श्रीराम

हनुमंतस्वामी विरचित

श्रीसमर्थ

रामदास स्वामी

यांचें चरित्र अथवा बखर.

श्रीराम

हनुमंतस्वामी विरचित

श्रीसमर्थ रामदास स्वामी

यांचें चरित्र अथवा बखर.

प्रकाशक.

मोरो बाबूराव गोगटे.

शके १८३१ सन १९१०.

किंमत २॥ रुपये.

मुंबई.
येथें गिरगांव गायवाडींत " गणपत कृष्णाजी प्रेस कंपनी "
च्या छापखान्यांत छापिलें.

म।१५१९८

प्रस्तावना.

श्रीसमर्थ रामदास यांची ही बखर त्यांचें सर्व चरित्र प्रत्यक्ष पाहिलेलें त्यांचे शिष्य हनुमंतस्वामी यांनीं लिहिली आहे. समर्थांनीं समाधि घेऊन आपलें अवतारकृत्य संपविल्यानंतर एक वर्षाच्या आंतच ही बखर लिहिली गेली आहे.

या बखरीला २०० वर वर्षें झालीं तरी तिची भाषा इतकी शुद्ध व सरळ आहे कीं, हल्लीं जे मराठींत उत्तम ठरलेले गद्यग्रंथ आहेत, त्यांत देखील इची प्रत बरीच वर लागेल. कुलीन स्त्रिया व पुरुष यांस ही बखर अत्यंत प्रिय आहे. समर्थांच्या अद्भुत चमत्काराविषयीं जरी कांहीं दीर्घ शहाणे शंकित होत असले तरी बहुतेक समाज श्रीसमर्थ यांस ईश्वरी अवतार समजत असल्यामुळें त्याविषयीं त्यांस पूर्ण आदर वाटत आहे.

ही बखर बरेच वर्षांपूर्वी यदुवंशीय कै० शेठ गोवर्धनदास लक्ष्मीदास यांनीं छापली होती; पण हल्लीं तिची प्रत दुर्मिळ झाली आहे. या नंतर आमच्या पाहण्यांत याच बखरीची एक हस्तलिखित प्रत आली; तिच्यांत हल्लीं नवीन होणाऱ्या चरित्र ग्रंथाप्रमाणें व्यवस्थेशीर भाग वगैरे पाडलेले होते. श्रीसमर्थचरणीं आमची अत्यंत निष्ठा असल्यामुळें व हल्लीं सदर बखरीची प्रत दुर्मिळ आहे असें आढळल्या-

मुळें पुस्तकप्रकाशनाचा आमचा उद्योग नसतांहीं आह्मांस हें कार्य हातीं घ्यावेंसें वाटलें; व तें निर्विघ्नपणें शेवटास गेल्यामुळें हा समर्थांचा गुप्त प्रसाद आपणांस झाला असें अंतःकरणास वाटून परमानंद होत आहे.

ही बखर ज्यांनीं पूर्वी प्रकाशित केली होती त्या शेट गोवर्धनदास लक्ष्मीदास यांचे सदर बखरीची लेखी प्रत दुरुस्त करण्याच्या कामीं त्यांच्या प्रतीचा आह्मांस बराच उपयोग झाल्यामुळें आह्मी अत्यंत आभारी आहों.

समर्थांच्या कृपेनें हा आमचा प्रयत्न आमच्या सर्व बांधवांस मान्य होईल हा भरंवसा आहे.

प्रकाशक.



श्री

समर्थ रामदासस्वामी यांचें

चरित्र अथवा बखर.

भाग १ ला. उपोद्घात.

श्री रघुपतये नमः॥ समर्थांचा जन्म शके १५३० कीलकनाम संवत्सरांत झाला आणि समाधि शके १६०३ दुर्मतीनामसंवत्सरीं झाली, या ७३ वर्षांमध्यें लीला बहुत झाल्या, चरित्रेंही अनंत जाहलीं, तीं सर्व सांगावयाची योग्यता कोणास आहे ? तथापि यथामतिकरून पूर्वीचे ग्रंथ व शिष्य मंडळीनीं चरित्रें लिहून ठेविलेलीं आहेत त्या आश्रयेंकरून सांगतों, तीं चरित्रें श्रवण करा म्हणोन आज्ञा करून हनुमंतस्वामी श्रीरामदासस्वामींचें चरित्र सांगते जाहले तें असें.

कलियुगाचीं वर्षें ४३२००० त्यांत मुळापासून म्हणजे शके १५३० कीलकनाम संवत्सरापर्यंत चार हजार सातशें नऊ वर्षें जाहलीं. " धर्माची ग्लानी जाहली असतां, मी अवतार घेऊन पुनः कर्म, ज्ञान, व उपासनारूप कांडत्रयात्मक वेदशास्त्र प्रतिपादित धर्मस्थापना करीन. अशी भगवन्ताची प्रतिज्ञा आहेच" हें व्यास आपल्या पुराणांतरीं सांगत आले, त्यावरून चहूंयुगां-

तहि होत आलें त्याच क्रमानें हल्लीं घोर कलि प्राप्त जाहला, त्याचीं सदतीस वर्षें गत जाहलीं, त्यावेळीं जे हिंदु राजे राज्य करीत होते, त्यांच्या दैविकसंपत्तीचा यक्ष होऊन आसुरीधर्म सर्वत्र व्याप्त होऊन सर्व पृथ्वी यवनाक्रांत जाहली, व वेदधर्म व सर्व यज्ञादि ब्रह्मकर्में यांचा उच्छेद जाहला, आणि मुख्यवर्ण व सर्ववर्णांचे गुरु जे ब्राह्मण ते यवनांच्या संपर्केंकरून वेदशास्त्रविहित जो धर्म, तो सोडणें भाग पडेल. आणि गाई, देव, ब्राह्मण, यांस बहुत पीडा होऊं लागली, ते समयीं श्रीभगवान् विष्णु यांना तें सहन न होऊन त्यांणीं श्रीसांब यांची प्रार्थना केली कीं, हा घोर कलि प्राप्त जाहला तरी दाहा हजार वर्षेपर्यंत कां त्रयात्मकवेदोक्ताचरण वर्णाश्रमधर्मानुसार चालावें (याप्रमाणें पुराणांत वर्णिलें आहे. कलियुगांत बौध्य अवतारासमयीं धर्माची ग्लानी होईल.) असें असतां सांप्रत पृथ्वी यवनाक्रांत व धर्मरहित जाहल्यामुळें उपासना व भक्तिमार्ग आदिकरून लुप्त जाहले. यास्तव आपण राजवेषानें व ऋषिवेषानें पृथ्वीचेठायीं अवतीर्ण होऊन धर्मस्थापना करून देवब्राह्मणादिकांची पीडा दूर होईल अशी कृपा केली पाहिजे. देवीपुराणांतील कथा अशी आहे कीं, कृतकर्मा ऋषी यांनीं देवी प्रसन्न व्हावी यासाठीं बहुत दिवस तपश्चर्या केली. त्या काळीं श्रीदेवीनीं प्रसन्न होऊन वर माग असें म्हणतांच ह्या ऋषींनीं विनंती केली कीं, मजला ब्रह्मपद द्यावें. हें देवीनें श्रवण करून हास्यवदन केलें आणि बोलिली कीं,

ब्राह्मणा हें काय मागितलेंस ? अस्तु, तुझी इच्छा ब्रह्मपद प्राप्तीची आहे तरी यज्ञ विच्छिन्न न होतां यज्ञामागें यज्ञ असे शंभर यज्ञ करावे. ज्या ऋषींच्या हातून यज्ञास प्रारंभ, त्यांचेच हातून शेवटास शंभर यज्ञ गेल्यास तुजला ब्रह्मपद प्राप्त होईल; या प्रमाणें आज्ञा करून देवी अदृश्य झाली. नंतर कृतकर्मा यांनीं सप्तऋषी आदिकरून ऋषींची प्रार्थना करून यज्ञास प्रारंभ केला. ते यज्ञ विच्छिन्न न होतां एकामागें एक असे पंचेचाळीस झाले. वर्षेंही पुष्कळ झालीं. यज्ञकर्मे करून ऋषींना श्रमही बहुत झाले. व यज्ञधूम्रेंकरून नेत्रांस व्यथा प्राप्त झाली. त्या समयीं सर्व ऋषींनीं कृतकर्मा यास सांगितलें कीं, सांप्रत यज्ञ समाप्त करावा. कालेंकरून यज्ञास प्रारंभ करूं. त्यावरून कृतकर्मा यांनीं ऋषींस विनंति केली कीं, यज्ञामागें यज्ञ असे शंभर यज्ञ व्हावे, मध्यें समाप्त झाल्यास माझी इच्छा पूर्ण होणार नाहीं. तेव्हां ऋषी बोलले कीं, तुला ब्रह्मपदाची इच्छा आहे तर दुसरें ब्रह्मांड तपःसामर्थ्यें निर्माण करून तुला ब्रह्मा करूं; मग या ब्रह्मांडाचा ब्रह्मा करण्यास अशक्य काय आहे ? परंतु सांप्रत शरीर वागत नाहीं याकरितां यज्ञ बंद करावा. कृतकर्मा याला ही गोष्ट न मानून आग्रहपूर्वक शेचाळिसावे यज्ञास प्रारंभ करविला. त्याकाळीं ऋषी बहुत संतप्त होऊन यज्ञांत विघ्न करावें असा संकल्प करून कृत्रिम गाय निर्माण केली. ती गाय यज्ञमंडपांत शिरून होमद्रव्य भक्षूं लागली. त्या गाईस कृतकर्मा यांणीं हैक क्षणतांच गाय पृथ्वीवर

पडून मृत्यु पावली. गोहत्या झाली असें ऋषींनीं पाहून आहुती टाकीत असतां तसेच उठले. विघ्न झालें हें कृतकर्मा यांणीं पाहून ज्ञानदृष्टीनें विचार करून पाहतां ऋषींनीं कृत्रिमेंकरून यज्ञास विघ्न केलें हें जाणून संतप्त होत्साता ऋषीप्रत शाप देता झाला कीं, कृतयुगांत कृत्रिम नसतां तुह्मीं कृत्रिम गाय निर्माण करून यज्ञास विघ्न केलेंत; एतदर्थ तुह्मीं कलियुगांत मृत्युलोकीं मानवयोनींत उच्च नीच योनी न पाहतां जन्म घ्यावा ह्मणून शापोकद् सोडिलें. हें सर्व ऋषिमंडळी यांनीं पाहून ते अति संतप्त झाले. त्या एकएकाचें सामर्थ्य असें होतें कीं, ते ब्रह्मांड भस्म करणार; परंतु विचार करून बोलले कीं, दुष्टा या युगांत कृत्रिम नाहीं ह्मणून तूं आह्मांस शाप दिलास हा युक्त धर्म आहे. परंतु ब्रह्मपदाची इच्छा धरून यज्ञ करितोस आणि परदुःख न जाणतां शाप देतोस हा धर्म नव्हे . एतदर्थ तुह्मीं कलियुगांत आपले परिवारयुक्त म्लेंछयोनींत जन्म घ्यावा असा शाप देऊन सर्व ऋषिमंडळी बद्रिकाश्रमाप्रत जाऊन तेथें श्री विष्णूची आराधना करूं लागले. त्या वेळीं श्रीभगवान प्रगट होऊन ऋषींना माझीय माझीय असें बोलून वर मागा ह्मणतांच सर्व ऋषी साष्टांग प्रणिपात करून विनंति करिते झाले कीं, महाराज आपण षड्गुण ऐश्वर्य युक्त, सर्वसाक्षी, सर्वांतरात्मा, आपणास सर्व विदीतच आहे, आमची वाट काय? त्याकाळीं श्री भगवान् मंदहास्य करून बोलतात कीं, तुह्मांस शाप झाला तो मम इच्छें करूनच झाला. त्या समयीं ऋषीमंडळी विनं-

... करितात कीं, महाराज आपला अपराध आह्मीं काय केला आहे? आह्मांविषयीं आपली इच्छा अशी कां झाली? या शापेंकरून पापयुगांत अनेक योनींत जन्म झाल्यास पापकर्म आचरून चौऱ्यांशींचे फेऱ्यांत पडूं आणि आह्मीं कृतकर्मा याचाही अपराध केला नाहीं. कारण तो ब्रह्मपदास अयोग्य हें जाणून व देहत्रासेंकरून यज्ञ समाप्त करावा असें सांगत असतां नकरी; यामुळें आह्मीं कृत्रिम गाय निर्माण केली. यास्तव श्रीनीं कृपा करून उद्धार करावा. आणि कलियुगांत आमचा जन्म न होय अशी कृपा करावी. याप्रमाणें प्रार्थना केली. त्यासमयीं श्री भगवान बोलते झाले कीं, कलियुग हें पातकाचा निधि, जगाचा उद्धार करण्यास्तव आह्मांस अवतार घेणें नाहीं. आणि जगाचा उद्धार तर झाला पाहिजे. एतदर्थ ही योजना करून तुह्मांस कलियुगांत जन्म घेण्याचें योजिलें आहे. तुह्मां बरोबर आह्मींही कलांशें कलीप्रमाणें अवतार धारण करून जगाचा उद्धार करूं. तुह्मीं ज्या ज्या योनींत अवतराल तेथें माझी उपासना करून तुह्मीं तर तरालच परंतु जग तारून ममपदाप्रती पावाल. याप्रमाणें ऋषींचें समाधान करून स्वस्थलाप्रति जाण्यास आज्ञा देऊन आपण अंतर्धान पावले. यानंतर कृतकर्मा यानेंही श्रीविष्णूची आराधना बहुत दिवस केली. त्याला प्रसन्न होऊन वर माग ह्मणतांच प्रणिपात करून श्री प्रभूप्रति प्रार्थना केली. महाराज, ऋषींनीं कृत्रिम गाय निर्माण करून माझे यागाचा विध्वंस केला व मलाही शाप

दिला. तो असा कीं, (न नीचो यवनात्परः) अतिनीच योनी जे यवन त्यांचे योनींत जन्म सांगितला, यास्तव श्रीनीं कृपाकरून दीनाचा उद्धार करावा. त्याकाळीं श्रीभगवान बोलते झाले कीं, बापा तूं देवीची आराधना करून देवीपाशीं वर मागितलास कीं मजला ब्रह्मपद प्राप्त व्हावें, ते समयीं देवीने हें पद प्राप्त व्हावयाचें नाहीं कारण सांप्रत ब्रह्मा कल्पी ब्रह्मपद ज्यास दिलें आहे तो हालवावयाचा नाहीं. पुढें भावी कल्प होणार त्या कल्पीं मारुती ब्रह्मा होणार तेव्हां तुला ब्रह्मपद कोठून प्राप्त होईल ? हें ब्राह्मणांनीं जाणून यज्ञांत विघ्न केलें याचा विचार तूं न करितां त्यांना शाप दिलास. अस्तु त्यांचें सामर्थ्य तुला भस्म करावयाचें असून त्यानीं कृपाकरून तुझा नीच योनींत जन्म होईल ह्मणून सांगितलें. दोन्हीही मम इच्छें करूनच झालीं. यांतील कारण घोरकली प्राप्त होणार त्याकाळीं दीनांचा उद्धार व्हावा, एतदर्थ ऋषींनीं शाप ग्रहण केला. त्यांस त्या युगीं जन्म देऊन साधू या नावें प्रख्यात करून मदंशयुक्तें जगाचा उद्धार करतील. तूं परिवारयुक्त म्लेंछ होशील. परंतु साधुआश्रयें करून उद्धार होईल. तुह्मीं सार्वभौम राजे व्हाल एतदर्थ संशय नधरितां स्वस्थानाप्रत जावें. ह्मणून आज्ञा करून श्री भगवान अदृश्य झाले. त्या योगें सांप्रत या कलियुगांत साधुअवतार असंख्य झाले त्यांतून ज्यांनीं जगविख्यात कीर्ती करून जगाचा उद्धार केला त्यांतील कांहीं नांवें सांगतों. तीं येणेंप्रमाणें—

श्रीशंकराचार्य.
श्रीनिरंजन स्वामी.
श्रीरामानंद स्वामी.
श्रीरंगनाथस्वामी
श्रीएकनाथ स्वामी.
श्रीकेशव स्वामी-
श्रीजयराम स्वामी.
वामन स्वामी पंडित.
श्रीनिवृत्तीदेव.
श्रीसोपानदेव.
श्रीचांगदेव.
श्रीमोरयादेव.
श्रीनामदेव.
श्रीज्ञानेश्वर.
श्रीतुकाराम.
श्रीमुकुंदराज.
श्रीनरहरिसोनार.
श्रीकाळा हरिदास.
श्रीविसोबा खेचर.
श्रीगोराकुंभार.
श्रीसांवतामाळी.

श्रीकृष्णापा आप्पा
श्रीपरसा भागवत.
श्रीनरसिमेहता.
माणकोजी बोधले.
श्रीमछेंद्रनाथ.
श्रीजालंदरनाथ.
श्रीगोरक्षनाथ.
श्रीगहिनीनाथ.
श्रीधनानाथ.
श्रीकानिफा.
श्रीगोपीचंद राजा.
श्रीभर्तृहरी राजा.
श्रीशाहूसेन.
श्रीभानुदास.
श्रीकूर्मदास.
श्रीरोहिदास.
श्रीसूरदास.
श्रीतुलसीदास.
श्रीमाधवदास.
श्रीपुरंधरदास.
श्रीकनकदास.

श्रीवरदराज.
श्रीमुक्ताबाई.
श्रीकर्माबाई
श्रीमिराबाई.
श्रीनिराबाई.
श्रीगिरीबाई.
श्रीजोगापरमानंद.
श्रीबहिरा पिसा.
श्रीरेणुकानंदन.
वाडवाळसिद्धनागेश
श्रीआनंदमूर्ती
श्रीकबीर.
श्रीकमाल.
श्रीकमाली.
श्रीचोखामहार.
श्रीबाजीपठाण.
श्रीसेखमहंमद.
श्रीलतीबखान.
श्रीमहंमद पठाण.
श्रीसजणाकसाई.

श्री शंकराचार्य स्वामीपासून दशपंथ झाले तेः—

१ गिरी. १ पुरी. १ बाल. १ भारथी.
१ परघट. १ परवत. १ आश्रम. १ इंद्र.
१ आरण. १ सारस्वत.

सदरीं नांवें लिहिलीं यां शिवाय साधुअवतार अनंत झाले, यांतच श्री शिवराजा म्लेंछ निवारणार्थ होणार त्याचे साह्यार्थ श्री मारुती अवतार गतकली चार हजार सातशें नऊ वर्षे यावेळीं श्री रामदास या नावें होऊन धर्म संस्थापना करितील ह्मणून भविष्योत्तर पुराणीं वर्णिलें आहे तें वाक्यः—

कृते तु मारुताख्याश्च, त्रेतायां पवनात्मजः
द्वापारे भीम संज्ञश्च, रामदासः कलौ युगे ॥ १ ॥

या प्रमाणेंच काशी खंडांत वर्णिलें आहे कीं, कलींत श्री विष्णुउपासना कोठपर्यंत चालावी तें वाक्यः—

कलौ दशसहस्राणि विष्णुः स्थास्यति मेदिनीं ॥
तदर्धं जान्हवो ज्ञेयं, तदर्धं ग्रामदैवतम् ॥ १ ॥

असें असतां ज्यावेळेस३७०० वर्षे गतकली होईल तेच समयीं घोर कली प्राप्त होऊन सिध्धार्थिनामसंवत्सरीं हिंदुराजे दैवीक संपत्तिवान यांचा क्षय होऊन आसुरी धर्म प्राप्त होईल.

अशी प्रार्थना ऐकून श्रीसांब यांणीं उत्तर केलें कीं, कलियुगीं पृथ्वी यवनमय व्हावी याविषयीं बृहन्नारदीय पुराणांत वाक्य आहे, व यवनाचार्यकृत रमल वाक्यही आहे, त्याप्रमाणें शालीवाहन शके[५१२]पांचशें बारांत पैगंबर उत्पन्न होऊन त्याणें सुल-

तानरूपदिलनामक यवनास वर दिला कीं, " हिंदूयांचें राज्य बुडवावें व देवब्राह्मणांस पीडा करावी, " असें पुराणांतही आहे, त्याप्रमाणें कलियुगीं जाहल्यास उपाय काय ?

ते समयीं श्रीविष्णु यांणीं विनंति केली जे–भविष्योत्तरादि पुराणीं कलीमध्यें दहा सहस्र वर्षे धर्म रहावा असें आहे, त्यास सांप्रत आपण अवतीर्ण होऊन धर्मसंस्थापना करावी आणि गाई ब्राह्मण व देव यांचें पालन करावें.

अशी श्री विष्णूची प्रार्थना श्रवण करून श्रीसांब यांणीं उत्तर केलें कीं, भविष्योत्तर पुराणांत वर्णिलें, त्याप्रमाणें आह्मीं भोंसले यांस वरही दिला आहे, त्यांच्या कुळात शिवनामेंकरून जन्म घेतो व वायुपुत्र मारुती यांणीं जमदग्निगोत्र ब्राह्मणकुळीं नारायणनामेंकरून श्रीगंगा पंचवटी जंबुग्रामीं जन्माला यावें आणि व्यास बृहस्पति आदिकरून ऋषींनीं अंशरूपें जन्म घेऊन सत्पुरुषांच्या वेषानें कर्म, ज्ञान, योग आणि उपासना यांची स्थापना करावी.

याप्रमाणें श्रीसांबानीं आज्ञा केल्यावरून महारुद्र मारुती यांणीं श्रीरामदाससद्गुरुरूपें पृथ्वीत अवतीर्ण होऊन ज्ञानवैराग्यसाध्य धर्मसंस्थापना केली व शिवाजीराजे यांवर अनुग्रह करून त्यांजकडून अमानुषकृत्यें करविलीं.

असें हनुमंतस्वामीचें वचन श्रवण करून पुन्हा श्रोत्यांनीं विनंति केली कीं, कृपाकरून श्रीशिवछत्रपति याचे हातून अमानुष कर्मे कशीं करविलीं? त्यासमयीं राज्यकारकीर्द कोणाची होती आणि समर्थांनीं या पृथ्वीतलाचे ठायीं अवतार घेऊन श्री शिवछत्रप-

तीवर अनुग्रह कसा केला? तें सर्व चरित्र आपण स्वमुखें सांगावें, ह्मणजे तें श्रवण करून कृतार्थ होऊं. या प्रकारें शिष्यमंडळीचा उत्सुकता पाहून हनुमंतस्वामीनीं श्रीसमर्थचरित्र शके १६४० विलंबीनाम संवत्सरीं ज्येष्ठ शुद्ध ५ शुक्रवारीं सांगितलें तें असें:-

पूर्वी वैकुंठवासी—तीर्थरूप श्रीगंगाधरस्वामी यांस शिष्यमंडळी यांणीं श्रीचें चरित्र श्रवण करण्यास्तव सज्जनगड मुक्कामीं प्रश्न केला त्याजवरून स्वामीनीं शिष्य मंडळी यांस सांगितलें कीं, श्रीसमर्थ याणीं लीलेंकरून जीं चरित्रें केलीं तीं त्यासमयीं ज्यांनीं ज्यांनीं पाहिलीं त्या त्या पुरुषांचे मुखेंकरून व तीर्थस्वरूप मातोश्री आकाचे मुखेंकरून श्रवण जाहलें तें व कल्याणस्वामी व उद्धवस्वामी व शाकाजीबावा व वासुदेव गोसावी व अंताजी गोपाळ वाकनीस व कुडाळकर देशपांडे इत्यादिकांनीं लिहून ठेविलेले व समर्थांनीं ग्रंथीं वर्णिलेले श्लोक अभंग इत्यादिकांचे आश्रयानें तुह्मांस सविस्तर श्रवण करवितों. शालिवाहन शके ५१२ त इंद्रप्रस्थीं पिठोर राजा होता त्याचा क्षय करून सुलतान रुपदिल यांनीं पैगंबराचे वरेंकरून राज्य घेतलें. त्या सुलतान रुपदिल याचे वंशांत सार्वभौम बादशाह बहुत झाले. त्यांचे राज्यांत उत्तरेकडील क्षत्रीय दक्षिणदेशीं येऊन विद्यानगरीं राज्य करीत असतां कांहीं-एक दिवसांनीं दक्षिणप्रांतीं कर्णाटकांत रामराजे ह्मणोन किष्किंधानगरीं राज्य करीत होते, त्यांणीं किष्किंधानगरीचें नांव विद्यानगर असें ठेवून सर्व दक्षिणप्रांतीं नर्मदातीरापासून रामेश्वरपर्यंत राज्य करूं लागले. त्याकाळीं साधुश्रीज्ञानेश्वर व नामदेव, परसाभागवत

गोरो कुंभार, सांवतामाळी, रेणुकानन्दन, भानुदास, विसोबा खेचर इत्यादि अंशावतारी साधु होते, त्यांचीं व रामराजांचीं परस्पर परमार्थाविषयीं संभाषणें व कीर्तनें होऊन आपले कारभारी जे हेमाडपंत त्यांसुद्धां श्रीपंढरीक्षेत्रीं येऊन श्रीचें दर्शन केलें. नंतर रामराजानें श्रीपांडुरंग यांस प्रसन्न करून आनागोंदी विद्यानगर येथें नेलें, आणि तेथें त्यांची स्थापना केली.

दिल्लीपतीच्या व रामराजाच्या कलहामुळें पूर्वीचेसमयींहीदौलताबादेस पादशाही नव्हती तर सुभाच होता, परंतु त्यासमयीं देश उजाड होता, तो पाहून हल्लीच्या सुभेदारांनीं कौल देऊन वसाहत करून लावणी करावी असें मनांत आणून जमीनदारांचा शोध करूं लागले, तों पूर्वीचे वृत्तिवान जमीनदार सर्व गेले, त्यांचीं कुलेंही राहिलीं नाहींत, असें पाहून जो कोणी ग्रामाची वसाहत व जमिनीची लावणी करील, त्यास तेथील, वृत्ति द्यावी असा नेम केला, त्यासमयीं कृष्णाजीपंत गोत्र जमदग्नि, सूत्रआश्वलायन, उपनाम ठोसर हे बेदरप्रांतीं राहात होते, तेथें राज्यक्रांति व दुष्काळ पडल्यामुळें, त्या प्रांतांतील गृहस्थ श्रीगंगातीरास येऊं लागले, त्यां बराबर कृष्णाजीपंतही कुटुंबसुद्धां गंगा दक्षिणतीरी मौजे हिंवरें तर्फ तालुके खेड प्रांत बीड येथें शालिवाहनशके ८८४ दुंदुभीनाम संवत्सरांत येऊन राहिले, त्यांस पुत्र पांचजण, पैकीं चौघे पुत्र पूर्वीच बेदरास झाले होते, व पांचवा पुत्र हिंवरें येथें आल्यानंतर झाला, त्या पुत्रांचीं नावें कचोपंत, २ राघोपंत, ३ हरीपंत, ४ आत्मारामपंत, ५ दशरथपंत, (यांस दादोपंत असें म्हणत होते.) त्यांत चौघे प्रौढ,

त्यांणीं बीडप्रांतीं गंगातीरीं राक्षसभुवन आदिकरून हिंवरें सुद्धां अठ्ठेचाळीस गांवची वसाहात केली. आणि बारा बारा गांव चौघांनीं वांटून घेऊन कुळकर्ण व ज्योतिष ही वृत्ति चालवूं लागले.

त्यासमयीं दशरथपंत लाहान होते ते पुढें प्रौढ वयांत विद्यासंपन्न जाल्यानंतर त्यांणीं आपले मनांत विचार केला, कीं चवघे बंधु यांनीं अठ्ठेचाळीस गांवची वृत्ति मिळविली, यांतच आपण विभाग मागावा, हा धर्म काय? तरि आपण नवीन स्वतंत्र वृत्ति संपादन करावी, ह्मणोन प्रगणें अंबाड गंगेच्या उत्तरतीरीं हिंवरें यापासून तीन कोसांवर तेथें पड पांढर पडली होती, त्या पांढरीचें पूर्वीचें नांव वडगांव असें होतें, तेथें बहुत दिवस वसाहत नव्हती. त्या ठिकाणीं गौळ्यांनीं वस्ती करून गौळवाडा वसवून होते, तेथें जाऊन गौळी लखमाजी यांस पाटिलकी देऊन आपण ज्योतिष व कुळकर्णपणाची वृत्ति मिळवून त्या गांवाचें पूर्वीचें नांव मोडून जांब असें नांव ठेवून वस्ती केली. जांबेसुद्धां बारागांवची वृत्ति मिळविली त्यांची नावनिशी येणेंप्रमाणेंः—

कसबे जांब.	मौजे सांकळगांव.	मौजे सोडगांव.
मौजे पोखरी.	मौजे सुरमेंगांव.	मौजे अंतरवेल.
मौजे हतगांव.	मौजे अरगडगव्हान.	मौजे आसनगांव.
मौजे निंब.	मौजे पाटोदें.	मौजे विरगव्हाण.

एकून बारा गांव संपादून शालिवाहन शके ९१० सर्वधारी नाम संवत्सरांत जांबगांवास येऊन राहिले.

त्यांस पुत्र सहाजण जाहले, त्यांचीं नामाभिधानें, १ रामाजीपंत २ लक्ष्मणपंत ३ भरतपंत ४ शत्रुघ्नपंत ५ हनुमंतपंत ३ वासुदेवपंत हे व्याकरणादि शास्त्रांत निपुण होते, (म्हणून यांस सिद्धांतव्यास असें लोक म्हणत असत.) हे श्रीरामाचे परम उपासक होते दशरथपंतांनीं स्वतां संपादन केलेले बारागांवा पैकीं प्रत्येकास दोन दोन गांव, असे विभाग करून दिल्हे. त्याप्रमाणें साहाजण आपआपल्या विभागास आलेल्या पैकीं गावांत जाऊन राहिले. दशरथपंतांचे कचोपंत आदिकरून चवघे बंधु कृष्णाजीपंतांनीं मिळविलेल्या अठेचाळीस गांवांच्या विभागाप्रमाणें आपापल्या वांटणीस आलेल्या गांवांपैकीं उभय गंगातीरस्थ राक्षस भुवन आदिकरून गांवीं राहिले.

आतां दशरथपंतांचे ज्येष्ठपुत्र रामाजीपंत; हे आपल्या विभागास आलेल्या श्रीगंगेच्या उत्तरभागीं आबड प्रांतीं असलेल्या जांबगांवास राहिले, पितामह कृष्णाजीपंत व पिते दशरथपंत हे श्रीरामउपासनेचे ठायीं परम तत्पर होते, त्याप्रमाणें रामाजीपंतही षट्कर्मे व श्रीरामभक्तियोग, यांत निष्णात आणि वैराग्यशील होते, त्यांस पुत्र १ हरीपंत, त्यांचे पुत्र निराजीपंत, (यांस निरंजन म्हणत होते) त्यांचे पुत्र शिवाजीपंत, त्यांचे पुत्र विष्णुपंत, त्यांचे पुत्र बमणाजीपंत (त्यांस ब्रह्मजी म्हणत होते) त्यांचे पुत्र गणेशपंत, त्यांचे पुत्र धोंडोपंत, त्यांचे पुत्र आत्मारामपंत, (त्यांस अलक्षपंत म्हणत होते) त्यांचे पुत्र गुंडोपंत, त्यांचे पुत्र निराजीपंत, त्यांचे पुत्र आत्मारामपंत, त्यांचे पुत्र शिवाजीपंत, त्यांचे

पुत्र विष्णुपंत, त्यांचे पुत्र केशवपंत, त्यांचे पुत्र रामजीपंत, त्यांचे पुत्र भवानजीपंत, त्यांचे पुत्र सूर्याजीपंत, त्यांचे पुत्र त्र्यंबकपंत, त्यांचे पुत्र सूर्याजीपंत, हे आणि पूर्वीचे कृष्णाजीपंत व दशरथपंत आणि रामाजीपंत मिळून सूर्याजीपंतांपर्यंत २२ पुरुष जाहले.

पुढें कांहींएका दिवसांनीं शालिवाहनशके १२०० यांत रामराजाचेच राज्यांतील यवन (६) साहाजण प्रबळ होऊन त्यांणीं त्यांचें राज्य हरण केलें. नंतर राजा निघोन रामेश्वर द्रविडप्रांतीं जाऊन राज्य करिता जाहला. इकडे साहा यवनांनीं विजापूर व दौलताबाद, गोंडवण आणि वऱ्हाड वगैरे ठिकाणें मिळून साडेसाहा सुभे करून विजापुरवाले यांजकडे दीड सुभा व पांचजणांकडे पांच सुभे येणेंप्रमाणें साडेसाहा सुभे वांटून घेऊन पादषाह दिल्लीपतीचे राज्यांत स्वतंत्र राज्य करूं लागले.

त्यासमयीं वर सांगीतल्यापैकीं नववे पुरुष गुंडोपंत होते सदरील साहाजण यवनांनीं रामराजाचा पराभव केला, ती कथा पूर्वी सांगीतलीच आहे, त्या साहा यवनांनीं शके १२०० पासून बारापर्यंत राज्य करून दिल्लीपति बादशाहा याशीं लढाई करून त्याचा पराभव केला, त्यावेळेस गुंडोपंत यांणीं अंबाड प्रांतांतील कुंभार पिंपळगांव, भडोज, विरगव्हाण, व गोनगांव, कावनई, अशा पांच गांवांचे कुळकर्णाची वृत्ति मिळविली; व अकरावे आत्मारामपंत, यांणींही पांच गांवांची वृत्ति आपल्या उपाध्यायास दिली. हे आत्मारामपंत, निराजीपंत, व वमणाजीपंत, हे तिघे ब्रह्मनिष्ठ ब्रह्मवेत्ते जाहले.

त्र्यंबकपंतांचे पुत्र सूर्याजीपंत हे परम तपस्वी, भागवतधर्मी व षट्कर्मी निरंतर तत्पर, व श्रीरामउपासना करून श्रीसूर्य आराधनाही बारा वर्षांपासून करीत होते, नित्य सूर्यअवलोकन व अर्घ्यप्रदान, नमस्कार, आदिकरून तीव्र तप प्रातःकाळापासून सायंकाळपर्यंत जप, ध्यान, आणि अर्चनविधींत निमग्न राहात असत, वृत्तीचें कार्य करणें तें रात्रौ करीत जाऊं, ह्मणोन ग्रामस्थांस व सर्व अधिकारी यांस त्यांणीं सांगोन ठेविलें होतें, याप्रमाणें तप करीत असतां दोन तपें गुजरलीं, वयही छत्तीस वर्षांचें जाहलें, परंतु पोटीं संतान झालें नाहीं, तेव्हां तप पूर्ण करून सर्व संग परित्याग करावा, आणि भगवत्प्राप्तीस्तव आजपर्यंत तप केलें तेंच पुढें साधन करावें, कदाचित् संतान जाहलें तरी परमभागवत व जगविख्यात असें व्हावें, नाहींतर अगदीं नाहीं, हेंच बरें, असें मानून परम सुखेंकरून राहिले.

अनंतर शके १५२५ शोभकृन्नामसंवत्सरीं माघशुद्धसप्तमी (रथसप्तमी) प्राप्त जाहली, तेदिवशीं तप पूर्ण करण्याचा नेम केला असतां तेच दिवशीं माध्यान्ह समयीं ब्राह्मणरूपेंकरून श्रीसूर्यनारायणांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन आज्ञा केली कीं, तूं उदासवृत्ति धरिलीस याचें कारण नाहीं, ज्याची तूं आराधना केलीस, तोच मी प्रत्यक्ष तुझे तर्पेकरून प्रसन्न होऊन वर द्यावा ह्मणोन प्राप्त जाहलों, वर माग. असें श्रीसूर्यनारायणाचें वाक्य श्रवणकरून सूर्याजीपंत यांणीं साष्टांग प्रणिपात करून हस्त जोडून समोर उभे राहून विनंति केली, जे आपण साक्षात् भगवान्

प्रसन्न जाहलांत, त्यापेक्षां आपल्यापाशीं नाशवंत वर काय मागावा, आपली कृपा संतत होऊन आपलें अक्षय पद मला प्राप्त व्हावें, या खेरीज अन्य वर मागावयाची इच्छा नाहीं, असें ह्मणतांच श्रीनारायण यांणीं उत्तर केलें, जें तुह्मीं ह्मणतां तें पद प्राप्त होईलच, परंतु प्रसन्न जाहलों त्यास वर देणें अवश्य आहे. तुह्मांस इच्छा नसल्यास तुमची स्त्री सौभाग्यवती राणुबाईस बोलवावें. ह्मणजे तिजला वर देऊन जाऊं, असें ह्मणतांच भगवन्, आपली आज्ञा प्रमाण, असें ह्मणोन आपले स्त्रीस बोलावून सांगीतलें कीं श्री भगवान् सूर्यनारायण प्रत्यक्ष वर द्यावयाकरितां आलें आहेत, तरी तुला जी इच्छा असेल तें मागावें. असें ह्मणोन जी श्रीमूर्ती ब्राह्मण रूपेंकरून पुढें उभी होती, तीस दाखविते जाहले, ते समयीं सौभाग्यवती राणुबाई श्रीसूर्यनारायणाचे चरणीं मस्तक ठेऊन विनंति करिती जाहली कीं, साक्षात् ईश्वर आपण प्रसन्न जाहलां, तरि आपल्याजवळ नाशवंत वर काय मागावेत तथापि स्त्रीजातीचे स्वभावाप्रमाणें पुत्रेच्छा असून आजपर्यंत पुत्र संतान नाहीं यास्तव परम भागवत एक पुत्र द्यावा यापरती इच्छा नाहीं.

असें तिचें भाषण श्रवण करून श्रीसूर्यनारायण यांनीं हास्य करून उभयतां परमनम्रतेनें समोर उभे पाहून उभयतांचे मस्तकीं हस्त ठेवून बोलते जाहले कीं, हीच आमची इच्छा असून पूर्वीचा संकल्पही असाच आहे, त्यास मदंशेंकरून एक व मारुती अंशेंकरून एक, असे दोन पुत्र तुह्मांस होतील, ते परम भागवत व श्रीरामउपासक होऊन श्रीगंगातीरीं व श्रीकृष्णतीरीं निवास

करून उभयतां जगदुद्धार करतील. या दोहों पुत्रांत जो माझा अंश तो वंशधर होईल, व मारुतीचा अंश तो ब्रह्मचारीच राहील. परंतु पुढील संवत्सरीं श्रीरामनवमीचे उत्साहांत श्रीरघुपतीचें दर्शन होऊन तुमचे मनोरथ पूर्ण होतील; असें सांगून भगवान् श्रीसूर्यनारायण अदृश्य जाहले.

" श्रीरामनवमीचा दिवस कधीं प्राप्त होईल " अशा उत्कंठेनें भगवदाज्ञेचें स्मरण धरून पूर्वीप्रमाणें चालत असतां शके १५२६ क्रोधीनामसंवत्सरीं चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्रीरघुपतीचे उत्सवास प्रारंभ करून प्रतिदिवशीं कीर्तनसमयीं हरिदासाचे पाठीमागें हात जोडून कीर्तनसमाप्तिपर्यंत उभे असून श्रीसूर्यनारायणाचे आज्ञेप्रमाणें श्रीरघुपतीचें प्रत्यक्ष दर्शन अद्यापि कां होत नाहीं. असा निदिध्यास हृदयीं वागवीत असतां, अष्टमीचे दिवशीं भजनी गोसावी बेदनापूरचे कुळकर्णी, राणूबाईचे बंधू आणि श्रीएकनाथस्वामींचे शिष्य, हे कीर्तनांत अद्वैत निरूपण करीत असतां प्रतिदिवशींचे क्रमाप्रमाणें त्यांचे मागें सूर्याजीपंत हस्त जोडून उभे आहेत, आणि मध्यरात्रीच्या सुमारास कीर्तनाचाही रंग बहुत चांगला होत चालला आहे, अशा समयीं श्रीमारुतीनें घोंगडीची खोळ व हातीं काठी घेऊन दरवाज्याबाहेर उभा राहून वेसकर याचे भाषेप्रमाणें बोलते जाहले कीं पारावर देवालयीं कांहीं काम आहे, याकरितां हुकमानीं तुह्मांस बोलाविलें आहे लौकर चलावें, असें त्याचें भाषण ऐकून सूर्याजीपंतांनीं सांगितलें कीं, कीर्तन समाप्त झाल्यानंतर येतों, असें त्याचें उत्तर ऐकून वेसकर पुन्हां बोलला कीं, फार

जरूरीचें काम आहे याकरितां लौकर चला, आणि परत येऊन कीर्तन समाप्त करा. असें ह्मणतांच ते समयीं पंतांनीं ही वृत्ति नको, असें बोलून दऊत लेखणी व रुमाल घेऊन पुढें मारुती व मागें आपण असे पारापर्यंत येतात तों पारावर दोघे पठाण हातीं तीर कमान घेऊन बसले होते, (त्यांस पाहून सूर्याजीपंत पारावर येऊन मनांत ह्मणतात) कीं, हे नवे कोण ? नित्यांतील मोकाशी नव्हेत, पाटीलही कोणी नाहींत, हें काय बरें ! असो मारुतीचें दर्शन करून मग बोलूं. असें ह्मणोन देवालयांत जाऊन श्रीमारुतीस साष्टांग प्रणिपात करून उठतात, तों तें देवालय परम दिव्यतेजेंकरून व्याप्त झालें, तें पाहून सूर्याजीपंतांस मूर्छा प्राप्त जाहली. ते समयीं किरीटकुण्डल पीतांबरधारी व हस्तांत धनुष्यबाण धारण करणारे श्रीरामलक्ष्मण, समीप येऊन आपादमस्तकपर्यंत हस्तस्पर्श करून पंतांस उठविते झाले. ते समयीं सूर्याजीपंत यांणीं प्रत्यक्ष श्रीरामचन्द्रजी, सीता, मारुति, लक्ष्मणासहवर्तमान चारही मूर्ति पाहून साष्टांगनमस्कार वारंवार घालून हस्त जोडून स्तुति करते जाहले व आनंदाश्रु, रोमांचादिक अष्टभावें करून युक्त होऊन अपार आनंदसमुद्रांत निमग्न जाहले.

अनंतर श्रीरघुवीरमूर्ति सिंहासनावर बसवून रामाचें ध्यान करिते जाहले, त्या समयीं श्रीराम सूर्याजीपंताप्रत बोलले कीं तुह्मांस श्रीसूर्यनारायणांनीं वरदान दिल्याप्रमाणें तुमचे मनोरथ पूर्ण जाहलेना ? आतां वर मागा. असें ह्मणतांच महाराज मनोरथ पूर्ण

जाहले, पूर्वी त्या रूपेंकरून पूर्णता केली, यासमयीं या रूपेंकरून आनंद केला व आतां वर माग म्हणतां परंतु आम्हांस वराची इच्छा नाहीं. असें पंतांचें वाक्य श्रवण करून श्रीराम हास्ययुक्त बोलले कीं, पूर्वी सूर्यनारायणानीं तुम्हांस वर दिलाच आहे, त्याप्रमाणें तुम्हांस दोन पुत्र होतील. एक सूर्यअंशेंकरून होणार तो परम भागवत व माझा उपासक आणि वंशधर होईल. दुसरा पुत्र श्रीमारुति अंशेंकरून होणार तो ब्रह्मचर्यव्रत धारण करून कृष्णातीरीं रहात असतां नवविधा भक्ति वाढवून जगदुद्धार करील.

असें बोलून श्रीरघुवीर पुन्हा म्हणतात कीं, तुमचे वंशज उपासक असतां तुम्हास मंत्रानुग्रह नसून परंपरेनें उपासनामात्र चालवितां, ती उपासना यथापद्धतीनें चालविल्यावांचून तुम्हांस पुत्र होणार नाहींत, याकरितां तुम्ही सद्गुरूपासून मंत्रानुग्रह घ्यावा, म्हणजे मनोरथ पूर्ण होऊन कैवल्यही प्राप्त होईल.

असें भगवद्वाक्य श्रवण करून पंत बोलिले कीं महाराज, वाडवडिल उपासना करीत आले त्याप्रमाणें मीही करितों, परंतु मंत्रानुग्रह पित्यापासून व्हावा, तो मी लहान असतां पिता शांत झाला, म्हणोन मंत्रानुग्रह जाहला नाहीं, उपासना मात्र परंपरेप्रमाणें चालवून सूर्यआराधना करित आलों. आतां सद्गुरूपासून मंत्रानुग्रह घ्यावा अशी श्रीची आज्ञा, त्यास महाराज आपणाखेरीज अन्य सद्गुरु कोण आहे, आपण जगद्गुरूच आहां, यास्तव कृपा करावी.

असें म्हणतांच श्रीनीं हास्य करून मस्तकीं हस्त ठेवून त्रयोदशाक्षरी मंत्राचा अनुग्रह केला, तेसमयीं पंतांस आनंद होऊन रोमांच स्फुरण घ कंठ सद्गदित झाला. तेवेळीं दुसरें कांहीं न सुचतां साष्टांग नमस्कारमात्र करून उभे असतां श्रीरामचंद्र पुनः (अभयहस्त मस्तकीं ठेवून) "तूं जें पूर्वी तप केलेंस तेणेंकरूनच मी संतुष्ट जाहलों, तरि आणखी मागावयाची इच्छा असेल तें मागावें" म्हणून आज्ञा करिते जाहले. तेसमयीं पंत म्हणतात कीं, स्वामीचे दर्शनानेंच मी कृतार्थ आहें, देणेंच असल्यास कृपाकरून भक्ति, वैराग्य, आणि आपले पदाची प्राप्ति व्हावी. इतकेंच मागणें आहे, याखेरीज कांहीं इच्छा नाहीं. असें ऐकून भगवान् बोलले कीं, तथास्तु, तुझे जन्माचें सार्थक जाहलें, तुझे उभयतां पुत्र भागवत व जगविख्यात होऊन, पृथ्वीचेठायीं ज्ञान, वैराग्य, भक्तिमार्ग विच्छिन्न झालेला पुनः स्थापन करून जगदुद्धार करतील. अशी श्रीरामाची आज्ञा जाहली, तेसमयीं (चरणीं मस्तक ठेवून) महाराज ! मी कृतकृत्य जाहलों, परंतु मजला दर्शन जाहलें हें वारंवार कसें घडेल अशी पंतांची प्रार्थना ऐकून पुढें बोलावून ताम्रधातुमय, पट्टाभिषिक्त आणि वामांकीं सीताबाई अशी श्रीराममूर्ति व लक्ष्मण आणि मारुति अशा चार मूर्ति देऊन या मूर्तीचें यथाविधि पूजन करावें, म्हणजे सर्वदा माझें सांनिध्य होईल, असें म्हणून श्रीराम अदृश्य जाहले.

भाग २ रा.

जन्म व बालपण.

नंतर सूर्याजीपंत परमसंतोषातें पावून त्या मूर्ति घेऊन घरास आले, आणि त्यामूर्ति देव्हाऱ्यांत ठेवून रुमाल व कलमदान देवापाशीं ठेविलें, (तें कलमदान अद्यापि परळीस आहे) आणि नित्यक्रमाप्रमाणें कीर्तन समाप्ति जाहल्यानंतर राणूबाईस सविस्तर वर्तमान सांगितलें, आणि मूर्तींचें दर्शन करविलें, त्यासमयीं दर्शन करून परमसंतोषातें पावून प्रार्थना केलीं कीं, प्रत्यक्ष दर्शन मला दिलें नाहीं, बरें असो, हेंच प्रत्यक्ष दर्क्षन, असा संतोष मानून उभयतां त्या मूर्तींचें आराधन परम भक्तीनें करीत असतां कांहीं दिवसांनीं सौभाग्यवती राणुबाई गरोदर होऊन नवमास पूर्ण होतांच ज्येष्ठ पुत्र शके १५२७ विश्वावसु नाम संवत्सरीं मार्गशीर्ष वद्य त्रयोदशीस जाहले. नंतर बाईनीं " मजला पुत्र जाहला म्हणजे तुझें नांव ठेवीन " असा पूर्वी श्रीगंगेस नवस केला होता, त्याप्रमाणें पुत्राचें गंगाधर असें नाव ठेविलें, त्यानंतर तीनवर्षांनीं शके १५३० कीलक नाम संवत्सरीं चैत्र शुद्ध नवमीस रामजन्मसमयीं द्वितीय पुत्राचें जन्म जाहलें. तेव्हां सूर्यप्रसादें करून पुत्र जाहला म्हणून नारायण असें नाम ठेविलें.

उभयतां पुत्र होण्यापूर्वी भानजी गोसावी हे बोधलापुरचे कुळकर्णी राणुबाईचे बंधु, हे श्रीएकनाथ स्वामीचे शिष्य होते,

यास्तव श्रीप्रतिष्ठानास प्रतिवर्षीं श्रीजनार्दन स्वामीचे पुण्यतिथीस फाल्गुन वद्य ६ स जात होते, त्यांसमागमें सूर्याजीपंत व राणूबाई हीं उभयतां पुण्यतिथीच्या उत्साहांत जात असत, तेसमयीं श्रीनाथजी हे अत्यादरें उभयतांस पोटाशीं धरून प्रतिवर्षीं बोलत असत, कीं, तुमची उपासना व दृढभक्ति उत्कृष्ट आहे, यास्तव तुमचे उदरीं भगवद्भक्त दोन पुत्र होऊन जगदुद्धार करतील. त्याप्रमाणें प्रथम ज्येष्ठ पुत्र जाहला तेवर्षीं फाल्गुनमासीं उभयतां त्या मुलास दर्शनास घेऊन गेले, तेव्हां श्रीनाथांनीं मुलास अवलोकन करितांच उठून मुलास घेऊन पोटाशीं धरून बोलते जाहले कीं, हा तुमचा पुत्र श्रीरामभक्तिपरायण होईल आणि श्रीगंगातीरीं राहून जगदुद्धार करील. असें बोलून त्यापुत्राचें श्रेष्ठ असें नांव ठेऊन परमसंतोषानें प्रतिवर्षीं आदर करीत होते.

नंतर कांहीं दिवसांनीं पुत्र नारायणबावा हा जाहला; त्यासही दर्शनास घेऊन गेले, तेव्हां श्रीनाथ अवलोकन करितांच सामोरे आले, नंतर पंत आपल्या मुलास नाथाचे पायांवर घालणार, तों पूर्वी आपणच घेऊन चुंबन व आलिंगन देऊन परमसंतोष पावून या उभतांस ह्मणते जाहले कीं, धन्य तुमची कूस व धन्य तुमची उपासना, तुमचें किती वर्णन करावें, साक्षात् मारुतीच तुह्मास पुत्र जाहला, हा परमसमर्थ श्रीकृष्णातीरीं राहून जगविख्यात होऊन जगदुद्धार करील. कोणी एक शककर्ता राजा होईल त्याचे हातून पृथ्वीचा भूभार हरण करवून धर्मसंस्थापना करवील व करील. असें वारंवार स्तवन करून हृदयीं सदृढ धरून सांगितलें कीं, आ-

मचे हातून घडावयाचें कार्य राहिलें, तें हे उभयतां तुमचे पुत्र शेवटास नेतील, तरि आह्मी आतां आपला अवतार समाप्त करितों. असें ह्मणून त्यांस कांहीं दिवस आपले जवळ ठेवून घेऊन निरोप दिला. नंतर शके १५३१ सौम्यनाम संवत्सरीं फाल्गुन वद्य ६ स नाथांनीं आपला अवतार समाप्त केला.

नाथांचा निरोप घेऊन सूर्याजीपंत पुत्रांसहवर्तमान आपल्या घरीं आले, नंतर ज्येष्ठपुत्र गंगाधर यास पांचवें वर्ष प्राप्त जाहलें, तेव्हां त्याचा व्रतबंध केला, व समर्थांचाही त्या प्रमाणेंच पांचवे वर्षी व्रतबंध केला. पुढें ज्येष्ठ पुत्राचा सातवे वर्षी अंबाडकर देशमुख सामवेदि काश्यपगोत्री यांची कन्या सांगून आली, तिच्याशीं विवाह केला, त्यानंतर श्रेष्ठांचें दहा वर्षांचें वय जाहलें, ते समयीं त्यांनीं सूर्याजीपंतांची प्रार्थना केली कीं, आह्मास अनुग्रह द्यावा. तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं देव्हाऱ्यांत श्रीच्या मूर्ती आहेत त्यांची प्रार्थना करून तुह्मास काय मागावयाचें असेल तें मागावें, अथवा श्रीमारुतीचे देवालयांत जाऊन त्यांजवळ मागावें.

अशी पंतांची आज्ञा होतांच श्रेष्ठ श्रीमारुतीचे देवालयांत जाऊन उपोषित असतां अकरा दिवसपर्यंत श्रीमारुतिकवचाचें पठण करीत बसले, तों अकरावे दिवशीं मध्यरात्रीस श्रीमारुति यांणीं प्रत्यक्ष दर्शन देऊन काय इच्छा आहे, ह्मणून विचारिलें. त्यासमयीं श्रेष्ठांनीं विनंति केली कीं, अनुग्रह द्यावा, ही इच्छा आहे. या व्यतिरिक्त कांहीं एक नाहीं असें ह्मणतांच मारुती ह्मणाले कीं, मजवर ज्याणीं अनुग्रह केला त्यांकडूनच तुह्मास अनुग्रह करवितों.

असें बोलून मारुतीनीं श्रीरामाचें ध्यान केलें. त्याबरोबर साक्षात् श्रीरघुपतीनें दर्शन देऊन त्रयोदशाक्षरी मंत्राचा उपदेश करून रामीं रामदास, असें नांव ठेवून याप्रमाणें उपासनाक्रम चालाववा, असें सांगून अदृश्य जाहले. (हा अनुग्रह शके १५३६ आनंदनामसंवत्सरीं फाल्गुन शुद्ध ११ स जाहला) त्यासमयीं नारायणबावा यांचें वय सातवर्षांचें जाहलें असतां सूर्याजीपंत हे शके१५३७ राक्षसनाम संवत्सरीं मार्गशीर्ष शुद्ध ९ स वैकुंठवासी जाहले. नंतर श्रेष्ठ, लोकांस अनुग्रह देऊं लागले, हें पाहून कोणे एके समयीं आह्मास अनुग्रह द्यावा ह्मणून नारायणबावा यांणीं श्रेष्ठांस विनंति केली. तेव्हां श्रेष्ठ बोलिले कीं, तुमचें वय अल्प आहे, अनुग्रहास योग्य व्हाल, तेव्हां अनुग्रह देऊं; अनुग्रह तुमचे घरचाच आहे. पुढें आपल्यास कार्य करणेंही पुष्कळ आहे. येव्हांच गडबड करावयाचें कारण नाहीं, असें श्रेष्ठांनीं ह्मटल्यावरून त्यांवर रुसून मारुतीचे देवालयांत जाऊन बसले, ते समयीं कांहीं अभंग केले आणि श्रमी होऊन श्रीमारुतीचे पाठीमागें निद्रा केली तेव्हां, श्रीमारुतीनें येऊन पाठ थापटून जागृत करून प्रत्यक्ष दर्शन दिलें, आणि बोलिले कीं, तूं चिंताग्रस्त कां ? आणि काय इच्छा आहे, ती सांग. असें ह्मटल्यावरून श्रीमारुतीच्या चरणीं मस्तक ठेऊन विनंति केली कीं, अनुग्रहाची इच्छा आहे, दुसरें कांहीं एक मागणें नाहीं. तेव्हां मारुति बोलिले कीं, या गोष्टीची चिंता करूं नये. मदंशेंकरून श्रीनींच तुह्मांस निर्माण केलें आहे, तरि श्रीरघुपतीचे इच्छेंकरून तुमचेही

मनोरथ पूर्ण होतील आणि तुमचें वयही अल्प आहे, यास्तव श्रेष्ठ म्हणाले, तेंही ठीकच आहे. तेव्हां समर्थांचें म्हणणें पडलें कीं, कालेंकरून घडावयाचें तें मला इष्ट नाहीं, याच समयीं अनुग्रह न जाहल्यास माण ठेवणार नाहीं, असा निश्चय पाहून मारुतीनें हास्य करून बहुत बरें, असें म्हणून त्या समयीं श्रीरघुपतीचें दर्शन करविलें, नंतर श्रीरघुपतीनें प्रसन्न होऊन अनुग्रह करून मस्तकीं हस्त ठेवून आज्ञा केली कीं तुम्हांस मारुतीचे अंशेंकरून निर्माण केलें आहे, तरि कलीचे प्रथमचरणींच म्लेच्छमय पृथ्वी झाल्यामुळें धर्म व वेदमर्यादा राहिलि नाहीं, हें जाणून पूर्वी उत्तर देशांत मदंशेंकरून व सांबअंशेंकरून साधु उत्पन्न होऊन त्यांणीं वेदधर्मस्थापना केली, सांप्रत दक्षिण देशीं कृष्णातीरीं तुम्हीं जाऊन धर्मस्थापना करून भक्ति व उपासना वाढवावी, आणि जगदुद्धार करावा, आणि म्लेच्छांचे निवारणार्थ सिसोदे यांचे वंशीं शिवनामेंकरून राजा उत्पन्न होणार आहे, त्यास तुम्हीं साह्य होऊन अनुग्रह देऊन धर्मस्थापना करावी. याप्रमाणें आज्ञा करून रामदास असें नाम ठेविलें, आणि अदृश्य जाहले.

हें कृत्य जांबेंत पंचवटी म्हणून जें स्थळ आहे, तेथें मारुतीचे देवालयांत शके १५३८ नलनामसंवत्सरीं श्रावण शुक्ल ८ स अर्धरात्रीं जाहलें. या पंचवटीचें वर्णन स्वामीनींच आपले कवितेंत केलें आहे, यावरून नाशिकाजवळचे पंचवटींत झालें म्हणून कोणी म्हणतात तें खरें नाहीं.

इकडे घरीं नारायण रुसून गेला, ह्मणून श्रेष्ठ आणि मातोश्री हे, गावांत व रानांत व पंचवटी व अश्वत्थ आदिकरून शोध करित असतां शोध लागेना, ह्मणून मातोश्री बहुत श्रमी होऊं लागली, तेव्हां श्रेष्ठ अकस्मात मारुतीचे देवालयांत आले आणि मारुतीस नमस्कार करून प्रदक्षिणा करावयास गेले, तों पाठीमागें समर्थांची गांठ पडली. तेथें त्यांस पोटाशीं धरून समजावून हनवटी धरून मुखाकडे पाहातात तों श्रीरघुपतीचा अनुग्रह प्रसाद जाहल्याचें चिन्ह पाहून बहुत संतोष पावले, आणि बापा! त्वां बहुत उत्तम केलेंस, श्रीची आज्ञा जाहली, त्याप्रमाणें कालेंकरून श्रीकृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करशील. आतां घरीं चलावें असें बोलिले, तेसमयीं समर्थानीं श्रेष्ठांस साष्टांग नमस्कार करून विनंति केली कीं, श्रीची कृपा जाहली, ती आपलीच कृपा आहे. पुढें आज्ञा होईल तशी वर्तणुक करीन, असें ह्मणतांच श्रेष्ठांनीं पोटाशीं धरून परम संतोषीत होऊन श्रीचे आज्ञेप्रमाणेंच करावयाचें, असें ह्मणून घरास घेऊन आले, तेव्हां मातोश्रीही समाधान पावली.

पुढें कोणेएके दिवशीं श्रेष्ठांस मातोश्री आज्ञा करिती जाहली कीं, नारोबाचें लग्न करावें. असें ह्मणतांच श्रेष्ठांनीं उत्तर केलें कीं, नारोबाचें लग्न कराल तर नारोबा हातांतून जाईल आणि आपणास बहुत दुःख होईल ही गोष्ट कामाची नाहीं, असें ह्मणतांच मातोश्री बोलिली कीं, आपला वंश फार नाहीं याकरितां दोघांचीही वंशवृद्धि जाहली पाहिजे. यास्तव अवश्यमेव लग्न कर्तव्य आहे, असें ह्मणून वधूचा शोध करूं लागलो. तेव्हां गांवांतील

लोक व इष्टमित्र "तुमचें लग्न मातोश्री करितात" असें समर्थांस ह्मणाले असतां, त्यांचा तिरस्कार करावा व उठोन जावें व रागें भरावें, किंवा दगड मारावे व वृक्षावर चढून या वृक्षावरून त्या वृक्षावर उड्या माराव्या आणि श्रेष्ठ आले, तर मात्र समजून घरीं यावें, असा क्रम चालू असतां कोणेएके समयीं कोणीएकानें लग्नाची गोष्ट काढिली, ह्मणोन समर्थ रुसून वडाचे वृक्षावर जाऊन बसले. वाड्यांतून बोलवावयास कोण लोक गेले, त्यासमयीं त्या झाडाखालीं मोठा ओढा होता, त्या ओढ्याचे पाण्यांत समर्थानीं उडी घातली. त्या वेळीं चोहींकडे हाहाःकार जाहला. नारायण पाण्यांत बुडाला ही बातमी गांवांत येतांच श्रेष्ठही धांवून आले. ते येण्याचे पूर्वी जमलेल्या माणसांपैकीं कांहीं माणसें पाण्यांत बुड्या मारून शोधीत होतीं परंतु कोणासही सांपडले नाहींत. मातोश्रीस वर्तमान समजलें तेणेंकरून तिला फार दुःख जाहलें. इकडे श्रेष्ठ येऊन त्याणीं डोहाचे कांठीं उभे राहून नारायणा बाहेर ये, असें ह्मणतांच समर्थ बाहेर आले त्यांस घेऊन सर्व मंडळी घरीं आली. मातोश्रीनीं पोटाशीं धरून समाधान केलें आणि ह्मणाला नारोबा ! असें अद्भुत कर्म करतोस हें बरोबर नाहीं. याकरितां असें करूं नये. तेवेळीं समर्थांच्या कपाळास खडक लागून टेंगुळ आलें होतें तें समाधिपर्यंत तसेंच होतें.

नंतर मातोश्रीनीं विचार केला कीं, लग्नाची गोष्ट काढिली असतां हा असें करितो. तरी यास कांहीं बोध करावा, असें मनांत

आणून त्यास एकांतीं बोलावून बोलिली कीं, बापा मी सांगतें ती गोष्ट मान्य करशील काय ? असें ऐकून समर्थ बोलिले कीं मी आपले आज्ञेबाहेर नाहीं, " न मातुः परदैवतं " असें शास्त्र आहे. त्यास आज्ञा करावी असें म्हणतांच तुम्हीं लग्न करीत नाहीं, लग्नाची गोष्ट काढिली असतां रागें भरतां, तर असें करूं नये. अंतःपट धरीत तों पर्यंत नाहीं असें म्हणूं नये, तुम्हांस माझी शपथ आहे. असें मातोश्रीचें वाक्य श्रवण करून ' उत्तम आहे, असें म्हणून त्या दिवसापासून पूर्वीचे प्रकार सर्व सोडून दिल्हे. नंतर मातोश्रीनीं लग्नाचा उद्योग करून आपले बंधु भानजीपंत बा दनापूरकर यांची कन्या योजून निश्चय केल्यानंतर सर्व आसनगांवीं लग्नास गेले. सीमंतपूजनापासून अंतःपट धरी पर्यंत सर्व यथास्थित झालें. पुढें ब्राह्मणांनीं अंतःपट धरून मंगलाष्टकें म्हणावयाचे पूर्वी सावधान असें म्हणतांच ' सावधान ' याचा अर्थ काय ? असें समर्थांनीं विचारितांच 'इतःपर संसाराची बेडी तुमचे पायांत पडली ' असें ब्राह्मणांचें वाक्य श्रवण करून समर्थांनीं विचार केला कीं पूर्वी मी सावध आहेंच, हल्लीं ब्राह्मणही म्हणतात, आणि मातोश्रीची शपथही एथपर्यंतच होती, आतां तिचे वचनांतून पार पडलों. अतःपर येथें गुंतून राहणें ठीक नाहीं. असें म्हणून तेथून पलायन केलें, ते जांबगांवीं अश्वत्थाचे वृक्षावर जाऊन बहुत निबिड व अवघड जागेंत बसले, ते त्या वृक्षावर तीन दिवस तसेच राहिले.

इकडे लग्नाचे समारंभांतून समर्थ पळून गेले, हें ठीक नाहीं, तर शोध करावा; असा विचार करून सर्वत्रांनीं व मातोश्रीनीं बहुत शोध केला, परंतु कोठेंच ठिकाण लागेना, म्हणून त्या मुलीस दुसरा वर पाहून लग्न केलें. नंतर मातोश्री फार शोक करूं लागली, तेव्हां श्रेष्ठांनीं मातोश्रीचें समाधान बहुत प्रकारें केलें आणि म्हणाले, कीं पूर्वीच मी विनंति करीत होतों कीं, नारायणाच्या लग्नाची गोष्ट काढूं नये, काढली असतां हातचा जाईल, तेंच जाहलें. अस्तु होणार त्यास उपाय काय, आपण शोक करूंनये.

कांहीं कालेंकरून त्याची भेट होईल असें समाधान करून मातोश्रीसहवर्तमान स्नानसंध्यादिकर्में करून स्वस्थ राहिले. आणि जगदोद्धारास्तव भक्तिरहस्य इत्यादि ग्रंथ करून नवविधा भक्ति वाढविली. पुढें स्वामीसमर्थ अश्वत्थावरून चौथे दिवशीं उतरून श्रीगंगातीरीं नाशिकाजवळ पंचवटीस गेले, " तेसमयीं समर्थांचें वय बारावर्षांचें होतें. " तेथें जाऊन श्रीरामचंद्राचें दर्शन करून पूर्वेस पंचवटी नजीक टांकळी म्हणून गांव आहे. तेथें गुहेंत राहून मंत्रपुरश्चरणाचा बेत शके १५४२ रौद्रनामसंवत्सरीं माघ शुद्ध ७ स बारावर्षांत तेराकोटी जपसंख्या करण्याचा निश्चय केला. मातःकाळीं उठून श्रीगंगेंत कंबरे इतक्या पाण्यांत उभेंराहून जप करावा त्या समयीं मासे डसून अंगाचें मांस तोडीत असत. तेणेंकरून क्षतें पडत व नाशिकजलाचे खालीं सर्व अंग पांढरें दिसे. यामाणें अति तीव्र, वैराग्येंकरून बारावर्षांच्या नेमानें पुरश्चरण करीत असतां, श्रीरामचंद्रांनीं आज्ञा केली कीं, इतकें तीव्र वैराग्ययुक्त

ग्रंथ संग्रह

पुरश्चरण करितां याचें कारण नाहीं. पूर्वी तुह्मांस श्रीकृष्णातीरीं जाण्यास सांगितलें त्याप्रमाणें लवकर जावें. त्यावेळीं समर्थांनीं आज्ञेप्रमाणें जातों ह्मणून विनंति केली; परंतु सर्व काळ पुरश्चरण, भजन, पूजन, यांत घालवीत असत. प्रतिदिवशीं दोन प्रहरपर्यंत पुरश्चरण करून पंचवटीस येऊन मधुकरी घेऊन श्रीरघुपतीस नैवेद्य समर्पण करून नंतर गुहेंत येऊन भोजन करीत असत. याप्रमाणें कांहीं दिवस गेले तों, एकेसमयीं टांकळीपासून, उत्तरेस एक कोसावर दसकपंचक गांव आहे, तेथें एक अत्रिगोत्री कुळकर्णी रहात असे, तो द्रव्यसंपन्न असून संतान नसतां पूर्ववयांतच त्यास क्षयरोग प्राप्त झाला. तेव्हां त्याच्या स्त्रीनें ब्राह्मणांकडून औषध उपाय बहुत केले; परंतु तो रोग असाध्य जाहल्यामुळें तो मृत्यु पावला. त्याची परमपतिव्रता स्त्री सहगमन करावें ह्मणून सर्व साहित्य करून गंगातीरीं टांकळीस आली, तों समर्थ मध्यान्हसमयीं ब्रह्मयज्ञाकरितां गंगेस आले, तेव्हां या बाईनें समर्थांस दुरून पाहून हे कोणी भव्य, तेजस्वी सत्पुरुष आहेत, असें समजून जवळ येऊन नमस्कार केला, तों समर्थांचे मुखांतून 'अष्टपुत्र सौभाग्यवती भव' अशीं अक्षरें निघालीं, तेसमयीं बाईनें हात जोडून विनंति केली कीं, आपण 'अष्टपुत्रा सौभाग्यवती' ह्मणून आशीर्वाद दिल्हा, तो याजन्मीं किंवा पुढील जन्मीं ? असें ह्मणतांच स्वामीनीं तिजकडे पाहिलें, तों बाईबराबर मंडळी होती, त्यांणीं विनंति केली कीं, बाईचा भ्रतार पंचत्व पावला, बाई सहगमनास आली आहे, ह्मणून सांगितलें. तें श्रवण करून रामदासांनीं

श्रीरघुपतीचें स्मरण केलें आणि बाईच्या भ्रताराचे प्राण कसे गेले तें पाहूं, असें म्हणून प्रेत जवळ आणविलें आणि ब्रह्मयज्ञ करीत असतां श्रीगंगोदक त्या शवावर सिंचन केलें, त्या बरोबर तें प्रेत निद्रितासारिखें सजीव होऊन रामराम असा मुखानें उच्चार करीत उठून बसलें. नंतर बाईस स्वामी बोलिले कीं, बाई ! आम्ही आशीर्वाद दिल्याप्रमाणें याचजन्मीं तुजला आठ पुत्र व शिवाय दोन पुत्र एकूण दाहा पुत्र होतील.आणि सौभाग्यवती आमरणांत राहशील. स्वस्थ असावें आणि भ्रतार घेऊन घरास जावें म्हणून आशीर्वादरूप आज्ञा होतांच उभयतां स्त्रीपुरुषें स्वामीस व गंगेस साष्टांग वंदनकरून संजीवन जाहलेल्या कुळकर्ण्यानें त्यास्थानीं असलेल्या ब्रह्मवृंदांस नमस्कार करून बोलिला किं,मला यमदूतांनीं नेऊन यमापुढें उभा केला आणि पुढें ते मला प्रश्न करणार तों समर्थ ब्रह्मयज्ञ करीत आहेत हीच मूर्ति सभेस आली,तेव्हां यमानें उठून आपल्या आसनीं यांस बसवून हस्त जोडून विनंति केली कीं, आपलें येणें कां झालें. तेव्हां यांनीं सांगितलें कीं, हा ब्राह्मण आपले दूतांनीं आणिला आहे यास तूर्त माघारा पाठवून द्यावा. या प्रमाणें सांगून उठून आले. नंतर मला सांगिलें कीं, तूं माघारा जा तुला दाहा पुत्र होतील. नंतर कालेंकरून तुझे स्त्रीस आणूं मग तुला आणूं त्यावरून मी माघारा आलों. यमसभेंत जी मूर्ति पाहिली ती हीच होय, असा वृत्तांत सांगून त्यानें समर्थांस पुनः साष्टांग नमस्कार केला. त्यानें सांगितलेलें चरित्र ऐकून सर्वांस फार आश्चर्य वाटून ते म्हणूं लागले कीं, आम्हीं पूर्वी यांस कोणी साधारण तपस्वी ब्राह्मण

बे. म. म. व. रा. दांडेकर
ग्रंथ संग्रह

आहे असें मानीत होतों; परंतु यांची योग्यता मोठी असून केवळ ईश्वरी अंशच आहेत असें ह्मणून समस्त ब्राह्मणमंडळीनीं समर्थांस नमस्कार करून त्यांचें स्तोत्र केलें. तेव्हां सर्व ब्राह्मणांस समर्थांनीं साष्टांग नमस्कार करून श्री केवळ देवब्राह्मणांचा दास आहें. हा ब्राह्मण सांगतो तें सर्व चरित्र श्रीरघुपतीचे इच्छेंकरून ह्मालें आहे. असें त्यांस सांगून त्या स्त्रीपुरुषांस सांगितलें कीं, तुह्मीं उभयतांनीं गंगास्नान करून समस्त ब्राह्मणांस वंदन करावें आणि आपले स्वगृहीं जावें. नंतर मंडळीसहवर्तमान आनंदयुक्त होऊन आपले गांवास गेलीं.

त्यानंतर गांवाहून नित्य प्रातःकाळीं उभयतांनीं येऊन श्रीची पूजा करून दर्शन घेऊन जावें, याप्रमाणें करीत असतां कांहींएक दिवसांनीं बाई गरोदर जाहली, आणि नवमास पूर्ण होतांच प्रथम पुत्र जाहला. नंतर हा पुत्र स्वामींस अर्पण करावा, असा विचार करून पुत्रासहवर्तमान स्वामिसन्निध येऊन त्यास पुढें ठेवून साष्टांग नमस्कार केला. तेसमयीं स्वामी बोलिले कीं, बाई तुह्मांस श्रीरघुपतीनें पुत्र दिला, आह्मांस बहुत संतोष ह्माला; आतां हा पुत्र आपल्या घरीं न्यावा, अशीं समर्थांची आज्ञा होतांच उभयतांस जीवदान देऊन दश पुत्र होतील ह्मणून वर दिला. त्यासमयींच प्रथम पुत्र स्वामीस द्यावयाचा आमचा संकल्प होता, त्याप्रमाणें हा प्रथम पुत्र स्वामीस अर्पण केला, तो घ्यावा. नंतर स्वामी बोलिले कीं, आह्मी अरण्यवासी आह्मास पुत्र कशास पाहिजे, तुमचा पुत्र तुह्मीं न्यावा. त्यासमयीं बाई बोलिली, कीं माझा

पूर्व संकल्प स्वामीनीं सफल करावा, अव्हेर करूंनये. याप्रमाणें उभयतां स्त्रीपुरुषांनीं वारंवार विनंति केली. त्यावरून समर्थांनीं तथास्तु म्हणून पुत्रास आपले जवळ घेऊन बाईस हा ईश्वरभक्त होईल म्हणून सांगितलें. आणि त्या मुलाचें नांव उद्धवबावा गोसावी, असें ठेविलें. आणि त्याचा व्रतबंधसमय होईपर्यंत पालन पोषण तुह्मींच करावें, अशी समर्थांनीं आज्ञा केली, त्याप्रमाणें पालनपोषण करून आठवे वर्षीं व्रतबंधाचें साहित्य घेऊन स्वामीपाशीं आणून दिल्हें, नंतर स्वामीनीं आपले मांडीवर मुलास घेऊन त्याचा व्रतबंध केला, नंतर तो स्वामीपाशींच सतत राहिला, इकडे त्या बाईस यथाकालेंकरून आणखी नवपुत्र झाले.

पुढें कारणपरत्वें ऋषिअंशेंकरून अवतरलेले तुकारामबावा, जयरामस्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी, रंगनाथ, रघुनाथ, मोरयादेव, धरणीधरदेव आणि वामनस्वामी इत्यादिक जे साधु त्यांच्या भेटी याच ठिकाणीं झाल्या. त्यांत प्रथम जयरामस्वामींची भेट झाली. जयरामस्वामी हे कात्राबाद मांडवगण येथील देशपांडे भिकाजीपंत यांचे पुत्र, यांची मातोश्री कृष्णाबाई व उपनाम केशर, यांचे तीर्थरूप भिकाजीपंत वारल्यानंतर मातोश्री कृष्णाबाई पुत्रास घेऊन श्रीपंढरीस आली, तेथें श्रीचें दर्शन घेऊन माघारी जाऊं लागली, तों चिरंजीव जयरामस्वामी माघारा येईना, तेव्हां येथेंच राहूं असें म्हणून तेथेंच दोघें राहिलीं. नंतर मातोश्रीचा काळ पंढरीसच झाला. पुढें जयरामस्वामी यांणीं गोपाळपुऱ्यांत राहून बहुत दिवस अनुष्ठान केलें, तेणेंकरून श्रीपंढरीनाथांनीं प्रसन्न होऊन दर्शन दिलें

आणि इच्छा असेल तें मागावें, म्हणून बोलले. तेव्हां जयराम स्वामी बोलले कीं, वरकड इच्छा नाहीं, केवळ आपला अनुग्रह प्रसाद मात्र पाहिजे, असें म्हटल्यावर श्रीची आज्ञा झाली कीं, वडगांवीं कृष्णाजी अपा अभ्यंकर उरुणाबादकर आहेत, त्यांजपाशीं जाऊन अनुग्रह घ्यावा. अशी आज्ञा होतांच तेथून निघून कृष्णाजी अपांची गांठ घेऊन अनुग्रह घेतला आणि समाधानातें पावले. अनंतर आत्मानात्मविचाराचा मार्ग सांगावा, म्हणून जयरामस्वामीनीं विनंति करितांच त्यांनीं उत्तर केलें कीं, श्रीमारुति अवतार रामदास स्वामी हे श्रीकृष्णातीरीं येऊन, राहिले आहेत. त्यांजकडे जाऊन विचार पुसावा, म्हणजे ते सांगतील. असें अपा म्हणाले. त्याजवरून त्यांची आज्ञा घेऊन जयरामस्वामी श्रीकृष्णातीरीं पाहत पाहत आले, तों माहुलीसंगमीं श्रीरामदासस्वामींची गांठ पडली. तेव्हां त्यांस साष्टांग नमस्कार करून, हात जोडून पुढें उभे राहिले, आणि आपलें सविस्तर वर्तमान निवेदन केलें. तें स्वामीनीं ऐकून हास्य करून बोलिले कीं, अपा व आम्ही दोन आहोंत असा अर्थ नाहीं, तथापि अपांची आज्ञा प्रमाण असें म्हणून आत्मानात्मविचार सांगून जयरामस्वामी यांचें समाधान केलें. नंतर जयरामस्वामी यांणीं अपा व स्वामी हे दोन नाहींत, असा निश्चय करून वडगांवीं गुरुसेवेस नेहमीं राहत असतां कधींकधीं स्वामीसही वडगांवीं घेऊन जात असत.

पुढें जयराम स्वामीनीं अपांजवळ राहून गुरुसेवा यथा पद्धतीनें उत्तम प्रकारें केली. नंतर कांहीं दिवशीं कृष्णाप्पाआपा यांनीं व-

डगांवींच जिवंतसमाधी १५४५ रुधिरोद्गारीनाम संवत्सरीं माघ-शुद्ध पौर्णिमेस घेतली. त्या दिवसापासून जयरामस्वामी हे श्रीरामदासांच्या आगमनाची इच्छा करीत असतां समर्थ कृष्णातीरीं आले हें वर्तमान ऐकून स्वामी दर्शनास निघाले. माहुली संगम एथें समर्थांची भेट झाली. तेव्हां जयरामस्वामींनीं समर्थांस साष्टांग नमस्कार करून आपलें सविस्तर वर्तमान साद्यंत निवेदन केलें. स्वामींनीं आपण जाऊं लागल्यादिवसापासून श्रीकृष्णजपंतीच्या उत्साहास प्रारंभ करविला आणि भेंडाचा रथ करून दिला आणि तेथें श्रीमारुति स्थापून प्रतिवर्षी उत्साहास जाण्याचा क्रम ठेविला.

पुढें स्वामीनीं पूर्वी प्रारंभ केलेल्या पुरश्चरणास बारावर्षे होत आलीं, तेव्हां पंचवटींत असतां श्रीरामचंद्र व मारुति प्रत्यक्ष दर्शन देऊन आज्ञा करिते झाले कीं, तुह्मीं श्रीकृष्णातीरीं जावें आणि तेथें श्रीसांबाच्या वरेंकरून शके १५४९ वैशाख शुद्ध ३ चे दिवशीं शिवाजिराजा जन्मला आहे, त्यास तुह्मीं साह्य होऊन त्याचे हातून पृथ्वीला भारभूत झालेल्या म्लेच्छांचा उच्छेद करून धर्मस्थापनापूर्वक उपासनामार्ग प्रवृत्त करून जगदुद्धार करावा, अशी उभयतांची वारंवार आज्ञा होत असतां स्वामीनीं उत्तर दिलें कीं, पुरश्चरण संपूर्ण जाहल्यावांचून जावयाचें नाहीं, तेव्हां श्रीमारुतीचें ह्मणणें कीं, तुह्मांस पुरश्चरण कशा करितां पाहिजे, श्रीची आज्ञा हेंच तुमचें पुरश्चरण असें मारुतीचें वाक्य श्रवण करून स्वामी ह्मणाले कीं, आपण ह्मणतां ही गोष्ट सत्य आहे परंतु लोकसंग्र-

हार्थ पुरश्चरण करावें अशी आपलीच आज्ञा आहे, त्याप्रमाणें तेराकोटी जपाच्या संकल्पास बारा वर्षे भरण्यास अवधी थोडेच दिवस राहिली आहे, आणि श्रीरामनवमीही जवळ आली, तिचा उत्साह झाल्यावर आज्ञेप्रमाणें जातों.

अशी विनंती केल्यानंतर थोडेच दिवसांनीं शके १५५४ अंगिरा नामसंवत्सरीं रामनवमी प्राप्त झाली, त्यासमयीं पंचवटींत उत्सावास प्रारंभ झाला, त्याउत्साहांत नित्य पुराणास जावयाची चाल पूर्वी होती व अद्यापिही आहे त्याप्रमाणें पुराणश्रवणास जात असतांनां श्रीमारुतीनें समर्थांस सांगितलें कीं, तुमचे मुखें पुराण श्रवण करावें अशी इच्छा आहे, त्यास तुह्मी पुराण सांगावें. तेव्हां समर्थ बोलले कीं, आपल्या पुढें रामायण सांगावें; अशी योग्यता कोणाचो आहे. कदाचित् सांगतांना चुकलों तर काय करावें ? दुसऱ्या पुढें सांगतांना चुकलों तरी चालेल असें ऐकून मारुती हास्य करून बोलले कीं, पुराण सांगावें चुकेल तेथें आह्मी सांगूं, असें ह्मणतांच उत्तम आहे, सांगतों असें ह्मणून दुसरे दिवशीं पुराणसमयीं स्वामी जाऊन पुराणिकास बोलिले कीं, पुराण सांगावें, असें मनांत आलें आहे, तुमची मर्जी असल्यास सांगूं, आपण श्रवण करावें, असें ह्मणाले. त्यावरून पुराणिकांनीं बहुत बरें ह्मणोन व्यासपीठ मांडून स्वामीस बसवून पुराणास प्रारंभ करविला. तेसमयीं श्रीमारुती बटुवेष धारण करून पुराण श्रवणास स्वामिसन्निध बसले, नंतर स्वामीनीं सांगावें व या बटूनें श्रवण करून मान हालवीत असावें, असे एक दोन दिवस गेले. एकेदिवशीं

पुराण सांगत असतां त्यांत कथा निघाली कीं, श्रीहनुमंत सीताशुद्धीस लंकेंत गेले. तेथें सूक्ष्मरूपें सर्वनगरींत प्रवेश करून शोध करीत करीत रावणाच्या स्नानाच्या जागीं कण्हेरीच्या वृक्षावर बसून सीताशुद्धीचा विचार करीत आहेत, अशी कथा स्वामी सांगतात, तों तो ब्रह्मचारी, ब्राह्मणाचा मुलगा बोलिला कीं, त्या कण्हेरीचीं पुष्पें तांबडीं किंवा पांढरीं होतीं ? तेव्हां समर्थ बोलिले कीं, तांबडीं नाहीं शुभ्र होतीं, ब्रह्मचारी बोलिला कीं, पांढरीं नाहीं तांबडीं होतीं अशीं, उभयतांचीं भाषणें श्रोत्यांनीं ऐकून त्या मुलास ह्मणूं लागले कीं, स्वामीबरोबर वाद करितोस, ही रीत कोण? अरे ह्या पुराणांतरींच्या गोष्टी आहेत याकरितां पुराणिक सांगतात त्या सत्य आहेत, असा विश्वास ठेवावा. वस्तुतः पुराणिकांनींही प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. केवळ पुराणांत लिहिलेलें आहे, तेंच ते सांगतात. त्यास असत्य असें आपण ह्मणूं नये. असें श्रोत्यांनीं ब्रह्मचारी मुलास सांगितल्यानंतर समर्थांनीं त्या मंडळीस सांगीतलें कीं, या ब्रह्मचाऱ्या बरोबर तुह्मीं कोणीं बोलूं नये. असें सर्वांचें निवारण करून ब्रह्मचारी यास निश्चयपूर्वक कण्हेराचीं पुष्पें पांढरीं च आहेत. ह्मणून सांगीतलें. नंतर त्यादिवशींचें पुराण समाप्त जाहल्यावर समर्थांस मारुतीनें सांगीतलें कीं, तुह्मी पांढरीं पुष्पें आहेत असें ह्मणतां, तर आह्मासमागमें लंकेस चलावें, ह्मणजे दाखवितों, मग स्वामी बोलिले कीं, नित्य पुराण सांगावें व नित्य नेमानें श्रीची पूजा करीत जावी, अशी पूर्वीची आपली आज्ञा आहेच आणि आतां मज समागमें लंकेस चलावें ह्मणून आज्ञा

होते, त्यास नित्यनेम पूजा करावी किंवा लंकेस येऊन झाड आहावें, याविषयीं जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन. असें म्हणतांच " तुह्मीं पूजा करावी तुमचे पूजेस तींच पुष्पें घेऊन येतों " असें म्हणून श्रीमारुति लंकेस गेले.

तेथें जाऊन झाड पाहतात तों पुष्पें पांढरीं पाहून मनांत आश्चर्य करून पुष्पें काढीत असतां बिभीषणाची, गांठ पडली. तेव्हां तो बोलिला कीं, तुह्मी अकस्मात येऊन मजला न भेटतां पुष्पें काढितां हें काय ? तेव्हां मारुतीनीं उत्तर केलें कीं, रामदास म्हणून सदंशेंकरून श्रीनीं कांहीं कारणास्तव उत्पन्न केले आहेत. ते पंचवटींत श्रीरामासन्निध पुराण सांगत असतां कर्णेत पुष्पांचें प्रकरण निघालें त्यांत मी प्रश्न केला कीं, लंकेत कण्हेराचीं पुष्पें तांबडीं किंवा पांढरीं ? तेव्हां त्यांचें म्हणणें पांढरीं व आमचें म्हणणें तांबडीं असा त्यांचा व आमचा विवाद झाला. यास्तव प्रत्यय पाहावयास हीं फुलें नेतों. असें म्हणतांच बिभीषण बोलिले कीं, पूर्वी हीं पुष्पें प्रत्यक्ष आपुल्या पाहण्यांत असतां समजून किंवा त्याचे परीक्षेस्तव आपण बोलिलां असाल, परंतु त्यांच्या पाहण्यांत नसतां पांढरीं पुष्पें आहेत असें निश्चयेंकरून त्यांनीं सांगीतलें तस्मात् त्या पुरुषावर श्रीची व आपली कृपा पूर्ण आहे, असें वाटतें. तरी त्या पुरुषाची भेट आह्मांस करविली पाहिजे. असें बिभीषण बोलल्यावर मारुती बोलिले कीं, पृथ्वीप्रदक्षिणेस ते जाणार तेव्हां तुमची व त्यांची भेट करूं असें सांगून फुलें घेऊन पंचवटींत आले आणि स्वामींच्या पूजेचे समयीं तीं पुष्पें दिलीं आणि मारुति बोलिले कीं,

सीताशुद्धीस गेलों,तेव्हां हीं पुष्पें तांबडीं पाहिलीं होतीं,त्याजवरून तुह्मास तांबडीं, ह्मणून सांगोतलीं, परंतु तुह्मी पांढरीं ह्मणून सांगीतलीं, हें कशावरून तें मात्र सांगा ! त्या नंतर समर्थ बोलिले कीं, आपण तांबडीं सांगीतलीं तीं खरीं, व मी पांढरीं ह्मणून सांगीतलीं, हेंही खरें, यांचें कारण, आपण सीताशुद्धीस गेलां त्यासमयीं क्रोधाग्नीनें तप्त झालां होतां, तेणेंकरून आकाशादि सर्व पदार्थ आपल्यास आरक्त भासत होते, त्यांत पुष्पांची कथा काय ? पांढरीं असतां तांबडीं भासलीं. मीही पांढरीं पुष्पें आहेत ह्मणून विनंति केली त्याचें कारण, रावण मोठा शैव असून स्वहस्तें पुष्पें काढून शिवपूजन करीत होता. तेव्हां शिवपूजेस पुष्पें शुभ्र असावीं असें जाणून बोलिलों.

यानंतर " आतां उत्साह पूर्ण झाला व बारावर्षे पर्यंत तेराकोटि पुरश्चरणाचा जो संकल्प होता, तोही पूर्ण जाहला. तेव्हां तुह्मीं श्रीकृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करावा " अशी श्रीरघुपति व मारुति या उभयतांची आज्ञा होतांच एकवार पृथ्वीप्रदक्षिणा करून मग कृष्णातीरीं जातों, ह्मणून समर्थांनीं प्रार्थना केली असतां ' बरें आहे ' असें ह्मणून उभयतांनीं वल्कलें व हुरमुजी रंगाचीं वस्त्रें प्रसाद देऊन आज्ञा दिल्ही. नंतर उभयतांस साष्टांग नमस्कार करून समर्थ पंचवटींतून निघून टांकळीस आले, आणि पृथ्वीप्रदक्षिणेस चालिले. तेव्हां बरोबर उद्धवबावा निघाले त्यासमयीं समर्थांनीं त्यांस आज्ञा केली कीं, तुझें वय लहान; आह्मा बरोबर निभावणी लागावयाची नाहीं, यास्तव येथेंच रहावें,ह्मणून

आज्ञा केली त्याजवरून उद्धवबावा बहुत श्रमी होऊन पायांवर गडबडां लोळून बोलूं लागले, कीं, आपण टाकून गेले असतां, वियोगव्यथेंकरून माझा प्राण निघून जाईल. असा उद्धवबावाचा मनःपूर्वक आग्रह पाहून समर्थांनीं कृपायुक्त होऊन त्यास अनुग्रह देऊन वरदहस्त मस्तकीं ठेविला, आणि ज्या गुहेंत आपण स्नानसंध्या करीत होते, त्या गुहेंत गाईचे शेणाची मारुतीची मूर्त्ति करून यथाशास्त्र अर्चनविधि करवून त्यास आज्ञा केली कीं, तुह्मी येथें मारुतीची पूजा करीत जावी. आणि आह्मी परत येऊं, तोंपर्यंत भिक्षान्न भक्षण करून पुरश्चरण करीत स्वस्थ असावें. आह्मी पृथ्वीप्रदक्षिणा करून आल्यानंतर ज्या ठिकाणीं राहूं, तेथें तुह्मास घेऊन जाऊं, याप्रमाणें उद्धवबावांची स्थापना करून त्यांची सर्वदा समाधानवृत्ति रहावी, अशी कृपा करून आपण श्रीरघुपतीची आज्ञा घेऊन शके १५५४ फाल्गुन शुद्ध पक्षीं पृथ्वीप्रदक्षिणेस निघाले.

भाग ३ रा.

तीर्थयात्रा.

ते प्रथम काशीक्षेत्रीं जाऊन श्रीविश्वेश्वराचें दर्शन घेण्याकरितां देवालयांत गेले. तों तेथें ब्राह्मण विश्वेश्वरास अभिषेक करीत बसले होते; त्यांनीं समर्थांस पाहतांच त्यांचे मनांत आलें कीं, हा भव्य पुरुष वैराग्यशील दिसत आहे परंतु अन्यजाती असेल असें

वाटतें. आणि संपूर्ण ब्राह्मण समर्थांस आंत जाऊंनये असें ह्मणूं लागले. समर्थांनीं फार उत्तम आहे असें ह्मणून मागें परतले, इतक्यांत ब्राह्मण अनुष्ठान करीत होते त्यांजला श्री विश्वेश्वराचें लिंग दिसेनासें झालें. असें पाहून सर्व ब्राह्मण चकित झाले आणि समर्थांजवळ येऊन सर्वांनीं साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली कीं, महाराज, आपण दर्शनास चलावें, असें ह्मणून देवालयांत आले. समर्थांनीं येऊन श्री विश्वेश्वरास नमस्कार करितांच सर्वांसही पूर्वीप्रमाणें श्री विश्वेश्वराचें लिंग दिसूं लागलें. यानंतर स्वामीनीं शास्त्रविधिप्रमाणें त्रिस्थळी यात्रा करून कांहीं दिवस क्षेत्रीं वास केला, आणि पूर्वी भागीरथीच्या तीरीं हनुमंत घाट होता, परंतु तेथें मारुतीची मूर्ति नव्हती, तेव्हां त्या घाटावर मारुतीची स्थापना केली, आणि तेथून निघून अयोध्येस गेले. तेथें श्रीरघुपतीचें दर्शन करून साधुवृंदें होतीं, त्यांचेंही दर्शन घेऊन कांहीं दिवस वास करून अयोध्यामाहात्म्य श्रवण केलें नंतर श्रीची आज्ञा घेऊन गोकुळ, मथुरा, वृंदावन, विंदार्कप्रभास हींही तीर्थें केलीं. अशा क्रमानें ज्याज्या तीर्थीं गेले, तेथील देवतांचीं प्रत्यक्ष दर्शनें घेऊन कांहीं दिवस तेथें राहून शिष्य संप्रदायी करून त्या त्या क्षेत्राचे-ठायीं मठ करून देऊन तेथें श्रीची पूजनादि व्यवस्था चालण्याकरितां आपले शिष्य ठेविते जाहले. असे फिरत फिरत द्वारकेस गेले. तेथें श्रीकृष्णाचें दर्शन घेऊन तेथील संप्रदायाप्रमाणें तीर्थविधि केला, आणि श्रीची मूर्ति स्थापून तेथें अभंग केला तोः--

॥ अभंग ॥

अंतरीं गुरु वचन ॥ बाह्य नापोत वपन ॥ १ ॥
अंतर बाह्य शुद्धशाला ॥ रामदर्शनें निवाला ॥ २ ॥
मन मुंडिल्या उन्मन झालें ॥ शिर मुंडिल्या काय केलें ॥ ३ ॥
रामदासीं तीर्थ विधी केला ॥ रामीं पिंड समर्पिला ॥ ४ ॥

शिष्य संप्रदायी जे जाहले, त्यांची तेथें योजना करून हिमालया आलीकडे श्रीनगर आहे तेथें गेले. तेथें शिख लोकांचा गुरू नानकपंथी होता, तो परम भाविक असून सर्वदां आत्मानात्मविचार करीत असे, परंतु मनाचें समाधान होईना, तेव्हां कोणी साधु आले असतां, त्यांस समाधानाच्या गोष्टी पुसत असे, तथापि कोणापासून समाधान जरी न जाहलें. तरी त्याचा छळ न करितां नमस्कार करून निरोप देत असे, असें करीत असतां; श्रीरामदासस्वामीचें आगमन त्यास्थानीं जाहलें. त्यासमयीं नानकपंथी याणें नमस्कार करून बहुत युक्तीनें प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें समर्थांनीं सयुक्तिक व अनुभवसिद्ध अशीं देऊन त्याचें बहुत प्रकारें समाधान केलें. नंतर त्याणें बहुत संतोष पावून स्वामीस नमस्कार करून प्रार्थना केली कीं,आपण कृपा करून मजला अनुग्रह द्यावा. ते समयीं स्वामीनीं उत्तर केलें कीं, तुह्मास पूर्वीच अनुग्रह जाहला. आतां वेगळा अनुग्रह नको. असें समर्थांनीं ह्मटलें असतां पुनः नानकाचें ह्मणणें पडलें कीं, जेथें विशेष गुण, तें सद्गुरूचें अधिष्ठान, यास्तव स्वामीनीं कृपा केलीच पाहिजे, असा त्याचा विशेष आग्रह पाहून पुनः आज्ञा केली कीं, तुह्मीं अनुग्रहाविषयीं

ग्रह करूंनये, कारण एकवेळ अनुग्रह झाला असतां दुसरे वेळीं नये, अशी शास्त्रमर्यादा आहे. तथापि तुमची मर्जीच आहे, तरि श्रीरघुपतीची उपासना करावी. असें सांगून हुर्मुजी रंगाचीं वस्त्रें देऊन जपास एक माळ दिल्ही. याप्रमाणें नानकाचें समाधान करून आपण त्याचा निरोप घेऊन हिमालयपर्वतीं गेले.

नंतर श्री बदरीनारायण व केदारेश्वर यांचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें, आणि श्रीश्वेतमारुति सर्वदा ध्यानस्थ ज्या पर्वतावर आहेत, जेथें मनुष्याचें गमन नाहीं, त्या स्थानीं स्वामी गेले. नंतर मारुतीचें दर्शन घेऊन कांहीं दिवस तेथेंच वास केला. त्या स्थानीं समर्थांस सीताची पीडा बहुत जाहली, तें मारुतीनीं जाणून समर्थांस टोप, व मेखला, वल्कलें, हुरमुजी रंगाचीं वस्त्रें, व जपास माळ, पायीं पादुका व हातांत कुबडी हीं सर्व आपल्या हातें दिल्हीं. याशिवाय दुसरा पदार्थ जवळ न ठेवतां तेथें चातुर्मास्य काढून श्री मारुतीची आज्ञा घेऊन उत्तर मानस यात्रा पूर्ण करून पूर्वेकडील तीर्थें करीत श्रीजगन्नाथास गेले. तेथें कांहीं दिवस राहून शरण येईल त्यावर अनुग्रह करीत असतां पद्मनाभ म्हणोन एक ब्राह्मण शरण आला होता, त्यास अनुग्रह दिल्हा. नंतर तेथें मठ बांधून श्रीची मूर्ति स्थापून तेथील सर्व अधिकार पद्मनाभास दिल्हा. याप्रमाणें जे जे शरण येतील त्यांस कृपानुग्रह करावयाची योग्यता ज्यांस असेल, त्यांस मठ करून देऊन तेथील सर्व अधिकार देत देत पूर्वसमुद्रतीरानें फिरत फिरत दक्षिणसमुद्रतीरीं आले. तेथें श्रीरामेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन केलें. नंतर पूजा करून कांहीं संभाषण करून सेतुबंधीं

श्रीमारुति आहेत, तेथें जाऊन त्यांचें दर्शन घेतलें आणि आज्ञा घेऊन निघणार, त्यासमयीं मारुती बोलिले कीं, बिभीषणानें पूर्वी आह्मास सांगीतलें कीं, रामदास यांची व आमची भेट करवावी. त्यास अनायासेंकरून तुह्मी या सेतुबंधीं आले आहांत, तर एकदां लंकेस चलावें, असें श्रीमारुति ह्मणाले, त्यावरून आपली आज्ञा प्रमाण, असें ह्मणून समर्थ मारुतीबरोबर अंतरिक्षमार्गें लंकेस गेले. तों द्वारपाळानें बिभीषणास जाऊन सांगीतलें. कीं, महाराज ! मारुति आले आहेत. असें श्रवण करितांच बिभीषण अतित्वरेनें नगरद्वारापर्यंत सामोरे आले, तों मारुति येतात, हें पाहून त्यांस साष्टांग नमस्कार करून बिभीषण पुढें उभा राहिला. नंतर मारुतीनें बिभीषणास हृदयालिंगन देऊन सांगीतेलें, कीं, तुह्मी पूर्वी आह्मास सांगीतलें होतें, कीं, रामदासांची व आमची भेट करवावी. त्यावरून हल्लीं रामदासास घेऊन आलों, त्यांस भेटावें. असें ह्मणतांच बहुत संतोषेंकरून आलिंगनार्थ जवळ येतात, तों समर्थांनीं साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां बिभीषणानें रामदासास उठवून दृढ आलिंगन दिल्हें. आणि शाबास बापा ! योग्य आहेस, असें ह्मणून एकीकडेस मारुति व एकीकडेस बिभीषण, आणि मध्यें रामदास, अशा समारंभेंकरून त्रिवर्ग मंदिरास गेले.

अनंतर मारुतिसहवर्तमान भोजनपानादि होऊन सभेचा समारंभ बहुत जाहला. त्यासमयीं बिभीषणानें श्रीमारुतीस प्रार्थना केली कीं, पूर्वी ज्ञानेश्वर असतानां नामदेव येथें येऊन कीर्तन श्रवण करवीत होते, त्यादिवसापासून आजपर्यंत कीर्तन श्रवण जाहलें

नाहीं. यास्तव रामदास यांचें कीर्तन श्रवण करवावें. असें म्हणतांच श्रीमारुतीनें रामदासांस आज्ञा केली कीं, बिभीषणाची इच्छा कीर्तनश्रवणाविषयीं आहे, तरि तुम्हीं कीर्तन करावें. त्यावरून समर्थांनीं एकमास तेथें राहून कीर्तन केलें. तें श्रवण करून सर्वांस बहुत संतोष जाहला. याप्रमाणें तेथें होते तोंपर्यंत नित्य कीर्तन करीत होते. असे कांहीं दिवस राहून मारुतिसहवर्तमान निघाले, ते समयीं बिभीषणानीं सांगीतलें कीं, तुम्हास कांहीं कारणास्तव श्रीनीं उत्पन्न केलें आहे, यास्तव उपासना मार्गाची वृद्धि करून जगदुद्धार करावा. म्हणून बिभीषणाची आज्ञा होतांच समर्थांनीं साष्टांग नमस्कार करून अभंगरूपें विनंति केली. तो अभंगः—

॥ अभंग ॥

धन्य हें नगर धन्य बिभीषण ॥ धन्य वरदान समर्थांचें॥१॥
समर्थांचे कृपें वर हा पावला ॥ चिरंजीव झाला कल्पएक॥२॥
कल्प एक वस्ती लंकेमाजी जाण ॥ मारुती रक्षण जयालागीं ॥३॥
जयालागीं कृपासमर्थ हनुमंता ॥ ऊपासना स्वतां राघवाची ॥ ४॥
राघवाचे कृपे भेटी याचो झाली॥लंका देवी आली भेटी लागीं॥५॥
भटीचा हा लाभ मारुतीच्या संगें॥पुण्यांचिया योगें लाभझाला॥६॥
लाभाचाही लाभ मारुती प्रसंगें॥समर्थांचा योग येणें करितां॥ ७॥
येणें झालें एथें प्रदक्षिणायोगें ॥ समर्थांचा संग म्हणूनियां ॥ ८ ॥
म्हणोनियां विनंती ऐका लंकापती॥लोभ फार चित्तीं असूं द्यावा॥
असूं द्यावी आतां कृपादासावरी ॥ दास हा निर्धारीं मनीं चिंती॥
मनीं हा लोभ फार असूं द्यावा ॥ लोभायोगें सेवा घडोमज ११॥

मंजघंडो मुक्ती राघवाची भक्ती॥उभयपद प्राप्ती ह्मणूनियां॥ १२॥
ह्मणूनियां धन्य आपण ह्मणावी॥दासह्मणे पदवी तुह्मां करितां॥

याप्रमाणें समर्थांनीं केलेली अभंगरूपी प्रार्थना उभयतांनीं ऐकून संतोषयुक्त जाहले. नंतर बिभीषण श्रीमारुतीस बोलिले कीं, समर्थांस श्रीनीं तुमच्याच अंशेंकरून निर्माण केलें आणि स्वाधीनही तुमच्याच आहेत, त्या अर्थीं यांचे हातानें जगद्धुद्धार वगैरे जें काय करणें असेल, तें शेवटास नेणें आपणाकडेसच आहे. असें बिभीषणाचें वाक्य श्रवण करून श्रीमारुतीनें हास्य करून आज्ञा केली कीं, ज्यानें निर्माण केलें आहे, तो करविणार समर्थ आहे, असें ह्मणून निरोप घेतला. नंतर पोहोंचविण्याकरितां जी लंका देवी आली होती, तिजला निरोप देऊन मारुतिसहवर्तमान सेतुबंधीं आले. नंतर तेथून श्रीमारुतीची आज्ञा घेऊन वंदन करून निघाले, ते हंसक्षेत्रीं आले. तेथून आदिरंग, मध्यरंग, अंतरंग, भद्रसेन, जनार्दन, यांचें दर्शन करून गोकर्णमहाबलेश्वर येथें आले. आणि तेथें कांहीं दिवस वास करित असतां शरणागतांस पावन करून शेषाचलास आले. तेथें श्रीवेंकटेशदर्शन केलें, आणि श्रीशैलमल्लिकार्जुन, महोबळनरसिंह व पानकनरसिंह राचोटिवीरभद्र, पंचमहालिंगें यांचें दर्शन करून किष्किंधानगरीस जाऊन पंपासरोवर व ऋष्यमूक पर्वत इत्यादि दक्षिण तीर्थयात्रा करित असतां कार्तिकस्वामीचें दर्शन करून फिरत फिरत कोठें मास व कोठें पक्ष, असा वास करीत असतां शरण येतील त्यांस पावन करून योग्य शिष्य असतील त्यांस मठ करून देऊन दैवतें व तीर्थें यांचीं

दर्शनें व स्नानें करीत करीत करवीरक्षेत्र दक्षिणकाशी येथें येऊन यथाविधि यात्रा करून श्रीपरशुरामक्षेत्रीं आले. तेथें कांहीं दिवस वास करून शरण येतील त्यांस अनुग्रह प्रसाद देऊन तेथून पश्चिममानसतीर्थें करून सह्याद्रीवर श्रीमहाबलेश्वरीं आले. तेथून पंढरीनाथ आदि श्रीमाशंकर यांचें दर्शन घेऊन त्र्यंबकेश्वरीं गेले, आणि तेथून पंचवटीस आले. आणि श्रीरघुपतीचें दर्शन घेऊन प्रार्थना केली कीं, "मी बारावर्षेपर्यंत पृथ्वीप्रदक्षिणा केली. यावत् मनुष्यसंचार स्थलें व निर्मनुष्यसंचार स्थलें होतीं, तेथें जाऊन तेथील देवतांचीं दर्शनें व तीर्थांचीं स्नानें केलीं." तीं सर्व आपणास अर्पण. असें समर्थांनीं निवेदन करितांच श्रीरघुपतीनीं बहुत संतोष पावून मस्तकीं, वरद हस्त ठेवून "आतां तुह्मीं कृष्णातीरीं जावें." ह्मणून आज्ञा केली. त्याजवरून समर्थांनी विनंति केली कीं, सांप्रत सिंहस्थ आहे, तरि गंगातीरीं जाऊन मातोश्रीचें व बंधूचें दर्शन करून पुनः श्रीचें दर्शन घेऊन श्रीकृष्णातीरीं वास करतों. अशी समर्थांनीं प्रार्थना करितांच बहुत बरें, त्वरेंकरून यावें, अशी श्रीची आज्ञा होतांच तेथून निघून टाकळीस उद्धव गोसावी यांस भेटले, आणि "गंगाप्रदक्षिणाकरून कृष्णातीरास रहावयास जाऊं, तेव्हां तुह्मास बोलावून नेऊं." असें त्यास सांगून गंगेची प्रदक्षिणा करित करित श्रीप्रतिष्ठान (पैठण) येथें आले. आनंदनगरींत कांहीं दिवस वास केला.

इकडे पूर्वी जांबेहून, निघाले त्या दिवसापासून मातोश्रीनीं बहुत शोक करीत असावें, त्यांचें समाधान श्रेष्ठांनीं करीत जावें,

परंतु " नारायण कधीं भेटेल आणि त्यासीं कधीं, बोलेन व तो दृष्टीस पडेल कधीं. " असा रात्रंदिवस ध्यास करितां करितां मातोश्रीची दृष्टि मंद जाहली, श्रेष्ठही समाधान करितां करितां थकले. परंतु शोक जाऊन समाधानवृत्ति होईना. यास्तव मूळच्या गोष्टीचें व श्रीनाथांच्या भाषणाचें स्मरण देऊन समाधान करावें, असें श्रेष्ठांनीं मनांत आणून मातोश्रीस विनंति करिते जाहले, कीं, नारायणाचा शोक आपण बहुत करितां आणि मीं आपले समाधानार्थ गोष्टीही बहुतप्रकारें सांगतों, परंतु आपलें समाधान होत नाहीं, यावरून असें वाटतें कीं, आपल्यास पूर्वकथेची विस्मृति पडली. ती गोष्ट प्रत्यक्ष आपल्यास ठाऊक असतां उगेंच शोक करून विव्हल होऊं नये, इतर सामान्य मनुष्यासारखा आपण भाव धरावा, ही गोष्ट ठीक नाहीं, असें श्रेष्ठांनीं सांगितलेलें मातोश्रीनीं ऐकून परम संतोषी होऊन श्रेष्ठांस समीप बोलावून आलिंगन दिलें आणि मस्तक अवघ्राण करून मातोश्रीनें भाषण केलें कीं, बापा ही गोष्ट विस्मृतींत होती तिचें त्वां स्मरण दिलें, तेणेंकरून मी समाधान पावलें, परंतु आत्मानात्मविचार कसा तो सांग, ह्मणून प्रश्न केल्यावरून तोही त्यांणीं सांगितला, तेणेंकरून मातोश्री फारच संतोषित होऊन ह्मणाली कीं, नारोबा भेटावा ही फारच इच्छा आहे, त्यावरून श्रेष्ठांनीं विनंति केली कीं, शोकाचा त्याग करावा, आणि श्रीरघुपतीचें स्मरण अखंडित करावें, ह्मणजे नारोबाही लौकरच भेटेल.

इकडे प्रतिष्ठानीं समर्थ वास करून राहिले होते, तेथें नाथांचे वृंदावनापाशीं नित्यशः कीर्तन करीत असत, तें ऐकून लोक समाधान मानून ' हे दुसरे नाथच आहेत कीं, काय ? ' असें ह्मणूं लागले. पुढें पायांत पादुका, हातीं माळ, गळां मेखला, मस्तकीं जटाभार, त्यावर टोप, कांखेस कुबडी, अंगावर हुरमुजी रंगाचीं वस्त्रें आणि पाठीशीं गलोल, असा वेष धारण करून समर्थ हिंडत असतां, ब्राह्मण गंगातीरीं स्नान करीत होते, त्या स्थलीं समर्थ आपल्या वेषेंकरून आले, त्यांस पाहून समस्त ब्राह्मणांनीं प्रश्न केला कीं तुह्मीं हा वेष धारण केला, हा आश्रम कोण ? आणि नेहमी गलोल बाळगितां, याचें कारण काय ? त्याजवरून समर्थांनीं उत्तर केलें कीं, हा ब्रह्मचारी आश्रम आणि आह्मीं श्रीरघुपतीचे दास व स्वेच्छाविहारी आहों, यास्तव खेळण्याकरितां हातीं गलोल धारण केली आहे. असें उत्तर ऐकतांच ब्राह्मणांनीं विचारिलें कीं, गलोल खेळावयासच बाळगिली आहे; किंवा कांहीं अभ्यासही आहे ? तेव्हां समर्थांनीं अभ्यासही आहे असें म्हटलें. त्याजवरून ब्राह्मण बोलिले कीं, ही आकाशीं घार उडत आहे हिला खडा मारून खालीं पाडावी, त्यावरून समर्थांनीं गलोल हातीं घेऊन घारीस खडा मारून पृथ्वीवर पाडिली.

ते समयीं समस्त ब्राह्मण ह्मणूं लागले कीं तुह्मीं साधु, हातीं माळ मस्तकीं जटाभार; हुरमुजी रंगाचीं वस्त्रें धारण करितां, आमचा ब्रह्मचारी आश्रम व आह्मीं रामदास असेंही सांगतां आणि हिंसा तरकरितां हा धर्म कोण ? तेव्हां ' तुह्मीं सांगितलें ह्मणून ही घार

मारिली ' असें स्वामींनीं उत्तर केलें. तेव्हां ब्राह्मण बोलिले कीं, ही गोष्ट ठीक नाहीं. तरि तुह्मीं प्रायश्चित्त घ्यावें. तेव्हां स्वामी बोलिले कीं, उत्तम आहे; जशी आज्ञा कराल, तसें करितों असें समर्थांनीं ह्मणतांच ब्राह्मणांनीं सामग्री आणवून क्षौरपूर्वक विधियुक्त स्वामीस प्रायश्चित्त दिल्हें. नंतर स्वामीनीं ब्राह्मणांस प्रार्थना केली, कीं, मजला प्रायश्चित्त देऊन तर शुद्ध केलें, परंतु घार अद्यापि उठली नाहीं हें काय ? तेव्हां ब्राह्मण बोलिले, कीं, मृत्यु पावला जो, तो कसा उठेल. वेदआज्ञा इतकीच आहे कीं, हिंसादि कर्म घडलें असतां प्रायश्चित्त घ्यावें, असें ह्मणतांच स्वामी हास्य करून ब्राह्मणांस हात जोडून बोलिले, कीं, वेदआज्ञा प्रायश्चित्त घ्यावयासच आहे, मृत जीव उठावयाचा नाहीं, असें तुह्मी ह्मणतां, हें मोठें आश्चर्य वाटतें. पूर्वी श्रीनाथमाहाराजांस तुह्मीच या क्षेत्रीं छप्पन्न प्रायश्चित्तें दिल्हीं, आणि त्यांणींही घेतलीं, अस्तु आतां मृत जीव उठतो किंवा नाहीं, हें पाहावें. असें ह्मणून समर्थांनीं ती घार हातीं घेऊन तिच्या शरीरावर हात फिरवून जिवंत करून " तूं आकाशमार्गी पूर्वी विहार करीत होतीस, त्याप्रमाणें विहार कर " असें तिजला सांगून आकाशपंथें लावून दिल्ही, ती पूर्ववत् उडून गेली. व स्वामीचे मस्तकीं जटाभारही पूर्वीप्रमाणें सर्व ब्राह्मणांचे दृष्टीस पडला.

हें ब्राह्मणांनीं पाहून परम आश्चर्य करून स्वामीस नमस्कार केला, आणि आह्मी अपराधी आहों, असें ह्मणून शरण आले. त्यांस स्वामीनीं साष्टांग नमस्कार करून तुह्मीं साक्षात् भूदेव मूर्ति-

मंत वेद आहां, आणि श्रीराम कर्ता समर्थ आहे, तो काय न करील ! तरि घार उठविली, हें सामर्थ्य तुमचेंच आहे, असें ह्मणून त्या दिवसापासून हातींची गलोल टाकून दिल्ही.

भाग ४ था.

आईची भेट.

नंतर कोणे एके दिवशीं कीर्तन करीत असतां अंबाड प्रांतांतील कोणीएक ब्राह्मण पैठणक्षेत्रीं आला. त्याणें समर्थ कीर्तन करीत आहेत, हें पाहतांच हे जांबेंतील सूर्याजीपंतांचे चिरंजीव नारायणबावा होत अशी ओळख पुरली. तेव्हां त्या ब्राह्मणानें समक्ष येऊन नमस्कार करून विचारिलें कीं, तुह्मी सूर्याजीपंतांचे चिरंजीव, असे दिसतां, तुमचें नांव नारायणबावा, असें ह्मणतांच समर्थ "होय" असें बोलिले. नंतर ब्राह्मण बोलिला, कीं तुह्मी असे फिरतां, हें उत्तमच आहे, परंतु तुमच्याकरितां श्रेष्ठबंधु व मातोश्री बहुत श्रमी होऊन शोक करितात, त्या शोकें करून मातोश्रीचे नेत्रही गेले, त्यास त्यांची भेट घेऊन समाधान करावें, हें उत्तम, असें त्यानें ह्मटल्यावरून " फार चांगलें, भेटीस जाऊं " असें समर्थ बोलिले. आणि तो ब्राह्मण घरास परत जाऊन सांगणार, त्यापूर्वीच स्वामी निघून " पायीं पादुका, गळ्यांत मेखला, मस्तकीं जटाभार, हुर्मुजी रंगाचीं वस्त्रें, हातीं माळ " अशा वेषानें

जांबेस जाऊन श्रीमारुतीचें दर्शन करून घरीं गेले आणि अंगणांत उभे राहून जयजय रघुवीरसमर्थ म्हणून शब्द केला. त्यासमयीं घरांत मातोश्री बसली होती, ती म्हणाली कीं, कोणी गोसावी आला आहे, त्यास भिक्षा घालावी, असें बोलतांच समर्थ ओसरीवर चढून आले, तों श्रेष्ठांची स्त्री भिक्षा घेऊन आली. हें पाहतांच " हा भिक्षा घ्यावयाचा गोसांवी नव्हे " असें बोलिले. हें मातोश्रीनें ऐकून आश्चर्य केलें आणि माझा नारोबा आला कीं काय ? अशी बोलली. हें स्वामींनीं ऐकून " होय आई मीच आलों, " असें म्हणून साष्टांग नमस्कार करून चरणीं मस्तक ठेविला. नंतर मातोश्रीनीं त्यास आलिंगन दिलें आणि मस्तक अवघ्राण करून मुखावरून हात फिरवून " नारोबा तूं थोर झालास, तुजला मी आतां कोणत्या दृष्टीनें पाहावें, " असे मातोश्रीचे प्रेमाचे शब्द ऐकतांच आई दृष्टीस उशीर काय ? असें म्हणून स्वामींनीं नेत्रावरून हात फिरविला. तेचक्षणीं तिची दिव्यदृष्टि जाहली. नेत्रेंकरून भव्यमूर्तीचें अवलोकन करून बोलली कीं, नारोबा तूं देशांतरीं फिरून भूतचेष्टा शिकून आलास. हें वचन ऐकून हास्य करून विनंति केली कीं, आई आह्मांस ज्याच्या योगानें भूतचेष्टा आली, तें महद्भूत सांगतों ऐका, असें बोलून " भूतगे माय " असें एक पद केलें तें.

॥ पद ॥

होतें वैकुंठींचे कोनीं ॥ शिरलें अयोध्याभुवनीं ॥
लागे कौसल्येचे स्तनीं ॥ तेंची भूतगेमाय ॥ १ ॥

जातां कौशीक राउळीं ॥ अंबलोकितां भयकाळीं ॥
ताटिका ते छळोनि मेली ॥ तेंची भूतगेमाय ॥ २ ॥
मार्गी जातां वनांतरीं ॥ पाय पडला दगडावरी ॥
पाषाणाची झाली नारी ॥ तेंची भूतगेमाय ॥ ३ ॥
जनकाचे अंगणीं गेलें ॥ शिवाचें धनु भंगीलें ॥
वैदेही अंगीं संचरलें ॥ तेंची भूतगेमाय ॥ ४ ॥
जेणें सहस्त्रार्जून वधिला ॥ तोही तात्काळची भ्याला ॥
धनु देऊनी देह रक्षिला ॥ तेंची भूतगेमाय ॥ ५ ॥
पितयाचे भाकेशीं ॥ कैकेयीचे वचनासी ॥
मानुनि गेलें अरण्याशीं ॥ तेंची भूतगेमाय ॥ ६ ॥
चौदासंवत्सर तापसी ॥ अखंड हिंडे वनवासी ॥
सांगातें भुजंग पोसी ॥ तेंची भूतगेमाय ॥ ७ ॥
सुग्रीवाचें पालन ॥ वाळीचें निर्दालन ॥
तारी पाण्यावरी पाषाण ॥ तेंची भूतगेमाय ॥ ८ ॥
रक्षी मरणीं बिभीषण ॥ मारी रावण कुंभकर्ण ॥
तोडी अमरांचें बंधन ॥ तेंची भूतगेमाय ॥ ९ ॥
वामांगीं स्त्रियेला धरिलें ॥ धावुनी शरयूतीरा आलें ॥
तेथें भरताशीं भेटलें ॥ तेंची भूतगेमाय ॥ १० ॥
सर्वां भूतांचें हृदय ॥ नाम त्याचें रामराय ॥
रामदास नित्यगाय ॥ तेंची भूतगेमाय ॥ ११ ॥

या प्रमाणें पद केलें, तें मातोश्रीनें ऐकून तिला फार आनंद झाला. नंतर दृढ आलिंगन देऊन चुंबन घेतलें. याप्रमाणें उभयतांचें संभाषण होत आहे, तों श्रेष्ठ घरांत स्नानसंध्या करीत असतां नारोबा आले, हें ऐकून यज्ञोपवीत हातीं धरून बाहेर आले, तों त्यांस पाहतांच नारोबांनीं साष्टांग नमस्कार घातला आणि चरणीं मस्तक ठेविला. नंतर श्रेष्ठांनीं उचलून पोटाशीं धरून मस्तक अवघ्राण करून दृढ आलिंगन दिलें. त्या आलिंगनानें परस्परें परम सुख होऊन उभयतांस आनंद जाहला, नंतर श्रेष्ठांचे हातीं यज्ञोपवीत पाहून समर्थ बोलिले कीं, यज्ञोपवीत हातांत धरण्याचें कारण काय ? असें ऐकून श्रेष्ठांनीं उत्तर केलें कीं, बहुत वर्षांनीं परस्परें भेटी व्हावयाच्या त्या देवतासंनिध व्हाव्या, असें शास्त्र आहे. यास्तव हें यज्ञोपवीत हातांत घेतलें, यांत सूर्य आणि गायत्री ह्या दोन देवता आहेत, यांच्या संनिध तुमची भेट घेतली. असें सांगून श्रेष्ठांनीं समर्थांस प्रश्न केला तोः—

॥ श्लोक ॥

संपन्न लावण्य तारुण्य नारी ॥ कौशल्यता वैभव चित्त हारी ॥
एकांत काळीं पडतां समंधु ॥ अभिलाष नकरी तो धन्य साधु॥१॥

या प्रश्नावर समर्थांनीं उत्तराचा श्लोक झटला तोः—

॥ श्लोक ॥

स्वर्गांगना ते सन्मुख आली ॥ लावण्यरूपीं दृष्टी न घाली ॥
मुक्ताफळीं शुक्र उघेचरासी ॥ परंतु आरण्य मिरासि त्यासीं ॥१॥

असें ऐकून पुनः समर्थ बोलिले कीं, आजपर्यंत ब्राह्मण्य रक्षून परमार्थ साधन केलें आणि आपल्या दर्शनास आलों असें ह्मणतांच श्रेष्ठ बहुत संतोषातें पावून सर्वांचीं भोजनें जाहलीं. नंतर तुह्मी गेल्यापासून आजपर्यंत काय काय केलें ? असें श्रेष्ठांनीं विचारिल्यानंतर निघून गेल्यापासून येईपर्यंत केलेलें सर्व कृत्य समर्थांनीं सविस्तर निवेदन केलें. तें मातोश्री व श्रेष्ठ या उभयतांनीं श्रवण करून " बापा ! तूं धन्य आहेस, सर्वथा या कुळाचा उद्धार केलास" असें सांगून येथें कांहीं दिवस रहावें ह्मणून आज्ञा केली. त्याप्रमाणें कांहीं दिवस तेथें वास केला. आणि नित्य स्नानसंध्यादि कर्में जाहल्यानंतर मातोश्रीस संनिध बसवून उभयतां परमार्थपर भाषणें करीत असत. तेव्हां श्रेष्ठांचें प्रपंचीं राहून परमार्थसाधनपर, व समर्थांचें नाशवंत प्रपंचाविषयीं वैराग्यवृत्तीनें अरण्यवासपूर्वक उपासनापर, अशीं एकमेकांचीं भाषणें होत असावीं. आणि परस्परें अभंग व पदें शंभर शंभर कडवींपर्यंत करीत असत. याप्रमाणें उभयतांचीं भाषणें मातोश्रीनें ऐकून समाधानातें पावावें. असे नित्यनित्य चमत्कारिक संवाद करीत करीत कांहीं दिवस राहून समर्थांनीं ' मला गंगाप्रदक्षिणा करून कृष्णातीरीं जावयाचें आहे ' यास्तव आज्ञा व्हावी, ह्मणून प्रार्थना केली. तेसमयीं श्रेष्ठांनीं उत्तम आहे असें ह्मणून श्रीचे आज्ञेप्रमाणें सर्व करून पुनः लौकर यावें, अशी आज्ञा दिल्ही तेव्हां मातोश्री श्रमी होऊन बोलली कीं, नारोबा तूं इतके दिवस गेलास, त्या

वियोगानें परम श्रम जाहले, आणि पुनः जातों म्हणतोस हें ठीक नाहीं; वियोगाचें दुःख सोसवत नाहीं. असें म्हटल्यावरून श्रेष्ठांस विनंति केली कीं, मातोश्रीची आज्ञा काय होत आहे. आपण सन्निध असतां अद्यापि दुःख, शोक राहिले, हें काय ? तेव्हां श्रेष्ठांनीं उत्तर केलें कीं, शोकादिक जाण्याविषयीं पूर्वी विनंति करावयाची, ती मी केलीच आहे. आतां निःशेष दुःख जाऊन निःसंशयत्व प्राप्त व्हावें, याविषयीं विनंति करणें तुह्मांकरितां ठेविली आहे. हें समर्थांनीं श्रवण करून मातोश्रीस नमस्कार करून विनंति केली कीं, आह्मी उभयतां पुत्र आपल्यास असतां दुःख शोक करावे, हें योग्य नाहीं. याकरितां कांहीं कथा सांगतों, ती श्रवण करावी, असें बोलून श्रीभागवतीं कपिल महामुनीनीं मातोश्री देवहूतीस जें आख्यान (कपिलगीता) सांगितली ती सांगते जाहाले. श्रवण करून मातोश्री परम समाधानातें पावून संतोषयुक्त होऊन बोलिली कीं, तुमच्या योगें परम समाधान पावलें; अशीच समाधानवृत्ति निरंतर असावी, आणि पूर्वी जें श्रीचें अभय वचन आहे. कीं, माझें प्रत्यक्ष दर्शन तुला होईल. त्याप्रमाणें श्रीचें दर्शन करविलें, म्हणजे मी कृतकृत्य होईन, असें म्हणतांच समर्थांनीं श्रीची प्रार्थना केली, आणि श्रीमारुति, लक्ष्मण, सीता युक्त पट्टाभिषिक्त श्रीरामाचें प्रत्यक्ष दर्शन करविलें, तेणेंकरून मातोश्री बहुत आनंदातें पावली.

भाग ५ वा.

गंगाप्रदक्षिणा.

नंतर मातोश्रीची, व श्रेष्ठांची आज्ञा घेऊन समर्थ निघाले, ते श्रीगंगेचे सप्तओघ समुद्रसंगमीं आहेत तेथें आले. त्या सप्त ओघांचीं नांवें:-पहिला ओघ राजमहेंद्रीवर वसिष्ठ कोटिलिंगस्थान. दुसरा ओघ कौशिका. तिसरा ओघ गौतमी. चवथा ओघ वृद्धगौतुमी. पांचवा ओघ भारद्वाज्या. सहावा ओघ आत्रेया. सातवा ओघ तूर्या. एकूण ओघ सात. त्यांत पहिला ओघ वसिष्ठा तिच्या पोटीं वैनतेया झाली आहे. तिचा संगम पृथक् आहे. वृद्धगौतमीचा ओघ नाहीं तो भूमीगत गुप्त आहे. वैनतेयासुद्धां सात ओघ म्हणून तीस सप्तगोदावरी म्हणतात. वैनतेयासुद्धां सात ओघ समुद्रगामी पृथक् पृथक् आहेत त्यांस समर्थ उजवे घालून दक्षिणतीरास येऊन दक्षिणतीर सव्य घालून कोठें न गुंततां त्र्यंबकेश्वरास सव्य घालून पंचवटीस आले. आणि श्रीचें दर्शन घेऊन सविस्तर वर्तमान निवेदन केलें. नंतर श्रीची आज्ञा घेऊन समर्थ टांकळीस आले आणि उद्धवगोसावी यास भेटून महिना पंधरादिवस तेथें राहिले.

समर्थ टांकळीस राहिले होते परंतु नित्य पंचवटीस श्रीचे दर्शनाकरितां जात असत. एके दिवशीं श्रीरामचंद्र समर्थांस म्हणाले कीं, तुम्ही आतां कृष्णातीरास जावें. श्रीदेवीच्या वरेंकरून शिसोदे यांचे कुळीं शिवनामा राजा उत्पन्न झाला आहे. त्यास तु-

ह्मी साह्य होऊन धर्मस्थापना करवून उपासना वाढवावी. समर्थ ह्मणाले, बरें आहे. महाराज, मला कृष्णातीरीं जाण्याविषयीं बहुतवेळां आज्ञा झाली परंतु मी अवज्ञा करून पुरश्चरण, व पृथ्वीप्रदक्षिणा इत्यादि केलीं. सांप्रत आज्ञेवरून कृष्णातीरीं जात आहें, तरी तेथें ज्याज्यासमयीं कारणपरत्वें संकल्प उत्पन्न होतील ते समर्थांनीं शेवटास न्यावे. दासाचें उणें पडल्यास लज्जा कोणाची जाईल ? हें ऐकून श्रीरघुपती हास्यवदन करून बोलले कीं, तुह्मीं श्री कृष्णातीरास जाऊन धर्मस्थापना करावी याकरितांच तुह्मांस उत्पन्न केलें आहे, यास्तव कोणत्याही गोष्टीचा संशय मनांत न धरितां कृष्णातीरास जावें. असें ह्मणून श्री रघुपतीनीं समर्थांचे मस्तकीं वरदहस्त ठेवून जाण्यास आज्ञा दिली. नंतर गंगाप्रदक्षिणा करून पंचवटीस येऊन श्रीरघुपतीचें दर्शन केलें, आणि सांगीतलें कीं, आज्ञेप्रमाणें गंगाप्रदक्षिणा करून आलों. असें ह्मणतांच कृष्णातीरीं जाऊन वास करावा ह्मणून पूर्वीच आज्ञा केली आहे, त्याप्रमाणें त्वरित जावें, अशी आज्ञा होतांच आज्ञेप्रमाणें जातों ह्मणून टांकळीस आले. आणि उद्धवबावांस पूर्वी सांगितल्याप्रमाणें सांगून आपण निघून शके १५५६ तारणनाम संवत्सरीं वैशाखमासीं, कृष्णातीरीं आले. ते प्रथम महाबलेश्वरीं येऊन तेथें वास केला. याच समयीं शिवाजीराजे यांणीं सतरा वर्षांचे वयांत असतां विजापूरवाल्याशीं द्वंद करून रायगडीं राहून राज्य साधनास आरंभ केला होता. इकडे समर्थ महाबलेश्वरीं चातुर्मास्य राहून

नित्य कीर्तन करोत असतां, तेथील गृहस्थ व भिक्षूक बहुत भक्तीस लागले. त्यांत अनंतभट, व दिवाकरभट महावलेश्वर कर, या उभयतांस अनुग्रह प्रसाद दिल्हा आणि तेथून निघाले, तेसमयीं अनंतभट यांणीं बरोबर येतों, ह्मणून बहुत आग्रह केला, तेव्हां "तुह्मी येऊंनये, येथेंच रहावें" असें सांगीतलें, आणि तेथें श्रीमारुति स्थापून देऊन त्याची पूजा करून, स्वस्थ असावें. अशी आज्ञा करून आपण निघून वांईस गेले. तेथें कांहीं दिवस राहून थीटे व चित्राव व पीठके यांच्या मातोश्रीस अनुग्रह देऊन कृष्णादक्षिणतीरास रोकडोबा मारुति स्थापून पीठके यांस पूजा सांगून तेथून निघून माहुलीक्षेत्रास आले. आणि जरंडा डोंगर येथें अनादिसिद्ध मारुतीचें स्थान आहे, तेथें नेहमीं रहावें, आणि श्रीकृष्णा वेण्यासंगमतीरीं येऊन स्नान, संध्या करून माध्यान्हसमयीं क्षेत्रांत माधुकरी मागून निर्वाह करावा, आणि सर्वदा वाळवंटींत पोरांसी खेळत असावें. त्यासमयीं श्रीकृष्णेवर स्वामींनीं श्रीव्यासवाक्याचा श्लोक ह्मटला तो व आरती केली तीः-

॥ श्लोकः ॥

कृष्णा विष्णुतनुः साक्षात् ॥ वेण्या देवो महेश्वरः ॥
उभयोः संगमो यत्र ॥ मुक्तिस्तत्र न संशयः ॥ १ ॥

असें ह्मणोन आरती केली तीः-

॥ आरती ॥

सुख सरिता गुण भरिता दुरिता निवारी ॥
निःसंगा भवभंगा चिद्रंगा तारी ॥

श्रीकृष्ण निजतनू जळवेष धारी ॥
कलिमल दल जळ निर्मळ साक्षात्वेंहारी ॥ १ ॥
जयदेवी जयदेवी जय माये कृष्णे ॥
आलों तूझ्या उदरा निरसीं ममतृष्णे ॥ ध्रुव० ॥
हरिहर सुंदर ओघ ऐक्याशीं आले ॥
परमानंद बोधें मिळणी मिळाले ॥
ऐसी हे संगमीं मिसळोनी गेले ॥
रामदास त्याचीं वंदी पाऊलें ॥ २ ॥

अशा क्रमानें स्वामी बहुत दिवस तेथें राहिले.

पुढें काहीं दिवसांनीं रंगनाथस्वामी यांची गांठ पडली. हे नाझरेकर, गोपाळपंत अपा देशपांडे यांचे चिरंजीव व यांच्या मातोश्रीचें नांव बयाबाई, हे तिघे बंधु होते. त्यांत वडील यादवराव हे विजापुरीं बेदरीपादशहापाशीं राहत होते. दुसरे रंगनाथस्वामी हे ब्रह्मचारी होते, व कनिष्ठ विठ्ठलराव तात्या होते. यांच्या वडिलांस साक्षात् दत्तात्रेयांनीं रामोपासना सांगून षडक्षरी मंत्राचा उपदेश केला होता. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं संन्यास घेतला, त्या आश्रमीचें त्यांचें नाव निजानंद स्वामी असें प्रसिद्ध होतें. पुढें त्यांनीं रंगनाथस्वामी यांस उपदेश देऊन कराड संगमीं जलसमाधि घेतली.

पुढें रंगनाथस्वामी बदरिकेदार इत्यादि तीर्थयात्रा करून ब्रह्मचारी असून राजयोग धारण करून होते, तों श्रीकृष्णातीरीं साधुमूर्ती बहुत आहेत, त्यांत श्री रामदासस्वामीची आख्या मोठी आहे,

यास्तव त्यांचें दर्शन घेऊन कांहीं संभाषण करावें, ह्मणून निघून मार्गी येत असतां निगडीचे माळावर एका ओढ्यांत रंगनाथस्वामीचा घोडा रुपणींत रुपला. तेव्हां " येथेंच मठ करून रहावें " ह्मणून बोलले आणि मठ करून तेथेंच राहिले. नंतर वडगांवास जाऊन जयरामस्वामीचें दर्शन घेतलें आणि त्यांस बरोबर घेऊन समर्थांचें दर्शन केलें. त्या दिवसापासून उभयतां समीप राहात असत आणि समर्थही त्या उभयतांस चिरंजीव असें ह्मणत असत. याप्रमाणें रंगनाथ स्वामीची भेट जाहली.

पुढें तुकारामबावा यांस श्रीपंढरीनाथ यांनीं सांगितलें कीं, मारुति अवतार श्रीरामदास कृष्णातीरीं आहेत, त्यांजकडे जाऊन भेटावें, ह्मणून आज्ञा जाहली. त्यावरून देहूहून माहुलीस येऊन स्वामीचें दर्शन घेतलें आणि सुरस भाषणें करून परस्परें समाधानातें पावले. त्या दिवसापासून तुकारामबावांनीं नेहमीं जावें, भेटावें, रहावें, असा क्रम चालविला. समर्थांस देहूस न्यावें असा त्यांचा बेत होता. यानंतर कोणी एके समयीं समर्थांनीं तुकारामबावांस विचारिलें कीं, आपल्यास श्रीची कृपा कशी झाली तें सविस्तर सांगावें; त्यावरून तुकाराम बावांनीं आपलें वृत्त अभंग रूपानें समर्थांस सांगितलें:-

॥ अभंग ॥

यातिशूद्र वैश्य, केला व्यवसाव ॥ आधींच हा देव कूळपूज ॥१॥
नवोलावें परी, पाळिलें वचन ॥ केलियाचा प्रश्न तुह्मीं संतीं॥२॥
संसारीं तो झाल्या, दुःखाचिया रासी॥ मायबापें शेखीं, कर्मी येतीं

देवाचें देऊळ, होतें तें भंगलें ॥ चित्तास हें आलें, करावेंसें॥४ ॥
दुष्काळीं आटलों, द्रव्य नेलें मानें॥स्त्री येक अन्न,करितां मेली५॥
लाजवाटे जीवा, त्रासलों या दुःखा॥व्यवसाई देखा, तुटी येत६॥
कांहीं पाठ केलीं, संतांचीं उत्तरें॥विश्वासें आदरें, करूनियां॥ ७॥
गाती पुढें त्याचें, धरावें धृपद ॥ भावें चित्त शुद्ध, करूनीयां ८॥
सत्य असत्यासीं, मन केलें ग्वाही॥ मानीयेलें नाहीं, बहुमत॥ ९॥
मानियेला स्वमीं, गुरूचा उपदेश॥ धरीला विश्वास, दृढमनीं॥१०॥
ठाकला तो थोडा, परोपकार ॥ केले हो शरीर, कष्टवुनी ॥ ११॥
संतांचें सेवीलें, तीर्थ पायवणी ॥ आरंभ कीर्तनीं, करिता झालों॥
नव्हतें अभ्यासीं, मन चित्त आधीं॥लाज नाहीं मधीं, येऊं दिली॥
तयावरी झाली, कवित्वाची स्फूर्ती॥पाय धरिले चित्तीं, विठोबाचे॥
निषेधाचा कांहीं, पडला आघात ॥ तेणें मध्यें चित्त, दुखवलें १५॥
बुडविल्या वह्या, बैसलों धरणें ॥ केलें नारायणें, समाधान १६॥
आहे तोचि आतां, दीसतो प्रकार॥पुढिला विचार,देव जाणे १७॥
तुका ह्मणे माझें, सर्व भांडवल ॥ बोलविले बोल, पांडूरंगें ॥१८॥

याप्रमाणें तुकारामांनीं आपलें सर्व वर्तमान समर्थांस निवेदन केलें. आणि ह्मणाले कीं, मला स्वप्नांत जेव्हां अनुग्रह झाला तेव्हां नामाभिधान चिदानंद ठेविल्याबद्दल दृष्टांत झाला. मला श्री पंढरीनाथांनीं आपला अवतार श्री मारुतीअंशेंकरून झाला ह्मणून सांगितलें आहेच परंतु आपल्या मुखें सर्व वृत्त श्रवण करावें ही इच्छा आहे. असें ऐकून स्वामींनीं हास्यवदन करून बोलिले कीं,

आपलें वृत्त स्वमुखेंकरून बोलूं नये; परंतु तुह्मीं आपलें गुह्य सांगितलें यास्तव आह्मीं आपलेंही सांगतों. असें ह्मणून स्वामींनीं अभंग ह्मटला तोः—

॥ अभंग ॥

नमो अधिष्ठाता, विष्णु मुख्य साधू ॥ तेथुनि बोधू, विधीलागीं ॥
विधी पासुनियां, ज्ञान विधीसुता ॥ तेंची ज्ञान प्राप्त, वसिष्ठासीं ॥
वसिष्ठें उपदेश, केला रामचंद्रा ॥ तोचि महारुद्रा , हनुमंता ॥ ३ ॥
हनुमंत कली माजी चिरंजीव ॥ झाले देव सर्व, बौध्य रूप ॥ ४ ॥
बौध्य नारायण, होऊनी बैसला ॥ उपाव बोलिला, व्यास मूनी ॥
व्यास मुनी बोले, भविष्य पुराण ॥ जगउद्धरणें, कलीमाजी ॥ ६ ॥
कलीमाजी गोदा–तीरीं पुण्य क्षेत्र ॥ तेथें वातपुत्र, अवतरे ॥ ७ ॥
अवतरे अभि, धानीं रामदास ॥ कृष्णातीरीं वास, जगदोद्धारा ॥
जगदोद्धारासाठीं, श्रीरामा सांकडें ॥ केलें वाडें कोडें भक्तीपंथें २ ॥
भक्तीपंथें मोठा केला श्रीरामानें ॥ जंबू अभिधान, ग्रामतेथें ॥ १० ॥
तेथें ब्रह्मनिष्ठ, अधिष्ठाता पूर्ण ॥ सूर्यनामाजाण, द्वीजवर्य ॥ ११ ॥
द्वीजवर्य सूर्य, जैसा तपोधन ॥ अद्भुत विंदान, झालें तेथें ॥ १२ ॥
झाली रामनवमी, मध्य अष्टमीसीं, ॥ अर्धरात्रीं त्यासीं दूत आले ॥
दूत आले पुढें, घालोनि चालिले ॥ महाद्वारा आले, भीम जेथें १४ ॥
भीमदेवाल्यांत, नेऊनी तयासीं ॥ तेथें उभयतांसीं, देखियेलें ॥ १५ ॥
देखियेलें राज पुत्र सूर्य वंशीं ॥ झापड नेत्रासीं, पडे तेव्हां ॥ १६ ॥
पडे तेव्हां जसा, दंडवत भूमी ॥ मग अंतर्धामीं, बोलाविलें ॥ १७ ॥
बोलाऊनी माथां, ठेवी सव्य पाणी ॥ मंत्रसांगे कर्णी रामनाम ॥ १८ ॥

नामा सांगुनियां, ताम्रमूर्ती रम्य ॥ पट्टाभिश्रीराम, दिधला तया॥
तयादीला वर तुजपुत्र होतील ॥ ध्वज उभारील, रामदास्यें ॥१०॥
रामदास्य झालें, धन्य वंशोद्धार ॥ बोलोनी सत्वर, गैब झाले॥११॥
झाला रामनवमी महोत्साव थोर ॥ माध्यान्हीं सत्वर, जन्म झाला॥
जन्म झाला झाला, देववंशा आले ॥ उपासना चाले,राघवाची१३॥
राघवाची भक्ती, सूखाची विश्रांती ॥ पितयाची शांती, झाली पुढें॥
पुढें ज्येष्ठ बंधु नसांगेची कांहीं ॥ सुखें देवालयीं, निद्रा केली१५॥
निद्रा केली तेथें, श्रीरामें उठवूनी ॥ तोची मंत्र कानीं,सांगितला॥
सांगितला बोध, रामीं रामदास ॥ गुरूच्याही वंशा, नीरोपिलें१७॥

याप्रमाणें स्वामींच्या मुखें वृत्त श्रवण करून तुकारामबावांस फार संतोष वाटला आणि सांष्टांग नमस्कार करून ह्मणाले कीं, आपण साक्षात् मारुती अवतार आहां, आह्मास जाण्यास निरोप द्यावा. असें ह्मणून निरोप घेऊन देहूस गेले.

याप्रमाणें चिंचवडकर मोरया देवही दर्शनास आले. यांजला गजाननाची उपासना असून प्रत्यक्ष दर्शनही होतें. यांनींही नेहमीं येऊन जाऊन दर्शनसंभाषणादि व्यवहार ठेविला. असेच रघुनाथस्वामी व आनंदमूर्ति यांनींही नेहमीं समर्थांजवळ असावें. रघुनाथस्वामी हे श्रीनासिक क्षेत्रस्थ आश्वलायन ब्राह्मण, यांनीं तीर्थयात्रा करीत असतां भागीरथीची कावड श्रीरामेश्वरास न्यावी, आणि सेतुबंध रामेश्वराची वाळु भागीरथीस न्यावी. असें करीत असतां कोणे एके समयीं रघुनाथस्वामी भालगांव मुक्कामीं राहिले. तेथें कमाविसदार अपाजीपंत देशपांडे व अनंतभट जोशी यांची

गांठ पडली, तेव्हां " हे ब्राह्मण बहुत योग्य " असें जाणून त्यांस रघुनाथस्वामीनीं अनुग्रह प्रसाद देऊन अनंतभटाचें आनंदमूर्ति नाम ठेविलें आणि वेदवतीचे संगमीं श्रीकृष्णातीरीं ब्रह्मनालक्षेत्रीं राहते जाहले. त्यांणींही रामदासस्वामीची कीर्ति ऐकून दर्शन घेतलें आणि नेहमीं समर्थांकडे जाण्यायेण्याचा व्यवहार ठेवून कधींकधीं स्वामीसही ब्रह्मनालीं नेत असत.

याप्रमाणेंच केशवस्वामी हे भागानगरीं राहात होते, त्यांणीं रामदासस्वामीची कीर्ति ऐकून एका ब्राह्मणापाशीं एक श्लोक वं एक अभंग देऊन त्यास समर्थांकडे पाठविलें. त्याणें येऊन समर्थांचें दर्शन करून सविस्तर वर्तमान निवेदन केलें नंतर समर्थांनीं बहुत संतुष्ट होऊन एका श्लोकाचें उत्तर देऊन ब्राह्मणाची रवानगी केली. नंतर ब्राह्मणानें जाऊन केशवस्वामीस समर्थांचें सविस्तर वर्तमान सांगितलें. तें ऐकून केशवस्वामी या प्रांतीं येऊन समर्थांचें दर्शन करून गेले. तसेच समर्थही त्या प्रांतीं जाऊन केशवस्वामीचें दर्शन करून आले. सर्व साधुमंडळी स्वामींस " समर्थ " असें ह्मणण्याचा पाठ ठेऊन वडीलपणानें मानूं लागली.

रामदासस्वामी श्रीकृष्णातीरीं राहून कोणी जे शरण येतील, त्यांस अनुग्रह प्रसाद देत असत, तों प्रीतिसंगमीं स्नान करावें, अशी इच्छा उत्पन्न झाली, यास्तव कऱ्हाडसंगमीं स्नान करून शाहापुराजवळ डोंगराची खिंड आहे, त्या खिंडीवर राहून प्रतिदिवशीं दोनप्रहरीं अथवा प्रातःकाळीं कोरडी भिक्षा मागावयास शाहापुर किंवा मसुर इत्यादि खिंडीच्या आसमंतातचे गांवांत जात

असत. तों कोणे एके दिवशीं शाहापुरकर कुळकर्णी याच्या घरीं भिक्षेस जाऊन जयजयरघुवीर समर्थ असें ह्मणून हाक मारिली, तों कुलकर्णी याचे घरीं याच्या बायकोनें ह्मटलें, कीं, आमचें भरलें घर, येथें तुह्मी ह्मणतां, हें ह्मणूं नका, असें ह्मटल्यावरून स्वामी बरें ह्मणून गेले. नंतर नित्य नित्य तेथें भिक्षेस येऊन, जयजय रघुवीर समर्थ " असा शब्द करावा. तो ऐकून बायकांनीं रागें भरावें. स्वामीनींही मुक्यानीं जात असावें. असें होत असतां कोणे एके दिवशीं स्वामी भिक्षेस आले, तों घरांतील सर्व बायका दिलगीर बसल्या आहेत, तें पाहून त्यांस स्वामीनीं विचारलें कीं, तुह्मीं चिंताग्रस्त कां बसलां ? कोणतें संकट पडलें आहे ? नंतर त्यांणीं उत्तर केलें कीं, कऱ्हाडीं मोंगलाई आहे, या मुळें तेथील अधिकारी यवन, गांवकीचे प्रकर्णीं घरच्या पुरुषांस विजापुरीं नेऊन बहुत पीडा करीत आहेत. या संकटांतून ते कसे पार पडतील, ह्मणून चिंता प्राप्त झाली आहे. नंतर स्वामीनीं उत्तर केलें कीं, तुमचे पुरुष संकटांतून पार पडल्यास मग " रामराम " असें ह्मणाल काय ? तेव्हां सर्व स्त्रिया " उत्तम आहे " असें म्हणून बोलल्या कीं, कऱ्हाडाहून विजापुरास बाजीपंत यांस नेलें. तेथून ते सुटून येतील तर आपण ह्मणतां तें मान्य करूं. तेव्हां स्वामी बोलले कीं, आजपासून अकरावे दिवशीं दोन प्रहरीं बाजीपंत घरीं येतील. हें ऐकतांच आपण सांगिल्याप्रमाणें झाल्यास, आह्मीं " राम राम " असें ह्मणूं आणि तुमची सेवाही करूं. असें सर्व स्त्रियांनीं ह्मटल्यावरून स्वामीनीं कारकुनाच्या वे-

घानें विजापुरास जाऊन बादशहापाशीं गांव प्रकरणीं हिशोब देऊन, कुलकर्णी यांचे जांवई बाजीपंत यांस सोडवून घेतलें. त्याकाळीं स्वामीचें स्वरूप पादशाहानें पाहून बहुत संतोषी होऊन नांव विचारिलें. तेव्हां समर्थांनीं दासोपंत ह्मणून नांव सांगितलें. त्यानंतर वस्त्रें पात्रें देऊन बहुत सन्मान केला, आणि बहुत संतोषानें उभयतांसही निरोप दिला.

दोघेही शहराबाहेर आल्यानंतर बाजीपंतांनीं विचारिलें, कीं, तुह्मी कोण, कोठून आलां व कोणी पाठविलें ? तेव्हां समर्थांनीं त्यास उत्तर केलें, कीं, तुमची स्त्री सतीबाई, आणि तुमचे श्वशुर आबाजीपंत यांणीं पाठविलें ह्मणून आलों. याप्रमाणें सांगून त्यांजबराबर स्वामी शाहापुरच्या शिंवेपर्यंत आले. तेव्हां बाजीपंत पुढें चालत असतां स्वामी पाठीमागेंच अदृश्य जाहले. इतक्यांत बाजीपंत मागें पाहतात तों ते नाहींत, तेव्हां मागें पुढें पाहात पाहात गांवांत आले, आणि ग्रामदेवतेचें दर्शन करून घरीं गेले (तो दिवस अकरावा) घरीं जाऊन सर्वांस भेटले, आणि विचारिलें कीं, तुह्मीं कारकून पाठविला, तो कोण ? त्यानें पादशाहाजवळ त्याच्या मर्जीप्रमाणें हिशोब देऊन मला सोडवून आणिलें. तो कारकून कोठें आहे ? आह्मां बरोबर शिंवे पर्यंत आला, तो मागचेमागेंच नाहींसा जाहला. असें ह्मणतांच सर्व बोलले कीं, आह्मी कांहीं कारकून पाठविला नाहीं, परंतु एक गोसांवी भिक्षेस येत होता, तो बोलला कीं, तुमचे घरचे पुरुष आजपासून अकरावे दिवशीं दोनप्रहरीं येतील, ते आल्यानंतर तुह्मी रामस्मरण

कराल, कीं काय ? तेव्हां आह्मी होय ह्मटलें आहे. त्या योगेंकरून आपण सुटून आलां असाल, ह्मणून सर्वांनीं सांगितलें. तेव्हां बाजीपंतांनीं विचारिलें कीं, तो गोसांवी कोठें रहातो ? तेव्हां त्याणीं सांगितलें कीं, आह्मांस ठाऊक नाहीं, बहुधा अरण्यांत असतो. असें ऐकून बाजीपंत यांणीं अरण्यांत बहुत शोध केला, परंतु कोठें ठिकाण लागला नाहीं. तेव्हां त्या साधूचें दर्शन घेतल्या शिवाय अन्न घ्यावयाचें नाहीं, असा निश्चय करून तीन दिवस निराहार राहिले. असा बाजीपंतांचा निश्चय पाहून, चवथे दिवशीं मातःकाळीं स्वामींनीं कृपा करून, " जय जय रघुवीर समर्थ " असें ह्मणून भिक्षेकरितां अंगणीं येऊन उभे राहिले. तों त्यांस त्या सतीबाईनें पाहतांच, जसें गाईला पाहतांच, वत्स हंबरून धांवतें, त्या अन्वयें मोठ्यानें हंबरडा फोडून धांवत अंगणीं जाऊन चरणीं मस्तक ठेऊन गडबडां लोळूं लागली. त्यासमयीं स्वामी कृपायुक्त होऊन तिचे मस्तकीं हस्त ठेऊन " तूं हा शोक कां करितेस, ऊठ " असें ह्मणतांच, तिणें उठून हस्त जोडून विनंति केली कीं, मजला आपण चुडेदान दिलें, त्याप्रमाणें भ्रतार घरीं आले, आणि आपले दर्शनाकरितां ते तीन दिवस उपोषित आहेत, यास्तव त्यांवर स्वामीनीं कृपा करावी. अशी प्रार्थना बाई करीत आहे, तों बाजीपंतही आले, आणि साष्टांग नमस्कार करून विनंति करितात, तों आबाजी मुन्हार व त्यांचे चुलतबंधु दत्ताजी अनंत हे सर्व मुलें बाळें सुद्धां येऊन साष्टांग नमस्कार करून प्रार्थना करिते जाहले कीं, आह्मां सर्वांस कृपानुग्रह करून

प्रसाद द्यावा. तें स्वामींनीं मान्य केलें. नंतर पाकसिद्ध करून स्वामीस मांगल्यस्नान घालून सर्वांनीं पूजा केली. समर्थांनीं प्रथम सतीबाईस, नंतर बाजीपंत व अंबाजी मुऱ्हार व दत्ताजी अनंत यांस क्रमेंकरून अनुग्रह दिला. पुनः सर्वांनीं पूजा करून तीर्थ प्रसाद घेऊन स्वामीचे पंक्तीस भोजनें केलीं. नंतर स्वामी निघून खिंडीवर गेले.

अबाजीपंत, व दत्ताजीपंत, हे उभयतां चुलतबंधु शाहापुर सुपणें येथील कुलकर्णी, बाजीपंत हे अबाजीपंत यांचे जामात, व सतीबाईचे भ्रतार, सतीबाईसच (बयाबाई शाहापुरकरीण असें म्हणत होते.) सर्वांपेक्षां बाईची निष्ठा स्वामिचरणीं बहुत होती. आणि प्राण जावो, अथवा राहो, दर्शन, व तीर्थ घेतल्या वांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं, हा नेम धरिला होता. तेव्हां एका दिवसाआड, किंवा दोन दिवसांआड, किंवा चार दिवसांआड, किंवा आठदिवसांनीं स्वामीचें दर्शन झालें, म्हणजे तीर्थ घेऊन अन्नसेवन करावें. असे कांहीं दिवस गेले, तों कोणे एके समयीं आठ दहा दिवस झाले, दर्शनच नाहीं. तेव्हां स्वामीनीं येऊन रागें भरून उतरंडी फोडून बारिक धान्य करून टाकिलें. तेव्हां बाईनें त्रास न करितां सर्व धान्य निवडून महाराज ! भोजनास यावें, यात्प्रमाणें प्रार्थना करित असावें. अशाप्रकारें स्वामींनीं बहुत छळणा केली, परंतु तिनें संतोष मानून आज्ञा पालन करीत असावें.

कोणे एके समयीं श्रीची स्वारी चंद्रगिरीस होती, तेव्हां बाईस अकरा दिवसपर्यंत दर्शन न झाल्यामुळें उपोषणें झालीं. ह्मणून बाई फिरत फिरत अकस्मात् चंद्रगिरीवर आली. तों व्याघ्र, रीस, इत्यादि जनावरें सभोंवतीं मिळवून स्वामी बसले आहेत, असें पाहून बाईनें भय न मानितां निःशंकपणें येऊन श्रीचरणीं साष्टांग नमस्कार घातला, आणि पुढें उभी राहिली. तेव्हां स्वामींनीं उठून पोटाशीं धरून भाषण केलें कीं, हा निग्रह काय ? बरें अस्तु, उत्तम आहे, स्वयंपाक करावा. असें ह्मणतांच बाई बोलली कीं, महाराज ! येथें कांहींएक साहित्य नाहीं, त्यास हें भाजणीचें पीठ नैवेद्यास आणिलें आहे. याचा अंगिकार करावा. त्यावरून हास्य करून स्वामी बोलले कीं, या जाळीखालीं सर्व साहित्य आहे, तें घेऊन पाक करावा. तेव्हां बाईनें आज्ञा ह्मणून सर्व साहित्य घेऊन वरण, पुरण, वडे इत्यादि स्वयंपाक सिद्ध केला. नंतर स्वामींनीं स्नान संध्या करून पात्र मांडिलें, आणि पुष्कळ वाढण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें बाईनें पात्र वाढिलें. नंतर समर्थांनीं " पाठमोरें बसून नैवेद्य होई तोंपर्यंत मजकडे पाहूं नको " ह्मणून बाईस आज्ञा करून आपण श्रीमारुतीचें ध्यान, आवाहन करून नैवेद्य समर्पण करीत आहेत, तों बाईनें किंचित् मान वांकडी करून किंचित् डोळे उघडून पाहिलें तों तेजःपुंज दिव्य स्वरूप दृष्टीस पडलें. तें पाहतांच बाईस मूर्छा प्राप्त जाहली. नंतर नैवेद्य समर्पण जाहल्यावर बाईस स्वामीनीं हस्तस्पर्श करून सावध केलें, आणि भाषण केलें, कीं, " तुझ्या पूर्वसुकृतें श्रीमा-

कृतीचें दर्शन तुजला जाहलें" असें ह्मणून आपण भोजन करून बाईसही भोजनास घालून शाहापुरास घेऊन आले. आणि "ज्याचें दर्शन तुजला जाहलें, त्या मूर्तीची स्थापना करून देतों" असें ह्मणून चुना तयार करवून एक मंदिर बांधून तेथें प्रताप मारुतीचें ध्यान स्थापून आपल्या हातें अर्चा करून आपल्या स्नानसंध्येकरितां गुहा केली. आणि बाईस सांगितलें कीं, श्रीमारुतीची पूजा करून तीर्थ घेऊन स्वस्थ भोजन करीत असावें. अतःपर उपोषणें करूंनये, ह्मणून आज्ञा करून आपण चाफळखोऱ्यांत आले.

भाग ६ वा.

मूर्तीची स्थापना.

ते समयीं शिवाजी महाराजही राजगड इत्यादि किल्ले घेऊन प्रतापगड बांधोन तेथें देवीची स्थापना करून पुर्णेपांत व नाशिकापासून करवीरपर्यंत मुलुख व कोंकणपट्टी सर करून राज्य आक्रमण करीत करीत म्लेंछांचा उच्छेद करून धर्मस्थापना करावी, ह्मणून महाराष्ट्रराज्याची स्थापना करीत चालले होते, तों स्वामी चाफळखोऱ्यांत डेरवणचे डोंगरघळींत किंवा वाघापुरचे सडचावर किंवा भैरवगडचे घळींत किंवा चंद्रगिरीवर किंवा क-

ळंब्याचे घळींत राहत असत. तेव्हां चाफळखोऱ्यांत नरसोमलनाथ अंबरखाने शिवाजीमहाराजाकडून मामलेदार होते. त्यांणीं व आनंदराव देशपांडे यांणीं अनुग्रह घेऊन चाफळीं श्रीस्वामीस मठ करून दिला. त्या मठांत कांहीं दिवस येऊन रहावें, तों भानजीजोशी याणीं स्वामींचा अनुग्रह घेतला, ह्मणून त्यांचें भानजी गोसांवी हें नाव पडलें. हे स्वामींजवळ नेहमी असत. याप्रमाणें शिष्यसंप्रदायी बहुत जाहले. तेव्हां कोणास मठ करून देऊन तेथें ठेविलें, व कोणी नेहमी जवळच असत, असा संप्रदाय वाढत चालिला. मग स्वामी कोणे एके दिवशीं रुद्राजीपंत देशपांडे कऱ्हाडकर यांचे घरीं आले. तेदिवशीं रात्रौ कीर्तन जाहलें. तें श्रवण करून रुद्राजीपंताची कन्या अकाबाई स्वामीस शरण आली; ती बाळविधवा होती, तिजला अनुग्रह दिला. तेणेंकरून ती पूर्णबोधांतें पावली, आणि निरंतर स्वामीचे सेवेस राहती जाहली.

नंतर कोणे एके दिवशीं मिर्जेस समर्थ गेले. तेथें दोन प्रहरीं भिक्षेस देशपांडे यांचे घरीं गेले. तों देशपांडे यांची कन्या वेणुबाई बाळविधवा होती, ती एकनाथी भागवत वाचीत बसली होती, तिजला स्वामीनीं विचारिलें कीं, तुह्मीं पारायण कशाचें करितां ? तेव्हां तिनें उत्तर केलें कीं, एकनाथी भागवताचें पारायण करितें. नंतर स्वामीनीं प्रश्न केला कीं, यांतील भागवतधर्म समजून घेतला किंवा नाहीं ? तेव्हां वेणू बोलली कीं, स्वामी ! धर्म कांहीं समजून घेतला नाहीं, मी पारायण मात्र करितें. असें ऐकून धर्म

समजोन घेतल्यावांचून पारायणाचें फल काय? असें ह्मणून स्वामी निघून गेले. नंतर पारायण करावयास घरचे उपाध्ये यांणीं सांगितलें होतें, त्यांजपाशीं येऊन वेणुबाई बोलली कीं, आज कोणी साधु भिक्षेस आला होता, त्याणें मजला विचारिलें कीं, यांतील धर्म काय? तेव्हां मी उत्तर केलें कीं, यांतील धर्म मला ठाऊक नाहींत, आपण सांगावे. तेव्हां त्यांणीं उत्तर केलें कीं, तुह्मास पारायण करावयाचें ज्यांणीं सांगितलें असेल, त्यांस विचारावें. असें ह्मणून तो साधु निघून गेला. तरी या भागवतांतील धर्म काय ते सांगावे. तेव्हां उपाध्यायांनीं उत्तर केलें कीं, यांतील धर्म आह्मांस ठाऊक नाहींत. हा पवित्र ग्रंथ वाचल्यानें वाणी पवित्र होते, यास्तव तुह्मांस वाचण्यास सांगितलें आहे. आतां तुह्मीं त्याच सत्पुरुषास शरण जाऊन यांतील धर्माचा विचार पुसून घ्यावा. असें ह्मटल्यावरून वेणुबाई स्वामीचा निदिध्यास करीत असतां कोणे एके दिवशीं पुनः स्वामीची गांठ पडली. त्याकाळीं स्वामीस बहुत प्रकारें विनंति करून आपले घरीं ठेवून घेतलें आणि पित्यास सांगून स्वामीची पूजा करून पित्यासहित अनुग्रह घेतला. नंतर स्वामीची प्रार्थना करून मास पक्ष घरीं ठेऊन घेतलें. स्वामीचें ध्यान व व्यवहार पाहून पिता व कन्या हीं उभयतां मनोभावें स्वामिसेवा करितीं झालीं. नंतर जाण्यास निघाले, तेसमयीं पित्याची आज्ञा घेऊन वेणुबाई स्वामीचे चरणसेवेसीं निरंतर रहावयासाठीं निघाली.

पुढें कोणे एके दिवशीं स्वामी शिष्यमंडळीसहवर्तमान करवीर क्षेत्रीं गेले. तेथें श्रीमहालक्ष्मीचें दर्शन घेऊन रात्रौ कीर्तन करीत असतां पाराजीपंत गंगातीरस्थ ते श्रीदेवीचे दर्शनास आले. ते समर्थांचें कीर्तन श्रवण करून बहुत संतोष पावले आणि हे साधु बहुत थोर आहेत, यांजपासून अनुग्रह घ्यावा, हें चित्तांत आणून दुसरे दिवशीं स्वामीकडे गेले. आणि प्रार्थना करून घरीं नेऊन पूजन अर्चन करून विनंति करून अनुग्रह प्रसाद घेतला. नंतर पंक्ति मांडिल्या. पाराजीपंत यांजवळ अंबाजी ह्मणून मुलगा दहा वर्षांच्या वयाचा होता, त्याणें स्वामीचे पूजेकरितां साहित्य तयार करून दिलें, आणि पंक्तीस पाट मांडणें, रांगोळ्या घालणें, आणि न्यून पडेल तें पाहणें इत्यादिक काम करित होता. असा चमत्कारिक मुलगा पाहून, स्वामीनीं पंतांस विचारलें कीं, हा मुलगा कोणाचा कोण ? यावरून पंतांनीं विनंति केली कीं, हा मुलगा माझा भाचा व गंगातीरीं बाभुळगांव ह्मणून आहे, तेथील कृष्णाजीपंत कुळकर्णी यांचा पुत्र, याचे तीर्थरूप कृष्णाजीपंत महायात्रेस गेले तेव्हां त्याणीं याची मातोश्री व याचा बंधु दत्तात्रेय व हा, असे त्रिवर्गास मजपाशीं ठेविलें.

यानन्तर स्वामीनीं अंबाजीस जवळ बोलावून विचारिलें कीं, मुला तुझें नांव काय ? तेव्हां तो बोलला कीं, माझें नांव अंबाजी. तुजला लिहावयास येतें काय ? असें स्वामीनीं विचारतांच त्याणें येतें ह्मणून विनंति केली. त्यावरून स्वामीनीं एक सवाई ह्मणून दाखविली. ती अंबाजीनें ऐकून त्याप्रमाणेंच लिहून दाखविली.

त्यावरून दुसरी, तिसरी, चवथी आणि पांचवी यामाणें बिकट बिकट अकरा सवाया म्हटल्या, तितक्याहि त्यानें तात्काळ लिहून दाखविल्या. त्या पाहून स्वामी बहुत संतुष्ट होऊन आपण ग्रंथ करितों, तो लिहावयास हा योग्य आहे. असें म्हणून पाराजीपंतांस समर्थ बोलिले कीं, हा मुलगा आम्हांस द्यावा. त्यासमयीं पाराजीपंतांनीं प्रार्थना केली कीं, या त्रिवर्गाचें पालन पोषणाचा विचार मात्र मजकडेस आहे, आणि माझीच सत्ता यांजवर आहे असें नाहीं. मी सर्वस्वी स्वामींचा दास आहें, मीच सेवेस निरंतर राहतों. सर्व स्वामींचेंच आहे. असें म्हटल्यावरून स्वामी हास्य करून बोलले कीं, तुमची बहीण व दुसरा मुलगा तुम्हांपाशीं असूंद्या. आणि हा आम्हांजवळ द्या. आणखीं असें एक विचारतों कीं, याचा बाप, बायको व मुलें तुम्हांपाशीं ठेऊन काशीस कां गेला ? यांतील वर्तमान सविस्तर सांगावें, म्हणून आज्ञा झाली. त्यावरून पाराजोपंत सांगते जाहले कीं, महाराज या मुलाचा पिता कृष्णाजीपंत बाभुळगांवकर कुळकर्णी, आमचा मातुलपुत्र आणि आम्हीं पारगांवकर कुळकर्णी, रोजगारास्तव इकडे आलों. पाठीमागें कृष्णाजीपंत यांच्या पित्यानें पुत्राचें लग्न करून शांत जाहला. नंतर कृष्णाजीपंत यांस एक पुत्र जाहला. तो थोर होईपर्यंत ते घरीं होते. नंतर स्त्री आणि पुत्रास घरीं ठेऊन "आतां या स्त्रीचे ऋणापासून मुक्त जाहलों." असें मनांत आणून उत्तर दक्षिण मानसयात्रा करावी म्हणून तीर्थयात्रेस निघाले, ते उत्तर मानसयात्रा करून दक्षिण मानसयात्रा करीत करीत करवीर क्षेत्रीं आले.

तेथें श्रीमहालक्ष्मीचें दर्शन करून ओरींत भजन करीत होते. ते समयीं आह्मीं देवीचे दर्शनास गेलों. दर्शन घेऊन जातेसमयीं कोणी सत्पुरुष भजन करितात ह्मणून श्रवणास गेलों. आणि पाहतों तों हे बाभुळगांवकर कुळकर्णी अशी ओळख पुरली, नंतर त्यांस प्रश्न केला कीं, तुह्मीं कोठील कोणाचे कोण ? तेव्हां त्यांणीं उतर केलें कीं, आह्मी तीर्थवासी आहों. नंतर अहो ! तुह्मी तीर्थवासी खरे, परंतु बाभुळगांवकर कुळवर्णी कृष्णाजीपंत अहां असें वाटतें ? असें आह्मी ह्मणतांच त्यांणींही आमचें नांव घेतलें. अशा परस्परें भेटी होऊन त्यांस घरास घेऊन आलों. चार दिवस ते घरीं राहिले. नित्यक्रमाप्रमाणें पाहांटची प्रहर रात्र राहतांच भजनास उठावयाचे पुर्वी कृष्णाजीपंत यांस दृष्टांत जाहला कीं ' पाराजीपंत यांची भगिनी आहे, इशीं तुह्मी विवाह करावा. तेव्हां जागृत होऊन आपलेठायीं विचार केला कीं, माझें एक लग्न जाहलें त्यांतूनच सुटकेचा विचार पाहत आहें, आणखीं दुसरें लग्न करावें हें ठीक नाहीं. असें मनांत आणून पुनः निद्रा केली. तों आणखीं दृष्टांत जाहला कीं पाराजीपंताचे बहिणीशीं विवाह केला, तर उत्तम आहे, नाहीं तर इजकरितां पुनः जन्म घ्यावा लागेल, यास्तव लग्न केलेंच पाहिजे. असा पुनः दृष्टांत जाहल्यावर उठून नामस्मरण करीत तुळसीवृंदावनाजवळ जाऊन बसले. इकडे आह्मी निद्रा केली होती, त्यासमयीं आह्मांस दृष्टांत जाहला कीं, तुमच्या भगिनीचा

कृष्णाजीपंतांशीं विवाह करून द्यावा, अनुमान करूं नये. असा दृष्टांत होऊन आह्मीं जागृत झालों आणि बाहेर आलों तों कृष्णाजीपंत वृंदावनाजवळ भजन करीत बसले होते. त्यांजवळ आलों, तों कृष्णाजीपंतांनीं आपल्यास झालेला दृष्टांत आह्मांस सांगितला व आह्मांस दृष्टांत जाहला, तो आह्मींही त्यांस सांगितला.

याप्रमाणें उभयतांनीं मान्य करून श्रीचे आज्ञेप्रमाणें विवाहाचा मुहूर्त योजिला. तेसमयीं कृष्णाजीपंत बोलले कीं, मी प्रपंचीं गुंतून राहणार नाहीं, तेव्हां " आपण लग्न करून घ्यावें. कुटुंबाचें संरक्षण मी करीन " असें आह्मीं बोलून लग्न करून दिलें. नंतर कृष्णाजीपंतांनीं कांहीं दिवस घरीं रहावें व कांहीं दिवस तीर्थयात्रा करावी. असें करोत असतां कांहीं दिवसांनीं प्रथम पुत्र जाहला. त्याचें नांव अंबेनें दृष्टांत दिला, यास्तव अंबाजी ह्मणून ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं पुनः पुत्र जाहला. त्याचें नांव दत्तात्रेय असें मातोश्रीनें ठेविलें. नंतर कृष्णाजीपंत काशीस जाऊन संन्यास ग्रहण करून तिकडेस राहिले या कारणानें ही बहीण व मुलें आह्मांपाशींच आहेत. तथापि यांजवर माझी पूर्ण सत्ता नाहीं, यास्तव यांचे मातोश्रीस विचारावें, ह्मणून पाराजीपंतांनीं विनंति केली. त्याजवरून बाईस बोलावून " हा मुलगा आह्मांस द्यावा " असें स्वामी बोलले. तेव्हां बाईनें उत्तर केलें कीं, महाराज ! अंबाजीसच नेतां आणि आह्मां दोघांस टाकितां, तरी समर्थांनीं कृपाकरून तिघांसही न्यावें. आह्मीं तिघेही शरण आहों आणि आपण शरणागतवत्सल आहां. असें बाईनें ह्मणतांच स्वामी बहुत

संतोषातें पावले आणि तिघांसही अनुग्रह प्रसाद देऊन पंक्तीस भोजन करून प्रातःकाळीं जातेसमयीं तिघांसही समागमें नेलें. पाराजीपंतही पोहोंचविण्याकरितां रत्नागिरीपर्यंत स्वामीबरोबर आले आणि तेथून आज्ञा घेऊन माघारीं गेले.

इकडे स्वामी कऱ्हाडप्रांतीं आले आणि तेथें उद्धवबावांस टांकळीहून बोलावून आणिले. नंतर शिरगांवीं मठ करून बाईस व दत्तोबास तेथें ठेविलें आणि अंबाजी व उद्धव गोसांवी व आणखी कांहीं शिष्यमंडळी नेहमीं आपल्या बरोबर ठेविली. यामार्णे आपला संप्रदाय वाढत चालला. तेव्हां आपली श्रीरामउपासना यास्तव रामनवमीचा उत्साह करावा. असें मनांत आणिलें आणि स्थलयोजना करितात तों, मनांत आलें कीं, मसुर हें गांव फार चांगलें, येथें ब्राह्मणसमुदाय बहुत आहे. ह्मणून यास ब्रम्हपुरी असें ह्मणतात, तर येथें उत्साह करावा, असें योजून तेथें कुळकर्णी याच्या आईस उपदेश करून श्रीमारुतीची स्थापना करून शके १५६७ पार्थिवनामसंवत्सरीं नवमीच्या उत्साहास प्रारंभ केला, उत्साहांत सिंहासनावरच्या निशाणांच्या काठ्यांला देवालयांत जाण्यास मार्गांत अंब्याच्या वृक्षाची फांदी आडवी आली होती, याजमुळें अडचण पडूं लागली, ह्मणून फांदी तोडावी, असें स्वामी बोलिले. तेव्हां " कऱ्हाडचे ठाणेदारास विजापुरची आज्ञा आल्याखेरीज झाडास हात लावावयाचा नाहीं, हे ब्राह्मण मनास येईल तसें करितात, तें करूं द्यावयाचें नाहीं " असें मसुर गांवच्या अधिकारी यवनानें सांगितलें. हें वर्तमान

स्वामींनीं ऐकून त्याचक्षणीं मनोवेगेंकरून विजापुरास जाऊन पादशहापुढें उभे राहिले. त्याकाळींचें ध्यान, पायीं पादुका, हातीं माळ, कौपीन आणि अंगावर एक छाटी अशी स्वामीची मूर्ति पादशहानें पाहून हे हिंदूचे फकीर अवलिया आहेत, असें जाणून पादशहानें तत्काळ तखताखालीं उतरून पायांवर मस्तक ठेवून विचारलें कीं, आपण कोठून आलां काय हुकूम आहे ? असें ह्मणतांच स्वामी बोलिले कीं, आम्ही मसुर गांवीं श्रीरामनवमीचा उत्साह करितों, तेथें देवाच्या सिंहासनास असलेल्या निशाणाच्या काठच्या जाण्याच्या वाटेंत, अंब्याची ढाळी आडवी आली आहे. तेणेंकरून अडचण होते, त्यास्त ती तोडवीत असतां, तुम्हांकडील ठाणेदार तोडूं देत नाहीं, यास्तव आलों. असें म्हणतांच पादशहानें त्या ठाणेदारास मोहोरसुद्धां चिठी करून दिली. आणि महाराज तुम्हांस जाण्यास अवकाश लागेल, असें म्हणतांच "जसा आतां आलों तसाच जातों." असें म्हणून समर्थ अंतरिक्षमार्गानें निघाले, हें पादशहानें पाहून परम आश्चर्य केलें.

स्वामीनीं मसुरास येऊन मोहोरसुद्धां चिठी ठाणेदारास आणून देऊन फांदी तोडावयाची परवागी घेऊन मठास आले. तेव्हां समस्त मंडळीनें नमस्कार करून महाराज ! अशा उत्साहांत एकाएकींच कोठें जाणें जाहलें होतें. तेव्हां स्वामीनीं विजापुरची चिठी ठाणेदारास आणून देण्याकरितां गेलों होतों, ह्मणून सविस्तर वर्तमान सांगितलें. तें मंडळीनें ऐकून आश्चर्य केलें. नंतर समर्थांनीं अंबाजीस बोलावून सांगितलें कीं, कुऱ्हाड घेऊन झा-

डावर चढून फांदी तोडून टाकावी. त्यासमयीं अका व वेणूबाई बोलली कीं, खालीं मोठी विहीर आहे आणि फांदी अडचणींत आहे, याकरितां जपून तोडावी. तेव्हां बरें ह्मणून अंबाजी खांद्यावर कुऱ्हाड घेऊन स्वामीस नमस्कार करून झाडावर चढून फांदीवर आला. तों " पुढें बसून मागें तोडणें " ह्मणून स्वामींनीं आज्ञा केली. तेव्हां आज्ञा प्रमाण, असें ह्मणून बुंधाकडे तोडितांच फांदी सहवर्तमान विहिरींत पडला. तेव्हां जनयात्रा व शिष्यमंडळी हे सर्व पहात आहेत परंतु कोणीच बोलत नाहींत. दोन घटिका जाहल्या, तथापि अंबाजी बाहेर येईना, तेव्हां अकाबाईनें अंबाजी मृत्यु पावला, असें मनांत आणून सर्वांच्या अनुमतें समर्थांस प्रार्थना केली, कीं, अंबाजीस बाहेर काढून त्याचे दहनादि संस्कार करण्याची आज्ञा जाहली पाहिजे. असें ह्मणतांच स्वामी आश्चर्य करून बोलले, कीं, अंबाजी मेला कीं काय ? त्यास पडून चार घटिका जाहल्या, अद्यादि कसा वांचेल. असें अकानें बोलतांच स्वामीनीं हंसून विहिरीजवळ येऊन विहिरीच्या कांठावर दोन हात टेंकून, अंबाजी ह्मणून हाक मारितांच अंबाजीनें पाण्यांतून हाक दिली. तीऐकतांच अंबाजी तूं कल्याणरूप आहेस का ? असें स्वामीनीं विचारिलें, तेव्हां अंबाजी बोलिला, कीं, आपले कृपेंकरून कल्याणरूप आहें. तेव्हां स्वामीनीं बाहेर ये ह्मणतांच बाहेर येऊन स्वामीस साष्टांग नमस्कार घालून पुढें उभा राहिला. तेव्हां स्वामींनीं त्याचें कल्याणस्वामी

हें नांव ठेवून, साकर वांटली, त्या दिवसापासून त्याचें कल्याण-स्वामी हें नांव प्रसिद्ध जाहलें.

यानंतर मसुरास स्वामी असतां शाहापूरकर बाई नित्य दर्शनास येत असे, तिच्या समागमें अपाजीपंत व शाहापुरकरांचा पुत्र भिकाजी, येत असे. याचें बाईनेंच लाहानपणापासून पालन पोषण केलें, ह्मणून यास बहुधा लोक बाईचा पुत्र असें ह्मणत असत, आणि तो बाईबराबर नेहमीं येत असे. बाई दर्शनास आली, नंतर नमस्कार करून बसण्याविषयीं समर्थांची आज्ञा जाहली, त्यावरून बसली, आणि भिकाजी उगाच राहिला. हें पाहून अका बोलली, कीं, अरे! उगाच धटिंगणासारखा कां उभा राहिलास, तरि स्वामींस नमस्कार करून हात जोडून उभें रहावें. असें ह्मणतांच तो बोलला कीं, स्वामीस नमस्कार केल्यानें स्वामी काय देतात, हें ऐकून स्वामी बोलले कीं, स्वामी सांगतील तें ऐकशील, तर जें मागशील तें देतील. तेव्हां काय सांगतां तें सांगा, ह्मणून भिकाजी बोलला. नंतर स्वामींनीं आज्ञा केली कीं, या विहिरींत उडी घे, असें ह्मणतांच शब्दासरशी उडी घेतली. हें स्वामींनीं पाहून बोलले कीं, या पोरानें आह्मावर निमित्त देऊन प्राण दिला. असें ह्मणून आपण उठून त्याचे मागोमाग उडी घेतली. तेव्हां भिकाजीस मी उडी घेतली, हें मात्र स्मरत होतें. पुढें विहिरीचे आंत गेला, तों तेथें एक दिव्य मंदीर व त्यांत सिंहासनारूढ स्वामींची मूर्ति, असें पाहून हात जोडून स्वामी पुढें उभा राहिला. तों स्वामी बोलले कीं, काय इच्छा आहे, माग.

असें म्हणतांच " माहाराज ! अनुग्रहकृपा करावी, दुसरें कांहीं नको. " अशी भिकाजीनें विनंति केली. त्यासमयीं पूजासामुग्री सर्व सिद्ध पाहून पूजा करा, म्हणून स्वामीची आज्ञा होतांच पूजा करून अनुग्रह प्रसाद घेतला. नंतर जे प्रश्न करावयाचे होते, ते केले. स्वामीनींही जें सांगावयाचें तें सर्व सांगितलें. त्यासमयीं भिकाजी परम समाधान पावून स्वामीचे कृपेंकरून परमयोग्यता पावला. नंतर स्वामी हात धरून विहिरीबाहेर घेऊन आले. उद्धव गोसांवी, कल्याण गोसांवी, अका व वेणुबाई यांचे योग्यतेसारखी भिकाजीगोसांवी यांची योग्यता जाहली. यांजवर स्वामींची कृपा बहुत यास्तव हे नेहमीं स्वामीजवळच असते जाहले.

पांच, चार, उत्साह मसुरेंत जाहल्यानंतर श्रीरामचन्द्रजीच्या मूर्ति स्थापून उत्साह करावा असा संकल्प केला, आणि मूर्तीचा विचार करूं लागले. तेव्हां पाथरवट यास बोलावून सांगितलें कीं, आह्मांस श्रीरामचंद्रजीच्या मूर्ति चार करून द्याव्या. तेव्हां त्या पाथरवटानें प्रार्थना केली कीं, महाराज, एकावर्षाचा अवकाश द्यावा, म्हणजे आज्ञेप्रमाणें मूर्ति करून देतों. तेव्हां " बरें रामाची इच्छा " असें बोलले. त्यानंतर कोणे एके दिवशीं निजानंदस्वामींचे पुण्यतिथीस कऱ्हाडीं जावघाकरितां रंगनाथस्वामीनीं निगडीस समर्थांस बोलावून नेलें. नंतर कऱ्हाडीं पुण्यतिथी जाहल्यावर रंगनाथस्वामी निगडीस समर्थांसहवर्तमान आले. कांहीं दिवस तेथें राहून निरोप घेऊन निघून स्वामी श्रीकृष्णातीरीं आले. दक्षिणवाहिनी कृष्णेच्या पूर्वतीरीं रहिमतपुरचे रानांत ब्रह्म-

पुरी पश्चिमतीरीं अंगापुरचे रानांत शिवनाथस्थान आहे. त्या स्थानीं समर्थ स्नान करून संध्येस बसले. ब्रह्मयज्ञादिक आन्हिक जाहल्यानंतर श्रीमारुतीचें ध्यान करून मानसपूजेस प्रारंभ केला. तों श्रीमारुतीचें ध्यान प्रकट न होतां श्रीरघुपतीचें ध्यान प्रगट झालें. त्यासमयीं समर्थांनीं विनंति केली कीं, आज असें ध्यान कां आलें यांतील कारण दासास कळलें पाहिजे. त्यावेळीं कृष्णेच्या डोहांतून शब्द जाहला कीं, तुमचे मनांतून रामनवमीचे उत्साहास मूर्तिस्थापना करावी असें आलें आहे; तरी या ध्यानाप्रमाणें मूर्ति येथील कृष्णेच्या डोहांत आहेत ह्या घेऊन जावें. हें श्रवण होतांच स्वामीनीं डोहांत उडी घातली आणि पाहतात तों रघुपतीची मूर्ति क्षत्रियध्यान व हातीं दोन कमळें रथावर उभी, व दक्षिणेस लक्ष्मण व वामभागीं सीता, उभयतांच्या हातीं चामरें आणि मारुति सारथी, अशा ध्यानाची मूर्ति एक्या पाषाणावर रथाच्या आकृतीसुद्धां पाहिली, व याप्रमाणेंच दुसरी मूर्ति महिषासुरमथिनी देवीची होती, अशा दोनही मूर्ति बाहेर घेऊन आले आणि ध्यान पाहून परम संतोषानें दोन्हीही मूर्तींची पूजा केली. त्या वेळीं त्या ध्यानाच्या स्तुतीपर श्लोक स्फुटला तोः—

॥ श्लोक ॥

ध्याये दूर्वादलाभं करधृतकमलं जानकीलक्ष्मणाभ्याम् ॥
वामे दक्षे च भागे शरदिज वधूसश्चामरैर्वीज्यमानम् ॥
संप्राप्त प्रसुनेसित हेम हय युक्तस्यन्दने तिष्ठधानम् ॥
राम क्षेत्रं सुपूर्ण दशवदनमुखात्कर्षयन्तं सुतेजः ॥ १ ॥

आणि त्या मूर्ति झोळींत घालून शके १५६९ सर्वजिन्नाम संवत्सरीं चाफळास जाण्याकरितां निघाले.

हें जाहलेलें चरित्र गुरारूयाच्या पोरांनीं पाहून अंगापुरीं जाऊन "कोणी गोसांवी येऊन दोन मूर्ति घेऊन जात आहे." असें वर्तमान सांगितलें. तेव्हां गांवकरी यांनीं झटलें कीं, आमचे रानांतील मूर्ति नेतात काय ? असें झणून स्वामींच्या पाठोस लागले आणि त्यांनीं चेरगांवचे रानांत सुकण्याचे खिंडींत स्वामीस गांठलें. आणि बोलले कीं, बावा, आमचे गांवच्या मूर्ति द्यावयाच्या नाहींत. त्या आमच्या आह्मांस द्याव्या. त्यासमयीं स्वामी बोलले कीं, या मूर्ति तुमच्या गांवांतून आणिल्या नाहींत, तर कृष्णेच्या डोहांतून आणिल्या त्या नेतों. तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, आमच्या गणपतीच्या देवळांतील मूर्ति आहेत. ह्या मागें मोंगलाईच्या दंग्यांत आमच्या वडिलांनीं डोहांत ठेविल्या होत्या, त्या द्यावयाच्या नाहींत, असें झणतांच स्वामीनीं उत्तम असें झणून तेथें सुकटण्यावर दोन्ही मूर्ति ठेऊन चाफळास आले. मागें अंगापूरकर यांनीं चेरगांवांतून दोन गाडे व पांच पन्नास मनुष्यें आणून मूर्ति नेण्याविषयीं प्रयत्न बहुत केला परंतु त्या मूर्ति जागेवरूनच उचलेनात, ते समयीं बहुत आश्चर्य करून चाफळास येऊन स्वामीस साष्टांग नमस्कार करून सर्वांनीं प्रार्थना केली कीं, महाराज ! आपल्या मूर्ति आपण आणवाव्या, आह्मीं नेत नाहीं. तेव्हां स्वामीनीं उत्तम झणून भानजी गोसांवी यांस आज्ञा केली कीं तुह्मीं सुकटण्यापावेतों जाऊन मूर्ति घेऊन येणें याप्रमाणें स्वा-

मींच्या आज्ञेवरून भानजी गोसांवी जाऊन दोन्ही मूर्ति झोळींत घालून चाफळास घेऊन आले.

नंतर अंगापुरकर यांनीं जाण्यास आज्ञा मागून प्रार्थना केली कीं, महाराज आपले सेवेसि आमचा कांहीं अधिकार असावा. त्यावरून स्वामीनीं आज्ञा केली कीं, प्रतिवर्षी श्रीरामनवमीचे उत्सवांत बिनीस सिंहासनाची काठी तुमची असावी. त्यावरून प्रतिवर्षी उत्साहांत बिनीचा मान अंगापुरकरांचाच चालू जाहला. नंतर चाफळकर यांस बोलावून देवालय करावयास जागा द्यावी म्हणून आज्ञा केली, त्यावरून गांवकरी यांनीं माडनदीस कुंभार डोह होता, त्याचे पलीकडेस दक्षिणतीरीं मोठी झाडीची, व भूत पिशाचादिकांनीं युक्त अशी अमंगळ श्मशानाची जागा होती, ती दाखविली. तेव्हां स्वामीनीं बहुत बरें, असें म्हणून ती जागा मान्य करून स्थलशुद्धि करण्याकरितां, तेथें शेंदूर लाविलेले जितके दगड होते, तितके उचलून नदीच्या डोहांत टाकिले. तेसमयीं त्यांत एक म्हसोबा होता, तो मूर्तिमंत पुढें येऊन साष्टांग नमस्कार घालून हात जोडून विज्ञप्ति करूं लागला कीं, स्वामीमहाराज! आपण तर सर्वभूतीं सारखे असतां; एथील सर्वभूतें स्थलभ्रष्ट केलीं, असें स्वामीनीं करूं नये. असो, आतां आम्हास आज्ञा होईल तेथें राहूं. तेव्हां स्वामी बोलले कीं, तुम्ही व तुमचा समुदाय उत्तम जन नसून जनांस उपद्रव करणारे आहांत, आणि आम्हास तर या स्थानीं श्रीचें देवालय करावयाचें आहे, तेथें श्रीची स्थापना झाल्यानंतर दर्शनास भक्तमंडळी बहुत येणार त्यांस तुम्हीं उपद्रव

घाल, याकरितां येथें तुमचें राहणें कसें घडेल ? याजवरून ह्मसोबा याचें ह्मणणें पडलें कीं, तुह्मी ठेवाल तेथें राहूं आणि तुमचे आज्ञेप्रमाणें चालूं. असें त्यानें ह्मटल्यावरून टेंकडीखालीं दक्षिणेस जांबळीच्या वृक्षाखालीं स्थल देऊन तेथें रहा, ह्मणून स्वामीनीं आज्ञा केली. त्याजवरून ह्मसोबानें पुनः प्रार्थना केली कीं, आमचे उदरपुर्तीची वाट काय ? नंतर समर्थांनीं आज्ञा केली कीं, उत्साहाच्या समयीं रथ ओढावयाचे पुर्वदिवशीं मापटेंभर तांदूळ व एक नारळ, रथ व ओढण्याचे समयीं मापटेंभर तांदूळ व एक नारळ, आणि रथावरून श्रीची स्वारी माघारीं आल्यानंतर श्रीवरून ओंवाळून दहींभात देतोल, इतक्यावर उदरनिर्वाह करून स्वस्थ रहावें, आणि कोणा एकासही उपद्रव करूं नये अशी स्वामींची आज्ञा जाहली, त्याप्रमाणें अद्यापपर्यंत त्या स्थानीं ह्मसोबा आहे.

पुढें श्रीचें देवालय करावयाचें तें सर्व शिष्यमंडळी, नरसोमलनाथ, अनंदराव देशपांडे चाफळकर व गिरिगोसांवी यांजकडून आलेलें द्रव्य व महाराज छत्रपति यांजकडून आलेले ३०० होन या सर्व द्रव्येंकरून त्यांत श्रीमूर्तीची स्थापना केली. आणि तेथें उत्साह शके १५७० सर्वधारी नामसंवत्सरीं चालू केला, तो आजपावेतों चालत आहे. शाहापुरकर पाटील साठे यांजकडे सर्व कारखान्याचा व छडीचा मान आहे. तें चालू ठेवून क्रमाप्रमाणें शिष्यमंडळीनीं उत्साह करीत असावा, स्वामीनीं उत्साहांत मठीं असावें; अथवा, रामघळीस किंवा शिंगणवाडीस गुहेंत असावें. या उत्साहाचें वर्णन समर्थांनीं डफगाण्यावर केलें आहे तें:—

॥ डफ गाणें ॥

भोंवती डोंगराचे फेर ॥ मध्यें देवाचें शिखर ॥
पुढें मंडप सुंदर ॥ नवखणाचा ॥ १ ॥
चहुंखांबांवरी रचना ॥ वरत्या चोवीस कमाना ॥
कम कटाउ नयना ॥ समाधान ॥ २ ॥
नानातरू आंबे वन ॥ दोहीं कडे वृंदावनें ॥
वृंदावनीं जगज्जीवनें ॥ वस्ती केली ॥ ३ ॥
पुढें उभा कपी वीर ॥ पूर्वेकडे लंबोदर ॥
खालीं दाटलें दरबार ॥ ठाईं ठाईं ॥ ४ ॥
दमामे चौघडे वाजतो ॥ धडाके भांड्यांचे होती ॥
फौजा भक्तांच्या साजती ॥ ठाईं ठाईं ॥ ५ ॥
माही मरातवे निशाणें ॥ मेघडंबरें सूर्य पानें ॥
पताका छत्र्या सुखासनें ॥ दिंड्या विंझणे कुंचे ॥ ६ ॥
काहळे कर्णे बुरुंग बाकें ॥ नानाध्वनीं गगन झांके ॥
बहु वाद्यांचे धबके ॥ परोपरी ॥ ७ ॥
टाळ मृदंग उपांग ॥ ब्रह्मविणे चुटक्या चंग ॥
तान मानें माजे रंग ॥ हरि कथेशीं ॥ ८ ॥
घंटा घांटा शंख भेरी ॥ डफडीं पांवे वाजंतरी ॥
भाट गर्जती नागरी ॥ परोपरी ॥ ९ ॥
उदंड यात्रेकरू आले ॥ रंगीं हरिदास मिळाले ॥
श्रोतेवक्ते कथा चाले ॥ भगवंताची ॥ १० ॥
नाना पुष्प माळा तुरे ॥ पाहों जातां भडस पूरे ॥
रंग स्वर्गींचा ऊतरे ॥ ठाईं ठाईं ॥ ११ ॥

गंध सुगंध केशरें ॥ उदंड उधळिति धूशरे ॥
जगदांतरे हरीहरें ॥ वस्ती केली ॥ १२ ॥
दिवटया हिलाल चन्द्रजोती ॥ नळे अरडत ऊठती ॥
बाण हवया झरकती ॥ गगनामध्यें ॥ १३ ॥
उदंड मनुष्यांचे थाटे ॥ दिसताती लखलखाटे ॥
एकमेकांसीं बोभाटे ॥ बोलावितो ॥ १४ ॥
उदंड उजळिल्या दीपिका ॥ नामघोष करताळिका ॥
कित्येक झणती ऐका ऐका ॥ ऐसे शब्द होती ॥ १५ ॥
क्षीरापतीची वांटणी ॥ तेथें जाहलीसे दाटणी ॥
पैस नाहीं राजांगणीं ॥ दाटी जाहली ॥ १६ ॥
रंगमाळा नीरांजनें ॥ तेथें वस्ती केली मनें ॥
दिवस उबावला सुमनें ॥ कोमायलीं ॥ १७ ॥
रथ देवाचा ओढीला ॥ यात्रेकरां निरोप झाला ॥
पुढें जावयाचा गलबला ॥ ठाईं ठाईं ॥ १८ ॥
भक्तजन झणती देवा ॥ आतां लोभ असूं द्यावा ॥
धन्य सुकृताचा ठेवा ॥ भक्ती तुझी ॥ १९ ॥
दास डोंगरीं राहतो ॥ यात्रा देवाची पाहतो ॥
देव भक्तासवें जातो ॥ ध्यानरूपें ॥ २० ॥

याप्रमाणें उत्साहाचा आनंद प्रतिवर्षी होत असे.

परंतु केव्हां केव्हां स्वामीनीं उत्सवांत असावें, केव्हां केव्हां नसावें तेव्हां " दास डोंगरीं राहतो यात्रा देवाची पाहतो " हें वाक्य समर्थांचें आहे असें शिष्यमंडळीनीं मानून डफगाण्यांत गात

असावें. देवीची मूर्ति आणिली होती, ती परळीस स्थापिली; तो विस्तार पुढें आहे. चाफळास श्रीचे देवालयासमीप दक्षिणेस जागा करून मठ बांधिला. त्या मठांत शिष्यमंडळींनीं राहात असावें. आपण स्वतः अरण्यांत किंवा घळींत किंवा मठांत किंवा सिंगणवाडीचे खिंडींत गुहा करून मारुति स्थापिला आहे, तेथें किंवा धोंडोबाचें डोंगरींत लहान गुहा व पाण्याचें टांकें आहे, इत्यादि ठिकाणीं कधीं कधीं वास करून श्रीचें देवालय पहावें, याप्रमाणें विहार करीत होते. प्रतिदिवशीं चाफळाहून उंबरजेस कृष्णास्नानास जात असत, तेव्हां तेथील गांवकरी यांनीं प्रार्थना करून मठ बांधावयास जागा दिली, तेथेंही मठ केला.

त्यावेळीं समर्थांचे शिष्य पुष्कळ झाले त्यांत बहात्तर असामी मोठे महंत होते त्यांचे नांवनिशीची याद डोम गांवचे मठीं आहे. त्या बहात्तर महंतांपैकीं स्वामीसेवेस जे होते त्यांचीं नांवें:—

उद्धव गोसावी.	देवदास गोसावी.	आपा गोसावी.
कल्याण गोसावी.	महादेव गोसावी.	दत्तात्रय गोसावी.
रंगोबा गोसावी.	मुसळराम गोसावी.	रोकडाराम गोसावी.
आकाबाई.	मौनी गोसावी.	हणमंत गोसावी.
वेणुबाई.	भोळाराम गोसावी.	दिवाकरभट गोसा०
सतीबाई शहापुरकर.	आनंदभट महाबले०	बाजीपंत शहापूरकर.
त्रिंबक गोसावी.	भिकाजी गोसावी.	(२०)

येणेंप्रमाणें शिष्यमंडळीपैकीं कोणी चाफळीचे मठांत असावें व कोणी स्वामीबरोबर असावें.

भाग ७ वा.

मारुतीची स्थापना व तुकाराम-मोरयागोसावी यांची भेट.

प्रथम शाहापुरीं शाहापुरकरीण बाईकरितां मारुतीची स्थापना केली, २ मसुरेंत श्रीरामनवमीच्या उत्साहाकरितां मारुतीची स्थापना केली; ३ चाफळीं श्रीची स्थापना केली, ते समयीं सन्मुख मारुतीची व पाठीमागें श्रीगणपतीचो स्थापना केली; ४ उंबरजेस नेहमीं स्नानास जाणें व राहणें पडूं लागलें, म्हणोन तेथें श्रीमारुतीची स्थापना केली; त्यासमयीं केशव गोसावी यांस त्या मठीं ठेविलें, (ते कल्याणगोसांवी यांचे शिष्य) ५ कसबे शिरोळ येथील देशपांडे वगैरे शिष्यमंडळी जाहली. त्यांनीं मार्थना केल्यावरून शिरोळ्यास श्रीमारुती स्थापून मठ करून दिला आणि देशपांडे यांस त्याची पूजा सांगितली मग ६ पाडळीस व ७ पारगांव येथील शिष्यमंडळीनें प्रार्थना केल्यावरून दोन्हीही ठिकाणीं श्रीमारुतींची स्थापना केली; ८ मानगावीं मारुति नव्हता यामुळें येतां जातांना दर्शन नाहीं, म्हणून गांवकरी यांस पुसिलें कीं, येथें श्रीमारुति कां नाहीं ? तेव्हां त्यांनीं विनंति केली कीं, शिंवेपुढें एक थोर धोंडा आहे, त्यासच आम्ही श्रीमारुति म्हणतों. असें बोलल्यावरून त्याच धोंडयावर आपण श्रीमारुति करून

देऊन त्याचो स्थापना केली. ९ हिंगणवाडीचे गुहेंत नेहमीं स्नान संध्या करण्याचें स्थान असे, म्हणून, लहान गोजिरी मूर्ति करून तिची स्थापना केली. १० मौजे बाहे तरफ वाळवें प्रांत मिरज त्यास्थळीं कोणे एके समयीं स्वामीची स्वारी गेली. बाहे येथें कृष्णेचे मध्यभागीं बेट आहे, त्यास्थळींची कथा अशी आहे कीं, पूर्वी श्रीरामचन्द्रजी लंकेहून येतांना कृष्णास्नानास उतरले,आणि सीताबाई सिरटें येथें स्नानास राहिली. श्रीरघुपती स्नानसंध्यादि कर्में करून श्रीसांबजीची स्थापना करून नांव रामलिंग ठेवून पूजा करून ध्यान करीत बसले. तेसमयीं कृष्णेस उल्हास होऊन बहुत गर्जना करूं लागली हें मारुतीनें ऐकून आपण मागें होते तसेच दोन्ही हात पसरून कृष्णेचा ओघ मागें सारिला, तो ओघ दोन गांवें माघारा गेला. असा मारुतीनीं ओघ मागें लोटल्यानंतर महाराज रघुपति ध्यानस्थ बसले होते, त्यांनीं विचार केला कीं, आमचें ध्यान लवकर विसर्जन न केल्यास कृष्णा मूळापर्यंत माघारी जाईल. यास्तव ध्यान विसर्जन करून मारुतीस आज्ञा केली कीं, कृष्णाबाईचा ओघ सोडून द्यावा. अशा आज्ञेवरून मारुतीनीं "एकदांच ओघ सोडिल्यास मोठा येऊन बहुत जीवांचा नाश होईल" असें जाणून ओघ सोडीत सोडीत सोडिला; तेणेंकरून दोन ओघ जाहले. त्या दिवसापासून मध्यें बेट जाहलें. त्या स्थानीं रामस्थापित व लक्ष्मणस्थापित अशीं दोन लिंगें आहेत, म्हणून स्वामी तेथें दर्शनास गेले. दर्शन घेऊन कृष्णामाहात्म्य कथा

श्रवणांत होतीच परंतु येथें मारुती कां नाहीं, म्हणून गांवकरी बांस विचारिलें. तेव्हां त्यांनीं विनंति केली कीं, हा अक्षोभ्य डोहो आहे, त्यांत भीमकुंड म्हणून कुंड देवाच्या पश्चिम भागास शंभर धनुष्यांवर आहे, या कुंडांत मारुती आहे. म्हणून सांगितलें. अनंतर स्वामीनीं सर्वांस सांगितलें कीं, नैवेद्याकरितां अकरा खंडी धान्याची सिद्धता कराल तर आम्ही मारुतीस बाहेर काढितों. तेव्हां सर्व मंडळी उत्तम आहे, असें म्हणून तयारीस लागली. त्यावरून स्वामीनीं डोहांत उडी घेतली; त्यासमयीं कृष्णाजीपंत बोकिल कोरेगांवकर हेही समागमें होते, यांनींही समर्थांच्या कमरेस मिठी घालून समागमें बुडी दिली. ते उभयतां अकरा प्रहरपर्यंत डोहांत होते. नंतर स्वामीनीं मारुतीचें दर्शन घेऊन मूर्ति बाहेर काढून आणिली. तों तें ध्यान परमसुंदर , सुवर्णमय आणि अकरा गज उंच, असें होतें. त्याचें सर्वांस दर्शन करवून या मूर्तीची स्थापना करावी, असें मनांत आणून श्रीमारुतीचे स्तवनार्थ पूर्व वृत्तांताचें वर्णन केलें तें:-

॥ श्लोक. ॥

बळें सर्व संहारिलें रावणाला ॥ दिल्हें अक्षयी राज्य बीभीषणाला
रघूनायकीं देव ते मुक्त केले ॥ अयोध्यापुरा जावयालागिं आले ॥
पथींलागिं कृष्णातिरीं रामराया ॥ घडे राहणें स्नानसंध्या कराया
सिता राहिली शीरटें गांव जेथें ॥ रघूराज तो पश्चिमेचेनि पंथें ॥
जपध्यान पूजाकरी रामराजा ॥ तयाचे परी वीर सौमित्र दूजा ॥

स्मरतां देहे चित्त ध्यानस्थ झालें॥ अकस्मात तें तोय अद्भूत आलें॥
बळें चालिला ओघ नेटें घडाडा॥ नभीं धांवती लोटलाटा धडाडा॥
नदी चालली रामध्यानस्थ जेथें ॥ बळें विक्रमें पावला भीम तेथें॥
उभा राहिला भीमरूपी स्वभावें ॥ बळें तुंबतो तुंबिला दोन गांवें॥
नदी एक वीभागिली दोन बाहें॥ क्षणोनी तया नांव हें गांव बाहें॥
सुखें लोटितां देखिलें रामलिंगा ॥ बळें चालिली भोंवती कृष्णगंगा॥
परी पाहतां भीम तेथें दिसेना ॥ उदासीन तें चित्त कोठेंवसेना ॥
हनूमंत पाहावया लागिं आले॥ दिसेना सखा थोर विस्मीत झाले॥
तयावीण देवाल्य दीसे उदासे ॥ जळांतूनि बोलाविलें रामदासें ॥
मनांतील जाणूनियां हा कुडावा ॥ दिला भेटिचा जाहला थोरहावा॥
बळें हांक देतांचि जैसा गडाडी ॥ महामेघ गंभीर तैसा गडाडी ॥
रघुराजऊपासकाला प्रसंगें ॥ सख्या मारुती धांवरे लागवेगें ॥
रघूनाथ वैकुंठ धामासि गेले ॥ तयीं दास क्षणे मारुतीनीरवीले ॥
प्रभूचें महावाक्य हें सत्य केलें ॥ क्षणे दास हें प्रत्यया शीघ्रआलें॥
जनामाजि हें सांगतां ही पुरेना ॥ अवस्था मनीं लागली हेसरेना॥

(हें समर्थांचें वाक्य असून कृष्णामाहात्म्यांत यास बाहुक्षेत्र ही संज्ञा आहे,) येणेंप्रमाणें प्रार्थना केल्यावर पूर्वी सांगितल्याप्रमाणें नैवेद्याचें साहित्य आणावें, म्हणून सर्वांस आज्ञा केली, परंतु समयास साहित्य सिद्ध जाहलें नाहीं. हें पाहून मारुतीनें आज्ञा केली कीं, याकालीं ही मूर्ती बाहेर रहावयाची नाहीं, यास्तव मी डोहांत राहिलों, परंतु तुझांकरितां मात्र बाहेर आलों. तुझी या

मूर्तीची स्थापना करूं नये, तर ही मूर्ति पूर्वस्थानींच ठेवावी, आणि या ध्यानाची दुसरी मूर्ति आपले हातची तयार करून स्थापावी अशी आज्ञा होतांच स्वामीनीं पूर्वस्थानीं ती मूर्ति ठेवून बाहेर येऊन कृष्णाजीपंत व शिष्यमंडळींचे हातून चुना तयार करवून त्या ध्यानाप्रमाणें मूर्ति तयार करून तिची स्थापना केली. कृष्णाजीपंत समागमें डोहांत गेले होते, त्यांणीं हें सर्व वृत्त पाहिलें, ते सदोदित जवळ असत, व त्यांजवर स्वामीची कृपाही बहुत होती, तेव्हां त्यांस पट्टाभिषिक्त श्रीराममूर्ति पूजेस देऊन समाधान केलें, आणि घरीं जाऊन गृहस्थाश्रम करून प्रपंच व परमार्थ साधावा. ह्मणून बहुत आग्रह करून निरोप दिला. (त्यांचे घरीं ती मूर्ति अद्यापि आहे), याप्रमाणें दहा मूर्तींची स्थापना करून अकरावी मूर्ती चाफळीं श्रीरघुपतीचे मागें स्थापिली, आणि त्या मूर्तीचें भीम असें नाम ठेविलें. याप्रमाणें अकरा मूर्तींची स्थापना केली. प्रसंगेंकरून याप्रमाणें अकरा मारुति स्थापिले त्यांचें स्थळासुद्धां वर्णन वेणूबाईनीं अभंगांत केलें आहे तेः—

॥ अभंग ॥

चांफळामाजी दोन, उंब्रजेसीं एक॥ पारगांवीं देख, चौथा तोहा॥
पांचवा मसुरीं, शहापुरीं साहवा ॥ जाणतो सातवा, शिराळ्यांत॥ २॥
सिंगणवाडी आठवा, मनपाडळें नववा॥ दहावा जाणावा, माजगावीं॥
बाह्यांत अकरावा, येणेंरीती गावा॥ सर्व मनोभाव पुरविला ॥ ४ ॥
वेणी ह्मणे स्वामी, समर्थ रामदास ॥ कीर्ति गगनांत नसमाये ॥ ५ ॥

पूर्वी समर्थांनीं डोलगावीं उर्वशीचे तीरीं स्नानसंध्येचें स्थान केलें होतें, तेथें मारुतीची पाषाणमय मूर्ति स्थापिली आहे. त्या स्थळीं कांहीं दिवस स्नानसंध्या करून मारुतीची आज्ञा घेऊन निघाले, तेसमयीं मारुतीनें मान हालविली.

कोणे एकेदिवशीं तुकारामबावा व चिंचवडकर मोरयादेव यांची आळंदीस भेट जाहली. तेव्हां देवांनीं तुकारामबावा यांसि प्रार्थना केली कीं, तुमचे आमचे पंक्तीस बहुत दिवस जाहले, याकरितां एकवार चिंचवडास चलावें, ह्मणजे परस्पर पंक्तिलाभ होईल. तेव्हां तुकारामबावा बोलले कीं, ज्या वेळेस रामदास स्वामी तुमचे घरीं येतील, त्यावेळेस आपण तिघेजण एके ठिकाणीं भोजन करूं. असें ऐकून चिंचवडकर देव घरीं गेले. नंतर एके दिवशीं रामदास स्वामी चिंचवडास अकस्मात् आले. तेव्हां मोरयादेव यांणीं सामोरे जाऊन समर्थांस मोठ्या समारंभानें घरीं आणलें. आणि स्वामीस ह्मणाले कीं, पूर्वी तुकारामबावा यांस येण्याविषयीं विनंति केली, त्यावेळेस त्यांनीं सांगितलें कीं, रामदास स्वामी येतील, त्यावेळेस आह्मीं येऊं. त्याप्रमाणें आज तो योग तर आला आहे, परंतु तुकाराम येतील तर फार उत्तम होईल. असें ह्मणतांच तुमची मर्जी आहे, तर तुकारामही येतील, असें ह्मणून स्नान करून संध्येस बसले आहेत, तों अकस्मात् तुकारामबोवाही आले. तेव्हां देवांस बहुत संतोष जाहला. आणि पात्रें मांडूं लागले. तेव्हां तुकारामबावानीं सांगितलें कीं, आपलीं त्रिवर्गाचीं पात्रें एकांतीं

मांडावीं, त्यांत आमचे पानाजवळ दोन, व समर्थांचे पानाजवळ चार, व तुमचे पानाजवळ एक, अशीं पात्रें मांडून सर्व पदार्थांची एकवाढ करावी, आणि तिकडे कोणीं येऊं नये, असा बंदोबस्त ठेवावा, आणि इतरांचीं पानें बाहेर मांडावीं.

हें ऐकून मोरयादेव यांनीं तुकारामबोवानीं सांगितल्याप्रमाणें तजवीज करून मध्यघरांत आपलीं तिघांचीं पात्रें मांडिलीं. नंतर तुकारामबावा व रामदास व आपण असे तिघेजण मध्यघरांत गेले. तेव्हां तुकारामानीं तो थाट पहातांच बहुत संतुष्ट होऊन इतःपर कोणी इकडे येऊं नये, असें सांगितलें. नंतर देवांनीं विचारिलें कीं, आपण जेवणार तर त्रिवर्ग आणि पात्रें तर पुष्कळ आहेत. तर जे येणार असतील त्यांस पाचारण करावें. तेव्हां तुकारामांनीं सांगितलें कीं, आपापल्या यजमानास बोलवावें. तेव्हां समर्थ बोलले कीं, सर्वांचा बोलावणेकरी मी होतों. असें ह्मणून नेत्र झांकून ध्यान करतांच राम, लक्ष्मण, सीता आणि मारुति हे चवघेजण समर्थांचे शेजारीं पाटावर येऊन बसले. पुनः नेत्र झांकतांच विठोबा रखुमाई येऊन तुकारामबोवांचे शेजारीं पाटावर बसले. पुनः नेत्र झांकतांच श्रीगजान येऊन मोरयादेव यांचे शेजारीं पाटावर बसले. याप्रमाणें सर्व बसल्यानंतर परमानंदानें सर्वांचीं भोजनें जाहलीं. नंतर मुखप्रक्षालनाकरितां तिघे मात्र बाहेर आले. आणि देवमंडळी आंतच अदृश्य जाहली.

नंतर समर्थांनीं चाफळीं येऊन श्रीची स्थापना केली, तें पूजा भानजी गोसांवी व विठ्ठलगोसावी यांस सांगितली, आणि साहित्य पाहण्याचा दिवाकरभट महाबळेश्वरकर यांजकडे अधिकार सांगितला. प्रतिवर्षी उत्साहास प्रारंभ जाहला ह्मणजे प्रतिपदेचा दिवस व नित्य सवाई ह्मणणें व प्रथम कीर्तनास प्रारंभ करणें तो शहापूरकर बाईकडे अधिकार, आणि नवमीस श्रीचा जन्मकाळ बाईनेंच करावा, रथावर मूर्ति जातांना बाईचे पालखींत बसवून न्यावी रथापुढें कीर्तन करणें तें बाईचे भ्रतार बाळाजीपंत सौभाग्यवतो बाई व भिकाजोपंत यांणीं करावें. द्वितीयेचा दिवस रुद्राजीपंत कऱ्हाडकर देशपांडे यांणीं करावा. तृतीयेचा दिवस तारळेकर देशपांडे यांणीं करावा. चतुर्थीचा व पंचमीचा दिवस शिराळकर देशपांडे यांणीं करावा. षष्ठीचा दिवस पंवाराचे निगडीकर रंगोबा गोसांवी यांणीं करावा. सप्तमीचा दिवस नरसोमलनाथ यांणीं करावा. अष्टमीचा दिवस वेणूबाईनें करावा. नवमीचा दिवस मुख्य मठींच कल्याण गोसांवी यांणीं करावा. दशमीचा दिवस आनंदराव देशपांडे चाफळकर यांणीं करावा. याप्रमाणें ज्याचा जो दिवस नेमिला आहे, तो त्यानें करून कीर्तनही त्यानेंच करावें. रथ माघारा येतानां शिराळकर यांणीं पुढें कीर्तन करावें. येतानां मूर्ति त्यांचे पालखींत बसवून आणावी, आणि लळित त्याणींच करावें. शाहापूरकर पाटील यांणीं अठरा कारखाने चालवावे, व शिवाय हुद्याचेंही काम करावें. वांकनिशीचें काम अंताजी गोपाळ कुडाळकर देशपांडे यांस सांगितलें. आणि स-

बायांच्या पूर्वी त्यांनींच वाका सांगावा. मठांतील सर्व व्यवहार अक्का व वेणूबाईनें व दिवाकरभट यांणीं सदोदित पहात असावा. वेणूबाईनें सर्वकाळ मठांत असावें. याप्रमाणें सर्व शिष्यमंडळीची योजना करून पूजा व कधीं कधीं अरण्यवास करावा, व कधीं कधीं गुहेंत, किंवा डोंगरावर, किंवा मनास येईल तेथें वास करावा. कदाचित् चाफळींही यावें, जावें, असा संचार करून जगदुद्धार करीत असतां जगविख्यात कीर्ति जाहली.

भाग ८ वा.

शिवाजीची भेट.

हें वर्तमान शिवाजीमहाराज यांनीं ऐकून रामदासस्वामी चेठायीं लक्ष्य ठेऊन एकदां दर्शन घ्यावें, अशी इच्छा धरून म्लेंच्छांचा उच्छेद करून देवब्राह्मणांचें पालन व महाराष्ट्र राज्याची वृद्धी व धर्मरक्षण होऊन प्रजेस बहुत पीडा होऊं नये या हेतूनें म्लेंच्छाचें राज्य आक्रमण करित करित रायगडीं आले. तेथेंहो पुन्हां स्वामीची जगविख्यात कीर्ति श्रवणांत आली; तेव्हां "हे साधु या प्रांतांतील आहेत, यांचें दर्शन व भाषण अवश्य झालें पाहिजे." अशी उत्कंठा धरून शिवाजी महाराजांचीं स्वारी रायगडाहून खालीं महाड मुक्कामास आली. त्यासमयीं तेथें कोणी गोसांवी सत्पुरुष

आले होते, त्यांजकडून महाराजांनीं कीर्तन करविलें. त्या कीर्तनांत त्यांणीं ध्रुवचरित्र लाविलें, आणि सद्गुरुवांचून मोक्ष नाहीं, असें प्रतिपादन केलें. तें ऐकिल्यापासून राजाचें चित्त फारच उद्विग्न झालें. आणि मनांत विचार केला कीं, समर्थांची तर गांठ पडत नाहीं, आणि इतर साधूंशीं तर दर्शन भाषणादिक होतें, परंतु कोणाप्रत शरण जावें येविषयीं देवीचो प्रार्थना करावी, म्हणून प्रतापगडीं स्वारी येऊन शुचिर्भूत होऊन श्रीची पूजा करून कोणते साधूप्रत शरण जावें, येविषयीं मला स्वप्नांत आज्ञा करावी, म्हणून प्रार्थना केली, आणि देवीच्या सन्मुख देवालयांतच निद्रा केली. त्याकाळीं, श्रीदेवीनें स्वप्नांत प्रत्यक्ष सुवासिनीरूपें जवळ उभी राहून आज्ञा केली कीं, सद्गुरुपाशीं शरण जाणें असेल तर रामदास यांसच शरण जावें. कारण ते साक्षात् मारुतीचा अवतार तुह्मांकरितांच उत्पन्न जाहले आहेत, यांतील कारण काय तें पुढें सविस्तर कळेल. याप्रमाणें आज्ञा केली, आणि पाठ थापटून, ' ऊठ जागा हो, त्वरा कर ' असें म्हणून देवी अदृश्य झाली.

शिवाजीमहाराज जागृत होऊन देवीनें आज्ञा केली हें अंतःकरणांत दृढ आणून स्वामीच्या दर्शनास जावें म्हणून, स्वारी तयार करून कऱ्हाडप्रांतीं चाफळास आले, आणि श्रीरघुपतीचें दर्शन करून मंडपांत आले. त्याकाळीं नरसोमलनाथ अंबरखाने हे समर्थांचे शिष्य, व सरकारच्या पदरचे चाफळखोऱ्याचे अधिकारी, (यांचें घर देवालयाच्या दरवाजाकडे होतें) यांणीं स्वार.

आली, तें पाहून महाराजांस मुजरा करून भेटले. नंतर त्यांस महाराजांनीं सविस्तर समर्थांचें वर्तमान विचारिलें. तेव्हां नरसोमलनाथ यांणीं विनंति केली कीं, समर्थ नेहमीं मठांत रहात नाहींत बहुत करून अरण्यवासच करितात. सांप्रत कोंडवलचे घळी नजीक भैरवगड येथें आहेत. असें वर्तमान सांगत आहेत, तों श्रीची पूजा करणार विठ्ठलगोसांवी व भानजी गोसांवी यांणीं श्रीचा प्रसाद आणून दिला, त्यास वंदन करून देवालय कोणीं बांधिलें, ह्मणून शिवाजीनें विचारिलें, आणि या प्रांतीं समर्थांची स्वारी असतां आह्मांकडून त्यांची सेवा कांहींएक घडली नाहीं, असें ह्मणून परम विस्मित जाहले. विठ्ठलगोसांवी यांणीं सांगितलें कीं समर्थांचें व आपुलें दर्शन नाहीं हें खरें, परंतु देवालयास द्रव्य आपलेंच लागलें आहे. असें ह्मणतांच महाराज बोलले कीं, आतां आपण आह्मांस थोरपणा मात्र देतां, परंतु आह्मांपासून सेवा घडलीच नाहीं. असें ह्मटल्यावरून विठ्ठलगोसांवी यांणीं सांगितलें कीं, महाराज आह्मी खोटें बोललों नाहीं, खरोखर आपलाच पैसा देवालयास लागला आहे. तो कसा ह्मणाल, तर सांगतों ऐका.

गिरिगोसांवी नाशिककर हे नाशिकाहून समर्थांच्या दर्शनास आले होते, ते दर्शन घेऊन माघारां जातानां पुण्यास आपले उपाध्यायांचे घरीं आले. तेच दिवशीं रात्रौ उपाध्यायांनीं त्यांचें कीर्तन करविलें. त्या कीर्तनास आपणास पाचारण केलें होतें. तेव्हां कीर्तन श्रवण करून आपली मर्जी संतुष्ट झाली आणि तीनशें

होन आपण त्यांस दिले. तेव्हां गिरिगोसांवी यांचें ह्मणणें पडलें कीं, आह्मीं निस्पृह आहों. आह्मास आपले होन कशाकरितां पाहिजेत. आपला आग्रहच आहे, तर आपण राजे असून ईश्वरभक्त आहां, त्यापेक्षां आपल्या कऱ्हाडप्रांतीं चाफळगांवीं समर्थ श्रीचें देवालय बांधित आहेत त्यांकडेस आपला मनुष्य बरोबर देऊन हे होन चाफळास पोंचवावे. ह्मणून गिरिगोसांवी यांणीं सांगितलें, त्याजवरून आपण मुद्दाम मनुष्य बरोबर देऊन तीनशें होन पोहोंचविले. ते होन, व आपुले पदरचे नरसोमलनाथ यांणीं ही कांहीं द्रव्य दिलें, तें द्रव्य व कांहीं शिष्यमंडळी नींआपल्याकडील द्रव्य लावून असें मिळून देवालय तयार केलें. त्याजवरून पैका आपलाच आहे, ह्मणून आह्मी राजश्रीपाशीं विनंति केली.

महाराजांनीं बरें आहे, असें ह्मणून देवळासभांवत फिरून पाहिलें, तों उत्तरेकडून माडनदी व दक्षिणेकडून हनुमंत ओढा, या दोहोंमुळें दरडीस उपद्रव होतो. हें पाहून नरसोमलनाथ यांजपाशीं आणखीं सातशें होन दिले. आणि ओढा फिरवून साकू (बंधारा) बांधून दरवाजा करवा, ह्मणून परवानगी दिली. नंतर श्रीचा प्रसाद घेऊन दुसरे दिवशीं नरसोमलनाथ यांचे घरीं भोजन करून कोंडवळचे घळीस जाऊन समर्थांचे शोधास निघाले, आणि यत्न जितका होता तितका केला, परंतु शोध लागेना. तेव्हां निरुपाय होऊन शिवाजी अतिउद्विग्न जाहले. त्यामुळें " हा राज्यकारभार व हें, वैभव नको, केवळ समर्थांचें दर्शनमात्र घडावें " हा रात्रंदिवस निदिध्यास लागून राहिला आहे. अशा संधीस कांहीं राज्य-

कारणामुळें स्वारी प्रतापगडास निघून गेली. तेथें जाऊन व्यवहा-
ररीतीनें राज्यादि कारभार करीत, परंतु अष्टौप्रहर समर्थांचें स्मर-
ण करीत असून स्वामी कोणते स्थळीं आहेत, या शोधास हेर व
कारकून इत्यादिकांची योजना करून प्रयत्न केला. प्रयत्नाची सीमा
जाहली, परंतु स्वामीचा थांग कोठें लागेना. तेव्हां मनांत अस
निश्चय केला, कीं, इतउत्तर स्वामिदर्शन व अनुग्रहप्रसाद झाल्या
वांचून अन्नग्रहण करणार नाहीं.

असें मनांत आणून चिंताक्रांत होऊन श्रीदेवीची प्रार्थना केली,
कीं, समर्थांचें दर्शन घेणें म्हणून पूर्वी आपली आज्ञा जाहली,
त्याप्रमाणें स्वामिदर्शन होण्यासाठीं जितका प्रयत्न होता तितका
केला, परंतु दर्शन होत नाहीं. तर इतःपर आज्ञा होईल त्याप्रमाणें
करीन. अशी प्रार्थना करून शिवाजीमहाराजानें देवीसंनिध वै-
शाख शुद्ध ४ मंदवारीं दिवसा उपोषण करून रात्रौ पूर्वीप्रमाणें
शुचिर्भूत होऊन निद्रा केली, तों, प्रभातसमईं स्वप्नांत पायीं पादु-
का, कटीं कौपीन, हातीं माळ, काखेस कुबडी, गळां मेखला
मस्तकीं जटाभार व टोप, याप्रमाणें स्वामीची मूर्ति अग्रभागीं उभी
पाहून महाराजांनीं साष्टांग नमस्कार केला. तेंव्हां स्वामींनीं मस्त-
कीं हस्त ठेवून आलिंगन दिलें, आणि मस्तक अवघ्राण करून
नारळ प्रसाद दिला. तो प्रसाद घेऊन पुनः शिवाजीनें चरणावर
मस्तक ठेविला, आणि विनंति केली कीं, आपली मूर्ति पाहून प-
रम संतोष पावलों. आपले प्रसादेंकरून सर्व कल्याण जाहलें. आ-

तां मजला आपल्या नांवाचें श्रवण करवावें. व स्थळ कोणतें, हें सांगावें अशी विनंति केल्यावरून समर्थांनीं हास्यवदन करून " बाबा ! आह्मी गंगातीरीं राहणार, परंतु सांप्रत तुझ्याकरितां कृष्णातीरीं आलों. आणि तुझ्या राज्यांत समर्थसंप्रदाय प्रवृत्त केला, आणि श्रीची स्थापना करून उपासनेची परिपाठीही चालविली, आणि ब्राह्मणांची सेवा व भक्ति करून आहों. मजला रामदास असें ह्मणतात. इतके दिवस तुझ्या राज्यांत असून तुझें दर्शन नाहीं, व तुह्मीही आमचा समाचार आजपर्यंत घेतला नाहीं. बरें, असो. तूं धार्मिष्ठ व देवब्राह्मणसेवक आणि धर्मस्थापनेविषयीं तुजला श्रीची आज्ञा झाली आहे आणि तुळजाभवानीही तुजविषयीं साभिमान आहे, आतां तुजला आमच्या भेटीची अपेक्षा प्राप्त जाहली, ह्मणून चाफळाहून येथें आलों. आतां इतकेंच मुख्य सांगावयाचें आहे, कीं, तुह्मी जो राज्यकारभार अवलंबिला आहे, तोच करावा. आणि हल्लीं धर्माचा उच्छेद जाहला आहे, त्याची स्थापना करून देवब्राह्मणांचे ठायीं परम सादर असावें. असें सांगून स्वामी अदृश्य जाहले.

शिवाजीमहाराज परम संतोषातें पावून आनंदाश्रु नेत्रांतून येत आहेत, आणि शरीरावर रोमांच उभे राहिले आहेत, अशा अवस्थेंत जागृत जाहले, तों स्वामी नाहींत, परंतु त्यांणीं दिलेला प्रसाद नारळ मात्र हातीं आहे, त्यासमयींचा आनंद कोठेंच मावेना, असा अपरिमित झाला. तेव्हां ज्येष्ठपत्नी जवळ होती, तिजजवळ नारळ प्रसाद देऊन बाहेर आले, तों उषःकाल जाहला.

तर महाराजांनीं आपले मनांत विचार केला कीं, स्वामीचें दर्शन आज स्वप्नांत घडलें हा तर सुदिनच, परंतु पुनः प्रत्यक्ष दर्शन होईल, तर तो अत्यंत सुदिन होईल. तस्मात् आतां स्वामिदर्शनाच्या प्रयत्नास आपण स्वतांच लागावें, हें ठीक. असा निश्चय करून नित्यक्रमाप्रमाणें प्रातःस्मरणादिक व शिवपूजा केली. नंतर भोजन करून मातोश्री जिजाबाईसाहेब यांस सर्व वर्तमान सांगून स्वारी तयार केली, आणि समस्त मंडळीसहवर्तमान निघाले, ते श्रीमहाबलेश्वरीं आले. तेथें देवदर्शन करून ब्राह्मणांस दान धर्म बहुत केला. नंतर तेथून वांईस आले. तेथेंही एक मुक्काम करून दान धर्म करून तेथून निघाले, ते माहुलीस आले. तेथें संगमीं स्नान करून दान धर्म केला. आणि स्वामींचें दर्शन लौकर व्हावें या हेतु धरून तेथेंच मुक्काम केला. इतक्या संधींत स्वामींकडून एक शिष्य ओंवीबद्ध पत्र घेऊन आला तें असें:—

॥ ओंव्या ॥

निश्चयाचा महामेरू ॥ बहुत जनांसि आधारू ॥
अखंडस्थितीचा निर्धारू ॥ श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी ॥ उदंड घडती जयाशी ॥
जयाचे गुणमहत्वासी ॥ तुलना कैंची ॥ २ ॥
नरपति हयपती ॥ गजपति गडपती ॥
पुरंदर आणि शक्ती ॥ पृष्ठभागीं ॥ ३ ॥

यशवंत कीर्तिवंत ॥ सामर्थ्यवंत वरदवंत ॥
पुण्यवंत आणि जयवंत ॥ जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशील विचारशील ॥ दानशील धर्मशील ॥
सर्वज्ञपणें सुशील ॥ सर्वठायीं ॥ ५ ॥
धीर उदार सुंदर ॥ शूर क्रियेसि तत्पर ॥
सावधपणेंसि नृपवर ॥ तुच्छ केले ॥ ६ ॥
तीर्थक्षेत्रें तीं मोडिलीं ॥ ब्राह्मणस्थानें बिघडिलीं ॥
सकळ पृथ्वी आंदोळली ॥ धर्म गेला ॥ ७ ॥
देव धर्म गो ब्राह्मण ॥ करावयासी रक्षण ॥
हृदयस्थ झाला नारायण ॥ प्रेरणा केली ॥ ८ ॥
उदंड पंडित पुराणिक ॥ कवीश्वर याज्ञिक वैदिक ॥
धूर्त तार्किक सभानायक ॥ तुमचे ठायीं ॥ ९ ॥
या भूमंडळाचे ठायीं ॥ धर्मरक्षी ऐसा नाहीं ॥
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं ॥ तुह्मांकरितां ॥ १० ॥
आणखी कांहीं धर्म चालती॥ श्रीमंत होऊनि कितेक असती॥
धन्य धन्य तुमची कीर्ती ॥ विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥
कितेक दुष्ट संहारिले ॥ कितेकांस धाक सुटले ॥
कितेकांसि आश्रय जाहले ॥ शिव कल्याणराजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें ॥ परंतु वर्तमान नाहीं घेतलें ॥
ऋणानुबंधें विस्मरण जाहलें ॥ बा काय नेणुं ॥ १३ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती ॥ सांगणें काय तुह्मांप्रती ॥
धर्मस्थापनेची कीर्ती ॥ सांभाळिली पाहिजे ॥ १४ ॥

णून उंबराखालीं जेठा घालून बसले आहेत, व जवळ दासबोध लिहिण्याचा क्रम चालला होता त्याचीं पानें होतीं, आणि पुढें कल्याण गोसांवी उभे आहेत त्या संधीस दिवाकरभटजी सहवर्तमान महाराज तेथें गेले. तों जाळीची दाटी बहुत, व झाडीही विशेष, आणि मार्गही लहान, यामुळें भटजी पुढें, व महाराज मागें, असे येत आहेत, तों, स्वामीनीं कल्याणगोसांवी यांस पुशिलें कीं, कोण येत आहेत. तेव्हां त्यांणीं विनंति केली, कीं, पुढें दिवाकरभट गोसांवी व त्यांचे मागें दोघे तिघे येत आहेत. तेव्हां दिवाकरभटजी यांस स्वामीनीं विचारिलें, कीं, दिवाकरा ! कां आलास. तेव्हां त्यांनीं उत्तर केलें, कीं, महाराज ! शिवाजी राजे आपल्या दर्शनास आले आहेत, त्यांस घेऊन आलों. असें ह्मणून साष्टांग नमस्कार केला. तों मागाहून महाराजांनीही येऊन साष्टांग दंडवत केला, आणि परम सद्गदित व रोमांचित होऊन हात जोडून पुढें उभे राहिले.

तों स्वामीनीं विचारिलें, कीं, शिवाजी! पत्र व तुह्मीं एकदाच आलां, इतकी त्वरा कां केली. तुमचे देशांत आह्मी आहों, आमचा परामर्ष तुह्मीं बराच घेतला. असें ह्मणून स्वामी हांसले. हें समर्थांचें भाषण श्रवण करितांच शिवाजीचा कंठ परमसद्गदित जाहला, आणि नेत्रांतून अश्रुपात होऊं लागले आणि मुखांतून शब्दोच्चार होईना, तथापि परमविनयानें बोलला कीं, महाराज ! मी सर्वस्वी अपराधी आहें, आणि समर्थ क्षमाशील आहेत, तस्मात् स्वामीनीं क्षमा करून कृपानुग्रह करावा. आजपर्यंत दर्श-

ळाजी आबाजी चिटणीस व निळोसोनदेव मुजुमदार वगैरे दहा पांच मंडळीसुद्धां चाफळगांवास येऊन श्रीचें दर्शन घेतलें, आणि मठांत येऊन अका वगैरे यांसि नमस्कार करून पुशिलें कीं, समर्थांची स्वारी कोणे ठिकाणीं आहे. तेव्हां अकानीं सांगितलें कीं, सिंगणवाडीस श्रीमारुतीपाशीं आहेत. आपले पत्राचें उत्तर काल अस्तमानीं पावलें, तें पत्र कल्याणगोसांवी आजच स्वामीकडेस घेऊन गेले आहेत. आतां नैवेद्यसमय आहे, आपण मंडळीसह भोजन करावें, तों आह्मीं स्वामीकडे कळवून आपणास कळवितों. नंतर आपण समर्थांचे दर्शनास जावें. असें ह्मणतांच " समर्थांचे पाय पाहिल्या वांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं " याप्रमाणें महाराज बोलले. तेव्हां अकानीं उत्तर केलें कीं, आपण मंडळी सहवर्तमान गेल्यास गांठ पडेल न पडेल, यास्तव जलदी करूंनये, पूर्वी कळवून जावें, हें बरें.

असें ह्मणतांच महाराजांनीं उत्तर केलें कीं, मी एकटाच जातों मजबरोबर कोणीएक माहीतगार मात्र द्यावा, याप्रमाणें अकाबाईची बहुत प्रार्थना केली, त्यावरून अकानीं दिवाकरभट यांस महाराजां समागमें दिलें. नंतर महाराज आपलीं दोन माणसें बराबर घेऊन सिंगणवाडीच्या मारुतीस गेले. तेथें स्वामी नव्हते, तर खिंडीचे खालीं बागेंत होते. तेथें महाराज जाण्याच्या पूर्वीच कल्याण गोसांवी यांणीं जाऊन साष्टांग नमस्कार करून महाराजांकडून पत्रोत्तर आलें, तें, वाचून दाखविलें. तेव्हां, स्वामी हास्य करून बोलले, कीं, शिवाजीची मर्जी दर्शन घेण्याविषयीं आहे. असें ह्म-

उदंड राजकारण तटलें ॥ तेथें चित्त विभागलें ॥
प्रसंग नसतां लिहिलें ॥ क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

याप्रमाणें स्वामीचें पत्र आल्यानंतर वाचून पाहून शिवाजी महाराज परमसद्गदित झाला. नंतर, या देशीं साधुवृंद बहुत आहेत, त्या सर्वत्रांचो यथाशक्ति सेवा, व दर्शन, भाषण करीत आहें, परंतु आजपर्यंत समर्थास भेटलों नाहीं, आणि त्यांचा समाचारही घेतला नाहीं, तस्मात् केवढा मी अभागी आहें. असा पश्चात्ताप करून परमविव्हळ होऊन पूर्व स्वप्नभावही ध्यानांत आणून त्याणें उत्तर लिहिलें कीं, (स्वामी ! मी बहुत अपराधी आहें, आपण क्षमावंत आहां, सांप्रत कृपा करून आशीर्वाद पत्र पाठविलें तें पाहून परम आनंदातें पावलों. दर्शनाची इच्छा धरून येत आहें, त्यास कृपा करून दर्शन दिलें पाहिजे. ही विज्ञप्ति) असें पत्रोत्तर लिहून, तेथून पत्र घेऊन जो ब्राह्मण आला होता, त्याजपाशीं दिलें, आणि त्याचा बहुत प्रकारें सन्मान करून विचारिलें कीं, सांप्रत स्वामी कोठें आहेत ? तेव्हां ब्राह्मणानें उत्तर दिलें कीं, सांप्रत स्वामी चाफळखोऱ्यांत आहेत, हें मी वर्तमान सांगितलें खरें परंतु एका निमिषांत कोणत्या स्थानापासून कोणते स्थळीं जातात याचा नेम सांगवत नाहीं. याप्रमाणें बोलून महाराजांचा निरोप घेऊन जाता जाहला.

नंतर दुसरे दिवशीं महाराज स्वारी तयार करून निघाले ते मानगांवापर्यंत स्वारीसहवर्तमान गेले. पुढें सडीस्वारीनिशी बा-

नाची एक इच्छा होती, ती तर पूर्ण जाहली. आतां दुसरी आहे, ती, समर्थांनीं पूर्ण केली पाहिजे. असें म्हणतांच स्वामींनीं उत्तर केलें, कीं, तुह्मांस प्रतापगडीं मंदवारीं रात्रीस जें सांगावयाचें, तें सांगून नारळ प्रसाद द्यावयाचा तो देऊन आलोंच आहों, त्यापरती इच्छा काय आहे ? असें म्हणतांच शिवाजी बोलले, कीं, आज्ञा जाहली ती प्रमाण, परंतु स्वामींनीं कृपापूर्वक अनुग्रह प्रसाद देऊन पावन करावें, ही इच्छा पूर्ण करावी, असें म्हणून बहुत प्रकारें प्रार्थना केली. त्याजवरून समर्थांनीं कल्याण याजकडे अवलोकन केलें, त्यासमयीं त्याणें हस्त जोडून विनंति केली, कीं, हे सत्पात्र खरे आणि मूळचाहि संकल्प असाच आहे, जाणून स्वामींनीं कृपा करावी, असें म्हणतांच बहुतबरें, म्हणून सामुग्रीची आज्ञा केली. त्याजवरून कल्याणगोसांवी यांणीं महाराजांस सांगितलें, कीं, पूजासामग्री आणावी, जवळ नसल्यास मी अरण्यपुष्पें आणून साहित्य करितों. तेव्हां शिवाजीमहाराजांनीं विनंति केली, कीं, सर्व साहित्य सिद्ध आहे, आतांच आणवितों असें म्हणून बाळाजी आबाजी चिटणीस व निळो सोनदेव मुजुमदार यांस पूजा सामग्री आणण्यास सांगितलें आणि आपण स्नानास गेले.

इकडे, श्रीचे देवालयापासून सिंगणवाडीपर्यंत मनुष्यांची डांक ठेविली होती, त्यांचे हातून सूचना पाठविली, त्याप्रमाणें निळोसोनदेव व बाळाजीआबाजी हे उभयतां साहित्य घेऊन बागेंत प्रविष्ट जाहले, तों महाराजही स्नान करून आले. नंतर दिवाकर-

भटजींनीं यथापद्धति सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं पूजा केली, नंतर समर्थांनीं महाराजांस त्रयोदशाक्षरी मन्त्रानुग्रह केला, तेव्हां महाराजांनीं कृतकृत्यता मानून साष्टांग दंडवत करून परमयुक्तीनें नम्र होऊन परमार्थाविषयीं प्रश्न केला. तेसमयीं स्वामींनीं कृपाळु होऊन राजाची धारणा पाहून आत्मानात्मविचार थोडक्यांत सर्व समजावा, असा सांगितला. (तो दासबोधांत तेरावे दशकीं सहावे समासीं लघुबोध सांगितला आहे.)

राजश्रींचो धारणा स्वामीनीं पाहून मर्जी संतोष होऊन वरदहस्त मस्तकीं ठेवून समाधीचें उत्थापन करून स्वामी बोलले कीं, राजा तूं अनुभव सुखातें पावलास. आत्मसुख यास ह्मणावें. राजश्री ह्मणाले महाराज, आपण मज अनाथास सनाथ केलें. असें ऐकून समर्थ ह्मणाले शिवाजी, स्वानुभवाचें लक्षण ऐकः—

॥ अभंग ॥

स्वानुभवाचे पालवि । शून्य गाळिले आघवि ॥ १ ॥
सघनीं हरपलें गगन । सहज गगन तें सघन ॥ २ ॥
सदा शुद्ध स्वप्रकाश । अवकाशा विणें आकाश ॥ ३ ॥
रामी रामदास ह्मणे । स्वानुभवाची हे खूण ॥ ४ ॥

याप्रमाणें महाराजांनीं अभंग ऐकून पूर्णबोधातें पावले हें पाहून समर्थांस फार आनंद झाला. नंतर महाराजांनीं स्वामीस साष्टांग नमस्कार केला. समर्थांनीं श्रीफळ, मूठभर माती, दोन मुठी लीद व चार मुठी खडे याप्रमाणें महाराजांचे पदरांत घातला. तो

घेऊन पुनः महाराज दंडप्राय नमन करून प्रदक्षिणा घालून हात जोडून उभे राहिले आणि म्हणाले कीं, महाराज, मला आत्मसुखार्ते पावविलें हीच स्थिति सतत असावी. हल्लीं राज्याचा व्यवहार चालविला आहे हा पुरे. आतां समस्त मंडळी सेवा करून समागमें आहेत त्याप्रमाणेंच मजकडून सेवा घेऊन सन्निध राहण्याची आज्ञा असावी. असें म्हणतांच समर्थ हांसून बोलले कीं, या करितांच मजला शरण आलास कीं काय ? तुमचा मुख्य धर्म क्षात्र, क्षात्रधर्मी पुरुषांनीं राज्य रक्षण करून प्रजेचें पालन करावें, देवब्राह्मणांची सेवा करावी, तुमचे हातून अमानुषीय कर्में पुष्कळ व्हावयाचीं आहेत, फार दिवस म्लेंछमय पृथ्वी झाली आहे त्यांचें निवारण तुमचे हातून करवावें अशी श्रीरघुपतीची इच्छा आहे.

॥ ओंवी ॥

बहुतां दिवसांचें हें बंड ॥ म्लेंछ माजले उदंड ॥
यांचें करूनि दुखंड ॥ राज्य करावें ॥ १ ॥

आणि तो क्षात्रधर्मच तुह्मांस मुख्य होय. श्रीनीं तुह्मांस म्लेंछ निवारणार्थच उत्पन्न केलें आहे, ह्मणून आह्मांस पंचवटींत आज्ञा जाहली;त्या सर्व गुह्यगोष्टी सांप्रत तुह्मांस आह्मीं सांगितल्या. तुह्मीं वर्णाश्रमधर्मेंकरून श्रीचे आज्ञेप्रमाणें धर्मसंस्थापना करावी. यांतच स्वार्थ व परमार्थ आहे. पूर्वी राजे झाले त्यांच्या कीर्ति पुराणांतरीं श्रवण करीतच आहां आणि तुमचे पूर्वज कोणत्या वंशांतीः

थ्वीपाल सिंह, व लक्ष्मण सिंह इत्यादिकांनीं प्रताप केलेले लक्षांत आणून राजधर्म व क्षात्रधर्म करावा. तें टाकून भलतेंच कर्म करण्याची इच्छा तुह्मीं धरितां ही धरूं नये. तेव्हां राजश्रीनीं महाराज आज्ञा शिरसावंद्य प्रमाण आहे असें ह्मणून राजधर्म व क्षात्रधर्म कसा त्याजविषयीं आज्ञा व्हावी ह्मणून समर्थांस विनंति केली. त्यावरून समर्थ ह्मणाले सांगतों. तेंस्वस्थमानसें करून श्रवण करावें, असें ह्मणून राजधर्म सांगितला तोः—

॥ राजधर्म ॥

नमो मंगळमूर्ती विघ्नहरू ॥ सरस्वतीस नमस्कारू ॥
सद्गुरु संत कुलेश्वरू ॥ दाशरथी ॥ १ ॥
श्रोतीं मानेल तरी घ्यावें ॥ अथवा दांडूनि सांडावें ॥
प्रपंचाकारणें स्वभावें ॥ बोलिलों मी ॥ २ ॥
सावधपणें प्रपंच केला ॥ तेणें सुखची पावला ॥
दीर्घ प्रयत्नें मांडला ॥ कार्यभाग साधे ॥ ३ ॥
आधीं मनुष्य ओळखावे ॥ योग्य पाहूनि काम सांगावें ॥
निकामी तरी ठेवावे ॥ एकीकडे ॥ ४ ॥
पाहोन समजोन कार्य करणें ॥ तेणें कदापि नये उणें ॥
कार्य कर्त्याच्या गुणें ॥ कार्यभाग होतो ॥ ५ ॥
कार्यकर्ता प्रयत्नीं जाड ॥ कांहीं एक असला हेकाड ॥
तरी समर्थपणें पाठवाड ॥ केली पाहिजे ॥ ६ ॥
अमर्याद फितवेखोर ॥ यांचा करावा संहार ॥
शोधिला पाहिजे विचार ॥ यथातथ्य ॥ ७ ॥

मनुष्य राजी राखणें ॥ हेचि भाग्याचीं लक्षणें ॥
कठोणपणें दुरी धरणें ॥ कांहींएक ॥ ८ ॥
समयीं मनुष्य कामा येतें ॥ तया कारणें सोशिजेतें ॥
न्याय सांडितां मग ते ॥ सहजची खोटे ॥ ९ ॥
न्याय सीमा उल्लंघूं नये ॥ उल्लंघितां होतो अपाय ॥
न्याय नसतां उपाय । होईल कैंचा ॥ १० ॥
उपाधीस जो कंटाळला ॥ तो भाग्यापासूनी चेवला ॥
समयीं धीर सांडिला ॥ तोही खोटा ॥ ११ ॥
संकटीं कंटाळों नये ॥ करावे अत्यंत उपाय ॥
तरी मग पाहतां काय ॥ उणें आहे ॥ १२
बंध बांधावे नेटके ॥ जेणें करितां चतुर तुके ॥
ताव न होतां फिके ॥ कारभार होती ॥ १३ ॥
धुरेनें युद्धासीं जाणें ॥ अशीं नव्हेत कीं राजकारणें ॥
धुराच करोनि सोडणें ॥ कितेक लोक ॥ १४ ॥
उदंड मुंडे असावीं ॥ सर्वही एक न करावीं ॥
वेगळालीं कामें घ्यावीं ॥ सावधपणें ॥ १५ ॥
मोहरा पेटला अभिमाना ॥ मग तो जिवास पाहेना ॥
मोहरे मिळवूनि नाना ॥ वरी चपेटे करी ॥ १६ ॥
देखोनि व्याघ्राचा चपेटा ॥ मेंढरें पळती बारा वाटा ॥
मस्त जोतो रेडा मोठा ॥ काय करावा ॥ १७ ॥
रायांनीं करावे राजधर्म ॥ क्षत्रीं करावे क्षात्रधर्म ॥
ब्राह्मणीं करावे स्वधर्म ॥ नानाप्रकारें ॥ १८ ॥

तुरुंग शस्त्र आणि स्वार ॥ पहिला पाहावा विचार ॥
निवटूं जातां थोर थोर ॥ शत्रु पळती ॥ १९ ॥
ऐसा प्रपंचाचा विवेक ॥ स्वल्प बोलिलों कांहीं एक ॥
एका मनोगतें स्वामी सेवक ॥ असतां बरें ॥ २० ॥

॥ इति श्रीराजधर्म समाप्त ॥

असा समर्थांनीं राजधर्म सांगून क्षात्रधर्म सांगितला तोः—

॥ अथ क्षात्रधर्म प्रारंभः ॥

अल्प स्वल्प संसार वर्म ॥ मागां बोलिलों राजधर्म ॥
आतां ऐका क्षात्रधर्म ॥ परम दुर्लभ जो ॥ १ ॥
जयास जिवाचें वाटे भय ॥ त्यानें क्षात्रधर्म करूं नये ॥
कांहीं तरी करूनी उपाय ॥ पोट भरावें ॥ २ ॥
विन्मुख मरणीं नर्क होती ॥ वांचून येतां मोठी फजीती ॥
इहलोक परलोक जाती ॥ पाहाना कां ॥ ३ ॥
मारितां मारितां मरावें ॥ तेणें गतीस पावावें ॥
फिरोन येतां भोगावें ॥ महद्भाग्य ॥ ४ ॥
नजरकरार राखणें ॥ कार्य पाहून खतल करणें ॥
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें ॥ चकित होती ॥ ५ ॥
जैसा भाडयांचा गलोला ॥ निरभय भारा मध्यें पडिला ॥
तैसा क्षत्री रिचवला ॥ परसैन्यामध्यें ॥ ६ ॥
निःशंकपणें भार फुटती ॥ परवीरांचे तवके तुटती ॥
जैसा बळिया घालूंन घेती ॥ भैरी उठतां ॥ ७ ॥

ऐसे अवघेच उठतां ॥ परदळाची कोण चिंता ॥
हरणें लोळवी चित्ता ॥ देखत जैसा ॥ ८ ॥
मर्दे तकवा सोडूं नये ॥ ह्मणजे प्राप्त होतो जय ॥
कार्य प्रसंग समय ॥ ओळखावा ॥ ९ ॥
कार्य सज्जेना अंतरे ॥ तें काय झुकेल विचारें ॥
युद्ध करावें खबरदारें ॥ लोक राजी राखतां ॥ १० ॥
दोनो दळें एकवटे ॥ मिसळताती लखलखाटें ॥
युद्ध करावें खणखणाटे ॥ सीमा सांडुनी ॥ ११ ॥
देवत्रात्र उच्छेदिला ॥ जित्यापरीस मृत्यू भला ॥
आपुला स्वधर्म बुडविला ॥ ऐसें समजावें ॥ १२ ॥
मराठा तितका मेळवावा ॥ आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ॥
ये विषयीं न करितां तकवा ॥ पूर्वज हांसती ॥ १३ ॥
मरणें हाक तो चुकेना ॥ देहे वांचवितां वांचेना ॥
विवेकी होऊनी समजाना ॥ काय करावें ॥ १४ ॥
भले कुळवंत ह्मणावे ॥ तेही वेगीं हजीर व्हावे ॥
हजीर न होतां कष्टावें ॥ लागेल पुढें ॥ १५ ॥
एक जाती दोन जाती पावला ॥ तो कैसा ह्मणावा भला ॥
तुह्मां सकळांस कोप आला ॥ तरी क्षमा केली पाहिजे ॥१६
देवद्रोही तितुके कुत्ते ॥ मारूनि घालावे परते ॥
देवदास पावती फत्ते ॥ यदर्थी संशय नाहीं ॥ १७ ॥
देव मस्तकीं धरावा ॥ अवघा हलकालोळ करावा ॥
मुलुख बडवा कां बुडवावा ॥ धर्म संस्थापनेसाठीं ॥ १८ ॥

विवेक विचार सावधपणें ॥ दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ॥
तुळजावराचे नि गुणें ॥ रामें रावण मारिला ॥ १९ ॥
अहो हे तुळजा भवानी ॥ प्रसिद्ध राम वरदायिनी ॥
रामदास ध्यातो मनीं ॥ यद् निमित्य ॥ २० ॥

॥ इति क्षात्रधर्म समाप्त ॥

याप्रमाणें राजधर्म व क्षात्रधर्म सांगून राजनीतीनें राज्य करावें म्हणजे त्यास धर्मराजा ही योग्यता येते असें शिवाजी महाराजांस स्वामींनीं सांगितलें. त्यासमयीं महाराजांनीं दंडवत प्रणाम करून "तथास्तु" म्हणून हात जोडून उभे राहिले. आणि समर्थांस विनंति केली कीं, महाराज, सर्व लज्जा आपली आहे. त्यासमयीं समर्थ म्हणाले कीं, तुझी सर्व लज्जा श्रीस आहे. तूं तिळमात्र काळजी करूं नको. महाराजांनीं आपली आज्ञा मला प्रमाण आहे असें सांगीतलें. राजाची धारणा पाहून समर्थ बहुत संतुष्ट जाहले, आणि मस्तकीं वरद हस्त ठेवून प्रसाद नारळ दिला, त्यासमयीं बाळाजी आबाजी व निळोसोनदेव यानींही पूजा करण्याविषयीं प्रार्थना केल्यावरून समर्थांची आज्ञा होतांच उभयतांनींही पूजा केली. नंतर त्या उभयतांसही समर्थांपासून अनुग्रह प्रसाद प्राप्त झाला. पूर्वी महाराजांनीं पूजा केली, तेसमयीं वस्त्रें आभरणें, जवाहीर, मोती, पोंवळीं, व पुतळ्या इत्यादि अपरिमित द्रव्य आणून समर्थांस अभिषेक केला होता तें द्रव्य स्वामींनीं चहूंकडे उधळिलें, आणि गुरुख्यांच्या पोरांस बोलावून आणून 'द्रव्य जमा करून नेणें' असें सांगून आपण उठून डोंगरांत चालले. (त्या रानांत चौकटी रुपाया

अथवा मोहरा किंवा पुतळी एखाद्यास दैवयोगेंकरून अद्यापि सांपडतें.) तेव्हां कल्याणगोसांवी यांशीं आज्ञा केली, कीं, तुह्मी राजश्रीबराबर जाऊन श्रीरघुपतीचें दर्शन करवावें, आणि या शिवदास स्वतां आपण प्रसाद द्यावा, अशी आमची विनंति श्रीचरणीं सांगावी, आणि मंडळीसहवर्तमान राजश्रीस भोजन प्रसाद देऊन तीन रात्री ठेऊन घ्यावें. आह्मीही उदयीक येऊं असें सांगून समर्थ घोडोबाचे डोंगरावर गेले.

नंतर स्वामीनीं जी पूजासामुग्री उधळिली होती, त्यापैकीं शेष राहिलें तें दिवाकरगोसांवी यांणीं जमा करून घेऊन कल्याणगोसांवी व शिवाजो महाराज यांसह मठास आले. आणि श्रीचे दर्शनास महाराजांस देवालयांत कल्याणगोसांवी घेऊन गेले. सर्व साष्टांग नमस्कार करून हात जोडून उभे राहिले, तेव्हां कल्याणगोसांवी यांनीं श्रीची प्रार्थना केली, कीं, शिवाजीराजे यांस प्रसाद स्वतां आपण द्यावा, ह्मणून स्वामीचो विनंति आहे. असें ह्मणतांच श्रीरघुपतीचे मस्तकीं मोगऱ्याच्या कळ्यांचा तुरा होता; तो सरकून खालीं आला. तोच कल्याणगोसांवी यांणीं घेऊन शिवाजीराजे यांच्या मस्तकीं खोंविला, तो तुरा तत्काळ मोत्यांचा जाहला. हा चमत्कार पाहून सर्वांस परम आश्चर्य वाटलें. नंतर महाराजांचे सैन्यासहवर्तमान भोजन जाहलें, आणि समर्थांच्या आज्ञे प्रमाणें शिवाजोनें तेथेंच मुक्काम केला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं समर्थांची स्वारी मठास आलो. नंतर स्नानसंध्या करून राजश्रीस पंक्तीस घेऊन मंडळीसहवर्तमान भोजन करिते समयीं अका, वे-

णूबाई, व दिवाकर गोसांवी, या त्रिवर्गास बोलावून स्वामी बोलले कीं, आह्मी अरण्यवासी तर खरे, परंतु श्रीचे दर्शनास राजेलोक आले आहेत, यांस मेजवानी केली पाहिजे. तरी उदयीक श्रीस नैवेद्य करून राजश्रीस निरोप देऊं, असें झटल्यावरून शिवाजीमहाराज यांणीं विनंति केली, कीं, स्वामीमहाराज ! मी तर दासाचा दास आहें आणि मेजवानीविषयीं अशी आज्ञा होत आहे हें काय? झणून विनंति करितांच स्वामीनीं हास्य करून विनोदार्थ भाषणें करून परस्परें भोजनें जाहलीं. नंतर तिसरे दिवशीं प्रातःकाळीं मंडळीनें समर्थांचे आज्ञेप्रमाणें मेजवानी बद्दल नैवेद्याचें साहित्य सिद्ध करून निवेदन केल्यानंतर समर्थांनीं श्रीरघुपतीची पूजा करून नैवेद्य समर्पण केला. नंतर शिवाजी महाराजांनींही समर्थांची पूजा करून तीर्थप्रसाद घेतला.

समर्थांच्या आज्ञेप्रमाणें पंक्ति मांडिल्या, आणि पद्धतीप्रमाणें राजश्रीसहवर्तमान सर्वांचीं भोजनें जाहलीं. नंतर बराबर सैन्य होतें, त्यांत ज्या ज्या ज्ञाति होत्या त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें त्या सर्वांस भोजन घातलें, नंतर श्रीचे मंडपांत सभा बसली, समर्थ ही पृथक् आसनावर बसले. त्याकाळीं राजश्रीनीं समर्थांस राज्य अवलंबनास प्रारंभ केल्यापासून सर्व वृत्त निवेदन केलें, तें समर्थांनीं श्रवण करून झणाले कीं, शिवाजी ! फार चांगलें केलेंस या विषयीं श्रीरघुपतीनीं पंचवटीस आह्मीं असतांनां आज्ञा केली आहे. हें ऐकून शिवाजीनीं पुनः विनंति केली कीं, श्री व आपण, दोन नाहीं, मज दीनापासून जें करविलेंत तें निवेदन

केलें. पुढें जी सेवा करवाल ती करीन. हें समर्थांनीं श्रवण करून बोलिले कीं, तुझे हातून म्लेंच्छनिवारण श्री करविणार आहेत. असें ह्मणून शिवाजी महाराजांस प्रसाद देऊन यांजपाशीं कारभारी मंडळी होती त्यांत अति निकट निळोपंत व बाळोबा हे असत. शिवाजीमहाराजांचें वारंवार काम सांगणें व लोभेंकरून बोलणें हें त्यांजपाशींच होत असे. हें समर्थांनीं पाहून त्या उभयतांस पुढें बोलावून ह्मणाले कीं, तुह्मीं स्वामीसेवा करीत असून उत्तम कुळींचे आहां; परंतु सेवकांनीं सेवाधर्म कोणतेरीतीनें करावे ते आह्मीं सांगतों. असें ह्मणून सेवकधर्म दोन समास सांगितले तेः—

॥ सेवकधर्म ॥

ऐका प्रपंच विचार ॥ आपली करणी उतरे पार ॥
येथें नाहीं उत्तर ॥ श्रेष्ठांकडे ॥ १ ॥
पूर्वी दरिद्रें पीडिले ॥ ते समर्थें अंगिकारिले ॥
शिकउ शिकउ शहाणे केले ॥ नानाप्रकारें ॥ २ ॥
पहिला होता नाच्यार ॥ श्रेष्ठीं वाढवोनि केला थोर ॥
या वचनीं होतां अनादर ॥ बरवें नव्हे ॥ ३ ॥
जो आपुलें हित नकरी ॥ तो आपुला आपण वैरी ॥
येथें कांहीं कोणावरी ॥ शब्द नाहीं ॥ ४ ॥
श्रेष्ठांचें मनोगत राखेना ॥ बळेंच करी वलगना ॥
युक्ती प्रयुक्ती नाना ॥ प्रकारें करी ॥ ५ ॥
श्रेष्ठांचे केले मोडावे ॥ आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें ॥
तरी मग लागे भ्रष्टावें ॥ वैभवा पासूनी ॥ ६ ॥

पुढें पुढें काम करी ॥ मागें कांहींच नकरी ॥
कार्यातें नासतां उरी ॥ कांहींच पुढें ॥ ७ ॥
उगाच गर्वें मेला ॥ मागील दिवस विसरला ॥
स्वार्थची करूं लागला ॥ म्हणजे गेले ॥ ८ ॥
वडिलांसी बुद्धी शिकवी ॥ युक्ती बळें जाणीव दावी ॥
त्यामूर्खासीं पदवी ॥ प्राप्त कैंची ॥ ९ ॥
जो सदाचा चोरटा ॥ जो सदाचा कळकटा ॥
कठीण शब्दें बारा वाटा ॥ मनुष्यें केलीं ॥ १० ॥
आपला इतबार राखावा ॥ मग तो सर्व धणी जाणावा ॥
उदंड वैभवाचा हेवा ॥ करूं नये ॥ ११ ॥
कार्य करितां कांहीं न मागे ॥ त्याची चिंता प्रभूस लागे ॥
ऐसें जाणूनि विवेक जागे ॥ म्हणिजे बरें ॥ १२ ॥
आपणास जपूं लागला ॥ श्रेष्ठांचे मनींचा उतरला ॥
येणें कोण स्वार्थ झाला ॥ विचारावा ॥ १३ ॥
स्वामीनीं जें जें बोलावें ॥ तेंचि सेवकीं प्रतिष्ठावें ॥
वेळ चुकवूनि बोलावें ॥ विनीत होउनी ॥ १४ ॥
श्रेष्ठापुढें शहाणपण ॥ हेंचि केवळ मूर्खपण ॥
मूर्खपणें नागवण ॥ आलो घरा ॥ १५ ॥
कळेल तरी सांगूं नये ॥ वडिलासीं बुद्धी शिकवूं नये ॥
नेणपणेंचो उपाय ॥ विवेकी करावा ॥ १६ ॥
पुढें पुढें निघूं नये ॥ आज्ञे वेगळें वर्तूंनये ॥
समानितां अपाय ॥ नेमस्त आहे ॥ १७ ॥

आधीं वडिलांसीं पुसावें ॥ किंवा आपणचि करावें ॥
समय पाहूनि वर्तावें ॥ विवेकी पुरुषें ॥ १८ ॥
आधीं निश्चय करितो ॥ मग उगेंचि पूसतो ॥
इतका विचार करितो ॥ शाहाणा कैंचा ॥ १९ ॥
मी करितों ऐसें पुसणें ॥ तें पुसणें न पूसणें ॥
करूं न करूं हें विचारणें ॥ हें उत्तमोत्तमा ॥ २० ॥
मी शाहाणा ऐसें कळलें ॥ तरी स्वतंत्र पाहिजे केलें ॥
स्वतंत्र होतां मिरवलें ॥ न शाहाणपण ॥ २१ ॥
हें मनींचें मनीं समजावें ॥ प्रगट कासया करावें ॥
घेऊं ये तरी घ्यावें ॥ चातुर्यासीं ॥ २२ ॥
न्याय मानील तो न्यायो ॥ न्याय न मानील तो अन्यायो॥
दगलबाज चिडाई ॥ सुटेल कैसी ॥ २३ ॥
ज्याचे अंतरीं स्वार्थबुद्धो ॥ तेथें कैंचो असेल शुद्धो ॥
बुद्धी सांडितां अवधो ॥ दुःखासीं होय ॥ २४ ॥
ज्याकरितां प्राणी वाढले ॥ त्यासींच अडऊं लागले ॥
ते कैसे ह्मणावे भले ॥ नीतिवंत ॥ २५ ॥
सेवकीं सेवाचो करावो ॥ स्वामो आसूदकीं द्यावो ॥
तरीच पाविजे पदवो ॥ कांहीं एक ॥ २६ ॥
समर्थांचें मनोगत ॥ तैसेंचो वर्तणें उचित ॥
तेथें चुकतां आघात ॥ नेमस्त आहे ॥ २७ ॥
सेवक तोचि अडेना ॥ शब्द भूईस पडेना ॥
काम चुकलें हें घडेना ॥ कदाकाळीं ॥ २८ ॥

उंच अश्व वेळेस अडे ॥ तरी पादछेद करणें घडे ॥
ऐसें कळोनियां वेडे अडोचि लागे ॥ २९ ॥
मनोगत राखतां श्रेष्ठ वोळे ॥ मनोगत चुकतां खवळे ॥
ऐसें जयासीं नकळे ॥ तो जाणता कैसा ॥ ३० ॥
स्वामीस जें अवश्य व्हावें ॥ तैसें सेवक न व्हावें ॥
होऊनी आडवावें ॥ कोण्या विचारें ॥ ३१ ॥
आपस्वार्थ उदंड करणें ॥ आणि स्वामीकार्य बुडविणें ॥
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें ॥ सेवकांचीं ॥ ३२ ॥
सेवकपणाचें मुख्य वर्म ॥ कांहीं नसावें कृत्रिम ॥
कृत्रिम केलिया संभ्रम ॥ कैंचा पुढें ॥ ३३ ॥
धनीकाजीं जितुका सावधान ॥ सर्वकाळ परिछिन्न ॥
त्यासि चोरितां निदान ॥ बरें नव्हे ॥ ३४ ॥
थोडी बहुत लालूच करणें ॥ आणि महत्कृत्य बुडविणें ॥
महत्व जातां लाजिरवाणें ॥ जनामध्यें ॥ ३५ ॥
ऐसे बहूत ऐकिले ॥ कांहीं दृष्टीस देखिले ॥
देखत ऐकत चुकले ॥ ते मनुष्य कैसे ॥ ३६ ॥
कार्य करितां उदंड देतो ॥ चुकतां तो महत्व घेतो ॥
ऐसें कळोनि वर्ते तो ॥ प्राणि कैसा ॥ ३७ ॥
सेवक विश्वास दावितो ॥ वैरीयाकडे मिळोनि जाती ॥
त्यां चांडाळांसीं गती ॥ कोठेंचि नाहीं ॥ ३८ ॥
सकळ लोक स्वामियांचे ॥ मागें पुढें अवज्ञेचे ॥
सेवक उगेची मूर्ख नाचे ॥ शब्द बोले ॥ ३९ ॥

धूर्तपणें अंतरसाक्षी ॥ नानाप्रकारें परीक्षी ॥
दूरी गेला परी लक्षी ॥ सर्व कांहीं ॥ ४० ॥
ह्मणोनि ऐसें न करावें ॥ करणें तें नेमस्त करावें ॥
नानाकारणें धरावें ॥ अंतर प्रभूचें ॥ ४१ ॥
इति श्रीसेवकधर्मनिरूपणं नाम प्रथम समास समाप्त ॥ १ ॥

॥ समास २ ॥

सुचित करूनि अंतःकरण ॥ आतां करावें राज्यकारण ॥
प्रमाण आणि अप्रमाण ॥ समजलें पाहिजे ॥ १ ॥
आकल ह्मणजे कल नाहीं ॥ अन्यायाचा साभिमान नाहीं ॥
न्याय नीति समर्थ पाही ॥ आप्त आणि परावे ॥ २ ॥
किती चूकती चाचू घेती ॥ पदरीं घालितां न घेती ॥
अन्याय करूनी ह्मणती ॥ अन्याय नाहीं ॥ ३ ॥
उदंड हांसती दुसऱ्याशीं ॥ तेचि गुण आपल्यापासीं ॥
अखंड वर्णिती आपल्यासीं ॥ समर्थी देखतां ॥ ४ ॥
मागील दिवस विसरती ॥ उगेच तालदारी आणिती ॥
अखंड चूकती लालुचि करिती ॥ परम अन्यायी ॥ ५ ॥
आपण वेगळें कार्य न व्हावें ॥ अवघे आपणची असावें ॥
आपलें केलें न मोडावें ॥ ऐसी वासना ॥ ६ ॥
व्याप आटोप करावा ॥ समर्थ वेळेस आडवावा ॥
आपुला हेका वाढवावा ॥ अत्यादरें ॥ ७ ॥

स्वयें आपणासीं कळेना ॥ समर्थें सांगितलें ऐकेना ॥
सत्य असलें तरी मानेना ॥ अभिमानें ॥ ८ ॥
वैरियाकडे सख्य लावी ॥ समर्थांचें काम बुडवी ॥
व्यर्थ लालूच उठाठेवी ॥ उदंड करी ॥ ९ ॥
इष्ट मित्र शरीरसंबंधी ॥ व्यापकपणें सूत्रें साधी ॥
वैरीवरी हिताळू कुबुद्धी ॥ अंतरीं वसे ॥ १० ॥
आज्ञेप्रमाण असतां ॥ बहुत दुःख वाटे चित्ता ॥
आपले इच्छेनें वर्ततां ॥ बरें वाटे ॥ ११ ॥
आपले अवगुण लपवी ॥ श्रेष्ठांपुढें जाणीव दावी ॥
घीटपणेंची दटावी ॥ कोणी एकासीं ॥ १२ ॥
जें समर्थांसी पाहिजे ॥ तें आपणासी न पाहिजे ॥
आपणासी मानेल तें कीजे ॥ कांहीं एक ॥ १३ ॥
काम सांगतांची अडे ॥ मीस करूनी वेळेसीं दडे ॥
कुकर्मीं आदरें पवाडे ॥ नानायत्नें ॥ १४ ॥
समर्था अडानी ताल केला ॥ गर्वें लेखिना कोणाला ॥
काम नासुनि उडाला ॥ येकोकडे ॥ १५ ॥
जें पाहिजे समर्थांसीं ॥ त्यासीं करणें बरकसी ॥
त्याची गोष्टी हरी कसी ॥ हाळू पाडी ॥ १६ ॥
आपुले ठायीं वोठानीं आणिती ॥ श्रेष्ठांसीं मागें तुच्छ करिती ॥
कठोण वेळेसीं मिळोनि जाती ॥ शत्रूकडे ॥ १७ ॥
समर्थांसीं बळेंची करणें ॥ मर्यादा सांडूनि चालणें ॥
मना ऐसें न होतां करणें ॥ अप्रमाद ॥ १८ ॥

मज वेगळें काम न चाले ॥ ऐसें मागें पुढें बोले ॥
कितेक लोकचि फोडिले ॥ आपणाकडे ॥ १९ ॥
समर्थांसीं कांहींच कळेना ॥ मी सांगतों तें ऐकेना ॥
शहाणपण दाखवी जना ॥ नाना प्रकारें ॥ २० ॥
श्रेष्ठ समजोनी न पाहे ॥ मजवेगळें कोण आहे ॥
निकामी मिळवूनि काय हें ॥ गळंगळा अवघा ॥ २१ ॥
अवघे ढाळ भाग्यें चालतें ॥ येरवीं मुख्यास काय कळतें ॥
आह्मां लोकांकरितां वोळतें ॥ सकळ कांहीं ॥ २२ ॥
आह्मां प्रमाणें काय जाणें ॥ प्रभु होय परी कांहीं नेणें ॥
आह्मां वेगळें कोण शहाणें ॥ आहे येथें ॥ २३ ॥
पोटासाठीं सेवा करणें ॥ उगेच फुगती रिकामे ॥
थोरपण दिधलें कोणें ॥ सेवकांसीं ॥ २४ ॥
ऐसे प्रकारींचे लोक ॥ त्यांस कैसा असेल विवेक ॥
मूर्खपणें अविवेक ॥ रक्षिती बळें ॥ २५ ॥
समर्थांसीं सांडून सेवकजन ॥ सेवकाकडे लाविती मन ॥
ते जाणावे परमहीन ॥ नीच काठीचे ॥ २६ ॥
ऐसे नेणतां चूक पडती ॥ जाणते अवघेची जाणती ॥
निकामी आणि गर्व करिती ॥ मूर्खपणें ॥ २७ ॥
सेवक जनावरी विश्वासिला ॥ तो सेवकीं जेर केला ॥
समर्थ पराधीन झाला ॥ हेंही अपूर्व ॥ २८ ॥
कामाकारणें ठेविले ॥ काम पाहूनि वाटविले ॥
तेही उगेच गर्वें फुगले ॥ कोण्या हिशोबें ॥ २९ ॥

याकारणें बदलीत जाणें ॥ सेवक आज्ञेच्या गुणें ॥
तरोच समर्थपण जाणें ॥ समर्थांसीं ॥ ३० ॥
काम नासलें तरी नासावें ॥ परी सेवकाधीन न व्हावें ॥
दास ह्मणे स्वभावें ॥ बोलिलों न्याय ॥ ३१ ॥
न्याय अन्यायासीं मानेना ॥ विवेक अविवेक्या कळेना ॥
पुण्यमार्ग आवडेना ॥ पापी जनासीं ॥ ३२ ॥
सेवक बहुतांसीं असतो ॥ परी पाहों नये हे प्रचीती ॥
तथापि हे क्षमा श्रोतीं ॥ केली पाहिजे ॥ ३३ ॥

इति श्रीसेवकधर्मनिरोपणंनाम दुसरा समास समाप्त ॥

याप्रमाणें सेवकधर्म सांगून निळो सोनदेव व बाळाजी आबाजी चिटणीस यांस समर्थ बोलले कीं, हा सेवकधर्म केवळ तुह्मांसच सांगितला असा अर्थ नाहीं. मोरोपंत पिंगळे व जनार्दनपंत हणमंते इत्यादि सर्व कारभारी यांस व सरदारापासून पायदळांतील सेवकांपर्यंत हाच सांगितलेला धर्म योग्य होय. यास्तव सर्वांनींही उत्तम लक्षणाचें ग्रहण करून अवलक्षणाचा त्याग करावा. त्याकाळीं स्वामीस सर्वांनीं विनंति केली कीं, महाराज! आपण समर्थ सर्वज्ञ जाणतच आहां. आज्ञेप्रमाणें यथामति व यथाशक्ति सेवा करीत आहों. आजपर्यंत बहुत करून सेवेंत अंतर पडलें नाहीं व पुढेंही अंतर पडणार नाहीं; परंतु नकळून अंतर पडल्यास क्षमा व शिक्षाही करण्यास स्वामी समर्थ व महाराज ही आहेत. हें ऐकून समर्थांनीं मंदहास्य करून बोलले कीं, तुम्ही

सर्वत्रही कुलीन आहांच. जें सांगणें तें कुलिनासच सांगावें. अकुलिनास सांगून फळ काय? यास्तव सर्वांनीं मिळून राजसेवा करीतच आहां यापमाणें पुढेंही करावी यांतच कल्याण आहे. हें सर्वत्रांनीं ऐकून " तथास्तु " ह्मणून वंदन केल्यावर समर्थ उठले आणि सभा विसर्जन झाली.

नंतर चवथे दिवशीं यथा पद्धती प्रमाणें सर्वत्र मंडळीचीं भोजनें झाल्यावर महाराजांस समर्थांनीं निरोप दिला. तेव्हां राजश्रीनीं प्रार्थना केली कीं, महाराज ! कालरोजीं राजधर्म इत्यादि सांगितले त्यापमाणें छपेंकरून जें घडणें असेल तें घडो; परंतु समर्थांस नित्य व्यवहार निवेदन करावा आणि नित्य दर्शन घडून मजला तीर्थप्रसाद प्राप्त व्हावा. असें शिवाजीनें ह्मणतांच आह्मी अरण्यवासी आणि तुह्मी राजेलोक, यास्तव नेहमीं आमचें दर्शन व्हावयाचें नाहीं. तुह्मी नेम केला हा कामाचा नाहीं. आतां नित्य तीर्थप्रसाद घ्यावा असा तुमचा नियम असला तर जें चरणतीर्थ मातोश्रीस द्यावयास घेतलें आहे, त्यांत गंध उगाळून त्याची गोळी करावी, आणि तो ताईतांत घालून तो ताईत नेहमीं जवळ बाळगावा, आणि त्याची नित्य पूजा करून तीर्थ घेत जावें. ती पूजा आह्मांस पावेल व तें तीर्थ आमचेंच समजावें, असें ह्मणतांच महाराज स्तब्ध राहिले. त्यासमयीं कल्याण गोसांवी बोलले कीं, आपणास मुख्य प्रमाण आज्ञाच आहे, मनांत संशय आणूंनये. तेव्हां पुनः समर्थही बोलले, कीं, आह्मी सांगितला हाच नियम तुह्मी चालवावा, संशय आणावयाचें कारण नाहीं. असें ह्मटल्या-

वरून " आज्ञाप्रमाण " असें ह्मणून नमस्कार करून महाराज उभे राहिले, तों जावें ह्मणून आज्ञा जाहली. तेव्हां शिवाजीचे नेत्रीं उदक भरलें, आणि शरीरीं रोमांच उभे राहिले. तें समर्थांनीं पाहून संतोषयुक्त बोलले, कीं, काहीं दिवशीं माझें दर्शन घडत जाईल, प्रसंगीं तुह्मीं स्मरण कराल तेव्हां दर्शन घडेल. अशी आज्ञा होतांच शिवाजी चरणीं मस्तक ठेवून मुहूर्तमात्र भूमीवर पडून राहिले. हें पाहून समर्थांनीं स्वहस्तानें उचलून दृढ आलिंगन दिलें, आणि मस्तक अवघ्राण करून शिवबा ! तूं धन्य आहेस, तुझा सर्व भार श्रीहरीवर आहे. असें ह्मणून " पूर्वी आह्मास पंचवटींत व टांकळीस पुरश्चरण करितांनां तुझ्या साह्यतेविषयीं वारंवार श्रीरघुपतीचो आज्ञा झाली आहे " ही गुह्य गोष्ट तुला पूर्वी सांगितली आहेच असें सांगून राजाचें समाधान केलें, आणि चिंता करूं नको. तुझें कल्याण करून तुझ्या हातूच सेवा घ्यावी, अशी श्रीची इच्छाच आहे. असें ह्मणतांच राजानें पुनः नमस्कार करून प्रदक्षिणा केली आणि आज्ञा घेऊन प्रतापगडास गेला. नंतर स्वामीचा तीर्थप्रसाद मातोश्री जिजाउआईसाहेब यांस व त्रिवर्ग राण्यांस देऊन सर्व मंडळीसही दिला. तेव्हां मातोश्रीनीं विचारिलें कीं, शिवबा ! नारळ, माती, खडे, आणि लीद, हा प्रसाद स्वामीनी दिला याचा अभिप्राय काय ? असें ह्मणतांच शिवाजी हास्य करून बोलले कीं, आईसाहेब ! यांतील भाव असा आहे कीं, नारळ प्रसाद हा माझे कल्याणार्थ, व माती दिली, येणेंकरून पृथ्वी प्राप्त होईल, व खडे दिले, येणेंकरून बहुत

किल्लेही ताब्यांत राहतील व लीद दिली, येणेंकरून पागा पुष्कळ पदरीं राहतील असे भाव समर्थांनीं सुचविले. हें ऐकून मातोश्री परमसंतुष्ट जाहली.

शिवाजीनें प्रतिगुरुवारीं स्वामी असतील तेथें जाऊन दर्शन घेत असावें आणि आठा दिवसांत झालेलें वृत्त स्वामीस निवेदन करावें, आणि पुढें आठा दिवसांत करावयाचें तें त्यांची आज्ञा घेऊन करीत असावें. याप्रमाणें क्रम चालू असतां कोणेएके समयीं यवनांकडून चढाई होऊन बहुत संकट पडलें असतां समर्थांस विचारल्यावांचून कांहीं मसलत करावयाची नाहीं ह्मणून स्वामीचे दर्शना विषयीं बहुत यत्न केला परंतु दर्शन नाहीं. ते समयीं सर्व कारभाऱ्यांनीं मिळून महाराजांस विनंति केली कीं, स्वामी आपलें स्वाधीन नाहींत. आपल्यास तर त्यांनां विचारल्यावांचून कांहींच कर्तव्य नाहीं, ही गोष्ट कशी चालेल. तस्मात् जो प्रसंग आला आहे, तो सर्वत्रांचे मसलतीनें शेवटास न्यावा. नंतर स्वामींस विनंति करावी. तेव्हां शिवाजी महाराजांनीं सर्व कारभाऱ्यांस आज्ञा केली कीं, कसेंही असो स्वामींची आज्ञा जाहल्याशिवाय कोणतेंही काम सर्वथैव कर्तव्य नाहीं. असा निग्रह सर्वत्रांनीं पाहून बहुत विचारांत पडले. गलीम चढाई तर करून आला, असें संकट प्राप्त झालें. त्याकाळीं स्वारी रायगडास होती. महाराज सभेंत मंडळीसहवर्तमान बसले आहेत. आणि स्वामींचे शोधास कारकून गेले आहेत व सर्व विनंति करीत आहेत कीं, स्वामींची गांठ कोठें पडत नाहीं, आणि गलीम तर चढाई करून

क. भ. म. द बा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

जवळ आला; आतां कशीतरी मसलत शेवटास नेली पाहिजे. अशी लोक विनंति करीत आहेत तों अकस्मात् पायांत पादुका व हातांत माळ अशा वेषानें समर्थ सभेंत येऊन उभे राहिले. हें पाहून महाराजांसहवर्तमान सर्व सभासद साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. ते समयीं समर्थ बोलले कीं, शिवबा ! तूं हा राज्यकारभार करितोस यांत कोणेसमयीं कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. आह्मीं तर सतत तुह्मांपाशीं नाहीं आणि तुमचा नेम तर असा आहे तो चालणार नाहीं. या करितां जसा प्रसंग येईल तशी मसलत करून काम करीत असावें. अशी समर्थांची आज्ञा होतांच साष्टांग प्रणिपात करून हस्त जोडून आनंदाश्रुयुक्त व अष्टभावें करून पूर्ण होतांता परम नम्रतेनें शिवाजी महाराज बोलले कीं, हा प्राण जावो अथवा राहो, दौलतीचा तो विषय किती. आज्ञेवांचून पाऊलही पुढें पडावयाचें नाहीं.

अशी विनंति करतांच समर्थांनीं हास्यवदन करून राजास पोटाशीं धरून भाषण केलें कीं, शिवाजी ! तूं धन्य आहेस. या कलिकालीं तूं केवळ जनकराजाच आहेस. असो. आतां आह्मीं सांगतों याप्रमाणें वर्तावें. परमार्थदृष्टीनें पाहिलें असतां आह्मीं सतत तुह्मांपाशीं नाहीं असा अर्थ नाहीं, परंतु लौकिकदृष्टीनें पाहिलें असतां जवळ नाहीं हाही भाव खरा. यास्तव जे समयीं कार्य प्राप्त होईल तेसमयीं श्रीकुलदेवीस विनंति करून आज्ञा होईल त्याप्रमाणें करीत जावें. असें ह्मणतांच स्वामीमहाराज ! देवी

तर प्रत्यक्ष नाहीं तेव्हां विनंति कोठें करावी, आणि ही आज्ञा होईल कशी येविषयीं आज्ञा करावी. असें म्हणतांच समर्थ बोलले कीं, हे राजा ! शुचिर्भूत होऊन तूं व आप्तवर्गांपैकीं चांगला लिहिणार एक व प्रश्न करणार एक असे त्रिवर्गांनीं एकांतीं बसून ज्या कार्याचा उद्देश असेल तो प्रश्न, प्रश्नकरणारानें करावा. म्हणजे तुमचे आंगीं देवी संचरून तुमच्या मुखें करून बोलेल त्याप्रमाणें लिहिणारानें लिहावें नंतर त्या लेखाचें तुम्हीं अवलोकन करून त्यांत जशी आज्ञा झाली असेल, त्याप्रमाणें करीत जावें. सांप्रतचें संकट प्राप्त झालें आहे, त्याचें निवारण करून तुमचा उद्देश श्री सिद्धीस नेईल. अशी आज्ञा करून समर्थ अदृश्य जाहले. हा चमत्कार पाहून महाराजांसहवर्तमान सर्व मंडळीस आनंद जाहला. नंतर स्वामीआज्ञेप्रमाणें शत्रूचा पराभव करून जयश्री घेऊन महाराजांची स्वारी परत आली. पुढें कारणरत्वें आज्ञेप्रमाणें देवीस प्रार्थना करून आज्ञा होईल तसें कार्य करीत चालले.

कोणे एके दिवशीं चाफळखोऱ्यांत स्वामींच्या दर्शनाकरितां राजश्रीची स्वारी गेली. तेव्हां स्वामी निंबघळींत होते तेथें जाऊन पूर्वपद्धतिप्रमाणें दर्शन करून हात जोडून महाराज उभे राहिले. तों, जवळ बसण्यास स्वामींची आज्ञा जाहली, तेव्हां समर्थांनीं मुखावलोकन करून शिवबा ! तूं म्लानवदन दिसतोस, तरी तृषाक्रांत झाला आहेस कीं काय ? असें पुसतांच महाराजांनीं होय म्हटलें, त्याबरोबर कुबडी कारखेंत घेऊन स्वामी बसलेच होते, त्या कुबडीनें पुढें दगड होता, तो ढकलिला, तों त्याचे खालून

पाणी बहुत सुंदर निघालें. तेव्हां उदक घेणें म्हणून आज्ञा केली, त्यामाणें महाराजांनीं उदक प्राशन करून परम संतोषी होऊन दंडवत् प्रणाम केला, आणि गुरुमहाराज ! मी दीन मजवर ही करुणा तरी किती, आतां मी उत्तीर्ण काय व्हावें ? असें म्हणून पुनः नमस्कार करून कांहीं प्रश्न केला. त्याचें उत्तर स्वामीच्या मुखेंकरून ऐकून आज्ञा घेऊन गेले. (महाराजांकरितां जें उदक निर्माण केलें, त्याचा झरा अद्यापि निंबघळींत त्या ठिकाणीं वाहत आहे, त्यास कुवडीतीर्थ असें म्हणतात.)

कोणे एके दिवशीं शिवाजी महाराज स्वामींचे दर्शनास कांहीं ब्राह्मण व फौजेसुद्धां मंडळी सुमारें दोन हजार घेऊन आले होते. आणि दर्शन करून दोन घटिका पर्यंत संभाषणें होऊन जाण्यास आज्ञा मागितली. तेव्हां स्वामी बोलले कीं, अशा दोन प्रहरच्या समयीं तुह्मी मंडळीसहित उपोषित जाऊं नये, भोजन करून जावें. नंतर कल्याण गोसावी यांस आज्ञा केली कीं, शिवाजी राजे यांस मंडळींसहवर्तमान भोजन घालावें. असें म्हणतांच आज्ञा प्रमाण म्हणून नमस्कार केला, आणि शिवाजी महाराजांस सांगितलें कीं, भोजनास सिद्ध व्हावें. असें म्हणून स्वामीकडे विलोकन केलें, तें समर्थांनीं पाहून कल्याणास सांगितलें कीं, या पर्वताचे कडचास दगड उभा आहे, तो ढकलून विवर मोकळें करावें, म्हणजे तेथें सर्व सिद्धता आहे. अशी आज्ञा होतांच कल्याणगोसावी यांणीं तो दगड ढकलून दिला तों, आंत विस्तीर्ण ताटें

मांडून त्यांत सर्व पदार्थ व षड्रस युक्त पक्वान्नें उष्ण उष्ण वाढिलीं आहेत, आणि दर ताटास दोन दोन समया, याप्रमाणें सिद्धता पाहून शिवाजी महाराजांनीं परम आश्चर्य मानून हें स्वामीचें कौतुक मी काय वर्णूं ! असें म्हणून मंडळीसह भोजन केलें. नंतर तांबूलादि भक्षण करून स्वामीपाशीं आले, आणि विनंति केली कीं, या अरण्यांत अशा समारंभानें मंडळीसहित भोजनास कसें वातलें, येविषयीं मला सांगण्याची कृपा व्हावी. असें म्हणतांच स्वामीनीं हांसून उत्तर केलें कीं, हा मजकूर जाऊन तुकोबास विचारावा, ते तुह्मास सांगतील. त्याजवरून निरोप घेऊन शिवाजी गेले.

कांहीं दिवशीं स्वामीची आज्ञा मनांत स्मरून मुजरद फौजेसुद्धां शिवाजी देहूस गेले, आणि दर्शनाकरितां आलों असें म्हणून खबर देण्याकरितां तुकारामबावांपाशीं कारकून पुढें पाठविला होता, त्यानें जाऊन शिवाजी महाराज आपले दर्शनास आले आहेत, त्यांस आज्ञा व्हावी, म्हणून विनंति केली. त्याजवरून तुकारामबावांची आज्ञा जाहली कीं, हा भरदोनप्रहरचा समय आहे, यास्तव भोजनाची सिद्धता आहे त्यास मंडळीसह भोजनास येऊन तें जाहल्यानंतर भेटीस यावें, असें सांगावें, आणि तुह्मीं जाऊन फौजेंत जे शिधे घेणारे असतील त्यांस देण्याकरितां भोजनाचें साहित्य न्याववयास माणसें घेऊन यावें. अशी आज्ञा होतांच कारकुनानें परत जाऊन महाराजांस विनंति केली कीं, आपल्या मंडळींत जे कोणी शिधा घेणार असतील त्याणीं शिधा

न्यावा, व भोजनास येण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांस बराबर घेऊन महाराजांनीं स्वतां भोजनास यावें, पाकाची सिद्धता आहे व घोडयादिकांस दाणा वैरण सुद्धां जें लागेल तें घेऊन जावें, आणि सायंकाळीं भेटीस यावें. याप्रमाणें आपणास तुकारामबावांची आज्ञा झाली आहे; इतउत्तर महाराज आज्ञा करतील त्याप्रमाणें करूं. याप्रमाणें कारकुनानें विनंति केल्यावरून महाराजांनीं विचारिलें कीं, बावांचे घरीं इतकें साहित्य आहे कीं काय ? तेव्हां कारकुनानें सांगितलें कीं, बावांचें वर तर चंद्रमौळी आणि स्वतां हातीं दगडाचे टाळ घेऊन भजन करीत बसले आहेत. असें ह्मणतांच महाराजांनीं आज्ञा केली कीं, दोन माणसें न्यावीं आणि बावा जें देतील, तें प्रसादार्थ घेऊन यावें, ह्मणून कारकुनास आज्ञा होत आहे, तों इकडे तुकारामबुवांनीं राजाकडून कारकून येण्यास विलंब लागला, असें पाहून इंद्रायणीच्या तीरीं अत्यंत रम्य जागा पाहून तेथें योगसामर्थ्यें रमणीय व विस्तीर्ण मंडप बनवून स्वयंपाकाची सिद्धता केली, आणि छकडयावर सर्व साहित्य दाणावैरणी सुद्धां घालून चिरंजीव नारायणबावांस बरोबर देऊन पुष्करांत पाठविलें. तेथें गेल्यानंतर नारायणबावा यांणीं येऊन महाराजांस सांगितलें कीं, सर्व साहित्य दाणावैरणी सुद्धां आणिलें आहे, हें घेऊन ज्यांस द्यावयाचें असेल त्यांस द्यावें, आणि आपण मंडळीसुद्धां भोजनास चलावें. तिकडे पात्रें मांडून सिद्धता जाहली आहे, तर त्वरेनें चलावें. असें ह्मणतांच महाराजांनीं विचारिलें कीं, स्वयंपाक कोठें करविला व भोजनास यावें कोठें असें

ह्मणतांच नारायणबोवांनीं सांगितलें कीं, आमचे बराबर चलावें. तेव्हां महाराजांनीं फार उत्तम आहे, असें ह्मणून साहित्य आलें होतें, तें कारखानदाराचे स्वाधीन करून शिधे घेणार आहेत त्यांस शिधे देणें, आणि दाणा वैरण सर्वांस देणें, ह्मणून आज्ञा करून आपण नारायणबावा समागमें सर्व मानकरी व ब्राह्मण मंडळीसह भोजनास इंद्रायणीचे तीरीं गेले. तेथें जाऊन स्थळ पाहतात तों दवण्याचा विस्तीर्ण मंडप आणि ठायीं ठायीं वाळ्याचे व चिकाचे पडदे, बैठकीची जागा, भोजनशाळा, व आरामस्थानें, हें सर्व निरनिराळें पाहून महाराज बहुत संतोषयुक्त जाहले. नंतर ब्राह्मणांच्या पंक्ति व मराठ्यांच्या पंक्ति व ज्या ज्या ज्ञाति होत्या त्या त्या ज्ञातीच्या पंक्ति यथा पद्धती पृथक् पृथक् बसविल्या, व वाढणारही तसेच निरनिराळे योजिले आणि ताटें, पाट, रांगोळ्या आदिकरून समारंभ सर्वत्र सारिखा, याप्रमाणें मोठ्या थाटानें भोजनें झाल्यावर तांबूल महाराजांनीं घेऊन क्षणमात्र आराम केला नंतर साधूंचें चरित्र अगाध ! याचा अंत कांहींच कळत नाहीं, ह्मणून परम विस्मित होत्साते नारायणबावा सहवर्तमान शिवाजी महाराज मंडळीसहवर्तमान तुकारामबावांचे दर्शनास गेले. तों तुकाराममहाराज मोडक्याशा पडवींत भजन करीत बसले होते; तेथें जाऊन राजश्री नमस्कार करून समर्याद बसले. आणि परस्परें रम्य भाषणें जाहलीं. नंतर संतोष पावून विनंति केली कीं, पूर्वी श्रीस्वामीकडेही असाच भोजनाचा प्रसंग झाला. तेवेळेस त्यांजपाशीं प्रश्न केला त्याचें उत्तर आपण सांगतील, अशी आज्ञा जा-

हली हें ऐकून तुकाराम महाराज हांसून बोलले कीं, राजा ! तूं इतर मनुष्यांसारिखा नव्हेस. जो अज्ञानी असेल त्यानें ही शंका घ्यावी. स्वामी तो साक्षात् मारुति अवतार, यास्तव काय एक न करितील. आह्मी तर साधु, गरीब, श्रीहरीचे दास, दीनाहून दीन आणि अनाथाहून अनाथ, आमचे घरीं ऐश्वर्य ह्मणाल तर (केळीवर नारळी; घर चंद्रमौळी,) असें असतांही आमचा हुकूम त्रैलोक्यावर आहे, आणि ऋद्धिसिद्धि तर आमच्या दासी, यास्तव साधूंचें माहात्म्य काय पहावयाचें आहे. तस्मात् याविषयीं मनांत किमपि शंका आणूं नये. असें सांगून त्याकाळीं अभंग ह्मटला तोः—

॥ अभंग ॥

लोडिस्ते बोलिस्ते पलंग सूपती ॥ परि नाहीं लंगोटी नेसावया ॥
रिद्धि सिद्धि दासी कामधेनु घरीं ॥ परि नाहीं भाकरी भक्षावया॥
पुसाल जरी आह्मां वैकुंठींचा वास॥ परि नाहीं रहावयास स्थळ कोठें॥
तुका ह्मणे आह्मीं राजे वैकुंठींचे ॥ परि नाहीं कोणाचें उरे पुरे ॥

असें बोलल्यावर तेंच प्रमाण मानून महाराज संतोषातें पावले, आणि आज्ञा घेऊन निघाले, ते स्वस्थानाप्रत गेले.

याजवर कोणेएके दिवशीं स्वामी कळंब्याचे घळींत असतां स्वामींच्या दर्शनास महाराज आले, आणि प्रार्थना केली कीं स्वामीचा सहवास नेहमीं असावा, व सदा जवळ असावें, अशी माझी इच्छा आहे. आपलें राहणें तर सर्वदा अरण्यांत किंवा पर्वतावर

असतें. त्याअर्थी स्वामीनीं कृपा करून रायगडीं अथवा प्रतापगडीं किंवा परळी किल्ल्यावर रहावें आणि मजपासून सेवा घ्यावी. अशी विनंति बहुत प्रकारें केली त्यावरून समर्थ बोलले कीं, शिवबा ! आह्मीं अरण्यवासी वनचरांतील राहणार, या करितां आह्मांस ग्रामवास किंवा दुर्गवास किंनिमित्त पाहिजे, त्यांत तुह्मीं राजे लोक तुमचा सहवास कशास्तव करावा बरें ? तुह्मीं येतां हेंच बरें. असें ह्मटल्यावरून राजश्री बहुत श्रमी होऊन उदासीन वाक्यें बोलूं लागले. तेव्हां त्यांची ही प्रार्थना अंतःकरणपुरःसर पाहून कृपायुक्त होऊन आह्मीं परळीवर राहतों, ह्मणून समर्थ बोलले. त्याजवरून महाराजांनीं विनंति करून स्वारी निघावी, अशी प्रार्थना केली असतां समर्थ निघाले. आणि बहुत समारंभें करून स्वारी गडास दाखल जाहली,महाराजांनीं किल्ल्यावर जाऊन राजमंदिर होतें तें दाखविलें, आणि या स्थळीं राहणें व्हावें. अशी विनंति केल्यावरून स्वामीनीं आज्ञा केली कीं, हें स्थळ जीर्ण आहे, हें नूतन करवावें, तों पर्यंत तटावर ओऱ्या आहेत त्यांत राहतों, असें ह्मणून त्या स्थानीं राहिले, आणि किल्ल्याचें नांव सज्जनगड ठेविलें. महाराज कांहीं दिवस त्या स्थानीं राहून भोजनसाहित्य वगैरे जें लागेल तें पुरवावयाकरितां कोंडोपंत कारकुनास नेहमीं ठेविला. इकडे चाफळ संस्थानीं खर्चाच्या वगैरे बंदोबस्ताकरितां चाफळ व खेरीज दोन तीन खेडीं नेमून तेथील कारभार नरसोमलनाथ यांस सांगितला. आणि जिजोजी काठकर हवालदार यांस बोलावून किल्ल्यावरील किल्ला स्वाधीन केल्या.

आणि हे आपले आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितील, ह्मणून समर्थांस विनंति करून सर्व बंदोबस्त ठेवून महाराज आज्ञा घेऊन स्वस्थानीं गेले.

दुसरे दिवशीं किल्ल्याचा तट पाहण्यास राजश्री सुद्धां समर्थ निघाले तों, नैर्ऋत्य कोनास कडा थोडा होता तो पुष्कळ करण्याकरितां राजश्रीनीं कारखाना लाविला होता. तो पाहून समर्थांनीं शिवाजी महाराजांस विचारलें कीं, शिवबा! हें काय करवितां? महाराजांनीं उत्तर दिलें कीं, कडा थोडा आहे सबब खणवून जास्ती करवितों. समर्थ ह्मणाले तुह्मीं येथें खर्च कशास करितां? महाराज ह्मणाले, आपलें राहणें येथें होणार याकरितां बंदोबस्त असावा. ह्मणून करितों. समर्थ ह्मणाले, तुह्मीं खर्च करूं नका. येथील बंदोबस्त आह्मीं करवितों. अशी आज्ञा होतांच राजश्रीनीं कारखाना बंद करविला. नंतर समर्थांनीं त्या ठिकाणीं मारुतीची स्थापना केली. पुढें समर्थांनीं राजश्रीस जी आज्ञा केली त्याचा प्रत्यय पुष्कळ वेळां आला हें तेथील राहणारांस ठाऊक आहे. सर्व तट पाहून समर्थ ओवरींत येऊन स्नान संध्यादि झाल्यानंतर भोजन झालें मग राजश्रीनीं समर्थांकडील नेहमींचे भोजनखर्चास मौजे वावरदेर या गांवचा वसूल नेमून त्याची व्यवस्था पाहण्यास कोंडोपंत कारकूननिसबत वाकनीस यांस नेमिले. त्यानीं नेहमीं समर्थांपाशीं किल्ल्यावर रहावें अशी आज्ञा केली. आणि किल्ल्यावरील सर्व कारखान्यांच्या चाव्या समर्थांपुढें ठेविल्या; किल्यावर व खा-

लीं परळींत राहणारे सर्व लोकांनीं स्वामींचे आज्ञेंत वागावें अशी ताकीद देऊन किल्याचें नांव सज्जनगड असें ठेविलें. चाफळचे मठाचा व श्रीरघुपतीचा नैवेद्य, नंदादीप वगैरे खर्चाचा बंदोबस्त नरसोमलनाथ अंबरखाने यांचे मार्फत पूर्वीच चालू केला होता, त्यापेक्षां जास्ती गल्ला चांफळखोऱ्यांपैकीं नेमून तेथील बंदोबस्त वगैरे पाहण्याचें काम नरसोमलनाथ यांजकडेसच सांगितलें. चांफळीं राहणारांपैकीं आकाबाई व वेणुबाई व कांहीं शिष्यमंडळी परळीस राहूं लागली.

स्वामीनीं कांहीं दिवस तेथें राहून अंगापुरचे डोहांतील देवीची मूर्ति आणून चाफळास ठेविली होती. ती तेथें नेऊन किल्याच्या दरवाजाचे दक्षिणेस तिची स्थापना केली, आणि नांव आंगळाई असें ठेविलें. व तिचा नंदादीप व नैवेद्याचा बंदोबस्तही महाराजांकडून करविला, आणि आपण नेहमीं ओरींत राहूं लागले.

कोणे एके दिवशीं स्वामी ओरींत मंडळीसहवर्तमान गोष्टी सांगत बसले आहेत, तों तृतीय प्रहरीं पश्चिमेकडून बहुत वारा सुटला. तेणेंकरून स्वामीचे अंगावरील छाटी उडून तटाखालीं पडली. तेव्हां कल्याणा ! छाटी पडली, असें स्वामीनीं सांगतांच कल्याणानें तटाखालीं उडी टाकिली. तेव्हां सर्व लोक कल्याण मेला, असें बोलूं लागले. तेव्हां समर्थ हास्य करून बोलले कीं, ज्याचें " कल्याण " हें नांव तो कधींही मरावयाचा नाहीं. हें ऐकून सर्व तटाखालीं पहातात तों कल्याण छाटी घेऊन दरवाजाचे वाटेनें वर आला. तें पाहून सर्व लोक आश्चर्य करून बोलले कीं,

आज समर्थांचे कृपेंकरून कल्याण वांचला खरा. ही कथा शके १५७१ सालीं जाहली.

कोणे एके समयीं एक भोळा ब्राह्मण होता त्याणें समर्थांस शरण येऊन अनुग्रह घेतला. तेसमयीं साताऱ्यास रंगनाथ स्वामी व शिवाजी महाराज यां सुद्धां समर्थांची स्वारी होती; तेथें पंक्तीस शें पन्नास शिष्य बड़स अन्नें नित्य भोजन करीत असत, कोणे गोष्टीचीही न्यूनता नव्हती, यामाणें नित्यनित्य होत असतां तेथून स्वामींचो स्वारी निघाली. नंतर शिष्यांनीं भिक्षा मागून आणावी, आणि स्वामीसह भोजन करीत असावें. या गोष्टीस तो ब्राह्मण कंटाळून स्वामीपासून निघाला, तो साताऱ्यास आला. तेथें आणखीं साधुमंडळ आलें त्यांत तुकारामही आले होते, त्यांस नित्य मेजवान्या होत आहेत तें पाहून तुकाराम यांस शरण जावें ह्मणजे जेवणाची पूर्वी प्रमाणें सोई होईल असें मनांत आणून तुकाराम बावांपाशीं जाऊन मजला अनुग्रह करावा, असें बोलतांच तूं कोणाचा अनुग्रह पूर्वी घेतलास कीं नाहीं असें त्याणीं विचारलें. तेव्हां भोळ्या ब्राह्मणानें सांगितलें कीं, रामदासस्वामींचा अनुग्रह सी पूर्वी घेतला आहे. हें ऐकून तुकारामांनीं सांगितलें कीं, स्वामींकडे जाऊन त्यांचा मंत्र माघारा देऊन ये नंतर. तुजला अनुग्रह देऊं, ह्मणून सांगितल्यावरून स्वामींचा शोध करीत करीत भोळा ब्राह्मण निघाला, तों स्वामींची गांठ कृष्णातीरीं उंबरजेस पडली.

तेथें समर्थ स्नान करून बसले होते तों ब्राह्मणानें येऊन नमस्कार करून आपलें सविस्तर वर्तमान निवेदन केलें. त्यावरून स्वामीनीं सांगितलें कीं, मुखांत उदक घेऊन सांगितल्या अक्षरांचा जप करून खडकावर गुळणी टाक आणि जा. तेव्हां ब्राह्मणांनीं आज्ञा ह्मणून चूळ टाकिली तों तेरा अक्षरें खडकावर उमटलीं आणि याची वाचा बंद जाहली. मग तो ब्राह्मण उठून तुकाराम यांजकडेस गेला, आणि आपलें वृत्त बोलावयास येईना; ह्मणून त्यानें अक्षरें लिहून दाखविलीं. तीं पाहून तुकाराम बोलले कीं, मूर्खा ! अशी गोष्ट कां केलीस ? असें ह्मणून बहुत प्रकारें त्याचा निषेध करून आपल्या बरोबर त्यास चाफेळास घेऊन आले, आणि स्वामींस सांगितलें कीं, या ब्राह्मणावर कृपा करावी. तें ऐकून समर्थ ह्मणाले तुमच्या मर्जीस्तव कृपा करितों. असें ह्मणून समर्थांनीं त्या ब्राह्मणास सांगितलें कीं, त्या खडकावर जाऊन तीं अक्षरें जिभेनें चाटून घे. अशी आज्ञा होतांच त्या ब्राह्मणानें जाऊन खडकावरील अक्षरें चाटून घेतलीं. त्या बरोबर पुनः त्या ब्राह्मणाला वाचा आली. नंतर तो स्वामींचें दर्शन करून निरोप घेऊन गेला. तुकारामही स्वामीपाशीं कांहीं दिवस राहून निरोप घेऊन जाते जाहले.

भाग ९ वा.

तुकारामबुवाचें शिवाजीस पत्र.

कोणेएके समयीं शिव छत्रपतीच्या मनांत आलें कीं, समर्थांनीं आत्मानात्मविचार सांगितला असून प्रतिदिवशीं त्याचा प्रत्यय पहातच आहें. परंतु स्वामी सतत आह्मांजवळ रहात नाहींत. याकरितां तुकाराम बावाही महाप्रतापी साधु आहेत. त्यांस बोलावून जवळ ठेवून घ्यावे आणि कांहीं दिवस सहवास घडून अध्यात्म पर भाषणें करावीं. असें मनांत आणून तुकाराम बावांस येण्याविषयीं पत्र देऊन एका कारकुनास पाठविलें. तेव्हां तुकाराम महाराज, यांणीं तें पत्र पाहतांच छत्रपतीच्या मनांतील भाव जाणून पत्राचें उत्तर लिहिलें कीं, श्रीरामदासस्वामी साक्षात् मारुतीचा अवतार त्यांस तुह्मीं शरण अहांच त्यापेक्षां आमचे भेटीचें प्रयोजन काय ? एकवार पूर्वी भेट जाहली आहे व पुढेंही कालेंकरून होईल. सांप्रत न येण्याचा मजकुर पत्रोत्तरीं सहा अभंगरूपानें लिहिला आहे तो एकचित्तें वाचून पहावा. ते अभंगः—

॥ अभंग ॥

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ ॥ तयामाजी खेळ नाना युक्ती ॥ १ ॥
युक्तीचे चालक तपोनिष्ठ ज्ञानी ॥ गुरुभक्ति मनीं विश्वासेशीं ॥ २ ॥
ऐसा तुझा प्रेमा कळला हा एक ॥ पाहूनीयां लेख पत्रींचे कीं ॥ ३ ॥
शिवनाम तुझें ठेविलें पवित्र ॥ छत्रपति सूत्र विश्वाच कीं ॥ ४ ॥

व्रत तप नेम ध्यान योग केला ॥ करूनी मोकळा झालाशी तूं॥५॥
हेत हा लागला आमुचीये भेटी ॥ पत्रांमाजी गोष्टी हीच थोर॥६॥
याचें ही उत्तर ऐकें गा भूपती ॥ लिहितों विनंति हेताची हे ॥ ७ ॥
अरण्यवासी आह्मी फिरूं उदासीन ॥ दर्शन हें हीन अमंगळ॥८॥
वस्त्राबीण काया जाहली मळीण ॥ अन्नाविणें जीण फलाहारी ॥९॥
रोड हात पाय दिसे अवकळा ॥ काय तो सोहळा दर्शनाचा ॥१०॥
तुका ह्मणे माझी विनंति सलगीची॥ वार्ता हे भेटीची करूं नका॥११॥
ऐशी माझी वाणी दीनरूप आहे॥ करुणा त्या आहे हृदयस्थाशीं॥१॥
नहों कीलवाण नहों आह्मीं दीन ॥ सर्वदा शरण पांडुरंगीं ॥ २ ॥
पांडुरंग आह्मां पाळीता पोशीता ॥ आणीकाची कथा काय तेथें ॥३॥
तुझी भेट घेणें काय हो मागणें ॥ आशेचेंही शून्य केलें तेणें ॥ ४ ॥
निराशेचा गांव दीधला आह्माशीं ॥ प्रकृतिभावाशीं सोडियेलें ॥५॥
पतिव्रतामन पतिशींच भेटो ॥ तैसें आह्मी विठोमाजी नांदों ॥ ६ ॥
विश्व हें विठ्ठल नाहिं दुजें कांहीं ॥ देखणें तुझेंही तुजमाजी ॥ ७ ॥
तुजही विठ्ठल हवा ऐसा वाटे ॥ परी एक मोठी आवडीची ॥८॥
सद्गुरु श्रीरामदासाचें भाषण ॥ तेथें घालीं मन चळूं नको ॥ ९ ॥
बहुतांची वृत्ति चाळविली जेव्हां ॥ रामदास तेव्हां घडे कवी ॥ १० ॥
तुका ह्मणे बापा चातुर्यसागरा ॥ भक्ति एक थारा भाविकांशीं॥११॥१
तुह्मांपाशिं आह्मां येऊनियां काय॥ वृथा शीण आहे चालण्याचा॥१॥
मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर ॥ वस्त्राचाही थार चिंध्या बिदीं ॥२॥
निद्रेशीं आसन उत्तम पाषाण ॥ वरी हें प्रावर्ण आकाशाचें ॥ ३ ॥
तेथें काय करणें कोणाचाही आस॥ वायां होय नाश आयुष्याचा॥४॥

राजगृहा यावें मनाचिया आशें ॥ तेथें काय वसे समाधान ॥५॥
राजाचीये घरीं भाग्यवंतां मान ॥ इतरां सन्मान नाहीं तेथें ॥ ६ ॥
देखोनियां वस्त्राभूषणांचे जन ॥ तत्काळ मरण येतें आह्मां ॥ ७ ॥
ऐकूनियां मनीं उदासावें जरी ॥ तरी आह्मा हरी उपेक्षीना ॥८॥
आतां हेंचि तुह्मां सांगेन कौतुक ॥ भिक्षे एवढें सुख नाहीं नाहीं॥९॥
तप व्रत योगें महाभले जन ॥ आशाबद्ध लीन वर्तताती ॥ १० ॥
तुका ह्मणे तुह्मी श्रीमंत नामाचे ॥ पूर्वील देहाचे हरीभक्त ॥११॥ ३ ॥
आतां एक योग साधावा हा नोट॥ भल्याचा हा वीट मानूं नये॥१॥
जेणें योगें तुह्मां लागूं पाहे दोष ॥ असा हा सायास करूं नका॥२॥
निंदक दुर्जन सांगाती असती॥ त्यांच्या युक्ति चित्तीं आणूं नका॥३॥
परिक्षावे कोण राजाचे सेवक ॥ विवेकाविवेक पाहूनीयां ॥ ४ ॥
सांगणें नलगे सर्वज्ञ तूं राजा ॥ अनाथांच्या काजा साह्य होशी॥५॥
हेंचि ऐकूनीयां पावे समाधाना ॥ आतां या दर्शना काज नाहीं॥६॥
घेऊनियां भेटी कोणा हा संतोष ॥ आयुष्याचे दिवस गेले गेले ॥ ७ ॥
एक दोन कर्में जाणोनियां वर्में ॥ आपुलीया भ्रमें राहे आतां॥८॥
कल्याण कारक अर्थ याचा एक ॥ सर्वांभूतीं देख एक आत्मा ॥९॥
आत्मारामीं मन देऊनियां राहे ॥ रामदास पाहे आपणची ॥ १० ॥
तुका ह्मणे राया धन्य धन्य स्थिती॥ त्रैलोकींही ख्याती कीर्ती तूझी ११
राया छत्रपती ऐकावें वचन ॥ रामदासीं मन लावीं वेगीं ॥ १ ॥
रामदास स्वामी सोयरा सज्जन ॥ त्याशीं तनमन अर्पी बापा ॥२॥
मारुती अवतार स्वामी प्रगटला ॥ उपदेश केला तूजलागीं ॥ ३ ॥
राम नाममंत्र तारक केवळ ॥ झालासे शीतळ उमाकांत ॥ ४ ॥

उफराटें नाम जपतां वाल्मीक ॥ झाला पुण्यश्लोक तात्काळीक ॥५॥
तोचि बीजमंत्र वसिष्ठ उपदेश ॥ याहुनि विशेष काय आहे ॥ ६ ॥
आतां धरूं नको भलत्याचा संग ॥ राम-पांडुरंग कृपा करी ॥ ७ ॥
धरूं नको आशा आमुचि कृपाळा॥रामदासीं डोळा लावीं आतां॥८॥
तुझी चाड आह्मां नाहीं छत्रपती ॥ आह्मी पत्रपती त्रैलोक्याचे ॥९॥
चारी दिशा आह्मां भिक्षेचा अधिकार॥नेमिली भाकर भक्षावया १०॥
पांडुरंगीं झाली आमुची हे भेटी ॥ हातांत नरोटी दिली देवें ॥ ११ ॥
आतां पडूं नको आमुचीये काजा ॥ पवित्र तूं राजा रामभक्त ॥१२॥
विठ्ठलाचे दास केवळ भिकारी ॥ आह्मां कधीं हरी उपेक्षीना ॥१३॥
शरण असावें रामदासालागीं ॥ नमन साष्टांगीं घालीं त्याशीं ॥१४॥
तुका ह्मणे राया तुज असो कल्याण ॥ सद्गुरूशरण राहें बापा ॥१५॥
आतां ही विनंति प्रधान अष्टका ॥ प्रभुसि विवेका ऐसा सांगा ॥१ ॥
प्रतिनिधि मनरक्षक चतुर ॥ सात्त्विकाचें घर तुह्मां पाशीं ॥ २ ॥
मजुरीचे धनी लेखन कारक ॥ पत्राचा विवेक समजावा ॥ ३ ॥
पेशवे सुर्नीस चिट्नीस डबीर ॥ राजाज्ञा सादर सेनापती ॥ ४ ॥
भूषण पंडित विद्या अध्ययन ॥ वैदिकां नमन माझें असो ॥ ५ ॥
पत्रींचा हा अर्थ अंतरीं जाणोनी ॥ विवंचुनी श्रवणीं घाला राया६॥
सात्विक प्रेमळ दृष्टांत्याचा मत ॥ बोलिलों बहुत कळावया ॥ ७ ॥
यथास्थित नेम सांगणें हो राया ॥ अर्थ पाहावया जाऊं न द्या ॥८॥
भीड अशी बळें घालोनि अर्थांत ॥ अनर्थ कारक तुह्मां होई ॥ ९ ॥
सत्यवंशीं जन असाल भूषण ॥ अर्थ हा सांगणें वाचोनीयां ॥ १० ॥
तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्यां॥ सांगावें तें राया पत्र माझें॥११॥

याप्रमाणें तुकाराम महाराजांकडून पत्राचें उत्तर आल्यानंतरही शिवाजीमहाराज यांस भेटीचा छंद बहुत लागला असून स्वारी सिंहगडीं असतां तुकाराममहाराज पुण्यास शितोळे देशमुख यांचे घरीं आले, हें वर्तमान शिवाजीस कळतांच अस्तमानीं किल्ल्याहून निघाले, ते रात्रौ कीर्तनसमयीं पुण्यास येऊन पोहोंचले. कीर्तनाचा समारंभ मोठा असून रंगही बहुत भरला आहे अशा संधीस शिवाजी महाराज सभेंत येऊन बसले, आणि पाहतात तों तुकाराम कीर्तन करीत असतां यांचे पुढें येक सांवळी मूर्ति नृत्य करीत आहे, ती महाराजांचे मात्र दृष्टीस पडत आहे, याप्रमाणें आनंदानें कीर्तन समाप्त झाल्यावर शिवाजी महाराज यांनीं तुकाराम यांस साष्टांग प्रणिपात करून " मला कांहीं विनंति करावयाची आहे" अशी प्रार्थना केल्यानंतर एकांतीं विनंति करणार तों तुकाराम महाराज बोलले कीं, बापा तूं आह्मांस पत्र पाठवून बोलावून नेऊन प्रश्न करणार तर तुला समर्थांनीं जें सांगितलें, व मी जें सांगणार, यांत भिन्नता नाहीं. आह्मीं कीर्तन करीत असतां जी मूर्ति नृत्य करीत असते तीच स्वामीची असें समज. याप्रमाणें बोलत असतां अकस्मात् स्वामी समर्थ येऊन उभे राहिले, आणि तुकारामबावांशीं बोलले कीं, तुह्मी व आह्मी दोन नाहीं याकरितां शिवबाच्या प्रश्नाचें उत्तर सांगून त्याची जी इच्छा असेल ती पूर्ण करावी. हें ऐकतांच उभयतां एकमेकांस साष्टांग दंडवत करून बसले, तेव्हां तुकाराम बोलले कीं, आपण जें सांगितलें त्यापेक्षां मी अधिक करून काय सांगावयाचें ? याप्रमाणें आनंदाचीं भा-

घणें परस्परें होऊन समर्थ गेले, आणि सूर्योदयानंतर तुकाराम-बावाही देहूस जाते जाहले; आणि शिवाजीही आपल्या स्थानीं गेले.

यानंतर शिवाजी महाराज विजापूरचे बादशहाचे राज्यांत दंगा करून लढाया करूं लागले. त्यामुळें पूर्वी शहाजी राजे यांस बादशाहानीं पराकाष्ठेची तसदी दिली परंतु शिवाजी आटोपेना. यामुळें नाइलाज समजून विजापूरकरानें शहाजीस बंधमुक्त केलें. आणि शिवाजी बरोबर साम दान बोलणेंही केलें परंतु शिवाजी ऐकेना सबब त्याजबरोबर लढाई करण्याकरितां अबदुलखानास रवाना केला. त्यानें मार्गानें येत असतां तुळजापूर एथील श्रीदेवीची व पंढरपूरचे विठोबाची दुर्दशा करून टाकिली. अनेक ठिकाणचे देव आच्छादून टाकिले, या प्रमाणें जिकडे तिकडे कहर केला. तेव्हां अत्यंत संकटाचा कठीण प्रसंग पाहून वकीलाकडून राजश्रीकडे दिवसांतून तीन तीन डांका येऊं लागल्या. मोठी काळजी पडली पुढें करावें काय याचा मसलत करण्यासाठीं समर्थांची भेट घ्यावी ह्मणून राजश्री दोन गुरुवारीं दर्शनास गेले परंतु गांठ पडली नाहीं. त्या समयीं सर्व कारभाऱ्यांनीं विनंति केली कीं, स्वामी स्वाधीन आहेत असें नाहीं यास्तव स्वामींचे चरणांचें स्मरण करून मसलतीस आज्ञा व्हावी ह्मणजे आह्मीं मसलत करून शत्रुनिवारणार्थ पुढें महादेवापर्यंत जातों मागें आपलीही तयारी असावी, गलीम तर चढाई करून आला आहे. या प्रमाणें सर्वांची विनंति ऐकून राजश्रीनीं सांगितलें कीं, कसेंही संकट आलें

तरी स्वामींस विचारल्यावांचून मसलत कर्तव्य नाहीं. तेव्हां कारभाऱ्यांनीं पुनः विनंति केली कीं, आपले निष्ठेस आणि राजकारणाचे मसलतीस मेळ कसा पडेल ? नंतर अंताजीपंत वोकील हिवरेकर व जनार्दन पंत हणमंते हे उभयतां पूर्वी विजापूरकरांकडील वकीलिचें काम करीत असत, ते पुढें होऊन बोलले कीं, महाराज, प्रसंग कठीण आहे, बहुतेकांचे प्राणाशीं गांठ पडणार यास्तव समर्थांची वाट न पाहतां सर्वांची विनंति श्रवण करून सरदार पुढें रवाना करावे. मागें मसलतीच्या विचारें कार्य करतां येईल. त्याजलाही राजश्रीनीं उत्तर दिलें कीं, समर्थांस विचारल्यावांचून कांहींच कर्तव्य नाहीं. प्राण जावो अथवा राहो. हें भाषण ऐकून सभा स्तब्ध राहिली.

इतक्यांत त्या सभेंत समर्थांची स्वारी प्राप्त झाली तें ध्यान– पायीं पादुका हातांत माळ, जटा केश मुक्त, गोपीचंदनाचे द्वादश टिशे, भव्य मुद्रा आजानबाहू त्याप्रमाणें मूर्ति राजश्रीनीं पाहतांच साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. त्याकाळीं समर्थ बोलले कीं, शिऊबा, तूं राजा, राज्यकारभार करणारा, त्यासंबंधें कोणे समयीं कसा प्रसंग येतो. आह्मीं तर अरण्यवासी आणि तुह्मीं राजेलोक तुमचा नेम चालेल कसा ? यास्तव प्रसंग येईल तशी मसलत करून सर्वांचे विचारें योग्य दिसेल तें करीत असावें. हें समर्थांचें वाक्य राजश्रीनीं श्रवण करून पुनः साष्टांग प्रणिपात केला आणि हात जोडून आनंदाश्रु अष्टभाव युक्त होत्साते परम नम्रतेनें विनंति करिते झाले कीं, महाराज प्राण जावो अथवा राहो, आ-

सेवांचून पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. दौलतीचा विषय तो किती ? अशी विनंति समर्थांनीं ऐकून मंदस्मित हास्यवदन करून राजश्रींस पोटाशीं धरून बोलले कीं, राजा तूं धन्य आहेस, या काळींचा तूं जनकच होय बरें, तुझा नेम चालेल असें आह्मीं सांगतों त्याप्रमाणें कर. आह्मीं तुह्मांपाशीं सतत नाहीं हा भाव दृश्यमानें करून आहे. तुझे भावनेनें आह्मीं सतत तुझे हृदयीं आहों. यास्तव ज्या समयीं जें कार्य प्राप्त होईल. तें पूर्वी श्रीदेवीस सांगावें ह्मणजे स्वप्नगत आज्ञा होईल ह्मणून पूर्वी सांगितलेंच होतें. त्याचा प्रत्यय तुह्मांस आहेच. सांप्रत सांगतों तें ऐका. श्रीदेवीस तुमची काळजी आहे व तिच्या वरानेंच तुह्मांस राज्यलक्ष्मी प्राप्त झाली आहे. तिला विचारून जें करणें तें करीत जावें. ज्या ज्या काळीं जसा प्रसंग येईल तो देवीपाशीं श्रुत करीत जावा. त्याबद्दल कशी व्यवस्था करावयाची ती आज्ञा होईल.

सांप्रतची मसलत तुह्मीं ज्या विचारानें कराल त्यास श्री अनुकूल होऊन कार्यसिद्धी होईल. तूं काळजी करूं नको, या मसलतींत अश्व, गज व द्रव्यही पुष्कळ मिळून तुमचे मनोरथ श्रीकृपेनें पूर्ण होतील अशी आज्ञा होतांच राजश्री चरणीं मस्तक ठेवून उठले. नंतर विद्युल्लते सारखें तेज चमकून समर्थ अदृश्य झाले, हा चमत्कार सर्वत्रांनीं पाहून संतोष पावले.

पुढें अबदूलखान चालून आला त्याची मसलत करून रडतोंडीचे घांटानें कोयनेच्या तीरीं आणून प्रतापगडास नेऊन त्याचा

फडशा केला. तें सविस्तर वर्णन राजश्रीचे इतिहासांत आहे या लढाईंत राजश्रींस अश्व, गज, द्रव्य पुष्कळ मिळालें अबदूलखानास स्वतः शिवाजी महाराजांनीं ठार मारिलें. ज्या बुरजावर त्यास मारिला त्याच बुरजाखालीं त्यास पुरला ह्मणून त्या बुरजास अबदुल बुरूज असें नांव पडलें आहे या प्रमाणें तें कार्य झाल्यानंतर एके समयीं समर्थ रामघळींत ग्रंथ लिहीत बसले आहेत तों शिवाजी महाराज छत्रपती अबदुलखानास मारून जयश्री घेऊन स्वामिदर्शनास आले आणि येऊन साष्टांग दंडवत् प्रणाम करून हात जोडून उभे राहिले. त्यासमयीं अठराव्या दशकाच्या पांचव्या समासाची समाप्ति होऊन साहावे समासास आरंभ होता, तों शिवाजी महाराज पुढें उभे पाहून राजश्रींची रीत, गुण, औदार्य व सामर्थ्य समर्थांनीं मनांत आणून चालत्या ग्रंथासंलग्न त्याचें वर्णन करून तो समास समाप्त केला, तो समासः—

॥ समास साहावा. ओंव्या ॥

नाना वस्त्रें नाना भूषणें ॥ येणें शरीर शृंगारणें ॥
विवेक विचारें राज्य कारणें ॥ अंतर शृंगारिजे ॥ १ ॥

शरीर सुंदर सतेज ॥ वस्त्रें भूषणें केलें सज्ज ॥
अंतरीं नसतां चातुर्य बीज ॥ कदापि शोभा न पाविजे॥२॥

तुंड हेकाड कठोर वचनी ॥ अखंड तोले साभिमानी ॥
न्यायनीति अंतःकरणीं ॥ घेणार नाहीं ॥ ३ ॥

तरी शीघ्र कोपी सदा ॥ कदापी नधरी मर्यादा ॥
राजकारणें संवादा ॥ मिळेंचि नेणें ॥ ४ ॥
असे लौद बेई मानीं ॥ कदापी सत्य नाहीं वचनीं ॥
पापी अपस्मार जनीं ॥ राक्षस जाणावे ॥ ५ ॥
समया सारिखा समयो येना ॥ नेम सहसा चालेना ॥
नेम धरितां राजकारणा ॥ अंतर पडे ॥ ६ ॥
अति सर्वत्र वर्जावें ॥ प्रसंग पाहोनि चालावें ॥
हटनिग्रहीं न पडावें ॥ विवेकी पुरुषें ॥ ७ ॥
बहुतची करितां हट ॥ तेथें येऊनि पडले तट ॥
कोणी एकाचा शेवट ॥ झाला पाहिजे ॥ ८ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी ॥ विशेष तुळजा भवानी ॥
परंतु विचार पाहोनी ॥ कार्य करणें ॥ ९ ॥
अखंडची सावधाना ॥ बहूत काय करावी सूचना ॥
परंतु कांहीं एक अनुमाना ॥ आणिलें पाहिजे ॥ १० ॥
समर्थांपाशीं बहूत जन ॥ राहिला पाहिजे साभिमान ॥
निश्चळ करूनियां मन ॥ लोक असती ॥ ११ ॥
म्लेंछ दुर्जन उदंड ॥ बहुतां दिवसांचें माजलें बंड ॥
या कारणें अखंड ॥ सावधान असावें ॥ १२ ॥
सकळ कर्ता तो ईश्वर ॥ तेणें केला अंगिकार ॥
तया पुरुषाचा विचार ॥ विरळा जाणे ॥ १३ ॥
न्याय नीति विवेक विचार ॥ नाना प्रसंग प्रकार ॥
परिक्षणें परांतर ॥ देणें ईश्वराचें ॥ १४ ॥

महायत्न सावधपणें ॥ समर्थीं धारिष्ट धरणें ॥
अद्भूतचि कार्य करणें ॥ देणें ईश्वराचें ॥ १५ ॥
यश कीर्ति प्रताप महिमा ॥ उत्तम गुणांसि नाहीं सीमा ॥
नाहीं दुसरी उपमा ॥ देणें ईश्वराचें ॥ १८ ॥
देवाचा कैं पक्ष घेणें ॥ ब्राह्मणाची चिंता वाहणें ॥
बहुत जनासि पालणें ॥ देणें ईश्वराचें ॥ १९ ॥
धर्म स्थापनेचे नर ॥ ते ईश्वराचे अवतार ॥
जाहले आहेत पुढें होणार ॥ देणें ईश्वराचें ॥ २० ॥
उत्तम गुणाचा ग्राहक ॥ तर्क तीक्ष्ण विवेक ॥
धर्मस्थापना पुण्यश्लोक ॥ देणें ईश्वराचें ॥ २१ ॥
सकळ गुणांमध्यें सार ॥ तजविजा विवेक विचार ॥
जेणें पाविजे पैलपार ॥ अरत्र परत्रींचा ॥ २२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्य संवादे अष्टादश दशके उत्तम पुरुष निरुपणोन्नाम साहवा समास समाप्त.

याप्रमाणें उत्तम पुरुषवर्णन ह्मणून त्या समासाचें नांव ठेवून महाराजांकडे अवलोकन केलें आणि "शिवबा, विजई होऊन आलांत बसावें" ह्मणून आज्ञा करितांच शिवाजी पुनः नमस्कार करून जवळ बसले. नंतर श्रीचे आसक्तेनें जो उत्तम पुरुषवर्णनाचा समास लिहिला तो वाचून पाहिला आणि पुनः नमस्कार करून उभे राहिले.

आनंदाश्रु अष्टभावयुक्त रोमांच उठून समर्थांस ह्मणाले–महाराज आपण पतिताचे नाथ, रंकाचे राव करणार मी दास ह्मणण्याची माझी योग्यता नाहीं दासस्य दासोस्म्यहम् हें ही ह्मणण्यास अनधिकारी, महाराज मी अनाथ मजवर कृपाकटाक्ष करून स्वामींनीं सनाथ केलें. हे शब्द ऐकून हास्यवदन करून कृपाकटाक्ष अवलोकनें करून शिऊबा बसावें तूं योग्य आहेस. तूं जें वर्णन करितोस हें पाहून सर्व लोक हा राजा थोर ह्मणून वर्णन करिताहेत. तुझे हातून म्लेंछांचा संहार करवून धर्मसंस्थापना करावयाची ही गोष्ट श्रीरघुपतीनीं पंचवटींत स्वमुखें बहुत वेळ सांगितली. तें श्रवण केलें आहे, तूं धन्य आहेस. जन्मजन्मांतरीं ही श्रीची सेवा तूं बहुत केली आहेस, आणि पुण्यार्थी आहेस, मागीलजन्मीं तुह्मीं सत्तावीस कावडी श्रीभागीरथीच्या रामेश्वरास नेऊन अभिषेक केला आहे. तुह्मीं बहुत पुण्यवान आहां ही समर्थांची वाणी ऐकून पुनः पुनः दंडवत करून राजश्री ह्मणाले महाराज, आपण काय ह्मणत आहां तें आपणच जाणतां. वानरांचे हातीं लंका घेवविली तशी माझ्या हातून सेवा घेत आहां.

नंतर स्वामीनीं विचारिलें कीं, अबदुल्या नायक यवन चढाई करून आला होता, त्या संकटांतून कसा पार पडलास? तें ऐकून शिवाजीनें हात जाडेन विनंति केली कीं, महाराज, ज्या वेळेस अबदुल्यानें मजला भेटीचे समयीं कात्रेंत दाबलें तेव्हां मी देहभानावर नव्हतों. त्याचे कात्रेंतून निघतांना मी फार लहान झालोंसें वाटलें, त्याचे मिठींतून सुटूं नये परंतु स्वामींचे आशीर्वद

कृपेनें सुटलों. अबदुल्यासारिखे त्या समयीं शतशः जरी असते तरी नरडीचे घोंटच घेतों असा त्या वेळचा आवेश होता. मला त्या समयीं मनुष्यादि सर्व प्राणिमात्र मुंगीप्रमाणें दिसले हे सर्व श्रीचरणाचे प्रताप किती वर्णूं ! असें बोलून नेत्रीं अश्रु स्रवताहेत. हात जोडून स्तब्ध बसले त्या वेळीं समर्थ म्हणाले शिऊबा शाबास शाबास बापा; अद्यापि अद्भुत कर्में व्हावयाचीं आहेत. श्रीकरविणार समर्थ आहेत. ही गोष्ट मानवी कृत्यांतील नव्हे. तरी मूळचा श्रींचा संकल्प असा आहे, असें म्हणून पंचवटींत जी, श्रीनीं आपल्यास आज्ञा केली ती सविस्तर राजश्रींस पुनः समर्थांनीं सांगितली.

तें ऐकून नमस्कार करून शिवाजी बोलले, महाराज ! श्रींचा संकल्प काय असेल तो आपणच जाणत असाल मी तर मुख्य आपली कृपा असें समजून जितकी सेवा करवेल तितकी सामर्थ्यानुरूप करीतच आहें. तेव्हां समर्थ बोलले कीं, राजा ! आम्हांस कृष्णातीरीं यावयाचें कारण तुम्हीच आहां आणि श्रींच्या संकल्पाप्रमाणें तुळजाभवानीचाही वर आहे. यास्तव कोणतेही गोष्टीची काळजी न करितां जो व्यवहार मनीं आणून करीत आहां. हेंच सर्वदा करावें अशी आज्ञा होतांच महाराजांनीं विनंति केली कीं, सेवे विषयीं वारंवार मी विनंति करीत आहें, यास्तव कांहीं तरी आज्ञा व्हावी. असा शिवाजीचा आदर पाहून समर्थांनीं आज्ञा केली कीं, अकरा ठिकाणीं मारुतींची स्थापना केली आहे शिवाय डोलगावीं गुहेंत मारुती आहे. त्यांच्या नैवेद्याचा बंदो-

बस्त करून देणें. अशी आज्ञा होतांच ती मान्य करून महाराजांनीं दरगांवीं अकरा बिघे जमीन मारुतीच्या नैवेद्याबद्दल नेमून दिली. आणि आज्ञा घेऊन शिवाजी तेथून निघून आपल्या स्थानीं गेले.

कोणे एके समयीं स्वामी कृष्णातीरीं असतां आषाढमासीं श्रीक्षेत्र पंढरीस जावयाकरितां निघालेले लोक पताका, निशाणें उभारून वाद्यघोषपूर्वक गर्जना करीत करीत थव्याथव्यानिशीं चालले असतां, वाटेनें स्वामींस पाहून साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. तेव्हां स्वामीनीं विचारिलें कीं, आज अशा थाटानें कोठें जातां ? त्यांनीं उत्तर केलें कीं, श्रीपंढरीस जातों. तेव्हां समर्थ बोलले तेथें काय आहे व देव कोण आहे. तेव्हां लोकांनीं सांगितलें कीं, आषाढी एकादशीस यात्रेकरितां जात असोन तेथें श्रीविठ्ठलाची मूर्ति आहे, असें सांगून तिचा महिमाही सविस्तर सांगितला, आणि स्वामीनींही यात्रेस चलावें, तेथें साधु संत बहुत आहेत. अशी प्रार्थनाही केली, त्याजवरून स्वामी बोलले कीं, एक रामावांचून इतर दैवतांचें आह्मांस कारण नाहीं, यास्तव मी येत नाहीं. तुह्मीच जावें, असें समर्थांनीं ह्मटल्यावरून यात्रेकरी निघून गेले आणि समर्थ कृष्णातीरींच राहिले.

इकडे पंढरीनाथ मनांत विचार करूं लागले कीं, सर्व संत महंत या स्थानीं येत आहेत परंतु रामदास मात्र येत नाहींत तरी त्यास आपण स्वतां जाऊन घेऊन यावें, असा निश्चय करून ब्राह्मणवेषें ज्यास्थानीं स्वामी होते त्या स्थानीं येऊन नमस्कार

करून बोलले कीं, आपण कोण, कोठें राहतां, आपलें नांव काय? स्वामीनीं उत्तर केलें कीं, आह्मी गंगातीरीं राहणार, सांप्रत कृष्णातीरीं आहों. या देहास रामदास असें ह्मणतात. हें ऐकून पंढरीनाथास बहुत संतोष जाहला. स्वामीनींही त्यांस पुसलें कीं, आपण कोठें राहतां? तेव्हां श्रीपंढरीनाथ बोलले कीं, आह्मी श्रीपंढरीस राहात असून देशावरास या प्रांतीं आलों. अकस्मात् आपली गांठ पडली, आपण थोर साक्षात् रामभक्त आहां आणि राम व पंढरीनाथ हे दोन नाहींत यास्तव आपण पंढरीस चलावें. तेव्हां स्वामीनीं उत्तर केलें कीं, सर्व रामच आहे रामाव्यतिरिक्त कोण आहे रिता ठाव या राघवाविण नाहीं, परंतु त्या ठिकाणीं रामचंद्राचें माहात्म्य नाहीं यास्तव आह्मास जावयाचें नाहीं, हें ऐकून ब्राह्मण हांसून बोलले कीं, सर्वत्र व्यापक राम आहे, हें तुह्मी रामउपासक असतां तुह्मास माहित नाहीं काय? तेव्हां स्वामी बोलले कीं, तुह्मी ह्मणतां हें सत्य परंतु रामाव्यतिरिक्त इतर देवतांस भजावयाचें नाहीं, असा आमचा निश्चय आहे. तेव्हां श्रीपंढरीनाथ बोलले कीं, असा निश्चय आहे तर सर्व तीर्थयात्रेस कां गेलां? अशीं अनेकप्रकारचीं भाषणें करून स्वामीस कोंडिलें परंतु स्वामींचा मनोदय न येण्याचा पाहून पुनः पंढरीनाथ बोलले कीं, पंढरीस जावयास अनमान करूं नये, त्या क्षेत्रीं श्रीमारुतीचें माहात्म्य असून तेथील मुख्य दैवत मारुतीच आहेत. असें ह्मणतांच स्वामी संतुष्ट होऊन, जर मारुती त्या स्थानीं आहेत तर फार चांगलें, आह्मी पूर्वी पृथ्वीप्रदक्षिणेस गेलों त्यासमयीं दर्शन

झालें नाहीं, तर या समयीं जाऊन श्रीमारुतीचें दर्शन घेऊन येऊं असें ह्मणून निघाले, आणि पंढरीनाथही ब्राह्मण वेषानें समर्थां समागमें मार्गी जात असून पर्जन्यकाळचे दिवस यास्तव स्वामींला चिखलांतून व पाण्यांतून नेत असतां समर्थांच्या पायांत कांटे मोडतील ते स्वहस्तें काढून पंढरीस घेऊन गेले. आणि महाद्वारीं मारुतीचे देवालयांत नेऊन श्रीमारुतीचें दर्शन करावें ह्मणून सांगून आपण अदृश्य जाहले.

नंतर स्वामीनीं मारुतीचें दर्शन घेऊन बहुत संतोष पावले, आणि सर्वलोक कीर्तन व नामघोषपूर्वक नगरप्रदक्षिणा करितात हें पाहून आपणही नगरप्रदक्षिणा करून वाळवंटीत आले, आणि कीर्तनाचा समारंभ पाहून बहुत संतोषानें त्या स्थानीं उभें राहून श्रीमारुतीचें ध्यान करितांच मारुतीचें प्रत्यक्ष दर्शन जाहलें तेव्हां साष्टांग नमस्कार करून विनंति केली कीं, या क्षेत्रीं या दैवतापाशीं राहावयाचें कारण काय ? असें ह्मणतांच श्रीमारुती हास्य करून बोलले कीं, श्रीरघुपतीचे अनंत अवतार आहेत, परंतु रामकृष्ण या अवतारांत भेद नाहीं. पूर्वी रामावतार समाप्तिसमयीं श्रीरामापाशीं मी विनंति केली कीं, पुनः या सगुणरूपाचें दर्शन मला कसें घडेल. त्यावरून श्रीरघुपतीची आज्ञा जाहली कीं, मद्भक्त उपासक यांच्या संरक्षणार्थ तुह्मांस ठेवून आह्मी निजधामाप्रत जातों. आणि सर्व उपासक आमचे ठिकाणीं तुह्मांस मानितील. तुह्मास पुनः दर्शनाची इच्छा आहे तर कृष्णावतारीं याच रूपेंकरून दर्शन देऊं अशी आज्ञा करून श्रीरघुपति निज-

धामाप्रत गेले. त्याप्रमाणें कृष्णावतारीं कारणपरत्वें गोकुळांव बाळक्रीडेचे समयीं वनांत दर्शन दिलें आणि द्वारकेंत असतां बलराम, यादव, सत्यभामा व गरुड यांच्या निमित्तें नारदस्वामी यांच्या हस्तें सूचना करून द्वारकेस नेऊन दर्शन दिलें, यावरून रामकृष्ण हे उभयतां भिन्न नाहींत.

कृष्णावताराचे अंतीं डिंडीरवनामध्यें कारणपरत्वें स्वारी आली होती, आणि लोहदंडतीर्थीं स्नानास मीही गेलों होतों त्यासमयीं दर्शन घेऊन तेथें रहावयास आज्ञा जाहली. आणि श्रीनीं ब्रह्मांड सृष्टि केली, त्यासमयीं लोककल्याणार्थ हेंही क्षेत्र निर्माण करून आदिदैवत परमात्म्यानीं मुख्य स्वरूपें करून या स्थानीं त्रिमूर्तीचा भेद न दाखवितां अद्वैतरूपानें वास केला. यास्तव या क्षेत्रास अद्वैतक्षेत्र ह्मणतात, असें जाणून या क्षेत्रीं राहिलों. तुह्मी श्रीचे देवालयांत जाऊन निःसंशयपणें दर्शन घ्यावें सर्व साधुमंडळी या स्थानीं येतात. परंतु तुह्मी आलां नाहीं ह्मणून खाशांनीं स्वतः येऊन तुह्मांस अनेकप्रकारें बोध केला. आणि बरोबर घेऊन निघाले तेव्हां वाटेनें तुह्मांस जे श्रम जाहले त्यांचा परिहार व कांटे लागले ते स्वहस्तें काढून टाकणें, यारीतीनें सांभाळ करून येथें आणिलें. असा तुमचे ठायीं श्रींचा लोभ असतां तुह्मांकडून मात्र अनादर होतो. हें ऐकतांच समर्थ परम सद्गदित होऊन बोलले कीं, जसें श्रीनीं रामरूपेंकरून आपणास दर्शन दिलें, त्याअन्वयें मलाही आपणच दर्शन करवावें, अशी प्रार्थना केल्यावरून रामदासस्वामींस श्रीमारुतीनें हस्त धरून राउळांत नेलें, आणि श्रींची

प्रार्थना केली कीं, उपासकाचें समाधान उपास्यदर्शनावांचून होत नाहीं, यास्तव या उपासकास श्रीदाशरथीरूपें दर्शन द्यावें. असें ह्मणतांच श्रीपांडुरंगमूर्ती दाशरथीरूप झाली. त्याबरोबर श्रीपंढरी अयोध्यारूप व भीमा शरयूरूप दिसूं लागली.

त्याकाळीं परस्पर दर्शन व भाषण होत आहे, तों पंढरीचे यात्रेकरू साधु जितके होते त्यांसही श्रीपंढरी अयोध्या दिसूं लागली तेव्हां सर्व आश्चर्य करून क्षेत्र पालटण्याचें कारण काय ? ह्मणून शोध करूं लागले, तों राउळांत रामदासस्वामीस दर्शनाकरितां श्रीमारुतीनें नेले यास्तव क्षेत्र पालटून आपणही रामरूप धरून त्यास दर्शन दिलें. हें समजतांच सर्व साधुमंडळी राउळीं आली त्यांत मुख्य मुख्य निंबराजबावा पैठणकर, तुकारामबावा देहुकर, माणकोजी बोधले धामणकर, जयरामस्वामी वडगांवकर, रंगनाथस्वामी व आत्यास्वामी निगडिकर व सेखमहंमद श्रीगोंदेकर इत्यादि मंडळीनीं समर्थास साष्टांग नमस्कार करून बोलले कीं, पूर्वी तुळशीदास वृंदावनीं गेले होते त्यांस तेथें रामरूप मात्र दाखवीलें असें ऐकण्यांत आहे, हल्लीं आपणाला तर क्षेत्रसुद्धां दर्शन दिलें याप्रमाणें बहुत स्तवन करून या क्षेत्राचें माहात्म्य चाललें पाहिजे यास्तव हें क्षेत्र व श्रीचें रूप पूर्ववत् दिसावें असें करावें. ह्मणून सर्वांनीं समर्थांची प्रार्थना केली, त्यावरून समर्थांनीं श्रीपांडुरंगाची प्रार्थना केली कीं, आपण पूर्ववत् व्हावें असें ह्मटल्यावरून श्रीमूर्ति व क्षेत्र पूर्ववत् जाहलें. त्यासमयीं स्वामीनीं अभंग केला.

॥ अभंग. ॥

येथें उभा कां श्रीरामा ॥ मनमोहन मेघश्यामा ॥ १ ॥
कायकेले धनुष्य बाण ॥ कर कटावरी ठेवून ॥ २ ॥
काय केली सीताबाई ॥ येथें राही रघुराई ॥ ३ ॥
काय केलें वानरदळ ॥ येथें वसविले गोपाळ ॥ ४ ॥
काय केली अयोध्या पुरी ॥ येथें वसविली पंढरी ॥ ५ ॥
काय केली शरयू गंगा ॥ येथें आणिली चंद्रभागा ॥ ६ ॥
रामदासीं जैसा भाव ॥ तैसा झाला पंढरी राव ॥ ७ ॥

या प्रमाणें समर्थांनीं श्रीची प्रार्थना करितांच पूर्ववत प्रमाणें श्रीविठ्ठल मूर्ती व क्षेत्र झालें. नंतर समर्थ सर्व साधुमंडळी सहवर्तमान श्रीचे देवालया बाहेर आले. सर्वत्रांनीं समर्थांस नामदेवाच्या जाग्या शेजारीं जयराम स्वामी राहात होते तेथें राहविलें. उपरांत अंतोबा कुळकर्णी मेथवाडकर हे समर्थांस शरण आले त्यांजला समर्थांनीं अनुग्रह प्रसाद दिला. पुढें पौर्णिमे पर्यंत समारंभ होऊन गोपाळ काला झाल्यानंतर श्रीची आज्ञा घेऊन समर्थ निघणार तों प्रतिवर्षी येत जावें ह्मणून श्रीची आज्ञा झाली; नंतर पंढरीस गंगातीरा कडील यात्रा आली होती ती मंडळी समर्थांचे निरोपाकरितां दर्शनास आली ते समयीं मातोश्रीकडील सर्व वर्तमान त्या लोकांनीं सांगितलें. नंतर आंवडग्रांतीं जांबेकडील जे होते त्यांजपाशीं समर्थांनीं मातोश्री व श्रेष्ठांकरितां पत्रें लिहून दिलीं. तीं अशीं:—

॥ मातोश्रीस पत्र. ॥

सकळ गुणांची निधी ॥ निर्गुणाची कार्यसिद्धी ॥
विवेकाची दृढ बुद्धी ॥ तुझेनि गुणें ॥ १ ॥
तूं भवसिंधूचें तारूं ॥ तूं भक्तांचा आधारू ॥
तूं अनाथाचे अवसरू ॥ वैष्णवी माया ॥ २ ॥
तूं भावार्थाची जननी ॥ तूं विरक्तास जीवनी ॥
तूं परमार्थाची खाणी ॥ भजनशीळ ॥ ३ ॥
तूं सर्व सुखाची मूस ॥ तूं आनंद रत्नाची मांदुस ॥
तुझेनि चुकती सायास ॥ संसारींचे ॥ ४ ॥
तूं परमार्था विषयीं अगण ॥ सद्गुरु दासांचें मंडण ॥
समाधानाची खुण ॥ अंतरीं वसे ॥ ५ ॥
सत्संगासीं सादर ॥ भक्ति मार्गासी तत्पर ॥
धूर्त कुशळ अती सादर ॥ परोपकारी ॥ ६ ॥
श्रीगुरु भजनीं तत्पर ॥ स्वामी कृपा निरंतर ॥
क्षणोनि शुद्ध क्रियेचा उद्धार ॥ तुमचे ठायीं ॥ ७ ॥
आत्मचर्चेसीं मुगुटमणी ॥ अत्यंत सादरता निरूपणीं ॥
बोलणें अमृत वाणी ॥ मृदुवचनीं ॥ ८ ॥
विवेक निधी केवळ ॥ अंतर शुद्ध निर्मळ ॥
ज्ञान दीप प्रबळ ॥ तुमचे ठायीं ॥ ९ ॥
क्रिया शुद्धी निर्मळ मन ॥ निरभिमानी परम सज्जन ॥
निरंतर अनुसंधान ॥ अंतरीं वसे ॥ १० ॥

भावार्थांचें आगरू ॥ मवळ शांतीचा सागरू ॥
पाहतां उपमे मेरू ॥ तोही उणा ॥ ११ ॥

॥ श्रेष्ठांस पत्र ॥

सकळ तीर्थांचें माहेर ॥ सकळ गुणांचें भांडार ॥
सकळ विद्येचा सागर ॥ स्वरूप तुमचें ॥ १ ॥
तूं धीरपणें मेरू ॥ तूं उदारपणें जळधरू ॥
तूं गंभीर पणें सागरू ॥ पीयुषाचा ॥ २ ॥
तूं पवित्रपणें वैश्वानरू ॥ तूं समर्थ पणें ईश्वरू ॥
तूं मतापाचा दिनकरू ॥ धग धगाय मान ॥ ३ ॥
तूं सकळ तीर्थांचें यश ॥ तूं उंच आकाश ॥
तूं मायेचा मूळ पुरुष ॥ सकळ कर्ता ॥ ४ ॥
तूं विष्णूचें मूळस्थान ॥ तूं योगीयांचें ध्यान ॥
तूं वेदशास्त्राचें मथन ॥ सार वेदांताचें ॥ ५ ॥
तूं सकल सत्याचा साक्षी ॥ अनंत माया तुझे कुक्षी ॥
तुमचें निजरूप लक्षी ॥ ऐसा कवणु ॥ ६ ॥
झुंजवायूसी आकळावें ॥ गगन वोलांडूनी जावें ॥
महातेजासी आच्छादावें ॥ कवणे परी ॥ ७ ॥
तप्त पाताळां तळवटीं ॥ एकवीसस्वर्गांचे शेवटीं ॥
पवाडा करीन ऐसो पोटी ॥ हाव कैची ॥ ८ ॥
वसुंधराही एकसरी ॥ घालोनियां मस्तकावरी ॥
अंतरिक्ष गमन करी ॥ ऐसा कवणु असे ॥ ९ ॥

आवणोंदकाचा अंत ॥ कैसा ध्यावा तो अद्भुत ॥
तुमचे स्वरूपाचा निश्चितार्थ ॥ कवण करी ॥ १० ॥

या प्रमाणें मातोश्रीस व श्रेष्ठांस पत्रें लिहून यात्रेकऱ्यांपाशीं दिलीं आणि ह्मणाले कीं, आमचे करितां मातोश्रीस व श्रेष्ठांस वंदन करावें असें सांगितलें.

नंतर श्रींचो व मारुतीची आज्ञा घेऊन समस्त मंडळी सुद्धां वाळवंटीस येऊन कीर्तन करून जयरामस्वामी यांचे मठांत पूर्णिमेपर्यंत राहून तेथील समारंभ पाहून संपूर्ण यात्रा गेल्या नंतर मारुतीचो आज्ञा घेऊन जाऊं लागले. तेव्हां मारुतीनीं आज्ञा केली, कीं, प्रतिवर्षी आपण येत जावें, तेव्हां समर्थ आज्ञा प्रमाण असें ह्मणून निघाले.

नंतर मेथवडकर अंतोबा गोसांवी यांची गांठ पडली, त्यांजवर स्वामींनीं कृपानुग्रह केला. प्रतिवर्षी आषाढी कार्तिकीस स्वामीनीं मेथवड येथें येऊन रहात असावें असें चालत असतां कोणे एके समयीं मेथवडचे नदीस स्वामी स्नान करीत असतां नदीच्या वाळवंटींत विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती सांपडल्या. त्या मूर्ति मेथवाडच्या मठांत स्थापून मेथवडकर यांस तेथील पूजा सांगून तिकडील मठाचा अधिकार त्यांसच सांगितला. नंतर स्वामींनीं पंढरीस नेहमीं जाण्यायेण्याचा क्रम चालविला असतां त्यांस क्षेत्रस्थ यांणीं मठास जागा दिली त्या जागेंत जयरामस्वामींच्या मठाजवळ स्वामींनीं मठ बांधून यात्रे संबंधी खर्चास पन्नास रुपये वर्षास्न

त्या मठास करून दिलें. तेथें मेथवडकर राहून वर्षासन घेऊन स्वामी आल्यास उत्तम, न आल्यास आपणच जाऊन गोपाळकाला इत्यादि साधुमंडळीच्या चालीनें करीत असत.

भाग १० वा.

शिवाजीची भेट व दैविक चमत्कार.

कोणेएके दिवशीं रायगडीं स्वारी होती, तेथें रात्रीं महाराज रंगमहालांत ज्येष्ठपत्नी सईबाई दुसरी सोयराबाई तिसरी सगुणाबाई या त्रिवर्ग राण्यांसहित बसले आहेत, तों, गोमांतकी आंबे आले होते, त्यांच्या पांकळ्या राण्यांनीं चिरून ताट भरून महाराजांचे पुढें ठेविलें. तेव्हां त्यांचे चित्तांत आलें, कीं, हे अंबे बहुत चांगले आहेत, यासमयीं स्वामी असते तर स्वामीस अर्पण करून आम्ही सर्वत्रांनीं प्रसाद घेतला असता. असें महाराज राण्यांशीं बोलत आहेत तों समर्थ येऊन कवाडास धक्का मारून कवाड उघडा म्हणून बोलले. तेव्हां कवाड उघडून पाहतात तों स्वामींचें दर्शन जाहलें. तेव्हां अतिआनंदानें नमस्कार करून स्वामीचा हस्त धरून खोलींत नेऊन आसनपाद्यादि पूजा करून अंबे अर्पण केले. ते स्वामीनीं भक्षून राहिलेला शेष प्रसाद भक्षावयाची आज्ञा केली. त्याप्रमाणें महाराजांनीं भक्षण करून राण्यांसही प्रसाद दिला. नंतर स्वामींनीं व महाराजांनीं तांबूल भक्षण करून क्षणभर बसून भाषणें केलीं. नंतर तेथून स्वामी निघाले.

तेव्हां महाराजांनीं विनंति केली, कीं, अशा रात्रीच्या समयीं स्वारी आली कशी, व आतां जाणें कसें घडेल. तर येथेंच राहण्याची कृपा करावी. असें ह्मणतांच समर्थ बोलले, कीं, मजबराबर यावें ह्मणजे आलों कसा व जातों कसा हें दाखवितों. असें ह्मणतांच पुढें स्वामी व राजश्री मागें, असे किल्याचे तटावर येऊन एक पाय खालीं व एक पाय किल्याचे तटावर असे उभे राहून समर्थ बोलले, कीं, असा आलों आणि असा जातों, असें ह्मणून गेले. हें महाराजांनीं पाहून परम आश्चर्य मानून स्वस्थानीं येऊन निद्रा केली.

कोणे एके दिवशीं शिवाजी महाराज स्वामिदर्शना करितां परळीस आले. नंतर पूर्व पद्धती प्रमाणें नमस्कार करून समीप बसले, आणि राजधर्म, क्षात्रधर्म, यांचे व इमारती वगैरे कारखाने बांधण्याचे व बागलावणें इत्यादिकांचे स्वामीस प्रश्न केले त्या प्रमाणें समर्थांनीं वेगळे वेगळे ग्रंथ करून दिले (ते अद्यापि आहेत) नंतर कांहीं दिवस समर्थां पाशीं राहून राजश्रीनीं समर्थांची आज्ञा घेऊन जातेसमयीं जिजोजी काटकर हवालदार यास सांगितलें कीं, उरमोडसि मोट लावून पूर्वी सरकारी बाग खालीं केली आहे. त्या बागेंत समर्थांची स्वारी गेली असतां तेथें राहण्यास जागा सुंदर बांधवावी आणि तिचें नांव संध्यामठी असें ठेवावें. हें बोलणें समर्थांनीं ऐकून राजश्रीस विचारिलें कीं, शिऊबा, बागेंत काय काय पदार्थ लाविले आहेत ! महाराजांनीं उत्तर दिलें कीं, फणस आंबें लाविले आहेत व शाक भाजी होत

असते. सांप्रत श्रीची स्वारी एथें राहिली व बागेची नेमणूकही भोजन खर्चाकडे केली आहे; परंतु फुलें तुळशी करावयास सांगितलें आहे. स्वारी खालीं गेली असतां नदीतीरीं हवाशीर जागा आहे तेथेंही राहण्याकरितां बागेंत घर बांधण्यास सांगितलें आहे. हें ऐकून समर्थ बोलले कीं, शिऊबा, तुह्मीं बागा कोठ कोठें करविल्या आहेत. त्या काळीं राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज शिवापूर व पुणें इत्यादि ठिकाणीं बागा केल्या, व त्यांत आंबे फणस वगैरे झाडें लाविलीं आहेत. त्याजवर समर्थ बोलले कीं. तुह्मीं पूर्वी बाग केले आहेत व पुढें ही करवालच परंतु बाग कसा करावा या विषयीं चाल आह्मीं सांगतों, तुमचे उपयोगी पडल्यास घ्यावी- असें ह्मणून बाग प्रकरण सांगावयास प्रारंभ केला तो समासः-

॥ स्फुट समास ॥

प्रसंग निघाला स्वभावें ॥ बागेमध्यें काय लावावें ॥
ह्मणूनी घेतलीं नावें ॥ कांहीं एक ॥ १ ॥
काटी रामकाटी फुलें काटी ॥ नेपतीसह मुळीं कारमाटी ॥
लावी चिलारी सागरगोटी ॥ हिवर खैर खरमाडी ॥ २ ॥
पांढर फळी करवंदी तरटी ॥ आळवी तोरणी चिंचोरटी ॥
सिकेकाई वाकेरी घोटी ॥ करंज विळस समुद्रशोक ॥ ३ ॥
अव्हाटि बोरटि हिंगणबेटी ॥ विकळी टांकळी वाघाटी ॥
शेर निवडुंग कारबेटी ॥ कांटेशेवरी पांगिरे ॥ ४ ॥

निरगुडी येरंड शेवरी ॥ कासवेद कासळी पेरारी ॥
तरवड उन्हाळ्या कुसरी ॥ शिवि तिव्हाअंबोटी ॥ ५ ॥
कातु तिकाच कुहीरी सराटी ॥ उतरणी गुळवेल चित्रकुटी ॥
कडोचि काटेली गोमटो ॥ घोळ घुगरो बिरभोटी ॥ ६ ॥
भोस बरु वाळा मोळा ॥ उस कास देवनळा ॥
लव्हे पानि पारोस पिंपळा ॥ गुंज कोळसरे देवपाळ ॥ ७ ॥
वेत कळको चिवारी ॥ ताड माड पायरी पिंपरी ॥
उंबरी अंबरी गंभिरी ॥ अडूळसा मोही भोपळी ॥ ८ ॥
साव सिसवे शिरस कुड ॥ कोळ कुंभा धावडा मोड ॥
काळकुडा भुता वोकड ॥ कुरडो हिरंडी लोखंडी ॥ ९ ॥
विहाळ गिळि टेंभुरणी ॥ अविट एणके सोरकीन्ही ॥
घोळी दालचिनी ॥ कबाबचिनी जे ॥ १० ॥
निंबारे गोडे निंब ॥ नाना महावृक्ष तळंब ॥
गोरक्षचिंच लातंब ॥ परोपरीचा ॥ ११ ॥
गोधनी शेलवंटी भोंकरो ॥ मोहे बिब्बा रायबोरी ॥
बेल फणस जांब भरी ॥ चिंच अंबसाले अंबाडे ॥ १२ ॥
चांफे चंदन रातांजन ॥ पतंग मैलागर कांचन ॥
पोपये खेलेले खपान ॥ वट पिंपळ उंबर ॥ १३ ॥
अंबे निंबें साखर निंबें ॥ रेकण्या खरजुरी तुतें दाळिंबें ॥
तुरडे विडे नारिंगें ॥ शेवेकविट अंजोर सिताफळें ॥ १४ ॥
जांब अननस देवदार ॥ सुरमे खासे मंदार ॥
पांढरे जंगली लाल पुरे ॥ उद्दे चित्रकीं ॥ १५ ॥

केळी नारळी पोफळी ॥ आंवळी रायआंवळी जांभळी ॥
कुणकी गुगळी साळफळी ॥ वेलफळी माहाळुंगी ॥ १६ ॥
भुईचांफे नागचांफे मोगरे ॥ पारिजातक बट-मोगरे ॥
संखासूर काळे मोगरे ॥ सोनतरवड सोनफुले ॥ १७ ॥
जाई सख जाई पित जाई ॥ त्रिविध शेवती मालती जुई ॥
पाडळी बकुळी अबई ॥ नेवाळी केतकी चमेली ॥ १८ ॥
सूर्य-कमळणी चंद्र-कमळणी ॥ जाम्बिनी हनुमंत जाम्बिनी ॥
केशर कुसुंबी कमळणी ॥ बहुरंग निळ याति ॥ १९ ॥
तुळसी काळात्रिसेदरी ॥ त्रिसिंगी रायचंचु रायपेटारी ॥
गुलखत निगुलचिन कनेरी ॥ नानाविध मखमाली ॥ २० ॥
काळा वाळा मरुवा नाना ॥ कचोरे गवले दवणा ॥
पाच राजगिरे नाना ॥ हळदी करडी गुलटोप ॥ २१ ॥
वांगीं चाकवत मेथी पोकळा ॥ माठ शेपू खोल बसळा ॥
चवकी चुका वेल सबळा ॥ अंबु जिरे मोहरी ॥ २२ ॥
कांदे मोळकांदे माइणमुळें ॥ लसूण आलें रताळें ॥
कांचन कारिजे माठ मुळे ॥ सुरण गाजरें ॥ २३ ॥
भोपळे नानाप्रकारचे ॥ लहान थोर पत्र वेलीचे ॥
गळ्याचे पेढ्या सांगडीचे ॥ वक्र वर्तुळ लंबायमान ॥२४॥
गंगाफळें काशी फळें क्षीर ॥ सागर सुगरवे सिंगाडे देवडांगर॥
दुधे गंगारुढे प्रकारें ॥ किनऱ्या रुद्र विण्याचे ॥ २५ ॥
वाळक्या कांकडचा चिबडचा ॥ कोहाळे सेंदण्या सेंदाडचा ॥
खरबुजा तरबुजा कलंगडचा ॥ द्राक्षी मिरवेली पानवेली२५ ॥

दोडक्या पारोशा पडवळ्या ॥ चवळ्या कारल्या तोंडल्या ॥
घेवडचा कुहिऱ्या खरस मुळ्या ॥ वेली अळू चमकोरे ॥२७॥
अठरा भार वनस्पती ॥ नामें सांगावीं त्यांचीं किती ॥
अल्प बोलिलों श्रोतीं ॥ क्षमा केली पाहिजे ॥ २८ ॥

इति स्फुट समास बाग प्रकरण समाप्त ॥

या प्रमाणें समर्थांच्या मुखें बागेंत झाडें लावण्याची पद्धती राजश्रीनीं श्रवण करून विनंति केली कीं, जो आज्ञा झाली ती सर्वज्ञपणें झाली व त्याप्रमाणें घडणें तेंही आपले कृपें करून घडेल. असें ऐकून समर्थ हांसून बोलले कीं, तूं श्रीमंत आहेस. तुझे हातून सर्व कृत्यें घडत आहेत व पुढेंही घडतील. असें म्हणतांच शिवाजी महाराजांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार करून स्वस्थानीं जाण्याविषयीं आज्ञा घेऊन जाते जाहले. पुढें राजश्रीनीं चार पांच ठिकाणीं समर्थांच्या आज्ञेप्रमाणें बागाही केल्या. नंतर समर्थ परळीवर शके १५७२ सालीं येऊन राहते जाहले.

पुढें राजश्रीनीं करवीर प्रांतीं कर्यात (जुने प्रांत हुकेरी) एथें सामनगड म्हणून किल्ला बांधण्याचा कारखाना चालू केला. किल्लयाचे तटापुढें श्री मारुतीचें अनादि सिद्ध स्थान होतें त्या ठिकाणीं किल्लयावरून जाण्यास मार्ग करविण्याचे विचाराकरितां प्रातःकाळीं राजश्री आले असून; हजारों मनुष्यें काम करीत आहेत त्यांस पाहून महाराजांचे मनांत आलें कीं, इतक्या मनुष्यांचें पोषण मीच करितों. असा संकल्प होऊन कारखान्याचें काम

पहात फिरत होते. हा संकल्प राजश्रींचे मनांत आला आहे. असें समर्थांनीं जाणून यास कांहीं चमत्कार दाखवावा असा मनांत निश्चय करून त्याचवेळीं राजश्रीपाशीं प्रगट झाले. राजश्रीनीं त्वरेनें उठून साष्टांग नमस्कार करून विनंति केली कीं, अकस्मात् कोठून येणें झालें? समर्थांनीं किंचित् मंदहास्य करून सांगितलें कीं, शिवाजी, तूं किल्लयाचा कारखाना चालवितोस तो पहावा अशी इच्छा झाली ह्मणून सज्जनगडाहून आलों. असें ऐकून राजश्रींस फार संतोष झाला आणि पुनः दंडप्राय नमस्कार करून हात जोडून उभे राहिले. नंतर समर्थांस राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज आज माझें मोठें भाग्य व या स्थळाचें दैव उदयास आलें ह्मणूनच कृपा झाली त्यासमयीं समर्थ बोलले कीं, शिऊवा, यास्थलीं श्रीमारुती आहेत त्यांचेयोगें या स्थळाचें दैव उदितच आहे. परंतु तुह्मी लक्षावधी मनुष्यांचें पोषण करून कारखाना करवितां तस्मात् तुह्मींही श्रीमंत आहां. हें वचन ऐकून छत्रपति बोलले कीं, महाराज हें सर्व आपल्या आशिर्वादाचें फल आहे. समर्थ ह्मणाले, बरें आहे. असें बोलत कारखाना पहात पहात चालले ते किल्यावरून मारुतीस जाण्याचे रस्त्याचें काम चाललें होतें तेथें आले. त्या ठिकाणीं रस्त्याचे मध्यभागीं मोठा दगड उभा होता तो तसाच कायम ठेवून त्याचे आसमंतात भागीं जागा नीट करून रस्त्याचें काम चाललें आहे हें स्वामीनीं पाहून राजश्रींस बोलले कीं, मध्यें दगड ठेवून कारखाना चालविला आहेस याचें कारण काय? राजश्री बोलले कीं, सर्व रस्ता झाल्यावर दगड फोडावयाचा मानस

आहे. समर्थ ह्मणाले हातासरसें काम करून घ्यावें पुढें होत नाहीं या करितां तबलदार बोलावून दगड फोडावयास लाविले. सुमारें अर्धा दगड फुटत आला त्यासमयीं समर्थ बोलले कीं, धोंड्याचे मध्यभागीं घाव न घालितां सभोंवार सर्व फोडावा. त्या प्रमाणें फोडून मध्यभागचा वर्तुळ नारळाहून कांहीं मोठा राहिला. त्यासमयीं समर्थांनीं तबलदारास आज्ञा केली कीं, मोठ्या युक्तीनें याचे दोन भाग सारखे करावे. त्या प्रमाणें तबलदारानें करितांच त्यांत उखळाप्रमाणें अर्ध तांब्या पाणी मावण्याजोगा खळगा असून त्यांत पाणी, व त्या पाण्यांत एक बेडकी आहे हें समर्थ व महाराज आदिकरून सर्वांनीं पाहिलें. त्यासमयीं समर्थ बोलले कीं, शिऊबा, तूं परम योग्य, तुझी योग्यता फार मोठी, तुझें करणें फार आश्चर्यकारक होय. पहा कीं, या दगडामध्यें खळगा करून त्यांत पाणी घालून बेडकीचें पोषण केलेंस हें इतरांच्या हातून व्हावयाचें आहे कीं काय? हे समर्थांचे शब्द ऐकून राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज अशी गोष्ट मजपासून कशी घडेल? समर्थ ह्मणाले शिऊबा, तुजशिवाय कर्ता कोण आहे? राजश्रीनीं उत्तर केलें कीं, हें ईश्वरीकृत्य मजपासून कधींही घडणार नाहीं. असें असतां समर्थ असें बोलतात तस्मात् माझे हातून कांहीं तरी अपराध झाला असावा त्याचे पारिपत्त्यादाखल हीं अक्षरें निघतांहेत. यास माझे हातून झालेले अपराधांची क्षमा करणार समर्थ आहेत. त्यासमयीं समर्थ बोलले बापा, तुजवांचून या जीवांचें पोषण करणार कोण आहे? असें ऐकून राजश्रीनीं स्वामीचे च-

रणीं मस्तक ठेवून हात जोडून उभे राहिले आणि कंठ सद्गदीत होऊन कांहीं बोलवेना अशी अवस्था राजश्रींची झाली.

याप्रमाणें राजश्रींची स्थिति पाहून समर्थांस करुणा आली आणि बोलले, बापा लक्षावधी मनुष्यांचें पालन तुह्मीं करितां आणि या बेडकोंचें पालन तुह्मीं करीत नाहीं काय ? हें भाषण ऐकून महाराजांनीं विनंति केली कीं, मी अपराधी खरा. पारिपत्यास योग्य; परंतु स्वामी समर्थ दीनवत्सल क्षमाशील आहेत याकरितां माझे अपराधाची क्षमा करावी. याप्रमाणें राजश्रींचें भाषण ऐकून समर्थ ह्मणाले, बापा तुह्मी सरकारचे आवडते सेवक याकरितां इतरांस तुमचे हातून सरकार शेर देववितात हें वास्तवीक असून तुमचे मनांत जो संकल्प आला तो योग्य नाहीं. याकरितां त्याची निवृत्ति व्हावी ह्मणून तावडतोब तुमचेकडे आलों. राजश्रीनीं विनंति केली कीं, मी पूर्ण अपराधी आहें. परंतु क्षमा करणार आपण समर्थ आहां. त्या समयीं समर्थ बोलले कीं, क्षमा करण्याकरितांच मी येथें आलों; आतां जातों असें ह्मणून निघाले. तेव्हां राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज दोनप्रहरचा समय झालेला आहे, याकरितां नैवेद्य करून नंतर जाण्याची तयारी होईल तर बरें. समर्थांनीं उत्तम आहे असें ह्मणून सर्व मंडळीसहवर्तमान मारुतीपाशीं आले.

नंतर स्वयंपाक सिद्ध करण्याविषयींची आज्ञा होऊन स्वामींची वारी नित्यकर्म स्नानसंध्यादि करण्यास जाती जाहली. तें झा-

ल्यानंतर मारुतीची पूजा नैवेद्य वगैरे होऊन राजश्री सहवर्तमान समर्थांचें भोजन झालें. उपरांत राजश्रीनीं विनंति केली कीं, किल्ल्यावर येऊन किल्ला पहावा. समर्थ ह्मणाले उत्तम आहे. नंतर राजश्रीनीं समर्थांस तटावर नेलें. तेथें कोठें कसें करावें यावद्दलही समर्थांनीं राजश्रीस सांगितलें; नंतर समर्थ राजश्रींस ह्मणाले कीं, तुह्मीं पूर्वी किल्ले वगैरे इमारती करविल्या आहेत व सांप्रतही करवीत आहां आणि पुढेंही करवाल; परंतु कारखान्यास सामान कसें असावें. कारखाना कसा करवावा या विषयीं आह्मी सांगतों त्या प्रमाणें सामान वगैरे तुह्मांस दिसल्यास करावें. असें सांगून एक समास ह्मणाले तो स्फुट समासः—

॥ ओंव्या ॥

ऐका विटांचा प्रसंग ॥ लांबी रुंदी यथा सांग ॥
चौक नेमस्त व्यंग ॥ असोंचि नये ॥ १ ॥
विट लांबी नऊ तसूं ॥ आणि रुंदी सात तसूं ॥
उंचि जाणिजे तीन तसूं ॥ पोटपाट नेमस्त ॥ २ ॥
खालीं बरड वरी खळगा ॥ ती विट कामा नयेगा ॥
धारे कोरेपाशीं दगा ॥ कामा नये ॥ ३ ॥
भूमिपासूनी नीट करावी ॥ कलबुताची कळाशी धरावी ॥
आंत पावेतों नेमस्त भरावी ॥ खिळे मारुनी ॥ ४ ॥
कडे खापरी कामा नये ॥ थोडें कमावणें कामा नये ॥
थोडी लीद कामा नये ॥ आणि बहुत ॥ ५ ॥

राख कोंडा बळग्यादाणे ॥ घालूं नये दैन्यवाणें ॥
अथवा कांहीं अधिक उणें ॥ करूंचि नये ॥ ६ ॥
घट्ट चिखल कामा नये ॥ पातळ तरी असूं नये ॥
दडपितां कळाशी वाहूं नये ॥ नाथर बुजे ॥ ७ ॥
खणखणीत वाळवाव्या ॥ झणझणीत भाजाव्या ॥
भटचा नेमस्त कराव्या ॥ आणि दरी ॥ ८ ॥
ओलें सरपण कामा नये ॥ कावळकाठचा कामा नये ॥
मोठे ढोण कामा नये ॥ नेमस्त असावे ॥ ९ ॥
जाळ घालावा नेमस्त ॥ उग्रास करूं नये व्यस्त ॥
ठाव असावा प्रशस्त ॥ समान भूमी ॥ १० ॥
पूजाविधी चुकों नेदावी ॥ भटी बरी निऊं द्यावी ॥
विट हळू उतरावी ॥ टाकूं नये ॥ ११ ॥
पहिले पासून शेवटवरी ॥ अंतःकरण बरें विवरीं ॥
आळस करील तो वैरी ॥ कामा नये ॥ १२ ॥
कामकर्त्यासि गर्में देऊं नये ॥ काम घेतां त्रासूं नवे ॥
कठीण शब्द बोलूं नये ॥ क्षणक्षणा ॥ १३ ॥
दिवस उगवल्यावरी येऊं देऊं नये ॥ गमित माणूस कामा नये ॥
अशक्त पोर कामा नये ॥ आणि ह्यातारे ॥ १४ ॥
बळकट लोक निवडावे ॥ काम पाहूनि लावावे ॥
सगट मुशारे करावे ॥ हें मूर्खपण ॥ १५ ॥
जेवणा पुरते बसों द्यावे ॥ सवेंचि कामास लावावे ॥
दिवस धारे सांभाळावे ॥ क्षणक्षणा ॥ १६ ॥

वेळ गमूंचि नेदावा ॥ खोटा रुका वदलून द्यावा ॥
मुशारा रेउचिने द्यावा ॥ तमक खोटा ॥ १७ ॥
हिशेब बरा राखित जावा ॥ लिहिण्याचा आळस नसावा ॥
मुवदला करीत जावा ॥ उपसामुग्री ॥ १८ ॥
खिळे कुऱ्हाडी पायळ्या ॥ पाहरा संबळ कुदळ्या ॥
सन फावडे लेसरळ्या ॥ तरफा असाव्या ॥ १९ ॥
नाडे सोल काथे दोर ॥ काढवणे कळके ढोलर ॥
उथाळ्या चाळण्या डाळ्या थोर ॥ तक्के बळकट काथवटी२०॥
मांदणे डेरे वागरी ॥ रांझण गाडगीं भारी ॥
पाळी बहुतां परोपरी ॥ दांडे असावे ॥ २१ ॥
धोंडे गुंडे चिपा चिपरे ॥ खरुस चुना वालु कंकरे ॥
पोटे वरवंटे बरे ॥ कामगार असावे ॥ २२ ॥
पोशिंदे असावे सावधान ॥ हुन्नर बंदी तुफान ॥
दोघांचें एक चित्त मन ॥ कामा नये ॥ २३ ॥
तिकट्या सूत्रें वळंबे ॥ काम पाहूनियां मनुष्य झोंबे ॥
तरी मग इमारती खबडंगे ॥ उभे राहति ॥ २४ ॥

(इति कारखाने प्रकरण स्फुट समाप्त ॥)

या प्रमाणें समर्थ उपदेश करून उठतांच राजश्रीनीं विनंति केली कीं, या स्थानीं आपलें येणें कधीं झालें नाहीं म्हणून त्रिरात्र राहून श्री मारुतीची समाराधना करून जाण्याचें करावें आणि कारखाना काढण्याविषयीं आज्ञा जाहली ती मनांत पुरती भरावी

या साठीं आणखी एक वेळ इच्छेनुरूप सांगण्याची कृपा व्हावी समर्थांनीं उत्तम आहे ह्मणून इमारती करण्या विषयींचा पुनः एक समास सांगितला तोः— ॥ स्फुटसमास. ॥

॥ ओव्या ॥

यादी इमारती कारणें ॥ काय काय लागे करणें ॥
श्रोतीं अवधान देणें ॥ ह्मणे वक्ता ॥ १ ॥
द्रव्य पारपत्य खबरदारी ॥ सत्ता सामर्थ्य वेठ बेगारी ॥
गंवडी पाथरवट लोणारी ॥ बेलदार कोळी ॥ २ ॥
लोहार सुतार कुंभार ॥ कामगार लहान थोर ॥
मांग महार चांभार ॥ नाना याती ॥ ३ ॥
घन कुदळी संभळ ॥ कुराळी पारा गुटी गोल ॥
टांक्या हातोडे लोळ ॥ लोह पोलादाचे ॥ ४ ॥
विळे पायळे कुराडी ॥ खुरपी थाप्या धावां येडी ॥
खिळे हलके गांधे गाडी ॥ खोरें सनभपावडीं ॥ ५ ॥
तर्फा दांडे मुंगळ्या नाटा ॥ चोपणी बडवणी धुमसखाटा ॥
चाळण्या पांट्या बंधली साठा ॥ नाना प्रकारींचे ॥ ६ ॥
सर कोडके कळक चिवे ॥ फळ्या चांफ चौफळे व्हावे ॥
चवरंग चवक्या पाट करावे ॥ नानागिलावयाचे ॥ ७ ॥
जाती शिळा वाटणो ॥ चाटु डंगारणी घांटणी ॥
तस्ते पाळी लाटणी ॥ कलक मापे तराजु ॥ ८ ॥
कोळसे भट्या लांकडें ॥ शिरटी फेस झाडें झुडें ॥
नाना इमारतीचे सांकडे ॥ करतां जाणे ॥ ९ ॥

चुना चिरे वाळु कंकरे ॥ पारडचा चिपा लहान थोर ॥
धोंडे गुंडे माती नीर ॥ राँजण डेरे घागरी ॥ १० ॥
मडकीं कुंडाली गाडगे ॥ परळ वेळण्या मांदन मोघे ॥
विटा चुना खरुस लागे ॥ झेल इमारतीशीं ॥ ११ ॥
गुळ कात हिरडे तागा ॥ उडीद नाचण्या डीक यागा ॥
वजन हिशेबें यथासांग ॥ केलें पाहिजे ॥ १२ ॥
तिळ राळे आणि भात ॥ चिकणा माती आरक्त ॥
राख लीद बळग्या मिश्रित ॥ कमाऊन विटा कराव्या ॥१३॥
तिकोन्या चौकोन्या लहान थोर ॥ भाजून भिजवून सुंदर ॥
तिकया वोळंबे धरून सूत्र ॥ इमारती कराव्या ॥ १४ ॥
चौकटचा मेहेरेवा ताकबंदी ॥ विटे बंदी चिरेबंदी ॥
लोहबंदी शिसेबंदी ॥ नीट नेमस्त उभार ॥ १५ ॥
काचबंदी पाच बंदी ॥ नाना रत्नें सुवर्ण बंदी ॥
नाना दर्पणें विचित्र बंदी ॥ नाना चित्र लेख ॥ १६ ॥
तोंड रचाया बळ कुसरी ॥ चित्र विचित्र वोवरी ॥
कमळें पानें परोपरी ॥ एकाहुनिएक ॥ १७ ॥
कलबुद् लादण्या बळकट ॥ जालंधरें झरोके सोनवट ॥
घोट घोटोनी लखलखाट ॥ सुरु सनाबदाचे ॥ १८ ॥
धाबे देउळें शिखरें ॥ उंच गोपूर मनोहरें ॥
वापी पोखरणी सरोवरें ॥ हमामें स्थान कारंजीं ॥ १९ ॥
गठ कोठ महाल मठ्या ॥ गुप्त द्वारें अंतर शिडचा ॥
छत्र्या लादण्याच्या तवकडचा ॥ नाना भुयरी विवरें ॥२०॥

धनधान्य रसखाने ॥ दारुखाने जामदारखाने ॥
नाना अठरा कारखाने ॥ गुमट मशीदी मनोहरे ॥ २१ ॥
चित्रशाळा नाटकशाळा ॥ भोजनशाळा होमशाळा ॥
पाठशाळा धर्मशाळा ॥ नाना इमारती ॥ २२ ॥
वाटे चौथरे वृंदावनें ॥ कुंचे दारवटे भुवनें ॥
नाना प्रकारचीं स्थानें ॥ चांदया पटकोट भडकलो ॥ २३ ॥
धरणें साकु कालवें ॥ नदी तीरीं पंथ बांधावें ॥
दीपमाळा चौक बांधावे ॥ हुडे खानगे भदालसा ॥ २४ ॥
गढ्या गुंफा कपाटें लेणीं ॥ देव दैत्य मानव करणी ॥
समाधी माझारी धरणी ॥ कोणें पाहिली ॥ २५ ॥
॥ इति इमारती प्रकरण स्फुटसमास द्वितीय समाप्त ॥

याप्रमाणें कारखाने प्रकरणीं आज्ञा झाली ती राजश्रीनीं श्रवण करून विनंति केली कीं, स्वामी सर्वज्ञ आहेत याकरितां सर्व मजकूर जाणतच आहां जी आज्ञा झाली त्याप्रमाणें घडणें असेल तें आपले आशीर्वादें करून घडेल; आणि जें करवाल तें करीत आहें असें ह्मणून साष्टांग नमस्कार केला. नंतर समर्थांचो स्नान संध्या होऊन भोजनें झालीं. नंतर तेथें त्रिरात्र राहून श्रीमारुतीची समाराधना करून निरोप घेऊन समर्थ सज्जनगडीं निघून गेले.

एका समयीं समर्थांची स्वारी चांफळीं असतां जांबेहून श्रेष्ठांकडून पत्र घेऊन एक शिष्य समाचाराकरितां मुद्दाम आला; त्यानें समर्थांस साष्टांग नमस्कार करून पत्र दिलें तें श्रेष्ठांचें पत्रः—

॥ ओंव्या ॥

चिरंजीव पदवी पावला ॥ त्यास लोक ह्मणती भला भला ॥
चिरंजीव तो झाला ॥ निश्चळरूप ॥ १ ॥
निर्गुणीं जो अनन्य ॥ तेंचि चिरंजीव पद जाण ॥
निश्चळीं निश्चळपण ॥ त्या नांव चिरंजीव ॥ २ ॥
आत्मनिवेदना जो मान्य ॥ त्यासीं ह्मणावें धन्य ॥
धन्य परते मान्य ॥ आणिक नाहीं ॥ ३ ॥
ऐसा जो तोचि नायक ॥ नायक तोचि चाळक ॥
चाळक तोचि ब्रह्मादिक ॥ निर्माण कर्ता ॥ ४ ॥
ऐसा जो निर्माणाचा निधी ॥ तो जाणा कौसल्येचे अंगणीं ॥
त्यातें स्मरे जो मनीं ॥ तो धन्य जाणा ॥ ५ ॥
तो राम जानकी नाहो ॥ त्याचे चरणीं चित्त राहो ॥
तूं मी पण तेथें जावो ॥ जाण बापा ॥ ६ ॥
गंगातीरीं जो जन्मला ॥ तोचि कृष्णातीरा गेला ॥
तेथें प्रताप प्रगटला ॥ तो धन्य साधु ॥ ७ ॥

यापमाणें श्रेष्ठांचें आलेलें पत्र वाचून पत्ररूप श्रेष्ठांचें दर्शन झालें असें मानून त्या पत्रास साष्टांग नमस्कार केला, आणि सनाथ झालों; ह्मणून मातोश्रीसही साष्टांग नमस्कार घालून जो शिष्य आला होता त्याचे मुखें घराकडील सविस्तर वर्तमान श्रवण करून संतोष पावले; आणि त्याजला पंधरा दिवस जवळ ठेवून घेतलें. नंतर तो जाऊं लागला त्यावेळीं त्यास पत्राचें उत्तर देऊन निरोप दिला तें श्रेष्ठांचें पत्रः—

॥ ओंव्या ॥

सकळ तीर्थांचें सार ॥ सत्य स्वरूप निर्विकार ॥
तुमचें चित्त तदाकार ॥ निरंतर ॥ १ ॥
विमळ ब्रह्म परायण ॥ सगुण भक्ति संरक्षण ॥
विशेष वैराग्य लक्षण ॥ तुमचे ठायीं ॥ २ ॥
मुक्त क्रियेचा अनादरु ॥ स्वधर्म कर्मी अत्यादरु ॥
आग्रह निग्रहाचा विचारु ॥ तोही नसे ॥ ३ ॥
नसे कामनेचा लेश. ॥ जयंत्या पर्वाचा हव्यास ॥
अंतरीं.माने विशेष ॥ हरिकथा निरूपण ॥ ४ ॥
तुमचे देह सार्थकाचे ॥ सर्वदा परोपकाराचे ॥
भगवंतें निर्मिले बहुतांचे ॥ समाधान ॥ ५ ॥
तुमचेनि वाग्विलासें ॥ बहु पाखंड नासे ॥
संशयातीत प्रकाशें ॥ विमळ वस्तु ॥ ६ ॥
सन्मार्गींचा कैपक्षी ॥ अनमार्ग करणें अलक्षी ॥
लोक पावती प्रत्यक्ष ॥ समाधान ॥ ७ ॥
दक्षता आणि चातुर्यता ॥ वित्पन्नता आणि लीनता ॥
उत्तम गुण सर्वज्ञता ॥ तुमचे ठायीं ॥ ८ ॥
तुमचें स्वरूप वर्णवेना ॥ क्षणोनि देहाची वर्णना ॥
युक्त अयुक्त मित्र जना ॥ क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥

यामाणें श्रेष्ठांस पत्र व मातोश्रीस साष्टांग नमस्कार सांगून शिष्यास पाठविला.

एका समयीं राजश्रींची स्वारी समर्थांचे दर्शनास आली असोन पूर्व पद्धती प्रमाणें दर्शन घेऊन विनंति केली कीं, महाराज, वारंवार सेवा घेण्या विषयीं विनंति करीत आहें. परंतु आज्ञा होत नाहीं. तस्मात् राज्य स्वामींचें नव्हे किंवा मी सेवा करण्यास अनधिकारी ह्मणून आज्ञा होत नाहीं. अशा प्रकारें फार नम्रतेनें विनंति करूं लागले. त्या काळीं समर्थांनीं आज्ञा केली कीं, तुह्मीं राज्य आक्रमणाचा जो व्यवहार हल्लीं चालविला आहे यांत म्लेंच्छ निवारण होऊन देव ब्राह्मणांची सेवा होऊन धर्मस्थापना होत आहे. ही सेवा आमची नव्हे कीं काय ? हें कृत्य तुमचे हातून कोण करवीत आहे ? याचा विचार करून नंतर बोलावें हें बोलणें ऐकून महाराज बोलिले कीं, आज्ञा झाली ती खरीच आहे अन्यथा नव्हे, ही सेवा आज्ञेवरूनच करीत आहें परंतु श्रीसांनिध्य सेवा घडावी एतदर्थ आज्ञा झाली पाहिजे समर्थांनीं हें बोलणें ऐकून किंचित् मंदहास्य करून बोलिले कीं, आह्मीं जें मागूं तें द्यालच असा निश्चय असेल तर मागूं. त्या वेळीं राजश्रीनीं दंडमाय नमस्कार करून विनंति केली कीं, हा देह स्वामींचा आहे सर्व ऐश्वर्य राज्यादिक हें स्वामींचेंच आहे असें असून कसोटीस लावण्यासारखें विचारितां पण कसोटीस लावून घेण्यासारखी माझी योग्यता नाहीं; परंतु देह स्वामींचाच हा निश्चय आहे, या करितां कृपा करून सेवा घेतलीच पाहिजे. हें ऐकून समर्थ बोलले कीं:—बापा फार चांगलें आहे. आह्मीं तीन वस्तु मागतों त्या द्याव्या. महाराज ह्मणाले आज्ञा होईल. ती

ग्रहण करण्यास मी तयार आहें. त्याजवरून समर्थांनीं तीन गोष्टी मागून घेतल्या त्याः-

१ तुह्मीं पूर्वापार सांबभक्त त्या योगेंकरून तुह्मांस हें ऐश्वर्य प्राप्त झालें याकरितां आतांही प्रतिवर्षी श्रावणमासीं तुह्मीं आराधना करीत आहांच परंतु या पुढें कोटी पार्थिव लिंगें करवोत जावीं आणि त्याजबद्दल ब्राह्मणभोजनादि करीत जावें. हें एक.

२ तुमचे राज्यांत ब्राह्मणांस नेमणुकी दक्षणा मिळत असते ती दरसाल श्रावणमासीं होत असावी, हें दुसरें.

३ तुमचें राज्य हिंदूचें असतां म्लेंछांचे राज्यासारिखें एकमेकांस जोहार करणें हा धर्म नीट नाहीं; याजकरितां हिंदूनीं एकमेकांस रामराम असें ह्मणावें व कागदोपत्रीं ही एकमेकांस रामराम ह्मणून लिहित जावें. यापुढें कोणीही हिंदूनीं (अंत्यज विरहीत) जोहार ह्मणूंनये हें तिसरें.

या प्रमाणें तीन गोष्टी आह्मांस द्याव्या; व यांचा बंदोबस्त करावा, हें राजश्रीनीं ऐकून आनंदित होत्साते नमस्कार करून विनंति करूं लागले कीं, महाराज आज्ञे प्रमाणें सांगितल्या गोष्टींचा बंदोबस्त करवितों; परंतु या व्यतिरिक्त श्री सान्निध्य सेवा होण्याची आज्ञा झाली पाहिजे. त्यावर समर्थ बोलले कीं, या तीन गोष्टींचा बंदोबस्त झाल्या नंतर जी आज्ञा करणें ती करूं. हें ऐकून उत्तम आहे असें ह्मणून राजश्री समर्थांपाशीं

त्रिरात्र राहून आज्ञा घेऊन गेले. त्यानंतर समर्थांचे आज्ञेप्रमाणें राजश्रीनीं श्रावणमासीं कोटीलिंगें करविलीं व ब्राह्मणांस दक्षणा देण्याचा क्रम चालविला तो असा कीं, दशग्रंथी ब्राह्मणास नक्त रुपये १० व दहामण धान्य; पंचग्रंथी असेल तर रुपये ५ व पांचमण धान्य; या प्रमाणें ब्राह्मणांची परीक्षा घेऊन दक्षणा देऊं लागले. प्रथम रायगडास हा दक्षिणा देण्याचा प्रकार सुरू केला पुढें जसजशी दौलत वाढत चालली तसतशी दक्षिणाही वाढविली तेणेंकरून ब्राह्मणांची विद्या वाढत चालली. आपले पदरचे सरदारलोक वगैरे यांस समजूत देऊन एक मेकांस सर्वत्रांनीं रामराम ह्मणावें व लिहित जावें अशी ताकीद दिली. तेव्हांपासून एकमेकांस रामराम ह्मणणें व लिहिणें सुरू झालें. या प्रमाणें राजश्रीनीं तिन्ही गोष्टींचा बंदोबस्त शके १५७३ खरनाम संवत्सरीं केला. (तो अद्यापि चालत आहे.)

स्वामीस विड्याचा छंद फार यास्तव महाराजांनीं मेढेखोरें येथील जकात विड्याचे खर्चास नेमून दिली. वरकड परळीचे मठाकडे भोजनखर्चास वांई तर्फ वरळी लावून दिली. आणि महाराजांनीं नेहमीं यावें, जावें व कदाचित् परळीसही रहावें, याप्रमाणें क्रम चालविला.

पुढें स्वामीपाशीं कल्याणाप्रमाणेंच एकनिष्ठेनें सेवा करून विडा देणारा अवरंगाबादेकडील राहणारा एक शिष्य होता, तो नेहमीं आज्ञा होईल तेव्हां विडा देण्याची सेवा जपून करीत असतां स्वामींस कांहीं कफाची विकृति जाहली. त्यामुळें नेहमीं

पिकदाणी बाळगिली होती, ती एके दिवशीं थुंकतां थुंकतां थुंकयांनीं भरली सबब त्या शिष्यास समर्थांनीं आज्ञा केली कीं, ही पिकदाणी कोणाचे दृष्टीस न पडे अशा ठिकाणीं रिचवून धुवून आणावी. अशा आज्ञेवरून तो शिष्य पिकदाणी ओतावयास गेला, तों चहूंकडे मनुष्यांच्या संचारामुळें आज्ञे प्रमाणें एकांत स्थळ मिळेना, तेव्हां आपणच त्यांतील प्राशन करून नंतर ती धुवून आणिली. स्वामींनीं विचारिलें कीं, पिकदाणी कोठें टाकिली ? तेव्हां तो बोलला कीं, स्वामी ! निर्वेध जागा कोठेंच मिळाली नाहीं, ह्मणून मीच प्राशन करून ती धुवून आणिली. असें बोलतांच स्वामी रागें भरले, आणि बोलले कीं, मूर्खा ! इतःपर असें करूं नये ह्मणून आज्ञा करून त्या दिवसापासून त्याचें नांव " भोळाराम " असें ठेविलें.

पुढें समर्थांस कफाची व्यथा दिवसेंदिवस अधिक होऊन प्रकृती फार बिघडत चालली तेव्हां समर्थांनीं भीमरूपी ध्यानपर श्रीमारुतीची स्तुति केली ती प्रार्थनाः—

॥ श्लोक ॥

फणिवर उठवीला, वेग अद्भूत केला ॥ त्रिभुवन जन लोकीं, कीर्तिचा घोष केला ॥ रघुपति उपकारें, दाटले थोर भारें ॥ परम धिर उदारें, रक्षिलें सौख्य कारें ॥ १ ॥ सबळ दळ मिळालें, युद्ध ऊदंड झालें ॥ कपिकटक नि-

मालें, पाहतां यश गेलें ॥ परदळ शरघातें, कोटिच्या कोटि
प्रेतें ॥ अभिनव रणपातें, दुःख बीभीषणातें ॥ २ ॥
कपि रिस घनदाटी, जाहली थोर दाटी ॥ क्षणवुनि
जगजेठी, धांवणें चार कोटी ॥ मृतविर उठवीले, मोकळे सिद्ध
झाले ॥ सकळ जन निवाले, धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥
बहुप्रिय रघुनाथा, मुख्य तूं प्राणदाता ॥ उठविं मज अनाथा,
दूर सारूनि व्यथा ॥ झडकरि भिमराया, तूं करीं दृढ काया॥
रघुवरि भजनाया, लाग वेगेंचि जाया ॥ ४ ॥
तुजविण मजलागीं, पाहतां कोण आहे ॥ क्षणवुनि मन
माझें, तूझिरे वाट पाहे ॥ मज तुज निरवीलें, पाहिजे आठ
वीलें सकळिक निजदासा, लागिं सांभाळवीलें ॥ ५ ॥
उचित हित करावें, उद्धरावें धरावें ॥ अनुचित न
करावें, त्वां जनीं यश घ्यावें ॥ अघटित घडवावें, सेवका
सोडवावें ॥ हरिभजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥
प्रभुवर विररया, जाहली वज्र काया ॥ परदळ नवटाया,
दैत्य कूळें कुडाया ॥ गिरिवर तुडवाया, रम्य वेश न
ठाया ॥ तुजचि अलगडाया, ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥
बहुत सबळ सांठा, मागतो अल्प वांटा ॥ नकरित हित
कांटा, थोर होईल ताठा ॥ कृपणपण नसावें, भव्य लोकीं
दिसावें ॥ अनुदिन करुणेचें, चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥
जलधर करुणेचा, अंतरामाजि राहो ॥ तरि तुज करुणाहे,

कां नये सांग पाहो ॥ कठिण हृदय झालें, काय कारुण्य केलें ॥ नपवसि मजकारे, म्यां तुझें काय नेलें ॥ ९ ॥
वडिलपण करावें, सेवकां सांवरावें ॥ अनहित न करावें तूर्त हातीं धरावें ॥ निपटचि हटवादें, प्रार्थिला शब्द भेदें ॥ कपि घन करुणचा, वोळला राम तेथें ॥ १० ॥
बहुतचि करुणाही लोटली देवराया ॥ सहजचि कफ गेलें, जाहली दृढ काया ॥ परमसुखविलासे, सर्वदा दासनुसे॥ पवनज तनुतोषें, वंदिला सावकाशें ॥ ११ ॥

या प्रमाणें श्रीमारुतीची स्तुति करितांच कफाची व्यथा तात्काळ नाहींशी झाली; आणि पहिल्यानें जसा विडा खात असत तसाच खाऊं लागले. ह्मणून भोळाराम यांस पूर्वीप्रमाणें नित्य विडा देत जावा, अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें स्वामीस नित्य विडा देत असतां दंत कांहींसे दुखूं लागले, ह्मणून खलबत्त्यांत कुटून देत जावा; अशी आज्ञा जाहली त्या प्रमाणें तो देत असे.

एके दिवशीं इतर शिष्यमंडळीचे मनांत "भोळारामाजवळच स्वामी नेहमीं विडा मागतात, आह्मांजवळ कां मागत नाहींत" असें वैषम्य येऊन त्याणीं विडा कुटण्याचा खलबत्ता लपवून ठेविला. याच संधींत समर्थांनीं जलदीनें विडा मागितला. तेव्हां भोळाराम येऊन पाहतो तों खलबत्ता ठिकाणीं नाहीं; विडा तर जलदीनें तयार करून दिला पाहिजे, यास्तव मुखप्रक्षालन करून विडा चावला आणि तो विडा पानावर ठेवून पुनः चूळ भरून टाकून स्वामींस नेऊन दिला. स्वामींनी तो विडा घेऊन भक्षिला, आणि बोलिले कीं,

भोळाराम ! आजचा विडा बहुत गोड लागतो, तरि असाच विडा नित्य तयार करून देत जावा, ह्मणून आज्ञा केली. त्याप्रमाणें भोळाराम नित्य विडा चावून तयार करून देत होता. हें सर्व शिष्यांनीं पाहून मनांत विचार केला कीं, हें ठीक होत नाहीं तर स्वामींस कळविलें पाहिजे, परंतु हा विडा चावून देतो असें स्वामीपुढें बोलण्याची शक्ति कोणाचीही होईना. तेव्हां सर्वांनीं विचार केला कीं, शिवाजी महाराजांची स्वामीजवळ अति लगट आहे. यास्तव त्यांजवळ सांगितलें असतां ते स्वामीजवळ सांगतील, असा निश्चय करून वाट पाहत आहेत, तों शिवाजी महाराज स्वामिदर्शनाकरितां नेमाप्रमाणें गुरुवारीं किल्ल्यावर आले. तेव्हां अका, वेणुबाई, कल्याण, उद्धव आणि भिकाजी गोसांवी यां व्यतिरिक्त सर्व शिष्य मंडळींनीं महाराजांस दरवाजांत गांठून सांगितलें कीं, महाराज भोळाराम नित्य स्वामींस विडा चावून देतो, हें स्वामीपुढें आमच्यानें बोलवत नाहीं, आणि स्वामींस उच्छिष्ट द्यावें हें तर ठीक नाहीं. त्यास आपण येविषयीं समर्थांस निवेदन करावें. तेव्हां शिवाजी महाराज उत्तम आहे असें बोलून दर्शनास गेले, आणि पूर्व पद्धती प्रमाणें नमस्कारादि करून हात जोडून उभे राहिले. नंतर समर्थांची आज्ञा होऊन समीप बसत आहेत, तों स्वामींनीं भोळारामास विडयाकरितां हांक मारिली, तों भोळाराम जवळ नाहीं, तेव्हां राजश्री बोलले कीं, मी विडा देतों. स्वामी बोलिले कीं, भोळारामच पाहिजे, तो विडा देईल, तुह्मीं

स्वतां जाऊन भोळाराम याजपासून विडा कुटलेल्या खलबत्त्यासहं घेऊन यावें.

असें सांगितल्यावरून महाराजांनीं जाऊन स्वामीनीं खलबत्त्यासुद्धां विडा तयार करून मागितला आहे. याप्रमाणें भोळारामास सांगितलें. तेव्हां भोळाराम बोलला कीं, अहो खलबत्त्यासुद्धां मागतात ! देऊंच कीं काय ? असें पुनः स्वामींस विचारून यावें. त्याजवरून महाराज स्वामींकडे गेले, आणि प्रार्थना केली कीं, भोळारामानें खलबत्त्यासुद्धां विडा देऊं कीं काय ? असें पुनः विचारावयास सांगितलें आहे, यास्तव आज्ञा कशी ती व्हावी. तेव्हां स्वामी बोलले कीं, खळबत्त्यासहितच विडा आणावा. अशी आज्ञा होतांच पुनः भोळारामाजवळ येऊन महाराजांनीं सांगितलें कीं, खलबत्त्यासुद्धांच विडा लवकर आणावयाची आज्ञा जाहली. असें ह्मणतांच भोळारामानें महाराजांदेखतांच पूर्व पद्धतीप्रमाणें विडा तयार करून आपुल्या मुखें चाविला, आणि उजवे हातीं सुरी घेऊन डावे हातीं शेंडी धरली आणि उजवे हातानें आपली मान डावा हात मस्तकासह महाराजांपुढें केला. तें पाहून महाराज चळचळां कांपूं लागले. त्यासमयीं कंठनाळांतून ध्वनी निघाला कीं, आपण भिऊं नये, खलबत्ता हातीं घेऊन स्वामींस नेऊन द्यावा. हा शब्द ऐकून शिवाजीनीं परम आश्चर्य करून हातांत रुमालावर शीर घेतलें, आणि मनीं परम भयभीत होऊन विचार केला कीं, मी या खलबत्त्याचे प्रकरणांत कां शिरलों. आतां हें शिर न न्यावें तरी आज्ञा भंग होतो, यास्तव म्लान वदनें करून स्वामींपाशीं

आले, तों स्वामींनीं राजश्रींचें ध्यान पाहून बोलले कीं, शिवबा ! तूं घाबरा कां जाहलास ? जलदीनें खलबत्त्यासह विडा आण असें म्हणतांच राजश्रीनीं स्वामीसन्निध येऊन हस्त पुढें केला, तों दांत विडा चावीत आहेत हें पाहून स्वामींनीं त्या मस्तकाची डावे हातीं शेंडी धरून तोंडाजवळ हात पसरला, त्या बरोबर तोंडांतून विडा हातांत पडला. तो अत्यंत प्रेमानें स्वामींनीं मुखांत. घातला आणि महाराजांचे हातीं पुनः शिरकमळ देऊन आज्ञा केली कीं, शिवबा ! हें शिरकमळ होतें त्या ठिकाणीं पुनः सरळ ठेऊन यावें.

अशी समर्थांची आज्ञा होतांच महाराजांनीं जाऊन भोळारामाच्या धडावर शिरकमळ ठेविलें. तों कांहींसा हात वांकडा चळला, त्यामुळें थोडें वांकडें बसलें. तेव्हां भोळाराम सावध होऊन बोलला कीं, मस्तक थोडेंसें वांकडें बसलें, असो श्रींची इच्छा, असें बोलून रक्त गळत होतें, तें भिंतीस जसा चिखल सारवावा याप्रमाणें बोटानें लिंपून धुवून टाकिलें. हें महाराजांनीं पाहून परम आश्चर्य मानून मुकाट्यानें स्वामीकडे येऊन नमस्कार करून उगेच बसले. तेव्हां स्वामी बोलले कीं, शिवबा ! आमचा खलबत्ता होता तो तसाच ठेवून आलास कीं ? असा प्रश्न ऐकून आज्ञेप्रमाणें ठेवून आलों. म्हणून महाराजांनीं सांगितल्यानंतर पुनः समर्थ म्हणतात कीं, शिवबा ! तुह्मांस सर्व मंडळीनें सांगितलें, त्याप्रमाणें तुह्मी बोलणार होतां, परंतु आतां बोला; या खलबत्त्यांतील विडा खावा किंवा नाहीं ? तुमची भीड मोठी

आहे, जसें सांगाल तसें करूं. असें ह्मणतांच राजश्रींनीं दंडवत् नमस्कार करून आह्मी सर्वस्वीं अपराधी आहों, सर्व मंडळीवर कृपा करणार स्वामीमहाराज समर्थ आहां. असें ह्मटल्यावरून स्वामीनीं हास्य करून वा राजा ! तूं भिऊं नको. असें ह्मणून जवळ घेऊन मस्तकावर हस्त ठेविला, आणि राजाचें समाधान केलें. नंतर राजश्री तेथें त्रिरात्र राहून स्वामींची आज्ञा घेऊन स्वस्थानीं गेले.

कोणे एके समयीं राजश्रींची स्वारी किल्ला सातारा; येथें आली. तेथें, स्वामी जरंड्यावर आहेत, असें ऐकिलें. नंतर महाराज स्वतां जरंड्यावर जाऊन, समर्थांस साताऱ्यास घेऊन आले, आणि राजवाड्यानजीक गणपतीजवळच्या धर्मशाळेंत समर्थांस राहण्यास जागा दिली. तेथें समर्थ आनंदेंकरून राहिले. हें वर्तमान ऐकून रंगनाथ स्वामी निगडीहून समर्थांचें दर्शनाकरितां साताऱ्यास आले. आणि राजमार्गानें स्वामींकडे जात असतां शिवाजीमहाराज माडीवर बसले होते त्यांनीं जामानिम्यासुद्धां पंच हत्यारें बांधून रंगनाथ स्वामी घोड्यावर बसले आहेत, आणि बरोबर लंगोटबंद पांचपंचवीस मंडळी चालत आहे; अशी स्वारी पाहून महाराज बोलले, कीं, यांस शिपाई ह्मणावें तर बरोबर लंगोटबंद मंडळी आहे, व गोसांवी ह्मणावें तर पोषाख शिपायाचा आहे, हें काय; असें आश्चर्य करून हे कोण; व कोठून आले; येविषयीं चौकशी करावी, ह्मणून चोपदारास आज्ञा केली

त्या प्रमाणें चोपदार जाऊन चौकशी करून आला, आणि त्यानें विनंति केली, कीं, हे निगडीकर रंगनाथस्वामी आहेत. असें ऐकून परम आश्चर्य मानून कोणाशीं न बोलतां खासनिसास आज्ञा केली, कीं, रंगनाथस्वामी आले आहेत, त्यांजकडे जाऊन श्रीसमर्थांची स्वारी येथेंच आहे, त्यांचे पंक्तीस आपण भोजनास यावें. अशी विनंति करून त्यांचा बंदोबस्त चांगल्या रीतीनें ठेवावा. अशी आज्ञा होतांच खासनिसानें रंगनाथस्वामीपाशीं जाऊन विनंति केली, त्याप्रमणें त्यांनींही मान्य केलें. नंतर खासनिसानें महाराजांपाशीं येऊन सांगितलें कीं, रंगनाथ स्वामींनीं आपण सांगितलेलें मान्य करून दिलालपुरीं महादेवाचे देवालयांत राहिले आहेत आणि सर्व मंडळीस स्नान संध्यादि करण्यास आज्ञा करून आपणही स्नान करून पूजेस बसले आहेत.

इकडे समर्थांचा प्रतिदिवशीं माहुलीस जाऊन संगमीं स्नान करावें, आणि संध्यादि कर्में करून साताऱ्यास आल्या नंतर शिवाजी सहवर्तमान मंडळी सुद्धां भोजन करावें, असा नियम असतां ते दिवशीं समर्थ माहुलीस जाऊन संध्या करीत असतां रंगोबा गोसांवी साताऱ्यास आले. त्यांचा वेष वगैरे पाहून शिवाजीचे अंतःकरणांत अश्रद्धा होऊन किंचित् अनादरासारखें जाहलें. हें, समर्थांनीं अंतर्दृष्टीनें जाणून रंगोबाचें सामर्थ्य शिवाजीस दाखविलें पाहिजे, असें चित्तांत आणून ब्रह्मयज्ञ समाप्त करून त्वरेनें साताऱ्यास आले, आणि भोजनास पात्रें मांडावीं ह्मणून त्वरा करूं लागले. हें वर्तमान शिवाजीस कळतांच त्यांनीं स्वतः

येऊन निळोपंत यांस आज्ञा केली कीं, रंगनाथस्वामी भोजनास येणार आहेत, त्यांची स्नानसंध्या जाहली असोन पूजा समाप्त होई तोंपर्यंत अवकाश करण्याविषयीं कृपा करावी. अशी स्वामींजवळ प्रार्थना करावी. अशी आज्ञा होतांच निळोपंतांनीं जाऊन शिवाजीनें सांगितल्याप्रमाणें समर्थांजवळ विनंति करितांच समर्थांनीं अरे ! रंगोबा आला कीं काय ? असें आश्चर्य करून भाषण केलें कीं, तो रंगोबा भ्रष्ट आहे, यास्तव त्याचे पंक्तीस आम्ही भोजन करीत नाहीं. तर त्यास निरोप पाठवावा कीं, तुम्ही भ्रष्ट अपांक्त आहां, याकरितां भोजनास येऊं नये. असें समर्थांचें भाषण ऐकून हा निरोप कसा सांगावा येविषयीं शिवाजी महाराज विचारांत पडून तटस्थ उभे राहिले. तेव्हां समर्थ स्वतः ह्मणाले कीं, राजा याविषयीं विचार किमर्थ पाहिजे, असें ह्मणून एका कारकुनास हांक मारून सांगितलें कीं, तुम्ही जाऊन रंगोबास सांगावें कीं, तुम्ही अपांक्त आहां, भोजनास येऊं नये. अशी आज्ञा होतांच कारकुनानें रंगनाथ स्वामीकडेसच जाऊन साष्टांग नमस्कार करून बसला, तों सर्व मंडळी भोजनाचें बोलावणें आलें, ह्मणून मोठ्या लगबगीनें आटपाआटप करूं लागली. तेव्हां कारकुनानें रंगनाथ स्वामींस विनंति केली कीं, समर्थांचे आज्ञेवरून मजला कांहीं बोलावयाचें आहे. तेव्हां स्वामींनींही बोल, ह्मणून सांगितलें असतां कारकुनाच्यानें बोलवेना तें पाहून रंगनाथस्वामी हांसून बोलले कीं, बोलण्यास अनुमान कां करितोस ? समर्थांनीं काय सां-

गितलें असेल तें निःशंक सांगावें. हें ऐकून कारकून बोलला कीं, महाराज आपण अंतरसाक्ष आहांत, आपणास सर्व ठाऊकच आहे; माझ्याच्यानें बोलवत नाहीं. तेव्हां रंगनाथ स्वामी ह्मणाले कीं, " तुह्मीं भ्रष्ट अपांक्त आहां, यास्तव भोजनास येऊं नये " असा समर्थांचा निरोप आहे कीं काय ? असें पुसतांच कारकुनानें होय, हाच निरोप, असें सांगितलें. त्याप्रमाणें रंगनाथ स्वामींनीं अंगिकार करून समर्थांची आज्ञा प्रमाण असें ह्मणून कारकुनास आज्ञा दिली.

नंतर रंगनाथ स्वामींनीं आपले मंडळीस आज्ञा केली कीं, आतां आपलें भोजनाचें साहित्य पहावें. तेव्हां मंडळीनीं प्रार्थना केली कीं, या उभ्या दोन प्रहरच्या समयीं कोठें साहित्य पहावें ? तेव्हां रंगनाथांनीं सांगितलें कीं रस्त्यांत जाऊन जें कांहीं सांपडेल तें घेऊन यावें, आणि पाक सिद्ध करावा. अशी आज्ञा होतांच एका शिष्यानें बाहेर जाऊन पाहिलें, तों देवीचा एक रेडा त्या देवालयाचे भिंतीस धडका देत होता, तो मात्र पाहिला आणि परत येऊन स्वामींस सांगितलें कीं, महाराज ! रस्त्यांत एक रेडा मात्र उभा आहे; दुसरें कांहींएक नाहीं. तेव्हां त्यांनीं त्यास सांगितलें कीं, तोच धरून आण. अशी आज्ञा होतांच त्यानें बाहेर जाऊन तो रेडा आणिला. त्यास पाहून रंगनाथांनीं सांगितलें, कीं, याला मारून मांस काढावें आणि पाक करावा. परंतु त्यास मारण्याचें कोणाचें धैर्य होईना, तेव्हां स्वतां उठून हातांत तेगा घेऊन रेड्याची मान उडविली. हा प्रकार त्या कारकुनानें

समक्ष पाहतांच तेथून उठून धर्मशाळेंत आला; आणि शिवाजी महाराजांस सांगितलें कीं, समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें रंगनाथस्वामी भ्रष्ट आहेत खरे, हें मी प्रत्यक्ष पाहिलें. तें सांग म्हणून आज्ञा होईल तरी माझ्यानें सांगवत नाहीं. असें दोघांचें भाषण होत आहे तों, शिवबा? काय गडबड आहे. असें समर्थांनीं विचारितांच शिवाजीनीं सांगितलें की, रंगोबा भ्रष्ट आहेत म्हणून हा कारकून सांगतो; त्याचें कारण विचारिलें असतां माझ्यानें सांगवत नाहीं, असें म्हणतो.

नंतर समर्थांनीं त्या कारकुनास पुढें बोलावून अरे रंगोबानें रेडा कापला कीं काय? असा प्रश्न करितांच त्यानें होय महाराज म्हणून सांगितलें. नंतर समर्थ म्हणाले कीं, शिवबा ? तूं विचार न करितां रंगोबास भोजनास सांगितलेंस. अशाबरोबर कसें जेवावें बरें? असें म्हणतांच शिवाजीनें उत्तर केलें कीं, महाराज मला काय ठाऊक, मी तर आपले आवडते साधू असें समजून भोजनास बोलाविलें. हें ऐकून समर्थ बोलले, कीं, आतां पात्रें वाढून तुम्हीं मंडळी सुद्धां भोजन करावें; आम्ही तर त्या भ्रष्टाचे समाचाराकरितां जातों. असें म्हणतांच शिवाजी बोलले, कीं, मंडळीस भोजनाची आज्ञा द्यावी. मी तर आपलें भोजन झाल्याशिवाय भोजन करणार नाहीं. यास्तव आपले समागमें येतों. तेव्हां समर्थ बरें आहे, असें म्हणून शिवाजीसहवर्तमान तेथून रंगनाथस्वामीकडे येण्यास निघाले.

इकडे रंगनाथस्वामी रेड्याचें मांस काढून शिजविलेलीं ४ मडकीं नैवेद्याकरितां आणा, ह्मणून शिष्यांस आज्ञा करित आहेत; त्या संधींत समर्थ शिवाजीसहवर्तमान दहापांच मंडळीनिशीं त्याठिकाणीं आले, आणि कवाड उघडा ह्मणून हाक मारिली, तेव्हां समर्थांचा शब्द ऐकतांच शिष्यांनीं कवाड उघडलें, नंतर समर्थ आंत येतांच रंगनाथांनीं साष्टांग नमस्कार करून बसावयास आसन दिलें. त्यावर बसून अंगणांत पाहतात, तों रेड्याचीं हाडें वगैरे तशींच पडलेलीं पाहून स्वामी ह्मणाले कीं, रंगोबा लोक तर भ्रष्ट होतात, परंतु तुझ्यासारखा भ्रष्ट रेडा खाणारा आह्मीं कोणी पाहिला नाहीं. तेव्हां रंगनाथ बोलले कीं, महाराज! मी कसाही भ्रष्ट असलों तरी आपला ह्मणवितों; माझी लाज आपल्यावांचून कोण राखील. असें रंगोबाचें भाषण श्रवण करून समर्थ शिवाजीस ह्मणाले कीं, कां शिवबा ! रंगोबा काय ह्मणतो पाहा ! प्रत्यक्ष रेडा कापून मोठमोठ्या गोष्टी सांगतो. तेव्हां शिवाजी बोलले कीं, महाराज मला कांहींएक कळत नाहीं, यांतील भाव आपणांसच ठाऊक असेल.

अशीं भाषणें होत आहेत तों, रंगनाथ स्वामींनीं नैवेद्य लवकर आणा, अशी शिष्यांस आज्ञा करितांच त्यांनीं चारी मडकीं आणून पुढें ठेविलीं. नंतर रंगोबानें नैवेद्य समर्पण करून पात्रें मांडावयास सांगितलीं. इतक्यांत समर्थ बोलले कीं, रंगोबा ! तूं भ्रष्ट तर खरा, परंतु आह्मांस पंक्तीस घेतोस काय ? असे ह्मणतांच रंगनाथ बोलले कीं, आपणासारखा अतिथी प्राप्त झाला

असतां नाहीं असें कोण अभागी ह्मणेल ? मर्जी असल्यास पान मांडतों. तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, हा रेडा मेलेला तसाच टाकून कसें जेवावें ? तर हा रेडा उठवून बाहेर लावून दे. नंतर भोजन करूं, या प्रमाणें समर्थांची आज्ञा होतांच रंगनाथ स्वामींनीं समर्थांचे पूजेस प्रारंभ केला आणि तीर्थ घेतलें. त्यावेळीं समर्थ बोलले कीं, आज तूं भक्ति काय मांडली आहेस ? रंगोबांनीं विनंति केली कीं, महाराज मी आपला भक्त पूर्वीचाच आहें; परंतु आज रेडा मारल्याचा मजवर आरोप आला आहे, याकरितां प्रायश्चित्त घेतों. त्या काळीं स्वामीनीं व रंगोबानीं परस्पर आनंदित होऊन हास्य केलें.

नंतर शिवाजी महाराजांस समर्थांनीं विचारिलें कीं, शिऊबा, रंगोबा काय ह्मणतो. राजश्री ह्मणाले, महाराज ! मी समजलों. काँहीं तरीं मजकडून अंतर पडलें असेल ह्मणून हें कौतुक होत आहे, परंतु मजकडून अंतर झाल्याचें मजला स्मरत नाहीं. समर्थ ह्मणाले बापा, जर तुला, समजतें तर इतकी खटपट कशास पडली असती ? राजश्रीनीं विनंति केली कीं, कृपा करणार समर्थ आहेत, मी पदोपदीं अन्यायी आहें. समर्थ ह्मणाले बापा, तुला कोणींही दोष लावूं नये व तुझे आंगीं दोषाचें वारें नसावें एतदर्थ इतका प्रयत्न करणें भाग पडलें. राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज ! मी अपराध कोणता केला ? समर्थ ह्मणाले ज्या काळीं रंगोबा आला, त्या वेळेस त्याचा वेष पाहून तुझे मनांत याचे

साधुत्वाविषयीं जो संशय आला तो तुला ठाऊक नाहीं काय ? तो दूर करण्याकरितां हा चमत्कार दाखवून रंगोबाचें स्वरूप तुजला प्रत्यक्ष दाखविलें.

त्या वेळीं राजश्रींस स्मरण होऊन बोलले कीं, मी अपराधी खरा; आपले साधूचें स्वरूप ओळखण्याविषयींची योग्यता मला कोठून असणार? परंतु कृपा करणार समर्थ आहेत. त्या काळीं स्वामींनीं सांगितलें कीं अतःपर साधूची हेळणा स्वप्नांतही करूं नको. साधू कोणत्या वेषानें व रीतीनें वागतात त्याचा तुला अंत लागणार नाहीं. साधु हीं अक्षरें श्रवणीं पडतांच पायांवर मस्तक ठेवीत जावें. त्यांचे आचरणावर दृष्टि देऊं नये. आज्ञा प्रमाण मानून राजश्रीनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभे राहिले.

नंतर समर्थांनीं रंगनाथ स्वामीस सांगितलें कीं, रेडा उठवून लाऊन दे. मग आज्ञा म्हणून रंगनाथस्वामी रेड्याजवळ आले, आणि त्याचीं अस्थिचर्म वगैरे एकत्र करून ऊठरे बापा ! असें म्हणून स्वामीचें चरणतीर्थ ठेविलें होतें तें हातांत घेऊन त्या अस्थिचर्मावर सिंचन केलें त्याबरोबर तो रेडा उठून बाहेर गेला आणि पूर्ववत् भिंतीस धडका मारूं लागला.

इकडे भोजनास पात्रें मांडलीं. तेव्हां समर्थ शिवाजीस बोलले कीं, आह्मीं या रंगोबाबरोबर भोजन करून भ्रष्ट होणार, तुझी मर्जी असल्यास आह्मा बरोबर भोजनास यावें, परंतु आह्मासारखें भ्रष्ट व्हावें लागेल, याचा मात्र विचार करावा. हें ऐकून म-

हाराज ! आपण भ्रष्ट किंवा रंगोबा भ्रष्ट हें मला कांहींच कळत नाहीं. या दाखविलेल्या चमत्कारार्चे रहस्य काय तें कृपा करून सांगावें. अशी शिवाजीनें प्रार्थना केल्यावर बरें आहे, पुढें सांगूं, असें समर्थांनीं सांगून भोजनास पात्रें मांडविलीं. नंतर रंगनाथाचे शिष्यमंडळींनीं वाढावयाकरितां मडकीं उघडून पाहतात तों दिव्य अन्नें पाहिलीं. तीं नेऊन त्यांनीं सर्व पात्रें वाढिलीं. अनंतर समर्थ, रंगनाथ व शिवाजी आदिकरून सर्व मंडळीचीं यथेच्छ भोजनें होऊन तांबूल भक्षण करीत बसले आहेत; ते समयीं रंगनाथ स्वामीनीं समर्थांवर कटिबंध केला तोः—

॥ कटिबंध ॥

रामदास चतुराक्षर मंत्र जप वारंवार ॥ दुस्तरतर भवसागर तारक सच्चित्सुखसार ॥ धृ० ॥ रामदास द्वय अभिन्न नामें गोडी शर्करा ॥ राहाटें परिमळ भुवनीं हातीं घेतां कर्पूरा ॥ राजस वर्तुळस्था त्या जिवनकी गारा ॥ राजाधिराज अवतरला या जगदोद्धारा ॥ १ ॥

मनुष्यरूपें विलसे परि हा परिपूर्ण काम॥ मकराकृति कुंडलें पाहतां स्वतः सिद्ध हेम ॥ मंडण संत सभेचें साधु जनासिं विश्राम ॥ मस्तक मणि हा शत कोटींचा निज विज श्रीराम ॥ २ ॥

दास तो उदास सउनि परमामृत कंदा ॥ दाता स्वात्मसुखाचा निरसुनी विषयाचा धंदा दानव षट्कुळ ॥

वैरी मर्दुनि तारक मतिमंदा ॥ दारा द्रव्य त्यजुनि सद्गुरु सद्भावें वंदा ॥ ३ ॥
सद्गुरुराज विराजित सज्जन गिरि वास ॥ सर्वस्वेंचो शरण रिघावें धरूनि कास ॥ सत्य सनातन श्रीगुरु समर्थ मुनि मानस हंस ॥ सहजपूर्ण निजरंगि रंगला तारक विश्वास ॥ ४ ॥

याप्रमाणें कटिबंध केला. नंतर सभा विसर्जन करून रंगनाथ स्वामींसह समर्थ बिन्हाडीं आले. नंतर महाराजांस कारभाऱ्यांनीं विनंति केली कीं, हें चरित्र काय झालें. राजश्रींनीं उत्तर दिलें कीं, प्रत्यक्ष रेडा मारून मडक्यांत मांस शिजविलें, असून ज्या वेळीं नैवेद्य दाखविला त्यावेळीं तें अति सुंदर दिव्यान्न झालें, व शेवटीं रेडाही उठवून लावून दिला. इतकें करण्याचें कारण माझे मनांत रंगनाथ स्वामीविषयीं संशय आला तो जावा हेंच. पूर्वी समर्थांनीं कडच्यांत जेऊं घातलें; तुकाराम महाराजांनींही जेऊं घातलें. त्याप्रमाणेंच हल्लीं हाही एक चमत्कार रंगनाथ स्वामींचे सामर्थ्याविषयीं दाखविला. साधूंचा अंत पाहण्याची योग्यता कोणाची नाहीं ह्मणून सविस्तर वर्तमान कारभाऱ्यांस राजश्रींनीं सांगितलें. त्यावरून कारभारीही आपले ठिकाणीं परमाश्चर्य करून साधु हे थोर. काय करितील व काय न करितील हें त्यांचें तेच जाणोत, असें ह्मणाले. समर्थ साताऱ्यास होते तों पर्यंत रंगनाथस्वामीही राहिले होते. कांहीं दिवसांनंतर समर्थ परळीस गेले, रंगनाथ स्वामी निगडीस गेले व महाराजांची स्वारीही रायगडीं जाती जाहली.

कोणे एके समयीं स्वामी परळीस असतां शिवाजी दर्शनास आले, आणि स्वामींस प्रार्थना केली कीं, मजपासून कांहीं तरी सेवा घडावी; अशी आज्ञा व्हाही. या प्रमाणें वारंवार विनंति केल्यावरून स्वामींनीं आह्मांस उपाधीचें कारण नाहीं, तूं राज्यकारभार चालवून प्रजापालन करितोस, हीच आमची सेवा आहे. असें वारंवार सांगितलें असतांही पुनः पुनः राजाचा अति आग्रह पाहून जिकडे त्याचें राज्य नाहीं तिकडील गांवांचीं नांवें घेऊन सनद करून द्यावी ह्मणून आज्ञा केली. तेव्हां शिवाजीनीं विनंति केली कीं, महाराज ! तिकडे आपलें राज्य नाहीं सबब तिकडील सनदापत्रें कशीं करून देऊं. तेव्हां समर्थ बोलले कीं, तुला या विचाराचें कारण काय? आह्मीं सांगितल्याप्रमाणें सनदापत्रें करून देणें. असें ह्मटल्यावरून शिवाजीनें पत्रें लिहून पुढें ठेविलीं. तीं पत्रें समर्थांनीं घेऊन शिष्यांचे स्वाधीन करून त्या त्या गांवांस जावें, ह्मणून आज्ञा केली, त्याप्रमाणें तेथें तेथें जाऊन शिष्य राहिले. पुढें ज्या ज्या गांवीं शिष्य जाऊन राहिले, त्या त्या गांवांपर्यंत शिवाजी महाराजांचें राज्य होऊन त्याणें त्या त्या संस्थानाचा बंदोबस्त करून दिला. तो असा कीं, भोळाराम यास करंज प्रांतीं वराड येथें मठ बांधून पत्र करून देऊन ठेविला. मुसळराम यास बेदर प्रांतीं पाठविलें. जयराम गोसांवी यास बालेघांटीं निलंगें येथें पाठविलें. त्रिंबक गोसांवीं यास भानगांव नजीक औरंगाबाद येथें पाठविलें. देवीदास गोसांवी यास देगांवीं पाठविलें. याप्रमाणें बाहात्तर महंत शिष्यांस पत्रें करून देऊन काशी-

पासून रामेश्वरापर्यंत व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत शिष्य पाठवून मठ करून देते जाहले.

नंतर कोणे एके समयीं परळीस जाण्याकरितां दहावीस शिष्य बरोबर घेऊन समर्थ निघाले, ते पाडळीचे रानांतून जात आहेत; तों दोनप्रहरचा समय झाला. परळीतर लांब राहिली. याजकरितां येथेंच स्नानसंध्या व्हावी म्हणून शिष्यमंडळीनें प्रार्थना केली; त्यावरून बरें म्हणून आम्ही आंबराईंत राहतों, तुम्ही गांवांतून भिक्षा मागून पीठ आणावें, असें म्हणून दहा पांच शिष्य गांवांत पाठवून आपण कल्याण व उद्धव यां सहवर्तमान आंबराईंत बसले. इकडे शिष्यमंडळी गांवांत भिक्षेस निघाली. तों चावडीजवळ महाडुष्ट कमाविसदार बसला होता, त्यानें विचारिलें कीं, हे गांवांत कोण जात आहेत ? तेव्हां गांवकरी यांणीं सांगितलें. कीं, हे रामदास स्वामींचे शिष्य गांवांत भिक्षेस जात आहेत. हें कमाविसदारानें ऐकून गोसांवी यांणीं भीक मागून शरीर पुष्ट करावें, आणि लंगोटी घालून फिरावें, यांत माहात्म्य काय ? असें बोलून शिपाई पाठवून सर्व गोसांवी धरून आणविले. आणि तुम्ही कोणाचे कोण, व गावांत कां आलांत, असें त्यांस विचारिलें. त्यावरून त्याणीं सांगितलें कीं, आम्ही समर्थांचे शिष्य, भिक्षेकरितां आलों आहों. असें म्हणतांच त्यांच्या झोळ्या व कुबडचा शिपायांचे हातें हिरून घेतल्या. हे स्वामी बहुत समर्थ आहेत, तुम्ही या छंदांत पडूंनये. तशांत शाहुमहाराजांचे गुरु आहेत. असें गांवकरी

यांणीं कमाविसदारास बहुतप्रकारें सांगितलें, परंतु तें न ऐकतां त्याणें गोसांवीयांस घालवून दिलें. तेव्हां शिष्यमंडळी तशीच परत येऊन त्यांणीं स्वामीजवळ सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून त्याणें तुह्मास बरें सोडिलें, आतां येऊन आह्मासही उपद्रव करील असें बोलून समर्थ सर्वांचे पुढें पळूं लगले. तों गांवांत अकस्मात् अग्नीचा धडका उठला, तेव्हां समस्त गांवकरी मिळून विझवावयास गेले; परंतु अग्नि अतिप्रदीप्त झाल्यामुळें विझेना आणि चहूंकडून गांवास एकदांच अग्नीचा उपद्रव जाहल्यानें सर्व गांवकऱ्यांची आरडाओरड पाहून कमाविसदार मोठ्या संकटांत पडला. तेव्हां सर्व गांवकरी ह्मणूं लागले कीं, तुह्मी गोसांवी यांस भिक्षेस न येऊंदेतां घालविलें त्याचें हें फळ सर्वांस भोगणें प्राप्त झालें. आतां आपण सर्व स्वामीकडे जाऊं, ह्मणजे ते कृपा करून अग्नि शांत करतील.

असा निश्चय करून स्वामीचे शोधाकरितां सर्व आंबराईंत आले. तों स्वामी तेथें नाहींत आणि गांवाकडे फिरून पाहतात तों, महान् एक वानर हातीं चूड घेऊन गल्लोगल्लीं फिरत आहे, हें पाहून परम आश्चर्य मानून स्वामींस शरण गेल्यावांचून निर्वाह नाहीं, असें बोलून स्वामीकडे चालले, तों स्वामी पुढें पळत आहेत आणि पाठी मागें गांवकरी येतात त्यांस पाहून तर अधिकच पळूं लागले, त्यासमयीं गांवकरी यांनीं हाका मारून स्वामी! आह्मी सर्वस्वीं शरण आलों आहों, आह्मांस मोकलून जाऊं नये. असें ह्मणत असतां स्वामी अधिकच पळूं लागले. हें गांवकऱ्यां-

नीं पाहून त्यांतून पांच पन्नास भले भले पळणार होते त्यांनीं पुढें जाऊन स्वामीस आटोपून आडवे पडले, तेव्हां स्वामी उभे राहिले, तों समस्त गांवकरी बायका पोरांसह वर्तमान येऊन आडवे पडले, आणि बोलले कीं, महाराज ! एकाच्या अपराधामुळें सर्वांचें पारिपत्य जाहलें. आतां क्षमा करून संकट निवारण करावें. मग स्वामी बोलले, कीं, आह्मी तुह्मांस काय उपद्रव केला आहे, तो निवारण करावयाचा तें सांगावें. तेव्हां महाराज! आपण कृपा केल्यावांचून आमचें संरक्षण होत नाहीं, असें बोलून हजार पांचशें गांवकरी पुनः आडवे पडले.

त्यासमयीं कल्याण व उद्धव आदिकरून विनंति करूं लागले, कीं, महाराज ! आतां सर्वांवर कृपा करावी, असें, ह्मणतांच समर्थांनीं हास्य करून समस्त गांवकरी यांस उठा असें ह्मणून आज्ञा केली, कीं, आपले गांवाकडे परतून पहा. तेव्हां सर्व उठून गांवाकडे पाहतात, तों ज्या वानराच्या हातीं चूड होती, तोच वानर खांद्यावर पर्वताएवढा घागर घऊन गांवास लागलेला अग्नि विझवीत आहे हें पाहून सर्व संतोषातें पावले आणि पहातात तों, अग्नीचा महाप्रलय झाला होता परंतु कोणी एकाचें काडीमात्र सुद्धां नुकसान जाहलें नाहीं. हें पाहून कमाविसदारा सहवर्तमान सर्वांस आश्चर्य वाटलें. नंतर स्वामींचो पूजा करून भोजनादिक जाहल्यानंतर समस्त गांवकरी यांणीं समर्थांचो प्रार्थना केली, व कमाविसदार यांणीं झोळ्या, कुबड्या घेतल्या होत्या, त्या माघाऱ्या दिल्या, आणि शरण येऊन या पांढरीच्या कल्याणार्थ आशीर्वाद द्यावा, अशी प्रार्थना केली, तेव्हां स्वामींनीं

आज्ञा केली कीं, याउप्पर तुमच्या गांवास अग्नीचा उपद्रव कधींही होणार नाहीं. (ही प्रचीत अद्यापपर्यंत तेथें आहे.) यामप्रमाणें आशीर्वाद देऊन समर्थ तेथून निघाले, ते परळीस जाऊन कांहीं दिवस तेथें राहिले.

समर्थ परळी मुक्कामीं असतां जांबेकडून एक ब्राह्मण मातोश्रीनीं मुद्दाम निरोप सांगून पाठविला; तो निरोप असा कीं "तुमचे भेटीस फार दिवस झाले याकरितां भेटीस लौकर यावें" यामप्रमाणें निरोप घेऊन ब्राह्मण परळीस आला. त्याचे मुखें सर्व वृत्त श्रवण करून आज्ञेप्रमाणें भेटीस येतों असें ह्मणून त्याजपाशीं पत्र दिलें तें पत्रः-

॥ ओंव्या ॥

सकळ तीर्थांची फलश्रुती ॥ सकळ भाग्याची संपत्ती ॥
सकळ पुण्याची गती ॥ आनंदमय ॥ १ ॥
तूं चतुर्विधा वागेश्वरी ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी ॥
जीचे निज व्यापारीं ॥ ब्रह्मादिक ॥ २ ॥
तूं भक्ती नवरत्नमाळा ॥ तूं कीर्ति चंद्राची कळा ॥
तूं महापुरुषाची लीळा ॥ ज्ञान शक्ति ॥ ३ ॥
तूं मुक्तीचें माहेर ॥ तूं भक्तांचा आधार ॥
तूं योगीजनाचें मंदिर ॥ सहज स्थिती ॥ ४ ॥
तूं भगवंताची महिमा ॥ तूं निरुपमासीं उपमा ॥
तुझेनि बोळे परमात्मा ॥ तुर्या साक्षिणी ॥ ५ ॥

तूं उन्मनीहूनी परती ॥ तूं संतांची संगती ॥
साधकाची सद्गती ॥ सद्गुरु कृपा ॥ ६ ॥
तूं गुरु कृपेचें सत्पात्र ॥ तूं अनन्यास क्षेत्र ॥
तूं चकोराचें सूत्र ॥ अर्धमात्रा ॥ ७ ॥
तूं भक्तीचें मंडण ॥ तूं समुदायाचें भूषण ॥
तुजवरोनि पंचप्राण ॥ ओंवाळीन ॥ ८ ॥
तूं माझी अंतरवृत्ती ॥ तूं माझ्या जिवाची गती ॥
तुज वर्णावया मती ॥ मज जीवास कैंची ॥ ९ ॥
तूं सखोलपणें गगन ॥ तूं माझे प्रीतीचें स्थान ॥
तुझे गुणीं माझें मन ॥ लांचावलें ॥ १० ॥
योगी वीतरागी तापसी ॥ ब्रह्मनिष्ठ सर्व संन्यासी ॥
भक्त मुक्त तुजपाशीं ॥ समाधान पावती ॥ ११ ॥
तूं भक्तांचें माहेर ॥ तूं भक्तांसी आधार ॥
तूं ज्ञानियांसी थोर ॥ संशयातीत ॥ १२ ॥
तूं योगियांचें मंडण ॥ तूं साधकाचें भूषण ॥
सर्व सार्थकाचा क्षण ॥ संग तुझा ॥ १३ ॥
तूं धर्माचा आश्रयो ॥ तूं पुण्याचा निश्चयो ॥
तुझेनि वाक्यें मज जयो ॥ समाधानासि होय ॥ १४ ॥
तूं भजनाचें जीवन ॥ तूं सगुणाचें रक्षण ॥
तूं शक्तीचें मोडपण ॥ आनंदमय ॥ १५ ॥
तुझेनि भक्तिरंग माजे ॥ तुझेनि उपासना गाजे ॥
तुझेनि परमार्थ साजे ॥ भावार्थपणें ॥ १६ ॥

तूं सन्मार्गाचा कैपक्षी ॥ तूं अनन्याचा अंतरसाक्षी ॥
तुझी कृपादृष्टि रक्षी ॥ अनाथासी ॥ १७ ॥
तूं मज अनाथाचा नाथ ॥ तूं मज दीनाचा समर्थ ॥
तूं मज कृपणाचा अर्थ ॥ निज ठेवा ॥ १८ ॥
तूं तापलियाची छाया ॥ तूं मज बालकाची माया ॥
तुझेनि सुखें माझी काया ॥ दृढ वाढली ॥ १९ ॥
तूं मज चकोराचा चंद्र ॥ तूं मज चातकाचा जलधर ॥
तुजविण मज आधार ॥ आणिक नाहीं ॥ २० ॥
तूं मज विदेशाचा देश ॥ तूं मज पक्षियाचें आकाश ॥
तुजवांचोनि विश्वास ॥ आणिक नाहीं ॥ २१ ॥
तूं कृपाळू शरणांगतासी ॥ न बोलतां अंतर जाणसी ॥
लडिवाळाचे लळे पाळिसी ॥ स्नेहाळुपणें ॥ २२ ॥
तुमची करावया स्तुती ॥ मज दीनास कैची मती ॥
एक वेळ कृपा मूर्ती ॥ कृपा करावी ॥ २३ ॥
जनस्थान गोदा तटीं ॥ परम पवित्र पंचवटी ॥
जेथें पडली कृपा दृष्टि ॥ रघूत्तमाची ॥ २४ ॥
तेथील रामउपासक ॥ त्याच्या सेवकाचा सेवक ॥
तुह्मांमध्यें मी एक रंक ॥ सरतें करावें ॥ २५ ॥
तुह्मीं निकट देवापाशीं ॥ मी पडलों दूर देशीं ॥
कृपाळूपणें रघुनाथासी ॥ माझी करुणा भाकावी ॥ २६ ॥
म्हणावे ते अनाथ ॥ समर्था तूं दीनानाथ ॥
म्हणावे ते पतीत ॥ तूं पतितपावन ॥ २७ ॥

म्हणावे ते परम किंकर ॥ देवा तूं करुणाकर ॥
म्हणावे ते निराधार ॥ आधार इच्छी ॥ २८ ॥
सत्य मिथ्या तुझा म्हणवी ॥ त्याची चिंता असों द्यावी ॥
ऐशी करुणा करावी ॥ नानाप्रकारीं ॥ २९ ॥
तुझ्या दासांमध्यें हीन ॥ माझे कोटयावधी अवगुण ॥
परंतु अनन्यभावें शरण ॥ सेवक रघुनाथाचा ॥ ३० ॥
पुढें म्यां असेंचि असावें ॥ माझें मन न पालटावें ॥
इतकें देवापाशीं मागावें ॥ बंधुवर्गीं ॥ ३१ ॥
नित्यहीं माझा नमस्कार ॥ देवासि करणें निरंतर ॥
मज कारणें शरीर ॥ इतुकें कष्टवावें ॥ ३२ ॥
शुद्ध उपासना निर्मळ ज्ञान॥उपासना आणि ब्राह्मण्यरक्षण॥
गुरुपरंपरेचें लक्षण ॥ शुद्ध ज्ञान ॥ ३३ ॥
बाळ वृद्ध नरनारी ॥ सकळ भक्त कुमार कुमारी ॥
त्या समस्तांस मी नमस्कारीं ॥ कृष्णातीरवासी ॥ ३४ ॥
ऐसें पंचधा बोलिले ॥ म्हणजे सकळ कांहीं पावलें ॥
इतुके पाहिजे यत्न केले ॥ म्हणे दासानुदास ॥ ३५ ॥

या प्रमाणें मातोश्रीकडे पत्र पाठवून आपण परळीसच होते. इतक्यांत राजश्रींची स्वारी गुरुवारीं दर्शनास आली, पूर्व पद्धती-प्रमाणें साष्टांग नमस्कार करून उभे राहून विनंति केली कीं, माझे भेटीस तीर्थरूप शहाजी महाराज आले आहेत त्यांची इच्छा स्वामींचें दर्शन व्हावें अशी आहे, आज्ञा होईल त्या प्रमाणें कळ-

वीन. समर्थ बोलले कीं, बरें आहे त्यांस घेऊन यावें. त्यावरून रायगडाहून शहाजी महाराज, जिजाऊ साहेब इत्यादि सर्व मंडळी दर्शनाकरितां सज्जनगडास आली. नंतर समारंभें करून संपूर्णांनीं समर्थांची पूजा केल्यावर शहाजी महाराजांनीं आपलें पूर्ववृत्त समर्थांस निवेदन केलें कीं, शिवाजीनें राज्य आक्रमण्यास प्रारंभ केल्यामुळें विजापुरचे बादशहानें मला भिंतींत चिणलें होतें वगैरे सर्व हकीकत सांगितली आणि म्हणाले कीं, महाराज शिऊबा सर्वस्वी आपला आहे, आपले आशीर्वादेंकरून राज्य प्राप्त झालें, तेंही आपलेंच आहे. याकरितां पुढें व्यवस्था करणें असेल तशी करावी. हें बोलणें ऐकून समर्थ म्हणाले, तुम्हीं कर्णोपकर्णीं शिऊबाचे पराक्रम ऐकिलेच असतील. यानें शाइस्तेखानाचे वेळेस अमानुषी कृत्यें केलीं तींही आपल्यास माहीत असतीलच. तुमचे पूर्वार्जित पुण्याईमुळें व वडिलांस श्रीदेवीनीं वर दिला. त्या योगानें तुमच्या उदरीं शिवाजी महान् प्रतापी, शूर उत्पन्न झाला आहे. याजवर श्री रघुपतीची पूर्ण कृपा आहे आपण याजबद्दल कांहीं काळजी करूं नये. याप्रमाणें समर्थांचें बोलणें ऐकून शहाजी महाराजांचे रोमांच उभे राहिले. आणि सद्गदित होऊन दंडप्राय नमस्कार करून जाण्याविषयींची आज्ञा मागितली तों त्रिरात्र. राहण्याची आज्ञा जाहली. त्याप्रमाणें मंडळीसह तेथें राहून जाण्याविषयीं आज्ञा मागितली. त्या बरोबरच तुकाबाई (व्यंकाजी महाराजांची आई,) व्यंकाजी महाराज, (शिवाजीचा सावत्र बंधु) जिजाऊ साहेब, (शिवाजी महाराजांची आई) वगैरे सर्व मंडळी

निघून गेली. शिवाजी महाराज मात्र सडे स्वारीनिशीं मागें राहिले होते, तेही मागाहून आज्ञा घेऊन जाणार ते समयीं समर्थांनीं महाराजांस सांगितलें कीं, मातोश्रींच्या व श्रेष्ठांच्या दर्शनास बहुत दिवस जाहले तर एकदां तिकडे जाऊन-येतों. कारण त्यांचें पत्रही आलें होतें. असें ह्मटल्यावरून आज्ञा होईल तर मीही सैन्यासहवर्तमान बरोबर येतों, अशी शिवाजिनें विनंति केली. तेव्हां तुह्मी त्याप्रांतीं येऊं नये, आह्मीच मातोश्रींचें व श्रेष्ठांचें दर्शन घेऊन येतों, अशी समर्थांची आज्ञा होतांच पुनः स्वामींची स्वारी लौकर यावी, कारण वियोगदुःख सहन होणार नाहीं. याप्रमाणें विनंति करून महाराज निघून गेले. इकडे स्वामीही शिष्यमंडळीसह निघून जांबगांवीं गेले, आणि मातोश्रींचें त श्रेष्टांचें दर्शन घेतांच त्यांस जो आनंद जाहला तो वर्णन करतां येत नाहीं. मातोश्रीनीं मस्तक अवघ्राण करून कांहीं दिवस येथें राहून आह्मांस सुख द्यावें ह्मणून समर्थांस सांगितलें त्यावरून कांहीं दिवस स्वामी जांबेंत राहून मातोश्रींस व श्रेष्ठांस ह्मणाले कीं, मी मातापुरीं जाऊन येतों, असें सांगून आज्ञा घेऊन तेथून निघाले ते मातापुरीं गेले. तेथें देवीचें दर्शन घेऊन श्रीदत्तात्रेयांचें स्थान आहे, तेथें गेले, तों दाहा पांच ब्राह्मण अनुष्ठान करीत बसले आहेत, त्यांस विचारिलें कीं, तुह्मी येथें कां बसलां? तेव्हां त्यांणीं उत्तर केलें, कीं श्रीदत्तात्रेयांचे दर्शनाकरितां अनुष्ठान करीत आहों, तें ऐकून समर्थ बोलले, कीं, उत्तम आहे, तुह्मा समागमें आह्मासही दर्शन घडेल, असें ह्मणून आपणही तेथें

बसले, तों एक मुहूर्तानंतर श्रीदत्तात्रेय स्वामींनीं मलंग फकीराचा वेष धरून एक बायको, (ती माया) तीन मुलें, (त्रिगुण) कोंबडीं पंचवीस, बक्रीं सहा (षड्रिपु) एक (अहंकार) रेडयावर बालून देवालयाजवळ आले आणि जागा चांगली पाहून स्त्रियेशीं बोलले, कीं, "ह्यां खाना खानेका इरादा है, वास्ते, हंडी पकाना" असें ह्मणतांच त्या स्त्रीनें रेडयावरून ओझें उतरलें, आणि चूल मांडून तिजवर एक घागर पाणी मावण्याजोगी हंडी चढविली आणि विचारिलें, कीं," हंडीमें क्या डालना ?" तेव्हां फकीर बोलला, कीं," मुरघी काटके डाल " असें ह्मणतांच पंचवीस कोंबडीं होतीं, तीं कापून मडक्यांत घातलीं, तथापि मडकें रिकामें पाहून त्या स्त्रीनें सांगितलें, कीं, " हंडी भरी नहीं " असें ह्मणतांच " छोरे काटकर डाल " हें ऐकून तिनें तिन्हीं मुलें कापून मडक्यांत घातलीं, आणि बोलली, कीं, " अबलग हंडी भरी नहीं " असें बोलतांच त्यानें सांगितलें, कीं, "बकरी काटकर डाल " त्याप्रमाणें तिनें बकरींही कापून मडक्यांत घातलीं, आणि पुनः बोलली कीं, "इस्सेही हंडी भरी नहीं" तेव्हां त्यानें पुनः सांगितलें कीं, " रेडा काटकर डाल " असें बोलतांच रेडा कापून घातला. परतु हंडी भरली नाहीं, ह्मणून बायकोनें सांगितलें, तेव्हां फकीर बोलला कीं, " इस बह्मनोंकूं काटकर डालो, असें ह्मणतांच बाई सुरी घेऊन ब्राह्मणांकडे धांवली, तों सर्व ब्राह्मणांनीं पूर्वीचें तिचें कृत्य पाहिल्यामुळें ही आपणांस कापील खरी, असा निश्चय क-

रून आसन, जपविधि, माळा व गोमुखी वगैरे अवघें टाकून सर्व पळाले. स्वामी मात्र एकटे कल्याण व उद्धव या शिष्यांसह राहिले.

हें पाहून बाई फकीरास ह्मणाली कीं, 'सब् बह्मन भाग गये, तेव्हां फकीर बोलला अच्छा बहुत बेहेत्तर हुवा ' असें त्रिवार बोलून ' हंडी भरी नहीं इसवास्ते एक बैठा है, दोनों खडे हैं इसमें ते काट डालो ' तें ऐकून ' हुकूम ' ह्मणून बाई हातीं सुरी घेऊन हांसतच कापण्यास आली. हें समर्थांनीं पाहून हास्ययुक्त होत्साते मान पुढें केली. असें पाहून त्यांजकडे न जातां बाई प्रथम कल्याण व उद्धवाकडे चालली; त्यासमयीं त्यांनींही मान पुढें केली. हें दत्तात्रेय महाराजांनीं पाहून प्रसन्न होऊन आपलें मूळ स्वरूप प्रगट करून उभे राहिले. हंडी, बाई वगैरे सर्व गुप्त झालीं. तेव्हां ' रामदासा आंत ये' ह्मणून मंदिरांतून शब्द जाहला. त्यासमयीं स्वामींनीं जाऊन साष्टांग नमस्कार करून चरणीं मस्तक ठेविला, तेव्हां श्रीदत्तात्रेय महाराज यांणीं मस्तकीं हस्त ठेवून समर्थांस उठविलें, त्याकाळीं स्वामीनीं पूजा करून बहुत स्तवनही केलें, तेणेंकरून श्रीदत्तात्रेय स्वामींस बहुत संतोष होऊन समर्थांस विचारिलें कीं, श्रींची आज्ञा तुह्मांस आहे, त्याप्रमाणें करीत असतां कीं नाहीं ? तेव्हां समर्थ बोलले कीं, श्रींची जी आज्ञा तीच आपली आज्ञा, त्याप्रमाणें सर्व करीत आहें, तेव्हां श्रीदत्तात्रेय बोलले कीं, तुह्मी येऊन दर्शन घेऊन जावें तें न करितां त्या ब्राह्मणांजवळ बसावयाचें कारण काय ? असें ह्मटल्यावरून

स्वामींनीं विनंति केली कीं, ब्राह्मण गरीब दर्शनाकरितां बसले होते, त्यांची इच्छा पूर्ण होईल, ह्मणून मीही त्यांजवळ बसलों होतों, पुढें पाहतों तों आपण येऊन त्यांस प्रत्यक्ष दर्शन द्यावें, तें न देतां उलटें भय दाखवून सर्व ब्राह्मण पळविले, हें स्वामींस योग्य कीं काय ? अशी रामदास स्वामींची विनंति ऐकून श्रीदत्तात्रेय हास्य करून बोलले कीं, ब्राह्मण अनधिकारी दर्शनास योग्य नाहींत ह्मणून त्यांस भय दाखविलें. तुझ्या समागमें उद्धव आणि कल्याण आहेत यांस कां भय प्राप्त जाहलें नाहीं ? तस्मात् माझ्या दर्शनास अधिकारी पाहिजेत अशी आज्ञा होतांच स्वामींनीं पुनः विनंति केली कीं, ब्राह्मणांस दर्शन दिलें पाहिजे तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, त्यांस तूं अधिकारी कर ह्मणजे दर्शन देऊं, असें सांगून श्रीदत्तात्रेय अदृश्य जाहले.

नंतर स्वामींनीं उद्धवास त्या सर्व ब्राह्मणांकडेस बोलावूं पाठविलें, आणि इतर आपली मंडळी होती, तीसही कल्याणाचे हातीं बोलावून आणिलें. आणि स्वयंपाकास प्रारंभ करविला. तों ब्राह्मण कोस अर्धकोस गेले होते, ते उद्धवगोसांवी यांणीं माघारे आणिले, मग त्याणीं उद्धवमुखेंकरून सविस्तर समर्थांचें चरित्र ऐकिल्यावरून सर्व ब्राह्मण बोलले कीं, आह्मी दुर्दैवी आहों, स्वामी आपण समर्थ आहां, हें नकळतां गेलों. आतां श्रीदत्तात्रेय ते आपणच आहां, तरी आह्मांवर कृपा करावी. असें ह्मणून ब्राह्मण शरण आले. हें पाहून दयापूर्वक सर्वांस स्वामीनीं मंत्रानुग्रह दिला. नंतर श्रीदत्तात्रेय महाराज यांचें समर्थांनीं स्मरण करितांच

पायीं पादुका, हातीं दंडकमंडलु. अशी त्रिगुणात्मक श्रीदत्तात्रेय मूर्ति पुढें उभी राहिली, त्या काळीं समर्थांनीं सर्व ब्राह्मण यांस व आपली शिष्यमंडळी होती त्यांसही दर्शन करविलें, आणि सर्वत्रांचे हातून पूजन करवून नैवेद्य समर्पण केला. नंतर आरती केली ती:—

॥ आरती ॥

विधि हरिहर सुंदर दिगंबर झाले ॥ अनुसूयेचें सत्व पहावया आले ॥ तेथें तीन बालक करुनी ठेवीले ॥ दत्त दत्त ऐसें नाम पावले ॥ जयदेव जयदेव जय दत्तात्रया ॥ आरती ओवाळूं तुज देवत्रया, जयदेव जयदेव ॥ धृ० ॥ ॥ १ ॥ तिहिं देवांच्या युवती पति मागों आल्या ॥ त्यांला झणे वळखुनि न्या आपूल्याला ॥ कोमळ शब्दें करुनी करुणा भाकील्या ॥ त्यासीं समजावील्या स्वस्थाना गेल्या ॥ जय० ॥ २ ॥ काशी स्नान करवीरक्षेत्रीं भोजन ॥ मातापूरीं शयन होतें प्रतिदिन ॥ ऐसें हें अघटित सिद्ध महिमान ॥ दास झणे हें तो नव्हे सामान्य ॥ जयदे० ॥ ३ ॥

या प्रमाणें आरती करून पूजा संपूर्ण झाल्यानंतर श्रीदत्तात्रेयांनीं जो मी तोच रामदास अशी भावना धरून याचीच निरंतर सेवा करावी, असें सर्वांस सांगून आपण अदृश्य जाहले.

नंतर ब्राह्मणमंडळीसहवर्तमान सर्वांचीं भोजनें झालीं. आणि त्रिरात्र त्यास्थळीं वास करून श्रींचो आज्ञा घेऊन समर्थ निघाले ते फिरत फिरत शरण येतील, त्यांस पावन करीत करीत श्रीरंगपूर नजीक इंदूर येथें बहुत रमणीय जागेंत एक तलाव होता तेथें आले, तों त्या प्रांतांत पर्जन्य नव्हता झणून तेथील अधिकारी यांनीं साठ ब्राह्मण पर्जन्याकरितां अनुष्ठानास तलावांत नाभी इतक्या पाण्यांत उभे केले होते, ते त्या तळचांत कंबरे इतके पाण्यांत उभे आहेत तों तेथें स्वामी गेले आणि त्या ब्राह्मणांस विचारिलें, कीं, तुह्मी पाण्यांत कां उभे राहिलां ? तेव्हां त्यांणीं सांगितलें, कीं, पर्जन्य गेला झणून येथील अधिकारी यांणीं अनुष्ठान सांगितलें आहे, यास्तव पर्जन्यसूक्ताचें पठण करीत आहों. असें झणतांच स्वामी बोलले, कीं, मी सांगतों तें अनुष्ठान कराल तर दोन प्रहरांनंतर जितका पर्जन्य पाहिजे तितका पडेल. असें झणतांच ब्राह्मणांनीं स्वामींचें ध्यान पाहून हे कोणी तरी सत्पुरुष आहेत असें मनांत आणून हे सांगतील तें वाक्य मान्य करावें, असा निश्चय करून आपण सांगाल तें अनुष्ठान करूं असें सांगतांच " तुह्मी सर्वांनीं बाहेर यावें " असें समर्थांनीं झणतांच सर्व ब्राह्मण बाहेर आले. तों स्वामींनीं एक मोठा दगड होता त्यावर कोळशानें प्रतापमारुतीचें ध्यान रेखिलें आणि वर आपली छाटी झांकून ब्राह्मणांस सांगितलें, कीं, या मारुतीस सर्वांनीं मिळून महारुद्राभिषेक करावा. तो झाल्यानंतर पूजा होऊन भोजन झा-

ल्यावर पर्जन्य येईल. असें बोलल्यावरून सर्व ब्राह्मणांनीं महारुद्रास प्रारंभ केला.

इकडे स्वामींनीं उद्धवास सांगितलें कीं, स्वयंपाक सिद्ध करवावा. अशी आज्ञा होतांच मंडळी स्नान करून तयार झाली, तों, साहित्य व भांडीं कांहींच नाहींत. स्वामी तर त्वरा करीत आहेत तेव्हां कसें करावें. असा विचार करीत तटस्थ उभे राहिले, तों त्यांतून एका शिष्यानें स्वामीपाशीं जाऊन विनंति केली, कीं, महाराज ! स्वयंपाकाचें साहित्य व भांडीं नाहींत पाक कसा करावा. असें म्हणतांच समर्थांनीं आज्ञा केली, कीं, या जाळीचे पाठीमागें सर्व साहित्य व भांडीं आहेत. तीं घेऊन पाक करावा. तेव्हां शिष्यांनीं त्या जाळीमागें पाहिलें तों आज्ञेप्रमाणें सर्व होतें तें घेऊन स्वयंपाकास लागले. इकडे स्वामी स्नानसंध्या करून पूजेस बसल्यानंतर स्वामींची पूजा समाप्त होई पावेंतो ब्राह्मणांचा अभिषेकही समाप्त जाहला. नंतर स्वामींनीं जाऊन त्या दगडावरील छाटी काढली आणि पाहतात, तों टाक्यांनीं घडून मूर्ति करावी, याप्रमाणें अवयवयुक्त प्रतापमारुतीचें ध्यान उमटलेलें सर्वांनीं पाहून परम आश्चर्य पावले. नंतर स्वामींनीं त्यामूर्तीची पूजा करून नैवेद्य समर्पण केला आणि ब्राह्मणांसहवर्तमान भोजन होऊन त्यांस तांबूल व दक्षिणा देऊन मंडळीसहवर्तमान स्वामी बसले आहेत तों आकाशीं ढगें उत्पन्न होऊन असंख्य पर्जन्यवृष्टि होऊन जलमय जाहलें, परंतु स्वामी ज्यास्थानीं बसले होते; त्या स्थानीं मात्र पर्जन्य नाहीं.

याप्रमाणें चमत्कार पाहून सर्व ब्राह्मण समर्थांची स्तुति करीत बसले आहेत. तों पर्जन्यवृष्टि झाली, हें ग्रामाधिकारी व तेथील जमीनदार लोक, यांणीं पाहून ब्राह्मणांस मोठ्या समारंभानें आणावयास गेले, तों, ब्राह्मण स्वामीसह आनंदांत बसले आहेत. त्यांणीं अधिकारी यांस सांगितलें, कीं, हा पर्जन्य पडला, तो आमच्या अनुष्ठानानें पडला असें नाहीं. तर हे समर्थ रामदास स्वामी आले आहेत, यांच्या प्रसादानें पडला. असें ह्मणून पूर्वी स्वामींनीं करविलेला सर्व वृत्तांत सविस्तर सांगितला. आणि ह्मणाले कीं, जो काय समारंभ पूजा वगैरे करणें तो स्वामींचाच करावा. हें अधिकारीयांणीं ऐकून परम आश्चर्य मानीत असतां, " हे स्वामी साक्षात् ईश्वरमूर्तीच आहेत, असें ह्मणून श्रीमारुतीचें दर्शन करून स्वामीसन्निध आले आणि आह्मी दीन व शरणागत आहों, अशी प्रार्थना करून मोठ्या समारंभानें सत्कारपूर्वक सर्व ब्राह्मण व शिष्यमंडळीसहवर्तमान समर्थांस इंदुरास घेऊन गेले. तेथें उत्तम स्थळ पाहून स्वामीस जागा दिली त्या स्थळीं स्वामींनीं मठ करून कोदंडधारी ध्यानाची श्रीरघुपतीची मूर्ति स्थापून श्रीमारुती पाशींही मठ केला आणि आपण कांहीं दिवस तेथें राहून कधीं कधीं इंदुरास व कधीं कधीं खडीवर मारुतीपाशीं रहात असत. या प्रमाणें त्या स्थानीं राहून शरण येतील त्यांस अनुग्रह देत असतां सांप्रदाय उपासना पुष्कळ वाढविली. आणि एक वर्ष तेथें राहून पुनः घरीं जाण्याची सिद्धता केली; तेव्हां इंदूरचे अधिकारी जमीदार व शिष्य सांप्रदायी वगैरे स.

वांचा आग्रह पडला कीं, स्वामींनीं संप्रदाय बहुत वाढविला यास्तव संप्रदायी लोकांस दर्शन देण्याकरितां येथेंच राहावें. तेव्हां स्वामी बोलले कीं, आह्मास पृथ्वीपर्यटन करणें आहे, यास्तव एके जागीं राहावयाचें नाहीं. आतां तुमचा बहुत आग्रहच आहे, याकरितां उद्धवगोसांवी यांस ठेवितों. सर्वत्रांनीं यांची सेवा करावी असें ह्मणून त्यांस तेथें ठेवून आपण निघाले. तेव्हां उद्धवगोसांवी यानेंही वियोगाची व्यथा दर्शविल्या वरून त्याचेंही समाधान करून सांगितलें कीं, कांहीं दिवस येथें राहून यावें, असें सांगून तेथून निघाले, तेव्हां पूर्वी श्रीमारुतीची स्थापना केली होती त्यामागें डोंगर आहे त्या डोंगरावरून पाण्याचा मोठा झोत पडत होता त्या झोत पडण्याचे जागीं कडयांत बसावयाजोगी जागा होती तेथें दगडावर स्वामीनीं सवाई लिहिली ती:—

॥ सवाई ॥

श्रीराम भक्त मूळरे ॥ प्रसन्न सानुकूळरे ॥
समर्थ तो तया गुणें ॥ तयास सर्व ठेंगणें ॥ १ ॥

या प्रमाणें तेथें समर्थांनीं सवाई लिहून ठेविलेली अद्यापि आहे. आणि तैलंगी भाषेंतही समर्थांनीं पुष्कळ कवित्वें केलीं आहेत. तीं त्या प्रांतीं प्रसिद्ध आहेत. समर्थांची स्वारी जांबेहून निघाली ती मातापूर करून पुनः जांबेस येऊन मातोश्रीचें व श्रेष्ठांचें दर्शन घेऊन कांहीं दिवस तेथें राहिले असतां शके १५७४ नंदन नाम संवत्सरीं चैत्र शुद्ध प्रतिपदेस श्रीरामनवमीचा उत्साह प्राप्त जहा-

ला, तो नवमी पर्यंत सांग होऊन दशमीस पारण्याचे दिवशीं स्वयंपाक सिद्ध जाहल्यानंतर श्रेष्ठांनीं श्रींची पूजा आटोपून नैवेद्याचे समयीं नैवेद्य आणा, ह्मणून आज्ञा केली. परंतु जे गृहस्थ तूप आणावयास अष्टीस गेले ते यावयाचे होते ह्मणून नैवेद्य कोणी आणिला नाहीं. तेव्हां पुनः श्रेष्ठ ह्मणूं लागले कीं, उशीर जाहला, ब्राह्मणही येऊन बसले, नैवेद्य अद्यापि कां आणीत नाहींत.

हें ऐकून श्रेष्ठांचे पुत्र रामचंद्रबावा बाहेर जात, आंत येत, परंतु तूप लौकर येईना आणि श्रेष्ठ रागें भरत आहेत, हें समर्थांनीं पाहून रामचंद्र, कारभारी व शिष्यमंडळी यांस बोलावून विचारिलें कीं, विलंबाचें कारण काय ? तेव्हां रामचंद्रबावा यांणीं विनंति केली कीं, तूप आणावयास गृहस्थ गेले आहेत ते अद्यापि आले नाहींत, स्वयंपाक तर सिद्ध जाहला, परंतु नैवेद्याचा खोळंबा तुपाकरितां जाहला आहे. ह्मणून श्रेष्ठ रागें भरत आहेत.

हें ऐकून कारभाऱ्यास समर्थही बोलले कीं, ही तर्तूद पूर्वीच करावयाची होती, आतां श्रेष्ठ रागें भरत आहेत, मुलांनीं तर लहान तोंडें केलीं आहेत, असो, तुह्मापैकीं कोणी एकानें सडा घालण्याचीं मडकीं आहेत त्यांतील एक घागर धुवून विहिरींतून भरून आणावी, अशी आज्ञा होतांच मुंजे उपनावांचा श्रेष्ठांचा एक शिष्य होता त्याणें पूर्वी सांगितलेली मृत्तिकेची घागर धुवून बिहिरींतून भरून आणून समर्थांचे पुढें ठेविली, नंतर समर्थांनीं त्या घागरीवर वस्त्र झांकून हस्तस्पर्श करून मुंजे यांस सांगितलें कीं, आतां यांतून तूप काढून द्यावें. तेव्हां त्याणें लहानसें भांडें

घेऊन तूप काढून दिलें. मग श्रेष्ठांनीं नैवेद्य समर्पण करून ब्राह्मणांचीं पात्रें वाढविलीं. नंतर पंक्तींत तूप वाढावयाचें तेंही मुंजे यांजकडून काढून घेऊन वाढविलें. मग पुढील मागील भोजनें जाहलीं. पुढें वाढणाराचीं व इतर जातींचीं भोजनें होत, तों पर्यंत मुंजे उपाशी राहून तूप काढीतच होते. याप्रमाणें सर्वांचीं भोजनें जाहल्या नंतर आतां आज्ञा काय? ह्मणून मुंजे यांणीं स्वामींस विनंति केली, त्यावरून समर्थांनीं श्रेष्ठांचे चिरंजीव रामचंद्र यास बोलावून सांगितलें, कीं, ही घागर धुवून जतन ठेवावी, पुनः दशमीस पारण्याचे दिवशीं या घागरींत तूप घालून हिची पूजा करावी, आणि मुंजे यांचे हातें तूप काढून वाढवीत जाणें. ह्मणजे जितकीं पात्रें होतील तितक्यांस तूप पुरेल, ह्मणून आज्ञा केली, त्याप्रमाणें रामचंद्रानें घागर धुवून जतन करून ठेविली, आणि श्रेष्ठांस विनंति केली कीं, समर्थांनीं घागरींतून पाणी आणवून त्यांतून तूप काढविलें आणि पुनः ही घागर जतन ठेवावी ह्मणून सांगितलें. असें सविस्तर कथन केल्यावरून श्रेष्ठांनीं भाषण केलें कीं, केवळ तुझोच बेगमी केली, असा अर्थ नाहीं, तर तुझ्या वंशाचीही बेगमी करून ठेविली. त्यास ही घागर फारच जतन करून ठेवावी. ह्मणून चिरंजिवास आज्ञा केली. (ती घागर अद्याप पावेतों आहे. पांचशें अथवा पांच हजार पात्रें जरी जाहलीं तरी त्यांतील तूप पुरत आहे).

भाग ११ वा.

एकनाथाची भेट.

इकडे शिवाजी महाराजांनीं समर्थांची स्वारी जांबेस जाऊन दोन तीन वर्षे झालीं; अद्यापि माघारे कां येत नाहींत म्हणून पत्रें व ब्राह्मण मुद्दाम पाठविले त्यांणीं समर्थांची गांठ घेऊन देशीं येण्याविषयींची महाराजांची फार त्वरा असल्याचें निवेदन केलें त्यावरून स्वामींनीं निघण्याची सिद्धता केली. त्यावेळीं मातोश्री फार कष्टी होऊन म्हणाली कीं, बाबा पुनः केव्हां भेट होईल ? तेव्हां समर्थ म्हणाले भगवत्संकल्पेंकरून योग घडावयाचे ते आपोआप घडतच आहेत, त्याबद्दल पूर्वीच चिंतन करूं नये. असें सांगून चरणीं मस्तक ठेऊन मातोश्रीचा व श्रेष्ठांचा निरोप घेऊन निघाले ते शके १५७६ रांत कृष्णातीरीं आले. हें वर्तमान शिवाजी महाराज यांस समजतांच महाराज दर्शनास आले आणि नमस्कार करून " महाराज ! बहुत दिवस वियोगदुःख भोगिलें " असें म्हणून कांहीं बोलावें तों कंठ सद्गदित होऊन बोलवेना. तेव्हां समर्थांनीं त्यांचें समाधान करून त्यांजबरोबर चाफळास आले. नंतर शिवाजीनें समर्थ गेल्यापासून परत आले तोंपर्यंतचा दिल्लीस जाऊन आल्याचा वृत्तांत सविस्तर स्वामींस निवेदन केला आणि तेथें त्रिरात्र राहून आज्ञा घेऊन गेले.

कोणे एके दिवशीं स्वामी रामघळींत असतां पैठणकर एकनाथपंत म्हणून रोजगारी ब्राह्मण होते,ते या प्रांतीं येऊन रोजगार करीत असतां यवनापाशीं राजश्रीकडून वकील असत. त्यांणीं स्वामींची कीर्ति बहुत श्रवण केली. तेव्हां यांजपाशीं एकनाथमहाराजांप्रमाणें चमत्कार आहेत, किंवा नाहींत,हें पहावें असें त्यांचे मनांत होतें त्या प्रमाणें रोजगार आटोपून घरीं जाऊं लागले,ते समयीं स्वामिदर्शनाचा हेतु धरून चाफळास आले आणि श्रीरघुपतीचें दर्शन घेऊन तें स्थान पाहून बहुत संतुष्ट जाहले. नंतर जे कोणी मठांत होते त्यांचें दर्शन घेऊन त्यांस स्वामी कोठें आहेत म्हणून पुसलें. तेव्हां त्यांणीं सांगितलें, कीं, स्वामी येथून दोनकोसांवर डोंगरांत आहेत; तेथें गेल्यास दर्शन घडेल. असें त्याणीं सांगितल्यावरून एकनाथपंत त्रिरात्र तेथेंच राहून स्वामींची वाट पहात होते, परंतु स्वामी आले नाहींत. इतक्यांत कल्याण गोसांवी यांजपाशीं कांहीं ग्रंथ स्वामींनीं लिहावयाकरितां दिला होता, तो शिरगावीं नेऊन ग्रंथ सिद्ध करून गुरुवारीं दर्शनास जावें म्हणून कल्याणस्वामी चाफळास आले, आणि श्रीचें दर्शन करून स्वामीचे दर्शनास निघाले, ते समयीं एकनाथपंत बोलले कीं, आम्हीही येतों, तेव्हां कल्याणस्वामीनीं उत्तम आहे, असें म्हटल्यावरून घोडें व माणूस चाफळास ठेवून आपण एकटेच कल्याणस्वामीबरोबर रामघळीस गेले. आणि समर्थांचें दर्शन घेऊन साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. तेव्हां स्वामीनीं कल्याणास विचारिलें कीं, हे कोठील कोण आणि यांचें येथें येण्याचें कारण काय ? असें विचारितांच

कल्याणस्वामीनीं विनंति केली कीं, हे गंगातीरीं पैठणास असतात, आणि परमभाविक असून भक्तीनें आपल्या दर्शनास आले आहेत. तेव्हां उत्तम आहे, यांणीं भोजन करून जावें. असें समर्थांनीं सांगून कल्याणस्वामीस आज्ञा केली कीं, स्वयंपाक करावा. असें ह्मणतांच स्वामींची कौपीन व छाटी वाळत घालून आपण स्नान करून स्वामीपुढें उभे राहिले, आणि बोलले कीं, लौकर स्वयंपाक कर ह्मणून आपली आज्ञा होत आहे, परंतु साहित्य नाहीं. तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, या जाळीआड साहित्य आहे, तें घेऊन पाक सिद्ध करावा. असें ह्मटल्यावरून साहित्य पहावयास गेले तों, त्या जाळीआड तिघांचें साहित्य (मेदा, साखर, तूप, तांदूळ, तीन केळीचीं पानें, साहा द्रोण व तीन विडे वगैरे) होतें, तें घेऊन स्वयंपाक सिद्ध केला.

स्वामींची व त्या गृहस्थांची स्नानसंध्या झाल्यानंतर पात्रें मांडण्याविषयीं स्वामींची आज्ञा होत आहे इतक्यांत कोकणांतून साठ ब्राह्मण येत होते, ते खांडववनाजवळ आले. तेव्हां त्या ब्राह्मणांस स्मरण जाहलें कीं, या डोंगरांत रामदास स्वामी राहतात, त्यांचें दर्शन घेऊन जावें, ह्मणून घळीकडेस आले, आणि स्वामी बसले होते त्यांस साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. तेव्हां त्यांस स्वामींनीं विचारिलें कीं, तुह्मीं कोठून आलां व कोणीकडे जातां. त्यांणीं सांगितलें कीं, कोकणांतून आलों, राजापूर प्रांतीं राहतों शिवाजी महाराज वांईस कांहीं दान धर्म करणार ह्मणून कळलें, तिकडेस जातों. तेव्हां फार उत्तम, असें ह्म-

णून " पात्रें वाढावयाचा समय आहे, तर सर्वांनीं स्नान करून भोजनास यावें " असें समर्थांनीं सांगतांच ब्राह्मण म्हणाले कीं, आपलें दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. हाच मोठा लाभ झाला, आतां आम्ही साठ ब्राह्मण आहों यास्तव आम्हांस आज्ञा द्यावी म्हणजे आम्ही जातों. असें म्हटल्यावरून स्वामी बोलले कीं, दोन प्रहरच्या समयीं, उपोषित जावें, हें चांगलें नाहीं. तर स्नान करून श्रीरघुपतीचा प्रसाद घेऊन जावें, हें उत्तम. असें म्हणतांच सर्व स्नानास गेले आणि स्नान करितानां एकमेकांशीं बोलूं लागले कीं, साधूंचा प्रसाद आहे, यास्तव एक दोन शितें मिळतील तीं प्रसादरूपानें घेऊन जाऊं, असें म्हणून स्नान करून त्वरेनें आले. एकनाथपंतांस पात्रें मांडण्याविषयीं आज्ञा जाहली, तेव्हां एकनाथपंत बोलले कीं महाराज! भोजनास मंडळी फार, आणि पात्रें वगैरे तर तीन तीनच आहेत, कसें करावें ? तेव्हां समर्थ बोलले कीं, आहेत तितकींच हातांत घेऊन मांडूं लागा म्हणजे सर्वांस पुरतील अशी आज्ञा होतांच एकनाथपंत तीन पानें हातीं घेऊन मांडीत चालले, तों त्यांणीं ब्राह्मणांचीं साठ व एकनाथपंतांचें एकसष्टावें आणि स्वामींचें बासष्टावें अशीं पानें मांडिलीं, आणि एक पान हातीं राहिलें तें कल्याणासाठीं ठेविलें. तसेंच सहा द्रोण होते ते देत गेले, ते दोन दोन द्रोण दरपात्रीं देत असतां हातीं शेवटीं दोन राहिले, ते कल्याणास ठेविले. नंतर वाढण्याविषयीं आज्ञा जाहली, त्याप्रमाणें सर्व पदार्थ वाढिले. ब्राह्मणांचीं भोजनें यथासांग होऊन उठले आणि तीन विडे होते ते देत गेले, बाकी एक

विडा राहिला तो कल्याणासाठीं ठेविला. नंतर ब्राह्मणांस दक्षिणा द्यावी, हा विचार स्वामींनीं मनांत आणून एकनाथपंतांजवळ एकसष्ट होन होते ते मागितले. त्यांणींही स्वामींचा चमत्कार पाहून मागतांच दिले, ते घेऊन साठ होन साठ ब्राह्मणांस देऊन एक होन राहिला तो पंतांस दक्षिणा दिली. तेणेंकरून ब्राह्मण बहुत संतोषी होऊन कीर्ति ऐकिल्याप्रमाणें स्वामींचें चरित्र पाहून आज्ञा घेऊन गेले. एकनाथपंतांनींही स्वामींचा चमत्कार पाहून ऐकण्यांत होतें; त्याप्रमाणेंच ही मूर्ति आहे. अशी खात्री जाहली. त्याच दिवशीं अस्तमानीं एकनाथपंतांसह स्वामी चाफळास आले; आणि त्यांस त्रिरात्र ठेऊन घेतलें. तेथें राहून प्रतिदिवशीं "स्वामीस होन दिले ते मागतां येत नाहींत, परंतु, स्वामीही ठेवणार नाहींत" अशी एकनाथपंत मनांत कल्पना करीत असतां चवथे दिवशीं भोजन जाहल्यानंतर एक शेला व पागोटें देऊन पंतांस स्वामींनीं निरोप दिला, आणि स्वतः टेंकापावेतों पोहोंचवावयास जात असतां बहुत प्रकारें आदर करून आपण पर्वतावर गेले.

वाटेनें जात असतां एकनाथपंत बहुत श्रमी होऊन वर्ष दोन वर्ष श्रम करून जें द्रव्य मिळविलें तें सर्व स्वामींस दिलें, वाटखर्चासहो जवळ कांहीं राहिलें नाहीं, परंतु स्वामींनीं कृपा करून एक होन दिला आहे, यांत वाटखर्ची होईल. याप्रमाणें खेद करीतकरीत पैठणापर्यंत गेले, आणि विचार करूं लागले कीं, अशा स्थितींत घरीं तोंड काय दाखवावें ? आणि मातापित्यांस काय सांगावें ? तस्मात् अस्तमान झाल्यानंतर घरीं जाऊं, असा बेत क-

ऊन गांवाबाहेर कोसावर मुंगीपैठण नांवाचा गांव आहे तेथें रा-हिले. त्याच दिवशीं स्वामीनीं त्यांचे जाण्यापूर्वी " पायांत पा-दुका, गळ्यांत मेखला, हातीं माळ, मस्तकीं जटाटोप " अशा वेषानें पैठणीं एकनाथपंतांचे घरीं दोनप्रहरीं जाऊन " जय जय रघुवीरसमर्थ " असें ह्मणून हांक मारिली, तों पंतांच्या पित्यानें बाहेर येऊन नमस्कार केला, आणि एकनाथपंतांचे तीर्थरूप तु-ह्मीच कीं काय ? हें विचारितांच त्यांणीं होय ह्मणून सांगितलें. तेव्हां त्यांणीं आपण कोण ? व कोठील रहाणारे असें ह्मणतांच आह्मी कृष्णातीरीं चाफळखोऱ्यांत राहतों, आह्मांस रामदास असें ह्मणतात. तुमच्या चिरंजीवांची गांठ पडली, ते व आह्मी समाग-मेंच आलों, परंतु पांचचार कोशीं त्यांची व आमची चुकामूक जाहल्यामुळें आह्मी पुढें आलों. आज अस्तमानपर्यंत तेही येतील. त्यांनीं आह्मापाशीं कांहीं द्रव्य दिलें आहे, तें घ्यावें. असें ह्मणून एकशें बावीस होन पंतांचे पित्याजवळ देऊन आपण निघाले. तेव्हां त्यांणीं भोजनास राहण्याकरितां बहुत आग्रह केला, परंतु समर्थ भोजनास न राहतां पुढें जावयाची निकड सांगून निरोप घेऊन गेले.

तो ब्राह्मण बहुत आनंदानें अस्तमानीं दरवाजांत बसून पं-तांची वाट पाहत आहे, तों चार घटिका रात्र जाहली, त्यासमयीं चिरंजीव घोडें व मनुष्य पुढें लावून देऊन आपण मागें परम ल-ज्जेनें टोपी पांघरून आले. तेव्हां वडिलांनीं एकनाथ ! ह्मणून हांक मारितांच पंतांनीं हांक दिली. तों वडिलांनीं जवळ जाऊन

भेटून मस्तक अवघ्राण करून त्यास घरांत आणिलें, तेव्हां मातोश्री आदिकरून सर्वांस बहुत संतोष जाहला, नंतर भोजनादिक होऊन निद्रा जाहली. प्रातःकाळीं उठून पुत्राचें मुखावलोकन करितात तों चिंताक्रांत पाहून बापा ! तूं चिंताक्रांत कां जाहलास ? असा वडिलांनीं प्रश्न करितांच पंतांनीं उत्तर केलें कीं, जसा गेलों तसाच परत आलों, ह्मणून चिंताग्रस्त झालों. असें ह्मणतांच बापा ! तूं आणिलें तितकेंच बहुत आहे. असें वडिलांचें भाषण ऐकून आणिलें, आणिलें, असें आपण वारंवार ह्मणतां हें काय ? असें पंतांनीं भाषण करितांच वडील बोलले कीं, एकनाथा ! एकशें बावीस होन तूं ज्या रामदास बावा गोसांवी यांजवळ दिलेस त्यांची व तुझी चुकामुक जाहली, परंतु त्या गृहस्थांनीं आजच दोनप्रहरीं मला होन आणून दिले आणि भोजनास न राहतां तसेच निघून गेले. आतां आपला ऐवज गेला ह्मणून श्रमी असशील तर श्रमी होऊं नको. असें ऐकतांच एकनाथ परम सद्गदित होऊन नेत्रीं अश्रुपात चालले, आणि वडिलांस विचारिलें कीं, त्यांचें ध्यान कसें होतें ? तेव्हां वडिलांनीं सांगितलें कीं, पायीं पादुका, हातीं माळ, गळ्यांत मेखळा, कांखेस कुबडी, मस्तकीं, जटाभार आणि हुरमुजी रंगाचीं वस्त्रें, या वेषानें येऊन आंगणांत उभे राहिले, आणि मला हांक मारून ह्मणाले कीं, एकनाथपंतांनीं मजपासीं दिलेले होन घ्यावे आणि रात्रौ ते येतील, असें सांगून एकशें बावीस होन देऊन गेले. असें बोलून ते

होन प्रत्यक्ष त्यास दाखविले, हें पाहून एकनाथ याणीं वडिलांस समर्थांचें सविस्तर वृत्त सांगितलें. त्यांनींही परम आश्चर्य मानून हे दुसरे साक्षात एकनाथ महाराजच असा निश्चय केला. त्या वेळेपासोन एकनाथपंतास सतत समर्थांचा निदिध्यास लागला असून कांहीं दिवस घरीं राहिले परंतु चैन पडेना ह्मणून पुनः चाफळास आले, आणि स्वामींस बहुत प्रकारें विनंति करून अनुग्रह घेऊन पैठणास गेले.

कोणे एके दिवशीं समर्थांची स्वारी रामघळींत असतां कल्याणास कांहीं ग्रंथ लिहिण्यास सांगितला, त्यावरून कल्याणानें ग्रंथ लिहून पुस्तक स्वामीपुढें ठेविलें तें पुस्तक स्वामींनीं पाहून कल्याणास सांगितलें कीं, तुझें अक्षर चांगलें नाहीं तर अक्षर चांगलें कर, असें ह्मणतांच महाराज ! कित्ता दिला असतां मी अक्षर चांगलें करीन. असें ह्मणतांच स्वामींनीं झोळींत हात घालून कित्ता काढून दिला. त्यावरून कल्याणानें कांहीं दिवसांनीं चांगलें अक्षर करून दाखविलें नंतर स्वामींनीं त्याजकडून दासबोध ग्रंथ लिहविला. त्या कित्त्यांत सोन्याच्या शाईचीं अक्षरें असून बाळबोध लिपि आहे व ती देववाणी असून तिचा अर्थ स्वामी व कल्याण या दोघांसच ठाऊक होता. तो कित्ता अद्यापि डोमगांवचे मठांत आहे.

एकेसमयीं स्वामी रामघळींत असतां तेथें जवळ राहणारी शिष्य मंडळी होती ती, स्वामींची कृपा कल्याण गोसांवी यांजवर बहुत

आहे, यास्तव जें काम सांगणें तें त्यासच सांगतात. असें आपसांत बोलूं लागली, तों कोणे एके दिवशीं दोनप्रहर रात्र जाहली असतां अकस्मात् विडा द्यावा, असें समर्थ बोलले, तेव्हां सर्व शिष्य उठून पानसुपारी पाहूं लागले, तों विड्याचीं पानें नाहींत, तेव्हां एकमेकांकडे पाहून बोलूं लागले कीं, पानें नाहींत आणि स्वामी तर विडा लौकर आणा असें ह्मणतात, आतां कसें करावें. असा विचार करितात तों स्वामींनीं पुनः हाक मारिली. तेव्हांशिष्यांनीं स्वामीजवळ येऊन विनंति केली कीं, महाराज ! पानें नाहींत सुपारी आणितों, असें ह्मणतांच स्वामींनीं कल्याणास हांक मारिली, आणि ह्मणाले कीं, कल्याणा विड्याचीं पानें पाहिजेत. असें ह्मणतांच कल्याणगोसांवी " आज्ञा महाराज " असें ह्मणून पानें आणावयास चाफळास जाण्याकरितां निघाले, आणि अर्धपर्वताखालीं आले तों मध्यरात्रीचा समय व अंधार निबिड, यामुळें मार्ग दिसेना तेव्हां मार्गावर एक मोठा कृष्णसर्प होता त्याचे पुच्छावर गोसांवी यांचा पाय पडतांच त्याणें त्यांच्या पोटरीस कडकडून दंश केला. त्यायोगें विव्हळ होऊन जयजय रघुवीर श्रीरामसमर्थ ! कृपा असावी असें ह्मणून पृथ्वीवर पडतांच अत्यंत मूर्छा आली तेव्हां तो कल्याणगोसांवी यांचा शब्द ऐकून स्वामी बोलले कीं, कल्याणाची गति काय जाहली ? हें पहावें ह्मणून शिष्यमंडळी सुद्धां समर्थ चुडी पेटवून खालीं आले. तों कृष्णसर्प एकीकडे बसला आहे, व एकीकडे कल्याण मूर्छित पडला आहे, हें पाहून समर्थ सर्पास बोलले कीं, तूं अशी पीडा करणारा आहेस, त्याअर्थीं या-

स्थानीं राहूं नये, निघून जा. असें ह्मणतांच त्या सर्पानें फणा काढून स्वामींस एक प्रदक्षिणा करून निघून गेला. ' नंतर स्वामी कल्याणाच्या जवळ येऊन तेथें बहिरोबा आहे त्यास नवस केला कीं, माझ्या कल्याणास विषापासून मुक्त करून उठवावें, ह्मणजे तुझे नावानें अकरा मण गूळ वांटीन. असें ह्मणून कल्याणाच्या अंगावर मस्तकापासून पादपर्यंत हस्तस्पर्श केला, आणि कृपार्द्र-दृष्टीनें पाहून ऊठ रे बाबा ! असें ह्मणून उठविला. त्याबरोबर कल्याण सावध होऊन नमस्कार करून विड्याचीं पानें आणा-वयास चालला. हें पाहून स्वामी बोलिले कीं, आतां जाऊं नको; विडा पावला. असें ह्मणून कल्याणास हातीं धरून पर्वतावर घळींत घेऊन गेले आणि झोळण्यांत पानें आहेत, किंवा नाहींत पहा, अशी कल्याणास आज्ञा होतांच झोळणा सोडून पानपु-ड्यांत पाहतो, तों पानें आहेत, तीं घेऊन कल्याणानें विडा क-रून दिला. नंतर सर्व शिष्यमंडळीस बोलले कीं, पहा कल्याणा-वरच स्वामींची कृपा, त्याचाच काम सांगतात, असा तुह्मीं हेवा करीत होतां, यास्तव तुह्मांपाशीं विडा मागितला. तेव्हां घरांत पानें नाहींत ह्मणून स्वस्थ बसलां, आणि कल्याणास पानें पा-हिजेत इतकें सांगितल्याबरोबर कांहींएक विचार न करितां अर्ध-रात्रीस पानांकरितां बाहेर निघाला. यावरून तुमच्या व त्याच्या निष्ठेचा विचार करा. असें ह्मणतांच सर्व शिष्यांनीं खालीं पाहून आह्मीं सर्व अपराधी आहों, असें ह्मणून साष्टांग नमस्कार केला.

तेव्हां स्वामी बोलले कीं, कोणाचा हेवा करीत जाऊं नये. आपले हातानें सेवा होईल ती करीत जावी, आणि आनंदांत असावें. आह्मीं तर काम करणारास काम सांगतों. तुह्मांसही सांगूं असें ह्मणून सर्वांचें समाधान केलें.

पुढें उडपीस श्री मध्वाचार्य स्वामींचें संस्थान आहे. त्या स्वामींस कळलें कीं, रामदास स्वामी ह्मणून श्रीमारुतो अंशेंकरून अवतार झाला आहे. त्यावरून त्यानीं मनांत विचार केला कीं, श्रीमारुती अंशेंकरून अवतार झाला आहे किंवा कसें या विषयीं शोधास कोणी मनुष्य पाठवावा. तो कांहीं चिन्हें पाहून आल्यानंतर खरें असल्यास आपण दर्शनास जावें अथवा त्यांजला येथें आणविण्याचें करावें. असा पूर्ण विचार करून शिष्य मंडळीपैकीं एक चतुर व चाणक्ष असा शिष्या बोलावून त्यास सांगितलें कीं, कऱ्हाड व वांई प्रांतीं रामदास ह्मणून सत्पुरुष उत्पन्न जाहाले आहेत त्यांजपाशीं तुह्मीं जाऊन त्यांचें चिन्ह ओळखून यावें. असें सांगून रवाना केला. तो मार्गीं येतांना एका ग्रामाच्या नदीतीरीं स्वयंपाक सिद्ध करून पात्र वाढून शाळिग्रामास नैवेद्य दाखवून उदक आणण्याकरितां नदीवर गेला. उदक घेऊन माघारा पानाजवळ आला तों एका श्वानानें पात्रास स्पर्श केला आहे. हें त्यानें पाहिलें आणि जवळ आला ह्मणून श्वानानें पलायन केलें. त्याकाळीं आचार्यशिष्यानीं विचार केला कीं, पात्रास स्पर्श करून श्वानपुत्र गेला यास्तव या अन्नाचा त्याग करावा हा मुख्य धर्म; परंतु त्याग केला असतां उदईक हा वेळपर्यंत अन्न

मिळावयाचें नाहीं. व हें कृत्य दुसऱ्यानें कोणी पाहिलेंही नाहीं. आपले अश्व भृत्य वगैरे तर झाडाचे आड लांब आहेत तस्मात् याजवर विष्णुतीर्थ सिंचन करून तुळसीसहवर्तमान ग्रहण करावें. असा विचार करून त्यावर तुलसीयुक्त तीर्थ सिंचन करून आचार्यशिष्यांनीं भोजन केलें. नंतर मार्गक्रमण करीत करीत कांहीं दिवसांनीं चाफळास येऊन पोंचले.

आचार्यशिष्यानीं चाफळास येतांच समर्थांची भेट घेतली आणि नमस्कार करून आपले स्वामींकडील संपूर्ण वर्तमान त्यांस कथन करून स्वामीनीं दिलेलें पत्र समर्थांपुढें ठेविलें. त्याकाळीं मुद्रांकित मध्वाचार्य स्वामीचें पत्र पाहून प्रत्यक्ष दर्शन झाल्याप्रमाणें मानून त्यास वंदन करून वाचिलें आणि आदरपूर्वक सांगितलें कीं, आपण स्नान करावें नैवेद्य सिद्ध झाला आहे. त्याकाळीं आचार्यशिष्यानीं समर्थांस विनंति केली कीं, महाराज आह्मीं वैष्णव दुसऱ्यानें केलेलें स्वयंपाकाचें भोजन करीत नाहीं. हें ऐकून दिवाकर भटजींस सांगून समर्थांनीं त्या शिष्यास सर्व साहित्य देवविलें. नंतर ब्राह्मणानें स्नान करून पाक सिद्ध केला. समर्थांनीं श्रीरघुपतीस नैवेद्य समर्पण करून सांगितलें कीं, पंक्ती वाढून सिद्ध करा, आह्मीं आज स्वहस्तानें तूप वाढूं. असें ह्मणून श्रीमारुतीचें दर्शन घेऊन आले तों पंक्ती वाढून तयारी झाली. आचार्यशिष्यानींही आपलें पान वाढून घेतलें हें समर्थांनीं पाहून तुपाचें भांडें हातीं घेतलें आणि प्रथमच त्या ब्राह्मणाचे पात्राजवळ येऊन

स्वहस्तें द्रोण त्याचे पात्रावर ठेवून तूप वाढिलें त्या समयीं तो शिष्य बोलला कीं, आह्मी स्वतः स्वयंपाक करून भोजन करणारे दुसऱ्यानें केलेलें व स्पर्श केलेलें अन्न भक्षण करीत नाहीं. अशी आपणास पूर्वीच विनंति केली असोन आपण आमच्या पात्रास स्पर्श केलात तस्मात् आह्मी या अन्नाचें आतां भोजन कसें करावें ? आपणही वैष्णवच आहां परंतु तप्तमुद्रांकित नाहीं.

याप्रमाणें आचार्यशिष्याचें भाषण ऐकून समर्थांनीं तुपाचें भांडें खालीं ठेवून मोठ्यानें रडूं लागले. त्यासमयीं सर्वत्र शिष्यमंडळीनीं विनंति केली कीं, महाराज, आपण श्रमी कां होतां ? असें ऐकून समर्थ ह्मणाले कीं, या ब्राह्मणानें आपले हातानें श्रम करून स्वयंपाक केला व पात्र वाढून घेतलें त्या पात्रास मी स्पर्श केला; त्या योगेंकरून ब्राह्मणाचें भोजन अंतरलें. केवढा हा अपवित्र देह ! ह्मणून मी रडतों. त्याकाळीं शिष्यांनीं विनंति केली कीं, महाराज आपण श्रमी होऊं नये. ब्राह्मणास पुनः साहित्य देतों. ते आणखीं चरु उतरून घेऊन भोजन करतील. समर्थ ह्मणाले बापहो ! ब्राह्मण स्वयंपाक करून भोजन करितील त्यास चार घटका वेळ लागणार आहे. यासाठीं श्रमी होत नाहीं. परंतु माझा देह श्रीरघुपतीनीं इतका अपवित्र कां उत्पन्न केला ह्मणून रडत आहें. शिष्यांनीं विनंति केली कीं महाराज हें काय ह्मणतां ? हें ऐकून तर मोठ्यानेंच हंबरडा फोडूं लागले.त्यासमयीं कल्याण गोसांवी यानीं विनंति केली कीं, महाराज, आपण श्रमी होऊं नये. त्यावेळीं समर्थ ह्मणाले कीं, श्रमी होण्याचें कारण इतकेंच कीं,

सर्वही देह अपवित्रापासून उत्पन्न होतात त्यांस शुद्धता येते; परंतु माझा देह कुत्र्याचे देहापेक्षांही अशुद्ध ह्मणून मी रडत आहें. पहा कुतऱ्यानें स्पर्श केलेलें अन्न श्रीविष्णुतीर्थानें शुद्ध होतें परंतु या देहानें स्पर्श केलेलें अन्न त्या तीर्थानेंही शुद्ध होत नाहीं. त्या काळीं शिष्य ह्मणाले महाराज, हें भाषण आपण काय करितां ? समर्थ ह्मणाले ह्या आचार्यशिष्यांनीं कुत्रा शिवलेलें अन्न विष्णुतीर्थानें शुद्ध करून भक्षिलें आहे कीं नाहीं, हें त्यांस विचारावें आणि मग मी बोलतों हें खरें आहे किंवा नाहीं हें पूर्णपणें समजेल. याप्रमाणें बोलणें झाल्यावर कल्याण गोसांवी खेरीज करून बाकी सर्वत्र मंडळीनें आचार्यशिष्यांस विचारलें कीं, समर्थ ह्मणतात हें खरें आहे किंवा कसें तें आपण त्यांस सांगावें. त्या काळीं आचार्यशिष्य बावा अति खिन्न होऊन लज्जायुक्त मौन्य धरून समर्थांपाशीं आले आणि साष्टांग नमस्कार घालून बोलले कीं, महाराज ! मी सर्वस्वी अपराधी आहें; चुकलों मला क्षमा करावी. समर्थ ह्मणाले आपण कांहीं चुकलां नाहीं. कुतऱ्यापेक्षांही माझा देह अपवित्र आहे तुह्मांकडेस काय दोष आहे ? आचार्य ह्मणाले महाराज ! शिक्षा झाली व मी ज्या कार्याकरितां आलों होतों तेंही कार्य झालें. परंतु समर्थांनीं कृपा करावी, माझी फजिती येथें झाली तशी स्वामींपाशीं होऊं नये असें करावें. हें ऐकून समर्थ बोलले कीं, या देहास. तप्तमुद्रांकित देहाची योग्यता आली काय ? आचार्य बोलले महाराज, आतां कृपा करावी, छळूं नये मी जेवितों. असें ह्मणतांच समर्थ हांसले. नंतर सर्व मंडळीसहवर्त-

मान भोजनास बसले. आणि आका व वेणुबाई यांनीं वाढिलें. नंतर कांहीं दिवस आचार्यशिष्यांस ठेवून घेऊन निरोप दिला. तो आचार्यशिष्य परत आपले स्वामीपाशीं येऊन समर्थांकडील सर्व वर्तमान निवेदन केलें. त्या समयीं स्वामींनीं विचारिलें कीं, ते इकडे कधीं येणार आहेत ? त्यांनीं सांगितलें कीं, दक्षिणमानस यात्रेस येणार आहेत त्या समयीं आपले दर्शनास येईन ह्मणून मजजवळ सांगितलें आहे. हें चरित्र शके १५७६ जयनाम संवत्सरीं झालें.

इकडे कोणे एके समयीं स्वामींचे मनांत रामेश्वरास जावें असें आलें. नंतर बरोबर भिकाजी गोसांवी, अका व वेणुबाई आदिकरून मंडळी घेऊन परळीहून वैशाख शुद्ध २ शके १५७७ रोजीं निघाले. तेव्हां मार्गानें जातां जातां कोणीं शरण येतील त्यांस पावन करीत होते, ते चिकोडी येथें वस्तीस गेले. तेथें तिमाजीपंत देशपांडे यांणीं महाभगवद्भक्त स्वामी आले आहेत हें ऐकून शरण जाऊन अनुग्रह प्रसाद घेतला. आणि आपले घरीं चार पांच दिवस स्वामींस राहून घेतले. नंतर समर्थ निघून जाऊं लागले, ते समयीं तिमाजीपंतास वियोगाचें परमदुःख जाहलें, तें पाहून समर्थांचे मनांत परम दया उत्पन्न झाली. नंतर त्यांस रामपंचायतन देऊन त्यांचें समाधान केलें. आणि पुढें निघून चालते जाहले. कोणे एके दिवशीं अस्तमानीं तिमाजीपंत बहिर्भूमीसगेले. तेथें अकस्मात् कृष्ण सर्पाचा दंश जाहला, तो पंतांनीं पाहून माघारां

आले आणि हस्तपाद प्रक्षालन करून हातीं वीणा घेऊन रघुपतीचे सन्मुख स्वामीचे करुणापर अभंग ह्मणत उभे असतां मध्यरात्रीचे समयीं देवाच्या मूर्ति काळ्या लोखंडाप्रमाणें जाहल्या. हें पंतांनीं पाहून प्रार्थना केली कीं, महाराज ! माझें विष आपण प्राशन केलें. तस्मात् आपण पूर्ववत् जाहल्यावांचून या स्थानापासून उठावयाचा नाहीं; हा देह येथेंच ठेवीन. असें ह्मणून पुनः भजनास प्रारंभ केला, तों अरुणोदयापर्यंत त्या मूर्ति पूर्ववत् जाहल्या. हें पाहून साष्टांग नमस्कार करून नित्य क्रमाप्रमाणें स्नानादिक केलें. नंतर मूर्तीची पूजा करून नैवेद्य समर्पण केला आणि मोठ्या समारंभेंकरून ब्राह्मणभोजन करते झाले. याप्रमाणें तिमाजीपंत हे मूळचेच परम भक्त. त्यांत समर्थांची कृपा, यास्तव यांची योग्यता कोठवर वर्णावी. (त्या रामपंचायतनाच्या मूर्ति अद्यापि त्यांच्या कुटुंबांत आहेत)

समर्थ चिकोडीहून निघाले ते फिरत फिरत तीर्थयात्रा करीत करीत जात असतां जे लोक शरण येतील त्यांस अनुग्रह प्रसाद देऊन पुढें जात. याप्रमाणें शिवकंची, विष्णुकंची, कुंभकोन, इत्यादि स्थानें पाहिलीं. त्यापांतीं वडदेस कावेरीचे उत्तर भागीं खाडपळें या गावीं श्रीआपय्या दीक्षित राहत होते त्यांची भेट घेतली. ते साक्षात् श्रीसांबअवतार असून त्यांची कीर्ती कर्नाटक, तैलंगण या देशांत फार आहे. त्यांचो भेट झाल्यानंतर समर्थ पुढें चालले ते चंदावरमांती गेले. हें वर्तमान श्रीशिवाजी

महाराज यांचा सापत्न बंधु व्यंकोजी राजे यांस समजतांच समर्थ जेथें होते तेथें आपण जाऊन त्यांनीं साष्टांग नमस्कार केला. नंतर बहुत नम्रतेनें स्वामींची प्रार्थना करून चंदावरीं घेऊन आले. तेथें रहावयास स्थान देऊन सर्व साहित्य सिद्ध असावें, अशी तरतूद करून देऊन सेवेशीं तत्पर जाहले, आणि कांहीं दिवस समर्थांस ठेवून घेतलें. व्यंकोजी राजे याजपासी एक आंध्रदेशांतील विद्वान् ब्राह्मण होता त्याचा अनुग्रह घेतला होता, त्यांची व समर्थांची भेट जाहल्यानंतर परमार्थपर भाषणें होत असतां त्यांनीं स्वामींस प्रश्न केला कीं, आपण बहुत थोर, व आपलें ब्रह्मचर्यव्रतही मोठें अशी कीर्ति बहुत ऐकण्यांत आहे, असें असतां स्त्रिया बरोबर असाव्या हें लौकिकांत विरुद्ध दिसतें हें काय! असें ह्मटल्यावरून स्वामींनीं हांसून त्यांजकडून एक पात्र आणविलें आणि कौपीन सोडून त्या पात्रांत आपलें वीर्य पतन केलें. तें पाहून ब्राह्मणमंडळीसह राजा शंकित जाहला, तों त्या पात्रांत इंद्रिय सोडून तें वीर्य पुनः आकर्षण करून घेतलें. हें पाहतांच ब्राह्मणांनीं उठून साष्टांग नमस्कार केला आणि आह्मी अपराधी शरणागत आहों असें ह्मणून ते समर्थांच्या पायांवर लोळूं लागले. तेव्हां त्यांचें अंतःकरण अतिशुद्ध जाहलें, असें स्वामींनीं पाहून त्यांस उठवून आलिंगन दिलें, आणि बोलले, कीं, तुह्मी बोललां तो लौकिक विचार खरा, असें ह्मणून बहुत प्रकारें त्यांचें समाधान केलें. त्यानंतर सर्वांनीं पुनः चरणीं मस्तक ठेऊन स्वामींनीं आह्मावर कृपा करावी, असें ह्मणतांच समर्थांनीं त्यांस अनुग्रह दिला.

नंतर सर्व ब्राह्मणांनीं व्यंकोजी राजे यांसही सांगितलें कीं, हे शिवाजीमहाराज यांचे गुरु आणि आमचेही गुरु आहेत, यास्तव आपणही यांचा उपदेश घ्यावा. त्याजवरून राजश्रीनीं प्रार्थना करून शके १५७७ मन्मथ नामसंवत्सरीं ज्येष्ठ वद्य ३ समर्थांचा अनुग्रह घेतला. नंतर स्वामी तेथें कांहीं दिवस राहून पुढें जावयास निघाले. तेसमयीं व्यंकोजीराजे यांणीं स्वामींनीं येथेंच राहावें ह्मणून बहुत प्रार्थना केली, कीं, शिवाजी महाराज यांजपाशीं राहावें आणि मजपाशीं कां न रहावें! कदाचित् नेहमीं राहण्याची मर्जी नसल्यास सहा महिने येथें रहावें, व सहा महिने महाराजांपाशीं रहावें. असें ह्मटल्यावरून स्वामी हास्य करून बोलले कीं, बापा ! तुह्मीं व शिवबा हे दोघेही मला सारिखेच आहां, अधिक उणे नाहीं, कांहीं दिवस येथें व कांहीं दिवस तेथें रहावें, असा विभाग कां करितां, सतत आह्मी तुह्मापाशींच आहों, आह्मास तर नेहमीं पर्यटन करणें, त्यास येथें अथवा तेथें नेहमीं राहणें कसें घडेल ? अशी समर्थांची आज्ञा जाहल्यावरून राजश्री स्वामीचा वियोग होतो, हें जाणून बहुत श्रमी होऊं लागले; त्यासमयीं स्वामीनीं त्याचें समाधान करून तुह्मास वियोगव्यथा न होईल तसें करितों, असें ह्मणून भिकाजीबावांस आज्ञा केली कीं, तुह्मी राजापाशीं मठ करून रहावें, असें ह्मटल्यावरून भिकाजी बोवांनीं विनंति केली कीं, मजला वियोग होतो याची वाट काय? त्यावरून स्वामी बोलले कीं, तुह्मी मानसपूजा करीत बसाल, त्या समयीं माझें प्रत्यक्ष दर्शन होईल. असें भिकाजीस सांगून मौनी-

गोसांवी प्रभृति त्रिवर्गांस तुह्मी भिकाजी गोसांवी यांजपाशीं रहावें, असें सांगून चौघांस चंदावरीं ठेविलें. आणि राजश्रीस तुह्मी भिकाजीचे आज्ञेंत असावें, असें सांगीतलें. नंतर भिकाजी गोसांवी यानीं पुनः अशी प्रार्थना केली कीं, महाराज, जें ध्यान मानसपूजेचें सांगितलेंत त्याप्रमाणें तसबीर काढून उत्साह वगैरे करण्याची परवानगी असावी, आज्ञेप्रमाणें काय करणें तें करीन. त्यासमयीं स्वामीनीं सांगितलें कीं, जेणेंकरून उपासना वाढून जगदोद्धार होईल त्या मानानें उत्साह करण्याची वहिवाट तुह्मीं ठेवावी. अशी आज्ञा होतांच भिकाजी बावांनीं मस्तक समर्थांचे चरणावर ठेविला, समर्थांनीं वरदहस्त मस्तकीं ठेवून उठविलें. (भिकाजी बावा यानीं आपले हातें समर्थांची तसबीर काढिली ती अद्यापि चांफळचे मठीं परळीवर आहे. शिरगांव येथें त्याचप्रमाणें लक्ष्मणगोसांवी यांनीं काढलेली तसबीर त्यांचेच मठीं शिरगांवास आहे, हें समर्थांचें चरित्र मौनी बावांनीं वर्णिलें आहे, त्यावरून लिहिलें आहे.)

समर्थांनीं तेथून निघते समयीं मौनीबावांस आज्ञा केली कीं, मी तसाच भिकाजी गोसांवी यांस मानून त्यांचे आज्ञेंत वागावें. असें सांगून राजश्री आदिकरून शिष्यसमुदायांचा निरोप घेऊन निघाले ते श्रीरामेश्वरास गेले, तेथून पांचाळक्षेत्रीं श्रीराघवेंद्र स्वामी होते त्यांस भेटून उडपी सुब्रह्मण्य क्षेत्रास गेले. त्या ठिकाणीं मध्वाचार्य स्वामीची भेट घेतली, त्यासमयीं आचार्यांस फार

आनंद होऊन त्यानीं समर्थांस कांहीं दिवस राहविलें, आदर सत्कार बहुत केला, सहवासाअंतीं समर्थ साक्षात् मारुती अवतार आहेत अशी त्यांची खातरी झाली. नंतर त्यांचा निरोप घेऊन समर्थ श्रीकृष्णातीरीं आले. हें वर्तमान शिवाजीमहाराजांस समजतांच तोरगळापर्यंत सामोरे जाऊन समर्थांस चांफळीं घेऊन आले. कांहीं दिवस राहून व्यंकोजीमहाराजांकडील वर्तमान विचारून समर्थांची आज्ञा घेऊन राजश्री गेले. हें चरित्र शके १५७७ सालीं झालें.

नंतर कोणे एके समयीं समर्थांची स्वारी परळीवर असतां सर्व शिष्यमंडळीस बोलावून समर्थांनीं सांगितलें कीं, खोलीचें कवाड लावून कुलूप घालावें आम्ही आंत निद्रा करितों पंधरा दिवस कवाड उघडूं नये तर सोळावे दिवशीं उघडावें. अशी आज्ञा होतांच शिष्यांनीं कवाड लावून कुलूप घातलें. आपण तेथून गुप्तरूपानें निघाले, ते मातोश्रीनें अंतकालाच्यासमयीं श्रेष्ठांचे मांडीवर मस्तक ठेऊन ती त्यांचें मुखावलोकन करून यासमयीं नारोबा नाहीं. असें बोलत आहे तों हा मी आलों, असें ह्मणून समर्थ " जयजय रघुवीर समर्थ " असा शब्द करून मातोश्रीसमीप आले. आणि नमस्कार करून उभे राहिले, तों मातोश्रीनीं जवळ बोलावून समीप बसवून उभयतां पुत्रांचें स्तवन केलें कीं, उभयतां तुह्मी माझ्या उदरीं येऊन उभय वंशाचाही उद्धार केलात, असें ह्मणतांच उभयतां नमस्कार करून बोलले कीं, अहा ! तूं आमची माता असून केवळ जगन्माता आहेस तुझे उदरीं जन्म घेऊन

आमचेंहि सार्थक जाहलें. तुमच्या पुण्यप्रतापेंकरून सर्व गोष्टी घडल्या. तुमचें पुण्य काय वर्णावें ! आतां देहांतसमयीं मूळस्वरूपीं लक्ष ठेऊन श्रीचे चरण अवयवयुक्त ध्यानांत ठेवून तदाकार व्हावें असें ह्मणतांच मातोश्री उत्तम आहे असें ह्मणून जयराम असा शब्द करून निःशब्द होती जाहली. (हें मातोश्रीचें निर्याण शके १५७७ मन्मथनामसंवत्सरीं ज्येष्ठ शु० ३ चे प्रातःकाळीं जाहलें.) त्यासमयीं उभयतांनीं पुत्रधर्म करावयाचा तो यथाविधि केल्यानंतर पंधरावे दिवशीं श्रेष्ठांची आज्ञा घेऊन समर्थ परळीस आले.

इकडे शिष्यमंडळी यांणी सोळाव्यादिवशीं कवाड उघडून पाहतात तों आंत स्वामी नाहींत तेव्हां कोणीकडे गेले असा विचार करीत आहेत, तों अंगळाईच्या देवालयांत समर्थ आहेत असें कोणीं सांगतांच सर्वांनीं तेथें जाऊन नमस्कार केला, आणि मुखाकडे पाहतात तों क्षौरादि विधि जाहला आहे तें पाहून सर्वांनीं विचारिलें कीं, हें काय ? तेव्हां समर्थ बोलले कीं, आमची मातोश्री परधामाप्रत गेली, यास्तव पुत्रधर्म कर्तव्य तो करून जांबेंत चौदादिवस राहिलों, आणि श्रेष्ठांची आज्ञा घेऊन येथें आलों, असें सर्वांस सांगितलें. शिवाजी महाराजांस हें वर्तमान कळतांच त्यांनीं येऊन दर्शन घेतलें. आणि त्रिरात्र राहून प्रार्थना केली कीं, माझे हातून निरंतर सेवा घेण्याविषयीं मी वारंवार प्रार्थना करीत असतां आज्ञा होत नाहीं ह्मणून आतां तरी सेवेस आज्ञा व्हावी असें ह्मणतांच डोमगांव व गोडरें या दोन गांवच्या सनदा करून द्याव्या. अशी समर्थांची आज्ञा होतांच त्या दोन गांवच्या

सनदा लिहून दिल्या. त्या सनदा समर्थांनीं कल्याणाजवळ देऊन आज्ञा केली कीं, तुह्मी ह्या सनदा घेऊन जावें, आणि मठ करून तेथें श्रींची मूर्ति स्थापून उपासनामार्ग वाढवावा. असें ह्मटल्यावरून कल्याणगोसांवी यांनीं विनंति केली कीं, सर्वदा जवळ असून सेवा घडावी, अशी माझी इच्छा आहे. आज्ञा तर वियोग होण्याची होत आहे त्यास मीं कसें करावें ! असें ह्मणतांच समर्थ बोलले कीं, कल्याणा ! तुह्मी माझें सर्वदा चिंतन करितां यास्तव नेहमी जवळच आहां. आमच्या आज्ञेप्रमाणें जगदुद्धार करून सत्कीर्ति वाढवावी.

जसें झाडाखालीं झाड वाढत नाहीं, याप्रमाणें आह्मापाशींच सर्वदा राहिल्यानें तुमची कीर्ति वाढावयाची नाहीं. यास्तव आमच्या आज्ञेचें उल्लंघन न करितां आपण जाऊन स्वतंत्र उपासनामार्ग वाढवावा. असें समर्थांनीं बहुत प्रकारें सांगितल्यावरून त्यांची आज्ञा घेऊन कल्याणस्वामी निघाले. तेसमयीं स्वामींनीं वाईकर चित्रांव यांचे घरचा मूल उद्धव, जगन्नाथ गोसांवी निंबकर कुळकर्णी यांचा मूल व चेरकर कुळकर्णी यांचा मूल अशीं तीन मुलें कल्याणाचे स्वाधीन केलीं, तीं घेऊन ते डोम गांवीं गेले. आणि आज्ञेप्रमाणें करून उपासना मार्ग वाढवीत असतां बहुत सत्कीर्ति केली. स्वामी असतां त्यांचे दर्शनास दोन तीन वेळां येऊन पुन; आज्ञा घेऊन गेले. (कल्याणस्वामीची संस्थान करण्याची व उपासनामार्ग वाढविण्याची कथा आलाहिदा आहे.)

नंतर कोणे एके दिवशीं समर्थ जयरामस्वामिप्रभृति शिष्यमंडळीसुद्धां मिर्जेस गेले. तेथें अविंधाचें ठाणेदार दिलालखान नांवाचा अधिकारी बहुत क्रूर होता. तेथील कोणीएक गृहस्थानें रस्त्यांत कनाती देऊन जयरामस्वामीचें कीर्तन करविलें. त्या कीर्तनाचा रंग भरून राहिला होता त्या संधीस यवनाची स्वारी समनामीर पीराच्या दर्शनास जावयाकरितां रस्त्यांतून जात आहे; तों टाळमृदंगांचा घोष ऐकून " ये क्या तमाशा है " असें त्या यवनानें विचारितांच जवळच्या मंडळीनीं विनंति केली कीं, " हिंदूका फकीर आनंदसे देवभजन करता है " असें ऐकून तो यवन कनातीजवळ उभा राहिला. तेव्हां जयरामस्वामी कीर्तनाचे बहारांत आनंदांत येऊन वास्तविक बोलले कीं, जो कोणी प्राणी दुष्ट अथवा सुष्ट असो, त्यास साधूंचा मुहूर्तमात्र समागम झाला असतां ते साधु साक्षात् श्रीरामदर्शन करवितात. हा शब्द त्या यवनानें पक्केपणें स्मरणांत ठेवून तो समनामीर पीराच्या दर्शनास गेला, तेथून मावारा किल्ल्यांत जातानां हा गृहस्थ कोठील कोण, कोठें राहतो ? याचा गुप्तपणें ठिकाण लावण्याकरितां जासुदास हुकूम करून गेला नंतर जासुदानें गुप्तरीतीनें शोध करून बातमी सांगितल्यानंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून सदरेस बैठकी तयार करवून थोर थोर मुसलमान व हिंदु यांस कचेरीस बोलाविलें. आणि जयरामस्वामी बिन्हाडीं होते तेथें पालखीसहवर्तमान बहुत समारंभानें बोलावणें पाठविलें.

इकडे प्रातःकाळीं उठून स्वामी कृष्णास्नानास गेले, जयरामस्वामीही जाण्याच्या उद्योगांत आहेत तों, यवनाचें बोलावणें येऊन पोहोंचलें. कारकुनानीं जाऊन विनंति केली कीं, खानांनीं बहुत संतोषी होऊन स्वामींस बोलाविलें आहे. असें झटल्यावरून आपल्यास म्लेंच्छाकडे जाण्याचें कारण नाहीं. तथापि समर्थांस विचारून जावें, तर ते स्नानास गेले आहेत, असा विचार करीत आहेत, तों सर्वांनीं विनंति केली कीं, हा गांवचा प्रभु आहे, यास्तव त्याकडे जाणें अवश्य प्राप्त आहे. हें ऐकून बरोबर शिष्यमंडळी घेऊन जयरामस्वामी किल्ल्यांत गेले. यवनानें जयरामस्वामी येतात, हें ऐकतांच आपण दरवाजापर्यंत बाहेर आला, आणि रुमालानें हात बांधून बहुत मुजारतीनें त्यांस वाड्यांत नेऊन गादीवर बसविलें. आणि आपण त्यांच्या समोर हात जोडून उभा राहिला असतां खिजमतगारास डोळा घालतांच त्यानें सरपोसानें झांकलेलें तबक स्वामीपुढें ठेविलें. नंतर खानानें हात जोडून प्रार्थना केली कीं, " कल अपने भजनमें कहा जो फकीर (साधु) का मीलाप घडीभर होनेसे वो साधु श्रीराम बतातेहैं, तो हमकूं आपका मिलाप चार घडी हुआ और रामरहीम ये दो नहीं है (यकही है) वास्ते हमकूं राम दिखलाना चाहिये " असें झटल्यावरून जयरामस्वामी बोलले कीं, साधूंनीं सांगितलेल्या गोष्टी निरंतर भजन पूजन केलें असतां कालेंकरून घडतात. असें झणतांच खान बोलला कीं, " अब ऐसी बात नहीं बोलना; कारन बुरा या भला कैसाभी हो तोभी उसकु साधका मीलाप होनेसे

श्रीरामका दरसन होताहै. ऐसा आपका कल बोलना हुवा वास्ते मुजे रामदर्शन कराना चाहिये नहीं तो आपकुं मैं मुसलमान बनाऊंगा " असें बोलून तवक उघडून मांस दाखविलें.

त्या काळीं जयरामस्वामीनीं स्तब्ध होऊन यवनास सांगितलें कीं, आपलें तवक झांकून ठेवावें, आमचे गुरु आहेत त्यांस आणवितों, ते या गोष्टीचा निकाल करतील. तो न जाहल्यास उभयतांही भ्रष्ट होऊं, चार घटिका अवकाश मात्र करावा. असें ह्मणतांच " वो किधर है सो कहो कारन मै उने बुलाना भेजताहुं " तेव्हां जयरामस्वामीनीं सांगितलें कीं, तुमच्या बोलावण्यानें ते येणार नाहींत, मीच बोलावून आणवितों. असें ह्मणून गोपाळ गोसांवी यांस सांगितलें कीं, तुह्मी जलद जाऊन समर्थांस सविस्तर वर्तमान निवेदन करून बरावर घेऊन यावें. अशी आज्ञा होतांच गोपाळगोसांवी जलद वायुवेगेंकरून कृष्णेस गेले, आणि स्वामीस सविस्तर वर्तमान निवेदन करून सांगितलें कीं, आपण लौकर चलावें, अवकाश केल्यास पुढें विचार बरा दिसत नाहीं. अशी विनंति करितांच स्वामी रागें भरून " जे आपणास साधु ह्मणवितात त्यांनीं श्रीरामदर्शन करवावें, आह्मी येत नाहीं " असें बोलले, आणि तूं निघून जा ह्मणून आज्ञा केली.

यावरून गोपाळगोसांवी चिंताग्रस्त होऊन समर्थ येत नाहींत त्यापेक्षां पुढें बरें दिसत नाहीं, या काळजीनें धैर्य खचल्यामुळें पाय उचलेना; तथापि तसेच संकटानें मार्गी जात आहेत तों इकडे समर्थांनीं विचार केला कीं, जयरामाची गति बरी नाहीं, हें मनांत

आणून गोपाळगोसांवी जाण्याचे पूर्वीच आपण जाऊन यवनाच्या कचेरींत उभे राहिले, आणि जयराम ! कां बसलास ? ऊठ असें ह्मणतांच जयरामस्वामी बोलले कीं, स्वामी ! ह्या अधिकाऱ्याचें ह्मणणें असें आहे कीं, मला श्रीरामदर्शन करवा, नाहीं तर तुह्मांस मी यवन करीन. त्यास याचा निकाल झाल्यावांचून उठणें कठीण. असें ऐकून समर्थांनीं खानाकडे मुख करून तुह्मांस श्रीरामदर्शन पाहिजे कीं काय ? असें विचारितांच, हजरत ! होय. असें यवनानें ह्मणतांच साधु ज्या मार्गे करून जातील त्या मार्गे करून तूं येशील तर तुला रामदर्शन होईल, असें समर्थ बोलले. तेव्हां त्यानें विनंति केली कीं, " आप हुकूम करोगे उस रस्तेसे मैं आउंगा " असें ह्मणतांच जयरामा ! ऊठ, असें बोलून खानासही उठविलें. नंतर किल्लयाच्या सफेलीवर आले. आणि आपण जंगीचे भोंकातून बाहेर जाऊन जयरामा ! तूंही याच मार्गानें बाहेर ये. असें ह्मणतांच जयरामही त्या मार्गानें बाहेर गेला. नंतर खान उभे होते त्यांसही सांगितलें कीं, तुह्मीही याच मार्गे खालीं यावें, ह्मणजे श्रीराम येथें उभा आहे तुह्मास दाखवितों. असें ऐकून त्या मार्गाची त्यांस गति नसल्यामुळें खान बोलले कीं, " हिंदूके फकीर अवलिया है " असें ह्मणून सद्गदित होऊन बाहेरून येऊन साष्टांग दंडवत् करून " हमारी मुसलमान जात बहुत क्रूर और नीच है उस जातका मैहूं वास्ते अब स्वामीनें मेरा गुन्हा माफ करना और मुज गरीबका भला करना और मेरी जातपर बिचार करना नहीं " ह्मणून बहुत प्रकारें प्रार्थना केली.

त्यावरून स्वामी कृपाळु होऊन तूं सर्वदा राम राम म्हणत जा, अशी आज्ञा केली. नंतर खानानें विनंति केली कीं, "मेरे पास आपने हमेशा रहना चाहिये" असें त्यानें म्हटल्यावरून एके ठिकाणीं आम्हांस राहणें नाहीं; परंतु आम्ही राहिल्याप्रमाणें कोणास तरी येथें ठेऊन जातों. मठ करण्याकरितां जागा मात्र दाखवावी. असें समर्थांनीं म्हणतांच त्यानें आपल्या मशिदीजवळ जागा दाखविली. नंतर समर्थांनीं वेणुबाईस आज्ञा केली कीं, खानाचा मजपाशीं आपण निरंतर राहावें असा आग्रह आहे, त्यास तुम्हीं येथें मठ बांधून नेहमी सुखेंकरून रहावें. असें म्हणतांच वेणुबाई बोलली कीं, स्वामींची आज्ञा उल्लंघवत नाहीं आणि वियोग तर सहन होत नाहीं. यास्तव तो नसावा येविषयीं आज्ञा असावी. अशी बहुत नम्रतेनें विनंति करितांच स्वामी हांसून बोलले कीं, वेणु तुजला कोठेंही राहून सेवा करणें, तुला वियोग तो काय ? तुजपाशीं मी सतत आहेंच; तत्रापि आमची पूजेची पट्टाभिरामाची मूर्ति आहे, ती देतों ती घेऊन तिचें पूजन अर्चन करून जगदुद्धार करावा, आणि प्रतिवर्षीं रामनवमीचे उत्साहास चाफळास येत जावें. अशी आज्ञा करून तेथील संस्थानाच्या बंदोबस्ताविषयीं खानास सांगून त्याचा निरोप घेऊन स्वामी चाफळास आले. (ही कथा शके १५७७ मन्मथनाम संवत्सरीं श्रावणमासीं जाहली.)

शिवाजी महाराज कोणे एके दिवशीं दर्शनास येऊन पूर्वपद्धतीप्रमाणें नमस्कार घालून उभे राहिले. तेव्हां बसण्याविषयीं सम

थींची आज्ञा जाहली, त्याप्रमाणें बसून शिवाजी महाराजांनीं प्रश्न केले, त्यांचीं समर्थांनीं उत्तरें दिलीं. त्यानंतर राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज ! उत्साह व महोत्साह यांच्या बंदोबस्ताविषयीं मला आज्ञा होत नाहीं ती व्हावी. हें स्वामीनीं ऐकिलें न ऐकिलेंसें केलें असतां पुनः राजश्रीनीं स्वामींस दंडवत् प्रणिपात करून सन्मुख उभे राहिले. तेव्हां समर्थांची आज्ञा जाहली कीं, तूं जें करीत आहेस ही सर्व सेवाच आहे, तत्रापि तूं म्हणतोस तर केव्हां तरी आज्ञा करूं; तेव्हां आपली आज्ञा होईल ती शिरसा वंद्य आहे, असें राजश्रींनीं म्हणून नमस्कार करून स्वगृहीं जाते जाहले.

कोणे एके दिवशीं महाराज साताऱ्याचे किल्ल्यावर आहेत त्या संधीस स्वामी माहुलीकडून येऊन करंजास भिक्षा मागून माचीस आले आणि तेथें भिक्षा करीत असतां शिवाजी महाराज किल्ल्यावरून खालीं राजवाड्यांत आले. तों स्वामीही अकस्मात् राजवाड्यांत भिक्षेस आले. हें शिवाजीनें ऐकतांच बाहेर येऊन दंडवत केलें, आणि बाळाजी आबाजी चिटणीस यांचे हातें चिठ्ठी लिहून तिजवर आपले हातची धाकटी मुद्रा करून ती चिठ्ठी स्वामीच्या झोळींत टाकिली. हें पाहून स्वामीनीं विचारिलें कीं, शिवबा ! झोळींत काय टाकिलें ? महाराज ! भिक्षा घातली. असें शिवाजीनें सांगतांच झोळींत हात घालून ती चिठ्ठी बाहेर काढिली आणि उद्धवा ! चिठ्ठी वाच, म्हणून समर्थांची आज्ञा होतांच उद्धवानें चिठ्ठी घेऊन वाचली. त्यांतील (आजपर्यंत मिळविलें तें

सर्व स्वामींस अर्पण असो.) हा भाव जाणून शिवबा ! तूं आपलें राज्य आह्मास अर्पण केलेंस आतां तुह्मी काय करणार ? असें समर्थांनीं विचारिलें असतां श्रीनें सेवा घ्यावी आणि आह्मी सेवा करून नेहमीं सन्निध रहावें असें शिवाजीनें ह्मणतांच उत्तम आहे, आमचे बरोबर चलावें. असें ह्मणून समर्थांनीं आपली झोळी राजश्रींचे खांद्यावर दिली. आणि पुढें आपण व मागें शिवाजी असे भिक्षेस निघाले.

रोज दहा पांच घरें भिक्षा मागावयाची पद्धत असून त्या दिवशीं घरोघर टिपून भिक्षा मागितली. तों दोनप्रहरचा समय झाला. ह्मणून परळीस जावयाचें टाकून वेण्ण्येचे कांठीं गेले. तेथें जाऊन शिष्यांचे हातीं रानशेणी आणविल्या, आणि दगडावर पीठ मळून पानगे भाजले. ते यथाविभागें जवळच्या मंडळीस, आपणास व शिवाजी महाराजांस वांटून दिले. ते भक्षण करून उदक प्राशन केलें, नंतर हस्तप्रक्षालन, आचमन, व तुळसीदळ भक्षण करून सर्व बसले. जेव्हां समर्थांनीं प्रश्न केला कीं, कां ? शिवबा! आह्मापाशीं राहून कसें सुख आहे तें पाहिलेंस ना ? शिवाजीनें उत्तर केलें कीं, महाराज ! या सुखाचीच इच्छा करून आहें. समर्थांनीं बहुत संतोषी होऊन त्यास पुढें बोलाविलें. शिवाजी पुढें होऊन नमस्कार करून हस्त जोडून उभे राहिले. समर्थ बोलले शिवबा ! आह्मी एक मागतों तें द्याल काय ? शिवाजी बोलले, हा देहच आपला आहें, स्वामींनीं मागावें आणि म्यां

द्यावें तें काय ? जें आहे तें सर्व स्वामीचेंच आहे. समर्थ बोलले, शिवबा ! असा तुमचा निश्चय आहे तर आम्ही पूर्वी सांगितल्याप्रमाणें राज्य करून आमची सेवा करावी. अशी आज्ञा होतांच शिवाजीनें पुनः नमस्कार करून आपली आज्ञा उल्लंघन करण्याचें सामर्थ्य नाहीं; परंतु या व्यापारांतून सुटावें आणि स्वामींचो सेवा अखंड घडावी ही इच्छा आहे, अशी प्रार्थना केली. तेव्हां समर्थांनीं पुनः आज्ञा केली कीं, शिवबा ! ब्राह्मणानें तपश्चर्या करावी आणि राजानें राज्य करून त्यांचें संरक्षण करावें. हा मुख्य धर्म आहे, येविषयीं पूर्वकथा सांगतों ती ऐकावी.

श्रीरामचंद्रजीनें आपले गुरु वसिष्ठ महर्षि यांस गुरुदक्षिणा म्हणून आपलें सर्व राज्य अर्पण केलें. त्या वेळीं ब्रह्मनिष्ठ वसिष्ठ यांणीं राजधर्म व नीति इत्यादि सांगितली ती अशी कीं, ब्राह्मणांनीं तप करावें, आणि राजानें यथान्याय राज्य करून त्यांचें पालन करावें, हा त्याचा धर्म आहे. यास्तव यांत गुरुसेवाही घडते. आतां तूं मला राज्य अर्पण केल्यामुळें हें राज्य माझें खरें, परंतु तपश्चर्या सोडून मला राज्य करावयाचें नाहीं आणि शिष्यही गुरूचाच पुत्र आहे यास्तव तूं या माझ्या राज्याचें संरक्षण करून प्रजेचें पालन करावें. अशी वसिष्ठ गुरु यानीं श्रीरघुपतीस आज्ञा करून आपण तपश्चर्येस गेले. नंतर आज्ञेप्रमाणें श्रीरघुपति राज्य करिते झाले. याप्रमाणें सांप्रत आमच्या राज्याचें संरक्षण तुम्हीच करावें अशी समर्थांची आज्ञा होतांच शिवाजी बहुत

संतुष्ट व सद्गदित होऊन 'आज्ञा प्रमाण' असें ह्मणून उभे राहिले, समर्थांनीं उद्धवास सांगितलें, कीं, तुजजवळ जी चिठ्ठी आहे ती शिवबापाशीं परत द्यावी, असें ह्मणतांच राजश्री ह्मणाले स्वामी ! माझें राज्यं तूं चालवावें ह्मणून आपली आज्ञा असतां चिठ्ठी माघारी देऊन माझी परीक्षा करावयाची असल्यास मी कसा पुरा पडेन. तेव्हां स्वामींनीं हास्य करून शिवबा ! तुझें व माझें हा संकल्प अद्यापि तुजपाशीं असल्यास दिवाकर याजपाशीं ही चिठ्ठी राहूं द्यावी, आणि तुह्मी राज्य करावें. अशी समर्थांची वारंवार आज्ञा होत असतां महाराज ! पादुका दिल्यावांचून राज्य करणें प्रशस्त वाटत नाहीं. अशी शिवबाची विनंति श्रवण करून समर्थांनीं बहुत बरें असें ह्मणून पादुका दिल्या आणि श्री रघुपतीची आज्ञा झाल्याची वगैरे गुह्य गोष्ट सांगून समाधान करून पुनः शिवाजीस राज्याधिकारावर पाठविलें.

तेव्हां राजश्रीनीं नमस्कार करून विनंति केली कीं, राज्यव्यवहार करण्याविषयीं आज्ञा होते त्यास आजपर्यंत राज्यव्यवहार कांहीं स्वमतें व कारभाऱ्यांचे मतें चालला आहे. हल्लीं पुनः राज्य कारभार करण्याविषयीं आज्ञा होते,तर परलोक साधनाचा उपाय कसा करावा? समर्थ बोलले कीं, व्यवहाररीत्या राजधर्म करून परमार्थ कसा करावा तें सांगतों, त्या रीतीनें चालावें. असें ह्मणून राजधर्म सांगावयास प्रारंभ केला तोः—

भाग १२ वा.

राजधर्म परमार्थ.

इहलोकीं कीर्ति संपादन करून परलोक साधनाविषयीं बहुपुण्यें करून देवयोनी प्राप्त होते. फार पापें करून दैत्ययोनी प्राप्त होते, पापपुण्य सारखें झाल्यास मनुष्ययोनी प्राप्त होते. त्या मध्यें ब्राह्मण योनी प्राप्त झाल्यास तो जन्म इह सौख्याविषयीं नाहीं. देह प्राप्त झाल्याची सार्थकता करावी, वर्णाश्रम धर्मेंकरून चालावें. श्रीगुरूस शरण जाऊन त्याची कृपा जेणेंकरून होईल अशी सेवा करावी, सद्गुरूचे पाय सतत चित्तीं धरावे. श्रीगुरूनीं सांगितल्या गोष्टीचें सतत स्मरण ठेवावें. प्रथम आलस्य, निद्रा आणि निंदा टाकावीं. व्यवहारसंबंधें यथामतीनें यथाशक्ति धर्मशास्त्र अवलोकन करावें. हा ब्राह्मणदेह झाल्यास त्या देहाचा धर्म होय.

दैवयोगेंकरून राजा झाल्यास राजधर्म, प्रजापालन, नीति-न्यायेंकरून सर्वत्रांस आपापले वर्णाचे धर्माप्रमाणें चालवावें. देव, देवतास्थानें यांचे ठायीं प्रीति ठेवून त्या देवतांस नैवेद्य नंदादीव इत्यादि द्यावे. आपण नानाप्रकारच्या लिपी लिहूं शिकाव्या, कर्ममार्ग ध्यानांत आणावा व त्यांत सत्समागम करावा. नाना-मतांचें तर्कज्ञान असावें. त्यांत घेण्यासारखें असेल तेंच घ्यावें. अति विनोद कोणाशींही करूंनये. मसलती शिकवाव्या, आणि शिकाव्या, मनुष्यें जवळ परीक्षा करून बाळगावीं. जे मनुष्य कार्यकर्ते त्यांजवर

विश्वासही ठेवावा. कार्यकर्तेपणाची परीक्षा पाहून अधिकार वाढवावा. कार्यकर्ता आणि विश्वासू असून हेकड असल्यास आपण समुद्रासारखें सांठवण करावी. कामगारांत जशी ज्याची योग्यता तसतसा त्यांचा बंदोबस्त ठेवून त्यांचे हातून अधिकारप्रमाणें सेवा आपण निरालस्यपणें घ्यावी; आणि देश, दुर्ग, कोट यांचाही बंदोबस्त विश्वासू मनुष्यांचे हातून करवावा; परंतु आपण त्या बंदोबस्ताची चौकशी पाहून जमेदारांत नूतन कोण पुरातन कोण कार्यकर्ते कोण आहेत तें पाहून त्यांचे मगदुराप्रमाणें त्यांचे हातून सेवा घ्यावी व त्यांजवर विश्वास ठेवण्याजोगा असेल तितका ठेवावा. सैन्यांत सेनापती शूर, धैर्यवान् धार्मिक व एकपत्नीव्रती असा गुणवान् पाहून ठेवून त्यास सेनाधिकार द्यावा; तो आपले प्रत्यान्नायाचे योग्यतेचा असावा, दोन लेखक असावे. याप्रमाणें राजधर्मरीतीनें राज्य चालवावें. तुह्मीं चतुर आहां फार सांगावयास नको. धान्यकोश व द्रव्यभांडार इत्यादिकांचा संग्रह अजरामरवत् करीत असावें. परमार्थाविषयीं देह क्षणभंगुरवत् जाणून सर्व विषयांचा त्याग मनोजयवृत्तीकरून करावा एतदर्थी वाक्यः—

॥ श्लोक ॥

अजरामरवत्प्राज्ञो ॥ विद्यामर्थं च साधयेत् ॥
गृहीत इव केशेषु ॥ मृत्युना धर्ममाचरेत् ॥ १ ॥

याप्रमाणें व्यवहार करून देहाचें सार्थक करावें. सद्गुरूची कृपा संपादन करून प्रपंचासह परमार्थ करावा. याविषयीं पुनः सांगतों श्रवण करावें. असें ह्मणून स्फुट समास सांगितला तोः—

॥ ओंव्या ॥

कोणाचा भरंसा न धरावा ॥ आपुला आपण विचार पहावा॥
तकवा उदंड धरावा ॥ हाही एक विषयीं ॥ १ ॥
देहदुःखें कदरों नये ॥ उदंडचि करावे उपाय ॥
मग सर्व सुखास काय ॥ उणें आहे ॥ २ ॥
एकांतीं चाळणा करावी ॥ धारणा उदंड धरावी ॥
नाना विचारणा करावी ॥ अरि मित्राची ॥ ३ ॥
प्रयत्नीं चुकों नये ॥ सुखवासी कामा नये ॥
सुचावे नाना उपाय ॥ अनेक विषयीं ॥ ४ ॥
धुरेनें धीर सोडूं नये ॥ मुख्य प्रसंग चुकों नये ॥
उद्योगरहित कामा नये ॥ पशु जैसे ॥ ५ ॥
उपाधीस कंटाळला ॥ विचाराचा आळस आला ॥
ह्मणजे जाणावा चेवला ॥ बुद्धिपासुनी ॥ ६ ॥
खबरदारी आणि वेगीं ॥ तेणें सामर्थ्य चढे अंगीं ॥
नाना प्रसंगें कार्यभागीं ॥ अंतरचि न पडे ॥ ७ ॥
कार्यकर्ते दूरी करावे ॥ प्रसंगीं सवेंचि हातीं धरावे ॥
परंतु शोधोनि पहावे ॥ कपटाविषयीं ॥ ८ ॥
जेथें बहु विचार ॥ तेथें ईश्वर अवतार ॥
मागें झाले थोर थोर ॥ धके चपेटे सोसूनी ॥ ९ ॥
आपल्या मनासीं रोधावें ॥ परांतर शोधावें ॥
क्षणक्षणा सांभाळावें ॥ बदलेल ह्मणूनी ॥ १० ॥
पाहिलेंच पाहावें ॥ केलेंचि करावें ॥

शोधिलेंचि शोधावें ॥ राज्यकारण ॥ ११ ॥
इशारतीचें बोलतां नये ॥ बोलायाचें लिहूं नये ॥
लिहावयाचें सांगूं नये ॥ जबाबीनें ॥ १२ ॥

॥ इति सावधता प्रकरण स्फुट समास समाप्त ॥

या प्रमाणें समर्थांनीं उपदेश केला तो महाराजांनीं श्रवण करून साष्टांग नमस्कार करून उभे राहिले आणि मनांत म्हणतात कीं, ध्रुवास नारद महाराज जसे गुरु होते तसेच समर्थ माझे गुरु. याप्रमाणें संकल्पयुक्त नेत्रीं आनंदाश्रु स्रवताहेत, अंगावर रोमांच उभे राहिले. हें पाहून समर्थ आनंदयुक्त बोलले कीं, बापा! शाबास योग्य आहेस! कोणेविषयीं चिंता करूं नकोस, तुझ्या हातून श्रीसेवा घेणार समर्थ आहेत. ध्रुवावर श्रीविष्णूनीं कृपा करून त्याचे हातें सेवा घेऊन अक्षयपदीं स्थापिलें. तशीच श्रीची कृपा तुजवर आहे काळजी करूं नये. हें समर्थांचें वाक्य श्रवण करून पुनः साष्टांग नमस्कार करून राजश्री म्हणाले कीं, महाराज, ध्रुवावर श्रीची कृपा जाहली ती नारद स्वामींचे कृपेंकरून झाली; तशी समर्थकृपेंकरून जी सेवा घेणार ती घेवोत. परंतु समर्थांचें दर्शन तेंच श्रीदर्शन होय. सेवा घ्याल तशी करीन, सर्व काळजी स्वामींस आहे, यापरती विनंति काय करावी? असें म्हणून स्तब्ध उभे राहिले. आनंदाश्रु नेत्रीं स्रवताहेत, हें समर्थांनीं पाहून उठून आलिंगन दिलें. मस्तक अवघ्राण करून म्हणाले कीं, राजा तूं विदेही जनकाप्रमाणें माझ्या राज्याचें संरक्षण करून प्रजेचें पाळण पोषण करावें;

हीच सेवा होय. धर्मसंस्थापना तुझे हातून करावयाची आहे. अशी आज्ञा होतांच पुनः राजश्रीनीं दंडमाय नमस्कार करून हात जोडून उभे राहिले आणि विनंति केली कीं, महाराज जन्म जन्मांतरीं यातना सोसून या नरदेहास प्राप्त झालों; पूर्व संचितें करून अकस्मात् श्रीचरणांची गांठ पडली. यास्तव समर्थांनीं माझा अव्हेर न करितां पुनरपि जन्मास कारण न होय असें करावें. ही इच्छा धरुन सतत सेवा घेण्याविषयीं विनंति करीत आहें. आज्ञा झाली त्या प्रमाणें न करावें तर अवज्ञा होते. या करितां स्वामीनीं कृपा करून जी आज्ञा करणें ती करावी. समर्थ बोलले कीं, शिवबा तुह्मीं कांहीं काळजी करूंनये. तुमचा सर्व भार श्रीवरआहे; याकरितां राज्य करावें. राजश्रीनीं विनंति केली कीं, आज्ञा होते त्याप्रमाणें करितों; परंतु समर्थांनीं कृपा करून पादुका द्याव्या, त्या आश्रयानें व्यवहार करीन. त्यावरून समर्थांनीं पादुका दिल्या आणि सांगितलें कीं, पूर्वी व सांप्रत व्यवहाराविषयीं नीति सांगितली आहे त्याप्रमाणें करावें. परमार्थाविषयींही पूर्वी सांगितलें आहे व आतां सांगितलें त्याप्रमाणें करितच आहां. राजानें आपले राज्यांत सहज शत्रु कोण व सहज मित्र कोण याचें वारंवार मनन करून राज्य करावें. हाच विषय परमार्थाकडे लावून परमार्थ साधावा. कोणत्याही गोष्टीची काळजी करूं नये. या प्रमाणें आज्ञा करून निरोप दिला. नंतर महाराज साताऱ्यास आले. हें चरित्र शके १५७७ मन्मथनाम संवत्सरीं चैत्र वद्यपक्षीं झालें. आणि स्वामी निघून परळीस गेले.

कोणे एके समयीं स्वामी परळीचे किल्ल्यावर असतां ते नित्य पंक्तीस भोजन करीत नसत, एकांतीं भोजन करावयाची चाल असे. एकवेळ पुष्कळ पदार्थ वाढावयाचे म्हणून शिवाजी महाराजांनीं विस्तीर्ण ताट करून त्यास चौसष्ट वाट्या खिळून दिल्या होत्या. तेथें वेणूबाई स्वामिसेवेकरितां रहात असून नित्य स्वयंपाक करीत असे आणि एकवेळ ताट भरून नेऊन ठेवीत असे. स्वामीनीं दार लावून नैवेद्य समर्पण करून भोजन करावें. हा नित्यपाठ होता, त्याप्रमाणें एके दिवशीं वेणूबाई इनें नैवेद्याचें ताट भरून खोलींत नेऊन ठेवून दार लावून बाहेर आली आणि स्वयंपाकघरांत जाऊन पाहते तों वाढण्यापैकीं चुकीनें राहिलेला पदार्थ घेऊन खोली जवळ आली आणि आंत जाण्याकरितां किंचित् कवाड उघडून पाहते तों मारुतीसहवर्तमान समर्थ भोजन करीत आहेत हें पाहिलें. वेणूबाई आंत येते हें पाहून मारुतीनीं भुभुःकार केला, तो ऐकतांच वेणू मूर्छित पडली. नंतर स्वामी भोजन होतांच बाहेर आले. तेव्हां वेणू तशीच पडली आहे हें पाहून आकानीं प्रार्थना केली कीं, महाराज ! वेणूस उठवावें. समर्थ बोलले नैवेद्य समयीं येऊं नये अशी आज्ञा असतां ही कां आली ? अका बोलली महाराज ! आपण आमचे आई बाप, याकरितां आपलीं मुलें एकांतीं जरी आलीं तथापि दंडास पात्र होत नाहींत. असें मनांत आणून कृपा करावी. अशी अकाची विनंति ऐकतांच स्वामी प्रसन्न होऊन वेणूजवळ आले, आणि हस्तस्पर्श

करून वेणू ऊठ असें ह्मणतांच वेणू उठून सावध झाली. हें चरित्र शके १५७७ मन्मथ नाम संवत्सरीं जाहलें.

कांहीं दिवशीं समर्थ चाफळास येऊन घळींत मंडळीसहवर्तमान असतां वारणातीरीं कोरेगांव येथील ज्योतिषि, वामनस्वामी मध्वसंप्रदायी यांनीं काशीक्षेत्रीं जाऊन बारा वर्षे विद्याभ्यास करून सर्व शास्त्रवेत्ते होऊन क्षेत्रस्थ विद्वान् ब्राह्मणांतही श्रेष्ठ जाहले असतां आपल्या गुरूशीं संभाषण करून त्यांस जिंकिलें. गुरूही " पुत्रादेके पराजय. शिष्यादेके पराजयं " असें ह्मणून संतोष पावले. नंतर तेथील ब्राह्मणांस व गुरूंस विचारिलें कीं, देशीं जाण्याविषयीं मला आज्ञा जाहल्यास जाईन. तेव्हां समस्त ब्राह्मण गुरूपाशीं बोलले कीं, वामनपंडित जयपत्र घ्यावयास योग्य जाहले आहेत, यास्तव यांस घरीं जाण्याकरितां निरोप द्यावा अशी त्यांची इच्छा आहे, असें ऐकून गुरूनीं त्यांचा बहुत सन्मान करून देशीं जाण्यास निरोप दिला. नंतर बरोबर त्यांची स्त्री गिरीबाई होती, तीसहवर्तमान मार्गी येतांना ज्या ज्या क्षेत्रीं विद्वान् असतील त्या त्या क्षेत्रीं जाऊन त्यांजपासून जयपत्रें घेत घेत इंद्रायणीचे तीरीं आले. तों एका वृक्षावर ब्रह्मराक्षस होता, तो वृक्ष विच्छिन्न झाल्यामुळें तो ब्रह्मराक्षस निघून दुसरा वृक्ष पाहत पाहत इंद्रायणीचे तीरीं आला, तों एक अश्वत्थ वृक्ष पाहिला त्यास तीन फांद्या होत्या त्यांपैकीं दोन फांद्यांवर दोन ब्रह्मराक्षस होते तिसरी फांदी मोकळीच होती. हें पाहून त्या फांदीवर हा ब्रह्मराक्षस जाऊं लागला. त्यासमयीं त्या दोघांनीं

सांगितलें कीं, तूं यास्थळीं येऊं नको. तेव्हां तो ब्रह्मराक्षस ह्मणाला कीं, अहो ? हें रिकामें स्थान असून आह्मास येण्याविषयीं नको ह्मणतां यार्चे कारण काय ? असा त्यानें प्रश्न केला असतां त्या दोघांनीं उत्तर केलें कीं, अरे हें रिकामें स्थान नाहीं, सांप्रत जाहलेले वामनपंडित यांजकरितां ही जागा नेमिली आहे. तेव्हां पुनः तो बोलला कीं, वामनपंडित आमचे योग्यतेस येई तोंपर्यंत आह्मी या स्थळीं राहूं ते आल्यानंतर त्यांस हें स्थळ देऊन आह्मीं दुसरे स्थानास जाऊं तेव्हां दोघांनीं सांगितलें कीं, दुसऱ्याचें स्थळ आह्मी देणार नाहीं त्याची परवानगी घेऊन राहिल्यास आह्माकडून अटक नाहीं.

हें ऐकतांच त्या ब्रह्मराक्षसानें ब्राह्मणाचें रूप धरून इंद्रायणीचे तीरीं ज्या स्थानीं वामनपंडित उतरले होते, तेथें जाऊन त्यांस नमस्कार करून बोलला कीं, महाराज आपणाजवळ कांहीं एकांतीं बोलावयाचें आहे. त्याजवरून पंडितांनीं सर्वत्रांस दूर करून त्यास बोला, ह्मणून आज्ञा केली. तेव्हां ब्राह्मण बोलला कीं, आपल्याकरितां जें स्थळ नेमिलें आहे, तें आपण येई तों पर्यंत आह्मांस रहावयास द्यावें. आपण याल, तेव्हां आपली जागा आपणास देऊन आह्मी दुसरे स्थळीं जाऊं. तेव्हां तुह्मी कोण ? व आमचें स्थळ कोठें आहे असें वामनपंडितांनीं विचारितांच त्याणें उत्तर केलें कीं, मी ब्रह्मराक्षस आहें. आह्मी जें कर्म करून ब्रह्मराक्षस झालों तेंच कर्म हल्लीं आपण करीत आहां यास्तव आपणही पुढें ब्रह्मराक्षस

होणार, आणि इंद्रायणीच्या कांठीं अश्वत्थवृक्ष आहे त्यास्थळीं येणार. हा ईश्वरी संकेत आहे. यावरून तो अश्वत्थ आपलें नियमितस्थान आहे, तें मी मागत आहें. तेव्हां हें परिज्ञान तुह्मांस कशावरून जाहलें असें ह्मणाल तर सांगतों. या योनींत त्रिकालज्ञान आहे परंतु योनीमात्र दुष्ट आहे. अशी गोष्ट ऐकून वामन पंडित स्तब्ध होऊन बोलले कीं, आह्मी जरी ब्रह्मराक्षस जाहलों तरी तें स्थळ तुह्मांस बक्षीस दिलें. परंतु तुमच्या योनींत त्रिकालज्ञान आहे, त्यापेक्षां आह्मी ब्रह्मराक्षस न होण्यास कांहीं मार्ग आहे किंवा नाहीं, हें सांगा ? ब्रह्मराक्षस बोलला कीं, तुह्मांस साक्षात ईश्वरकृपा जाहली, तरी ही योनी चुकावयाची नाहीं, परंतु दैवयोगानें साधुकृपा जाहल्यास चुकेल. तेव्हां असा साधु कोण आहे ? ह्मणून पंडितानीं विचारिलें. तेव्हां सांप्रत देहूस तुकारामबावा आहेत असें त्यानें सांगितलें आणि निरोप मागितला. तेव्हां वामनपंडित यांणीं त्यास साष्टांग नमस्कार घातला आणि तुह्मीच आमचे गुरु असें ह्मणून दाहा वीस पावलें त्याच्या बरोबर जाऊन निरोप दिला.

नंतर पंडितांनीं परत येऊन इंद्रायणींत स्नान केलें, आणि केवळ एक पंचा व एक उत्तरीय अशीं दोन वस्त्रें मात्र घेऊन सौभाग्यवती गिरीबाईस सांगितलें कीं, जी संपत्ति आहे; ती सर्व घेऊन आपलें घर आतां जवळ आहे तेथें जाऊन रहावें. आह्मी तर आतां आमच्या देहाचें सार्थक करावयास जाणार. तेव्हां गिरीबाई बोलली कीं, स्वामी ! आपण आपल्या देहाचें सार्थक क-

रण्याकरितां जाणार मी मात्र घरीं जाऊन नरकीं जावें कीं काय? आपली सेवा करावी हा आमचा मुख्य धर्म आहे. यास्तव हा देह पडो अथवा राहो आपल्यास टाकून जावयाचें नाहीं, हा माझा निश्चय आहे. पंडित बोलले कीं, असा तुमचा निश्चय आहे तर जसा मी निघालों, याप्रमाणें मजबरोबर चलावें. असें झट-ल्या बरोबर गिरीबाई इंद्रायणींत स्नान करून एक लघुवस्त्र ने-सली आणि पंडितांच्या समीप हात जोडून उभी राहिली. नंतर वामनपंडित, कांहीं बरोबरचे व कांहीं आळंदीहून आलेले ब्राह्मण त्यांस आपली सर्व संपत्ति वांटून देऊन तुकाराम बावांचे दर्शना-करितां देहूस गेले. तों तुकाराम बावा आळंदीस गेले आहेत हें समजतांच आपणही तेथें गेले. तेव्हां तुकाराम बावा कीर्तन करीत होते त्यांच्या जवळ जाऊन साष्टांग प्रणिपात करून उभे राहिले. हें तुकाराम बावांनीं पाहून बोलले कीं, तुम्ही ब्राह्मण असतां आम्ही अनधिकारी यास प्रणिपात करितां, हा धर्म कोण ? असें ह्मण-तांच तुम्ही साधु व आम्ही मुमुक्षु ब्राह्मण यास्तव आपण कृपा करावी, या बुद्धीनें आलों. याकरितां वर्ण व धर्मविचाराचें काम नाहीं. असें ह्मणून वामनपंडितांनीं आपलें सविस्तर वृत्त निवेदन केलें. तें ऐकून तुकारामबावा बोलले, कीं शाबास, माघारां फिर-लांत हें उत्तम केलेंत. परंतु मी शूद्रवर्ण आहें, व आपण ब्राह्मण-वर्ण आहांत तेव्हां वर्णाश्रमधर्म रक्षावा, अशी ईश्वरी आज्ञा आहे यास्तव कृष्णातीरीं समर्थ रामदास महाराज ब्राह्मण असून साक्षा-त् मारुतिअवतार आहेत त्यांस तुम्हीं शरण जावें. असें ह्मणतांच

पंडितांनीं पुनः साष्टांग नमस्कार करून स्वामी समर्थ कोठें राहतात हें विचारिलें. तेव्हां तुकाराम बावांनीं सांगितलें कीं, श्रीकृष्णातीरीं चाफळखोऱ्यांत ते राहतात तेथें तुम्ही जावें.

त्यावरून वामनपंडित स्वामींचा शोध करीत करीत रामघळींत आले. तेथें स्वामींची गांठ पडतांच उभयतां स्त्रीपुरुषांनीं साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली, त्यासमयीं समर्थ बोलले कीं, बापा? तुम्ही योग्य केलेंत; आतां काय म्हणतां ? पंडितांनीं आपलें सविस्तर वृत्त निवेदन केलें, तें ऐकून संतुष्ट होऊन तुम्हीं आतां ईश्वरास शरण जावें, म्हणून समर्थांनीं सांगितलें. स्वामी ! मला ईश्वरकृपेचें कारण नाहीं, आपण साधु असून दीनदयाळु आहां आणि मी दीन असून मुमुक्षु आहें, यास्तव आपणच कृपा करावी. अशी पंडितांनीं प्रार्थना केली. तेव्हां स्वामी बोलले कीं, बापा ! तुमचें सार्थक करावयाजोगें सामर्थ्य आम्हांपाशीं नाहीं. तेव्हां महाराज ! हें मला कांहींच समजत नाहीं. परंतु " सद्यः साधुसमागमः " या वाक्यास बाध न येईल असें व्हावें, इतकीच प्रार्थना आहे. असें पंडितांनीं म्हटल्याबरोबर स्वामीनीं हास्य केलें आणि बापा ! योग्य आहे. आतां मी सांगतों त्या वाटेनें तुम्हीं जावें, म्हणजे ईश्वर कृपा करील. असें बोलून तुम्ही उभयतांनीं बदरिकाश्रमीं जाऊन बारा वर्षे पर्यंत तपश्चर्या करून विष्णुउपासना करावी, म्हणजे ईश्वर साक्षात् दर्शन देऊन कृपा करील, अशी आज्ञा केली.

वामनपंडित साष्टांग नमस्कार करून आज्ञेप्रमाणें बदरिकाश्रमीं गेले आणि समर्थांच्या आज्ञे प्रमाणें बारावर्षे पर्यंत हरळीच्या मुळ्यांचा रस काढून प्राशन करीत असतां तपश्चर्या केली, परंतु ठिकाण नाहीं, मग प्रत्यक्ष दर्शन कोठून होणार ! असें पंडितांनीं मनांत आणून विचार केला कीं, सर्व साधूंनीं कंटाळून माझा त्याग केला. आतां ईश्वर तरी कृपा कशी करील. परंतु साधु समर्थांच्या कृपेनें ही तपश्चर्या घडली, यामुळें देहाची शुद्धि होऊन ब्रह्मराक्षस योनीपासून तर चुकलों. दुसरी गोष्ट, भागीरथीच्या तीरीं ब्रह्मराक्षस योनी नाहीं, व भागीरथींत देहत्याग केला असतां आत्महत्येचें पातकही नाहीं. यास्तव भागीरथींत देहत्याग करावा. असा विचार करून गिरीबाईस पुसलें कीं, आह्मी गंगेमध्यें देहत्याग करितों, तुझा विचार काय? तो सांग. तिणें विनंति कीं,जी वाट तुमची तीच माझी. असा तिचा निश्चय पाहून उभयतां गंगाद्वारीं गेले, आणि डोळ्यांस पट्टा बांधून कडयावर चढले. आणि हात सोडून पडणार तों साक्षात् भगवान् विष्णुमूर्तीनें आडवा हात देऊन "वामना! नेत्र उघडून खालीं उतर" असें ह्मणतांच पंडितांनीं तुह्मी कोण ह्मणून विचारिलें. तेव्हां भगवंतांनीं सांगितलें, कीं, तूं ज्याकरितां प्राण देतोस तोच मी आहें, असें श्रवण करितांच वामन हंसून बोलले कीं, तो जर असता तर मी कां मरतों? तो मरण पावला ह्मणून आह्मीं मरतों. आतां हात सोडा आणि आह्मांस पडूं द्या. तेव्हां वामना माझा हस्त लागला असतां तुमचें

पतन कसें होईल, व भागीरथीही तुह्मास कशी बुडवील, असें भगवंतांनीं ह्मणून उभयतांस उठवून तळीं आणिलें.

नंतर आपल्या चतुर्भुजमूर्तीचें साक्षात् दर्शन देऊन मस्तकीं वरदहस्त ठेविला. आतां इच्छा असेल तें माग, असें ह्मणतांच उभयतांनीं साष्टांग नमस्कार करून नेत्रोदकानें चरणक्षालन करित असतां यथासामर्थ्यें स्तव करून विनंति केली कीं, वर मागण्याविषयीं आपली आज्ञा, परंतु मला श्रीचरणसेवेवांचून दुसरी इच्छा नाहीं. भगवान् बोलले कीं, कांहीं तरी माग. वामनांनीं उत्तर केलें काय मागूं ? देणेंच असल्यास साधूंस जें सुख प्राप्त होतें तें द्यावें. असें ह्मणतांच भगवान् ह्मणाले कीं, तें सुख आह्मापाशीं नाहीं कदाचित् वैकुंठलोक मागितल्यास तोही देऊं, परंतु साधूंचें सुख साधूंस शरण गेल्यावांचून प्राप्त होत नाहीं. तेव्हां पुनः उभयतांनीं नमस्कार करून कोणत्या साधूस शरण जावें, येविषयीं आज्ञा व्हावी, अशी विनंति केली. ती ऐकून भगवंताची आज्ञा जाहली कीं, रामदासास शरण जावें आणि ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करावी, ह्मणजे तुह्मांस उत्तम पद प्राप्त होईल. अशी श्रींची आज्ञा होतांच उभयतां श्रींची पूजा करून निघाले ते देशीं येऊन स्वामींचा शोध करीत करीत रामघळींत आले. तेथें येऊन उभयतां स्त्रीपुरुष स्वामींस नमस्कार करणार तों पूर्वीच स्वामींनीं त्यांस नमस्कार केला. हें पाहून वामनपंडित ह्मणाले महाराज ! आह्मा दीनावर हा गहजब काय ? असें ह्मणून उभयतांनीं साष्टांग नमस्कार केला आणि वारंवार

स्तवन करून ह्मणाले महाराज, सरकारची हुंडी आपणाकडेस आली आहे, ही स्वीकारून मला आज्ञा करावी.

स्वामी बोलले कीं, सरकारची आज्ञा जशी तुह्मांस जाहली आहे तशीच आह्मासही जाहली आहे. त्यांत श्रीअवधूतमूर्ति आहेत त्यांस शरण जाऊन आपली इच्छा पूर्ण करून घ्यावी. पंडित हास्यपूर्वक आज्ञा प्रमाण असें ह्मणून कांहीं दिवस स्वामींपाशीं राहून आज्ञा घेऊन गेले. ते श्रीशैलपर्वतीं अवधूत महाराजांचें दर्शन घेऊन ह्मणाले महाराज ! सरकारच्या आज्ञेप्रमाणें अनुग्रह करून माझें समाधान करावें, अशी विनंति केली आणि कांहीं दिवस अवधूतांची सेवा करीत राहिले. पंडितांनीं नित्यानित्याचा विचार नित्य पुसत असावें आणि अवधूत महाराजांनीं त्यांस सांगावें, याप्रमाणें होत असतां अकस्मात् अवधूतांचा समाधिसमय येता जाहला. तेसमयीं पंडितांनीं विनंति केली कीं, श्रीचरणापाशीं राहून सेवा घडत असतां मनाचें समाधान व्हावें असें मनांत असून अकस्मात् हा समय प्राप्त झाला. इतःपर माझी वाट काय ? अवधूतांनीं उत्तर केलें कीं, या देहाच्या मर्यादे प्रमाणें समाधि करणें प्राप्त आहे, तर तुमच्या मनांत अद्यापि संशय असल्यास रामदास यांजपाशीं जाऊन निःसंशय व्हावें. याप्रमाणें आज्ञा करून आपण समाधि घेते जाहले. नंतर वामनपंडित यांणें अवधूत महाराजांच्या देहाचें सार्थक करून तेथें वृंदावन बांधून कांहीं दिवस राहून देशीं यावयास निघाले.

वामनपंडित मध्वसंप्रदायी वैष्णव होते म्हणून स्त्रीचे हातचें भोजन करीत नसत या करितां गिरीबाईनें पाकाची सिद्धता करून भांडीं मात्र अग्नीवर ठेवावीं आणि पंडितांनीं उतरून घ्यावीं, असा नित्य क्रम असे. त्याप्रमाणें मागीं एके दिवशीं पाकसिद्धते विषयीं गिरीबाईस आज्ञा करून आपण स्नानसंध्येस बसले आणि सत्, चित्, आनंद या तीन पदांच्या अर्थाचा विचार करूं लागले तों समाधि लागली. इकडे गिरीबाई आज्ञे प्रमाणें सिद्धता करून आपणही बसली आहे; तों पात्र स्थळावरून घसरलें, तेव्हां "मला तर स्पर्श करावयाचा नाहीं व यांचीही समाधि लौकर उघडत नाहीं, यामुळें आज पाकाचेंही ठीक दिसत नाहीं " असें म्हणून गिरीबाई हांसली. त्या बरोबर पंडितांनीं ऐकून नेत्र उघडून विचारिलें कीं, तूं कां हांसलीस ? बाई म्हणाली महाराज! स्वाभाविकच हांसलें. तेव्हां पंडित म्हणाले तुला माझ्या गळ्याची शपथ आहे, सत्य सांग ? असें म्हणतांच महाराज ? तीन वेदांचा अद्यापि विचार करीत आहां म्हणून हांसलें. असें गिरीबाईनें म्हणतांच उठून आलिंगन देऊन पंडित बोलले, दुसरा कोणी असता तर वंदनादि व्यहवार केला असता, परंतु तूं या देहाची स्त्री आतां यामुळें उपाय नाहीं. असो, मनाचा संशय फिटत नाहीं याचा विचार कसा करावा सांग! मग गिरीबाई बोलली महाराज आपण सर्वज्ञ, आपणांस मीं विनंति करावी, असा अर्थ नाहीं, तथापि अवधूत महाराज यांचो समर्थाकडे जाण्याचो आज्ञा आहे

तेथें गेलें असतां मन निःसंशय होईल. आतां भातार्चे भांडें नीट करून भोजन करावें. कारण उशीर फार जाहला. पंडित बोलले- भातार्चे भांडें तूंच नीट कर. गिरीबाई बोलली, नित्यक्रम असा नसून आज हें काय? पंडितांनीं सांगितलें आजमासून तुझ्याच हातानें जेवावयाचें " गिरीबाईनें आज्ञा प्रमाण " असें ह्मणून भातार्चे भांडें नीट केलें. नंतर उभयतां भोजन करून निघाले ते मार्ग क्रमून स्वामींपाशीं येते जाहले.

वामनपंडित येऊन पोहोंचण्याचे पूर्वीच समर्थांनीं अर्धकोश सामोरें येऊन त्यांनीं नमस्कार करावयाचा तों पूर्वीच आपण त्यांस साष्टांग नमस्कार केला. तेव्हां महाराज ! आह्मां गरीबांवर हा गजब काय? असें ह्मणून उभयतां स्त्रीपुरुष समर्थांस साष्टांग नमस्कार करून पुढें उभे राहिले. तेव्हां समर्थ बोलले, वामना शाबास? तुझ्या सारीखा प्रयत्नी पुरुष तूंच, धन्य आहेस, ईश्वरी कृपा व सद्गुरुकृपाही करून घेण्याची योग्यता तुलाच आहे, तूं जें केलेंस तें इतरांस व्हावयाचें नाहीं. वामन बोलले, स्वामी ! ही कृपा आपलीच आहे, तेव्हां स्वामी हांसून बोलले वामना ! तूं गिरीबाईस नमस्कार कर वामन बोलले, आज्ञा प्रमाण, मी केवळ आज्ञाधिकारीच आहें. अशीं परस्परें विनोदाचीं भाषणें होऊन स्वामी पाशीं चाफळास परळीस व रामघळीस कांहीं दिवस राहून ज्ञानपूर्ण व निःसंशय जाहले. आणि नेहमीं स्वामीपाशीं रहात असून स्वामींनीं केलेल्या दासबोध ग्रंथाचें पारायण करीत असतां सातवे दिशकीं चौथे समासीं चवदा ब्रह्मे स्थापून उडविलीं. यांपैकीं विचार पाहतां चौदा

स्थानीं ब्रह्मसंज्ञेविषयीं बहुतां ग्रंथिं दाखला मिळतो; परंतु उडविल्याचा दाखला कोणतेही ग्रंथीं दिसत नाहीं, हें पाहून " स्वामीस विचारावयाचें तर सामर्थ्य नाहीं आणि निःसंदेह तर होत नाहीं " असा विचार करून स्वामींस समक्ष विनंति केली कीं, महाराज ग्रंथाचें पारायण मी करितों आणि आपण याचा अर्थ स्वमुखें सांगावा.

समर्थांनीं बहुत बरें असें ह्मणतांच पारायणास प्रारंभ करून सातवे दशकीं तिसरे समासीं पारायण आलें; त्यासमयीं चौदा ब्रह्मांविषयीं प्रश्न वामनानीं केला त्याकाळीं, स्वामींनीं चौदा ब्रह्मे स्थापून उडविलीं. याप्रमाणें स्वामींनीं उडवावीं वामनांनीं स्थापावीं असें होत असतां वामनाचा निःसंशय होईना, तेव्हां समर्थ श्रीमारुतीरूपानें भुभुःकार करून शेंपटाचा मोठा तडाखा देऊन बोलबोल असें वामनास ह्मणूं लागले. तों त्यांच्या त्या स्वरूपातें पाहून वामनपंडित भयभीत होत्साता स्वामी! माझी समस्या पूर्ण जाहली, असें बोलले. याप्रमाणें स्वामींनीं त्रिवार विचारिलें पंडितांनींही तीन वेळां पूर्वीप्रमाणेंच विनंति केली. नंतर स्वामींनीं पूर्वरूप धारण करून " वामना! तुझी समस्या पूर्ण जाहली, कींवा नाहीं? वामनांनीं महाराज! नाहीं असें उत्तर करितांच समर्थ बोलले, अरे? पूर्वीच समस्या पूर्ण झाली ह्मणून बोललास आणि आतां नाहीं कां ह्मणतोस " असा प्रश्न केला तेव्हां स्वामी! आपण आद्यरुद्ररूप धारण केलें त्याबरोबर बोलावयाचें सामर्थ्य कोणाचें आहे? असें वामनांनीं उत्तर दिलें. तेव्हां स्वामी हास्य करून बोलले, कीं, तुझी पंडित सर्व ग्रंथांचें अवलोकन करीत

असून बरोबर उंटाचे उंट पुस्तकें बाळगून जयपत्रें घेत होतां आणि चवदा ब्रह्मे स्थापून उडविलीं हें कोणत्याही ग्रंथीं पाहिलें नाहीं असें ह्मणतां हें आश्चर्य वाटतें. असो, आतां बृहदारण्यांत चवदा ब्रह्मांची स्थापना करून उडविण्याचा प्रकारही आहे तो पहा. त्यांत असल्यास आह्मी ग्रंथ केला आहे यांत असूंद्यावा नसल्यास हरताळ लावावा. असें ह्मणतांच बृहदारण्यांत वामन स्वमींनीं पाहिलें, तों स्वामींनीं सांगितलें त्याप्रमाणें त्यांत आहे, ही त्यांची खात्री जाहल्यावरून त्यांनीं स्वामींस नमस्कार करून प्रार्थना केली कीं, स्वामी ! आपण जी आज्ञा केली त्याप्रमाणें अवलोकन करितां आपण ग्रंथ केला. हा त्याप्रमाणेंच आहे, यांत संशय नाहीं. आतां माझें मन निःसंशय जाहलें. याप्रमाणें रामघळींत जाहलें.

नंतर स्वामीपाशीं वामनपंडितांनीं विनंति केली कीं, आपले कृपेंकरून मनोरथ पूर्ण जाहले. आतां हा देह वागविणें आणि कालानुरूप त्याचें सार्थक करणें, तें कसें करावें ? स्वामी बोलले कीं, बापा ! सांप्रतकाळीं कलियुगीं मनुष्य केवळ प्राकृतबुद्धीचे आहेत. यांच्या उद्धाराविषयीं तुह्मास व आह्मास श्रींची आज्ञा आहे. यास्तव इतःपर या प्राकृत जनांस संस्कृताचा उपयोग नसल्यामुळें संस्कृताच्या आणि वेदवाणीच्या अभिप्रायासहित प्राकृतवाणीनें हरिगुणानुवाद वर्णून आपली वाचा पवित्र करून देहाचें सार्थक आणि जनाचा उद्धार करावा. त्यावरून समर्थांच्या आज्ञेप्रमाणें वामनांनीं निगमसारादि बहुत ग्रंथ केले ते

स्वामींनीं पाहिले व ऐकिले. त्यासमयीं समर्थांवरून स्तुतिपर स्तोत्र केलें तें:—

॥ श्लोक ॥

यं प्राहुः शिवनिर्विशेषमनिशं ब्रह्मेति वेदान्तिनः ॥ कर्तारं कुशलाः प्रमाणपटवः सद्युक्तिभिस्तार्किकाः ॥ अन्ये स्वाभिमतं वदन्ति बहुधा सांख्याः प्रधानं परम् ॥ तस्मै सद्गुरवेति सन्तु नतयः श्रीरामदासाय मे ॥ १ ॥ लोकानामिहसंसृतावभिनिमग्नानामसंचेतसाम् ॥ तेषा मुद्धरणाय येन परमां प्रज्ञामधिष्ठाय वै ॥ आद्यन्तात्परमागतेन निकृतः सारोवतारोह्ययम् ॥ तस्मै सद्गुरवे० ॥ ॥ २ ॥ वैराग्ये कृतवानतीव जगतां तादृक् प्रवृत्त्यैव यः ॥ कान्तारान्तर संचरैकनिरतौ नीताः कियद्वासराः ॥ पश्चाल्लोकदयापरेण हि पुराश्चापाहासं सेविता ॥ तस्मै सद्गुर० ॥ ३ ॥ नाना देव महोमहा विरचिता स्तीर्थाटणान्यादरा ॥ दन्तःप्रेमभरेण येन बहुधा मूर्तिप्रतिष्ठापनाः ॥ ग्रंथाश्चापिजगत्प्रबोधपटवः सत्सारमाशंसिनः ॥ तस्मैसद्गुरवे० ॥ ४ ॥ यःसन्मंगलं मंगलं वरमनं सर्वादि भूतं परम् ॥ यत्सान्निध्यमवाप्य वाक्प्रभृतिसद्भोजातमावर्तते ॥ अन्तः प्रान्तदुरागमः किमिति हो वाक्पारदूरे स्थितम् ॥ तस्मै सद्गुरवेति सन्तु नतयः श्रीरामदासाय मे ॥ ५ ॥ इति श्रीवामनपंडित विरचितं रामदासस्तोत्रं सम्पूर्णम् ॥ ६ ॥

याप्रमाणें समर्थांचें स्तोत्र करून वामनपंडित स्वामींचा निरोप घेऊन सहकुटुंब जाते झाले. पुढें वामनपंडित यांनीं जगदोद्धारास्तव स्वामींचे आज्ञेप्रमाणें यथार्थ दीपिका आदि करून बारालक्ष ग्रंथ केला. त्यांतील प्रत्येक यमक अतिसुंदर पाहून स्वामीनीं पंडितांचें नांव " यमक्या वामन " असें ठेविलें. (याप्रमाणें वामनपंडितांचें चरित्र जाहलें.)

उद्धव गोसांवी यांस सारंगपुर येथील श्रीमारुतीचे अधिष्ठानाकरितां इंदूरचे मठीं स्थापून स्वामी दक्षिणप्रांतीं आले होते, त्यास दोन वर्षे झालीं. उद्धव गोसांवी यांनीं आज्ञेप्रमाणें राहून संस्थान व सांप्रदाय वाढवून समर्थांचे दर्शनाची इच्छा धरून विनतिपत्र पाठविलें तें:-

॥ श्लोक ॥

गुरूराजया ब्रह्मरूपा दयाळा । दयासागरा धांव वेगें कृपाळा ॥
अनाथा दिना कारणें तूं कुवासा । महाराजया श्रीगुरू रामदासा॥ १॥
तुझें रूप पाहावया आस मोठी । तरी दाखवीं रूप तत्काळ दृष्टी ॥
जशी बाळका माय तूं धांव तैसा । महाराजया श्रीगुरू रामदासा ॥२॥
मना इंद्रियां कामक्रोधांसि मारीं । मदें मत्सरें वासना हे निवारी ॥
जळावेगळा तळमळे मीन जैसा । महाराजया श्रीगुरूरामदासा ॥३॥
नसे सूख संसार हा घोर मोठा ॥ जसा सिंह हस्तीसि मारी चपेटा ॥
अशा संकटीं सोडवीं राजहंसा । महाराजया श्रीगुरू रामदासा ॥४॥
चकोरें जसा चंद्रमा चिंतिताहें । वनीं गाय घरीं वत्स तें वाट पाहे ॥

तसें ध्यान तूझें मला हो कुवासा । महाराजया श्रीगुरू रामदासा॥५॥
नको अंत पाहूं माया हे हरावी । तुझी भक्ति वीरक्ति शांतीहि द्यावी॥
बरा अंतरीं लावीं वैराग्य ठसा । महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ६ ॥
तुझें ब्रीद साचचि असेल खरें । प्रचीति मला दाखवीं सत्वरीरे ॥
पतीतासि हा हेत आधार जैसा । महाराजया श्रीगुरू रामदासा॥७॥
मला वाटतें अंतरीं त्वां वसावें । तुझ्या दासबोधासिं त्वां बोधवावें ॥
अपत्यापरी पाववीं प्रेमरसा । महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ८ ॥
म्हणे उद्धवासि त्वां हातीं धरावें । सदासर्वदा अंतरीं प्रेम द्यावें ॥
उपेक्षूं नका स्वामि दासासि हंसा । महाराजया श्रीगुरू रामदासा॥९॥

यापमाणें उद्धव गोसांवी यांनीं पाठविलेलें विनंतिपत्र स्वामींनीं पाहून मंदस्मित हास्य करून उद्धवास दर्शनाचीं तळमळ फार लागली आहे असें म्हणून येण्याविषयीं पत्र पाठविण्यास कल्याण गोसांवी यांस आज्ञा केली तें पत्रः—

॥ ओंव्या ॥

चिरंजीव ते निश्चळ ॥ निश्चळीं जाहले चंचळ ॥
चंचळीं जाणावा निश्चळ ॥ निश्चळ रूपी ॥ १ ॥
सदा सर्वदा निश्चळ ॥ निश्चळींच पाहावें सकळ ॥
सकळ पाहतां केवळ ॥ आपणच वस्तु ॥ २ ॥
वस्तुरूप आपण ॥ अधिष्ठानीं पाहता कोण ॥
पाहतां पाहणें ज्यालागून ॥ तोचि तो आत्मा ॥ ३ ॥

आत्मारामीं आत्मा पहा ॥ जाणूनियां सुखी रहा ॥
स्वानंदामृत सेवुनी पाहा ॥ निखिल निजरूपा ॥ ४ ॥
रूप तेंचि पाहतां सगुण ॥ सगुण तेंचि आपण ॥
आपणा परतें ज्ञान ॥ वेगळें नाहीं ॥ ५ ॥
वेगळेपण पाहावें ॥ मग तें वेगळेंचि जाणावें ॥
मग मिळेना स्वभावें ॥ मुक्त जैसा ॥ ६ ॥
म्हणूनि वेगळें नसाहे ॥ नसाहे म्हणणेंचि बाह्यें ॥
बाह्याबाह्य ते अबाह्य ॥ जाण बापा ॥ ७ ॥
ऐसें जें अधिष्ठान ॥ तेथें जावया जाण ॥
जाण जाणो परिच्छिन्न ॥ आपणचि ॥ ८ ॥
शरण जावें सद्गुरूसी ॥ म्हणजे कळे आपणासी ॥
आपपर नाहीं त्यासीं ॥ दास म्हणे ॥ ९ ॥

याप्रमाणें समर्थांचें आज्ञोत्तर, येण्याविषयीं जातांच उद्धव गोसांवी यानीं तेथील सर्व बंदोबस्त करून आपले जागीं सांप्रदाय चालविण्यास महादेव गोसांवी म्हणून एका शिष्याची नेमणुक करून ग्रामाधिकारी व जमीदार वगैरे सर्वांस आज्ञा केली कीं, आज पर्यंत तुम्हीं जशी श्रीची सेवा करीत आलां त्याप्रमाणें करीत जावी. त्यांत न्यून पडूंनये, आम्हीं आपले जागीं महादेव गोसांवी यांस ठेवून समर्थांचे दर्शनास जात आहों; याकरितां त्यांचेंही न्यून न पडे अशी तजवीज ठेवावी. याप्रमाणें तेथील बंदोबस्त करून आपण श्रीसमर्थांचें भेटीकरितां शके १५७८ सालीं देशीं आले. आणि समर्थांस भेटून तेथेंच राहते जाहले.

एकासमयीं समर्थ कोंडवळचे घळींत असतां चांफळास येण्याकरितां निघाले; तों कोयना नदीस मोठा पूर आला होता; याकरितां नदी उतरण्यास वाट नाहीं म्हणून समर्थ पाटणाजवळ आले आणि उतरणारास हाक मारली. त्यावेळीं चांदजीराव पाटणकर यांस खुद्द सांगडीवाले जमा करून आणण्यास कांहीं उशीर लागला म्हणून स्वामीनीं उदकांत उडी घेतली आणि पोहत येत असतां नदीचे मध्यभागीं मोठा भोंवरा होता त्यांत स्वामी गेले. भोंवऱ्याचे पाण्यानें स्वामींस फिरवीतफिरवीत मध्यभागीं नेलें आणि तेथें येतांच स्वामी बुडून तळास गेले; ते आंतच पद्मासन घालून बसले. दुसरीकडे पाहण्याकरितां मंडळी आली होती त्यानीं एकच हरळी केली कीं, स्वामी भोंवऱ्यांत सांपडून बुडाले. त्या समयींच चांदजीराव पाटणकर हे मंडळी सहवर्तमान येऊन पोंचले. तों त्यानीं स्वामी भोंवऱ्यांत बुडाल्याचें वर्तमान श्रवण करून अति दुःखित होत्साते नदीचे कांठास एक कोशपर्यंत दोहों बाजूनें सांगडी घेऊन, माणसें बसविलीं व आपण खुद्द भोंवऱ्या जवळ अस्तमान होई पर्यंत बसले परंतु स्वामींचा ठिकाण नाहीं. असें पाहून स्वामी निःसंशय मरण पावले असें सर्वांस वाटलें, नंतर सर्व लोक निराश होऊन आपले घरीं गेले.

दुसरे दिवशीं चांदजीराव यांनीं चाफळीं मठांत सांगून पाठविलें कीं, समर्थ येथील भोंवऱ्यांत सांपडून बुडून मरण पावले. त्यावरून कल्याण गोसांवी व उद्धव गोसांवी मंडळी सहवर्तमान अतित्वरेनें निघून तिसरे दिवशीं पाटणास येऊन पोंचले. नंतर चांदजीराव आ-

दिकरून मंडळी बरोबर घेऊन नदीवर आले. तेव्हां कल्याण गोसांवी यांनीं विचारिलें कीं, स्वामी कोणत्या ठिकाणीं बुडाले? त्यावरून लोकांनीं नदीचे मध्यभागीं भोंवरा आहे त्यांत बुडाले म्हणून सांगून तें स्थळ दाखविलें. त्यासमयीं पाण्यांत बुडी देऊन शोध करावा; म्हणून कल्याण गोसांवी व उद्धव गोसांवी सिद्ध झाले. तें पाहून पाटणकर मंडळी बोलूं लागली कीं, स्वामींस बुडून आज तीन दिवस झाले अद्यापि ते तेथें असतील असा भरंसा वाटत नाहीं, कदाचित् पाण्याच्या ओघानें प्रवाहांत वाहून गेले असतील; किंवा जलचरानीं नेऊन भक्षिले असतील. हे शब्द कल्याण व उद्धव गोसांवी यांणीं ऐकतांच हंसूं लागले आणि बोलले कीं, स्वामीं मरण पावले व जलचरानीं भक्षिले असें जें म्हणतां हें आश्चर्य वाटतें, असें म्हणून कल्याण गोसांवी पाण्यांत बुडी देण्यास सिद्ध जाहले आणि उद्धवगोसाव्यांस म्हणाले कीं, आपण पाण्यांत येऊंनये, बाहेरच असावें मी पाण्यांत जाऊन स्वामींचा शोध करितों. या प्रमाणें सांगून आपण पाण्यांत शिरले. तेव्हां पाटणकर मंडळी बोलले कीं, आपण पाण्यांत जाऊं नये. स्वामी त्या ठिकाणीं आहेत असें नाहीं, तेव्हां कल्याण गोसांवी बोलले कीं, जसे स्वामी मेले तसे आम्हीही मेल्यास चिंता नाहीं. याप्रमाणें भाषणें होऊन कल्याण गोसांवी यांनीं " जयजय रघुवीर " असा मोठ्यानें शब्द करून नदींत उडी टाकिली आणि पोंहत पोंहत भोंव-ऱ्यापाशीं येऊन तळीं बुडी दिली आणि पाहतात तों, स्वामी

पद्मासन घालून बसले आहेत. असें पाहून पाण्याचे उसाळीसरसे वरती आले आणि पुनः पाण्याचे ओघानें व आंगजोराचे बळानें बुडी देऊन तळीं गेले आणि स्वामींचे पद्मासनांत डोकें खुपसून स्वामींस खांद्यावर घेऊन पाण्याचे उसाळीसरसे वर आले. हें पाहून स्वामींकडील सर्व मंडळीनीं मोठ्या आनंदानें "जयजय रघुवीर समर्थ" असा शब्द केला.

पाटणकर मंडळीनीं स्वामी जिवंत असल्याचें पाहून परमाश्चर्य मानिते झाले. आणि आपसांत बोलूं लागले कीं, आज तीन दिवस होऊन गेले अद्यापि स्वामी पाण्यांत जिवंत कसे राहिले बरें? समर्थांनीं ही एक लीलाच दाखविली. असें परस्परांत बोलून चकित झाले आहेत तों, कल्याण गोसांवी स्वामी सहवर्तमान पोंहत पोंहत नदीतटाकास आले. समर्थांनीं कल्याण गोसांवी यांस पोटाशीं धरून बोलले कीं, त्वां आज मजला वांचविलेंस. असें ऐकून कल्याण गोसांवी यांनीं श्रीचरणीं मस्तक ठेवून हंसून विनंति केली कीं, महाराज आपले कृपेकरून सर्व जग वांचणार आणि आपणास मी वांचविलें; असें समर्थ म्हणतात, हा अर्थ बराच खोल आहे. तीन दिवस पाण्यांत पद्मासन घालून जिवंत राहणार, असा कोण आहे! हें भाषण पाटणकर चांदजीराव आदिकरून सर्वत्र मंडळीनीं श्रवण करून समर्थांस साष्टांग नमस्कार केला. व हें चरित्र समर्थांनीं दाखविलें म्हणून सर्वांस परमाश्चर्य वाटलें. नंतर चांदजीराव यांनीं बहुत सन्मानेंकरून समर्थांस मंडळीसहवर्तमान पाटणांत आपले घरीं नेलें. तेथें सर्वत्र मंडळीसह समर्थांचें

भोजन होऊन. कांहीं दिवस तेथें राहून शिष्य मंडळी सहवर्तमान समर्थ चाफळास आले. हें चरित्र शके १५७७ दुर्मुखनाम संवत्सरीं झालें. तें समर्थांचे शिष्य मंडळीपैकीं मौनी गोसांवी यांचे शिष्य अनंतमौनी त्यांचे शिष्य मेरु गोसांवी मठ तंजावर यांनीं वर्णिलें आहे.

त्यावेळचें मेरु गोसांवी यानीं समर्थांचें जें चरित्र वर्णिलें आहे त्यांतील एक अष्टक येथें सांगतों तें श्रवण करावें.

॥ श्लोक ॥

परंधाम चिद्रूप व्यक्तीसि आलें । समर्थस्वरूपेंचि विख्यात झालें ॥
परब्रह्म प्रत्यक्ष या लोक भावें । नमो सद्गुरू रामदासासि भावें ॥ १ ॥
पराकाश सारांश घेऊनि वेगीं । जना द्यावया पातले अंतरंगीं ॥
सदा उन्मनी नंदजे मी स्वभावें । नमो सद्गुरू रामदासासि भावें ॥ २ ॥
तपस्वी तनू तेज वैराग्यलीला । कळे आकळे चित्कळेचा जिव्हाळा ॥
उदासीन वृत्ती अरण्यीं वसावें । नमो सद्गुरूरामदासासि भावें ॥ ३ ॥
क्षणामाजि कायारुपें पालटावी । अकस्मात त्या भाविका भेट द्यावी ॥
महद्भूत संसार अदृश्य व्हावें । नमो सद्गुरूरामदासासि भावें ॥ ४ ॥
महारुद्ररूपेंचि लोकीं प्रसिद्धी । क्षुधा नी तृषा नित्य तृप्ती समाधी ॥
महापर्वतीं काष्ठरूपीं पडावें । नमो सद्गुरूरामदासासि भावें ॥ ५ ॥
उडी घातली ती नदीचे प्रवाहीं । बुडाली तनूची जया शुद्धि नाहीं ॥
कितेकाकळींचे प्रवृत्तीसि यावें । नमो सद्गुरूरामदासासि भावें ॥ ६ ॥
धनुष्पाणिचे रामसौमित्र संगें । बसावें पुजावें स्वहातांत रंगे ॥

वनीं वानरें क्रीडती तेथें जावें। नमो सद्गुरूरामदासासि भावें॥७॥
त्रेता युगींचा राम आला कलीला। जना दाखवी सत्वरूपें स्वलीला॥
जना दर्शनीं पैं विरक्तीसि यावें। नमो सद्गुरूरामदासासि भावें॥८॥
महोत्साह हा चांफळीं नित्य नेमी। भरे विश्वयात्रा महारामनौमी॥
घनानंद संकीर्तनीं मग्न व्हावें। नमो सद्गुरूरामदासासि भावें॥ ९॥
बहु सुकृतें योग या सांपदायीं। घडे प्राप्ति कैवल्य श्रीरामपायीं॥
समर्थाचि या आठवें उद्धरावें। नमो सद्गुरूरामदासासि भावें॥१०॥
जिणो निश्चयें घोर संसार वैरी। समर्थानुग्रें रूपें नानाधिकारी॥
विरक्तीस भक्तीस मेरू करावें। नमो सद्गुरूरामदासासि भावें॥११॥

यामाणें मेरुगोसांवी यांणीं समर्थांचें स्तुतिपर केलेलें अष्टक हनुमंत गोसांवी यांनीं शिष्यमंडळीस सांगितलें.

पुढें कांहीं दिवसांनीं वडगांवास माघ शुद्ध पौर्णिमा शके १५७९ हेमलंबी नाम संवत्सरीं कृष्णाप्पांचे पुण्यतिथीचा मुख्य दिवस आला. त्या उत्साहाकरितां जयरामस्वामी, समर्थांस शिष्यमंडळी-सहवर्तमान वडगांवास घेऊन आले. त्या संधीस रंगनाथस्वामी भागानगरास गेले होते म्हणून आले नाहींत. पौर्णिमेचे दिवशीं ब्राह्मणभोजनाचा समारंभ झाल्यावर समर्थांनीं जयरामस्वामीस आज्ञा केली कीं,, आतां तुह्मीं आह्मीं भोजन करूं. त्यासमयीं जयरामस्वामीनीं विनंति केली कीं, महाराज रंगोबा आला नाहीं; त्या खेरीज भोजन कसें करावें ? समर्थ बोलले, बरें तर रंगोबा आल्यानंतरच भोजन करूं.

इकडे भागानगरास त्या दिवशीं प्रातःकाळीं रंगनाथस्वामी स्नानास बसले असतां ब्राह्मणानें संकल्प सांगतेवेळीं माघशुद्ध पौर्णिमेचा उच्चार केला, तो ऐकून स्वामीनीं ब्राह्मणांस विचारिलें कीं, माघ शुद्ध पौर्णिमा आजच कीं काय? ब्राह्मणानीं विनंति केली कीं, महाराज आजच आहे म्हणून त्याप्रमाणें उच्चार केला. रंगनाथस्वामी बोलले कीं,आज आमचा सरकारचाकरीचा मुख्य दिवस असून चाकरीस चुकलों. असें म्हणून जलदीनें घोडा तयार करण्यास सांगितलें. तों लागलाच जवळील मंडळीनीं घोडा तयार करून आणिला. हें पाहून रंगनाथस्वामी त्वरेनें पोषाख करून एकटेच निघाले. तेव्हां शिष्यमंडळीनीं विनंति केलीकीं, महाराज आपण एकटेच जातां व उशीरही जाहला म्हणून वडगांवास आज जाणें कसें होईल ? रंगनाथस्वामीनीं उत्तर दिलें कीं, देह व घोडा पडेल तेथपर्यंत जाऊं अथवा सरकारांनीं कृपा करून नेल्यास वडगांवासही जाऊन पोंचूं. असें बोलून निघाले ते मार्गानें येतां येतां कुकुडवाचे खिंडींत अस्तमान झाला. तेथें चोर राहत होते त्यांनीं स्वामींचा घोडा व पोषाख हरण करावा म्हणून त्यांस अडविलें. तेव्हां चोर पुष्कळ होते त्यांजला रंगनाथस्वामी बोलले कीं, तुम्ही चोर बहुत आहां मी एकटा आहें असें तुम्ही समजत असाल तर माझा पोषाख व घोडा तुम्हांस मिळणार नाहीं; माझें नांव रंगनाथ गोसांवी निगडीकर आहे. मी तुम्हांस एकटा दिसतों परंतु मजपाशीं दोनशें शिपाई आहेत ते तुम्हां सर्वांस पुरून उरतील. हें भाषण

ऐकून त्या चोरांनीं हंसत हंसत झटलें कीं, बाबा तुमचें नांव आम्हांस ऐकून ठाऊक आहे. तुम्हीं साधु म्हणवितां आणि खोटें बोलतां हें चांगलें नाहीं. आम्हीं चोर असूनही खरें बोलत असतों. आपण एकटे असून आम्हांस भय उत्पन्न व्हावें एतदर्थ शिपाई असल्याबद्दल सांगता; परंतु आपण एकटेच आहां हें आम्हीं पूर्णपणें जाणत आहों. आम्ही एकंदर दीडशें असामी असून दरवडा घालण्याकरितां जात आहों. मध्यें मुख्य आपली शिकार सांपडली ही घेऊन पुढें जाणार. आपण आपला पोषाख व घोडा आम्हांस कृपा करून द्यावा आणि जावें; तुम्हीं साधु असल्यामुळें मारण्याची आम्हीं इच्छा करीत नाहीं.

याप्रमाणें चोरांचें भाषण ऐकून रंगनाथस्वामीनीं त्यांस सांगितलें कीं, मजपाशीं जे शिपाई आहेत ते तुम्हांस दाखवितों पहा, असें म्हणून भात्यांतून एक तीर काढून जवळ मोठा खैराचा वृक्ष होता त्यास मारिला. आणि चोरांस तो काढावयास सांगून जर तीर काढाल; तर घोडा व पोषाख मिळेल म्हणून सांगितलें. मारलेल्या तिराचा तसूभर पिसारा मात्र बाहेर दिसत होता बाकीसर्व झाडांत गर्क होऊन गेला. नंतर बाहेर असलेले शेंपटास धरून चोर ओढूं लागले परंतु ओढावयास येईना म्हणून स्वामींजवळ येऊन विनंति करूं लागले कीं, तीर बाहेर थोडा राहिला आहे;याकरितां ओढतां येत नाहीं. स्वामी म्हणाले, आम्हांपाशीं घोड्याची काढणी आहे ती तुम्हांस देतों त्याचा फांस करून सर्वत्र मिळून ओढा असें

सांगून काढणी त्यांजपाशीं दिली. नंतर फांस घालून तो तीर संपूर्ण घोर लागून ओढूं लागले तरी तीर बाहेर निघेना. त्यासमयीं रंगनाथस्वामीनीं घोरांस एकीकडे होण्यास सांगून आपण त्या झाडाजवळ आले;आणि डाव्या हातानें तिराचा पर धरून केसासारखा ओढून बाहेर काढला, हें त्या घोरांनीं पाहिलें. तेव्हां स्वामी बोलले कीं, यामणें शिपाई मजपाशीं आहेत. हें भाषण ऐकून सर्वत्रांनीं हत्यारें ठेऊन दंडप्राय भूमीवर पडले, त्यांजला स्वामीनीं उठा झणून सांगितलें. त्यासमयीं घोर बोलले कीं, महाराज आह्मीं जन्माचे घोर असून आतां आह्मांस साव करावें. आपलें सामर्थ्य आह्मांस कळलें नव्हतें. आमची दुष्ट बुद्धि दूर होऊन सुबुद्धी होय अशी तजवीज करावी. तेव्हां रंगनाथस्वामी बोलले कीं, तुह्मीं आमचे बरोबर वडगांवांत चला झणजे तुह्मांस साव करूं. त्यावरून ते घोर स्वामींच्या घोड्याबरोबर धावूं लागले. आणि स्वामीही घोडा जलदीनें चालवून प्रहर रात्रीचे सुमारास वडगांवच्या शिवेवर येऊन पोहोंचले. त्याकाळीं घोडा खंकाळला; तो शब्द जयरामस्वामीनीं ऐकून समर्थांस झणाले कीं, रंगोबा आला. असें झणून परस्परें बोलत आहेत तों रंगनाथ स्वामी येऊन पोंचले. घोड्यावरून उतरून समर्थांस व जयरामस्वामी यांस साष्टांग नमस्कार केला. उभयतांनींही आलिंगन देऊन मस्तक अवघ्राण केला. नंतर जयरामस्वामीनीं विचारलें कीं, आज कृष्णाप्पांचा मुख्य दिवस असतां इतका उशीर कां केला. असो, बरेच आलेत. त्यावेळीं रंगनाथस्वामीनीं विनंति केली कीं, महाराज आज प्रातःकाळीं भा-

गानगरास स्नान करित असतां आजच स्वामींचा मुख्य दिवस असें समजलें. त्यासमयीं चाकरीचा दिवस चुकून गेल्यास सरकारचाकरीस फांटा पडेल हें समजून त्वरेनें आलों. तें ऐकून समर्थ म्हणाले बाबा, तूं सेवाधिकारी आहेस. असें म्हणून गोपाळ गोसांवी यांस सांगून घोडा पार्गेत बांधविला.

नंतर रंगनाथस्वामी यांस मंगळस्नान घालून आनंदमूर्तीसहवर्तमान समर्थ भोजनास बसले आणि चौघांचीं भोजनें मंडळीसहवर्तमान झालीं. चोरही सर्व आले, त्यांचा सविस्तर वृत्तांत समर्थांस सांगून त्यासंपूर्णांस जेवावयास घालून रंगनाथस्वामी कीर्तनास उभे राहिले, अरुणोदयापर्यंत कीर्तन होऊन सळीत झालें. प्रसाद घावयास समर्थादि मंडळी बसली आहे तों जयरामस्वामींचा शिष्य गोपाळगोसांवी येऊन नमस्कार करून विनंति करूं लागला कीं, महाराज! रात्रीं घोडा बांधावयास सांगितला तो पार्गेत नेऊन सामान उतरावयास तंग वार सैल करितांच घोडा मृत्यु पावला. रात्रींच येऊन विनंति करावी तर कीर्तनाचा समारंभ व यात्रेची दाटी सबब विनंति केली नाहीं. हें ऐकून रंगनाथस्वामी म्हणाले कीं, सरकार चाकरीवर घोडा पडला. हें समर्थांनीं ऐकून जयराम स्वामीस बोलले कीं, जयराम! रंगोबा काय म्हणतो ? जयरामस्वामी बोलले कीं, महाराज रंगोबा खरेंच बोलतो. इतक्यांत रंगनाथस्वामी पुनः बोलले कीं, सरकार चाकरीवर घोडा पडल्यास नवीन घोडा सरकारांतून बक्षीस देत

असतात ही सरकारची चाल आहे. तें ऐकून समर्थ जयरामस्वामी स म्हणाले जयरामा ! रंगोबा आणखी काय बोलत आहे तें ऐकिलेंस काय ? जयरामस्वामीनीं विनंति केली कीं, महाराज रितीचेंच बोलतो, सरकारांतून घोडा दिलाच पाहिजे. त्यासमयीं समर्थांनीं जयरामस्वामींस सांगितलें कीं, यास घोडा दिलाच पाहिजे हें खरें आहे याकरितां चला पागेंत जाऊं. असें म्हणतांच जयरामस्वामी, आनंदमूर्ती, रंगनाथस्वामी, वगैरे समर्थांकडील शिष्यमंडळी व पुष्कळ यात्रेकरू यांसह समर्थ पागेंत आले. नंतर ते काय चमत्कार करितात याकडे सर्व लोकांचें लक्ष लागून समर्थांनीं जयरामस्वामींस सांगितलें कीं, घोडा थकून निजला आहे. त्यास उठीव. तेव्हां त्यानीं विनंति केली कीं, महाराज आपण उठवावा. मी घोड्याची झोंप मोडण्यास प्रयत्न केला असतांही झोपेंतून जागा होणार नाहीं. समर्थ म्हणाले अरे तूंच उठीव. जागा होईल. नंतर आज्ञाप्रमाण म्हणून जयरामस्वामीनीं घोड्याचे पाठीवरून हात फिरविला आणि म्हणाले बापा तूं सरकारचाकरीवर पडलास म्हणून तुला सरकारांतून उठविण्याची आज्ञा झाली आहे तर ऊठ. असें म्हणून पुनः पुनः हात फिरवून घोड्याचे पुठ्यावर तीन वेळां थापटी मारितांच घोडा खडबडत उठून उभा राहिला आणि मोठ्यानें फुरफुरला. त्यावेळेस समर्थांनीं घोड्यास सांगितलें कीं, बापा, जोंपर्यंत रंगोबा जिवंत आहे तोंपर्यंत तूं त्याची चाकरी करावीस. मध्यंतरीं मरूंनये. हें वाक्य ऐकून त्रिवर्गांनीं समर्थांचे स्तुतिपर एक एक श्लोक म्हटला तोः—

॥ जयराम स्वामीनीं केला तो श्लोक ॥

श्रीगुरुसमर्थ परलीला ॥ काय एक न करी पर लीला ॥
सत्वरूप सत्वाचिहि मूर्ती ॥ रामदास ह्मणतां बहुकीर्ती ॥ १ ॥

॥ रंगनाथ स्वामीनीं केला तो श्लोक ॥

रामरूप रामचि अवतरला ॥ रामदास ह्मणतां पर तरला ॥
निर्जिवा करितसे सजीवा ॥ धन्यकीर्ति स्मरतां जिवशीवा ॥ २ ॥

॥ आनंदमूर्तीनीं केला तो श्लोक ॥

जडजिवोतारिलें बहुतांही ॥ यापरी न सजिवा बहुताही ॥
अश्व हे उठ ह्मणे उठताहे ॥ धन्यकीर्ति पाहतां बहुताहे ॥ ३ ॥

॥ तेव्हां समर्थांनीं तिघांवरून केला तो श्लोक ॥

धन्य साधु पहा जयरामा ॥ धन्य रंग पहा निजरामा ॥
धन्य साधु पहा आनंदमूर्ती ॥ पाहूं पाहा स्वतः सिद्धकीर्ती ॥

असो, नंतर जमलेल्या सर्व लोकांनीं समर्थांस वंदन केलें. तों रंगनाथ स्वामीबरोबर आलेल्या चोरांनीं हें झालेलें चरित्र पाहून चौघांसही साष्टांग नमस्कार केले आणि सद्गदित होत्साते उभे राहिले. त्या समयीं त्यांस समर्थ बोलले कीं, चोरहो, तुह्मांवर रंगनाथस्वामीनीं कृपाकरून तुह्मांस साव केलें आतां या पुढें चोरी न करितां सावाप्रमाणें वागावें. ह्मणजे तुमचें वर्तनही तसें होऊन कल्याण होईल. असा त्यांस आशीर्वाद दिला व प्रसाद देऊन घरीं जाण्यास आज्ञा दिली. तेव्हां ते चोर आपले गांवीं

निघून गेले. नंतर समर्थादि चौघे असामी सभेस येऊन त्यानीं सर्व लोकांस प्रसाद दिला तो घेऊन यात्रेकरू चालते झाले. मग दुसरे दिवशीं चौघांचें स्नानसंध्यादि भोजनकर्म होऊन आसनावर बसले. तेव्हां एकमेकांत परमार्थपर भाषणें बोलत असतां आनंदानें एकमेकांस नमस्कार करीत व आलिंगन देत. अशा प्रकारें संतोषानें नेत्रांतून आनंदाश्रु श्रवताहेत. व अंगावर रोमांच उभे राहिले आहेत. अशा विदेहस्थितींत चौघेही असतां त्या आनंदांत विदेहस्थितीचे लक्षणपर समर्थांनीं श्लोकाचा पहिला चरण झटला. व दुसरा जयराम स्वामीनीं. तिसरा रंगनाथ स्वामीनीं व चौथा आनंदमूर्तीनीं झटला तो श्लोकः-

॥ श्लोक ॥

मुक्तासि कांहीं तनुभाव नाहीं। असून देहीं परि तो विदेही ॥
प्रारब्ध कर्मास्तव देहि झाले । वायूसवें पादप जेंवि डोले॥ १॥

या प्रमाणें चौघेही आनंदी होऊन सुख पावले आणि कांहीं दिवस वडगांवास राहून तिघेही आपआपले स्थानाप्रत जाते जाहले. जयरामस्वामी मात्र वडगांवास राहिले. (हें चरित्र शके १५७९ माघशुद्ध पौर्णिमा व वद्य प्रतीपदेस झालें.)

कोणे एके समयीं परळीचे किल्ल्यावर तटाचे ओरींत स्वामी राहत असतां तेथें शिवाजीमहाराज दर्शनास आले. त्यासमयीं महाराजांस कोणी एक घोडा नजर दिला होता, तो जीन सामानासुद्धां तयार करून स्वामींस अर्पण करावा, या हेतूनें आणून

पुढें उभा केला. तो घोडा पाहून स्वामी बोलले कीं, अरे ! या घोड्यास ठायीं ठायीं कां बंधन केलें! लौकर मोकळा करा, असें म्हणतांच सामान उतरून घोडा मोकळा केला. त्या घोड्यावर अयाळ धरून समर्थ उडून बसले. तो घोडा मोकळा तसाच दरवाजांतून खालीं उतरला, आणि मनास येईल तिकडे निघाला. तों घोड्यामागें सर्व शिष्यमंडळी धांवत गेली, परंतु त्यास धरण्याविषयीं कोणाचीही हिंमत होईना, तेव्हां सर्व मागें राहिले. एक उद्धवगोसांवी व कल्याणगोसांवी हे उभयतां मात्र बरोबर ठरले. भर दोनप्रहरच्या समयीं घोडा बेलाशक डोंगरांतून व दगडांतून धांवत आहे तों समर्थांस तृषा लागली, त्या समयीं उद्धवा पाणी दे, असें म्हणतांच उद्धवानें चंबूंतून पाणी काढून दिलें. तेणेंकरून तृषा निवारण जाहल्यानंतर समर्थांनीं संतुष्ट होऊन उद्धवाचें नांव शिव असें ठेविलें. (उद्धवगोसांवी यांनीं पदें व अभंग केले; त्यांत शिव असें नांव घातलें आहे.) नंतर समर्थांची स्वारी घोडा फिरवीत फिरवीत चाफळास आली, आणि तो घोडा मठांत ठेवून आपण घळींत गेले. त्या घोड्याचें नांव " रामबाण " असें ठेविलें (हें चरित्र शके १५७९ हेमलंबी नाम संवत्सरीं जाहलें.)

कोणे एके समयीं छत्रपतींची स्वारी साताऱ्यास असतां समर्थ निगडीस जाऊन परळीस जाण्याकरितां शिष्यमंडळीसहवर्तमान निघाले. मार्गानें चालत असतां सर्व शिष्यमंडळींनीं शेतांतून हुरडा तयार झालेला पाहून स्वामीस विनंति केली कीं, महाराज सर्वांस

हुरडा खाण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे, त्यास आज्ञा व्हावी. तेव्हां स्वामीनीं आज्ञा केली कीं, प्रत्येक शेतांतून दाहा दाहा वीस वीस, कणसें घेऊन एके ठिकाणीं बसून भाजून खावीं. त्याप्रमाणें कणसें जमा करीत करीत सर्व शिष्यमंडळी समर्थांसहवर्तमान देहेगांवानजीक आली.

तेथें एका पाटलाच्या शेतांत विहिरीजवळ आले. आणि समर्थांस विनंति केली कीं, आम्ही हुरडा तयार करूं तोंपर्यंत अवकाश करावा. तेव्हां स्वामी विहिरीजवळ आंब्याचे वृक्षाखालीं बसले. शिष्यमंडळींनीं त्या पाटलाचे शेतांतून कांहीं कणसें आणिलीं, तीं व पूर्वीचीं जमा केलेलीं सर्व कणसें एकत्र केलीं आणि आगटी पेटवून हुरडा भाजून तयार केला. त्यांतून कांहीं समर्थांस देऊन आपण भक्षावयास बसले आहेत; तों आपले शेतांत मंडळी हुरडा खात आहे हें पाहतांच, तो शेतकरी पाटील गांवांतून धांवून आला. आणि पाहतो तों हुरड्याचा मोठा ढीग पडलेला आहे, आणि आंब्याचे झाडाखालीं आसन घालून कोणी बोवा बसले आहेत, हें पाहून हेच या मंडळीचे अधिकारी आहेत, सबब यांसच शिक्षा करावी, असें त्यानें मनांत आणून तींच तांटें घेऊन स्वामीचे पाठीवर मारिलीं; तेव्हां सर्व शिष्य धांवले आणि पाटलास धरून मारूं लागले, तों सर्वांचें निवारण करून समर्थ बोलले कीं, अरे! याच्या शेतांतील कणसें घेऊन खातां आणि यासच मारतां ? हें योग्य नाहीं, तर यास सोडून द्या. असें सर्वांस सांगून स्वामीनीं पाटलाचेंही समाधान केलें.

अनंतर त्या पाटलानें यांची सहनशक्ती पाहून हे कोण असा शोध केला, तों हे समर्थ रामदासस्वामी शाहुछत्रपतीचे गुरु आहेत, असें समजतांच, तो अत्यंत भयभीत होऊन पुनः स्वामीजवळ आला आणि साष्टांग दंडवत करून चरणाजवळ गडबडां लोळूं लागला, आणि म्हणाला महाराज ! मी आपलें स्वरूप न ओळखतां हा मोठा अपराध केला, यास्तव समर्थांनीं क्षमा करावी. असें म्हणून दीर्घस्वरानें रुदन करूं लागला. तेव्हां समर्थांनीं बहुत प्रकारें त्याचें समाधान केलें आणि त्यास अभय देऊन घरीं पाठविलें, नंतर आपण निघून माहुलीस आले.

समर्थ आल्याचें वर्तमान राजश्रीस समजतांच ते भोजनाच्या पूर्वीच समर्थांकडे येऊन मोठ्या समारंभानें त्यांस माचीस घेऊन आले, आणि पाक सिद्ध करवून समर्थांस आपले हातें मंगलस्नान घालावें या इच्छेनें विनंति केली, त्याप्रमाणें समर्थांची आज्ञा होतांच स्वामीस चौरंगावर बसवून त्यांचें पादप्रक्षालन केलें, आणि सुगंध तैल घेऊन अंगास मर्दन करूं लागले तों, त्यांच्या पाठीवर तीन वळ उठलेले पाहतांच हे वळ कशाचे म्हणून शिवाजीनें विचारलें, तेव्हां तुला हें विचारण्याचें प्रयोजन नाहीं, असें स्वामींनीं म्हटल्यानंतर पुढें कांहींच न बोलतां मोठ्या समारंभानें मंगलस्नान घालून संध्यावंदनादि झाल्यानंतर मंडळीसहवर्तमान समर्थांस भोजनास बसविलें. आणि महाराज स्वतां समर्थांच्या उच्छिष्टपात्रीं भोजन करावें या हेतूनें मागील पंक्तीबरोबर राहिले. समर्थांचें भो-

जन झाल्यानंतर, त्यांस तांबूल दिला, आणि ते निद्रास्थानीं गेले.

इकडे शिवाजीनें भोजन करावें परंतु स्वामींनीं पाठीवर वळ उठल्याचें कारण न सांगितल्यामुळें त्याच्या अंतःकरणास व्यग्रता होऊन त्यास भोजनही सुचेना, तेव्हां सर्व मंडळीस एकत्र करून तुह्मास समर्थांच्या पायांची शपथ आहे, त्यांच्या पाठीवर कशानें वळ उठले तें खरें सांगा? अशी प्रार्थना करितांच त्यांनीं झालेला सर्व मजकूर सविस्तर सांगितला. तो ऐकून छत्रपतीस बहुत क्रोध आला, परंतु तसेंच भोजन करून दोन ढालाईत बोलावून आणिले आणि आज्ञा केली कीं, तुह्मी देहेगांवीं जलद जाऊन तेथील पाटलास मारीत मारीत येथपर्यंत आणावें. असें ढालाइतांस शिवाजी सांगत आहे; हें समर्थांनीं अंतर्दृष्टीनें जाणून शिवाजीस बोलावून आणिलें, आणि सांगितलें कीं, तुझे मनांत देहेगांवकर पाटील याचें पारिपत्य करावें असें असल्यास; आह्मीं सांगूं त्याप्रमाणें करावें. शिवाजीनें आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन, असें सांगितलें. समर्थांनीं आज्ञा केली कीं, तूं जे मनुष्य पाठविणार त्यांस सांगावें कीं, पाटलास मारहाण न करितां व कांहींएक न बोलतां; येथवर आणावें. जें पारिपत्य करणें तें आह्मी समक्ष करूं.

राजश्रीनें ढालाइतांस समर्थांचे आज्ञेप्रमाणें सांगून पाठविलें. त्याप्रमाणें ते जाऊन पाटलास घेऊन आले. इकडे स्वामी व लहान थोर मंडळीसुद्धां सभा भरली होती, तेथें त्या पाटलानें येऊन मी सर्वस्वीं अपराधी आहें, असें ह्मणून सभेपुढें दंडवत् नमस्कार घातला.

समर्थांनीं पुनः छत्रपतीस विचारिलें कीं, आह्मी सांगूं त्याप्रमाणें याचें पारिपत्य करणार किंवा नाहीं खरें सांग ? शिवाजीनें उत्तर केलें कीं,महाराज ! खरें सांगतों. आपल्या पायांचीच शपथ, आपली आज्ञा होईल, तसेंच करीन. असें राजाचें वचन घेऊन त्या पाटलास सांगितलें कीं, अरे ! ऊठ, आणि शिवबाचे पायांवर डोई ठेव, अशी समर्थांची आज्ञा होतांच; त्यानें उठून शिवाजीचे पायांवर डोई ठेविली. मग समर्थ बोलले, शिवबा ! या पाटलास पागोटें व बनात देऊन ती जमीन यास इनाम करून द्यावी.

असें समर्थांनीं सांगतांच छत्रपतीसुद्धां संपूर्ण सभा हसूं लागली आणि महाराज ! असें पारिपत्य मागेंही कोणीं केले नाहीं व पुढेंही कोणीं करणार नाहीं; असें बोलूं लागली. समर्थ बोलले कीं, यासमयीं यास असेंच केलें पाहिजे. छत्रपतीनें आज्ञा प्रमाण असें ह्मणून त्यास पागोटें व बनात पोषाख देऊन, ती जमीन त्यास इनाम करून दिली आणि निरोप दिला. शिवाजी समर्थांबरोबर परळीस आले आणि त्रिरात्र राहून आज्ञा घेऊन गेले. (हें चरित्र शके १५८० विलंबीनाम संवत्सरीं पौष मासीं जाहलें)

कोणे एके समयीं चाफळास असतां त्यांस, शीतज्वराचा उपद्रव जाहला होता, त्या संधीस शिवाजी दर्शनास आले. तेव्हां कल्याणस्वामींनीं शिवाजी दर्शनास आले, अशी विनंति करितांच समर्थांनीं अंगावरील छाटी उशाकडेस ठेवून आपण उठून बसले, शिवाजीनीं येऊन दंडवत केलें, आणि आज्ञेप्रमाणें पुढें बसून कांहीं गोष्टी बोलत असतां अकस्मात् त्यांची नजर समर्थांच्या छाटीवर गेली, तों

छाटी उडत आहे. हें आश्चर्य पाहून राजश्रीनीं कल्याणगोसांवी यांच्या मुखाकडे पाहिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, समर्थांस पंचवीस दिवस शीतज्वर येत असतो; हल्लीं शीत आलें, या संधींत आपणही दर्शनास आलां ह्मणून शीत छाटींत ठेवून तुह्मांबरोबर बोलत आहेत, हें ऐकून शिवाजी चरणीं मस्तक ठेवून बोलले कीं, महाराज! असें आपलें सामर्थ्य असतां शरीरेंकरून क्लेश भोगणें हें काय? समर्थ ह्मणाले, शरीरभोक्तृत्व भोगणें प्राप्त आहे. राजश्री ह्मणाले सामर्थ्य असतां कां भोगावें? समर्थांनीं उत्तर केलें कीं, यदर्थीं भगवद्वाक्य भागवतीं एकादशस्कंधीं आहे. कीं, उद्धवाशीं भगवान् प्रश्नोत्तर सांगत असतां साधूंचें वर्णन करितानां स्वमुखें असें ह्मणाले कीं, साधुमाहात्म्य कोठवर वर्णावें? साधु हे थोरच; परंतु देह, प्रारब्धावर टाकून व्यथा भोगीत आहेत. त्याकाळीं उद्धवानीं विनंति केली कीं, आपल्यास शरण आलों असतां प्रारब्ध भोक्तृत्वही सुटत नाहीं; त्या अर्थीं आपल्यास शरण येऊन उपयोग काय? भगवान ह्मणाले प्रारब्धास शरण गेल्यास काय होतें व मला शरण आल्यास कसें घडतें, याचा विचार करावा. उद्धव ह्मणाले, महाराज! प्रारब्धास शरण गेल्यास जन्म मरण सुटत नाहीं. आपल्यास शरण आल्यास देहप्रारब्धभोग सुटत नाहीं. दोहोंकडून संकट, यांत उत्तम मार्ग कोणता? शरण कोणास जावें? त्याजवरून भगवान बोलले कीं, उद्धवा! संचितक्रियमाणाचा संचय होतो. याचें नांव प्रारब्ध. या योगानें जन्ममरणास कारण ह्मणून प्रारब्धास शरण गेल्यास उपयोग काय? मला शरण आ-

न्यास सद्गुरुकृपेच्या योगानें महावाक्याचा बोध अंतर्गत झाल्यावर देव कोण ? भक्त कोण ? याचा विचार गुरुमुखानें श्रवण होऊन दृढीकरण होतें. देवभक्तैक्य आत्मानात्मविचार योग केल्यानें तर देह प्रारब्ध भोक्ता. आपण साक्षी सुख दुःख व्यतिरिक्त होतो. आणि अन्वयव्यतिरेक आत्मानात्मविचार योगें साक्षित्व निरसल्यानंतर जन्ममरणाव्यतिरिक्त होतो. यास्तव मला शरण ये. बापा संचित याचें नांव प्रारब्ध भोक्तृत्व भोगावेंच. सामर्थ्य योगानें भोगाचा त्याग केल्यास जन्मास कारण होईल. यास्तव सामर्थ्य असतांही भोग भोगून आपण व्यतिरिक्तत्व असून निरामयाप्रमाणें आहे. एकनाथ महाराज यानीं याप्रमाणेंच वर्णन केलें आहे. ह्मणून शिवबा! कसेंही सामर्थ्य असून ब्रह्मज्ञानही झालें असतां तेणेंकरून संचितक्रियमाणकर्मांचा मात्र नाश होतो, परंतु प्रारब्धकर्म भोगल्यावांचून सुटत नाहीं. यास्तव प्राप्त झालेले प्रारब्ध कर्मानुरूप भोग, अवश्य भोगिले पाहिजेत, ह्मणून या शरीरेंकरून दुःख भोगितों. हें ऐकून महाराजांनीं साष्टांग दंडवत करून मी धन्य आहें, असें ह्मणून त्रिरात्र राहून आज्ञा घेऊन गेले.

कोणे एके समयीं स्वामी रामघळींत असतां काशीकडून विद्याभ्यास करून सदाशिवशास्त्री देव येवलेकर दिवसा मशाली लावून व जानव्यास सुरी बांधून दिग्विजय करीत निघाले, ते दक्षिणेस शिवाजीमहाराज केवळ धर्मात्मा आणि त्यांजपाशीं गंगापंडित

मोठे विद्वान आहेत त्यांस जिंकावें ह्मणून रायगडीं शिवाजीमहाराज यांजपाशीं येऊन राजदर्शन घेऊन सभा करावी, ह्मणून सांगितलें. तेव्हां राजश्रीनीं तें मान्य करून गंगाभट यांचे आश्रमास जाऊन त्यांस सांगितलें कीं, काशीहून सदाशिव शास्त्री देव हे दिवसास मशाल लावून यज्ञोपवीतास सुरी बांधून जयपत्रें घेत घेत आले आहेत. आणि उदयीक सभा करावी, असें ह्मणतात. हें आपणास कळावें. याप्रमाणें सांगून छत्रपती गेले. नंतर गंगाभटजी यांणीं रात्रौ विचार केला कीं, सदाशिव शास्त्री आले आहेत, यांस जिंकणें आपल्याकडून घडेल किंवा न घडेल, याचा अजमास लागत नाहीं, यास्तव हें अरिष्ट स्वामींकडेस ढकलावें. असा विचार करून त्या रात्रीं त्यांचे बिऱ्हाडीं जाऊन परस्पर आगतस्वागत होऊन बोलले कीं, आपण उदयीक सभा करविणार त्यास मी पंडित व आपणही पंडित आहां. तस्मात् यथाक्रमें होणें तसें होईलच; परंतु राजश्रींचे गुरु रामदास महासमर्थ आहेत यास्तव जयपत्र घेणें तें त्यांजपासून घ्यावें हा प्रकार आपणही राजश्रींशीं बोलावा, आह्मीही अनुमोदन देऊं, याप्रमाणें ठरवून गंगाभट घरीं आले.

भाग १३ वा.

अंत्यजाकडून वेद बोलवितात.

सूर्योदयानंतर महाराज छत्रपति यांणीं स्नानसंध्यादि कर्में झाल्यानंतर सभा करून गंगाभटजी आदिकरून आश्रित सर्व शास्त्री व सदाशिव शास्त्री यांस पालख्या पाठवून बोलावून आणिलें. आणि उभयतां शास्त्री यांशीं प्रार्थना केली कीं, ही सभा आपली आहे. असें बोलून पुढें महाराज बोलणार; तों सदाशिव देव बोलले, कीं, आपले गुरु आहेत, त्यांस येथें आणवावें, किंवा आपण तेथपर्यंत चलावें ह्मणजे त्यांजबरोबरच दोन भाषणें करूं. गंगाभटजीही जवळच आहेत. तेव्हां महाराज बोलले, कीं, स्वामी अरण्यवासी आहेत, हा विषय त्यांचा नव्हे. आपण कोणी सांगितल्यावरून ह्मणत असाल, परंतु शास्त्री यांचा वाद शास्त्री यांशींच व्हावा, हें योग्य आहे. गंगाभट बोलले देव ह्मणतात हें यथायोग्य आहे. महाराज बोलले, कीं, जयपत्र देणें जाहल्यास आपणासहवर्तमान स्वामीपाशीं जाऊन देऊं. हा विषय तुमचा तुह्मीं पहावा. देव गैरमाहितीनें बोलले, ते बोलोत, परंतु आपण या छंदीं पडतां हें चांगलें नव्हे. असें बहुत प्रकारें महाराज सांगत असतां, स्वामीकडेसच चलावें ह्मणून उभयतांचा आग्रह पाहून महाराज " बहुत बरें " ह्मणून रायगडाहूनें स्वारीनिशीं स्वामींचा शोध करीत करीत चाफळास आले. तेथें श्रीचें दर्शन करून स्वामींचा शोध करित असतां घळींत आहेत ह्मणून कळतांच

स्वारीसहवर्तमान निघाले, तों कल्याण गोसांवी शिरगांवाहून आले, त्यांचेबरोबर चालले. ते पुढें व स्वारी मागें असे जात असतां बहिरोबाचे डोगरांत उत्तरकेडील रत्स्यावर एक्या मोठ्या दगडावर स्वामी एकटेच कुबडी घेऊन बसले आहेत. तों कल्याणगोसांवी पुढें जाऊन नमस्कार करून उभे राहिले.

स्वामीनीं विचारिलें कीं, मागाहून स्वारी कोणाची येत आहे. कल्याणगोसांवी यांणीं सांगितलें कीं, महाराज ! राजश्रींची स्वारी व त्यांजबरोबर दिवसास मशाल लावून एक शास्त्री येत आहेत. असें कल्याणगोसांवी बोलत आहेत, तों महाराजांची स्वारी येऊन पोहोंचली. महाराजानीं दंडवत प्रणाम करून उभे राहिले, तों सदाशिव शास्त्री शिबिकेंतून उतरून स्वामी ज्या दगडावर बसले होते तेथें पायीं चालत आले. तेव्हां स्वामीनीं दगडावरून खालीं न उतरतां नमस्कार केला. सदाशिव शास्त्री बोलले कीं, आपली व आमची बरोबरी जाहल्यास आह्मी नमस्कार करूं, नाहीं तर आशीर्वाद ह्मणूं. स्वामी बोलले कीं, आपण साक्षात भूदेव, यास्तव आपण आह्मास आशीर्वाद ह्मणावा हें योग्य आहे. तेव्हां सदाशिवशास्त्री बोलले, कीं. परीक्षा जाहल्यावांचून नमस्कार किंवा आशीर्वाद कां ह्मणूं ? समर्थ बोलले परीक्षा ती काय? शास्त्री बोलले, आमची वादभिक्षा आहे ती द्यावी. आपल्यास मी जिंकिल्यास जयपत्र घेऊं. आपण आह्मास जिंकल्यास जयपत्र देऊं. आणि दिवसा मशाल लाविली आहे ही विझवूं व यज्ञोपवीतास सुरी बांधली आहे, हिणें जीभ उतरून पुढें

ठेवून जाऊं. तेव्हां समर्थ बोलले कीं, वादभिक्षा ह्मणणें आणि इतकें निग्रहपर बोलणें आह्मांस कशाकरितां पाहिजे. आह्मी ना शास्त्री ना पुराणीक, ना वैदिक, ना विद्वान, आह्मी केवळ रामाचे दास आणि अरण्यवासी आहों. यास्तव आह्मावर कृपा करावी, व आपले बरोबरीचे जे असतील त्यांसह आग्रहपुरस्सर जें बोलणें असेल तें बोलावें. आह्माशीं बोलणें हें योग्य नव्हे.

त्यानंतर शास्त्री बोलले; आपण राजगुरु, सर्वांपेक्षां विद्वान् आणि राज्यमंडळांतील सर्वांपेक्षां पूज्य यास्तव जयपत्रघेणें तें आपलेंच घेऊं आणि भाषण करणें तेंही आपल्याशींच करूं. तेव्हां स्वामी बोलले, कीं, इतका आग्रह करणें चांगलें नव्हे "बहुरत्ना वसुंधरा" आणि श्रीचे भांडारीं कोणतेही गोष्टीचा तोटा नाहीं. परंतु आपण या छंदांत पडूं नये. शास्त्री बोलले, मी तुमच्या ह्या साधुपणाच्या गोष्टी ऐकावयाला आलों नाहीं. तस्मात् वाद घालावा, किंवा जयपत्र द्यावें. हा सदाशिवांचा आग्रह पाहून स्वामींनीं कल्याणाकडे पाहिलें. तेव्हां त्यानें नमस्कार करून विनंति केली कीं, महाराज! पात्र बहुत शुद्ध आहे त्यांत यांणीं आपण होऊन गांठ घातली आहे. यास्तव आपण कृपा करावी. हे कल्याणाचे शब्द ऐकून पंडितांनीं हसून कायहो हा भाषण करीत आहे! असें आश्चर्य केलें आणि महाराज मंडळीसहवर्तमान व त्यांचे मागें गंगाभट्टप्रभृति पंडित उभे असून स्वामी दगडावर कुबडी टेंकून बसले आहेत. हें पाहून शास्त्रीयांचे मनांत आलें कीं, स्वामी नम्र बोलतात, परंतु आह्मी आलों हें पाहिलें असतां उभे सुद्धां राहिले नाहींत. तेव्हां

पे. ज. म. ह. सं. चोपडा
ग्रंथ संग्रह

स्वामींनीं शाखी यांचे मनांतील भाव जाणून व कल्याण गोसांवी यांचें सांकेतिक बोलणें ऐकून ह्मणाले कल्याणा! हा मोळक्या कोण जात आहे, त्यास बोलवावें ह्मणून आज्ञा केली.

कल्याणगोसांवी यांनीं जाऊन मोळक्यास हाक मारिली,तों त्यानें मोळी टाकिली, आणि जवळ येऊन हात जोडून प्रार्थना केली कीं, महाराज! मी महार मजला काय आज्ञा आहे. तेव्हां कल्याण स्वामी बोलले कीं, " तूं भिऊं नको माझे मागें ये " असें ह्मणून त्यास घेऊन गेले. नंतर तो स्वामिसन्मुख जोहार करून उभा राहिला. आणि कल्याण स्वामींनीं विनंति केली कीं, महाराज ! मोळक्या आला. तेव्हां स्वामींनीं त्यास पुसलें कीं, तूं कोण आहेस? तो बोलला मी चाफळचा महार आहें, आपले मठांत मोळी देऊन भाकर नेत असतों. ह्मणून लांकडांची मोळी नेण्याकरितां या रानांत आलों होतों; मी महाराजांचा गुलाम आहें. असें ऐकून स्वामींनीं हातची कुबडी कल्याणाजवळ दिली आणि सांगितलें कीं, या कुबडीनें रेषा ओढून तिचे आंत त्याजला बोलवावें. तेव्हां आज्ञा प्रमाण, ह्मणून कल्याणगोसांवी यांणीं त्या कुबडीनें रेषा ओढून ही रेषा ओलांडून आलीकडे ये असें त्यास सांगितलें, त्याप्रमाणें तो ती रेषा ओलांडून आंत आला. त्यास स्वामींनीं पुसलें कीं, तूं कोण आहेस? त्यानें उत्तर केलें, महाराज! मी शूद्र आहें. पुनः स्वामींच्या सांगण्यावरून कल्याणानें दुसरी रेषा ओढून आलीकडे बोलाविलें. तो येतांच स्वामींनीं विचारिलें कीं, तूं कोण आहेस?

महाराज मी वैश्य आहें. पुनः कल्याणानें स्वामींच्या आज्ञेनें तिसरी रेषा ओढून त्यास आलीकडे बोलाविलें. तो येतांच तूं कोण? म्हणून स्वामींनीं विचारिलें. तेव्हां महाराज! मी क्षत्रिय आहें. पुनः स्वामी बोलले कल्याणा ! चवथी रेषा ओढ. असें म्हणतांच त्यानें चवथीही रेषा ओढिली ती ओलांडून येतांच समर्थांनीं पुसलें तूं कोण? महाराज! मी ब्राह्मण आहें. तेव्हां समर्थांनीं विचारिलें कांहीं पढला आहेस काय? तो म्हणाला महाराज! मी सर्व पढलों आहें. कोणाशीं संवाद करूं? हें ऐकून या पंडिताशीं बोल अशी समर्थांनीं त्यास आज्ञा केली.

नंतर तो पंडिताकडे मुख करून वेदापासून आरंभ करून न्यायशास्त्रादि सर्व शास्त्रांत बोलता जाहला आणि शास्त्री यांस तीन वेळां हरविलें आणि म्हणाला आतां आपण पूर्वपक्ष करावा; मी उत्तर देईन. तें ऐकून सदाशिव शास्त्री यांनीं मनांत विचार केला कीं, मी जन्मजन्मांतरच्या पुण्यप्रभावेंकरून ब्राह्मणयोनींत जन्म पावलों, द्विज होऊन श्री काशिक्षेत्रीं जाऊन वेदाध्ययन व शास्त्र पढून दिवसा दिवटी लावून आणि यज्ञोपवीतास सुरी बांधून सर्व क्षेत्रीं जयपत्रें घेत आलों. त्याच अन्वयें शिवाजी राजाचा सभा जिंकावी आणि जयपत्र घ्यावें असा हेतु मनांत धरून येथें आलों. गंगाभट शास्त्र्याच्या योगानें समर्थांपाशीं आलों. समर्थांनीं तर प्रत्यक्ष अंत्यज आणून त्याचे तोंडून वेद बोलविला व माझा गर्व परिहार केला, आतां यांजपाशीं बोलून पार पडेन अशी गोष्ट

नाहीं, स्वामी साक्षात् मारुतिअवतार त्यांशीं द्वंद्व करून मीं कर्म केलें तें खोटें; असा शास्त्रीबावांस पश्चात्ताप झाला. पश्चात्तापाअंतीं उपरती झाली. 'पश्चात्तापेन शुद्ध्यति' या वचनाचें स्मरण करून मनोभावानें स्वामींस साष्टांग नमस्कार केला. त्या बरोबर सदाशिव शास्त्री यांणीं पूर्व निबंधाप्रमाणें मशाल आपले हातें मालविली, आणि यज्ञोपवीताची सुरी काढून डावे हातीं जिव्हा धरून उजवे हातीं सुरी घेऊन आपली जिव्हा कापूं लागले. इतक्यांत समर्थ बोलले, कीं, कल्याणा! ब्राह्मणाचा हात धर आणि सुरी घे. अशी समर्थांची आज्ञा होतांच कल्याणगोसांवी यांणीं जलदीनें त्यांचे हातची सुरी घेतली. स्वामी शास्त्रीबावांस ह्मणाले कीं, बाबा! या दुराग्रहाचें कारण काय? येथें कोणाचें कोणी जयपत्र घ्यावें, जीभ कोणाची कोणीं कापावी. दिवसा मशाल कोणाची कोणीं विझवावी, तुह्मीही समर्थ आहां. श्रीरघुपतीच्या भांडारांत अनेकप्रकारच्या विभूति आहेत यास्तव अशी अतिदुराग्रहाची गोष्ट करूं नये. असें बहुत प्रकारें समाधान करून शास्त्री बावांचें सांतवन केलें.

याप्रमाणें झालेली स्थिति पाहून शिवाजी महाराज, गंगाशास्त्री, जनार्दनपंत कोरडे, जनार्दनपंत हणमंते, मोरोपंत पिंगळे, निळो पंत मुजूमदार, बाजी व महादाजी खासनवीस व बाळाजी आबाजी चिटणीस आदिकरून सर्व मंडळी उभी होती. सर्वांचे मनांत परमाश्चर्य वाटून महाराज पुढें उभे होते. त्यांचे नेत्रांतून अश्रुधारा स्रवताहेत, कंठ सद्गदित झाला आहे, मनांत संकल्प कीं, प्रत्यक्ष अंत्यजाचे तोंडून वेद बोलविला. पूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं

रेड्याचे मुखानें वेद बोलविला त्याचप्रमाणें हें चरित्र होय. असें अघटित करणें ईश्वरअंशावांचून होत नाहीं. असें मनांत येऊन आनंदाश्रू नेत्रीं येऊन कंठ सद्गदित झाला. आंगावर रोमांच उभे राहिले, अशी राजाची वृत्ति पाहून समर्थ मंदस्मित हांस्य करून बोलले कीं, राजा तुझें दैव थोर तुजकरितां श्रीस हें चरित्र करून दाखविणें भाग पडलें. आतां पुढें काय होईल तें पहा. असें ऐकून राजश्रींचा कंठ फार सद्गदित झाला आणि साष्टांग नमस्कार करून उभे राहिले.

नंतर समर्थांनीं अंत्यजास सांगितलें कीं, जी रेषा ओलांडून तूं आलास, ती रेषा माघारी वोलांडून जा. अंत्यज बोलला कीं, महाराज ! आज्ञेप्रमाणें मी माघारा जातों, परंतु माझी एक विनंति आहे ती सर्व मंडळीसहवर्त्तमान ऐकावी. पूर्वी मी चित्रसेन नामा गंधर्व असून स्त्रियांसहवर्तमान जलक्रीडा करीत असतां त्या मार्गानें भगवान् नारद आले. तेव्हां मी मद्यप्राशनानें मदांध होऊन स्त्रीसमुदायांत निमग्न असतां नारदाचें आगमन पाहून त्यांशीं पूजायुक्त नमस्कारपूर्वक उत्तम भाषण न करितां स्त्रियांशीं क्रीडा करूं लागलों, तें पाहून नारदमुनीनीं शाप दिला, कीं, अरे मदांधा तुला या मृत्युलोकीं, कलियुगांतच कालेंकरून पशुयोनींत दोन व अंत्यजजातींत एक असे तीन जन्म होतील. असें त्यांचें शापवाक्य ऐकतांच मी वृत्तीवर येऊन त्यांस शरण गेलों.

त्यानंतर नारद यांणीं कृपार्द्र होऊन भाषण केलें कीं, आह्मांस शाप द्यावयाचें कारण नाहीं; परंतु ऐश्वर्यमदा-

मुळें तुला साधूंचा महिमा ठाऊक नाहीं. पुढें कलियुगांत साधूंचे अवतार होणार आहेत त्यांचें माहात्म्य तुला कळण्याकरितां प्रथम शाप देऊन त्या साधूंच्या कृपेनें तुझा उद्धार होईल, असा उश्शाप देतों. त्याजवरून मी विनंति केली कीं, महाराज ! कोणते साधूंच्या योगें उद्धार होईल आणि माझे जन्म कसकसे होतील ? तेव्हां नारदस्वामीनीं सांगितलें कीं, प्रथम अश्वाचें जन्म जयपाळराजाचे घरीं होईल, तेथें श्रीसांबअवतार मुकुंदराज येऊन तुझा उद्धार करतील. नंतर तूं कांहीं कालेंकरून प्रतिष्ठान क्षेत्रीं ब्राह्मणाचे घरीं रेडा होशील; तेथें श्रीमहाविष्णूचा अवतार ज्ञानेश्वर होऊन तुझा उद्धार करतील. नंतर कांहीं कालेंकरून कृष्णातीरीं चाफळीं अंत्यज होशील; त्याकाळीं मारुती अवतार श्रीरामदास येऊन, ते तुझा उद्धार करतील. नंतर आपले स्थानाप्रत जाऊन अक्षय राहशील. अशा नारदांच्या वचनाप्रमाणें माझे दोन जन्म होऊन हा तिसरा जन्म आहे. याजन्मीं स्वामीनीं दर्शन देऊन अनुग्रह करून मुक्त केलें. असें बोलून त्या देहाचा त्याग करून तो दिव्यदेही जाहला.

शिवाजीमहाराज आदिकरून सर्वांनीं हा चमत्कार पाहतांच परम आश्चर्य मानून स्वामी परम समर्थ आहेत, असें परस्परें बोलूं लागले, तों अंबरीं घंटाघोषानें व गंधर्वगायनानें युक्त आणि विद्युल्लतेसारखें सतेज, असें एक दिव्यविमान सर्वांचे दृष्टीस पडलें. तेसमयीं चित्ररथ गंधर्वानें पुनः स्वामींस विनंति केली कीं, महाराज ! दोन जन्माचा पूर्वी उद्धार जाहला, तेथें उभयतां सा-

धूंनीं दोन्ही देहांचे कांहीं चमत्कार करून ठेविले आहेत. आतां या देहापासून स्वामींनीं मुक्त केलें. या देहाचाही चमत्कार पुढें जगास कळून समर्थांची कीर्ति आणि माझेंही अल्पचरित्र प्रसिद्ध व्हावें; असा वर द्यावा. हें ऐकून समर्थ हांसून बोलले कीं, तुला काय मागणें तें माग. मग गंधर्वानें प्रार्थना केली कीं, महाराज ! रथोत्सवाचे समयीं रथावर श्रीची स्वारी दीपमाळेपर्यंत येते, त्याकाळीं माझा जो कोणी वंशज राहील, त्यास मानाचा नारळ देऊन श्रीची स्वारी माघारी फिरावी, असा वर द्यावा. स्वामींनीं " दिलें " असें सांगितलें, त्याप्रमाणें अद्यापि चालत आहे.

इकडे चित्ररथ गंधर्व समस्तां देखतां स्वामींची आज्ञा घेऊन विद्युल्लतेसारख्या तेजस्वी विमानांत आरूढ होऊन जाता जाहला. अंत्यजदेह पडला तो स्वामी ज्या दगडावर बसले होते त्या दगडाखालीं खळगा करवून पुरविला, तें त्याचें समाधिस्थान (त्यास भैरधोंडा म्हणतात) व हल्लींही त्यास शेंदूर लावीत असतात. भैरधोंडा म्हणण्याचें कारण त्या अंत्यजाचें नांव बहिऱ्या होतें. हें चरित्र सदाशिवशास्त्री गंगाभटशास्त्री व राजश्री आदिकरून सर्व मंडळीनें पाहून सर्व लोक सद्गदित झाले. राजश्री दंडप्राय भूमीवर पडले. गंगाशास्त्री नमस्कार करून उभे राहिले. हें स्वामीनीं पाहून घोंडीवरून खालीं येऊन सदाशिवशास्त्री यांस उठवून पोटाशीं धरून समाधान केलें. त्याकाळीं सदाशिव शास्त्र्यानीं फार स्तुति केली. ती ऐकून समर्थ म्हणाले आतां स्तुति पुरे कर. असें म्हणून जवळ गंगाशास्त्री उभे होते त्यांस भेटून नंतर राज-

श्रींस पोटाशीं धरून मस्तक अवघ्राण करून ह्मणाले कीं, बापा हें कृत्य तुजकरितां श्रीस करून दाखविणें भाग पडलें; नाहींतर या वांचून कारण काय अडलें होतें ! हें ऐकून राजश्रीनीं चरणीं मस्तक ठेऊन उभे राहिले. कंठ सद्गदित होऊन बोलवेनासें झालें. आणि ह्मणाले. महाराज ! मी पतित, मजला कृपा करून स्वामीनीं पावन केलें. मज दीनाचा उद्धार केला. मी दासाचाही दास ह्मणविण्याची माझी योग्यता नाहीं. यदर्थीं भगवद्वाक्य आपण श्रीदासबोधीं वर्णिलें आहे तें:–

॥ श्लोक ॥

यस्मिन् कस्मिंश्च वर्णे तु, ज्ञानं देहं प्रतिष्ठितं ॥
तस्य दासस्य दासोहं भवेज्जन्मनि जन्मनि ॥ १

यामप्रमाणें भगवद्वाक्य आहे. तेथें आमची मानवांची काय कथा ? ' कः केन पदार्थः ' स्वामी समर्थ कृपासागर करुणाकर. आह्मीं जन्मांतरें करूनही उत्तीर्ण व्हावयाची माझी योग्यता नाहीं. समर्थांनीं कृपा करून आतांच चांफळास चालावें, तें समर्थांनीं मान्य केल्यानंतर सदाशिव शास्त्री आदिकरून सर्व मंडळीसह राजश्री व समर्थ चांफळास आले. नंतर त्रिरात्र तेथें राहून राजश्री जावयास निघाले. निघतेवेळीं समर्थांची आज्ञा मागावयास आले व समर्थांची फार स्तुति करूं लागले, कंठ सद्गदित होऊन अष्टभावयुक्त रोमांच उभे राहिले. हें लक्षण पाहून समर्थ ह्मणाले कीं, राजा तूं धन्य आहेस, तुझा देव ऋणी आहे व त्याचा वास सतत

तुझ्या हृदयांत आहे, तूं मंडळीसहवर्तमान आतां जावेंस हें ऐकून सदाशिव शास्त्री यांणीं लोटांगण घालून महाराज पतित आहें. मजला पावन करावें. अशी प्रार्थना करितांच स्वामीनीं कृपाळु होऊन अनुग्रह करून त्यांची इच्छा पूर्ण केली. आणि अनुग्रह दिल्यानंतर त्यांचें नांव वासुदेव पंडित असें ठेवून मौजे कणेरी प्रांत शिरोळ येथें मठ करून राहावें ह्मणून शास्त्री यांस आज्ञा केली. आणि शिवाजी महाराज आदिकरून सर्वांस आपल्या स्थानाप्रत जावें ह्मणून सांगितलें. तेव्हां सर्वांनीं नमस्कार करून वारंवार प्रदक्षिणा करून स्वामींची आज्ञा घेऊन प्रतापगडीं जाऊन श्रीदेवीचें दर्शन करून त्वरेनें रायगडास आले आणि मातोश्रीस संपूर्ण वर्तमान श्रुत केलें. तें ऐकून मातोश्री ह्मणाली कीं, बाबा तूं धन्य आहेस. समर्थ तर साक्षात् ईश्वर, त्यांचें स्तवन करावयाची योग्यता कोणाची आहे ! तूं या कुलीं उत्पन्न होऊन पूर्वजांचा उद्धार केलास, याप्रमाणें परस्पर बोलून आनंद पावलीं (हें चरित्र शके १५८० विलंबी नाम संवत्सरीं माघमासीं जाहलें.)

नंतर कोणे एके समयीं स्वामी चांफळास असतां शिवाजी महाराज दर्शनास येऊन स्वामींस उत्तम वस्त्रें समर्पण करून पूजा केली, आणि चौखांबी मंडपांत परमार्थपर भाषणें करीत बसले आहेत, तों अकस्मात् समर्थांचें सर्वांग भिजून महाराजानीं दिलेलीं वस्त्रेंही (पीतांबर, बादलीचिरा व चादर) पिळावीं याप्रमाणें भिजलीं. हें पाहून माहाराजांनीं विनंति केली कीं, अकस्मात् सर्वांग भिजून वस्त्रेंही भिजलीं हें काय ? असें विचारितांच समर्थांनीं व-

खाचा पदर शिवाजीच्या हातावर पिळून या उदकाची परीक्षा करावी म्हणून आज्ञा केली. त्यावरून शिवाजी महाराजांनीं आचमन केलें, तों समुद्रोदकाप्रमाणें क्षारोदक लागतें म्हणून सांगितल्यावरून समर्थांनीं सांगितलें कीं, आजची मिती लिहून ठेवावी. आजपासून पंधरावे दिवशीं याबद्दल सर्व खुलासा कळेल. नंतर भोजन होतांच शिवाजी महाराजांनीं मिती लिहून ठेऊन स्वामींची आज्ञा घेतली, आणि स्वस्थानास गेले.

नंतर पंधरावे दिवशीं पुनः महाराजांची स्वारी चांफळास आली. त्याच दिवशीं दोनप्रहरीं राजापुरकर मुंजे उपनामाचे सावकार होते तेही येऊन पोहोंचले आणि स्वामीस दंडप्राय नमस्कर करून आपलें सर्व वृत्त निवेदन करिते जाहले. तें असें कीं, आमचें माल भरलेलें जहाज समुद्रांत येत असतां बुडूं लागलें त्यासमयीं आह्मी स्वामीचें स्मरण केलें आणि प्रार्थना केली कीं, अर्थानिशीं व प्राणानिशीं बुडत आहों तरी त्यासमयीं स्वामींनीं आह्मांस जहाजासुद्धां तारावें. त्याबरोबर जहाज मालासुद्धां बाहेर निघालें. तेव्हां त्यांतील उत्तम उत्तम पदार्थ व चौथाई द्रव्य घेऊन कुटुंबासुद्धां चांफळास स्वामीचे दर्शनास आलों आहें, असें म्हणून पुनः दंडवत प्रणाम करून आणिलेलें द्रव्य व वस्त्रें स्वामीस अर्पण केलीं. नंतर समर्थांनीं बसावयास आज्ञा करितांच शिवाजीराजासहवर्तमान सर्व मंडळी बसली; त्यासमयीं समर्थ राजश्रींस बोलले कीं, शिवबा हें वर्तमान ऐकिलेंस काय? तेव्हां शिवाजी बोलले कीं, महाराज आपण समर्थ आहां, स्मरण केल्याबरोबर समुद्रांत बूडी देऊन जहाज बाहेर

काढिलें. हें प्रत्ययास आलें. नंतर सावकार सहकुटुंब आले होते ते त्रिरात्र तेथें राहून जातेसमयीं स्वामींची पूजा करून आज्ञा घेऊन गेल्यानंतर शिवाजीही आज्ञा घेऊन स्वस्थानीं गेले. (हें चरित्र शके १५८१ विकारी नाम संवत्सरीं पौष वद्य ५ स जाहलें.)

कोणे एके दिवशीं स्वामी परळीस असतां शिवाजी महाराज दर्शनास आले आणि पूर्वपद्धतीप्रमाणें नमस्कार करून समर्थांच्या आज्ञेनें समीप बसले आणि विनंति केली कीं, महाराज जन्म होतें, याचें कारण काय ? तेव्हां समर्थ बोलले, बापा ! बीजरूपेंकरून राहिलेल्या वासनेनें जन्म होतें. शिवाजी बोलले, महाराज ! प्रपंचांत वासना सतत चालूच आहे. ही सर्व जन्माची कारण कीं काय ? समर्थ बोलले, बापा ! संकल्प विकल्पात्मक जें मन यांतच नानाप्रकारचे संकल्प होऊन संकल्पात्मकही सर्व प्रपंच उभा आहे. यांत वासना अखंड चालू आहेच परंतु मरणांतसमयीं जी वासना मनांत दृढ राहून मरण घडेल, ती वासना आपल्या अनुरूप जन्मास कारण होते. शिवाजी बोलले, महाहाज ! मरणसमयीं वासना न रहावी याची युक्ती काय ? आणि प्रपंचीं असतां वासना न होगें, हें कसें घडेल ? समर्थ बोलले, बापा ! बरा प्रश्न केलास. शुद्ध प्रपंची यास वासना न होणें हें घडावयाचें नाहीं तर प्रपंचीं असून जो परमार्थी असेल त्यासच वासनात्याग घडेल. याचा विचार तुह्मांस पूर्वी बहुत प्रकारें सांगितला आहे, त्याच अन्वयें व्यवहार करावा आणि दासबोधादि ग्रंथांचें अवलोकन तुह्मी करितच आहां, त्यांतील

लक्षणें ध्यानांत आणून पदार्थमात्राच्या ठायीं आसक्ति ठेवूं नये, ह्मणजे आत्मा आत्म्याचे ठायीं लीन होतो आणि जन्मास कारणभूत वासना कधींही होणार नाहीं.

हें ऐकून आत्मा आत्म्याचे ठायीं लीन होतो ही गोष्ट दृष्टांतानें प्रत्ययास येईल अशी आज्ञा व्हावी; अशी शिवाजीनें विनंति केली. त्यावरून समर्थांनीं गंधाचा गोळा आणून त्याचे पुढें ठेविला आणि यांत पाणी आहे किंवा नाहीं असें विचारिलें असतां शिवाजीनें यांत पाणी आहे हें कबूल केलें. नंतर हें पाणी यांतल यांतच नाहींसें करावें, असें सांगून अंगवस्त्र आणवून गंध पिळविलें. त्यांतील पाणी निघालें तें पुनः त्यांतच घालून पुनः पिळविलें. याप्रमाणें पांच च्यार वेळां शिवाजी महाराजांचे हातून करविलें. तेव्हां पिळतां पिळतां गंध कोरडें होऊन पाणी त्यांतलें त्यांतच मुरलें. या अन्वयें साधनपरत्वें आत्मानात्म विचारें करून आत्मा आत्म्यांत लीन करावा. अशी समर्थांची आज्ञा होतांच शिवाजीनें साष्टांग नमस्कार करून आज्ञेप्रमाणें साधन करून आहें; आणि वासना कोणतेही ऐहिक विषयांचे ठायीं नाहीं परंतु एक हत्याराचे ठायीं मात्र आहे, हेंही पायां जवळ ठेवितों. असें ह्मणून हातीं तरवार होती (जिचें नांव भवानी होय) ती स्वामींचे पुढें ठेविली आणि नमस्कार करून आज्ञा घेऊन गेले.

ती तरवार नेहमीं उशागतीं असतां कोणे एके दिवशीं समर्थांनीं प्रातःकाळीं उठून कांहीं मौज करावी अशा हेतूनें केश मोकळे करून कुंकुमाचा मळवट कपाळीं लावून ती तरवार नागवी

हातीं घेऊन खोलीबाहेर पडले. शिष्यमंडळी नित्यपाठा प्रमाणें नमस्कार करण्याकरितां बाहेर उभी होती; तों अकस्मात् समर्थ मोठ्यानें आरोळ्या मारीत असतां नागवी तरवार उगारून मंडळीवर धांवले. हें पाहतांच मंडळी भयभीत होऊन पळूं लागली. स्वामीही पाठीस लागले. हवलदार आदिकरून शिपाईलोक कोणी समोर येईनात. स्वामी धांवत निघाले ते किल्ल्यावर चढून खालीं उडी टाकून रानांत शिरले.

त्याकाळीं शिष्यमंडळीनें शोक करून स्वामीस वेड लागलें, हा निश्चय केला आणि कोणी रडत आहेत कोणी दुश्चित्त होऊन विचार करीत आहेत याप्रमाणें दोन तीन दिवस जाहल्या नंतर कल्याणगोसांवी यांणीं लिहिलेला ग्रंथ घेऊन शिरगांवाहून किल्ल्यावर आले, तों तेथील सर्व व्यवस्था पाहून व ऐकून ह्मणाले. अरे ! स्वामींस वेड लागलें असें तुह्मी ह्मणतां परंतु माझे मतें तुह्मांसच वेड लागलें, असें ह्मणून निघाले आणि स्वामी ज्या अरण्यांत गेले होते त्या अरण्यांत येऊन पाहतात तों उरमोडी ज्या कडचावरून खालीं पडत आहे त्या कडचाचे मध्यभागीं पिंप्रीच्या झाडावर स्वामी बसले आहेत; हें खालून कल्याणगोसांवी यांणीं पाहिलें तों असंभाव्य कडचाची उंची यामुळें जाण्यास वाट नाहीं. असा विचार करून वरून जाण्याचा प्रयत्न करावा ह्मणून डोंगरावर जाऊन खालीं उतरावयास वाट पाहतात, तों वाट नाहीं. आणि स्वामी तर कल्याणा कल्याणा

झणून हाका देत आहेत. हें ऐकून स्वामी ज्या ठिकाणीं आहेत त्या ठिकाणीं उडी टाकावी झणून कल्याणस्वामीनीं कंबर बांधली. हें पाहतांच " कल्याण उडी घालून मरतो " असें मनांत आणून तरवार हातीं धरून वानराप्रमाणें कडा चढून स्वामी वरते आले.

हें पाहतांच साष्टांग नमस्कार करून कल्याणस्वामी समर्थांकडे चालले, तों कल्याणा येऊं नको असें झणून समर्थ दगड मारीत सुटले. ते दगड कल्याणाच्या खांद्यावरून आणि डोईवरून जात; परंतु त्यास लागले नाहींत. याप्रमाणें चुकावून दगड मारीत असतां मारण्याची सीमा जाहली. तितकेही दगड सोसून कल्याण स्वामीजवक्ष लगट करीत आले. समर्थही तरवार घेऊन बोलले कीं, " तोंडतों " झणून त्यावर धांवले. तेंही सोसून धांवत धांवत कल्याणानें चरणावर मस्तक ठेविला. आणि बळकट पाय धरिले. त्या काळीं स्वामीनीं कल्याणाची शेंडी मोठी होती, ती धरून तीस पिळा दिला, आणि उजवे हातीं तरवार उचलून " कल्याणा तुला तोडतों " असें झणून तलवार वरचेवर उगारली. तेव्हां कल्याणानें विनंति केली कीं, महाराज ! आपले हातून मुक्त होणें हें बहुत जन्मींच्या पुण्याचें फळ आहे. आतां स्वामी ! कृपाकरून लौकर एक घाव दोन तुकडे करावे. ते वेळेस समर्थ बोलले, कल्याणा ! एक घाव दोन तुकडे करावे असें तूं झणतोस परंतु हें होणार नाहीं, तुला कुचंबून अवकाशानें आठ पंधरा दिवसांपर्यंत मारीन, तेव्हां कल्याण बोलला, महाराज ! जसें मनास वाटेल तसें करावें. याप्रमाणें कल्याणाचा दृढ निश्चय पाहून स्वा-

मींनीं हातची तरवार टाकून कल्याणास आलिंगन दिलें. आणि मस्तक अवघ्राण करून भाषण केलें कीं, " कल्याणा ! लोक मला वेड लागलें असें म्हणतात " हे शब्द ऐकून परमसद्गदित होऊन " स्वामी ! आपणांस वेड लागलें, म्हणतात ते मूर्ख आहेत " आतां स्वामीनीं कृपा करून लौकर चलावें. सर्व लोक शोक करीत आहेत अशी कल्याणाची विनंति ऐकून स्वामी पद म्हणत चालले तें पद:—

॥ पद ॥

पळा पळा ब्रह्म पिसा येतो जवळी ॥
राम नामें हांक देउनि डोई खांजोळी ॥ ध्रुवपद ॥
वृत्ति शेंडी बंधनेंविण सदा मोकळी ॥
संसाराची धुळी करून अंगिं उधळी ॥
प्रपंच उकरडयावर बैसणें ज्याचें ॥
भोंवता पाळा फिरून पाहे जन अविद्येचें ॥ २ ॥
धाऊनी बैसे उठोनि पळे दृश्य वाटतें अदृश्याचें ॥
राहणें घेतां नचले कोणाचें ॥ ३ ॥
औट हात गज नवा ठायीं वितुळले ॥
ठहावा ठाव क्षणोनि तेथें ठिगळ दिधलें ॥ ४ ॥
ऐसें मन हें चंचल वृत्तींत गुंतलें ॥
परतोनि आलें क्षणउनि जिवेंच मारिलें ॥ ५ ॥
मीपणाचें शहाणपण जळालें माझें ॥
कोण वाहे देहबुद्धि वस्त्राचें ओझें ॥ ६ ॥

नलगे आह्मां मानपानाचें ओझें ॥
तुझी शुद्धि घेतां गेलें मीपण माझें ॥ ७ ॥
आह्मी जन धन देखोनि वार करितों ॥
आपणा ऐसें क्षणवुनि उमज धरितों ॥ ८ ॥
आर्तें भेटों येसी त्यांस वेड लावितों ॥
रामीं रामदास ऐसें अबद्ध बोलतों ॥ ९ ॥

याप्रमाणें पद केल्यानंतर समस्त शिष्य मंडळीनीं नमस्कार करून संतोषातें पावले. समर्थ शके १५८१ माघ वद्य पंचमीचे दिवशीं रानांत गेले होते ते नवमीचे दिवशीं परत माघारे कल्याण गोसाव्यासह किल्लचावर आले. नंतर सर्व मंडळीनीं येऊन नमस्कार केला आणि स्नान करून भोजनें झालीं. भवानी तरवार खालीं मठांत कांहीं दिवस होती. अनंतर कांहीं दिवसांनीं गर्दी जाहली तेव्हां दिवाकरभट कारभारी यांनीं करवीरकर पाटील यांचे स्वाधीन केली. शाहुमहाराज आल्यानंतर त्यांस तरवारीचें वर्तमान कळतांच महाराजांनीं त्या पाटलापासून ती तरवार घेतली. (ती अद्यापि सरकारांत असून तिची पूजाही होत असते.)

कोणे एके समयीं चाफळास समर्थांची स्वारी असतां उद्धव गोसांवी यांस कीर्तन करा ह्मणून आज्ञा जाहली; त्याप्रमाणें उद्धव गोसांवी कीर्तनास उभे राहिले. तेव्हां समर्थ कीर्तनश्रवणाकरितां पोषाख करून आसनावर बसले आहेत आणि कल्याण गोसांवी व शिवाजी महाराज यांचे हातीं मोरचेलें वारीत आहेत. त्रिंबक गोसांवी व वासुदेव गोसांवी यांचे हातीं चौऱ्या सोन्याच्या

काठच्या असून सभेची दाटीही बहुत जाहली आहे, कीर्तनास रंग बहुत भरून राहिला तो पाहून स्वामींची मर्जी बहुत संतुष्ट जाहली. तेव्हां उद्धव गोसांवी मागें टाळकरी वगैरे कोणी नसतां स्वामी आज्ञेवरून कीर्तनांस उभे राहिले; तेव्हां यांचे मागें टाळ धरण्यास कोणी नाहीं हें पाहून साक्षात मारुती आपणच त्याचे मागें टाळ वाजवित उभे राहिले. तेवेळेस उद्धव गोसांवी कीर्तनांत गिरक्या घेत असतां मारुतीच्या अंगास लाविलेला शेंदूर त्यांच्या झग्याच्या शेवटास लागला. हें. स्वामीनीं पाहून अकस्मात् उद्धवगोसांवी यांचे मागें पाहिलें; तों मारुती टाळ वाजवीत आहेत हें स्वामीनीं पाहून ह्मणाले "उद्धवा ! कीर्तन समाप्त कर आणि मागें नमस्कार कर" असें उद्धव गोसांवी यांस सांगून आपण उभे राहिले. मग उद्धवानें त्याप्रमाणें नमस्कार करून आरति केल्यानंतर स्वामिसन्निध येऊन नमस्कार केला; तेव्हां स्वामीनीं त्यास पुढें बोलावून शाबास ! ह्मणून पाठ थापटिली आणि तुझें कीर्तन धन्य. अतःपर कीर्तन करणें तें उभ्यानें करीत जाऊंनको. कारण, श्रीमारुतीस श्रम होतात ज्या प्रमाणें त्यांस आज्ञा केली त्याप्रमाणें उद्धव गोसांवी यांचे वंशांत कीर्तनाचे आरंभीं व समाप्तीस मागें नमस्कार करण्याची चाल अद्यापि आहे. (हें चरित्र शके १५८१ त जाहलें.)

कोणे एके समयीं छत्रपतींची स्वारी गंगातीरास गेली असतां राक्षसभुवनावर मुक्काम जाहाला. रात्रौ पंचपदीच्या समयीं श्रेष्ठांचें पद ह्मटलें. तें श्रवण करतांच महाराजांस स्मरण झालें कीं, श्रेष्ठ

जांबेस रहात आहेत तें जांबगांव समीपच आहे तरी त्यांची भेट घेऊन समर्थप्रमाणेंच चमत्कार व सामर्थ्य आहे किंवा नाहीं हें पाहावें. आणि दर्शन घ्यावें. असें महाराजांनीं मनांत आणून पंचपदी समाप्त करून निद्रा केली. उषःकालीं मानसपूजेकरितां उठण्याचे पूर्वी श्रेष्ठांनीं स्वप्नांत येऊन शिवाजीस दर्शन दिलें; त्यासमयीं महाराजांनीं थोर सत्पात्र ब्राह्मण भेटीस आले, ह्मणून सामोरां जाऊन आसन अर्घ्य आणि पाद्यप्रभृति पूजा केली आणि हस्त जोडून विनंति केली कीं, महाराज आपल्या दर्शनेंकरून बहुत आनंद जाहला. परंतु सुंदर भाषणेंकरून संतोषवावें आणि नाम श्रवण करवून स्थान कोणतें तें सांगावें ? तेव्हां श्रेष्ठ हंसून बोलले कीं, गंगातीरीं पंचवटींत जंबुग्रामीं राहतों या देहाचें नाम " रामीरामदास " असें ह्मणतात. तुह्मी स्मरण केलें ह्मणून भेटीस आलों, असें बोलून श्रेष्ठांनीं नारळ व स्फटिकांची स्मरणी हा प्रसाद देऊन संतोषपर भाषणेंही केलीं आणि येथून आश्रम जवळ आहे. याकरितां श्रीरघुपतीचे दर्शनास चलावें असें सांगून त्यांस घेऊन गेले. हा वृत्तांत सर्व स्वप्नांत जाहला.

महाराज प्रातःकाळीं जागृत होऊन पाहतात, तों श्रेष्ठ नाहींत. नारळ व स्मरणी मात्र हातांत आहे. हें पाहतांच परम आश्चर्य मानून समर्थप्रमाणेंच चमत्कार आहे, आतां प्रत्यक्ष दर्शन घेऊन पुनः हा चमत्कार पाहावा, ह्मणून उठून शिवपूजा व पादुकांची पूजा केल्यानंतर किंचित् फलाहार करून गांवकरी यांस आणून विचारिलें कीं, येथून जांब किती दूर आहे ? तें

ऐकून त्यांणीं विनंति केली कीं, महाराज येथून वीस कोश आहे. असें ऐकतांच शिवाजीनीं स्वारी तयार करून सर्वत्रांस "जांबेस मुक्कामास यावें आम्ही पुढें जातों" अशी आज्ञा करून सडीस्वारीनिशीं निघाले, ते दोनप्रहरीं जांबेस येऊन पोहोंचले आणि श्रीमारुतीचें दर्शन घेऊन गांवांत गेले. तों श्रेष्ठ वैश्वदेव करून काकवली टाकावयास द्वारीं येऊन उभे होते, तेसमयीं छत्रपती साष्टांग प्रणिपात करून हस्त जोडून उभे राहिले आणि विलोकन करून पाहतात; तों, जी मूर्ति स्वप्नांत पाहिली तीच ही असा निश्चय केला.

नंतर श्रेष्ठ पादप्रक्षालन व आचमन करून बोलले कीं, शिवबा ! ओळख पुरली ? यावयाची फारच निकड केली, असो. बरेंच केलेंत. हा आश्रम आपलाच आहे. श्रीदर्शन करून भोजनास उठावें. असें म्हणतांच शिवाजी महाराजांनीं समर्थ व आपण एकच असून उभयतांची लीलाही सारखीच आहे. यास्तव आपली आज्ञा प्रमाण, अशी विनंति करून श्रीचें दर्शन घेऊन भोजनास दहा असामीनिशीं उठले. तेव्हां श्रेष्ठ बोलले कीं, दहा असामीनिशींच भोजनास उठलां हें काय ? स्वारीबराबर ब्राह्मणापासून अंत्यजांपर्यंत जी मंडळी असेल त्या सर्व मंडळीनीं रघुपतीचा प्रसाद घ्यावा. महाराज बोलले कीं, स्वारीबराबर सुमारें दोन हजार मनुष्यें आहेत याकरितां दहा पांच मंडळीनिशींच भोजनास उठलों. तेव्हां श्रेष्ठ बोलले, शिवबा रघुपतीचे दरबारांत न्यून काय आहे ? तस्मात् सर्वांनीं प्रसाद घेतलाच पाहिजे.

शिवाजीनें आज्ञा प्रमाण असें ह्मणतांच श्रेष्ठांनीं पात्रें मांडून घरांत पंचवीस मनुष्यांचा पाक केला होता तितक्याच पाकांत महाराजांस सन्निध बसवून सर्वांचीं भोजनें जाहलीं. तों मागाहून फौज आली त्या फौजेपैकीं जे जेवणार होते त्यांस पात्रें मांडून भोजनास घातलें व न जेवणारांस पात्रें वाढून दिलीं, आणि स्वहस्तेंकरून जेवणाऱ्यांस शिधे देण्याकरितां एका शिष्यापाशीं एक शिधा देऊन त्यास लष्करांत पाठविलें. त्याणें सर्वांस शिधे देऊन एक शिधा नेला होता तो तसाच परत आणिला. तसेंच घोडीं वगैरे यांस चंदि व चारा देण्याकरितां एका शिष्यापाशींच पायलीभर दाणा व एकापाशीं कडब्याच्या तेरा पेंढ्या देऊन पाठविलें. त्याणीं सर्व लष्करांत दाणा व वैरण वांटून येतांना पायलीभर दाणा व तेरा पेंढ्या उरलेल्या तशाच परत घेऊन घरीं आला.

हें महाराजांनीं पाहून परम आश्चर्य मानून स्तब्ध जाहले. श्रेष्ठ बोलले शिवबा ! आमचा चमत्कार पहावयाचा तो काय ! आह्मी केवळ श्रींचे दास आहों. श्रींचे इच्छेनें जें घडेल तें खरें, शिवाजी बोलले, महाराज ! आपण उभयतां समर्थ आहां; स्वामींचा व आपला चमत्कार माहणाराची मति किती ! मी केवळ दीन आहें. मजवर पूर्ण कृपा करावी. श्रेष्ठ बोलले कीं, बापा ! तुजवर नवीन कृपा काय करावयाची ? जो कृपाकरणारा त्याची कृपा तुजवर पूर्वीच होऊन रामदास यांस तुजप्रीत्यर्थ कृष्णातीरीं पाठविलें आहे, सांप्रत कृपा करावी असा अर्थ

नाहीं. असें ह्मणून सूर्याजीपंताचे जन्मापासून आपलें जन्म होऊन समर्थ कृष्णातीरास गेले, तोंपर्यंत सविस्तर वृत्त सांगितलें. तें ऐकतांच शिवाजीनें जरा सद्गदित होऊन "महाराज! आपण उभयतां अवतार धारण करून जगदुद्धार केला व करीतही आहां. मजकरवींही सेवा करवीत आहां" असें भाषण करून जाण्यास आज्ञा मागितली, तेव्हां श्रेष्ठांनीं सांगितलें कीं, "शिवबा! तुमचें येणें कधींनवत घडलें आहे यास्तव कांहीं दिवस राहून जावें" असें बोलून शिवाजीस पंधरा दिवस ठेवून घेतलें आणि पहिल्या दिवसाप्रमाणेंच नित्य भोजनपानादि समारंभ होऊन जातेसमयीं राजश्रीस वस्त्रें व भूषणें देऊन निरोप दिला, तो घेऊन श्रेष्ठांचें व समर्थांचें सामर्थ्य एकरूपच असून उभयतां गंगातीरीं व कृष्णातीरीं श्रींच्या आज्ञेवरून जगदुद्धार करीत आहेत हें सत्य मानून स्वारीनिशीं शिवाजी निघाले, ते देशीं येऊन समर्थांचें दर्शन घेऊन त्यांस सविस्तर वर्तमान निवेदन करिते जाहले.

समर्थ बोलले कीं, शिवबा! श्रेष्ठांचा चमत्कार पाहण्याच्या संकल्पानें गेला होतास, त्याप्रमाणें दृष्टीस पडून तुझी खात्री जाहली किंवा नाहीं? शिवाजीनें उत्तर केलें कीं, महाराज तिकडील व इकडील भाषणें व सर्व लीला एकच आहेत, हा चमत्कार पाहणाऱ्यांची योग्यता ती किती? असो स्वामी! आपण क्षमावंत आहां यास्तव अपराधाची क्षमा असावी. स्वामी बोलले कीं, श्रीचे इच्छेवरून सर्व गोष्टी घडतात, परंतु आपण मात्र निःसीम दास जाहलें पाहिजे. ह्मणजे मनोरथ पूर्ण करणार श्रीसमर्थ आहेत. तेव्हां शिवाची महाराजांनीं प्रश्न केला कीं,

साधू अनेक चरित्रें करीत आहेत यांचें मूळ निःसीमपणें श्रीचे दास हें खरें परंतु साधूंजवळ अनेक प्रकारचा सिद्धियोग दिसतो, हा तर मुख्यफलास प्रतिबंधक आहे. त्याविषयींचो आज्ञा काय? तेव्हां स्वामी हांसून बोलले कीं, बापा! ईश्वरप्राप्ति होण्याकरितां निःसीमपणें दास्य करीत असतां सिद्धि येऊन अनेकप्रकारें मोह घालून गुंतवूं पाहतात परंतु त्यांच्या मोहांत न गुंततां ईश्वरप्राप्तीस अंतर नपडे अशा प्रकारें निरंतर ईश्वर ध्यानांत राहिल्यास ईश्वर आपल्या दासांस ईश्वरपणा देतो. तो प्राप्त झाल्यानंतर धनी होऊन कोणतेंही कर्म केलें असतां बाधक होत नाहीं. याकरितां धनीपणा न येतां कार्य केल्यास तें बाधक होतें व मुख्यपदास अंतर पडतें. यास्तव धनी होऊन कार्य करणाऱ्या साधूचा कधींही अंत लागणार नाहीं, हें ऐकतांच शिवाजी अत्यंत संतुष्ट जाहले, आणि प्रणाम करून समर्थांची आज्ञा घेऊन स्वस्थानीं गेले.

कोणे एके समयीं स्वामी परळीस होते. तेव्हां वासुदेवपंडित कणेरीस मठ करून असतां " स्वामींनीं सांगितलेला त्रयोदशाक्षरीमंत्र स्वाभाविक (वसिष्ठकल्पांतील लघुविषय आहे.) यास्तव त्यांणीं (रामार्चनचंद्रिकेंतील) विधि पाहून मंत्रपद्धतीप्रमाणें पुस्तक सिद्ध करून स्वामीस दाखवावें म्हणून तें पुस्तक घेऊन किल्ल्यावर आले आणि दर्शन नमस्कार करून समर्थांपुढें पुस्तक ठेविलें. त्यासमयीं बापा! योग्य केलेंस, असें म्हणून पुस्तक उचलून माघारीं त्याजपाशीं दिलें. तें पुस्तक हातीं घेतांच वासुदेवगोसांवी यांची वाचा बंद झाली. तेव्हां माझा अपराध कोणता

ह्मणून अका कडून त्यांनीं विनंति करविली ती ऐकून स्वामी बोलले कीं, हा आह्मापेक्षां बहुत चतुर व जातीचा पंडित यास्तव श्रीचे आज्ञेप्रमाणें यास उपदेश केला असतां, त्यावर अविश्वास ठेऊन स्वबुद्धीनें विचार करून मंत्र विधिपुरस्सर आचरण करण्यास प्रवृत्त झाला. हाच श्रींचा अपराध घडला. याचा मजकडे काय दोष आहे! तेव्हां अका आदि करून सर्व मंडळीनीं क्षमा करावी. अशी प्रार्थना केल्यावरून समर्थांनीं बहुत बरें असें ह्मणून कृपायुक्त भाषण केलें. त्यासमयीं वाचा येऊन वासुदेव गोसांवी यांणीं बहुत प्रकारें विनंति केली, महाराज ! ग्रंथ दृष्टीस पडला ह्मणून आपणास आणून दाखविला. आज्ञा नसल्यास करणार नाहीं.

स्वामी बोलले, कीं परमार्थास मुख्य गुरु आज्ञा प्रमाण यास्तव मला श्रीनें सांगितलें त्याच अन्वयें मी सर्वत्रांस सांगत आहें. यांतील कारण सांप्रत कलियुगांमध्यें विधिपुरस्सर आचार घडत नाहीं ह्मणून लोकांचा उद्धार होत नाहीं ही करुणा श्रीरघुपतीस येऊन दीनांचा उद्धार व्हावा ह्मणून नामस्मरण या युगीं मुख्य. याजकरितां सोपा मंत्र त्रयोदशाक्षरी मला सांगून जगदुद्धार करविला, आणि पुढेंही करावयाची आज्ञा झाली. यास्तव श्रींच्या आज्ञे प्रमाणेंच करावें अशी आज्ञा करून शास्त्री यांस स्वामींनीं निरोप दिला.

कोणे एके समयीं स्वामी पर्यटणास निघाले तों अकस्मात् शिवरामस्वामींचे स्थानास गेले. शिवरामस्वामी हे पूर्णानंदस्वामीचे शिष्य.

त्यांचे शिष्य कल्याण कलबुर्गेकर पूर्वी कृष्णातीरीं स्वामीचें दर्शन घेऊन भाषण करून गेलेच होते. आतां यामांतीं अकस्मात् स्वामी आले हें ऐकून शिवरामस्वामी कोस दोन कोस पर्यंत आडवे येऊन साष्टांग नमस्कार करून बहुत समारंभानें स्वामीस घेऊन गेले. आणि कांहीं दिवस ठेऊन घेऊन त्यांची नित्यनित्य बहुतप्रकारें सेवा केली. एके दिवशीं स्वामी बसले असतां शिवरामस्वामींनीं विनंति केली कीं, स्वामी! आपले कृपेंकरून कांहीं ग्रंथ केले आहेत ते अवलोकन करावे. त्यांत पंचीकरण केलें आहे, तेंहो पहावें. तेव्हां स्वामीही ते ग्रंथ पाहून बहुत संतुष्ट जाहले. आणि त्यांपैकीं पंचीकरण विलोकनांत आणून बोलले कीं, शिवराम! पंचीकरणें पांच चार प्रकारचीं केलीं असून, बालबोध पंचीकरण करावें असा आमचा संकेत होता परंतु तुह्मी केलें हें पाहून बहुत संतोष जाहला. अतःपर आह्मी पंचीकरण करीत नाहीं. तुह्मीं केलें तेंच आमचें आहे. असें ह्मणतांच शिवरामस्वामींनीं साष्टांग नमस्कार करून स्वामी! आतां मी कृतकृत्य जाहलों. कारण समर्थांनीं पावन केलें, त्याप्रमाणें या पंचीकरणावर आपली कांहीं मुद्रा करावी कारण राजपत्र जसें राजमुद्रेवांचून मान्य होत नाहीं तसेंच आपल्या मुद्रेवांचून साधुजनांस ग्रंथ मान्य होणार नाहीं ह्मणून कृपा करावी अशी विनंति केली. त्यावरून स्वामींनीं पांच ओव्या करून त्या पंचीकरणांत शेवटीं घातल्या आणि ग्रंथाची पूर्णता केली. पुढें कांहीं दिवस राहून निरोप घेऊन स्वामी आपल्या मांतीं आले. (हें चरित्र शके १५८५ प्लवनाम संवत्सरीं जाहलें.)

समर्थ पूर्वी गंगाप्रदक्षिणा केली तेसमयीं पैठणास गेले होते. तेव्हां जें चरित्र झालें तें तेथील ब्राह्मणमंडळी आदिकरून सर्वत्रांस ठाऊक होतें. सांप्रत समर्थ राजगुरु झाले आहेत आणि राजाचे धर्मकीर्तीचाही उत्कर्ष ऐकत आहों, व समर्थांचीही विशेष कीर्ति होऊन दिगंतरास गेली आहे. याजकरितां स्वामींचें दर्शन घेऊन राजदर्शनही घ्यावें आणि महत्वाचीही परीक्षा करावी, ह्मणून शें पन्नास ब्राह्मण पैठणाहून माहुलीस आले. आणि तेथील ब्राह्मणांस विचारूं लागले कीं, सांप्रत राजश्री व समर्थ कोठें आहेत तेव्हां माहुलीकर ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, सांप्रत रामदास स्वामी व राजश्री सातार्‍यास आहेत. तेव्हां पैठणकर ब्राह्मण यांनीं राजश्रींस माहुलीकर ब्राह्मणांचे हातीं निरोप पाठविला कीं, आह्मीं आपले व समर्थांचे भेटीस आलों आहों. तेव्हां समर्थांसह आपली व आमची भेट केव्हां व कोठें होईल? तेव्हां राजानें पैठणकर ब्राह्मणांस निरोप आणणार्‍या बरोबर सांगून पाठविलें कीं, आपली व आमची भेट होण्याकरितां आपण आजच तिसरे प्रहरीं येण्याचें करावें. त्याप्रमाणें माहुलीकर यांनीं पैठणकर यांस सांगितलें. पुढें राजश्रीनीं समर्थांस व सर्वांसही श्रुत केलें. नंतर भोजनें झाल्यावर समर्थांनीं राजश्रींस विचारिलें कीं, राजा ! पैठण क्षेत्रींचे थोर ब्राह्मण तेच तुमचे भेटीस राजगृहीं येणार किंवा तुह्मी त्यांजला सामोरे जाणार आहां ? राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज, जशी आपली आज्ञा होईल तसें करीन. तेव्हां समर्थांनीं राजश्रींस सांगितलें कीं, बापा ते थोर ब्राह्मण, क्षेत्रींचे आहेत, त-

स्मात् आपण त्यांस सामोरे जावें हें उत्तम आहे. आज्ञा म्हणून राजश्रीनीं विनंति केली, त्यानंतर समर्थ बोलले कीं, तुम्हीं ब्राह्मणांस तृतीय प्रहरीं आणावयास जाणार तोंपर्यंत आम्हीं थोडीशी शिकार करून येतों. राजश्री बोलले कीं, आपण कधीं शिकार केलेली मी पाहिली नाहीं आणि आज शिकार करितों म्हणता ती कशाची करितां हें सांगावें. समर्थ म्हणाले; अरे! तुला यावांचून कारण काय? जे पदार्थ शिकार करून आम्हीं आणूं ते तुला दाखवूं. नंतर समर्थ कल्याणास बोलले कीं, शिकारीस चल. असें म्हणून हातीं गलोल घेऊन कल्याण गोसाव्यासहवर्तमान गोंडाळीच्या खोऱ्यांत गेले आणि तेथें गलोलीनें खडा मारावा, चिमणी पाडावी असें करितां करितां कल्याणगोसांवी यांची दोनमण दाणे मावण्याजोगी झोळी होती ती भरली. तों अस्तमानास चार घटका वेळ राहिला. नंतर समर्थ बोलले कीं, कल्याणा आतां ब्राह्मणांचे दर्शनास जाऊं चल. असें म्हणून निघाले.

इकडे राजश्रींची स्वारी माहुलीच्या रस्त्यानें माळाखालीं आली, तों माहुलीकडून ब्राह्मणही येत आहेत हें पाहून राजश्रीनीं घोडयाखालीं उतरून ब्राह्मणांस दंडप्राय वंदन केलें. नंतर तेथेंच बसावयास घालून ब्राह्मण व इतरमंडळीसह राजश्री बसले आणि परस्परें कुशल वृत्तांताचीं भाषणें होत आहेत, तों समर्थही आले.

स्वामींस पाहतांच महाराजांनीं उठून वंदन करून उभे राहिले, नंतर ब्राह्मणांसही हेच रामदास असें कळतांच तेही उठून स्वा-

मीस नमस्कार करणार तों समर्थांनीं त्यांस साष्टांग नमस्कार केला. तेव्हां त्या ब्राह्मणांतील कांहीं ब्राह्मण पुढें होऊन महाराज उठावें असें ह्मणून समर्थांस उठविलें. नंतर ब्राह्मण राजश्री व समर्थ सर्व बसले आणि समर्थांचीं व ब्राह्मणांचीं कुशल वृत्तांताचीं भाषणें झालीं. मग राजश्रीनीं समर्थांस विनंति केली कीं, महाराज ! आज स्वारी कोठपर्यंत कोणीकडे गेली होती ? समर्थ बोलले कीं, गोंडाळी खोऱ्यांत शिकारीकरितां गेलों होतों. राजानें विचारिलें कीं, महाराज, शिकार कशाची केली ? (हीं भाषणें समर्थांचीं व राजश्रींचीं ब्राह्मणांनीं ऐकून एकमेकांकडे पाहूं लागले.) तों समर्थ कल्याण गोसांवी यांस बोलले कीं, बापा, आह्मीं शिकार केलेली राजास दाखीव. अशी आज्ञा होतांच फार त्वरेनें कल्याणगोसांवी यांनीं राजश्रीपुढें झोळी ओतली तों मृत चिमण्यांचा ढीग पडला. हें ब्राह्मणांनीं पाहून एकमेकांत बोलूं लागले कीं, महंताची महंती दृष्टीस पडली व स्वामींची परीक्षा झाली. आतां कपाळास शेण पुसावें वगैरे अवज्ञा करूं लागले. परंतु त्यांत जे वृद्ध ब्राह्मण होते ते संज्ञेनें गडबड करूं नका, दम धरा. ते नावाचे रामदास आहेत, पुढें काय होतें तें पहा, असें सांगूं लागले. राजश्री चिमण्यांचा ढीग पाहतांच काळवंडले आणि मनांत विचार करितात कीं, समर्थांनीं आज हें चरित्र ब्राह्मणांदेखत काय आरंभिलें आहे पहावें. इतक्यांत समर्थ बोलले कीं, दिवस थोडा राहिला याजकरितां राजा ! आतां गृहास चलावें. नंतर राजानें व ब्राह्मणमंडळीनेंही त्याचप्रमाणें हात जोडून विनंति

केली. तेव्हां समर्थ बोलले कीं, कल्याणा या वेळपर्यंत तुमचा आमचा खेळ झाला. आतां आह्मीं तुह्मी सर्वत्र आपले घरास जाणार व या पडलेल्या चिमण्यांचीं मुलेंही घरीं घाट पहात असतील. यास्तव यांस आपले घरीं जाण्यास निरोप दे. आज्ञा ह्मणून कल्याणगोसांवी उभे राहिले. समर्थ बोलले कीं, अरे उभा कां राहिला आहेस. गवताचा ढीग पडला आहे, त्यांतून दहा वीस पेंढचा घेऊन ये. अशी आज्ञा होतांच कल्याणस्वामी पेंढचा घेऊन आले. तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, चिमण्यांच्या ढिगासभोंवतीं चिमण्या दिसेनात अशा पेंढचा लावून अग्नि लावून दे. त्याप्रमाणें करून कल्याणगोसांवी यांनीं अग्नि आणून लाविला. सर्व मंडळी, समर्थ हें काय करितात ह्मणून हांसूं लागले. तों एकदम जाळाचा भडका झाला. त्याबरोबर चिमण्यांचा कळप भरारा उडून गेला. हें पैठणकर ब्राह्मण वगैरे सर्व मंडळीनीं पाहिलें. त्याकाळीं राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज हें कसें झालें ? समर्थांनीं सांगितलें कीं, बापा, हा वेळपर्यंत खेळ आह्मीं खेळलों. आतां आपल्या घरास चाललों व त्यानांही आपल्या घरास जाण्यास पाठविलें, यांत कसें काय झालें ह्मणून काय विचारतोस ? त्याकाळीं पैठणकर ब्राह्मण बोलले कीं, महाराज पूर्वी आपण पैठणांत घार उडविली हें आह्मीं पाहिलें होतें. तें सामर्थ्य अद्यापि आहे किंवा नाहीं हें पहावें, असा विचार करून दर्शनास आलों. समर्थांनीं संशय काढून टाकला, असें समजून सर्व ब्राह्मणांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार केला. समर्थ बोलले कीं, तुह्मी भूदेव

तुह्मांपाशीं सामर्थ्य दाखवावयाची योग्यता कोणाची आहे ? तुमचें सामर्थ्य तुह्मी दाखवितां व तुह्मीच पाहतां, परंतु मनांत संशय आणतां तो आणूं नये. मी देव ब्राह्मणांचा दास आहें, असें ह्मणून समस्त ब्राह्मणांस वंदन केलें आणि त्यांस घेऊन मठास आले. ब्राह्मणांचा आदर सत्कार करून कांहीं दिवस ठेवून घेऊन राजश्रीस सांगून त्या ब्राह्मणांचा आतिथ्यसत्कार करून निरोप देवविला.

भाग १४ वा.

केशवस्वामींची भेट.

कोणे एके समयीं केशवस्वामी हे भागानगरीं रहात होते ते महासमर्थ असून त्यांनीं समर्थांचो अतिशयित कीर्ति प्रतिदिनीं वृद्धिंगत होत असलेली श्रवण करून पुनः भेट व्हावी असा मनांत संकल्प आणून एका शिष्यास एका दिवसाचा शिधा व पत्र देऊन पाठविलें. त्या शिष्यानें तो शिधा नित्य खर्चीत असावें, परंतु दुसरे दिवशीं तो शिधा गुरुकृपेनें जसाचा तसाच असावा. त्याप्रमाणें नित्य खर्च करीत करीत तो शिष्य रामदासस्वामीपाशीं येऊन साष्टांग प्रणिपात करून हात जोडून उभा राहिला तों स्वामींनीं विचारलें कीं, तूं कोठून आलास व कोण आहेस ? तेव्हां त्यानें विनंति

केली कीं, महाराज केशवस्वामी भागानगरीं रहात आहेत त्यांणीं आपली सत्कीर्ति श्रवण करून आपण साधु थोर आणि साक्षात् मारुतीअवतार हें जाणून आपलें पुनः दर्शन व्हावें या हेतूनें विनंतिपत्र देऊन मला आपलेकडेस पाठविलें आहे, असें बोलून तें पत्र त्या शिष्यानें समर्थांपुढें ठेविलें. नंतर स्वामींनीं तें पत्र घेऊन वाचलें. त्यांतील केशवस्वामींनीं लिहिलेल्या ओंव्या व अभंग, होते ते येणेंप्रमाणेः-

॥ ओंव्या ॥

ओंनमोजीसच्चिदानंदा ॥ पदत्रयस्वरूपसिद्धा ॥
बीजबीजारविंदा ॥ स्वयेंआमोदापरिमळसी ॥ १ ॥
त्यास्वानंदामृताचीचाखवटी ॥ तूंचितुझियापोटीं ॥
निरसोनियांअंधाभेटी ॥ स्वानंददृष्टीअवलोकनें ॥ २ ॥
श्रीरामदासपदसखया ॥ स्वानंदपानागुरुवर्या ॥
केशवविज्ञप्तिव्हावया ॥ हेंचिकारणअसेपां ॥ ३ ॥

॥ अभंग ॥

निजानंदडोहीं ॥ बुडोंगेलेपाही ॥ १ ॥
तनुत्यागहोतांत्याची ॥ मगसांगूंभेटीकैची ॥ २ ॥
देहबुद्धीवाटोनिप्याले ॥ जितचीब्रह्मतेजाहले ॥ ३ ॥
केशवह्मणेडोळा ॥ तेपाहीनवेळोवेळां ॥ ४ ॥

अशा अनेक प्रकारच्या विज्ञप्तींपर ओंव्या व अभंग वाचून समर्थांनीं बहुत संतोषपूर्वक पत्राचें वंदन करून प्रत्यक्ष भेटीतुल

मानिते जाहले आणि त्या ब्राह्मणाचा बहुत सन्मान करून केशव स्वामीकडील सविस्तर वर्तमान विचारून घेऊन त्यास कांहीं दिवस ठेऊन घेतलें. नंतर ब्राह्मणानें विनंति केली कीं, महाराज ! मला जाण्याविषयींची आज्ञा व्हावी. असें झटल्यावरून रामदासस्वामींनीं केशवस्वामीस एक श्लोकबद्ध पत्र दिलें तें असें.

॥ श्लोक ॥

पदातीतवाक्यार्थशोधीसमाधीं ॥ क्षमातीतजोनिर्विकल्पावबोधी ॥
तयाऊनमीजन्मनाहींजिवाशीं ॥ मिळेसंगमीदासत्याकेशवासीं ॥ १॥

यामणें श्लोकरूपपत्र देऊन त्या ब्राह्मणाची रवानगी करितानां समर्थांनीं त्यास विचारिलें कीं, स्वामीनीं येतानां तुह्मास वाटखर्चास काय दिलें होतें? तेव्हां त्याणें विनंति केली कीं, महाराज! मला एका दिवसाचें आमान्न व दोन पैसे रोख वाटखर्चास दिले होते, त्यावर येथें येऊन पोहोंचलों. हें ऐकून समर्थांनीं आकास सांगून त्या ब्राह्मणाजवळ शेरभर तांदूळ व दोन आणे रोख देववून रवाना केलें. ते तांदूळ व पैसे त्यास केशवस्वामींच्या दर्शनास जाई तोंपर्यंत पुरले. तो ब्राह्मण केशवस्वामीजवळ जाऊन पत्र देऊन साष्टांग नमस्कार करून उभा राहिला. तेव्हां केशवस्वामींनीं त्याचे हातचें पत्र वाचून पाहून फारच संतुष्ट जाहले आणि पत्रांतील खूण पाहून समर्थ साक्षात् श्रीमारुतीचा अवतार, असें जाणून त्यांची त्वरेनें भेट घ्यावी, असा नित्य नित्य विचार करीत असतां अकस्मात् समर्थ त्यामार्गीं गेले, तेव्हां हें केशवस्वामीस कळतांच सामोरे

जाऊन समर्थांची भेट घेऊन आले. त्यासमयीं केशवस्वामीस अति आनंद होऊन त्यानीं समर्थांवर पद केलें तें:—

॥ पद ॥

रामदास माउली अनाथाची ॥ रामदास० ॥ ध्रुवपद ॥
सच्चितसुख घन वरद प्रतापी ॥ शांतीची साउली ॥ अना० ॥ १ ॥
अनन्य जे नर शरण रिघाले ॥ तयांलागीं पावली अ० ॥ २ ॥
केशवीं केशव निजसुख सेवी ॥ आठवितांची धांवली अ० ॥ ३ ॥

याप्रमाणें भेटीचा आनंद झाल्यानंतर तेथें कांहीं दिवस समर्थ राहून त्यांचा निरोप घेऊन कृष्णातीरीं आले. नंतर केशवस्वामीही कांहीं दिवसांनीं समर्थांकडे येऊन चातुर्मास्य स्वामीपाशीं राहिले.

कोणे एके समयीं परळीवर स्वामी असतां महाराजांनीं पलंग व बिच्छाना वगैरे सर्व साहित्यानें युक्त असें निद्रेचें स्थळ निवांत-जागीं करून दिलें होतें; त्या स्थानीं स्वामी निद्रा करीत असतां रात्रौ आका व वेणुबाई यांनीं समर्थांची चार प्रहर चरणसेवा करित असावी. हें कोंडोपंत ह्मणून जो कारकून शाहु महाराजांनीं ठेविला होता, त्याणें पाहून मनांत विचार केला कीं, रात्रीं बायकांनीं स्वामीजवळ रहावें हा धर्म नव्हे ह्मणून स्वामींचा वाका नित्य नित्य महाराजांस ल्याहावयाचा त्यांत हेंही वर्तमान बहुतवेळां लिहित गेला, हें महाराजांनीं लिहिण्यांत पाहून अकस्मात् रात्रौ किल्ल्यावरील दिंडी उघडून एकाएकीं मध्यरात्रीस जाऊन कोंडोपंत यांस आणून तुह्मी लिहित गेलां तें दाखवावें ह्मणून सांगितलें. हें ऐकतांच कोंडोपंतांनीं महाराजांस घेऊन जा-

ऊन स्वामींच्या निद्रास्थानीं खिडकीचे वाटेनें दाखविलें, तों एक वानर पलंगावर निजला असून दोहों बाजूस दोन वानर बुक्या मारीत आहेत याप्रमाणें पाहून महाराज कोंडोपंतास ह्मणाले मूर्खा ! हें काय केलेंस ह्मणून रागें भरतात तों स्वामी अकस्मात बोलले, कीं, शिवबा ! मूर्ख तूं किंवा तो असें ह्मणतांच महाराजांनीं परम लज्जित होऊन स्वामी मी परम अपराधी आहें तर क्षमा करावी अशी प्रार्थना केली. तेव्हां स्वामींनीं संतुष्ट होऊन महाराजांस निरोप दिला.

नंतर समर्थ चाफळचे मठीं असतां कोणे एके दिवशीं दासबोध ग्रंथाचे आठवे दशकीं निरूपणांत मायाविवरण चाललें असतां कल्याण आदिकरून अका, वेणूबाई, शहापुरकरबाई उद्धवगोसांवी, वासुदेवगोसांवी, व त्रिंबकगोसांवी. हे सर्व श्रवणास बसले होते. त्या सर्वांस समर्थांनीं प्रश्न केला कीं, माया सत्य किंवा मिथ्या आहे ? हें ऐकून सर्व मंडळी हात जोडून स्तब्ध राहिली. कोणीच बोलेना तेव्हां पुनः स्वामींनीं प्रश्न केला. त्याकाळीं अका व कल्याणगोसांवी बोलावयास उद्युक्त झाले, तों वासुदेवपंडित कणेरकर यांणीं विनंति केली कीं, स्वामी माया मिथ्या आहे असें ह्मणतांच स्वामींनीं त्रिवार विचारिलें. त्यांणींही त्रिवार मिथ्या ह्मणून विनंति केली, त्यावेळीं स्वामींनीं कांहीं एक न बोलतां पुढें निरूपण समाप्त केलें.

त्यानंतर कोणे एके दिवशीं स्वामी मठांत भोजन करून बसले आहेत, तों गारोडी आले. तेव्हां तुह्मी कोण ह्मणून स्वामींनीं

विचारिलें असतां महाराज ! आह्मीं गारोडी आहों, आमचा खेळ करवावा. अशी त्यांची प्रार्थना ऐकून स्वामींचो आज्ञा होतांच त्यांणीं खेळास प्रारंभ केला. तेव्हां खेळ होत आहे, त्यांत गारोड्यानें हातांत वादी घेऊन समस्तांस दाखवून हातचे हातांत सर्प केला. आणि हातांत घेऊन खेळवीत आहे, तों स्वामींनीं वासुदेवास विचारिलें कीं, हा सर्प खरा किंवा खोटा ? त्याणें विनंति केली कीं,महाराज ! सर्प खोटा आहे. तेव्हां स्वामींनीं विचारिलें कीं, खोटा आहे तर तूं धरशील काय ? त्याणें सांगितलें. आज्ञा जाहल्यास धरीन. स्वामींनीं धर ह्मणून सांगून गारोडयास सांगितलें कीं, वासुदेवाचे हातीं सर्प दे- तेव्हां गारोडी वासुदेवास सांगूं लागला कीं, सर्प धरा त्याणें त्या सर्पाचें मुख धरितांच सर्पानें हातास वेढा घातला; त्याबरोबर कळ लागून वासुदेवाची प्राणांत अवस्था जाहली. तेव्हां त्यास सोडावा तर डसतो, आणि धरिला तर प्राण जातो, असें दोहींकडून वासुदेवास संकट पडलें. तें पाहून स्वामी ह्मणूं लागले कीं, वासुदेवा ! सर्प खरा किंवा खोटा ? वासुदेव बोलला महाराज ! सर्प तर खोटा, परंतु प्राण तर जातो. समर्थ ह्मणाले कीं, खोट्या सर्पानें प्राण कसा जाईल मग वासुदेव बोलला महाराज ! प्राणांतसमय प्राप्त आहे. तेव्हां समर्थांनीं खोट्या सर्पानें कधींही प्राण जावयाचा नाहीं असें ह्मणून गारोडी यास सांगितलें कीं, वासुदेवाचे हातास सर्पाचा वेढा आहे त्याची तशीच पूर्ववत वादी कर. असें ह्मणतांच गारोडी यार्णे त्याचे हातावर अक्षता टाकिल्या त्याबरोबर त्या सर्पाची वादी जाहली. मग त्यांणीं हात

सोडितांच वादी हातांतून खालीं पडली. त्याकाळीं पुनः वासुदेव-गोसांवी यास पुढें बोलावून समर्थांनीं विचारिलें कीं, वादीचा सर्प खरा किंवा खोटा ? तेव्हां पुनः वासुदेव बोलला महाराज ! वादीचा सर्प खोटा. नंतर स्वामी बोलले, त्या खोट्या सर्पानें तुझा प्राण कसा जात होता ? वासुदेव बोलला महाराज सर्पतर खचीतच खोटा परंतु प्राणास गांठ पडली हेंही खरें. स्वामी बोलले सर्प खोटा कशानें जाहला. वासुदेव बोलला स्वामी, गारोड्यानें केल्यावरून सर्प खोटा जाहला, परंतु गारोडी नसता तर प्राणच घेता, ही गोष्ट खरी. स्वामी बोलले ही गोष्ट जर खरी तर माया मिथ्या असें कशावरून म्हटलेंस ? हें ऐकून वासुदेव खालीं पाहूं लागला. त्याकाळीं कल्याण गोसांवी व त्रिंबक गोसांवी भानगांवकर या उभयतांनीं विनंति केली कीं, वादीचा जसा सर्प तशीच माया, परंतु गारोड्याच्या योगानें जसा सर्प खोटा तशीच स्वामींच्या कृपेंकरून माया असत्य होते. स्वामी बोलले कीं, वासुदेवा ही गोष्ट प्रत्ययास आली कीं, नाहीं ? तेव्हां महाराज गोष्ट तर प्रत्ययास आली परंतु स्वामींची कृपा पाहिजे.

त्यावेळीं उद्धव गोसांवी यांनीं पुनः विनंति केली कीं, सद्गुरूस शरण गेलें असतां माया मिथ्या कशी होते याविषयीं सविस्तर स्वामींचे मुखानें श्रवण करावें अशी सर्वांची इच्छा आहे; ती पुरविणार समर्थ कृपावंत आहेत आणि सद्गुरूस शरण गेल्यावांचून माया मिथ्या होत नाहीं अशीं मन्वादि सर्व समर्थांचीं वाक्यें

आहेत याविषयीं निःसंशयता व निःसंदेहता करणार स्वामी समर्थ आहेत. असें ह्मणून साष्टांग नमस्कार करून हात जोडून उभे राहिले. त्यासमयीं समर्थांनीं हास्यवदन करून ह्मटलें, उद्धवा वारंवार तुह्मीं श्रवणारूढ असतांही प्रश्न करिता यास काय ह्मणावें ? तेव्हां उद्धवांनीं विनंति केली कीं, महाराज ! एतदर्थीं आपलें वाक्य आहे तें:—

॥ ओंव्या ॥

सेविलेंचि सेवावें अन्न ॥ केलेंचि करावें भोजन ॥
नित्यनेम पुराणश्रवण ॥ केलेंचि करावें ॥ १ ॥
अध्यात्म विद्येचा अभ्यास ॥ नित्य करावा हव्यास ॥
निरोपणाचें विशेष ॥ ऐकिलेंचि ऐकावें ॥ २ ॥

यामणें आपली आज्ञा आहे ह्मणून वारंवार विनंति करितों. हें भाषण श्रवण करून समर्थांनीं मंदस्मित हास्यवदनानें सांगितलें कीं, बापा, सांगतों ऐक. सद्गुरूस शरण गेल्यावांचून माया मिथ्या होत नाहीं हें खरें आहे. परंतु पुष्कळ साधनें करून अंगीं सिद्धपणा येऊन माया मिथ्या ह्मणतील त्यांच्या पायांस मी स्पर्श करीन.

माया मिथ्या ह्मणजे सर्व अबद्ध ब्रह्म तीच माया व माया तेंच ब्रह्म. माया व ब्रह्म या दोहोंस पृथकत्व नाहीं असें मानलें असतां वेदांतादि शास्त्रांस बाध येतो व वसिष्ठ वामदेव इत्यादिकांनीं मायात्याग करून पूर्ण पदातें पावले. व्यासादिकांचे कृत्यांस

व मन्वादिकांचे वाक्यांस असत्यता येते. असें ह्मणाल तर वेदांतादि शास्त्रें हीं खरीं. वसिष्ठ वामदेव इत्यादिकांनीं त्यागशब्द बोलून पूर्णपदातें पावले हेंही खरें. व्यासादिकांनीं माया मिथ्या ह्मटली हेंही खरें. ब्रह्म तीच माया व माया तेंच ब्रह्म हेंही खरें. तें कसें ह्मणाल तर ब्रह्म ह्मणून पदार्थ नाहीं व माया ही पदार्थ आहे असें कल्पिलें तर हातांत धरतां येत नाहीं. दृष्टांतद्वारा अनुभवून प्रत्यय समजावा. दृष्टांतद्वारा सांगतों तें ऐक. ब्रह्म तेंच माया व माया तेंच ब्रह्म या दोहोंत वेगळेपण नाहीं, तें कसें जसें– अग्नींत दाहकत्व आणि प्रकाशकत्व हे दोन गुण आहेत. दाहकत्वास व अग्नीस पृथकत्व नाहीं. अग्नीचा धर्म प्रकाशकत्व, दाहकत्व उपाधियोगें आहे परंतु पृथक् पृथक् करण्याचें सामर्थ्य नाहीं. दाहकत्व आणि प्रकाशकत्व हें पृथक् पाहणें असेल तर प्रयत्न करून प्रत्यय पहावा. तो कसा ह्मणाल तर अग्नी धगधगीत प्रफुल्लित असतां मोहोऱ्याचे खडचास कचें सूत गुंडाळून अग्नींत टाकिलें असतां सुतास अग्नी स्पर्श करीत नाहीं, कारण मोहोऱ्याचे योगें दाहकत्वाचें पृथकत्व झालें. या योगानें जसें समजलें तसें ब्रह्मीं माया पृथक् समजण्यास सद्गुरूंस शरण जाऊन साधनद्वारा श्रीगुरुकृपेनें आपणच ब्रह्म व्हावें. ह्मणजे त्याकाळीं माया व ब्रह्म पृथक् होतें. तें सांगावयास अनिर्वाच्य तें कसें तर साखर भक्षिली असतां तिची गोडी अमुकासारिखी सांगतां येत नाहीं आणि तुपाची गोडीही अमक्या सारखी आहे असें भक्षणारांस सांगतां येत नाहीं, त्याचा प्रत्ययही तुह्मां सर्वत्रांस आहे

किंवा नाहीं? सर्वांनीं प्रार्थना केली कीं, आह्मांस हा प्रत्यय आहे. तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, याचा अर्थ असा आहे कीं, शब्दें करून माया मिथ्या ह्मणणें सर्व अवद्ध हें समजून उत्तर करावें.

हें समर्थांचें वाक्य श्रवण करितां करितां उद्धव, कल्याण आका वेणू व त्रिंबकगोसांवी इत्यादिकांची एकाग्रता होऊन समाधी लागली, त्यासमयीं समर्थांनीं त्यांचे मस्तकीं वरदहस्त ठेवितांच सर्वत्रांनीं नेत्र उघडून साष्टांग नमस्कार करून कांहीं एक नबोलतां हात जोडून उभे राहिले. तेव्हां समर्थांनीं वासुदेवगोसांवी यांस विचारिलें कीं, बापा, गोष्ट कशी? त्यानीं विनंति केली कीं, महाराज मी अपराधी आहें. असें ह्मणून साष्टांग नमस्कार करून हात जोडून उभे राहिले. त्यांजलाही पुढें बोलावून समर्थांनीं त्यांचे मस्तकीं हस्त ठेवून आज्ञा केली कीं, बापा, महान्ऋषी सर्व ज्या मार्गानें गेले त्यामार्गानें जाऊन तूं सुख पावशील. असें ऐकून वासुदेव गोसाव्यांनीं पुनः साष्टांग नमस्कार केला. याप्रकारें सर्वांचा संशय दूर करून स्वामींनीं खेळ समाप्त करविला. आणि गारुडचास निरोप देऊन समर्थ उठले तेव्हां सभा विसर्जन झाली.

कोणे एके समयीं स्वामी चिंचवडास मोरयादेव यांची भेट घेऊन जेजोरीचे मार्गें खंडोबाचें दर्शन न करितां खालूनच नमस्कार करून परभारे येत होते त्यासमयीं खंडोबा शिवाजी महाराजांचे स्वरूपेंकरून निळ्या घोडचावर बसून दहा पांच माणसें व एक कोतवाली घोडा बरोबर घेऊन आपण ज्यामार्गें स्वामी जात होते, त्यामार्गें आले आणि स्वामींस पाहतांच घोडचावरून उतरून न-

मस्कार करून बोलले कीं, महाराज आपण देवदर्शनास आलां होतां कीं काय? तेव्हां समर्थ म्हणाले आम्ही चिंचवडास मोरया देव यांस भेटून घरीं जात आहों. खंडोबाचे दर्शनास गेलों नाहीं. तेव्हां शिवाजीरूपें खंडोबा म्हणाले महाराज देवदर्शन केल्या वांचून जाणें होऊं नये, तर कृपा करून देवदर्शनास चलावें. तेव्हां समर्थांनीं विचारिलें कीं, तुम्हीं एकाएकीं सडी स्वारीनिशीं कोठून आलां? मग खंडोबांनीं सांगितलें कीं, मी पुरंदरास सडा आलों होतों, पुढें पुण्यास जावयाचें आहे. असें निमित्त सांगून स्वामींस कोतवाल घोडयावर बसवून देवदर्शनास डोंगरावर घेऊन गेले. महाद्वारापुढें घोडयावरून उतरून स्वामी देवळांत आले आणि महाराज बाहेरचे बाहेर राहून, नाहींसे जाहले. त्यासमयीं स्वामींच्या मनांत आलें कीं, शिवाजीच्या रूपानें खंडेराव महाराजच स्वतां येऊन, मला येथें घेऊन आले. बरें! फार उत्तम जाहलें असें म्हणून देवदर्शन करून देवब्राह्मण केला आणि त्रिरात्र तेथें राहून निघते वेळीं एक आरती केली तीः—

॥ आरती ॥

पंचानन हयवाहन सुरभूषण लीला ॥ खंडा मंडित दंडित दानव अवलीला ॥ मणिमल्ले मर्दुनियां धूसर जो पिंवळा॥ विरकंकण बासिंगें सुमनांच्या माळा ॥ जयदेव जयदेव जयजय मल्हारी ॥ वारी दुर्जन वारी निंदक अपहारी ॥ ॥ जयदेव ॥ १ ॥ ध्रुवपद ॥ सुरवैरी संहारा वर दे मज

देवा ॥ नाना नामीं गाइन मी तुमची सेवा ॥ अखंड गुण गावयासि वाटतसे हेवा ॥ फणिवर शिणला तेथें नर पामर केवा ॥ जय० ॥ २ ॥ रघुविर स्मरणें शंकर हृदयीं नीवाला ॥ तो हा मदनांतक अवतारचि जाहला ॥ यालागुनि आवडिनें भावें वर्णियला ॥ रामींरामदासा जिवलग भेटियला ॥ जय० ॥ ३ ॥

याप्रमाणें श्रीमल्हारीची आरती करून प्रसाद व आज्ञा घेऊन निघतांना साष्टांग नमस्कार करून हात जोडून विनंति केली कीं, महाराज ! आपण त्रैलोक्यनाथ असतां शिवाजीचें स्वरूप धारण करून आह्मां भक्तजनांस फसविण्याचें कारण काय ? मी श्रीरघुपतीचा दास तोच आपला. त्यासमयीं श्रीखंडेराव महाराजांनीं प्रत्यक्ष प्रगट होऊन समर्थांस पोटाशीं धरून मस्तक अवघ्रहण करून बोलले कीं, आह्मी भक्तप्रिय आहों. आह्मांस भक्तांची आवड फार हें तुह्मांस माहित असून भेद कां मानावा ? तुह्मां आह्मांमध्यें भेद काय आहे ? याप्रमाणें समाधान केलें. त्यासमयीं समर्थ बोलले कीं, महाराज ! आपण पतितपावन होय. असें ह्मणून चरणीं मस्तक ठेवून आज्ञा घेऊन चाफळास आले. (हें चरित्र शके १५८५ शोभकृत नाम संवत्सरीं झालें.)

एका समयीं निजानंद स्वामींचे पुण्यतिथी करितां समर्थांस बोलविण्यास रंगनाथ स्वामी आपणच येत असतां त्यांची व सम-

थींची गांठ चंद्रगिरीचे डोंगरांत पडली. त्यावेळीं रंगनाथ स्वामींनीं जामानिमाचा पोषाख व पंच हत्यारें तीर, कमान, सुद्धां बांधून आले असून; समर्थांस साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. त्यासमयीं समर्थांनीं त्यांस विचारिलें कीं, रंगोबा कां आलास ? रंगनाथ स्वामी ह्मणाले महाराज ! निजानंदस्वामींचे पुण्यतिथी करितां समर्थांची स्वारी कऱ्हाडास यावी ह्मणून बोलविण्यास आलों आहें. त्यावरून फार उत्तम आहे असें समर्थ बोलले. नंतर रंगनाथस्वामींस समर्थांनीं विचारिलें कीं, तूं असा वेष धारण करून फिरतोस यावरून लोक तुला काय ह्मणतील ? रंगनाथ स्वामी ह्मणाले महाराज लोकलज्जा कोणास आहे? समर्थ हंसून बोलले कीं, ही गलोल कां वाळगिलीस, याचें कांहीं सार्थक करितोस किंवा काय ! रंगनाथ स्वामी ह्मणाले महाराज! वरकड वेष त्यांतच हा एक. जी आज्ञा होणें असेल ती व्हावी.

नंतर समर्थांनीं सांगितलें कीं, रंगोबा, ही आकाशांत घार उडत आहे तीस खडा मारून खालीं पाड बरें. अशी आज्ञा होतांच गलोल हातीं घेऊन घार उडत होती तिला खडा मारून खालीं पाडली. त्यावेळीं समर्थ बोलले कीं, अरे रंगोबा हें कर्म कसें केलेंस ? आतां तुला काय ह्मणावें. मागें असाच रेडा मारिला होतास. त्यावरून रंगोबानीं विनंति केली कीं, महाराज ! पूर्वी रेडा कोणीं मारिला व हल्लीं घार कोणीं मारविली हें ज्यांचे तेच जाणत आहेत. समर्थ ह्मणाले बापा, हें परस्परें ठाऊक आहे परंतु

लौकीकव्यवहारांत योग्य दिसत नाहीं. याकरितां लोकचालीनें चालावें. रंगनाथ स्वामी म्हणाले, महाराज, लोकलज्जेचें कारण आपणास नाहीं म्हणून पूर्वी विनंति केलीच आहे. समर्थ म्हणाले बापा लोकलज्जेचें कारण आपणास नाहीं हें खरें परंतु लोकचालीनें चालून आपण उत्तम मार्गानें चालावें म्हणजे लोकांस मानत मानत त्यांसही उत्तम मार्गी लावून त्यांचा उद्धार करावा. आणि यासाठींच तुमचें आमचें जगांत येणें झालें आहे. तस्मात् लोकांचे रहाटीनें आपण चालून त्यांचा उद्धार करावा आणि आपलें भांडवल तर नघळे असें करितच आहां तें करावें. रंगनाथस्वामी म्हणाले महाराज, आज्ञेप्रमाणें करितों. त्यासमयीं समर्थांनीं सांगितलें कीं, आतां घार उठवून लावून दे. हें ऐकून मृत घार हातीं घेऊन रंगनाथ स्वामीनीं तिला सांगितलें कीं, " तुला समर्थांची आज्ञा होत आहे कीं, तूं पूर्ववत् प्रमाणें आकाशमार्गे जावें. " असें म्हणून हस्त फिरवितांच घार उडून गेली.

नंतर समर्थांनीं रंगनाथस्वामींस सांगितलें कीं, तुम्हीं गलोल टाकून द्यावी व अतःपर बाळगूं नये. या गलोलीच्या योगानें आम्हांसही प्रतिष्ठांनीं (पैठण) ब्राह्मणांनीं फसविलें होतें. असें सांगून पूर्वी जाहलेली सविस्तर गोष्ट रंगोबास सांगितली. ती रंगनाथस्वामींनीं ऐकून आज्ञेप्रमाणें करितों म्हणून नमस्कार करून त्याक्षणींच गलोल मोडून टाकिली. नंतर समर्थ व रंगनाथस्वामी उभयतां मिळून कऱ्हाडास येऊन तेथें तीन दिवस पुण्यतिथीचा समारंभ ब्राह्मणभोजन वगैरे करून समर्थांसह रंगनाथस्वामी नि-

गडोस आले. तेथें कांहीं दिवस राहून रंगनाथ स्वामींस विचारून समर्थ शके १५८६ क्रोधी नाम संवत्सरीं पौषवद्य त्रयोदशीस चांफळास आले.

पाटगांवीं मौनीबावा म्हणून संन्यासी हे फार योग्यतेचे असोन समर्थांचे स्नेही होते व त्यांची योग्यताही समर्थांप्रमाणेंच होती, परस्परांमध्यें कधीं कधीं पत्रव्यवहारही होत असे व एकमेकांस चिज वस्तुही पाठवीत असत. मौनीबावा हे बोलत नसून सर्वकाळ ईश्वरी चिंतनांत वेळ घालवीत असत; याकारणानें त्यांचें नांव मौनीबावा असें पडलें होतें. एका समयीं त्यांचे शिष्यांनीं त्यांस विनंति केली कीं, श्रीरामदास स्वामी यांचा चमत्कार आपल्याप्रमाणें आहे किंवा नाहीं हें पाहण्यास आह्मांस जाण्यास आज्ञा असावी हें ऐकून मौनीबावा त्यांस रागें भरले आणि जाऊं नका असें संज्ञेनें सांगितलें. रामदास समर्थ आहेत असेंही सुचविलें. यानंतर आषाढमासीं श्रीपंढरीचे यात्रेस प्रतिवर्षाप्रमाणें जावयाचें त्याप्रमाणें मौनीबावांची आज्ञा घेऊन शिष्यमंडळी पंढरीस गेली. तेथून परत येतानां सर्व शिष्यांनीं विचार केला कीं, आतां चाफळ परळीकडून जाऊन स्वामींचा चमत्कार पाहून नंतर पाटगांवास जावें असा सर्वांचा बेत ठरला. ते येतां येतां श्रीमाहुली क्षेत्रीं आले आणि कृष्णा उतरून वटछायेखालीं स्वयंपाक करून भोजनोत्तर परळीस जाऊं अशा बेतानें उतरले.

इकडे समर्थ परळीस होते. त्यांनीं आपले मनांत विचार केला कीं, मौनीबावांचे शिष्य आमचा चमत्कार पाहण्याचा संकल्प धरू-

न येत आहेत हें समजून कल्याणास सांगितलें कीं, कल्याणा, कृष्णास्नानास जाऊं चल. असें म्हणून कल्याणगोसाव्यासह निघाले ते माहुलीसंगमीं स्नानास आले. तेथें स्नान करून जटेंतून पाणी गळत आहे व आंग थबथबत होतें तसेच उभे राहून कल्याणास विचारूं लागले कीं, कल्याणा, खावयास कांहीं आणिलें आहेस काय? कल्याणानें विनंति केली कीं, महाराज! भाजाण्याचें थालीपीठ मात्र आणिलें आहे. समर्थांनीं सांगितलें कीं, तें आह्मांस आणून दे. असें ऐकतांच कल्याण गोसांवी यांनीं थालीपीठ नेऊन दिलें. तें हातावर घेऊन स्वामी खात उभे राहिले तों, पांथस्थ येणारे जाणारे व स्नान करणारे वगैरे सर्व लोक स्वामींस नमस्कार करून जात असून त्या काळीं मौनीबावांची शिष्य मंडळीही वडाखालीं स्नानसंध्या करीत बसली होती; त्यानीं त्या लोकांस विचारिलें कीं, हे बावा कोण आहेत? लोकांनीं सांगितलें कीं, हे महा समर्थ रामदासस्वामी आहेत. हें ऐकून ते आपआपणांत एकमेकांकडे पाहून हांसूं लागले आणि म्हणाले कीं, बावांची योग्यता समजली.

माहुलींत एका ब्राह्मणाची ओढाळ गाय होती तिला विकून दोन महीने झाले होते. तीस नेहमीं घरीं बांधून ठेवीत. एक दिवस तो ब्राह्मण घरीं नव्हता म्हणून त्याचे स्त्रीनें त्या गाईस पाणी पाजण्यासाठीं कृष्णेवर आणिली. नंतर पाणी वगैरे पिऊन ती गाय परत जातानां आडवाटेनें रानांतून पळत जाऊं लागली. तेव्हां तिचे पाठीमागून बाईही धावूं लागली, कारण गाय रानांत गेली असतां

पिकांत शिरून लोकांचे पिकाचा नाश करील व त्यांचा बोभाट येऊन आपणांस भ्रतार रागें भरतील. अशा घास्तीनें धांवतां धांवतां बाई थकली परंतु गाय आटोपेना. तेव्हां समोरून येणारे लोकांस बाईनें हाका मारून सांगितलें कीं, कोणी गाईस अडवा. त्याजवरून त्या लोकांनीं तिला अडविली. तेव्हां त्या गाईनें दरडी वरून खालीं उडी टाकिली ती कृष्णेच्या वाळवंटांत पडली त्यामुळें लागलाच तिचा प्राण गेला. हें पांथस्थ व मौनीबावांचे शिष्यांनींही प्रत्यक्ष पाहिलें. नंतर त्या गाईजवळ बाई येऊन पाहते तों ती मृत्यु पावलेली दिसली. तें पाहून ब्राह्मणस्त्रियेस वाईट वाटून ती मोठ्यानें रडूं लागली.

इकडे समर्थास थालीपीठ खात असतां घांस लागला. त्यासमयीं कल्याणास विचारिलें कीं, कल्याणा, थालीपिठाबरोबर खावयास कांहीं आणिलें आहेस कीं नाहीं ? कल्याणानीं विनंति केली महाराज ! कांहीं आणिलें नाहीं. समर्थ म्हणाले अरे, ती गाय पडली आहे तिचे स्तन पाहा दुधानें तटतटले आहेत तिजपाशीं जाऊन धार काढून दूध घेऊन ये. मग आज्ञा म्हणून कल्याणगोसांवी तुंबा घेऊन जेथें गाय पडली होती तेथें आले तों, त्या गाईपाशीं बाई रडत बसली आहे; तिला पाहून कल्याणांनीं विचारिलें कीं, बाई, तुम्हीं कां रडतां ? बाईनीं सांगितलें कीं, बाबा, ही गाय पुष्कळ दूध देणारी असून दरडीवरून खालीं पडून मेली. आतां घरीं मुलांस दुभतें नाहींसें झालें म्हणून रडत्यें. हें ऐकून कल्याणगोसांवी त्या माईजवळ गेले आणि तिला बोलले

कीं, हे बाई तूं ऊठ. स्वामी थालीपीठ कोरडे खात आहेत याकरितां मला धार काढूं दे. त्यासमयीं कल्याण गोसांवी यांचें हें भाषण ऐकून ती बाई हसूं लागली. त्यासमयीं कल्याण गोसांवी यांनीं बाईस विचारिलें कीं, तुह्मीं कां हंसता? बाईनें उत्तर दिलें कीं, बावा, तुह्मीं मेल्या गाईस धार काढूं दे ह्मणता हें तुमचें बोलणें ऐकून मला आश्चर्य वाटून हसूं आलें. कल्याण गोसांवी ह्मणाले बरें बाई तुह्मीं हंसा.

याप्रमाणें बोलणीं झाल्यानंतर कल्याण गोसांवी पुनः गाईस बोलले कीं, बाई उशीर झाला ऊठ, असें ऐकतांच गाय खडबडून उठली. तेव्हां कल्याण गोसांवी यांनीं त्या गाईखालींबसून धार काढून दूध घेऊन आले. तें घेऊन स्वामींनीं तुंब्यामध्यें थालीपीठ चूरून घातलें आणि हातावर तुंबा घेऊन तें खाऊं लागले. तों गायही स्वामींजवळ येऊन उभी राहिली. इतक्यांत बाईनें येऊन समर्थांस साष्टांग नमस्कार केला. तेव्हां तिला स्वामींनीं सांगितलें कीं, आतां तुह्मीं रडूं नका आपली गाय घेऊन घरास जावें. ही गाय अतःपर ओढाळपणा करणार नाहीं. असें ह्मणून गाईचे पाठीवरून हात फिरविला.

हा झालेला चमत्कार मौनीबावांचे सर्व शिष्यांनीं पाहून स्नान संध्या करितां करितां धांवत येऊन समर्थांस साष्टांग नमस्कार केला आणि चरणीं मस्तक ठेवून लोळूं लागले त्यासमयीं समर्थ त्यांस बोलले कीं, बापहो, आमचा चमत्कार पहावयास तुह्मीं आलां परंतु आह्मीं वेडेपिसे आहों आमचा चमत्कार तो काय पाहातां?

आह्मीं वेडे आहों हें मौनीबावांसही ठाऊक आहे. यामाणें समर्थांचें भाषण ऐकून शिष्यमंडळीनीं विनंति केली कीं,महाराज! आपण व मौनीबावा हे दोन नाहींत, आह्मीं सर्वस्वी अपराधी आहों. आमचे मनांत संशय आला हेंही खरें. आणि आह्मांस मौनीबावा यांनींही जाऊं नये ह्मणून सांगितलें असतांही मानवी देहबुद्धी अशाश्वत ह्मणून आलों. आतां स्वामीनीं क्षमा करावी. असें ह्मणून पुनः साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. त्यासमयीं समर्थांनीं हास्यवदन करून सांगितलें कीं, बाबा मौनीबावा नको ह्मणत असतां तुह्मीं आलां हेंच आश्चर्य होय. त्यानीं विनंति केली कीं, महाराज आह्मीं चुकलों, सर्वप्रकारें अपराधी आहों परंतु क्षमा करणार आपण समर्थ आहां; तेव्हां समर्थांनीं त्यांजला सांगितलें कीं, स्नानसंध्या करून भोजनें आटोपून लवकर परळीस चलावें. त्या समयीं त्यानीं विनंति केली कीं, महाराज स्वयंपाक सिद्ध होत आला आहे; कृपा करून समर्थांनीं पंक्तीस भोजन करावें. तेव्हां बरें ह्मणून सांगितल्यानंतर सर्व मंडळीनीं समर्थ कल्याण गोसांव्यासहवर्तमान भोजन केलें. नंतर समर्थ त्यांजला बरोबर घेऊन परळीस आले, कांहीं दिवस तेथें राहून समर्थ त्या मंडळीसह चाफळास आले. नंतर त्यांजला निरोप देते समयीं आमचा मौनिबावांस नारायण सांगावा ह्मणून सांगितलें. आज्ञा प्रमाण ह्मणून ती मंडळी निघून पाटगांवांस येऊन पोंचल्यानंतर मौनीबावांस त्यांनीं स्वामींचा नारायण सांगून तेथें झालेलें सविस्तर

वर्तमान श्रुत केलें. तें ऐकून मौनीबावा पोट धरून हंसून बोलले कीं, तुह्मांस नको जाऊं ह्मणत असतां, कां गेलां ? मंडळी बोलली कीं, महाराज ! आह्मीं चुकलों. समर्थ महाराज यांणीं कृपा केली तशी आपण करणार समर्थ आहांत. असें मंडळीनें ह्मटल्या वरून पुनः बावा हांसले, या प्रमाणें.

या नंतर कोणे एके समयीं जयरामस्वामीचे भेटीस समर्थ वडगांवास गेले असतां कांहीं दिवस तेथें राहिले होते. एके दिवशीं समर्थ स्नानास एकटेच गेले असतां त्याच गांवचा एका ब्राह्मणाचा मुलगा दाहा वर्षांचे वयाचा पवनतीर्थीं स्नानास गेला होता तो बुडून मेला. त्यास बाहेर काढून त्या मुलाचे आईबाप बहुत दुःखी होऊन आक्रोश करीत बसले आहेत. त्याच वेळेस जयराम स्वामी समर्थांचे पूजेकरितां आले तों मुलाचे आईबाप प्रेत पुढें घेऊन आक्रोश करित आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. नंतर आपण पुढें येऊन त्या प्रेतास पाहिलें आणि त्याचे आईबापांस बोलले कीं, मुलगा जिवंत असून तुह्मी कां आक्रोश करितां असें त्यांस सांगून मुलाचे अंगा वरून हात फिरवला आणि मुला उठ ! असें ह्मणतांच मुलगा उठून बसला. अशा प्रकारें मुलाचे आईबापांचा शोक दूर करून त्यांस घरीं लाऊन दिलें. हें चरित्र जयराम स्वामीनीं केलेलें समर्थांनीं पाहून तेदिवशीं कांहीं एक न बोलतां दुसरे दिवशीं समर्थ स्नानास निघाले व त्यांचे बरोबर जयराम स्वामीही निघाले. नंतर उभयतां वाटेनें चालले असतां

एक विहीर पाहिली. तेव्हां समर्थ बोलले कीं, जयरामा आज या विहीरींतच आपण स्नान करूं, स्वामींचें बोलणें ऐकतांच जयराम स्वामीनीं विनंति केली कीं, महाराज विहिरीस पायऱ्या नाहींत, उतरावयास मार्ग नाहीं,व मजला पोहतांही येत नाहीं, याजकरितां आपण स्नानास नदीवर चलावें. तेव्हां समर्थ बोलले कीं, आज तर येथेंच स्नान करूं ये; तेव्हां जयरामस्वामी ह्मणाले महाराज! मजला खचितच पोहोंतां येत नाहीं. समर्थ बोलले कीं, तूं बुडालास तर मी काढीन. असें सांगून समर्थांनीं आपण स्वतः प्रथम उडी टाकिली. नंतर जयरामस्वामीनींही समर्थांचे आज्ञेवरून मागाहून उडी टाकिली. समर्थ एकटेच बाहेर निघून वडगांवीं मठास न जातां तसेच चाफळास निघुन गेले. इकडे वडगांवीं मठांत स्वयंपाक सिद्ध झाला होता परंतु समर्थ व जयरामस्वामी यांचा शोध करितां कोठें पत्ता नाहीं ह्मणून सर्व मंडळी शोध करितां करितां थकले आणि स्वस्थ बसले. तों शोध करणारे शिष्यमंडळी पैकीं गोपाळ गोसांवी शोध करित करित चाफळास आले. त्याणीं समर्थांस पाहून साष्टांग नमस्कार केला आणि प्रश्न केला कीं, महाराज आमचे स्वामी कोठें आहेत ? हा प्रश्न श्रवण करून समर्थांनीं उत्तर दिलें कीं, तुमचे स्वामी आह्मांस माहित नाहींत. ते तेथेंच राहिले. असे समर्थांचे कठिण शब्द श्रवण करून गोपाळ गोसांवी बहुत श्रमी होऊं लागले तेव्हां समर्थ बोलले कीं, गोपाळा श्रमी कां होतोस ! तेव्हां महाराज आपण उभयतां स्नानास ह्मणून आलां असून आपण येथें आहां आणि आमचे स्वामी नाहींत ह्मणून

विनंति करितों, आणि आपण तर क्रोधयुक्त होऊन बोलत आहां व स्वामीचाही ठिकाण लागत नाहीं ह्मणून श्रमी झालों आहें. या प्रकारें विनंति करून समर्थांचो प्रार्थना बहुत प्रकारें केली आणि अंतःकरण फार सद्गदित झालें. हें चिन्ह पाहून समर्थांनीं त्याचा हात धरून उभयतां वडगांवीं त्या विहिरीजवळ आले. नंतर समर्थांनीं विहिरीच्या कांठापाशीं उभे राहून जयरामा बाहेर निघ, ह्मणून हांक मारिली तेव्हां जयराम स्वामीनीं पाण्यांतून ओ देऊन विनंति केली महाराज मला पोहतां येत नाहीं. तेव्हां समर्थ ह्मणाले अरे बाहेर ये असें ह्मणतांच विहिरींतून मोठ्या संकटानें बाहेर येऊन समर्थांस साष्टांग नमस्कार केला. आणि विचारलें कीं, महाराज तीन दिवस पाण्यांत बसविलें हा दंड मला कां केला ? समर्थ बोलले कीं, बापा तूं मेलीं माणसें उठवूं लागलास आतां तुझे दारांत रोज एक मेलें माणूस पडेल तें तूं उठवित जा. तुजला आह्मीं ब्रह्मदेवच ह्मणूं. हें समर्थांचें बोलणें ऐकून स्वामीनीं विनंति केली कीं, महाराज अतःपर महाराजांचे आज्ञे व्यतिरिक्त कांहीं एक करणार नाहीं, बरें आहे असें ह्मणून वडगांवीं मठांत आले. मग कांहीं दिवस तेथें राहून नंतर चाफळीं निघून गेले.

एका समयीं समर्थांची स्वारी महाबलेश्वरास श्रीचे दर्शनास गेल्याचो खबर राजश्रीस समजतांच ते प्रतापगडाहून निघाले. हें जाणून समर्थांनीं विचार केला कीं, शिवाजीचा दर्शनास येण्याविषयींचा नेम कसा आहे व त्याचे आंगीं धैर्य कसें आहे याची आज परीक्षा करावी. असें मनांत आणून राजश्री येण्याचे पूर्वीच स-

मर्थ तेथून नाहींसे झाले. इतक्यांत राजश्रींची स्वारी येऊन पोंचली; त्या समयीं मंडळीनीं राजश्रींस सांगितलें कीं, समर्थ येथून गेल्यास बराच वेळ झाला. हें वर्तमान ऐकून महाबलेश्वराचें व श्रीमारुतीचें दर्शन घेऊन समर्थांचा शोध करण्याकरितां राजश्री निघाले ते डोंगरांत कडयांत झाडींतून पाहतां पाहतां अस्तमान झाला आणि स्वारीचे लोकही थकले आणि रात्रही होऊन निबिड अंधःकार पडला, कारण तो कृष्णपक्ष होता स्वारींतील लोक चुकून चुकून रानांत रहात गेले सबब राजश्रीनीं घोडयावरून उतरून फार खेदयुक्त होऊन जवळचे मंडळीस सांगितलें कीं, पहा, समर्थ येथें असतां आज दर्शन घडलें नाहीं; आतां काय करावें? असतु, समर्थांची इच्छा!!! असें ह्मणून दोन तीन मशाली लावून दहा वीस मनुष्यांनिशीं राजश्री रानांत व डोंगरांत कडे कपारें पहात पहात फिरत होते. घोर अंधःकार असल्यामुळें मशालजी दरडीवरून घसरून पडूं लागले. बाकीच्या माणसांपैकीं फक्त दोन चार माणसांनिशीं राजश्री राहिले.

या तऱ्हेनें रानांतच सर्व रात्र क्रमल्यानंतर प्रातःकाळ झाला. ह्मणून तेथें एका झऱ्याचें स्वच्छ उदक पाहून राजश्रीनीं स्नान केलें, आणि मानसपूजा झाल्यावर पुनरपि शोधास निघाले ते मोठ्या अरंण्यांत शिरले, तों तेथें त्या डोंगरास वायव्यकोनीं एक लहानशी गुहा होती त्यांत समर्थ दिसले. तों मोठ्यानें हुंकार देऊन विवळत असून जमिनीवर गडबडां लोळत आहेत असें पाहून राजश्री फार भयभीत जाहले आणि मोठ्या धैर्यानें तेथें जावया-

स निघाले परंतु तेथें जाण्याची वाट फार अवघड आहे असें पाहून मोठ्या यत्नानें कडा वेंघून राजश्री वर चढले. बाकीचीं मनुष्यें थकलीं, त्या समयीं राजश्री एकटेच गुहेपाशीं गेले तों, त्या गुहेंत समर्थ एकटे असून दुःखानें विवळताहेत व जमीनीवर गडबडां लोळत आहेत ही स्वामींची अवस्था पाहून राजश्री फार घाबरे झाले आणि समर्थांपाशीं जाऊन ह्मणाले कीं, महाराज आपणांस काय व्यथा होत आहे हें कृपा करून त्वरेनें सांगावें. समर्थ ह्मणाले कीं, बापा आज दोन तीन दिवस अशीच अवस्था होत आहे. राजश्री ह्मणाले, महाराज महाबलेश्वराहून बरोबर कोणी न घेतां असें अरण्यांत एकटें येणें कां केलें? समर्थ ह्मणाले शिवबा, येथें आल्यावर व्यथा उत्पन्न जाहली या व्यथेस जो औषधी उपाय आहे तो दुसऱ्यास सांगून उपयोग नाहीं, स्वतःच केला पाहिजे. ह्मणून यास्थळीं एकटा आलों. परंतु अद्यापि यास औषध मिळेना ह्मणून येथें पडलों आहें. राजश्री ह्मणाले, महाराज असें अवघड औषध कोणतें आहे तें त्वरेनें सांगावें.

समर्थ ह्मणाले सांगितल्यानेंही मिळावयाचें नाहीं. तत्रापि मिळाल्यास तुह्मांस धैर्य होऊन प्राप्तही होणार नाहीं. तेव्हां राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज असें कसलें औषध आहे तें सांगावें. सांगितल्यास प्रयत्न करून दैवयोगें मिळाल्यास उत्तम. नाहीं पेक्षां प्राणानिशीं जाण्यास सिद्ध आहें. तेव्हां स्वामी ह्मणाले आपल्यासाठीं दुसऱ्याचा प्राण घेणें हा धर्म कोणता? यास्तव सांगावयाचें कारण नाहीं. राजश्रीनीं आग्रह केला कीं, महाराज,

असें औषध कोणतें तें सांगितलेंच पाहिजे. समर्थ झणाले अरे बाबा या व्यथेस वाघणीचें दूध पाहिजे, तें मीं सांगूं कसें व तूं आणशील कसें. राजश्री बोलले महाराज अवघड काय ? आपल्या वरून हा देह ओंवाळून टाकावयास योग्य आहे. मीं वाघणीचें दूध आणितों. समर्थ झणाले अरे बाबा वाघणीचें दूध प्रत्यक्ष हातास येईल कसें ? कोणी दगडावर पडून वाळलेलें आणितात तें तर उपयोगीं नाहीं, तरी प्रत्यक्ष धार काढून आणिली पाहिजे. राजश्री झणाले महाराज मी त्याप्रमाणेंच आणितों, स्वामी झणातात बाबा जिवाची ओढ ती काय करावी, ती गाय झैस नव्हे आणि हा तुमचा विषयही नव्हे, मीच माझे जिवाकरितां प्रयत्न करीत असतां वाघणीची गांठ पडून दूध प्राप्त झालें नाहीं, यास्तव तूं तरी आपला प्राण वांचवून दूध कसा आणशील, त्यांस शिवाजी बोलले महाराज, आपलेपेक्षां मला माझा जीव अधिक नाहीं. मी आणितोंच. स्वामी झणाले बाबा तूं या छंदीं पडूं नयेस कारण तूं निस्पृही नव्हेस. तुझ्या जिवाची काळजी मला आहे. आह्मीं गोसावी एकटे. ना रांड आणि ना पोर. आमचें काय व्हावयाचें ? तूं नरपती लक्षावधी मनुष्यांचा पालन करणारा, त्यांत धर्मसंस्थापक धर्मराजा होय. याजकरितां हा विषय तुझा नव्हे. तूं भांडूं नकोस. जिवावरची ओढ आहे. तर आमच्या दैवयोगें करून वाघणीची गांठ पडल्यास आह्मांवर पूर्वी दोनचारवेळां कृपा केली होती; तशीच सांप्रत करील अथवा भक्षिल्यासही चिंता नाहीं, तूं जाऊं नकोस. हें ऐकून राजश्रीनीं विनंति केली कीं,

महाराज, असें कसें बोलतां? आपण असें करून पाहिल्यावांचून मी कसोटीस कसा उतरेन. आपली कृपा पुत्रापेक्षांही मजवर अधिक. त्यापेक्षां आपल्याबद्दल माझा प्राण खर्च झाल्यास कैवल्यप्राप्ती होईल हा निश्चय मला ठाऊक आहे. एरव्ही तरी हा देह अमर आहे, असें नाहीं. कोणे काळीं तरी जावयाचाच आहे. असें म्हणून स्वामींस नमस्कार करून जवळ पात्र नाहीं. म्हणून तुंबा घेऊन राजश्री निघाले, तों त्या अरण्यांत गेंडीं इत्यादि फार भयंकर श्वापदें दृष्टीस पडूं लागलीं. त्यांचें भय न मानितां राजश्री वाघणीचा शोध करीत चालले. झाडी फार त्यामुळें अंगावरील वस्त्राचे धुडके उडून गेले. पागोटें अंगरखा इत्यादि व उपवस्त्रें फाटून आंगाचे टवके निघाले, इतके श्रम झाले तथापि वाघणीची गांठ पडेना. तों अकस्मात् राजश्रीनीं एके जाळींत वाघणीचीं पिलीं पाहिलीं आणि मनांत विचार केला कीं, आपण बिळाजवळ बसावें म्हणजे वाघीण येईल; तेव्हां आपलें कार्य होईल. म्हणून तेथें बसले तों दोनप्रहरच्या समयीं तेथें वाघीण आली. तों जाळीजवळ मनुष्य पाहून अतिक्रोधानें गर्जना करीत धांवली, वाघाची जात त्यांत ती वाघीण प्रसूत असल्यामुळें अतिक्रोधानें येत असतां पिल्यांजवळ तिनें मनुष्य पाहिलें; त्या योगें करून भयानें राजश्रींनीं नेत्र झांकिले. परंतु धैर्य धरून मनांत विचार करून संकेत केला कीं, वाघणीचें दूध मिळोन स्वामींस दिल्यानंतर आपण मेल्यासही चिंता नाहीं. हीही काळजी त्यांसच आहे. असो समर्थांचे इच्छेंकरून घडेल तें खरें. असा मनांत विचार

करितात तों वाघिणीनें झपाट्यानें येऊन राजश्रीच्या मानगुटीस धरून हिसका दिला, त्यासरशी राजाची मान वाघणीच्या तोंडांत जाऊन फडशा व्हावा परंतु श्रींचे इच्छेंकरून कांहीं एक इजा न होतां जशी माजर आपलीं पिलें तोंडांत धरिते तशी महाराजांची मान वाघणीनें तोंडांत धरिली. तेव्हां राजश्री मनीं म्हणतात कीं, बाई मी तुझीं पिलीं मारावयास आलों नाहीं. अथवा तुला द्वेष-बुद्धीनें वधावें म्हणोनही आलों नाहीं, फक्त स्वामीस व्यथा प्राप्त जाहली आहे म्हणून तुझें दूध पाहिजे. यास्तव तूं कृपा करून मला न मारितां दूध दे म्हणजे स्वामीची व्यथा दूर होईल. हें जाणून त्या वाघणीनें राजश्रींची मान सोडून गाईप्रमाणें राजश्रीपाशीं उभी राहिली. तेव्हां राजश्रीनीं समर्थांचें स्मरण करून विचार केला कीं, माझें धैर्य पाहावें व कांहीं मौज दाखवावी म्हणोन ही कामगिरी योजिली असावी. बरें असो, समर्थइच्छा. म्हणोन संतोष मानून वाघिणीचे कांसेखालीं बसून दूध काढून घेतलें. नंतर पुनः वाघिणीस नमस्कार करून निघाले. ते कांहीं जाळ्या ओलांडून आले तों समर्थांनीं मागून हाक मारिली तेव्हां राजश्री मागें फिरोन पाहतात तों समर्थ येऊन पोहोंचले हें पाहून राजश्रीनीं समर्थांस नमस्कार करून विनंति केली कीं, महाराज आपली व्यथा दूर होऊन येथें येणें कसें जाहलें. तेव्हां समर्थांनीं मंद हास्यवदन करून बोलले कीं, बाबा तुजसारखा वैद्य मिळावर मजसारिख्याची व्यथा कशी राहील, तेव्हां राजश्री

झणाले महाराज हें बोलणें काय; सर्वत्र प्राणिमात्रांची व्यथा आपण दूर करणार समर्थ असून आपली व्यथा मी दूर केली हें कसें घडेल ? यासमयीं अशी लीला करण्याची इच्छा झाली झणून त्याप्रमाणें ही लीला मला दाखविली. असें बोलून राजश्रीनीं साष्टांग नमस्कार केला आणि सद्गदीत अंतःकरण होऊन नेत्रीं अश्रु स्रवतांहेत, अशा मुद्रेनें राजश्रीनीं पुनः चरणीं मस्तक ठेविलें असतां समर्थांनीं राजश्रीस उचलून पोटाशीं धरून बोलले कीं, बाबा तुझ्या धैर्याची पराकाष्ठा झाली. कालपासून तूं रानांत उपोषीत हिंडतानां आंगाचे टवके निघाले. आणि वाघणीनें मान धरिली त्यायोगानें मानेस क्षतेंही पडलीं असतां धैर्यापासून चळला नाहींस आणि वाघणीची प्रार्थना करून तिजला जिजाबाई तुल्य मानिलेंस यास्तव तूं धन्य आहेस. असें झणून पुन्हा पोटाशीं धरून बाबा तूं फार श्रमलास आतां स्नान करून ये. तेव्हां राजश्री बोलले महाराज या अरण्यांतच? तेव्हां होय झणून समर्थ राजश्रीचा हात धरून कांहींसे लांब आले तों दिव्य जागेंत विस्तीर्ण मंडप असून माणसें पाक सिद्ध करून वाट पहात आहेत, तों तीं मनुष्यें सुंदर तेजस्वी परंतु राजश्रीच्या ओळखीचीं नसून समर्थ त्या स्थानीं येतांच त्यांणीं समर्थांस स्नान करण्याविषयीं विनंति केली. समर्थांनीं स्नान करून राजश्रीस तैलाभ्यंग करवून स्नान घालविलें. नंतर राजश्रीसह समर्थांनीं श्रीरघुपतीची पूजा करून नैवेद्य समर्पण करून राजश्रीनीं जें वाघिणीचें दूध आणिलें होतें तें तापवून भोजनस-

मयीं वाढावें असें सांगून राजश्री व समर्थ तेथील मंडळीसह भोजनास बसले. भोजनसमयीं राजश्रीनीं आणिलेले दुधाविषयीं समर्थ बोलले कीं, हें दूध जिजाबाईचें आहे ह्मणून अतिप्रीतीनें प्राशन करितों. याप्रमाणें आनंदानें भोजन होऊन उठल्यानंतर तांबूलादि उपचार झाल्यावर राजश्रीच्या आंगावरील टवके नाहींसे झाले. बाबा तूं फारच श्रमलास असें ह्मणोन राजश्रीचा हात धरून समर्थ बाहेर आले. तों रात्रभर स्वारीचे लोक थकून बहुत श्रम झालेले भेटले. त्यांजलाही भोजनांस घालवून स्वामी राजश्रीसह महाबलेश्वरीं आले. तेथें फौजेतील कांहीं लोक मागें राहिले होते तेही येऊन मिळाले. नंतर महाबळेश्वरीं त्रिरात्र राहून समर्थांसहवर्तमान राजश्री प्रतापगडास गेले. तेथेंही त्रिरात्र राहून नंतर समर्थांस परळीस पोंचवून आज्ञा घेऊन राजश्री जाते जाहले.

यानंतर कोणे एके समयीं समर्थ शिराळें येथें जाऊन तेथून करवीरक्षेत्रीं गेले, नंतर ब्रह्मक्षेत्रीं जाऊन आनंदमूर्तीचे गुरु श्रीरघुनाथस्वामी यांचे समाधीचें वृंदावन होतें तेथें त्या वृंदावनाचे दर्शनास समर्थ गेले. तेव्हां आनंदमूर्तीही तेथें स्नानसंध्या करीत असतां समर्थांस पाहतांक्षणीं तसेच उठोन आडवे होऊन साष्टांग नमस्कार करून समर्थांचा हात धरून वृंदावनापाशीं आणिले. तेव्हां समर्थांनीं वृंदावनास प्रदक्षिणा करून साष्टांग नमस्कार करितांच पाषाणाचें वृंदावन डोलूं लागलें. हें पाहून समर्थांनीं आनंदमूर्तीस पोटाशीं धरून बाबा गुरु सेवेचो सोमा केलोस. तं गुरुसेवा करणार

श्रीएकनाथमहाराजांप्रमाणेंच असून याशिवाय तुजला दुसरी योग्य साक्ष मिळावयाची नाहीं. असें ह्मणोन तेसमयीं समर्थांनीं आनंदमूर्तीवर दोन श्लोक केले ते:—

॥ श्लोक ॥

अति कठिण शिळा ती डोलवी वृक्ष जैसा ॥ जननि-
जठरकोशीं जन्मला कोण ऐसा ॥ गुरुभजन प्रतापें
ख्याति झाली दिगंतीं॥ अनुदिन स्मर चित्ता स्वा-
मिआनंदमूर्ती ॥ १ ॥ अचेतना जो बहु डोलवीतो ॥
सचेतना काय न बोलवी तो ॥ जो चिद्घनानंद
आनंदमूर्ती ॥ तदाकार राहोचि आनंदवृत्ती ॥२ ॥

याप्रमाणें आनंदमूर्तीचें स्तवन समर्थांनीं करितांच आनंदमूर्तीनीं समर्थांस साष्टांग नमस्कार करून महाराज आपण व श्रीगुरु रघुनाथस्वामी हे दोन कीं काय? माहाराज, या स्तवनास मी योग्य नाहीं. असें आनंदमूर्तीनीं ह्मणतांच समर्थांनीं आनंदमूर्तीस पोटाशीं धरून तूं या स्तवनास योग्यच आहेस असें ह्मणतांच आनंदमूर्तीनें समर्थांचे स्तवनपर एक श्लोक केला तो:—

॥ श्लोक ॥

समर्थ हें नामचि साच मानूं ॥ समर्थ हें नाम दुसऱ्या न मानूं ॥
समर्थ कृपेनें जड जीव तरती ॥ समर्थ हें नाम सद्यः प्रतीती॥ १॥

याप्रमाणें आनंदमूर्तीनीं समर्थांची स्तुति करून श्रीचरणीं मस्तक ठेऊन स्नानसंध्यादि उरकून गांवांत मठांत जाऊन भोजन केलें,

नंतर ब्रह्मनाळीं कांहीं दिवस राहून आनंदमूर्तीचा निरोप घेऊन समर्थ वडगांवास येऊन जयरामस्वामीस भेटून तेथें कांहीं दिवस राहून चाफळास आले.

या नंतर कोणे एके समयीं समर्थ व जयराम स्वामी व रंगनाथस्वामी आणि आनंदमूर्ती असे चौघेही बाहे या गांवीं येऊन राहिले. त्या गांवचे ज्योतिषी यांची स्त्री म्हातारी विधवा होती तिचे घरीं नित्य सर्वांनीं भोजन करावें आणि चौघेही रामलिंगापाशीं बेटांत अस्तमानपर्यंत जात. रात्रौ त्या बाईचे घरीं निद्रा करून प्रातःकाळीं स्नानास पुनः बेटांत जाऊन दोन प्रहरपर्यंत स्नानसंध्यादि करीत असत. असे कांहीं दिवस गेले असतां त्या बाईनें एके दिवशीं चौघांसही सांगितलें कीं, महाराज, घरीं वैरण नाहीं. म्हशीस रानांत सोडावी तर उष्णकाळामुळें चारा नाहीं. यास्तव तुम्हीं बेटांत जातानां तीस बरोबर नेऊन येतानां चारून परत आणावी; असें केल्यास तुम्हांस दूध मिळेल. हें ऐकून आनंदमूर्तीनीं बरें म्हणून दुसरे दिवशीं प्रातःकाळीं म्हैस व रेडकूं बरोबर घेऊन बेटांत गेले. तेथें दोनप्रहरपर्यंत म्हैस चारून पाणी पिऊन आराम छायेंत येऊन बसली. हें पाहून तिला तेथेंच ठेवून चौघेही भोजनास घरीं आले. भोजनोत्तर नित्यपाठाप्रमाणें बेटांत जाऊन अस्तमानीं संध्या करून येतानां म्हैस व रेडकूं आणावयास आनंदमूर्ती गेले तों म्हैस एकीकडे चरत होती, आणि रेडकास तर श्वापदांनीं खाल्लें; असें जाणून म्हैस घेऊन समर्थादि त्रिवर्ग होते तेथें आले. आणि बोलले कीं, बडिलहो, रेडकास लांडग्यांनीं खाल्लें. तेव्हां जयराम

स्वामी बोलले कीं, बरें जाहलें. समर्थ बोलले कीं, बापहो आज पर्यंत त्या ह्मातारीचे घरीं दहीं दूध प्यालेत त्यांत रंगोबास लोणी आवडतें ह्मणोन ती बाई त्याजला लोणी भाकर घालीत होती आणि आतां कसें होईल, हें सर्वांनीं ऐकून हांसले. नंतर चौघेही ह्मैस घेऊन घरीं आले. आणि तीस दाव्यास बांधोन ठेविली. तेव्हां ह्मातारीनें विचारिलें कीं, बाबाहो रेडकूं कोठें आहे? त्या काळीं आनंदमूर्तीनीं सांगितलें कीं, रेडकूं श्वापदानीं खालें. बाई ह्मणाली तूह्मांस मीं कधीं नाहींतें काम सांगितलें, आणि तुह्मीं आजच ह्मैस व वासरूं चारावयास नेऊन ह्मैस आणिलीत व वासरूं मारून टाकिलें. आतां ह्मैस धार कशी देईल असें ह्मणोन ह्मातारी श्रमी होऊं लागली. तों चौघेही उगाच होते धार काढावयाचा समय झाला तेव्हां ह्मैस ओरडूं लागली, परंतु धार काढूं देईना. कांस तटतटली हें पाहून ह्मातारी फारच रडूं लागली.

तेव्हां समर्थ बोलले कीं, अरे गृहस्थ हो, तुह्मीं ह्मातारीचे घरीं भोजन करून दहीं, दूध, लोणी तूप खाऊन मोठे आनंदांत होतां आणि ह्मातारीनें तुह्मांस कधीं नव्हे तें काम सांगितलें असून तुह्मी रेडूक मारून आलां. आतां पाहा ह्मैस ओरडते, ह्मातारी रडते तर ह्मशीपाशीं जाऊन धार काढून कां द्यांना ? त्या काळीं रंगनाथ स्वामी बोलले कीं, महाराज आज्ञा होईल त्याप्रमाणें आजचा दिवस आह्मीं धार काढून देऊं. परंतु ह्मातारीचे घरीं आह्मींच भोजन केलें आणि स्वामीनीं भोजन केलें नाहीं असें नाहीं. आज्ञा झाली सबब आह्मीं धार काढून देऊं, परंतु समर्थांनीं

म्हातारीचा शोक दूर करून म्हैस निरंतर दूध देई असें करावें. समर्थ बोलले कीं, आम्हींच करावें, तुम्हीं करूं नये असें नाहीं. रंगनाथ स्वामी बोलले कीं, उभयतां वडील असतां आम्हां मुलांकडे काय आहे ! हीं परस्परांचीं विनोदपर भाषणें ऐकून म्हातारी बोलली कीं, रेडकूं मारून आलां आणि माझीच थट्टा करितां यास काय म्हणावें म्हणोन मोठ्यानें रडूं लागली.

तेव्हां जयराम स्वामी बोलले कीं, बाई तुमची थट्टा आम्हीं करीत नाहीं आजपर्यंत आम्हीं जेविल्याचें सार्थक करितों, तुझे दुधाचा बंदोबस्त करित आहों रडूं नकोस. तों रंगनाथ स्वामी बोलले कीं, महाराज म्हातारी म्हणते माझें खाऊन वासरूं मारून आलां. हीं भाषणें ऐकून उगीच बसावें हा धर्म कोण ? तेव्हां समर्थ बोलले कीं, जयरामा म्हातारीचें समाधान करून म्हैस दूध देई असें कर जा. तेव्हां जयराम स्वामींनीं विनंति केली कीं, महाराज जसें रंगोबा बोलतो तसेंच हें काम वडिलांकडे. बरें बाबा, असें बोलून समर्थ स्वतः म्हशीजवळ येऊन म्हशीचे पाठीवर हात फिरवून बोलले कीं, बाई मृत्युलोकीं जो प्राणी जन्मास येतो तो मृत्यु पावतच आहे. यास्तव मेल्या वासराचें दुःख मानून धार न देणें हा धर्म नव्हे. झाल्या गोष्टीस उपाय नाहीं.

याजकरितां बाई यावत् जिवंत आहे, तावत्काळपर्यंत निरंतर दूध देत जा. पुनः गर्भिणी होऊं नकोस, वासरासाठीं दुःख करूं नकोस. याप्रमाणें म्हशीस सांगून पाठीवरून हात फिरवून बाईस

सांगितलें कीं, तपेलें आणून धार काढावी. बाई बोलली कीं, आतां धार कशी देईल ? समर्थ बोलले कीं, वेडे म्हातारी तुला काय ? तूं जोंपर्यंत जिवंत आहेस तावत्काळपर्यंत पूर्वी नित्य धार काढीत होतीस त्याचे दुप्पट दूध काढीत जा. त्याची काळजी तूं करूं नको. बरें बावा म्हणून घरांतून तपेलें आणून बाईनें धार काढिली तेव्हां नित्यापेक्षां दुप्पट दूध म्हशीनें दिलें. हें म्हातारीनें पाहून चौघांच्या चरणीं मस्तक ठेवून संतोषातें पावली. ती म्हैस म्हातारीचे आमरणांत दूध देत होती. याप्रमाणें चरित्र करून चौघेही आपआपले गृहाप्रत गेले.

नंतर कोणे एके समयीं समर्थ मंडळीसह उंबरजेस असतां प्रातःस्नान करण्यास घांटावर जाऊन स्नान करावयास श्रीकृष्णेंत शिरतांना अकस्मात् खडकाच्या शेवटास पाय पडला तेणेंकरून घसरून स्वामी बुडाले ते तळास जाऊन वरते आले तेव्हां गडेहो धांवून मला ओढून काढा म्हणून शिष्यमंडळीस बोलले. मंडळी येताहेत तों श्रीमारुतीनीं स्वामींस हात देऊन ओढून घेऊन आपले पोटाशीं धरिलें. तेव्हां समर्थांनीं विनंति केली कीं, महाराज मंडळी काढणारी आहेत व मीही बुडत नव्हतों. इतकी त्वरा कां केली ? तेव्हां श्रीमारुती म्हणाले अरे मंडळी येई तोंपर्यंत फुरसत कोठली ? मी मंडळीची वाट पाहूं कीं काय ? तेव्हां समर्थांनीं विनंति केली कीं, या देहाचे मालक धनी आपणच आहांत मी चरणांचा दास आहें. म्हणून चरणीं मस्तक ठेविल्यानंतर श्रीमारुति अदृश्य झाले. तेव्हां ज्या खडकावर श्रीमारुतीनीं पाय देऊन स्वामीस वर

घेतलें त्या खडकावर सबंध एक पाय आंगठ्या बोटांसुद्धां व एक अर्धा असे अद्यापि आहेत.

यानंतर कोणे एके समयीं श्रीरंगनाथ स्वामी प्रतिवर्षी भागा नगरास केशव स्वामीचे भेटीस जात असतां तेथें महिना दोन महिने राहून नित्य कीर्तन करीत असत. तेथें एक झातारी विधवा होती, ती नित्य कीर्तनास येत असे. रंगनाथ स्वामीस नित्य एकानें भोजनास बोलावीत असावें. हें पाहून त्या झातारीचेही मनांत आपले घरीं रंगनाथ स्वामींस एक दिवस भोजनास सांगावें असें आलें. परंतु रिकामा दिवस सांपडेना. झणून कांहीं दिवसांनंतर रंगनाथ स्वामी श्रीची आज्ञा घेऊन सर्वत्र मंडळीचाही निरोप घेऊन सर्वांस प्रसाद देत असतां घटकाभर रात्र झाली. ती वृद्ध बाई त्यासमयींही होती. तिला प्रसाद देऊन जावें झणून आज्ञा झाली. तेव्हां होय झणून नमस्कार करून पुन्हा बाई बसली. नंतर कांहीं मंडळीस निरोप देऊन पुनः रंगनाथ स्वामींनीं त्या बाईस जावें झणून सांगितलें, तेव्हांही तिनें होय झणून नमस्कार करून पुनः बसली. याप्रमाणें दोनचार वेळां झालें, कारण त्या बाईचे मनांत उदईक स्वामीला भोजनास बोलवावयाचें होतें; परंतु आपण गरीब असून भिक्षा मागून निर्वाह करणार. स्वामीस तर नित्य आमंत्रणें भोजनाचीं येतात तेथें पक्कानें होतात. यास्तव स्वामीस कसें बोलवावें. हा विचार मनांत करीत आहे तों तिचे मनांतील हेतु स्वामींनीं जाणून बाईस बोलले कीं, बाई तुझीं घरीं जावें आह्मीं उद्यां तुमचे घरीं भोजनास येतों हें ऐकून बरें झणून

बाई विचार करीत बसली. कारण त्यांजला भोजनास काय करावें ? हा तिचे मनांतील भाव जाणून स्वामी बोलले, बाई ! तुह्मी आतां घरीं जावें. जें तुमचे घरीं असेल तेच पदार्थ करा, आह्मीं श्रीरघुपतीस सपर्पण करून भोजन करून जाऊं. हें स्वामींचें भाषण ऐकून बाई संतोष पावली. परंतु स्वामीची मंडळी फार, मी गरीब; एक शेर धान्यांत कशी तरी भाकरी करणार; यास कसें करावें ह्मणून मनांत विचार करीत आहे. हें जाणून स्वामींनीं बाईला सांगितलें कीं, मी एकटाच येतों आपण काळजी करूं नये, नंतर बाईनें नमस्कार करून संतोष मानून आपल्या घरास निघाली. तेव्हां स्वामींनीं एका शिष्यास बोलावून सांगितलें कीं, बाईस नेऊन घरास पोंचवावें आणि घर पाहून यावें; कारण ह्मातारीचें कोणी बोलावण्यास येणारें नाहीं. तेव्हां आज्ञा प्रमाण ह्मणून एका शिष्यानें जाऊन घर पाहून आला.

स्वामींनीं सर्व शिष्यमंडळीस सांगितलें कीं, तुह्मीं उदईक बिऱ्हाडीं भोजन करावें. आह्मीं बाईचे घरीं एकटे भोजनास जाणार, याप्रमाणें सांगून निद्रिस्त जाहले. नंतर प्रातःकाळीं उठोन स्नानसंध्यादि जाहल्यावर श्रीरघुपतींच्या मूर्ती बाईच्या घरीं पोहोंचविण्यास स्वामींनीं शिष्यास सांगितलें. त्याप्रमाणें मूर्ति शिष्यानें पोहोंचवून परत बिऱ्हाडीं आला. बाईनीं दोन भाकरी व हरभऱ्याच्या पाल्याची भाजी याप्रमाणें स्वयंपाक सिद्ध केला. स्वामी येतांच एक वीतभर रुंदीचें पिढें होतें तें, बसावयास देऊन त्याप्रमाणेंच पत्रावळ वीतभर रुंदीची मांडून पदार्थ वाढिले आणि अन्नशुद्धीस

तुळशी पत्र ठेविलें. तेव्हां स्वामीनीं श्रीरघुपतीस नैवेद्य समर्पण करून तिचा भावार्थ पाहून संतोष पावले. ज्याप्रमाणें श्रीकृष्ण भगवान् यांणीं विदुराच्या घरीं कण्या भक्षिल्या होत्या तशा ह्या कण्या आहेत. व यांजला योग्यताही तीच आहे, याजकरितां श्रीरामदास समर्थ भोजनांस येतील तर बरें आहे. असें ह्मणोन पात्रावर वस्त्र डोळे झांकून समर्थांचें ध्यान केलें तों रंगनाथ स्वामींचा शिष्य भोजन करून आला त्या जवळ देव गुंडाळून देऊन बिऱ्हाडास पाठविलें. नंतर बाईनीं विनंति केली कीं, महाराज भोजनास बसावें, तेव्हां रंगनाथ स्वामीनीं सांगितलें कीं, आमचे वडील आहेत; त्यांजला तुझे घरीं भोजनास बोलाविलें आहे. ते आल्याशिवाय भोजनास कसें बसावें. बाई ह्मणाली महाराज ते कोठें आहेत? स्वामी बोलले ते चाफळीं आहेत. बाईनीं विचारिलें चाफळ किती लांब आहे? स्वामीं बोलले दोनशें कोस आहे. बाई बोलली ते येतील कसे? स्वामी ह्मणाले आतांच ते येतील.

इकडे समर्थ चाफळीं श्रीरघुपतीच्या देवालयांत स्नान संध्यादि कर्म आटोपून नैवेद्य समर्पण करून बाहेर आले. काणि दिवाकर भट्ट गोसांवी व कल्याण गोसांवी व इतर मंडळी यांस सांगितलें कीं, आह्मांस रंगोबा भोजनांस बोलावीत आहे. आह्मीं जातों तुह्मीं भोजन करावें. तेव्हां मंडळीनें विनंति केली कीं, महाराज, रंगनाथस्वामी सांप्रत कोठें आहेत व आपण जातां कोठें? समर्थ बोलले कीं, तो भागानगरींत जेवावयास बसला असून आह्मांस त्वरेनें बोलावितो, असें ह्मणून जलदीनें पाहिऱ्या उतरतांच अदृश्य

झाले; ते भागा नगरींत त्या बाईच्या घरांत रंगोबापाशीं येऊन उभे राहिले तेव्हां रंगोबा नमस्कार करून बोलले कीं, महाराज आजचें भोजन अतिप्रीतीचें आहे. आपण पंगतीस असावें, ह्मणून स्मरण केलें. तेव्हां बरें, बाबा ह्मणोन समर्थ हांसले. रंगनाथ स्वामी आपण ज्या पात्रावर बसले होते त्या पात्रावर स्वामींस बसवून आपण शेजारीं बसले आणि बाईस पत्रावळ आणा ह्मणतांच बाईनीं आपल्यास पत्रावळ ठेविली होती ती मांडून पदार्थ वाढिले. स्वामी बसावें असें रंगनाथ स्वामी बोलले; तेव्हां समर्थ ह्मणाले कीं, रंगोबा आज जयरामास टाकून कसें बसावें? रंगोबा बोलले महाराज त्याजलाहो बोलवावें.

त्या काळीं इकडे जयराम स्वामींनी वडगांवीं कृष्णापा यांचे समाधीची पूजा आटपून नैवेद्य समर्पण करून मठांत आले आणि गोपाळ गोसांवी आदी करून इतर मंडळीस सांगितलें कीं, समर्थ व रंगोबा हे आह्मांस भोजनांस बोलावित आहेत तर आह्मीं जातों तुह्मीं भोजनास बसावें तेव्हां सर्व बोलले कीं, महाराज समर्थ कोठें आहेत? जयरामस्वामी बोलले, समर्थ भागानगरीं आहेत तेथें जातों ह्मणतांच अदृश्य झाले. ते भागानगरींत बाईच्या घरीं येऊन समर्थांस नमस्कार करून उभे राहिले आणि विनंति केली कीं, महाराज कां बोलाविलें? समर्थ बोलले कीं, आजच्या पंक्तीस भोजनास तुह्मी असावें ह्मणून बोलाविलें, बरें ह्मणून जयरामस्वामी बसले. तेव्हां रंगनाथ स्वामी बाईस बोलले कीं, आणखीं एक पत्रावळ आणा त्याकाळीं पत्रावळ नाहीं ह्मणून बाई सं-

काचली, तेव्हां रंगनाथ स्वामी बोलले कीं, चुलीजवळ पत्रावळ आहे; ती घेऊन वाढून आणा त्याजवरून बाई चुलीजवळ पाहते तों पत्रावळ होती ती घेऊन वाढून आणून ठेविली आणि बसावें असें म्हणतांच समर्थ बोलले कीं, त्या मुलास टाकून कसें बसावें तरी महाराज मुलासही बोलवावें म्हणून रंगनाथ बोलले.

इकडे आनंदमूर्तीनीं जाणून ब्राह्मणांस मठांत सांगून निघाले ते बाईच्या घरीं आले आणि सर्वांस नमस्कार केला तेव्हां रंगनाथस्वामीनीं बाईस पत्रावळ वाढून आणावयास सांगितलें तेव्हां बाई संकोचित होऊन बोलेना. हें पाहून रंगनाथ स्वामी बोलले कीं, संकोच कां करितां पत्रावळ आहे ती वाढून आणा. बाई चुलीकडे पाहाते तों पात्रावळ होती ती बाईनीं घेऊन वाढून आणून पुढें ठेविली. महाराज आतां भोजनास बसावें. तेव्हां महाराज चोरासारखें भोजन कसें करितां म्हणून आनंदमूर्ती बोलले, तें कसें म्हणून समर्थांनीं विचारिलें. तेव्हां आनंदमूर्तीनीं विनंति केली कीं, महाराज जो गृहस्थ आपले गांवांत आहे त्यास टाकून कसें भोजन करावें.

समर्थ बोलले कीं, गोष्ट खरी त्यास बोलवावें. म्हणून समर्थांनीं स्मरण करितांच केशवस्वामीही आपले मठांत सांगून आले, तेव्हां रंगनाथ स्वामी बोलले कीं, बाई पत्रावळ वाढून आणा. त्याजवरून बाई चुलीकडे पहाते तों पत्रावळ आहे. तो पत्रावळ घेऊन वाढून आणून पुढें ठेविली. नंतर पांचहीजण भोजनास बसले. बाईचा स्वयंपाक पहिलेच वाढण्यास सरला होता, तेव्हां रंगनाथस्वामी

बोलले कीं, बाई वाढण्यास आणा तेव्हां बाईनीं चुलीकडे तोंड करून श्रमी होऊं लागली तेव्हां रंगनाथस्वामी बोलले कीं, बाई श्रमी कां होतां बाईनें विनंति केली कीं, महाराज मी केलें होतें तें सरलें रंगनाथस्वामी बोलले कीं, असें बोलूं नये चुलीवर तपेल्यांत पहावें, आणि वाढावयास आणावें त्याजवरून तपेल्यांत बाई पहाते तों तपेलें भरलें आहे व चुलीवर दोन भाकरीही आहेत त्या बाईनें घेऊन वाढिल्यानंतर पांचहीजणांचीं भोजनें होऊन उठले. आणि बाई तपेल्यांत पुनः पहाते तों तपेलें भरलेलें व पूर्ववत् दोन भाकरी शिल्लक. हें बाईनें पाहून आश्चर्य मानिलें. नंतर पांचजणांसही मुखशुद्धीस तुळशीपत्र दिलें तें घेतल्यानंतर समर्थ बोलले कीं, आजचें भोजन परम सुंदर झालें. आतां चलावें असें झटल्यावरून रंगनाथ स्वामी बोलले कीं, महाराज झातारीचें फुकट जेवलां कीं, काय? तेव्हां समर्थ बोलले मागतोस काय? रंगनाथ बोलले महाराज! तिजवर कृपा करावी. समर्थ बोलले कीं, तूं कर. रंगनाथ स्वामी बोलले कीं, समर्थांपुढें आमची योग्यता नाहीं. समर्थ बोलले कीं, या गांवचे केशवस्वामी आहेत. त्याणीं करावी त्याजवरून केशवस्वामीनीं झटलें कीं, महाराज अधिकार आपलाच होय आमचा नाहीं; तेव्हां समर्थ बोलले कीं, फार उत्तम आहे. त्यावेळीं रंगनाथस्वामीनीं बाईस सांगितलें कीं, समर्थांस नमस्कार करा असें झणतांच बाईनीं संतोषीत होऊन समर्थांचे पायांवर मस्तक ठेवून दंडवत प्रणाम केले. तेव्हां समर्थांनीं तिचे मस्तकीं हात ठेऊन बाईला उठावें झणून सांगितलें. बाई उठून समर्थांचे मुखाकडे पहाते तों त-

शीच समाधी लागली. तेव्हां समर्थ बोलले कीं, रंगोबा बाईस योग्यता आली कीं नाहीं ? स्वामी ह्मणाले महाराज योग्यता आली, परंतु तिजला तशीच ठेवून कसे जातां ? तिला आपल्या मध्यें घ्यावी. त्याजवरून समर्थांनीं पुन्हां बाईचे मस्तकीं हात ठेवितांच बाईनीं नेत्र उघडले आणि समर्थांस व चौघांस प्रणिपात केला. आणि बोलली कीं, मजला धन्य केलें. जन्मजन्मांतरापासून मुक्त करून आपणांत मिळविलें. महाराज यास मी उत्तीर्ण काय होऊं ? हें बाईचें वचन ऐकून समर्थ बोलले कीं, तुमचे मनांत उत्तीर्ण व्हावें असें असल्यास तुह्मांस सांगतों ऐका. आमचा रंगनाथ गोसांवी हा तुमचे जन्मांतरींचा रिणकारी. याणें तुमचे विद्यमानें तुमचे रिणाचा फडशा केला. परंतु तुला आपल्यांत घेतलें ही गोष्ट कांहीं रिणांतील नव्हे तुझें जन्मांतरचें कर्म आणि साधूचा धर्म, आपल्यास जो अनन्यभावें शरण आला त्याचा उद्धारच करावा हा धर्म ज्याचा त्यानीं केला. तुमचे मनांतीस संकल्प शेवटास गेला. असें ह्मणून मस्तकीं वरदहस्त ठेवितांच बाई अति आनंदातें पावली. ह्मणून तिचें नांव आनंदीबाई असें ठेवून समर्थ आदिकरून रंगनाथास्वमी सुद्धां केशवस्वामीचा निरोप घेऊन स्वस्थानाप्रत गेले.

कोणे एके समयीं पौषमासीं स्वामी परळीहून चाफळास येत असतां पालीस खंडोबाची यात्रा होती, तेथें ताशेवाले व हरदासवाले या शाहिरांनीं दोन फड करून एकमेकांवर चढ घालून चार

पांच दिवस न उठतां हटीस येऊन बसले होते, त्या मार्गे स्वामीची स्वारी आली तों शेंपन्नास माणसें जमून बसलीं आहेत, आणि भोंवती तमासगिरांची दाटी जाहली आहे. हें पाहून काय आहे म्हणून त्यांस स्वामींनीं विचारिलें तेव्हां त्या उभयतांनीं साष्टांग नमस्कार करून आपापलें सविस्तर वर्तमान सांगितलें. तें ऐकून स्वामी म्हणाले, आम्हीं तुह्मां उभयतांवर चढ घालून प्रश्न करितों त्याचें उत्तर सांगावें; नाहींपेक्षां डफावरची कलगी उतरून चालते व्हावें असें म्हणून स्वामींनीं " डफगाणें म्हटलें तेः "

॥ डफ गाणें ॥

किती पृथ्वीचें वजन, किती आंगोळ्या गगन ॥ सांगा सिंधूचें जीवन, किती टांक ॥ १ ॥ किती आकाशींचा वारा, किती पर्जन्याच्या धारा ॥ तृण भूमीवरी चतुरा, संख्या सांगा ॥ २ ॥ वायूसरसे उडती सांगा, अणुरेणू किती ॥ लक्ष चौऱ्याशींची उत्पत्ती, संख्या सांगा ॥ ३ ॥ अठराभार वनस्पती, भूमंडळीं पाणी किती ॥ पुष्पें फळें जाती किती, संख्या सांगा ॥ ४ ॥ बीज वडी आणि पिंपळीं, किती आहे भूमंडळी ॥ सर्व धान्याची मोकळी, संख्या सांगा ॥ ५ ॥ सर्व सरितांची वाळू किती, सिंधु सागरीं वाळू किती ॥ हरखूं आहे किती, संख्या सांगा ॥ ६ ॥ सांगा माझें डफ गाणें, किं डफ ठेवा शाहाणपणें ॥ देहबुद्धीचें लक्षण, सोडविन ॥ ७ ॥ ऐका जें जें पुशिलें तुह्मां, तें तें आतां सांगा आह्मां ॥

अनंत ब्रह्मांड वेरीज, किती जाहली ॥ ८ ॥ रामदासाचा विनोद, सांडा अहंतेचें बीज॥ मग स्वरूपीं आनंद, सुखी राहा ॥ ९ ॥

याप्रमाणें डफगाणें ह्मणून त्यांस विचारलें; त्याचें उत्तर दोन्ही फडांचे शाहिरांस जाहलें नाहीं. तेव्हां दोन्ही फडवाले आपापल्या डफावरची कलगी उतरून स्वामींस साष्टांग नमस्कार करून आपापल्या घरास गेले.

स्वामींचे शिष्य रंगोबा गोसांवी हे पवाराची निगडी येथील राहणारे, ते गाणारेही बहुत चांगले असून स्वामींनीं केलेलीं पदें व अभंग सुरस चालीवर ह्मणत असतां तीं श्रवण करून स्वामी बहुत संतुष्ट होत असत. हे अति निस्पृह आणि ब्रह्मचारी असतां प्रारब्धयोगानें किंचित् दुर्व्यसनी होते. हें स्वामींस समजल्यानंतर ज्या ज्या समयीं त्यांस त्या कृत्याचें स्मरण होई; त्या त्या समयीं रंगोबास ते बाहेर ओढून टाकवीत, परंतु ज्या स्थळीं ज्या अंगावर स्वामींनीं टाकवावें त्या स्थानीं व त्याच अंगावर तसेंच त्यानें पडून रहावें. तें पाहून अका आदिकरून सर्वांनीं रंगोबास आणावयाविषयीं स्वामींपाशीं प्रार्थना करावी. तेव्हां पुनः दया करून आज्ञा देत असत. कदाचित् रंगोबानें स्वामींनीं केलेलें ध्रुपद ह्मटलें असतां त्या वेळेस स्वामींनीं संतोषी होऊन ह्मणावें कीं, हा रंगोबा फार चांगला आहे, परंतु कंबरेवरती ठेवावा, आणि खालीं तोडून टाकावा. असें कांहीं दिवस चालत असतां शके

दिवशीं कीर्तनास रंगोबा उभे राहिले. तेव्हां स्वामी बाहेर बसून करुणापर व अति मनोहर कीर्तन ऐकून बहुत संतोषातें पावले. नंतर आरती जाहल्यावर रंगोबा गोसांवी येऊन स्वामींस साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. त्या काळीं समर्थ बोलले कीं, रंगोबा! आजचें तुझें कीर्तन ऐकून श्रीस बहुत संतोष जाहला. यास्तव इच्छा असेल तें माग. असें ह्मणतांच पुनः रंगोबानें नमस्कार करून हात जोडून विनंति केली कीं, महाराज या भवसमुद्रांतून मुक्त केलें, परंतु आतां दुर्व्यसनास कारणभूत पूर्वसंचितापासून मुक्त करावें. हें ऐकून स्वामींनीं उत्तर केलें कीं, बहुत बरें, यांतूनही तुला मुक्त केलें. कसें ह्मणशील तर आजपासून प्रसूति समयीं स्त्री अडली असतां तुझे लंगोटीचें पाणी घेतलें तर तीही तत्काल त्या संकटापासून मुक्त होईल. याप्रमाणें वर देऊन पालींत मठ करून तेथें त्यांची स्थापना केली. त्या संधींत राजश्रींची स्वारी कर्नाटकची स्वारी करून समर्थांचे दर्शनाकरितां आली. तेव्हां समारंभें करून समर्थांची पूजा करून स्वारींतील सर्व वृत्त निवेदन करून कांहीं दिवस राहून आज्ञा घेऊन प्रतापगडीं श्रीदेवीचें दर्शन करून रायगडास गेले.

कोणे एके समयीं चाफळीं रामनवमीच्या उत्साहास प्रारंभ जाहला असतां कन्हाडास जोशी यांचे अठरा वर्षांच्या वयाचे पुत्र यजुःशाखी, निरंजनस्वामी श्रीकृष्णेस स्नानास आले असतां कन्हाडकर ब्राह्मण मंडळी उत्सवास जाण्याकरितां निघाली. तेव्हां हें पाहून निरंजन स्वामींनीं विचारिलें कीं, समुदाय मिळून

आपण कोठें जातां ? ब्राह्मण बोलले कीं, आह्मीं चाफळास जातों. तेथें रामनवमीचा उत्साह आहे. नित्य पुरणाच्या पोळ्या मिळतील, यास्तव तुला येणें असल्यास ये. तें ऐकून निरंजन स्वामींनीं उत्साह पहावा आणि समर्थांचें दर्शनही घ्यावें असें मनांत आणून स्नान करून जीं धोत्रें पात्रें बरोबर घेऊन आले होते, तीं एका ब्राह्मणासवें देऊन घरास न जातां तसेच समुदायाबरोबर चाफळास आले. तेथें श्रींचें व समर्थांचें दर्शन घेऊन उत्साह होईतोंपर्यंत राहून श्रीचे मंडपांत समर्थ बसले असतां निरंजन स्वामी समर्थांजवळ येऊन त्यांस साष्टांग नमस्कार करून दंडप्राय भूमीवर पडले. त्या काळीं समर्थ महाराज बोलले कीं, मुला ! ऊठ, तूं कोणाचा कोण ? कोठील रहाणार व तुझें नांव काय ? असें म्हणतांच निरंजन स्वामी बोलले कीं, महाराज ! मी कऱ्हाडकर जोशी यांचा मुलगा, व माझें नांव निरंजन आहे. स्वामींनीं कृपापूर्वक मजवर अनुग्रह करून मस्तकीं वरदहस्त ठेवावा. मी केवळ अनाथ आहें. अशी त्यानें विनंति केल्यावरून स्वामींनीं हास्य करून बापा ! तुजवर कृपा करणार श्री रघुपति समर्थ आहेत, आतां ऊठ, म्हणून आज्ञा केली.

निरंजन स्वामी बोलले कीं, महाराज ! आपण समर्थ असून दीनदयाळ व पतितपावन आहां, मी तर बहुत जन्मींचीं दुःखें सोसतां सोसतां श्रमी होऊन अकस्मात् या नरदेहीं प्राप्त जाहलों. आतां स्वामी कृपाळू, जाणून आपणास शरण आलों.

मज दीनाची उपेक्षा न करितां कृपा करावी, आणि आपलें ब्रीद सांभाळावें. हे करुणापर शब्द ऐकून स्वामींनीं बहुत संतुष्ट होऊन या मुलाचें वय लहान असतां ज्ञान तर फार चांगलें आहे. या वरून हा कोणी योगभ्रष्ट असावा. असें मनांत आणून अनुग्रहबुद्धीनें बापा ! तूं ऊठ, ह्मणून पुनः आज्ञा केली. तेव्हां कल्याणगोसांवी यांणीही विनंति केली कीं, मुलाचें वय लहान आहे खरें, परंतु हा कोणी योगभ्रष्ट असून खरा मुमुक्षु व अतिशुद्धबुद्धीचा आहे. यास्तव समर्थांनीं वरदहस्त मस्तकीं ठेऊन यावर कृपा करावी. असें कल्याण स्वामींचें भाषण श्रवण करून समर्थ कृपाळू होऊन त्या मुलाच्या मस्तकीं वरदहस्त ठेऊन ऊठ, ह्मणतांच निरंजन उठून हस्त जोडून उभा राहिला. आणि नेत्रीं अश्रु स्रवत असतां बोलला कीं, महाराज ! पतितांचें पावन असें आपलें नाम श्रवण करून पूर्वी पावन जाहलों होतों, आतां प्रत्यक्ष दर्शनेंकरून मुक्तच जाहलों, हें वाक्य ऐकून परम संतुष्ट होऊन स्वामी बोलले, बापा ! तूं मुक्तच आहेस, परंतु धोत्रें पात्रें तुजला आहेत, किंवा नाहींत ? निरंजन बोलला कीं, स्वामी कांहीं न आणितां केवळ कौपीन नेसून आलों आहें. समर्थांनीं कल्याणास आज्ञा करून त्या मुलास धोत्रें पात्रें आसन गवाळें, आणि जपास माळ देवविली आणि सांगितलें कीं, मुला स्नान करून श्रींचे देवालयांत बसून एकाग्रचित्तेंकरून श्रीमूर्तीचें विलोकनपूर्वक ध्यान कर, ह्मणजे जी आज्ञा करावयाची ती श्रीरघुवीर करितील.

अशी आज्ञा होतांच निरंजन यानें मांडगंगेचें स्नान करून संध्यादिक जाहल्यानंतर समर्थांच्या आज्ञेप्रमाणें श्रींचे सन्मुख एकाग्रचित्तें बसून ध्यान करूं लागला तों श्रीरघुपतीचें ध्यान मनांत यावें तें न येतां श्रीगणपतीचें ध्यान दिसूं लागलें. तेव्हां त्या ध्यानाचें विसर्जन करून पुनः श्रीरघुपतीचें ध्यान करीत असतां पुनः श्रीगजाननाचीच मूर्ति प्रत्यक्ष येऊन आपले अंगावर पडली कीं काय, असा त्या मुलास भास होतांच तो घाबरा होऊन स्वामीपाशीं आला. आणि साष्टांग नमस्कार करून जाहलेलें वृत्त त्यांस निवेदन केलें. तें ऐकून समर्थांनीं आज्ञा केली कीं, तुजवर श्रीगजाननाची कृपा आहे. तेच तुला कृपा करून प्रत्यक्ष अनुग्रह करतील. या गोष्टीचा संशय तिळमात्र आणूं नये. हें ऐकून निरंजनानें पुनः साष्टांग नमस्कार करून महाराज ! आपण आज्ञा करितां, हें प्रमाण. परंतु मजला प्रत्यक्ष दर्शन होऊन अनुग्रहप्रसाद कसा कोठें घडेल ? त्याजवरून समर्थांनीं आज्ञा केली कीं, कऱ्हाडक्षेत्रीं श्रीकृष्णातीरीं गणेशतीर्थ आहे तेथें श्रींचे देवालयामध्यें श्रीगजाननाची मूर्ति आहे. तिचें तुजला प्रत्यक्ष दर्शन घडेल. त्याच मूर्तीचें ध्यान, पूजन व स्मरण एकाग्रचित्तेंकरून करीत जावें. ह्मणजे तेथें प्रत्यक्ष दर्शन होऊन तुला अनुग्रहही होईल; याविषयीं चिंता करूं नये. याप्रमाणें आज्ञा करून मस्तकीं वरदहस्त ठेऊन निरंजनास निरोप दिला. तेव्हां समर्थांच्या आज्ञेप्रमाणें निरंजन नित्य गणेशतीर्थीं जाऊन दोन

प्रहरांपर्यंत स्नानसंध्यादिकर्में करून श्रीगजाननाची आराधना करीत असतां शके १५९४ माघ शुद्ध ४ चे दिवशीं प्रत्यक्ष मूर्तीचें दर्शन होऊन त्यांपासून अनुग्रहही जाहला.

भाग १५ वा.

शिवाजीस राज्याभिषेक.

नंतर कांहीं एक दिवसांनीं शिवाजी महाराज पुनः कर्नाटकचे स्वारीस जाण्याकरितां शके १५९५ चे सालीं निघाले, ते परळीस येऊन समर्थांचें दर्शन घेऊन नमस्कारपूर्वक समर्थांजवळ स्वारींत जाण्याविषयीं आज्ञा मागते जाहले. तेव्हां समर्थांनीं लौकर यश घेऊन यावें अशी आज्ञा दिल्यानंतर स्वारीस अधिक आगळे दिवस लागतील म्हणून तेथील भोजनखर्चाचा वगैरे बंदोबस्त कोंडोनारायण व सोमनाथ यांस सांगितला. नंतर राजश्रींनीं आपलेकडील कारखानदार यांस आज्ञा केली कीं, जर सोमनाथ व कोंडो नारायण व दिवाकरभट्ट गोसांवी यांची चिठी ज्या कारखान्यावर येईल त्या कारखान्यांतून चिठीप्रमाणें अवकाश न करितां जिन्नस देत जावें. आणि स्वामीचे शेवेशीं निसबतीचे शागिर्द वगैरे आहेत; त्यांचाही बंदोबस्त ठेवावा. म्हणून सांगून श्रीसमर्थांची प्रार्थना केली कीं, महाराज शरीरास वृद्धपण जाहलें आहे यास्तव आतां कृपा करून पर्यटन करूं नये.

कदाचित् करणें तरी पूर्वील पाठाप्रमाणें न करितां सरंजामासह जाणें होत असावें. कोणतेही पदार्थाविषयीं न्यूनता आहे असें नाहीं. हें ऐकून समर्थांनीं किंचित् हास्यवदन केलें. त्या कालीं पुनः राजश्रींनीं नमस्कार करून हात जोडून विनंति केली कीं, महाराज मी जी विनंति केली यांतील कारण सेव्यसेवकभाव जाणून प्रार्थना केली आहे. समर्थांनीं कृपा करून मान्य केलें पाहिजे. तेव्हां बहुत बरें आहे, बाबा तुझी मर्जी असेल तसें करूं. असें ह्मणून राजश्रींस जाण्यास आज्ञा दिली. नंतर राजश्री पांच दिवस तेथें राहून कर्नाटकांत गेले. मग तेथील राजेरजवाडे जे शरण आले त्यांजपासून खंडणी घेत घेत व ज्यांणीं बंडावा केला त्यांचें पारिपत्य करीत सोदस येथें गेले. तेथील दट्टूर वेरूळचा किल्ला बांधून तेथील अधिकार रघुनाथराव हणमंत यांस सांगून व्यंकोजी राजे यांसी तह करून एकंदर कर्नाटक प्रांताचा बंदोबस्त रघुनाथराव व हणमंते यांजकडेस सांगून चेदित सुभा करून कांहीं फौज व सरदार तेथें ठेऊन रघुनाथराव यास आपल्याबरोबर घेऊन त्या प्रांताचा बंदोबस्त केला. नंतर श्रीशैल व मल्लिकार्जुन यांचें दर्शन करून पाताळगंगा व कदलीवन इत्यादि स्थानें पाहून बहुत संतोषानें पुष्कळ दानधर्म केला, आणि सैन्यासहवर्तमान कदलीवनांत मास पक्ष राहिले असतां तेथील रम्य स्थल पाहून महाराजांनीं सर्व कारभारी मंडळीस बोलावून आज्ञा केली कीं, सर्व सैन्य व परिवार घेऊन तुह्मीं देशीं जावें. आह्मी या कदलीवनांत राहून तपश्चर्या करून आपल्या देहाचें सार्थक कर-

गार. असें बोलले तेव्हां कारभारी यांनीं प्रार्थना केली कीं, महाराज ! आजपर्यंत राज्य साधन केलें याची वाट काय ! राजश्रींनीं उत्तर केलें कीं, उभयतां पुत्र आहेत त्यांस घेऊन तुह्मी समर्थांचे आज्ञेप्रमाणें राज्य चालवावें. तेव्हां सर्व कारभारी मिळून विचार करून रघुनाथराव हणमंते यांजकडून पुनः विनंति करविली कीं, महाराज जी आपण आज्ञा कराल ती सर्वांस मान्य आहे. परंतु श्रीसमर्थ महाराज यांचे कृपेंकरून श्रीभगवतीच्या वरें जें राज्य प्राप्त झालें तें उभय कृपेंकरून पुढेंही चालेल यांत संशय नाहीं. परंतु माता, पिता, हीं उभयतां जिवंत असतां काशी क्षेत्रास जाणें तरी त्यांस घेऊन जावें त्यांचा त्याग न करितां सेवा केली ह्मणजे काशी यात्रेस गेल्याचें फळ प्राप्त होतें.

अशा विषयीं जो शास्त्राचा नियम आहे, त्याचा विचार करून आपण परमार्थ साधनांस प्रवृत्त व्हावें. जें परमार्थापासून आपणास प्राप्त व्हावयाचें तें प्रत्यक्ष असतां त्याची सेवा न करितां त्याचा त्याग करून आपण परमार्थ करणार हा धर्म कोण ? यास्तव त्याचा विचार करून देशीं जाऊन समर्थांची सेवा केली असतां परमार्थ करणार त्यापेक्षां कोटिगुणें फळ प्राप्त होईल हेंही आपल्यास कळतच आहे. आह्मीं सांगावें असा अर्थ नाहीं. आपण येथें राहून तपश्चर्या करणार हा धर्म कोण व यास काय ह्मणावें? राजश्रींनीं उत्तर दिलें कीं, आपण बोलतां हें सर्व प्रमाण आहे. समर्थ सर्वांतर्गत आहेत त्यांचे इच्छेंकरूनच आह्मांसही स्मृति होऊन त्यांत ही वासना उत्पन्न झाली आहे. तेव्हां रघुनाथराव

यांनीं पुनः विनंति केली कीं, महाराज आपण बोलतां हें प्रमाण आहे. समर्थ सर्वांतर्यामी आहेत तेच माझे अंतःकरणप्रवर्तक होऊन बोलवितात व आपलेही अंतःकरणीं प्रवर्तक होऊन तेच बोलवीत आहेत, परंतु त्यांत बहुमत ती ईश्वर आज्ञा व एक मत तीही ईश्वर आज्ञाच होय. यास्तव मी विनंति करीत आहें ती बहुमतेंकरून करीत आहें. आपण आज्ञा करीत आहां ती एक मतें करून करीत आहां यास्तव बहुमतास अनुकूळ होऊन देशीं जाऊन समर्थास विनंति करावी. समर्थ आज्ञा करतील त्याप्रमाणें करावें. तेव्हां राजश्री बोलले कीं, राव आपण धन्य आहां आपण बोललां हें प्रमाण. परंतु समर्थ येथें नाहींत कीं काय ? देशीं याव-याचें कारण काय आहे ? याच क्षणीं समर्थांची प्रार्थना केली असतां प्रगट होऊन आज्ञा करतील त्याप्रमाणें तुह्मीं व आह्मीं वागूं. रघुनाथराव यांणीं विनंति केली कीं, महाराज समर्थ प्रगट होणें हें आमचे स्वाधीन नसून आपले स्वाधीन आहे. आपण आमचे मुखद्वारें करून प्रार्थना केली असतां समर्थ प्रगट होतील किंवा न होतील नकळे. याजकरितां समर्थांचे आज्ञेप्रमाणें आपण श्रीदेवीची प्रार्थना केली असतां श्रीदेवी आपले आंगीं संचार करील तेव्हां आह्मीं सर्व प्रार्थना करून विचारूं आणि श्रीदेवीची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें आपण व आह्मीं सर्वांनीं वागावें. राजश्री बोलले कीं, ठीक आहे सर्वांची गांठ पडावी. परंतु बाळमित्राची गांठ पडूं नये. त्यांत तुह्मीं वडील शहाजी महाराज यांचे हस्तकचे तेव्हां आपलें बोलणें मान्य केलेंच पाहिजे.

नाहीं तर समर्थांपर्यंत आमचा बोभाट जाणार. यास्तव तुह्मीं म्हणतां तसें करूं. असें राजश्री म्हणतांच सभा विसर्जन झाली.

दुसरे दिवशीं महाराजांनीं स्नान करून नित्यनेमाप्रमाणें शिवपूजा व पादुकापूजा केली, नंतर देवघरचे राहोटींत हनमंते, व बाळाजी आवाजी लिहिणार व दत्तो मंगाजी व गंगो मंगाजी हे विचारणार इतके महाराजांसह बसले. आणि श्रीदेवीची प्रार्थना केली त्याबरोबर शिवाजीमहाराजांचे अंगीं देवीचा संचार जाहला. नंतर हनमंते यांणीं प्रार्थना करावयास सांगितल्यावरून दत्तोमंगाजी विचारणारानें प्रार्थना केली कीं, आईसाहेब ! आमचे महाराज सर्व त्याग करून तपश्चर्या करणार, याविषयीं आज्ञा झाली पाहिजे. हें ऐकून देवी बोलली कीं, शिवबानें पूर्वजन्मीं तपश्चर्या केली आहे तिचें फळ हल्लीं प्राप्त झालेंच आहे. मागील जन्मीं यांणीं श्रीभागीरथीच्या २७ कावडी श्रीरामेश्वरास अभिषेक केला होता. इतःपर पारमार्थिक सुद्धां होईल, कारण याचें कल्याण करण्याकरितांच रामदास स्वामींचा अवतार आहे, यास्तव परमार्थाविषयीं याजला काळजी करणें नको, आजपर्यंत यानें राज्य साधन मात्र केलें, परंतु सिंहासनारूढ होऊन राज्याभिषेक झाला नाहीं, याजकरितां देशीं जाऊन समर्थांच्या विचारानें सिंहासनारूढ व्हावें, म्हणजे याचा शक २६ पुरुष पर्यंत मिळोन १००० वर्षे चालेल. २७ वा पुरुष अन्मांध होऊन राज्य जाईल परंतु शक चालेल. असा वर यांचे पूर्वज मालोजी यांस दिला आहे नंतर पुनः विनंति केली कीं, राजश्रीस पुत्र दोन आहेत यांतून राज्याचे उपयोगीं कोण आहे?

त्याजवर आज्ञा झाली कीं, शिवाजीच्या मागें संभाजी थोडे दिवस राज्य करून वर्ष सणाच्या योगें त्याचा नाश होईल. त्याचे मागें राजारामही कांहीं दिवस राज्य चालवील. पुढें संभाजीचा पुत्र शिव नामा जो तो चाळीस वर्षे राज्य करील. पुढें कांहीं दिवस नामेंकरून राज्य चालेल व कांहीं पुरुष स्वतः राज्य करतील आणि शक चालेल. याप्रमाणें आज्ञा शके १५९५ चैत्र वद्य १३ स श्रीकृष्णातीरीं कर्दळीवनांत जाहली, ती बाळाजी आबाजी यांणीं लिहून ठेविली. नंतर देवीचा संचार महाराजांचे आंगांतून गेल्यावर लिहिलेलें राजश्रीनीं वाचून पाहून बहुत बरें, आज्ञा प्रमाण. म्हणून कर्नाटकचे बंदोबस्ताकरितां रघुनाथराव, हणमंत व हरजी महाडीक जात होते त्यांजपाशीं फौज देऊन सरदारीवस्त्रें देऊन ठेविले आणि आपण तेथून कुच करून कर्दळी वनांतून निघाले ते मजला चालत स्वारीसुद्धां चाफळ मुक्कामीं गुरु-दर्शनास आले. आणि समर्थ कोठें आहेत याचा शोध करून तेथें समर्थांचें दर्शन घेऊन मोठ्या समारंभानें आणिलेले अनेक पदार्थ अर्पणपूर्वक पूजा केली आणि पंधरा दिवस तेथें राहून स्वारींतील सविस्तर वर्तमान निवेदन केलें ते समयीं रघुनाथराव हणमंतराव यांणीं कर्दळीवनांतील देवीच्या आज्ञेचा प्रकार समर्थांस निवेदन केला असतां समर्थांनीं आज्ञा केली कीं, गंगाशास्त्री पैठणास गेले आहेत त्यांस आणवून त्यांच्या विचारें राज्याभिषेकाची तयारी करावी. तेव्हां सर्व फौज पुणें मुक्कामीं पाठवून देऊन नंतर आपण स्वतः निरोप घेऊन सर्व मंडळी सुद्धां राजश्री स्वारीनिशीं प्र-

तापगडास गेले आणि तेथें श्रीदेवीचें दर्शन घेऊन रायगडास आले. तेथें येऊन समर्थांच्या आज्ञेप्रमाणें बाळाजी आबाजी चिटणीस यांचे आश्रित सोमेश्वर भट्टजी व भालचंद्रभट्टजी पुरोहित या दोघांस पालखी वगैरे सरंजाम बरोबर देऊन गंगाशास्त्री यांस आणावयास पाठविलें. त्यांनीं पैठणास जाऊन गंगाशास्त्री यांस विनंति केली कीं, समर्थांच्या आज्ञेवरून महाराजांनीं आपणाकडेस आह्मास पाठविलें आहे त्यास अपण लौकर चलावें, असें सांगितलें. हें ऐकून शास्त्रीबावा पैठणाहून निघाले ते त्वरेनें रायगडीं आले. नंतर महाराजांनीं सामोरें जाऊन मोठ्या समारंभानें शास्त्रीबावांस घरीं आणलें.

राजश्रींच्या मनांत प्रथम समर्थांस राज्याचीं चिन्हें समर्पण करून अभिषेक करावा, नंतर समर्थआज्ञेंकरून आपण सिंहासनारूढ व्हावें ह्मणून समर्थांकडे जाऊन साष्टांग नमस्कार करून हात जोडून विनंती केली कीं, महाराज कांहीं मागणें मागतों तें समर्थांनीं कृपा करून दिलें पाहिजे. समर्थ बोलले कीं, मागावें. त्याजवर पुन्हा राजश्रीनीं विनंति केली कीं, महाराज ! अभय दिल्यास विनंती करून मागतों. त्याजवरून समर्थ बोलले कीं, मागावें; महाराज ह्मणाले मागितल्यानंतर नाहीं हें होऊं नये. समर्थ बोलले कीं, बाबा असें अवघड काय मागणें आहे ? राजश्रीनीं विनंती केली कीं, समर्थांनीं कृपा करून दिल्यास अवघड कांहींच नाहीं. समर्थ बोलले कीं, बरें मागा आह्मी देऊं. त्याजवरून राजश्रीनीं विनंती केली कीं, महाराज कृपा करून दिल्हें त्या

अर्थी जटाभार उतरावा. हेंच देणें द्यावें. म्हणतांच शिवबा हें काय मागणें मागितलेंस व्रताचे नेमांत अंतर करावा हा धर्म कोण? राजश्रीनीं विनंती केली कीं, माहाराज अशा अनेक प्रकारच्या युक्ती काढून मजला ठकऊं नये, भक्तांनीं देवापासून आपल्यास इच्छित तें मागावें व देवांनीं भक्ताचे मनांतील हेतु पूर्ण करावे, हा धर्म होय. याजकरितां स्वामीनीं कृपा करून मजला एवढें देणें दिलेंच पाहिजे. म्हणून राजश्रीनीं बहुत प्रकारें विनंती केली. त्याजवरून तुझी मर्जी म्हणून स्वामीची आज्ञा झाल्यावरून राजश्रीनीं बहुत समारंभेंकरून जटाभार उतरून समर्थांस विधिपुरःसर मंगळ स्नान घालून सर्व राज्य चिन्हें अर्पण करून ब्राह्मणभोजनाचा बहुत समारंभ केला. दान धर्म ही बहुत केला. कांहीं दिवस राहून आज्ञा घेऊन निघाले, ते समयीं समर्थांची आज्ञा झाली कीं, आतां कोणे गोष्टीविषयीं संशय मनांत न आणितां शास्त्रीबावांचे विचारें कार्य शेवटास न्यावें. राजश्रीनीं आज्ञा म्हणून निरोप घेऊन गेले.

इकडे कोणे एके समयीं समर्थ चाफळीं असतां रात्रौ नित्य नेमपंचार्ति होऊन श्रीची शेजार्ति जाहल्यानंतर समर्थ निद्रास्थानीं बिछान्यावर जाऊन बसले. जवळ उद्धव व कल्याण आदीकरून पांचचार मंडळी आहेत. तों अकस्मात पांच पन्नांस चोरटे आले म्हणून हाकाटी झाली. ती ऐकून कल्याण गोसांवी गडबडोन उठले आणि कांहीं मंडळी बरच्या, भाले वगैरे हत्यारें

घेऊन तयार झाली तें पाहून समर्थांनीं विचारिलें कीं, तुह्मीं इतके गडबडीनें हत्यारें घेऊन तयार कां जाहलां? व कोठें जातां? तेव्हां कल्याण गोसावी यांणीं विनंति केली कीं, महाराज चोर आले आहित. त्यांचे निवारणार्थ तयारी करून जात आहों. तेव्हां समर्थ ह्मणाले अरे ते आमचें काय नेतात. कल्याण गोसांवी ह्मणाले मठांतील विषय नेणार तोच आमचा विषय. समर्थ बोलले कीं, हा विषय तुमचाही नाहीं व आमचाही नाहीं, श्रीरघुपतीचें भांडारघर आहे. याजकरितां तुह्मीं गडबड करूं नये. तेव्हां सर्व ह्मणाले महाराज, आपण ह्मणतां हें प्रमाण, परंतु चोरांस कसें नेऊं द्यावें. समर्थ बोलले कीं, चोर लोकांचे आणि तुह्मीं मात्र देवांचे असा अर्थ नाहीं. तेही श्रीरघुपतीचे घरचेच होत. तस्मात् तुह्मीं गडबड कराल तर तुह्मास शपथ आहे. तेव्हां समर्थ आज्ञेवरून सर्वत्र मंडळी स्तब्ध राहिली. नंतर चोरांनीं मठांत शिरून पाहिजे तितका विषय घेऊन, मोटा बांधूं लागले. त्यांजला समर्थांनीं सांगितलें कीं, गडबड करूं नका. हेंही चोरांनीं ऐकून सावकाशपणें मोटा बांधून मठाच्या दक्षिणेकडून निघोन जांभळीचे वावरांतून गेले.

नंतर कल्याण गोसावी यांणीं समर्थांस साष्टांग नमस्कार करून विनंति केली कीं, महाराज जी आज्ञा होईल ती प्रमाण; परंतु शपथ घातली यांत अन्याय झाला. स्वामी बोलले कीं, बाबा अन्याय तो कसा झाला तें मला सांग. तेव्हां कल्याण गोसावी बोलले, देवाचा धर्म न्यायें करून व्हावा तो न होतां तस्करांनीं

नेला. यांत धर्म तो काय झाला. समर्थ झणाले बाबा येथें जरी खर्च झाला तरी उदरनिर्वाहासच खर्च होणारा व त्यांणीं नेला तरीही उदरनिर्वाहासच खर्च करतील. ईश्वराचे घरीं जीव सर्वही सारखेच आहेत. कल्याण बोलले महाराज, जीव सर्व सारखे खरे परंतु याबद्दल जें बोलणें आहे तें आपल्याशीं कसें बोलूं ? तेव्हां समर्थ बोलले कीं, बाबा जें बोलावयाचें असेल तें बोल. तेव्हां कल्याण बोलले महाराज ! सर्व भूतांचे ठाईं आत्मा एकच होय. असें आपण झणतां तर आपणासारखे मानव यांची योग्यता आणि जीवकर्माधीन पापपुण्याच्या योगें स्वर्ग नरक भोगणारे जे जीव त्यांची योग्यता एक कसी होईल ? झणून ईश्वरांनीं एक धर्म केला नाहीं तर मृत्युलोकीं मानवांनीं स्वधर्मे करून चालावें अशी वेदांची आज्ञा व आपलीही आज्ञा असतां चोरांस मारूं नका आणि विषयही घेऊं नका झणून आज्ञा होते यास मी कसें करूं. हें समर्थांनीं ऐकून हासून बोलले कीं, बाबा, मला बरेंच अडविलेंस. परंतु सर्व भूतांचे ठायीं भेद मानून त्रास द्यावा आणि विरोध करावा असें तरी कोठें आहे ? तेव्हां कल्याण गोसांवी झणाले महाराज आज्ञा होते ही प्रमाण.

परंतु विधी आणि अविधी हे धर्म कोणी केले ? त्यानंतर समर्थ हांसून बोलले कीं, बाबा तुझे मर्जीस येईल तसें कर. परंतु त्या चोरांस त्रास मात्र देऊं नकोस, व त्यांजला मारूं नकोस. आज्ञा झणून कल्याण गोसावी एकटेच निघोन बाहेर येऊन जांभळीची लहानशी फांदी मोडून घेऊन चोरांमागें जाऊन

त्यांजला हाक मारिली. त्या हाकेसरसे ते चोर गर्भगळीत झाले आणि उभे राहिले तों कल्याण गोसावी यांणीं त्यांजला धोंडोबाच्या माळाखालीं अडविलें. तेव्हां त्यांजला जशीं गुरें वळतात याप्रमाणें वळवून आणून त्यांसभोवतें मंडळ ओढिलें आणि सांगितलें कीं, या मंडळाबाहेर निघालां तर जिवें मारीन. याप्रमाणें ओरडून मोठ्यानें मठांतील मंडळीस हाक मारिली कीं, माणसें घेऊन ओझीं न्यावयास लौकर यावें. त्याजवरून मंडळी धांवत आली. त्यांजपाशीं ओझीं देऊन त्या चोरांचीं सर्व हत्यारें कल्याण गोसावी यांणीं जमा करून घेऊन मठांत आणलीं. हत्यारें निराळीं व ओझीं निराळीं ठेऊन आपण स्नान करून येऊन स्वामींस साष्टांग नमस्कार केला. तेव्हां स्वामींनीं विचारिलें कीं, बाबा त्या चोरांस मारलेंस कीं काय ? कल्याण बोलले महाराज त्यांजला मी मारिलें नाहीं. परंतु माळावर उभे केले आहेत. बरें ह्मणून समर्थ हांसले. इकडे कल्याण गोसावी मठाकडे जातांच चोर मंडळाचे बाहेर येतांच त्यांजला दिसेनासें झालें. तेणें करून सूर्योदयपर्यंत ते तेथेंच उभे राहिले होते. हें वर्तमान सूर्योदयानंतर स्वामीस कळल्यावर त्यांना बोलावून आणलें, तेव्हां त्या चोरांनीं येऊन समर्थांस दंडप्राय भूमीवर पडून प्रणाम केला. आणि हात जोडून ह्मणाले महाराज, आह्मीं अपराधी आहों. पोटासाठीं चोरी करितों, हें ऐकून समर्थ बोलले कीं, तुह्मीं भिऊं नका; स्वस्थ असा. याप्रमाणें त्यांजला सांगून कल्याण गोसावी

यास आज्ञा केली कीं, यांजला जेवावयास घालावयाचें आहे. याजकरितां स्वयंपाक जलदीनें करवावा; असें सांगून आपण स्नान केलें, आणि मठाची शुद्धता केली तों पाकही सिद्ध झाला. समर्थांचा पूजाविधी होऊन श्रीरघुपतीस नैवेद्य समर्पण करून भोजनोत्तर त्या चोरांस आपण जवळ बसोन भोजनास घालविलें. नंतर त्यांजला वस्त्रें पात्रें देऊं लागले. ते समयीं त्यांणीं विनंति केली कीं, महाराज आपले दर्शनें करून पवित्र झालों. सांप्रत कृपा करून जशी आमची बुद्धि आहे, तशी सतत राहील अशी कृपा करणार समर्थ आहेत.

त्याजवरून समर्थ बोलले कीं, इच्छेप्रमाणेंच घडेल. नंतर त्यांचीं हत्यारें वगैरे जें कल्याण गोसावी यानीं आणलें होतें तें त्यांचें त्यांस देऊन शिवाय समर्थांनीं वस्त्रें पात्रें देऊन निरोप दिला. हें चरित्र शके १५९५ वांत झालें.

पुढें समर्थ परळीस असतां त्यांणीं एक मांजरबोका बाळगला होता, त्याजला नित्य भोजनसमयीं दहींभात व दूध भात घालीत व त्याजला पाणी पाजावयास वाटी केली होती. त्यांत पाणी घालीत; याप्रमाणें त्याचें भोजन झालें म्हणजे रामा तूं तृप्त झालास काय ? असें विचारून मग आपण भोजनास आरंभ करीत. याप्रमाणें करीत असतां त्या बोक्यानें मठांत दुभत्यास फारच उपद्रव दिला. तेव्हां कोणे एके दिवशीं शागिर्द मंडळीपैकीं एकानें त्याजला धरून त्याचे डोळ्यांत तिखट भरलें, त्या दुःखेंकरून तो बोका घाबरा होऊन तळमळ करीत लपून बसला. समर्थांची

स्नानसंध्यादि पूजा होऊन नैवेद्य समर्पण झाल्यानंतर भोजन-समयीं आमचे रामास बोलवा म्हणून आज्ञा झाली. त्याजवरून शोध केला असतांही तो सांपडेना. तेव्हां मंडळींनीं विनंति केली महाराज बोका सांपडत नाहीं. त्यावर समर्थ बोलले कीं, त्याजला कोणी तरी कांहीं उपद्रव दिल्यामुळें तो आला नाहीं. तो आल्या-वांचून आम्हीं भोजन करणार नाहीं; तो आमचे पंक्तीचा बारगीर होय. याजकरितां त्याचा शोध करून घेऊन यावें. त्यावरून किल्ल्यावरील सर्व घरीं शोध केला, तेव्हां तो सांपडला. त्याजला घेऊन आले तों त्याचे डोळे तांबडे झाले आहेत व डोळ्यांतून पाणीही गळत आहे, हें पाहून रामा तुजला कोणी काय उपद्रव दिला ? तूं कां रडतोस, म्हणून आंगावरून हात फिरवून नित्य पाठाप्रमाणें भात घातला असतां तो खाईना. तेव्हां समर्थांनीं प्रत्येक असामीस युक्तीनें विचारिलें. त्यांस एकानें सांगितलें कीं, महाराज, यानें मठांतील दुभत्यास फार उपद्रव दिला म्हणून एकानें याचे डोळ्यांत तिखट घातलें, तेव्हां समर्थ सर्वांस बोलले कीं, तुम्ही सर्व खाणार आणि हा चोर आहे कीं काय ? हाही रघुपतीचाच जीव आहे, म्हणून तूप त्याचे डोळ्यांस आपले हातें लावून त्याजला जेवावयास घालून नंतर आपण भोजन केलें.

यानंतर शके १५९६ आनंद नाम संवत्सरीं ज्येष्ठ शुद्ध १३ मंदवारीं शास्त्रविधीप्रमाणें शास्त्रीबोवांचे विचारें मुंजीचा विधि करून राजश्री सिंहासनारूढ झाले. दानधर्म बहुत केला. त्या दिव-सापासून राजशक चालू झाला. राज्याभिषेकाचा सर्व समारंभ

रायगडीं झाल्यानंतर राजश्री समर्थांचे दर्शनाकरितां निघाले; बरोबर उभयतां पुत्र व कुटुंब घेऊन अष्टप्रधानांसहवर्तमान परळीस आले. बहुत समारंभेंकरून समर्थांचें दर्शन घेऊन पूजा केली. दानधर्म बहुत केला. महाराज समर्थांदेखत आपण राजचिन्हें बाळगीत नसत. कारण समर्थांस पूर्वी राज्यचिन्हें अर्पण केलीं होतीं.

रामचंद्र निळकंठ अमात्य यांजकडे समर्थांचे संस्थानाच्या खर्चाचा बंदोबस्त दिला व कोठी, पागा, पीलखाना आदि करून सर्व खर्चाचा बंदोबस्त बाळाजी अबाजी चिटणीस यांजकडे सांगून अण्णादत्तो यांणीं सर्वकाळ समर्थांची स्वारी बाहेर निघेल तेव्हां बातमी ठेऊन स्वारीचा बंदोबस्त राखावा, वाकनिशीचे कामावर पूर्वी दत्तो मंगाजी वाकनिस याजकडील कारकून कोंडो नारायण ठेविला होता, त्यासच त्या कामावर कायम ठेविला. प्रधान यांणीं स्वतां नेमणुकीचीं कामें व राजश्रींचे स्वारीचा बंदोबस्त ठेवावा. मुख्य प्रधान मोरो पंडित यांणी कीर्तन समाप्तीनंतर खिरापत वांटावी. परंतु नवमीचे दिवशीं मात्र मठाचे कारभारी यांजला बरोबर घेऊन वांटावी.

रामचंद्र पंडित अमात्य यांणीं ब्राह्मणभोजनसमयीं ब्राह्मणांची पूजा करावी. सभेचे समयीं समर्थांचे बैठकीची तयारी करावी व राजश्रींनीं समर्थ सभेस येऊन बसले क्षणजे मोर्चल घेऊन उजवे बाजूस उभें रहावें आणि रामचंद्र पंडित यांणीं डावे

बाजूस मोर्चल घेऊन उभें राहावें. व शागिर्द पैसा यांची व्यवस्था ठेवावी. अण्णाजी पंडित सचीव यांणीं ब्राह्मणांस भोजनदक्षणा द्यावी व पत्रावळी काढून सडासंमार्जन करावें व आरतीचे समयीं छबिन्याची सर्व तयारी करावी व कीर्तनाची बैठक घालवावी. दत्तो पंडित मंत्री याणी कीर्तनांत बुका लावावा, वाढपे यांचा बंदोबस्त ठेवावा व नित्य दिनचर्येची बातमी राजश्रींस कोंडो नारायण यांणीं लिहून पाठवावी. जनार्दन पंडित सुमंत यांणीं ब्राह्मणास विडे द्यावे.

बाळाजी पंडित न्यायाधीश याणीं पाक शाळेंतील सडा संमार्जन करवावें व पाणके यांचा बंदोबस्त ठेवावा. रघुनाथराव पंडितराव याणीं शूद्र व ब्राह्मण समर्थांचे दर्शनास येतील त्यांचा अति आदर राखावा. व जी संभावना करणें ती मठाचे कारभारी यांचे विचारें करावी. सेनापती हंबीरराव मोहिते यांणीं छबिन्याबरोबर दारूचा बंदोबस्त ठेवावा व समर्थ कीर्तनांत येऊन बसले असतां राजश्री नसल्यास उजवे बाजूस उभें राहून पंखा वारावा व डावे बाजूस प्रतापराव गुजर परळीकर यांणीं पंखा वारावा. व मुरारजी व महादजी खासनवीस यांणीं श्रीरघुपतीचे व समर्थांचे पोशाक जवाहीर वगैरे ठेवणें व आणून देणें हें काम त्यांणीं करावें. संस्थानसंबंधीं जमाखर्चाची व्यवस्था श्रीसमर्थांचे व राजश्रींचे आज्ञेप्रमाणें बाळाजी आबाजी चिटणवीस यांणीं पहावी. राजश्रीनीं पहांटेस उठोन मठाचें सडा संमार्जन आंगीं करावें. व नेमून दिल्हेलीं कामें व्यवस्थेनें होतात कीं नाहीं, याची चौकशी पाहून

बंदोबस्त ठेवावा. व छबिन्याची तयारी झाली ह्मणजे ती तयारी पाहून आरतीचे मागें चालावें. रथाचे दिवशीं सोन्याची काठी घेऊन रथापुढें उजवे बाजूस रामचंद्र पंडीत अमात्य याणीं चालावें व समर्थ कितनांत बसले नसतील तेव्हां गोसांवी यांचे मागें उभें रहावें. शिवाजी राजे यांणीं जें पद केलें तें नेहमीं ळळीतसमयीं ह्मणावें ह्मणून समर्थांची आज्ञा झाली. त्या प्रमाणें तें पद ह्मणाव याचा पाठ अद्यापि आहे. तें पदः—

॥ पद. ॥

महाराज गरीब नवाज, अजि हो महाराज गरीबनवाज ॥ धृ० ॥ सेवकहोकर सेवा मांगो, इतना साहेबकाज ॥ १ ॥
बंदाकमिन हीनमे साहेब, रखो मेरी लाज ॥ २ ॥
छत्रपती तुम शेकदार शिव, राखे हमारी लाज ॥ ३ ॥

या प्रमाणें केलेला सर्व बंदोबस्त राजश्रीनीं समर्थांच्या चरणापाशीं निवेदन करून आज्ञा घेऊन कुटुंब व स्वारीसुद्धां रायगडास निघून गेले.

कोणे ऐके समयीं स्वामी परळीस असतां कपिलाषष्ठीची पर्वणी प्राप्त जाहली ह्मणून खाशांनिशीं व समर्थ एकाएकीं निघून माहुली संगमीं स्नानास गेले. तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं पाहून स्नानासमयीं समर्थांस संकल्प सांगितला. मग समर्थ स्नान करून ब्रह्मयज्ञादिक नित्यकर्म जाहल्यानंतर जाण्यास निघाले, तों ब्राह्मण बोलले कीं, आपण थोर समर्थ असून राजगुरु आहां. यास्तव आ-

ह्मास आज दक्षिणा द्यावी; कारण आज मोठी पर्वणी आहे. हें ऐकतांच समर्थांनीं वाळवंटांतील गोटे घेऊन शें पन्नास ब्राह्मण होते त्यांस एक एक देऊन परळीस निघून गेले. तेव्हां मागें ब्राह्मण बोलूं लागले कीं, हे थोर समर्थ, जगविख्यात व कीर्तिमान् त्यांत राजगुरु ह्मणून सर्वांनीं येऊन संकल्प सांगितला असून त्यांनीं आह्मास दक्षिणा ह्मणून दगड दिले. यांस काय ह्मणावें ! याप्रमाणें बोलून सर्वांनीं ते दगड टाकून दिले.

त्यांतील एक ब्राह्मण भावार्थी होता त्याणें मनांत आणिलें कीं, समर्थ थोर आहेत. त्यांच्या हातचा दगड साधारण नव्हे, तर शालिग्रामातुल्य आहे. यास्तव हा देव्हाऱ्यांत ठेऊन त्याची पूजा करूं ह्मणून अंगवस्त्राचे पदरीं बांधून ठेविला. आणि दोन-प्रहरपावेतों पर्वणीच्या लोकांस संकल्प सांगून ब्राह्मण आपले घरीं भोजनास आला. (ज्याच्या पदरीं दगड बांधिला होता तें अंगवस्त्र विसरून धुण्यांत टाकलें, तेव्हां बायकोनें धुणें नेतेसमयीं अंगवस्त्राचे पदरीं काय आहे. ह्मणून सोडून पाहिलें तों सुवर्णाचा गोळा पाहिला.) नंतर भट्टजीनीं भोजन करून निद्रा केली होती त्यांस उठवून बायकोनें तो गोळा दाखविला. मग भट्टजीनें मोठ्या आश्चर्यानें तो गोळा हातीं घेऊन बाहेर येऊन समस्त ब्राह्मणांस दाखविला. आणि बोलला कीं, स्वामीसमर्थ यांणीं दगड दिला, ह्मणून तुह्मीं सर्वांनीं दुर्भाषणें करून आपआपले दगड टाकिले. मी त्याची पूजा करावी

अशाबुद्धीनें पदरीं बांधून आणिला, तोहा सुवर्णाचा जाहला. हें सर्वत्रांनीं पाहून रामदासस्वामी साक्षात् मारुतीचा अवतार, त्यांनीं आह्मास प्रसाद दिला असतां आह्मी दुर्दैवी ! यास्तव दगड ह्मणून त्याचा त्याग केला, हें अयोग्य झालें. अशा पश्चात्तापानें उद्यां आपण सर्व स्वामीकडे जाऊं. असा सर्वांनीं निश्चय केला.

दुसरे दिवशीं समस्त ब्राह्मण मिळून परळीस आले आणि परवानगी लावून किल्लचावर दर्शनास गेले, तेसमयीं स्वामीनीं सर्वत्रांस पुसलें कीं, आपलें कां येणें जाहलें. तेव्हां ब्राह्मण बोलले कीं, महाराज, आपण कृपा करून जो प्रसाद दिला होता; त्याचा दुर्दैवयोगें आह्मी त्याग केला. यास्तव स्वामींनीं कृपा करून आमचे गुणदोष न पाहतां पुनः प्रसाद द्यावा. तेव्हां स्वामी बोलले कीं, बाबाहो, त्यासमयीं जें जाहलें, तें श्रीरघुपतीनें केलें. तो समय कृष्णासंगमीं होता, येथें कोठें आहे. यास्तव आपण कृपा करून घरास जावें, हें ऐकून ब्राह्मण बहुत आग्रह करून बोलले कीं,स्वामी! आपण कृपा केल्याव्यतिरिक्त जावयाचें नाहीं. मग स्वामीनीं ब्राह्मणांचा आग्रह पाहून हास्य करून सर्वांस भोजनास उठविलें. आणि सर्वत्रांचीं भोजनें जाहल्यानंतर समर्थांनीं प्रार्थना केली कीं, तुह्मी साक्षात् भूदेव तुमचे मनोरथ पूर्ण करावयाचें सामर्थ्य कोणास आहे? कारण तुमच्या आशीर्वादेंकरून सर्व फल प्राप्त होतें. तुमची इच्छाच असेल तर जातानां

उर्वशी नदींतून मुठींत मावतील इतके दगड घेऊन जावें. ह्मणजे श्रीरघुपती तुमचे मनोरथ पूर्ण करील. याप्रमाणें ब्राह्मणांस निरोप देऊन आपण डोंगरांत गेले. तेव्हां ब्राह्मणांनीं स्वामींचे वचनावर विश्वास धरून उर्वशी नदींतील मुठींत मावेल असा एकेक दगड घेऊन पदरीं बांधून माहुलीस गेले, आणि घरीं जाऊन पाहतात, तों ते दगड सुवर्णाचे जाहले, तेव्हां समस्त ब्राह्मण एकमेकांस दाखवीत असतां परम आश्चर्य करून, हे स्वामी साक्षात् मारुतीच आहेत, याप्रमाणें बोलून अत्यंत संतोष पावले.

भाग १६ वा.

श्रेष्ठांचें निजधामाप्रत गमन.

समर्थांचे श्रेष्ठ बंधु गंगातीरीं राहून जगदुद्धार करीत असतां कोणेएके दिवशीं शिवळी प्रांतांतील अधिकारी श्रेष्ठांचे शिष्य होते त्यांचे घरीं लग्न समारंभ प्राप्त जाहला असतां श्रेष्ठांस लग्नाकरितां बोलावून ज्यावें ह्मणून जांबेस येऊन त्यानीं विनंति केली. त्यावरून श्रेष्ठांनीं सांगितलें कीं, मुलांबाळांस घेऊन जावें, आमचें येणें होत नाहीं. तेव्हां आपण आल्यावांचून लग्न व्हावयाचें नाहीं, असा त्यांचा अति आग्रह पाहून निरुपाय होऊन श्रेष्ठांनीं येण्याचें मान्य करून श्लोक ह्मटला तो असाः-

॥ श्लोक ॥

कळेनापुढेंकायहोणारआहे ॥ कळेनादेहकोठपर्यंतराहे ॥
कळेनामरावें स्वदेशींविदेशीं ॥ कळेनापुढेंवेळयेईलकैशी ॥१॥

असें ह्मणून तयारी करून श्रेष्ठ लग्नास निघाले ते तेथें जाऊन लग्न जाहल्यानंतर निरोप घेऊन मंडळीसहवर्तमान परत निघाले, ते मौजे दहिफळवुद्रुख परगणें शिवळी येथें दोन प्रहरां मुक्कामास आले. तेव्हां रथावरून उतरून समस्तांस सांगितलें कीं, स्नान संध्या करून लौकर आटोपून घ्यावें, हें ऐकून सर्व ह्मणाले कीं, महाराज ! कां लौकर आटोपा ह्मणतां? अशी प्रार्थना केल्यावर श्रेष्ठांनीं मग सांगूं ह्मणून आज्ञा केली. त्याप्रमाणें सर्वांचीं भोजनें जाहल्यानंतर सर्वांस बोलावून भजनांस प्रारंभ केला. तेव्हां चिरंजीव रामचंद्र बावास बोलावून श्रेष्ठांनीं सांगितलें कीं, आह्मी आतां निजधामाप्रत जातों. असें ऐकतांच रामचंद्रबावा अति दुःख करूं लागले. त्याकाळीं श्रेष्ठ ह्मणाले कीं, आजपर्यंत आह्मापाशीं राहून शोक करावयाचें अद्यापि तुह्मां जवळ आहे कीं, काय ? असें ह्मणून बहुत प्रकारें शोक निवारणाच्या गोष्टी सांगून त्याचें समाधान केलें. आणि उपासना वाढवीत असतां समर्थ तुमच्यावर छत्र आहेत त्यांच्या आज्ञेंत वर्तावें, आणि उपासनेंत अंतर करूं नये. याप्रमाणें रामचंद्रबावांस आज्ञा करून सकळ मंडळीस विचारून हरहर शब्द करीत असतां, राम असें ह्मणून शके १५९९ पिंगल नाम संवत्सरीं फाल्गूनवद्य त्रयोदशी सह १४ दोन प्रहरीं श्रेष्ठ परधामास गेले.

नंतर सर्व मंडळीनीं मोठ्या समारंभानें दहनादिविधि रामचंद्र बावा यांचे हातून करविला. दुसरे दिवशीं जांबेस पत्र पाठविलें; तें पावतांच बाई व श्यामजी बावा हे दोघे दहींफळास आले. तेव्हां बाई बहुत शोक करूं लागली असतां सर्वांनीं बहुतप्रकारें तिचें समाधान केलें. परंतु बाईनीं पतीबरोबर परलोकास जावें असा निश्चय करून अमावास्येचे दिवशीं दीर्घस्वरानें रामशब्दोच्चार करून देह विसर्जन केला. नंतर रामचंद्रबावा व श्यामजी बावा यांणीं तेथें राहून पुत्रधर्म केला आणि त्यास्थळीं वृंदावन बांधून पूजेस ब्राह्मण ठेवून खर्चाची व्यवस्था शेवलीकर देशमुख यांजकडे सांगून सर्व जांबेस आले. त्याकाळीं रामचंद्रबावा यांचें वय १६ वर्षांचें व कनिष्ठ बंधु श्यामजीबावा यांचें वय १० वर्षांचें होतें.

उभयतां बंधु श्रेष्ठांचे आज्ञेप्रमाणें चालत असून समर्थांस विनंतिपत्र पाठविणार तों इकडे समर्थ चाफळीं असतां फाल्गूनवद्य १३ चे दिवशीं स्नानसंध्या करून दोनप्रहरपर्यंत कीर्तन करून कल्याण व उद्धव गोसांवीप्रभृति मंडळीस बरोबर घेऊन स्नानास निघाले. तेव्हां सर्वांनीं आश्चर्य मानून आज या वेळेस स्नानास जाण्याचें कारण काय? म्हणून विनंति केली असतां आज श्रेष्ठ परधामास गेले. आमचें छत्र नाहींसें जाहलें. असें सर्वत्रांस समर्थांनीं सांगितलें. हें वर्तमान शिवाजीमहाराजांस कळतांच त्यांनीं तेथें येऊन विनंति केली कीं, महाराज तेथून कोणी मनुष्य न येतां आपणास हें वर्तमान कसें समजलें. तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, जसें मातोश्रीचें वर्तमान कळलें तसेंच हेंही

कळलें, हें ऐकून शिवाजी महाराज म्हणाले कीं, महाराज ! आपण सर्वज्ञच आहां. आमचें विचारणें निरर्थक आहे; असें बोलून महाराज आज्ञा घेऊन गेले. नंतर पुनः अमावास्येचे दिवशीं श्रेष्ठांचो पत्नी निजधामांस गेली असें सांगून समर्थ स्नान केले आणि पंधरा दिवस जाहल्यानंतर पत्र लिहून देऊन उद्धव गोसांवी यांस जांबेस रवाना केलें ते तेथें जाऊन पोहोंचतांच रामचंद्रबावा व शामजी बावा यांची गांठ पडली. तेही समर्थांस पत्र पाठविण्याचे उद्देशांत होते त्यावेळीं उद्धवगोसांवी यांणीं उभयतांस पत्र दिलें तें वाचून गहिंवरून उभयतां बहुत श्रमी होऊं लागले तेव्हां त्यांचें समाधान उद्धवगोसांवी याणीं बहुतप्रकारें करून आठ दिवस तेथें राहिले. नंतर उभयतां चिरंजिवांस घेऊन उद्धव गोसांवी रामदास स्वामीपाशीं आले. उभयतां स्वामींनीं पाहतांक्षणीं बहुत समाधान मानून उभयचिरंजीवांस संवत्सरपर्यंत जवळ ठेवून घेतलें, मग उभयतांचें आचरण पाहून स्वामी बहुत संतुष्ट जाहले. पुढें एक संवत्सरानंतर रामचंद्रबावांनीं विनंति केली कीं, महाराज आज्ञा जाहल्यास जांबेस जाऊं. त्याजवरून समर्थांनीं कृपाकरून नीति धर्म, उपासनाधर्म, भक्तिमार्ग व आत्मानात्मविचार उपदेशून म्हणाले कीं, बापहो तुम्हीं श्रेष्ठकुळीं उत्पन्न जाहलां अहां यास्तव जगदुद्धार करावा आणि श्रीरघुपतीचें अधिष्ठान नाशीकपंचवटी व जांब पंचवटी होय तरी तेथें जाऊन श्रीची सेवा करावी. आत्मानात्मविचाराची किल्ली सांगितलीच आहे, ती सर्वदां ध्यानांत ठेवावी व श्रीचरणांस विसरूं नये. अशी आज्ञा करून अति गौरवानें त्यां-

च्या समागमें शिष्यमंडळींत मुख्य, उद्धवबावास बरोबर देऊन त्यांस सोडून पुनः इकडेस यावें याप्रमाणें सांगून पाठविलें. तों जाते समयीं राजश्रीस वर्तमान कळल्यावरून तेही भेटीस आले होते. त्यानीं मुलांस वस्त्रें आभरणें देऊन पोंचविण्याकरितां लवाजमाही शके १६०० माघ कृष्णप्रतीपदेस दिला. त्यांस पोहोंचवून उद्धववावा माघारे आले.

नंतर एके दिवशीं अष्टप्रधानासहवर्तमान शिवछत्रपतीची स्वारी समर्थांच्या दर्शनाकरितां परळीस येऊन एक महिनापर्यंत राहून महाराज आह्मांपासून कांहीं तरी सेवा घ्यावी अशी प्रार्थना केली तेव्हां समर्थ बोलले शिवबा! वारंवार सेवा करावी असें जें ह्मणतोस हें काय? हें सर्व राज्य आमचेंच आहे. हें चालवितोस हीच आमची सेवा आहे. हें ऐकून महाराज उगेच राहिले आणि आज्ञा होत नाहीं ह्मणून एकीकडे जाऊन खिन्न होऊन बसले आहेत तों कोंडोपंत ज्यास स्वामींजवळ नेहमी ठेविलेले होते त्यांणीं येऊन विनंति केली कीं, महाराज गुदस्तां किंचित् महर्गता पडली होती आणि पंक्तीस पात्रें तर बहुत यामुळें सरकारांतून नेमिलेलें वेतन खर्चास पुरेना तथापि आपणाजवळ सांगण्याविषयीं समर्थ आज्ञा देईनात आणि मनाचे श्लोक २१० आपण करून शिष्यांजवळ देऊन कोकणांत पाठविले, आणि तेथून भिक्षा मागून तांदूळ आणविले. व देशांत पाठवून हरजिनसी धान्यही आणविलें. याप्रमाणें भोजन खर्चाचा बंदोबस्त समर्थांनीं करविला होता. हें ऐकून महाराजांस अति खेद उत्पन्न होऊन

राजश्रीनीं समर्थांपाशीं जाऊन बहुत प्रकारें सेवेविषयीं विनंति करून पाहिली, परंतु स्वामींची आज्ञा जाहली नाहीं. तेव्हां आज्ञा होवो अथवा न होवो, असें बोलून एकशें एकवीस खंडचा हरजिनसी धान्याची चाफळखोरें व परळखोरें इत्यादि ठिकाणीं तांदुळांची नेमणूक आंग्रे यांजकडून करून देऊन, सरकार तर्फेनें चाफळ खोऱ्याचे मामलतीस नरसोमलनाथ होते त्यांचेकडेस हें काम सांगून बंदोबस्त करविला, आणि महाराज निरोप घेऊन गेले. (हें कृत्य शके १६०० कालयुक्त नाम संवत्सरीं अधिक शुद्ध १० स जाहलें.

यानंतर कोणे एके समयीं समर्थ चाफळीं असतांना शिष्य मंडळी बहुत जमून पंगतीस पात्रें दोनशेंपर्यंत होऊं लागलीं. जी नूतन मंडळी जमली होती, त्यांत बहुतेकांचे नेमधर्म देवपूजा व स्वामींचें तीर्थ घेतल्यावांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं. हा नेम त्यांचा पाहून यांची परीक्षा करावी असें समर्थांनीं मनांत आणून एकेदिवशीं गोमांतकीउत्तम आंबे, राजश्रीकडून आले होते; त्यांपैकीं एक आंबा घेऊन पायाच्या पोटरीस बांधून त्याजवरून पांच चार वेष्टणें गुंडाळून अकस्मात मध्यरात्रीपासून समर्थ विवळूं लागले, असतां शिष्यमंडळी जमली तों प्रातःकाळ झाला असतां समर्थांनीं शौचविधी वगैरे कांहीं एक केला नाहीं. तेव्हां सर्वमंडळी तटस्थ बसली. त्या मंडळीपैकीं, कांहीं मंडळीनीं समर्थांस विनंति केली कीं, महाराज आपल्यास व्यथा काय होत आहे? समर्थ बोलले कीं, बापहो, मध्यरात्रीपासून तळमळत आहें. तुम्हीं आतां

काय होतें ह्मणून विचारितां हें आश्चर्य होय. परंतु झालें तें सांगतों. रात्रींतून पोटरीस एका एकीं खांडूक झालें तें दोन प्रहरांत आंब्याएवढें झालें आहे; त्या वेधनेनें तळमळत आहें. तेव्हां मंडळीनीं विचारलें कीं, महाराज यास उपाय काय ? समर्थ बोलले कीं, बापहो, जें खांडूक दोन प्रहरांत आंब्याएवढें झालें आणि ज्यानें प्राणाशीं गांठ घातली, त्याजला उपाय मिळून एक आहे, परंतु तो मी तुह्मांस सांगूं कसा? आणि तुमचे हातून उपाय घडेल कसा, यास्तव त्याची व्यथा आमचे आह्मीं सोशीतच आहों. ईश्वरइच्छेनें घडेल तसें घडो. मंडळीनीं विनंति केली कीं, महाराज ! असा उपाय अवघड तो काय ? आपण आज्ञा करावी आमचे हातून झाल्यास अनमान होणार नाहीं. समर्थ बोलले कीं, सांगावयाचा उपाय नाहीं, महाराज आज्ञा करावीच ह्मणून बहुत प्रकारें शिष्यमंडळीनीं विनंति केली, तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, हें खांडुक मनुष्यानेंच चोखिलें पाहिजे आणि जो हें खांडूक चोखील तो मरेल आणि मी वाचेन. हें ऐकून कोणी होय कोणी नाहीं असें ह्मणून स्तब्ध राहिले. इकडे आका, उद्धव व वेणूबाई, हीं मनांतील मनांत एकमेकांकडे पाहून परस्परें उमजून स्वयंपाक करण्याची गडबड करूं लागलीं. त्यांजला इतर मंडळी ह्मणूं लागली कीं, स्वामींच्या प्राणांताचा समय आणि ह्यांत तर जेवणासाठीं घाई करितात; यांच्या केवळ दृष्टी पोटावरच आहेत. याप्रकारें परमार्थ बोलत; परंतु समर्थांनीं सांगितलें त्या गोष्टीस कोणी धजावतना, तों इतक्यांत कल्याणगोसावी मातोश्रीच्या

दर्शनाकरितां शिरगांवास गेले होते, ते येऊन पोहोंचले आणि श्री-रघुपतीचें दर्शन घेऊन मंडपांत आले. तों मंडळी स्तब्ध बसली आहे, कोणी कोणाशीं बोलत नाहींत; स्नानसंध्या व देवपूजाही कोणी केली नाहीं. हें पाहून त्यांजला विचारिलें कीं, तुह्मीं सर्व असे कां बसलां. समर्थ कोठें आहेत? तेव्हां त्यांणीं सविस्तर वर्तमान कल्याण गोसांवी यांस सांगितलें, तें ऐकून कल्याणगोसावी समर्थांचे दर्शनाकरितां गडबडीनें मठांत समर्थ ज्या खोलींत होते तेथें आले. तों खोलीबाहेर मंडळी स्तब्ध आहे. त्यांजला आका व वेणूबाई स्नानास उठा ह्मणून सांगत आहेत; तों कल्याण गोसांवी यांणीं समर्थांपाशीं येऊन साष्टांग नमस्कार करून हात जोडून उभे राहिले आणि विनंति केली कीं, महाराज आपल्यास व्यथा काय झाली आहे? समर्थ बोलले कीं, बाबा तूं आतां आलास. तुजला काय सांगूं? सर्वत्रांस व्याधीचें कारण सांगितलें; त्यांजपासून काय झालें तें आतां तुला सांगून होणार, तेव्हां कल्याण ह्मणाले, महाराज, असें मनांत कसें आलें. मला तर आज्ञा झालीच पाहिजे. तेव्हां स्वामी बोलले, अरे बाबा काल रात्रींतून पायांचे पोटरीस एकाएकीं खांडूक होऊन दोन प्रहरांत आंब्याएवढें जाहलें तें पिकलें आहे. त्यानें फारच हैराण केलें आहे. हें ऐकून कल्याणगोसावी बोलले, माहाराज याजला उपाय काय आहे?

स्वामी बोलले बापा, उपाय फार अवघड आहे, तेव्हां कल्याण बोलले महाराज आज्ञा करावी. स्वामी ह्मणाले बापा, आपल्यास जो भोग आला तो भोग आपणच भोगावा; दुसऱ्याचा प्राण

घ्यावा हा धर्म कोण ? तेव्हां कल्याणगोसावी ह्मणाले, महाराज दुसऱ्याचे प्राणापर्यंत गांठ येणार असा तो उपाय काय आहे, ती आज्ञा करावी. समर्थ ह्मणाले बाबा जो माझें खांडूक चोखील तो मरेल आणि मी वांचेन, कल्याण बोलले महाराज, यांत अवघड काय आहे ! महाराज आपले देहावरून आमचा देह ओंवाळून टाकण्यास योग्यच आहे. तेव्हां समर्थ ह्मणाले बाबा तूं चोखितोस कीं काय? कल्याण सिद्ध होऊन ह्मणाले, महाराज उशीर काय आहे. तेव्हां समर्थ यांजला उठवेना यास्तव कल्याण गोसावी यांनीं मानेखालीं हात घालून उठवून पाठीमागें व दोहीकडे लोड ठेवून पायांखालीं तक्या ठेऊन स्वामीस बसविलें. नंतर स्वामींनीं वेष्टणावर वेष्टणें होतीं तीं सोडून, एक बारिक वस्त्राचें वेष्टण होतें तें ठेवून, जेथें आंब्याचें मुख होतें तेथें हळूच बोट लावून, या ठिकाणीं चोख ह्मणून कल्याणास आज्ञा केली, त्यावरून कल्याण गोसावी यांनीं मुख लावितांनां बाबा दुखवूं नको हळू चोख, ह्मणून स्वामी बोलले. कल्याण गोसावी यांणीं विनंति केली कीं, महाराज न दुखवितां चोखितों ह्मणून तोंड लावून चोखावयास लागले. तों गोमांतकी आंबा अति उत्तम गोड लागूं लागला तेव्हां समर्थ ह्मणाले कल्याणा हळू चोख, दुखवूं नको. कल्याण बोलले महाराज दुखवित नाहीं परंतु खांडूक फारच गोड लागत आहे असें खांडूक चोखून कां मी धरणार महाराज अशीं खांडकें दाहापांच जाहालीं असतीं तरी बरें होतें, असें ह्मणतांच समर्थ हांसले. नंतर तो आंबा कल्याण गोसावी यांणीं सोडून घेऊन खाल्ला. समर्थ

सर्वत्र मंडळीस बोलले कीं, कल्याणानें केलें तसें तुह्मीं केलें असतें तरी चिंता नव्हती. हें भाषण ऐकून सर्व मंडळी लज्जित जाहली आणि समर्थांस नमस्कार करून उगाच उभे राहीले. नंतर समर्थांचें स्नान संध्यादिकर्म होऊन भोजनें जाहलीं. हें चरित्र शके १५९३ चे सालांत जाहलें.

कोणे एकेसमयीं वेणूबाई मिरजेस राहून रामनवमीच्या उत्साहाकरितां प्रतिवर्षीं समर्थांच्या आज्ञेप्रमाणें परळीस येतजात असे; तों आपला मृत्यु आतां समीप आला हें जाणून, समर्थांचें दर्शन घेऊन त्यांचेच चरणापाशीं देह ठेवावा, ह्मणून परळीस येण्याकरितां निघाली. ती येऊन पोहोंचावयाचे पूर्वीच आकाजवळ स्वामी बोलले कीं, वेणू मरणास भिऊन येत आहे. तों वेणू येऊन पोहोंचली. नंतर स्वामीस नमस्कार करून उभी आहे, तों तूं आतां कां आलीस ! असें स्वामींनीं पुसलें. तेव्हां वेणूनें उत्तर केलें कीं, महाराज मला परलोकास जावयाचें आहे, यास्तव आज्ञा घेऊन जावें; ह्मणून स्वामीचरणापाशीं आलें, असें ह्मणतांच स्वामी हसून बोलले कीं, तुजला मरण्याचें भय अद्यापि दोन वर्षेपर्यंत नाहीं; तूर्त जा. आणि श्रीरघुपतीची सेवाकर. अशी आज्ञा झाल्यानंतर कांहीं दिवस तेथें राहून वेणूबाई आज्ञा घेऊन मिरजेस जाती जाहली.

पुढें दोनवर्षांचे नियमाप्रमाणें पुनः माघारी येऊन वेणूबाईनें स्वामीस विनंति करून आज्ञा मागितली, तेव्हां उद्यां देऊं असें

समर्थांनीं सांगितलें. याप्रमाणें पंधरा दिवसपर्यंत नित्य बाईनें विचारावें तों उद्यां देऊं असें समर्थांनीं सांगावें. असा नित्यक्रम पाहून शिष्यमंडळी आदिकरून बाई काय विचारतात, व स्वामी उद्यां देऊं असें काय ह्मणतात ह्याचा भेद कांहींच समजत नाहीं नंतर कोणे एके दिवशीं प्रातःकाळीं स्वामी मुखप्रक्षालन करीत आहेत, तों वेणूबाईनें नमस्कार करून पूर्वीप्रमाणें विनंति केली. तेव्हां आज तुला निरोप द्यावयाचा खरा असें समर्थांनीं तिजला-सांगून आकास आज्ञा केली कीं, आज वेणूबाईस निरोप द्यावयाचा आहे, ह्मणून पोळीवगैरे पक्कान्नें संपूर्ण नैवेद्याकरितां करावीं. ह्मणजे श्रीस नैवेद्य समर्पण करून वेणूस मेजवानी करूं आणि निरोप देऊं. अशी आज्ञा होतांच आकानें पाक सिद्ध केला. समर्थांनीं नित्यविधि आटोपून श्रींस नैवेद्य समर्पण करून रांगोळ्या, पाट, उदबत्या व वाजंत्री, इत्यादि समारंभानें वेणूस शेजारीं बसवून भोजन केलें. नंतर तांबूल भक्षण करून कीर्तनाकरितां बिछायत घालविली, आणि वेणूस बोलावून कीर्तनास प्रारंभ करविला प्रहर दाहा घटिकापर्यंत कीर्तन जाहलें. तों मागील साहा घटिका दिवस राहिला, त्यासमयीं कीर्तन समाप्त करून आर्ती केल्या नंतर वेणूनें नमस्कार करून मला आज्ञा असावी. अशी विनंति केली, त्यावरून समर्थांनीं उत्तम आहे, जावें. अशी आज्ञा करितांच वेणूनें जय जय रघुवीर श्रीसद्गुरु समर्थ ! असें उच्चशब्देंकरून समर्थांस दंडप्राय नमस्कार करितांच देह भूमीवर ठेविला.

हें पाहून समर्थांनीं आका, उद्धव व दिवाकर यांस आज्ञा केली कीं, आतां वेणूच्या देहाचें सार्थक करावें. अशी आज्ञा होतांच सर्वांनीं तिच्या देहाचें सार्थक करून मंडळीसुद्धां अका खोबळचांत स्नानास गेली. त्याकाळीं आकानें वेणूचा बहुत शोक केला. तेव्हां उद्धवगोसांवी यानीं तिचें समधान बहुत प्रकारें केलें. कोणे एके समयीं शिवाजी महाराज शके १६०० चे सालीं विजयादशमीस आपले अष्टप्रधान १ पेशवा २ पंतअमात्य ३ पंतसचीव ४ मंत्री ५ सेनापती ६ सुमंत ७ न्यायाधीश ८ पंडितराव यांसहवर्तमान स्वामिदर्शनास येऊन पूर्वपद्धतीप्रमाणें पूजाविधि करून ह्मणाले, महाराज ! मजपासून सेवा घ्यावी अशी मी वारंवार विनंति करीत असतां आज्ञा होत नाहीं; परंतु आजपासून सेवा घेतलीच पाहिजे. अशी अतिविनयपूर्वक शिवाजी प्रार्थना करित असतां समर्थांनीं आज्ञा केली कीं, शिवबा ! श्रीची सेवा करावी अशी तुझी मर्जी आहे, तरी विशेष उपाधीचें आह्मांस कारण नाहीं. तथापि कांहीं कालेंकरून अधिक अधिक वंश परंपरा सेवा व्हावी असें आतांपासून करून द्यावें. त्याजवरून राजश्रीनीं विचार करून एकशेंएकवीस गांव व एकशेंएकवीस गांवीं अकरा अकरा बिघे जमीन व जे महाल यापुढें सुटतील त्या दर महालीं पांच पांच गांव. याप्रमाणें संकल्प करून सांप्रत तेहतीस गांव व कांहीं गांवीं जमिनीचो नेमणूक करून, श्रींचे नांवें पत्र व उभयतां चिरंजीवांचे नांवें पत्र व अष्ट प्रधानांचे नावें एक पत्र, याप्रमाणें तीन पत्रें शिक्कामोर्तब करून दिवाकर गोसां-

वी यांजपाशीं दिलें. आणि श्रींची पूजा करून तेच दिवशीं आज्ञा घेऊन राजश्रींची स्वारी पन्हाळ्यास गेली.

या नंतर एके समयीं समर्थ चाफळास वसले असतां जवळ कल्याण गोसावी उभे होते, त्यांस आज्ञा केली कीं, शिवाजीनें जीं पत्रें करून दिलीं आहेत; त्यांतील डोमगांवीं तुह्मीं जाऊन मठ स्थापन करून राहावें. आणि उपासना वाढवून जगदोद्धार करावा व करवावा. तेव्हां आपणास माझा कंटाळा कां आला ह्मणून कल्याण गोसांवी बोलले आणि विनंति केली कीं, महाराज माझा अव्हेर करून दूर घालवूं नये. आपले चरणापाशीं निरंतर सेवा करून रहावें अशी माझी इच्छा आहे. असें ह्मणून मोठ्यानें हंबरडा फोडून रडूं लागले. हें पाहून समर्थांनीं कल्याण गोसांवी यास पोटाशीं धरून नेत्रोदक आपल्या छाटीनें पुसलें आणि ह्मणाले कीं, बापा तूं कष्टी होऊं नकोस. तुझे हातून आजपर्यंत रघुपतीची सेवा बहुत घडली. यास्तव तुझेच हातून उपासना वाढवून जगदुद्धार करावा, बापा ही रघुपतीची इच्छा होय. झाडाखालीं झाड वाढत नाहीं. याविषयीं तुला मी पूर्वीच सांगितलें आहे यास्तव तुला अवश्य जाणें प्राप्त आहे ह्मणोन तुला पूर्वील एक वृत्तांत सांगतों तो ऐक. पूर्वी आह्मीं मंडळीसहवर्तमान सिनेच्या तीरानें पर्यटणास गेलों होतों, त्यासमयीं डोम गांवीं एक जाळी होती त्या जाळीस आमच्या मेखळेचा पदर अडकला तो तूं सोडविलास; त्या वेळेचें तुला स्मरण नसेल. यांतील भाव असा कीं, त्या जागीं

आह्मीं असावें. परंतु तुह्मीं पदर सोडविला त्यायोगें ती जागा तुह्मांस नेमिली आहे. असें असोन अज्ञानासारखा रडतोस यास काय ह्मणावें ? त्या काळीं कल्याणानें पुन्हां नमस्कार करून विनंति केली कीं, महाराज समर्थांचा जो संकल्प असेल तो प्रमाण परंतु हा देह जाईपर्यंत आपली सेवा घडावी ही इच्छा आहे. समर्थ बोलले कीं, बापा तूं आहेस तावत्काळपर्यंत तुझेच हातून सेवा घडेल, कांहीं काळजी करूं नको. असें बोलून मस्तकीं वरद हस्त ठेऊन जाण्यास आज्ञा दिली. तेव्हां कल्याण गोसांवी यांजसमागमें आपणाजवळील १०।१२ वर्षांचीं ब्राह्मणांचीं मुलें होतीं, तीं दिलीं त्यांचीं नांवें:—

१ निजामकर कुळकर्णी यांचा पुत्र जगन्नाथ.
१ वांईकर चित्राव यांचा पुत्र मुधोबा.
२ चोरेकर कुळकर्णी यांचे पुत्र मुरारजी, व रामा.
१ वांईकर जुने देशपांडे यांचा पुत्र शिवाजी.
१ शाहापुरकर पाटील यांचा पुत्र.

येणें प्रमाणें ६ मुलें बरोबर देऊन कल्याण गोसांवी यांस रवाना केलें. नंतर कल्याण गोसावी यांणीं डोमगांवीं जाऊन मठस्थापन करून सांप्रदाय वाढविला आणि एक वर्ष होतांच स्वामीचे दर्शनास परत आले. या प्रमाणें प्रतिवर्षी येत जावें अशी स्वामीची आज्ञा झाली. कल्याणगोसांवी याणीं त्या प्रांतांत उपासना सांप्रदाय बहुत वाढविला, या प्रमाणें कल्याणगोसांवी यांचें चरित्र जाहलें.

भाग १७ वा.

शिवाजीचा मृत्यु.

कोणे एके समयीं स्वामी परळीस असतां महाराज यांची स्वारी येऊन दर्शन करून अत्यानंदांत निमग्न जाहली हें समर्थांनीं पाहून ह्मणाले कीं, शिवबा अत्यानंदांत बुडालास काय? माझ्या मनांत तुला कांहीं सांगावयाचें आहे. असें ह्मणोन स्वामीचीं व महाराजांचीं भाषणें बहुत प्रकारचीं जाहलीं, तीं अशीं कीं, आतां राज्याचा बंदोबस्त यथास्थित करावा, सेवक व सरदारलोक एकचित्तें करून ठेवावे, आणि देशाधिकार सुभेदार मामलेदार शेखदार ज्यांस ज्यांस दिला आहे; त्यांस "तुह्मीं यथास्थित वर्तून स्वामिसेवेशीं अंतर करूंनये" असें सांगून त्यांचा बंदोबस्त करावा. कोशभांडार यांचा त्यांच्या अधिकाऱ्यांचे हातून बंदोबस्त ठेवून शिलक झाडा पाहून विश्वासुकाचे स्वाधीन करावा. तुरंग, किल्ले व कोट याठिकाणीं शूर व विश्वासु मनुष्य ठेवावे. त्याणीं प्राण वेंचावे परंतु फितूर होऊं नये. आसमंतात् भागीं शत्रु असतील त्यांसी सख्य करून ठेवावें आणि महान् शत्रु एक असेल तर त्यास सर्वांनीं जपावें. सेनेचा अधिपती नेमणें तो शूर विश्वासु एकपत्नीव्रत धारणकरणारा व निर्व्यसनी असा असावा. सहज शत्रु सहज मित्र याचा विचार करित असावें. इत्यादि गोष्टी बहुत प्रकारें सांगून त्यांचा सर्व

बंदोबस्त ठेऊन उभयतां पुत्रांचा एक विचार करून बंदोबस्त आधीं करावा. कारण यांतून विपर्यास घडूंनये. तुम्हीं सुज्ञच आहां, फार काय सांगावें. या प्रकारें स्वामींची आज्ञा जाहली ती ऐकून महाराज म्हणाले कीं, आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त करीत आहें, पुढेंही आशीर्वादाच्या योगेंकरून कल्याण होईलच होईल.

नंतर स्वामी बोलले शिवबा ! राज्याची वृद्धि व्हावी असा श्रींचा संकल्प आहेच, परंतु मानवी उपाय आहे, तो करीत जावा. आजपर्यंत आमचा सहवास करून जें साधन केलें त्याची दृढता राखून मूळच्या गोष्टीचें विस्मरण नसावें आणि श्रीचें भक्तिपूर्वक पूजन करीत असावें. देव व ब्राह्मणांचे ठायीं तुमची भक्ति आहेच तो सदृढ असावी. असो, फार काय सांगावें, हे सर्वगुण वर्तमानकाळीं तुह्मापाशीं आहेतच. परंतु आमचा, स्वधर्म तुह्मांस वारंवार सांगण्याचा आहे सबब सुचविलें आहे. याप्रमाणें आज्ञा होतांच शिवाजीनीं साष्टांग दंडवत करून हस्त जोडून विनंति केली कीं, महाराज या काळीं अशी आज्ञा जाहली, हें आपले आशीर्वादें करून उमजलों. हा सर्व प्रताप श्रीचरणांचाच आहे, या व्यतिरिक्त मला दुसरा आश्रय नाहीं. सतत श्रीचरण हृदयीं आहेत यास्तव सर्व प्रकारें कल्याण आहे. असें म्हणून कांहीं दिवस राहून पंक्तीस भोजन व भाषणादिक करून आतां जाण्यास आज्ञा मागावी असा राजश्रीनीं विचार केला.

शिवाजी माहाराजांवर समर्थांची कृपा पहिल्यापासून होती, त्याप्रमाणें आपल्याकडून तिलप्राय अंतर न पडावें हा त्यांचा

मनोधर्म असतां कालेंकरून चुकीनें किंचित् श्रींचा अपराध जाहला असेल, तरी त्याचीही क्षमा कृपापात्र झणून समर्थांकडून जाहली. याकाळीं जी कृपा केली, ती अंतींचा लाभ असें समजून प्रेमळ भावानें समर्थांची मूर्ति आपादमस्तकपर्यंत अवलोकन करून सद्गदित होऊं लागले. हें समर्थांनीं पाहून राजश्रींस प्रश्न केला कीं, आज तुमची स्थिति अशी कशानें झाली? हें ऐकून राजश्रीनीं सद्गद होऊन मोठ्यानें हंबरडा फोडिला व श्रीचरणास मिठी घातली व या चरणाचें आतां दर्शन अंतरणार झणून बहुत श्रमी झाले. हा अंतःकरणांतील भाव समर्थांनीं जाणून राजश्रीस पोटाशीं धरून झटलें कीं, शिवबा आजपर्यंत साधन केलेंस त्याचें सार्थक हेंच कीं काय ? राजश्री बोलले महाराज याचें मला उत्तर सुचत नाहीं. समर्थ बोलले, अतःपर ममतेचा त्याग करून साधन करावें. आज्ञा प्रमाण असें झणून निरोप घेऊन राजश्री निघून रायगडास गेले.

राजश्रींस निरोप दिल्यानंतर समर्थ, उद्धव आदिकरून मंडळीसह बसले असतां उद्धवांनीं नमस्कार करून विनंति केली कीं, महाराज राजश्री आपल्यापाशीं एक मास असतां आपलीं व त्यांचीं भाषणें बहुत झालीं तीं आह्मीं ऐकिलीं आणि त्यांतील भावही समजला. परंतु अवकाश आहे झणून आज्ञा झाली. त्यास अवधी किति आहे हें स्वामी जाणतच आहेत. परंतु मला वाटतें अवकाश थोडाच असावा. आणि त्यांच्या हातून तर म्लेंच्छांचा निर्मूलनाश करावयाचा. असा तर श्रींचा संकल्प आहे, तेव्हां हें

कसें काय होणार? याविषयीं मला समज करून देण्याची कृपा व्हावी हें ऐकून समर्थ बोलले कीं, बापा, या मंडळींत कोणी समजेल कींवा नाहीं याचा मला अंदेशाच होता. परंतु तूं मात्र समजलास, येणें करून मला बहुत संतोष झाला. तूं श्रींचा वरदपुत्र आहेस. तुझ्या प्रश्नाचें उत्तर सांगतों ऐक. म्लेंछमय पृथ्वी जाहली आहे त्यांचा नाश व्हावा एतदर्थ शिवाजीनें श्रीकृष्णातीरीं श्रीचे आज्ञेनें जन्म घेतला, आमचेंही या कृष्णातीरीं येणें शिवाजीमुळेंच जाहलें. म्लेछांचा पुरा नाश झाला नाहीं हा तुला संशय मोठा आहे. परंतु जुन्यावृक्षाच्या फांद्या व मुळ्या सुकल्या म्हणजे तो कधीं तरी मरावयाचाच यांत संशय नाहीं. तेव्हां उद्धव गोसांवी यानीं विनंति केली कीं, महाराज शिवाजीच्या हातून संपूर्ण म्लेंच्छांचा मोड झाला नाहीं व आतां होणेंही दिसत नाहीं, तेव्हां समर्थ बोलले, बापा संकल्प झाला तो अप्रमाण कधींही होणार नाहीं. कांहीं शेष उरला आहे त्याचा नाश जसा दीपक जातां जातां मोठा होऊन एकदम जातो. तद्वत होणार आहे व शिउबाही आतांच पूर्व स्थळास जातो. असें घडत नाहीं. पुन्हा याच कुलांत उत्पन्न होऊन म्लेच्छाचें निवारण करून कांहीं दिवस ऐश्वर्य भोगून पुनरपि ब्राह्मणजन्म घेऊन बद्रिकाश्रमीं योगसाधन करून नंतर पूर्वस्थळास जाईल. यांत संशय नाहीं. आणि श्रीनींही नाशिकापासून करवीरपर्यंत राहण्याचें सांगितलें आहे. यास्तव या स्थानास आनंदभुवन असें नांव दिलें आहे. आणि सांप्रत श्रीनीं

पंचवटींत वास्तव्य धरिलें आहे. यास्तव या स्थानाचें आह्मीं पूर्वीच वर्णन करून ठेविलें आहे. तें ऐक.

॥ श्लोक ॥

अनुष्टुप्छंद.

कल्पांत मांडिला मोठा, म्लेंच्छ दैत्यबुडावया ॥ कैपक्ष घेतला रामें, आनंद वन भूवनीं ॥ १ ॥ बुडाले सर्वही पापी, हिंदुस्थान बळावलें ॥ कोपला देवदेवांचा, आनंद वनभूवनीं ॥ २ ॥ पूर्वी जे मारिले होते, तेचि आतां बळावले ॥ अभक्तांचा क्षय झाला, आनंद वनभूवनीं ॥ ३ ॥ त्रैलोक्य गांजिलें मागें, ठाउकें विवेकी जनां ॥ कैपक्ष घेतला रामें, आनंद वन भूवनीं ॥ ४ ॥ भीमासी धाडिला देवें, वैभवें धांवघेतली ॥ लांगूल चालिलें पुढें, आनंद वन भूवनीं ॥ ५ ॥ येथून वाढला धर्म, रमाधर्म समागमें ॥ संतोष मांडिला मोठा, आनंद वन भूवनीं ॥ ६ ॥ बुडाला औरंग्या पापो म्लेंछ संहार जाहला ॥ मांडिलीं मोडिलीं क्षेत्रें, आनंद वन भूवनीं ॥ ७ ॥ बुडाले भेदवादी ते, नष्ट चांडाळ पातकी ॥ तुडविले बुडविले देवें, आनंद वन भूवनीं ॥ ८ ॥ मळाले पळाले मेले, गेले देश धडी पुढें ॥ निर्मळ झाली ही पृथ्वी, आनंद वन भूवनीं ॥ ९ ॥

या प्रमाणें श्रीचे इच्छेनुरूप वर्णिलें आहे. हें निःसंशय होणार यांत संशय नाहीं. हें ऐकणार ऐकतील व पाहणार पाहतील. या प्रमाणें बोलून समर्थ सभेंतून उठले तेव्हां पुन्हा उद्धव यांणीं विनंति केली कीं, महाराज राजास अवकाश किती दिवसांचा आहे, समर्थ बोलले बापा आज तिथी कोणची आहे ? उद्धव बोलले महाराज आज शुद्ध पौर्णीमा आहे. समर्थ बोलले तरी शिउबा आजपासून साठावे दिवशीं परिक्षितप्रमाणें स्वर्गस्थ होईल. या प्रमाणें सांगून सभा विसर्जन झाली.

पूर्वी आज्ञा घेऊन शिवाजी रायगडास गेलेच होते तेथें जाऊन श्रींचे आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त करून उभयतां चिरंजीवांचा एक विचार करावा, ही गोष्ट दुरापास्त जाहली, ह्मणून ज्येष्ठ पुत्राचा पन्हाळ्यास बंदोबस्त करून आपण रायगडीं राहून श्रींचे आज्ञेप्रमाणें नित्य नेम करित असतां शेवटच्या दिवशीं प्रातःस्नान, शिवपूजा व पादुकापूजा करून देवब्राह्मणांचें श्रद्धापूर्वक पूजन केलें. आणि साधुवृंदें बोलावून आणून त्यांचें दर्शन व पुराणश्रवण व शंभर गोदानें भूमिदान व ग्रामदानप्रभृति दानें करून यथाशास्त्र आसनविधीपुरःसर परिक्षितीसारखा मुखानें शिव शिव असा उच्चार करीत असतां शके १६०२ रौद्रनामसंवत्सरीं चैत्र शुद्ध १५ रविवारीं दोन प्रहरीं ५३वर्षांच्या वयांत दीर्घ स्वरानें रामशब्दोचार करून शिवाजी महाराज परधामाप्रत जाते जाहले. त्याकाळीं सेवकांस अतिशय शोक जाहला, तो वर्णन करतां येत नाहीं. हा शिवाजी राजा केवळ मानवी नव्हे, तर प्रत्यक्ष शिवच

होय. श्रीचे आज्ञेवरून शिवाजीच्या रूपानें अवतार धारण करून हिंदुधर्मस्थापना करून निजलोकास गेला.

हें वर्तमान जासुदाच्यामुखें स्वामींनीं ऐकतांच शिवाजी परधामास गेला काय? "श्रींची इच्छा" असें म्हणून समर्थ खोलींत गेले.

शके १६०२ च्या सालीं रामनवमीचे उत्साहास समर्थ चांफळास गेले नव्हते. म्हणून त्या उत्साहांत शहापुरकर व शिराळकर यांचा मानाबद्दल तंटा झाला. तेव्हां दिवाकर गोसांवी तेथें होते त्याणीं समर्थ जी आज्ञा करतील त्याप्रमाणें करावें अशी समजूत घालून त्यांस परळीवर घेऊन आले. तों श्रीछत्रपती महाराज पौर्णिमेस समाप्त झाले, त्या गलबलींत हा विचार तसाच राहिला. कारण दिवाकार गोसांवी ही राजश्रींच्या समाचारास रायगडास गेले. तेथें राजश्री शंभु छत्रपती याणीं आपल्यास राज्याभिषेक करवून सिंहासनारूढ होण्याचा निश्चय केला. आणि श्रीसमर्थांस आमंत्रण करण्याकरितां दिवकर गोसांवी यांच्याच समागमें पिंगळे प्रधान यांजकडील कारकून राघो अनंत यांस पाठविलें; ते उभयतां सज्जनगडास आले. तेव्हां आका हिणें शिरोळकर व शहापूरकर यांच्या मानाबद्दल कांहीं विचारणें आहे अशी स्वामीपाशीं विनंति केली, तेव्हां बरें आहे म्हणोन आज्ञा झाली. नंतर उद्धव गोसांवी यांणी एक एक कलमाची विनंति केली. त्या प्रत्येक कलमाबद्दल स्वामींची आज्ञा झाली; ती कलमवार अंताजी गोपाळ वांकनिस यांणीं लिहून ठेविली (ती अद्यापि परळीच्या

मठांत आहे.) यानंतर राघो अनंत यांणीं राजश्रीकडून आमंत्रणास आलों आहें अशी विनंति केली. त्यांजला स्वामींची आज्ञा झाली कीं, आमचें येणें होत नाहीं तर कोणास तरी पाठवून देऊं असें म्हणून निरोप दिला. नंतर समर्थ शके १६०३ दुर्मतीनाम संवत्सरीं श्रीच्या उत्साहाकरितां चांफळास आले. आणि श्रीचा उत्साह सांग होऊन श्रीमारुतीजयंती झाल्यावर एके दिवशीं कारभारी यांणीं समर्थांस विनंति केली कीं, महाराज श्रीचें देवालय व दीपमाळ बांधण्याची आज्ञा झाली होती. परंतु इतक्या संधींतच राजश्री यांचा काळ झाला. तरी त्यांनीं दिलेला विषय मठांत आहे, त्याचा व्यय करून आज्ञा झाल्यास देवालय, व दीपमाळा बांधवितों. हें ऐकून समर्थांनीं उत्तर दिलें कीं, फार बरें आहे. त्याजवरून कारभारी यांणीं राजश्रीकडून आलेले होन व जवाहीर स्वामीपाशीं आणून याद करूं लागले. तेव्हां समर्थांनीं ब्राह्मणांस हाक मारून यादींत लिहिलेला विषय वांटूं लागले तें पाहून कारभारी यांणीं विनंति केली कीं, महाराज आज्ञा झाल्यावरून एकंदर जमेची याद करीत असतां त्यांतील विषय खर्च होत आहे. तेव्हां याबद्दल कायती आज्ञा व्हावी. हें ऐकून समर्थांजवळच तरवार होती ती उपसून हातांत घेऊन मंडळीचे आंगावर धावूं लागले. तेव्हां भयभीत होऊन सर्व मनुष्यें जिकडे तिकडे पळूं लागलीं. हें समर्थांनीं पाहतांच मौन धारण करून आसनावर बसते झाले. तेव्हां मंडळी एकत्र होऊन विचार करूं लागली कीं, आतां समर्थ शांत होतील कसे, व हें द्रव्य वांटलें तर देवालय आणि दीपमाळा

होतील कशा. यास्तव आका व उद्धव यांस पुढें करून उभयतां-कडून विनंति करवावी असें ह्मणून आका व उद्धव या उभयतांस समर्थांस शांत करण्याविषयीं सर्वांनीं विनंति केली. त्याजवरून उभयतां समर्थांपुढें येऊन साष्टांग नमस्कार करून विनंति करिते जाहले कीं, महाराज आपले आज्ञेवरून मठांतील विषय काढून याद करीत असतां त्यांतील विषय समर्थ खर्च करीत आहेत तेव्हां स्वाभाविक विनंति केल्यानें इतका क्रोध आणावा हें काय ? या-विषयीं काय आज्ञा होणें ती व्हावी. समर्थ बोलले, बापा जो विषय एक वार खर्ची पडला तो पुन्हा जमेस कसा येईल ? तेव्हां आका ह्मणाली महाराज विषय प्रत्यक्ष दिसत असतां खर्च झाला ह्मणून आज्ञा होत आहे हें काय ? समर्थ बोलले ? बापा, ज्यांनीं ज्या-काळीं अर्पण केला त्याचकाळीं त्यांचे घरीं खर्ची पडला. येथें जरी असला तरी तो खर्च पडलेलाच आहे. देवालयाबद्दल जो नूतन विषय येईल तो जमा होईल. मंडळीनें विनंति केली कीं, महाराज राजश्री तर समाप्त झाले. आतां देवालय, व दिपमाळ कोण बां-धणार. त्याजवर आज्ञा झाली कीं, ज्यास आमची आज्ञा झाली आहे तोच बांधविणार. त्यांजकडे आमची बहुत बाकी राहिली आहे. ते जरी समाप्त झाले तरी चिंता नाहीं. त्याची काळजी तुह्मीं करूं नये. असें ह्मणून जो विषय वांटून राहिला होता तो नेऊन ठेवा ह्मणून आज्ञा झाली आणि आपण उठून खोलींत गेले.

नंतर समर्थांनीं कांहीं दिवस चांफळीं राहून श्रीची आज्ञा घे-तांना प्रार्थना केली कीं, महाराज हा देह उत्पन्न करून सेवा घे-

तली ती केली. पुढें जे आपली सेवा करतील त्यांचें कल्याण करावें यासांप्रदायाचा अभिमान श्रीस आहेच. मी विनंति करावी असें सामर्थ्य माझें नाहीं. याप्रमाणें बोलून सर्वत्रांस देवालयांतून बाहेर काढून आपण एकटेच आंत बसले. चार घटका स्वामी आंत होते. तेव्हां देवालय अति तेजेंकरून सुंदर दिसूं लागलें. हें मंडपांत होते त्यांणीं पाहिलें. नंतर समर्थ बाहेर आले आणि आनंदयुक्त मंडपांत येऊन श्रीस साष्टांग नमस्कार घातला आणि श्री मारुतीची आज्ञा घेऊन शिबिकारूढ होत्साते सज्जनगडीं आले.

भाग १८ वा.

समर्थांचें देहविसर्जन व संभाजीचें राज्यारोहण.

यानंतर समर्थ महाराज यांणीं पर्यटण करावयाचें सोडलें. केवळ परळी व चाफळ येथें राहावें. जवळ आका व उद्धव बावा आदिकरून शिष्यमंडळी होती, परंतु विशेष भाषण कोणाशींच करावयाचें नाहीं. व याउपर कोणाजवळ बहुत दिवस राहावयाचेंही नाहीं, असा आपले मनांत विचार आणून समर्थ परळीस रहाते झाले. आतां आपल्या निजधामास जाण्याचा अवकाश थोडा राहिला, यास्तव शिवबांनीं जें मंदीर तयार करविलें आहे, तेथें रहावें असें समर्थांनीं मनांत आणून कांहा कारखाना ओरींत व कांहीं कारखाना घरांत, असें दोहीं ठिकाणीं ठेवून आपण गात्र ओरींत रहात असत. त्या काळीं ज्येष्ठमासींच घरांत वस्तीचा

संकल्प कश्चन बाहेर जाणें टाकिलें. असे सहा सात महिने जाहल्यानंतर मार्गशीर्षमासीं कल्याण गोसावी डोंब गांवाहून दर्शनास आले. त्या समयीं दासबोध ग्रंथाचा विसावा दशक समर्थांनीं समाप्त केला, तो दशक कल्याण गोसांवी यांणीं लिहिला. आणि कांहीं दिवस तेथें राहिले असतां जाण्याविषयीं समर्थांची आज्ञा जाहल्याप्रमाणें निघून डोंबगांवास गेले.

शिवाजी महाराजांनीं पितळेच्या खुराचा पलंग करून दिला होता त्यावर स्वामींनीं खोलींत सर्वदा बसत असून अन्नआहार अगदीं टाकिला आणि दुग्धाहार मात्र करून पांच चार महिने होते. तेव्हां जवळ कोणी येऊं नये, ज्यास बोलावितील त्याणेंच मात्र येऊन आज्ञा काय तें विचारून जावें. अका व उद्धव बावा हे मात्र खोलींत न विचारितां जात असून स्वामीस उठवून दुग्ध देत असत. परंतु स्वामींनीं मर्जीस आल्यास दुग्ध घ्यावें नाहीं तर अपेक्षा नाहीं ह्मणून सांगावें. एके दिवशीं आका आदि सर्व शिष्यमंडळींनीं विनंति केली कीं, महाराज किल्ल्यावरची हवा कठीण आहे, यास्तव प्रकृतीस मानत नाहीं ह्मणून चाफळास किंवा खालीं तरी उतरावें. केवळ पर्वतावर राहणें चांगलें नाहीं अशी सर्वांची प्रार्थना ऐकून कोठेंही जावयाचें नाहीं, येथेंच रहावयाचें असें स्वामींनीं सांगितलें, याप्रमाणें पांच चार वेळां आका आदि शिष्यमंडळींनीं विनंति केली असतां स्वामींनीं हेंच उत्तर द्यावें कीं, येथेंच रहावयाचें. यांतील भाव असा होता कीं, आपण चाफळीं जाऊन देह ठेविला असतां पुढें सांप्रदायी लोक पुण्य-

तिथी करितील त्यामुळें मोठा डौल पडल्यानें श्रीरघुपतीची अमर्यादा घडेल, हें ठीक नाहीं यास्तव येथेंच असावें, हा निश्चयपूर्वक स्वामींचा संकल्प उद्धव व आका मात्र जाणत होते.

असा समर्थांचा मनांतील निश्चय सर्वांनीं जाणून किल्लचाखालीं जाण्याविषयीं विनंति करावयाची टाकिली. स्वामी नित्य दुग्ध आहार करीत असतांही दिवसानुदिवस त्यांचें शरीर पुष्ट आणि तेजस्वी दिसूं लागलें, यावरून आतां स्वामींचा निर्याणसमय संनिध आला असें जाणून " एके दिवशीं आका व उद्धव गोसांवी यांणीं प्रार्थना केली कीं, महाराज स्वामींनीं संस्थानाचा बंदोबस्त करून द्यावा आणि कोणाचे आज्ञेंत कोणी कसें चालावें व श्रीची पूजा अर्चा कोणी करावी याविषयीं नियम बांधून द्यावा. कारण पूर्वी मानापानाकरितां शिष्यमंडळींनीं शके १६०२ चैत्रमासचे उत्साहांत कटकट केली होती, ते समयीं स्वामींनींच मानकरी यांस कार्यभाग नेमून देऊन याद लिहून दिलीच आहे, परंतु त्याप्रमाणें पूजा, उत्साह व महोत्साह यांची व्यवस्था करून एकाचे आज्ञेनें सर्वांनीं चालावें असें करून दिलें पाहिजे " अशा प्रकारें आका वारंवार विनंति करित असतांही स्वामींनीं ऐकिलें न ऐकिलेंसें करावें. याप्रमाणें पांच चार वेळां आकानें विनंति केली तेव्हां स्वामींची आज्ञा जाहली कीं, शिष्यमंडळीचे द्वारा संप्रदाय वाढलाच आहे त्यांत जो सेवा करील त्याजवर श्री कृपा करतील. आकानीं पुनः विनंति केली कीं, महाराज आपण अशी आज्ञा करितां अशानें निर्वाह होणार नाहीं. आपण विद्यमान असतां

पुढें कटकटीस कारण नसावें, यास्तव सर्वांनीं अमक्याचे आज्ञेंत चालावें असा कांहीं नियम करावा. स्वामी बोलले तूंच हें काम करीनास. त्यावरून आका ह्मणाली कीं, महाराज माझा स्त्रीदेह अनधिकारी व पुढें वंशही नाहीं, तेव्हां मी हा अधिकार करून उपयोग काय ? तेव्हां उद्धवास बोलावून समर्थांनीं आज्ञा केली कीं, तूं हें संस्थान संभाळून सर्वांस घेऊन चालावें. उद्धव गोसांवी याणीं प्रार्थना केली कीं, स्वामींचो आज्ञा प्रमाण. परंतु हा अधिकार माझ्या हातून व्हावयाचा नाहीं. ज्याला स्वामी आज्ञा करतील त्याचे आज्ञेंत मी चालेन. मी जी ही विनंति करीत आहें याविषयीं स्वामीनींच सत्य मिथ्या पहावें. असें उद्धवाचें भाषण ऐकून स्वामी उगाच राहिले.

त्याजवर आठ चार दिवसांनीं पुनः आकांनीं विनंति केली कीं, महाराज मी वारंवार प्रार्थना करीत आहें परंतु स्पष्टपणें आज्ञा होत नाहीं ती व्हावी. असें ह्मटल्यावरून स्वामी बोलले, आमची प्रतिज्ञा अशी आहे कीं,

॥ ओवी ॥

आमुची प्रतिज्ञा ऐसी ॥ कांहीं न मागावें शिष्यांसीं ॥
आपणा मागें जगदीशासीं ॥ भजत जावें ॥ १ ॥

येणेंप्रमाणें कोणापाशीं कांहीं एक न मागतां शिष्यांनीं आपल्यामागें श्रीजगदीशास भजत जावें. हें ऐकून आका बोलली कीं, महाराज ईश्वराचें भजन पूजन सतत चालण्याविषयींच विनंति

करीत आहों त्यांत शिष्यांस संकट पडेल अशी माझी प्रार्थना मुळींच नाहीं. असें ह्मटल्यावरून स्वामी हांसून बोलले कीं, आतां तुझ्या मनांतील भाव समजलों. तर जांबेस श्रेष्ठांचीं मुलें आहेत, त्यांस येथें आणून हें संस्थान त्यांचे स्वाधीन करावें, आणि त्यांची व श्रीची सेवा करून भजनपूजन करीत असतां तुह्मीं सर्वांनीं त्यांचे आज्ञेंत चालावें. अशी समर्थांनीं आज्ञा केली. त्यावरून आकांनीं दत्तोबा गोसांवी व देवबा गोसांवी व दिवाकर गोसांवी या तिघांस सांगितलें कीं, श्रेष्ठांचे पुत्र रामचंद्रबावा यांणीं श्रीची पूजा, भजन इत्यादि अधिकार करावा, आणि तुह्मीं आह्मीं सर्वांनीं त्यांचे आज्ञेंत चालावें अशी समर्थांची आज्ञा होत आहे तर त्यांस बोलावणें पाठवावें. हें ऐकून त्रिवर्ग होय ह्मणून बोलले परंतु बोलावूं पाठविलें नाहीं. नंतर आठ चार दिवशीं स्वामींनीं आपण होऊन आकास विचारिलें कीं, मुलांस आणावयास अद्याप कां पाठविलें नाहीं ? तेव्हां दत्तोबा व दिवाकर गोसांवी यांनां सांगितलें आहे, ह्मणून आकांनीं विनंति केली, त्यावरून दत्तोबास बोलावून समर्थांनीं समक्ष विचारिलें कीं मुलांस कां आणिलें नाहींस. दत्तोबा बोलले महाराज ! तिकडेस कांहीं दंग्यामुळें मार्ग चालत नाहीं यास्तव अनमान केला. हें ऐकून बरें सांप्रत त्यांचें येणें होत नाहीं, असो. पुढें तरी त्यांस आणून त्यांचे आज्ञेनें सर्वत्रांनीं चालावें अशी समर्थांनीं पुनः आज्ञा केली.

याजवर शिवाजी माहाराजांच्यामागें संभाजीची स्वारी स्वामिदर्शनाकरितां पौषमासीं किल्लचाखालीं आली, आणि मी दर्शनास येतों ह्मणून विनंति सांगून पाठविली. तेव्हां समर्थांचो आज्ञा जाहली कीं, आह्मांस समाधान नाहीं, यास्तव दर्शन घडावयाचें नाहीं, सबब तुह्मीं येणें करूं नये. त्यावरून संभाजी माहाराज परत साताऱ्यास गेले. तेथें जाऊन त्यांनीं बाळाजी आवाजी चिटणीस यांस हत्तोच्या पायांखालीं घालून मारिलें. शामजी आवाजी, बल्लाळ व विठोजीफरजंद, या चौघांस तसेंच अण्णाजीदत्तोस संगमेश्वरीं चुन्याचे भट्टींत घालून मारविलें व कलुशा कारभाऱ्याचे संगतीनें मद्यपानादि अनाचार करूं लागले. हें वर्तमान कर्णोपकर्णीं स्वामींनीं ऐकून आश्चर्य केलें कीं, शिवाजीच्या पोटीं पुत्र असा जाहला, असो ! कालमाहात्म्यास उपाय नाहीं. तेव्हां सर्वत्रांनीं श्रीची विनंति केली कीं, महाराज ! राजास आज्ञापत्र पाठवून तो यथामार्ग चालेल असें करावें. समर्थ बोलले कीं, ईश्वराची इच्छा अशीच आहे; त्यांत क्षयमासही प्राप्त जाहला आहे, यास्तव राज्यक्रांति अवश्य व्हावयाची. त्यास आपला उपाय काय ! असें ऐकून पुनः सर्वत्रांनीं राजश्रीस पत्र पाठविण्याविषयीं फार आग्रह धरल्यावरून समर्थांनीं ओंवीबद्ध पत्र लिहून शके १६०३ पौषमासीं राजास पाठविलें तें असें.

॥ ओंव्या ॥

अखंडसावधानअसावें ॥ दुश्चित्तकदापिनसावें ॥
तजवीजकरितबसावें ॥ एकास्थळीं ॥ १ ॥

कांहींउग्रस्थिती सोडावी ॥ कांहीं सौम्यताधरावी ॥
चिंतालागावीपराची ॥ अंतर्यामीं ॥ २ ॥
मागीलअपराधक्षमाकरावे ॥ कारभारीहातींधरावे ॥
सुखीकरूनसोडावे ॥ कामांकडे ॥ ३ ॥
पाटांतोलतुंबनिघेना ॥ तरीमगपाणीचालेना ॥
तैसेंजनाच्यामना ॥ कळलेंपाहिजे ॥ ४ ॥
जनांचामवाहचालिला ॥ ह्मणजेकार्यभागआटोपला ॥
जनठायींठायींतुंबला ॥ ह्मणजेतेंखोटें ॥ ५ ॥
श्रेष्टींजेंजेंमिळविलें ॥ त्यासाठींभांडतबसलें ॥
तरीमगजाणावेंफावलें ॥ गलीमांशीं ॥ ६ ॥
ऐसेंसहसाकरूंनये ॥ दोघेभांडतांतिसऱ्याशिजाये ॥
धीरधरूनमहत्कार्य ॥ समजूनकरावें ॥ ७ ॥
आधींचपडलीधास्ती ॥ मगकार्यभागहोयनास्तो ॥
याकारणेंसमस्तीं ॥ बुद्धीशोधावी ॥ ८ ॥
राजीराखतांजग ॥ मगकार्यभागाचीलगबग ॥
ऐसेंजाणोनियांसांग ॥ समाधान करावें ॥ ९ ॥
सकळलोकएककरावे ॥ गलीमनिवटूनकाढावे ॥
येणेंकीर्तिधांवे ॥ दिगंतरीं ॥ १० ॥
आधींगाजवावेतडाखे ॥ तरीमगभूमंडळधाके ॥
ऐसेंनहोतांधक्के ॥ राज्यास होती ॥ ११ ॥
भयप्रसंगओळखावा ॥ रागनियटूनकाढावा ॥
आलातरीकळोंनद्यावा ॥ जगामाजीं ॥ १२ ॥

राज्यामध्येंसकळलोक ॥ सलगीदेऊनकरावेसाफ ॥
लोकांचेमनाधाक ॥ उपजोंचिनये ॥ १३ ॥
बहुतलोकमिळवावे ॥ एकविचारेंभरावे ॥
कष्टकरोनीघसरावें ॥ म्लेंच्छावरी ॥ १४ ॥
आहेतितकेंजतनकरावें ॥ पुढेंआणिकमिळवावें ॥
महाराष्ट्रराज्यकरावें ॥ जिकडेतिकडे ॥ १५ ॥
अहंमतीलोकींधरावी ॥ हिंमतीचीतरवारकरावी ॥
चढतीवढतीपदवी ॥ पावालयेणें ॥ १६ ॥
शिवराजासआठवावें ॥ जीवित्वतृणवतमानावें ॥
इहलोकींपरलोकींतरावें ॥ कीर्तिरूपें ॥ १७ ॥
शिवराजाचेंआठवावेंरूप ॥ शिवराजाचाआठवावासाक्षेप ॥
शिवराजाचाआठवावाप्रताप ॥ भूमंडळीं ॥ १८ ॥
शिवराजाचेंकसेंबोलणें ॥ शिवराजाचेंकसेंचालणें ॥
शिवराजाचीसलगीदेणें ॥ कैसीअसे ॥ १९ ॥
सकलसुखाचाकरावात्याग ॥ करूनिसाधिजेतोयोग ॥
राज्यसाधनाचीलगबग ॥ कैसीकेली ॥ २० ॥
त्याहूनकरावेंविशेष ॥ तरीचक्षणवावेंपुरुष ॥
याउपरीआतांविशेष ॥ कायलिहावें ॥ २१ ॥

असें पत्र समर्थांनीं पाठविल्यानंतर संभाजी राजा बहुत संतोषी होऊन पत्र देणारास वस्त्रेंपात्रें जवाहीर देऊन त्या बरोबर " आज्ञे प्रमाणें करितों " क्षणोन उत्तर पाठविलें.

नंतर संभाजीराजानें सिंहासनारूढ व्हावयाचा निश्चय करून समर्थांस पाचारण करण्याकरितां उद्धोदेव यांस विनंतिपत्र देऊन परळीस पाठविलें. त्याणीं येऊन समर्थांचें दर्शन घेऊन पत्र दिलें. त्या समयीं समर्थांनीं उत्तम आहे ह्मणून दिवाकर भट गोसांवी यांस पत्र देऊन समारंभाकरितां पाठविलें.

त्यानंतर माघ शुद्ध ६ चे दिवशीं मंडळी सुद्धां अका आदिकरून संनिध बसली असतां, आतां आपल्यास हा लोक सोडून परलोकीं लवकर जाणें हें या मंडळींत कोणास कळलें किंवा न कळलें व सुचविलें असतां समजतात किंवा न समजतात व समजून उत्तर देतात किंवा न देतात याविषयीं परीक्षा पहावी असें मनांत आणून स्वामींनीं अर्धा श्लोक ह्मटला तो.

॥ श्लोक ॥

रविकुलटिळकाचावधसंनीधआला ॥
तद्दुपरिभजनाशींपाहिजेसांगकेला ॥

याप्रमाणें पूर्वार्ध ऐकिल्याबरोबर उद्धव गोसांवी याणीं त्याच श्लोकाचा उत्तरार्ध ह्मणून उत्तर दिलें तो–

॥ श्लोक ॥

अनुदिनिनवमीहेमानसींआठवावी ॥
बहुतलगबगीनेंकार्यसिद्धीकरावी ॥ १ ॥

याप्रमाणें उद्धव गोसांवी याणीं श्लोकाचा उत्तरार्ध ह्मटल्या बरोबर स्वामी बहुत संतोष पावून उद्धवा ! शाबास शाबास

असें बोलिले. त्या संधीस माघ कृष्ण ५ स चंदावराहून व्यंकोजी राजाकडून पंच धातूंच्या मूर्ती चार करून आणविण्यास ज्या पूर्वी स्वामींनीं सांगितल्या होत्या त्या येऊन पोंचल्या.

या विषयीं पूर्वीचो कथा अशी आहे कीं, स्वामी चंदावरीं गेले होते तेथें चार मूर्ति थोर थोर कराव्या असें मनांत आणून व्यंकोजी राजे यांस आज्ञा केली कीं, एक बहुत चांगला कारागीर आणावा. अशी स्वामींचो आज्ञा होतांच त्या सभेंत रघुनाथराव हनुमंते मुजुमदार होते त्यानीं विनंति केली कीं, महाराज ! जो बहुत चांगला कारागीर आहे त्याचे तर नेत्र गेले आहेत, त्या व्यतिरिक्त दुसरे आहेत, त्यांस आणविण्याविषयीं आज्ञा जाहल्यास आणवितों. समर्थ बोलले, जो तुह्मीं सांगितला तो तर कारागीर चांगला आहेना ? असो ! नेत्र गेले ह्मणून त्याचा अव्हेर करूं नये. त्याचेच हातून श्रींच्या मूर्ति करवावयाच्या यास्तव, त्यासच आणवावा. त्यावरून पुनः मुजुमदार यानें विनंति केली कीं, महाराज तो नेत्र गेल्यामुळें अगदीं उपयोगीं नाहीं, त्या व्यतिरिक्त दुसरे आहेत त्यांस आणवितों. हें ऐकून पुनः स्वामी बोलले कीं, आपणास रघुपतीच्या चांगल्या मूर्ती करवावयाच्या आहेत यास्तव तोच कारागीर पाहिजे सबब त्यासच आणवावा. अशी समर्थांची आज्ञा होतांच त्या अंध कारागिरासच आणविला, तो येऊन नमस्कार करून हात जोडून उभा आहे; तों स्वामींनीं कारागिरास आज्ञा केली कीं, श्रीरघपतीच्या मूर्ती करून द्याव्या. त्यानें

विनंती केली कीं, महाराज नेत्र गेले नसते, तर मूर्ती अति उत्तम करून दिल्या असत्या. तेव्हां स्वामी म्हणाले कीं, तुझे नेत्र आल्यावर तर करशील कीं नाहीं ? आज्ञेप्रमाणें माझे नेत्र आल्यावर करून देईन असें त्याणें म्हणतांच स्वामींनीं त्यास पुढें बोलावून नेत्रांवरून हात फिरविला, त्याबरोबर त्याचे दिव्य नेत्र जाहले. हें महाराजासुद्धां सर्व मंडळींनीं पाहून परम आश्चर्य मानून समर्थ साक्षात् हे ईश्वर आहेत असें मानिलें.

त्या समयीं रघुनाथराव हनुमंते याणीं विनंति केली कीं, महाराज ! मूर्ती कारागीर करणार आणि स्वामी करविणार हा लौकिक प्रकार आहेच. वस्तुतः मूर्ती करण्याचें किंवा करविण्याचें सामर्थ्य स्वामींचेंच आहे, हें ऐकून स्वामी हांसोन म्हणाले बावा ! ज्याची सेवा त्याचे हातूनच घेतली पाहिजे, असें रघुनाथराव हनुमंते यास उत्तर करून स्वामी कारागीर यास बोलले कीं, आह्मीं मेणाच्या मूर्ती करून देतों त्याप्रमाणें तेरा मण पंच धातूच्या मूर्ती करून द्याव्या. कारागीर बोलला, महाराज ! आज्ञेप्रमाणें मी मूर्ती तयार करून देतों परंतु माझी एक प्रार्थना आहे ती स्वामींनीं ऐकावी असें म्हणून नमस्कार करून बोलला कीं, समर्थांनीं मला नेत्र दिले, त्या योगें होणाऱ्या मूर्तीचें नखशिखापर्यंत अवलोकन जाहलें म्हणजे तेंच ध्यान सतत हृदयीं असावें, आणि मूर्ती जाहल्यानंतर पुनः माझे नेत्र पूर्ववत् व्हावे. असें म्हणतांच स्वामींनीं कृपा करून पुढें बोलावून मस्तकीं हस्त ठेविला,

आणि बोलले कीं, तूं त्या मूर्ती तयार करून त्यांचें पूर्णपणें अवलोकन कर ह्मणजे त्या मूर्ती तुझ्या अखंड ध्यानांत राहतील आणि नेत्रही तुझे पूर्ववत् होतील. असें सांगून स्वामींनीं मेणाच्या चार मूर्ती आपले हस्तें तयार करून कारागिराच्या स्वाधीन केल्या आणि समर्थ या प्रांतीं आल्यानंतर मागाहून कारागिरानें आज्ञेप्रमाणें मूर्ती तयार करून राजश्रींच्या स्वाधीन केल्या. आणि त्याचे नेत्र पूर्ववत जाहले.

नंतर व्यंकोजी महाराज यांणीं त्या मूर्तीचा बंदोबस्त करून नेत्रांस मेण लावून मल्हारराव लिंबदेव थेऊरकर व केशव गोसांवी यांजबरोबर मूर्ति स्वामींकडे रवाना केल्या. त्या ह्या मूर्ती आतां परळीस आल्या. त्या पाहून स्वामींनीं मूर्तीच्या नेत्रांवरील मेण काढून अवलोकन केलें, तों सांगितल्याप्रमाणें यथास्थित ध्यान पाहतांच स्वामी बहुत संतोष पावले आणि आपण ज्या खोलींत निद्रा करीत होते तेथें सिंहासन करून त्या मूर्तीची स्थापना करून अर्चा करविली आणि पुढें या मूर्तीचें अर्चन पूजन करतील त्यांजवर श्री कृपा करतील, असें बोलले. त्या दिवसापासून सिंहासनावर मूर्ती व आपण पलंगावर नेहमीं असतां कोणे एके दिवशीं श्रीरघुपतीच्या मूर्तीस स्वामींनीं प्रार्थना केली कीं, आज्ञेप्रमाणें श्रीकृष्णातीरीं येऊन जगदुद्धार केला, आणि करविला, उपासनाही सामर्थ्यानुरूप वाढविली, आतां हा संप्रदाय श्रीकृपेंकरून सतत चालावा, या संप्रदायांत भावार्थी दीन बहुत आहेत त्यांज-

वर कृपा करून समर्थांनीं दर्शन देऊन मुक्तीस न्यावें. अशी स्वामींची प्रार्थना ऐकून श्रीरघुपती बोलले कीं, तुह्मीं पुरश्चरणाचा नेम केला आहे त्याचप्रमाणें सर्वत्रांनीं त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप केल्यास तुह्मीं बोलल्याप्रमाणें दर्शन देऊन मुक्तीस पाठवीन.

त्यानंतर समर्थांनीं आकास बोलावून आज्ञा केली कीं, या मूर्तीची पूजा करण्याकरितां अर्चनविधि करून सांप्रत पूजा केली आहे. पुढें या मूर्तीची व चाफळीं श्रीची पूजा अर्चा करून संस्थान संभाळून उपासनामार्ग चालवा. नंतर दुसरे दिवशीं स्वामी प्रातःकाळीं उठून मूर्तीस साष्टांग नमस्कार करून त्यांच्या सन्मुख पायांत पादुका घालून दिगंबर होऊन भूमीवर बसते झाले. त्या समयीं जिजोजी काटकर मुद्राधारी व समस्त गडकरी आदिकरून सर्व मंडळी खोलीबाहेर दर्शनाकरितां येऊन उभी राहिली, तेव्हां खोलीचे आंत आका व उद्धव गोसांवी मात्र होते: त्याणीं स्वामीस प्रार्थना केली कीं, महाराज मुद्राधारी बाहेर दर्शनास आले आहेत, त्यांस येण्याविषयीं आज्ञा व्हावी. तेव्हां समर्थांनीं येऊं द्या असें ह्मटल्यावरून जिजोजी काटकर, कारखाननीस, फडनीस व सबनीस यांणीं येऊन दंडप्राय नमस्कार करून साखर व मनुका आणून पुढें ठेविल्या, आणि विनंति केली कीं, महाराज आज नऊ दिवस जाहले, स्वामींनीं उदकस्पर्शही केला नाहीं, यास्तव आज तरी कृपा करून साखरपाणी घ्यावें. तेव्हां समर्थांनीं उत्तम आहे असें ह्मणून आकांनीं पाणी करून दिलें तें वाटी भरून

माशन केलें. नंतर त्यांस विडे देववून बाहेर बसा ह्मणून आज्ञा केली, त्यावरून सर्व बाहेर बसते जाहले. खोलींत आका व उद्धव गोसांवी मात्र होते. त्यांणीं महाराज ! पलंगावर चलावें, अशी प्रार्थना केली असतां आमच्यानें उठवत नाहीं, तुह्मींच उठवा, असें समर्थ बोलले. तेव्हां आका व उद्धव गोसांवी उचलावयास गेले, तों दोघांच्यानें स्वामी उचलेनात ह्मणून चौघे मिळून उचलूं लागले, तरी उचलेनात. तेव्हां प्रार्थना केली कीं, स्वामी आपण उचलत नाहीं हें काय ? स्वामी बोलले कीं, तुह्मीं सर्व एकीकडे व्हा असें ह्मणतांच सर्व एकीकडे जाहले. तेव्हां समर्थांनीं श्रीरघुपतीकडे अवलोकन करून ध्यान धरिलें तें पाहून आका व शिष्य मंडळी बहुत श्रमी होऊं लागले. तेव्हां स्वामी बोलले कीं, तुह्मीं आजपर्यंत माझे सेवेस राहून बहुत प्रकारें वेदांत श्रवण केला असून या समयीं श्रमी होतां हें काय ? अरे अध्यात्म ऐकिल्याचें हेंच फल कीं काय ? त्या समयीं अकानीं हात जोडून विनंति केली कीं, महाराज ! श्रमी व्हावें व ममतेंत गुंतावें हें स्वामींनीं कांहींच ठेविलें नाहीं, परंतु या सगुण मूर्तीचें दर्शन इतःपर व्हावयाचें नाहीं ह्मणून श्रम वाटतात. हें ऐकून स्वामींनीं एक अभंग ह्मटला तोः--

॥ अभंग ॥

माझी काया गेली खरें, परि मी आहें जगदाकारें ॥
ऐका स्वहित उत्तरें, सांगेन तीं ॥ १ ॥

नका करूं खटपट ॥ पहा माझा ग्रंथ नीट ॥
तेणें सायुज्याची वाट ॥ ठायीं पडे ॥ २ ॥
राहा देहाच्या वीसरें ॥ वर्तूं नका वाईट बरें ॥
तेणें मुक्तीचींही द्वारें ॥ चोजवीती ॥ ३ ॥
रामीं रामदास ह्मणे ॥ सदा स्वरूपीं अनुसंधान ॥
करा श्रीरामाचें ध्यान ॥ निरंतर ॥ ४ ॥

असा अभंग स्वामींनीं सांगून सर्वत्रांचें समाधान केलें. तेव्हां आकांनीं विनंति केली कीं, महाराज परमार्थ दृष्टीनें स्वामी जगदंतरीं आहेत हें खरें, परंतु आजपर्यंत प्रत्यक्ष दर्शन असून परस्पर संभाषणादि व्यवहार होत होता, तो नाहींसा होणार; याविषयीं खेद होतो. त्याजवरून स्वामी बोलले कीं, दासबोध व आत्माराम हे दोन ग्रंथ पहावे व त्यांचीं पारायणें करावीं, ह्मणजे आह्मांशीं प्रत्यक्ष भाषण केल्यासारखें होईल. त्या समयीं सर्व मंडळी खोलीच्या बाहेर उभी व द्वारासंनिध उद्धव गोसांवी व केशव गोसांवी व शिवराम गोसांवी व त्यांची बहीण व उद्धवपंत इतके होते. स्वामींच्या संनिध आका मात्र असतां समर्थांनीं एकवीस वेळां हरहर शब्द करून श्रीराम असें ह्मणून मूर्तीकडे अवलोकन केलें; तों त्यांच्या मुखांतून दिव्य तेज निघून मूर्तीच्या मुखांत प्रविष्ट जाहलें. तो दिवस [शालिवाहन शके १६०३ दुर्मुखनामसंवत्सरीं माघ वद्य ९ मंदवारीं दोनप्रहरीं स्वामींनीं देह ठेवून निजरूपीं प्रवेश केला.]

नंतर सर्व मंडळींनीं व आकानीं बहुत शोक करून देहाचें सार्थक करावयाचा विचार केला, तेव्हां देहदहनाच्या जागेविषयीं विचार चालला असतां कोणी बोलले कीं, पूर्वी मठाचे उत्तरभागीं पटांगण आहे त्यांत खळगा आहे तो भरून काढावा अशी शिवाजी माहाराजांची आज्ञा जाहली असतां स्वामी बोलले होते कीं, खळगा भरून काढूं नका पुढें उपयोगी पडेल. त्यावरून तो खळगा अद्यापि तसाच ठेविला आहे. त्याठिकाणीं देहदहन व्हावें. हें ऐकून आकासही त्या गोष्टीचें स्मरण जाहलें. नंतर त्याच खळग्यांत स्थळशुद्धि करून बिल्व व तुळसीकाष्ठानें समर्थांच्या देहाचें दहन केलें. स्वामींचें उत्तरकार्य यथाविधि करण्यास संभाजी राजे यांजकडून रामचंद्रपंत अमात्य बहुत द्रव्य घेऊन आले आणि उत्तरकार्य उद्धव गोसांवी यांजकडून यथासांग करविलें. नंतर तेथें समाधी बांधून चंदनाचा ओटा समर्थांचे शिष्य तारळेकर गोसांवी याजकडून करवून त्यावर पादुका स्थापिल्या आणि लहानसें देवालय बांधिलें. अस्थी जमा करून भागीरथीस नेण्याकरितां चांफळी मठासमोर वृंदावन करून तेथें ठेविल्या.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें स्वामींचा निर्याणसमय संन्निध आला असतां त्याच संधीस शिवाजीचे पुत्र संभाजी राजे यांस राज्याभिषेक होऊन सिंहासनारूढ होण्याचा तयारी झाल्यामुळें राजश्रींकडून जें स्वामींकडेस बोलावणें आलें होतें, त्यास समर्थांनीं सांगितलें होतें कीं, आमची प्रकृति नीट नाहीं, याकरितां येणें होणार नाहीं, परंतु आमचेकडून कोणास तरी पाठवूं. त्याप्रमाणें समर्थांनीं

दिवाकर गोसांवी यांस आमच्या वतीनें पाठविले आहेत असें पत्रोत्तर देऊन स्वामींनीं रायगडीं पाठविलें होतें. तेथें राज्याभिषेकादिसमारंभ झाल्यानंतर स्वामी समाधिस्थ जाहले. हें वर्तमान ऐकतांच संभाजीराजे यांस विचारून दिवाकर गोसांवी परळीस आले.

नंतर चंदावराहून श्रीसमर्थांचे दर्शनाकरितां भिमाजीबावाही आले. परंतु ते आले त्यादिवशीं समर्थांस निजधामास जाऊन तीन दिवस जाहले होते. त्याणीं हें वर्तमान ऐकून फार दुःख केलें. तेव्हां भिमाजीबावा यांस समर्थांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांचें समाधान केलें. त्याप्रमाणेंच आका व उद्धव व वासुदेव गोसांवी यांसही दर्शन दिलें. (समर्थ परधामास गेल्याचे सविस्तर वर्तमानाबद्दल भिमाजीबावा यांणीं ५० ओव्या लिहिल्या आहेत) नंतर एक संवत्सरपर्यंत तेथें वास करून उद्धवादि मंडळींचा निरोप घेऊन भिमाजीबावा चंदावरास परत जाते जाहले.

नंतर आका आदिकरून सर्व मंडळीनीं मिळून समाधीवर लहानसें देवालय बांधून त्यांत श्रीरघुपतीच्या मूर्ती स्थापून पूजा करीत असतां एकेदिवशीं संभाजीराजे व रामचंद्रपंत अमात्य हे श्रीचे दर्शनास आले असून, समाधीचे दर्शनास गेले तों लहानसें देवालय पाहिलें, तेव्हां देवालय मोठें करावें असें मनांत आणून, राजश्रीनीं समाधीसुद्धां मोठें देवालय करविलें. नंतर आका आदिकरून सर्व मंडळींनीं संभाजीराजे व रामचंद्रपंत अमात्य यांस सांगून प्रतिवर्षी शके १६०४ दुंदुभिनामसंवत्सर माघ वद्य प्रतिपदेपासून

उत्साहास प्रारंभ करावा आणि नवमीस मुख्य दिवस करून दशमीस प्रातःकाळीं लळित करावें, याप्रमाणें पुण्यतिथीची नेमणूक करविली.या उत्साहाचा अधिकार चाफळच्या उत्साहाप्रमाणें आकाकडेसच होता.

हें श्रोत्यांनीं श्रवण करून पुन्हा हनुमंतस्वामी यास विनंती केली कीं, महाराज समर्थांच्या मागें आकानीं सेवा केली. नंतर गंगाधर स्वामी यांस शाहुमहाराज याणीं आणविलें व सांप्रत आपण सेवा करीत आहां याचें साद्यंत वर्तमान कथन करावें; त्याजवरून हनुमंतस्वामी याणीं पुढें सांगण्यास आरंभ केला तो.

समर्थांची पूर्वी आकास तूं श्रीची सेवा करावी, याविषयीं आज्ञा झालीच होती. त्याप्रमाणें चाफळ येथें आकाच श्रीची सेवा करूं लागलो असतां, आकाच्या हाताखालीं दिवाकर गोसांवी व दत्तोबा गोसांवी जामगांवकर हे होते; त्यांच्या अनुमतानें आका सेवा करीत असे. खर्चास द्रव्य लागेल तें रामचंद्र निळकंठ आमात्य व खंडोबल्लाळ चिटणीस हे राजद्वाराकडून पुरवीत असत व श्रीस शिवाजी महाराजानीं ज्या गांवचीं पत्रें करून दिलीं होतीं, त्या गांवची वहिवाट नरसोमलनाथ आंबरखाने हे करीत. उद्धव गोसांवी हे समर्थांच्या पुण्यतिथीस इंदूर किंवा टांकळी येथून येत. ते रामनवमीचा उत्साह झाल्यानंतर माघारे जात. त्या वेळेस वर्षभर जो कांहीं व्यवहार झाला असेल तो आका व दिवाकरभट, नरसोमलनाथ व खंडोबल्लाळ चिटणीस यांणीं उद्धवगो-

सांवी यांस समजवावा. कांहीं न्यूनाधिक करणें झाल्यास उद्धव गोसांवी आज्ञा करीत त्याप्रमाणें ते व्यवस्था ठेवीत. याप्रमाणें चालत असतां पुढें राज्यक्रांति बहुत होऊन त्या संधींत संभाजी महाराज यांस यवनांनीं संगमेश्वराकडून तुळजापुरास धरून नेलें. तथेंच त्यांचा काळ १६१० यावर्षी झाला. नंतर राज्यांत यवनांनीं फारच दंगा मांडिला.

नंतर राजाराम महाराज गादीवर बसले. त्याच संधींत शाहुमहाराज यांस यवनांनीं दिल्लीस नेलें. इकडे रामचंद्र बावा व शामजी बावा असे श्रेष्ठांचे दोन पुत्र जांबेस होते. त्यांत वडील रामचंद्रबावा यांस पुत्र झाला. त्याचें नांव गंगाधर ठेविलें. नंतर शामजीबावा यांचा काळ शके १६१५ चैत्र शुद्ध १० स झाला. यानंतर रामचंद्रबावा यांस दुसरा पुत्र झाला. त्याचें नांव शामजीबावा असें ठेविलें. इकडे यवनांची गर्दी झाली. तेव्हां पंत आमात्य यांचे विचारें श्रीरघुपतीच्या मुर्ती चांफळ खोऱ्यांत वाघापुरचे सडचावर नेऊन तेथेंच वस्ती केली, आणि उत्साहाचें साहित्य आमात्य यांणीं पुरविलें. पर्शराम त्रिंबक समशेर बहाद्दरी निसबत आमात्य यांणीं समाधीचें द्वार चिणून त्यांत श्रीमारुतीची मूर्ती मात्र ठेविली आणि श्रीरघुपतीच्या मूर्ती तर वासोट्यास नेऊन ठेविल्या त्यां बरोबर उद्धव बावा गेले होते, पुढें सातारा व परळी यवनांपासून पर्शरामपंत याणी परत घेतली. तेव्हां वासोट्याहून श्रीच्या मूर्ती परत आणविल्या. नंतर राजारामराजे

चंदीहून परत आले. तेव्हां संस्थानचा बंदोबस्त करून वाघापुरचे सडचावरूनही श्रीच्या मूर्ति चांफळीं आणविल्या. आणि आमात्य यांस सांगितलें कीं, संस्थानचें काम पूर्वीच्या बेतानें चालवावें. उद्धव गोसांवी तर येथें नेहमीं असत नाहींत, तर त्याणींही आतां संस्थानीं असावें. आणि समर्थांची आज्ञा रामचंद्र बावा यांस आणण्याविषयीं आहे. त्याप्रमाणें त्यांजला आणावें. असें आमात्य यांस सांगून आपण स्वारीस गेले. ते स्वारीहून परत येऊन सिंहगडीं मुक्काम केला. तेथेंच शके १६३१ यावर्षीं त्यांचा काळ झाला. पुढें आमात्य यांणीं रामचंद्र बावा यांस आणविण्याचा उद्योग चालविला. इतक्यांत वर्तमान आलें कीं, रामचंद्र बावा यांचाही काळ झाला, त्यामुळें तो उद्योग तसाच राहिला.

शाहुराजे यांस जे यवनांनीं धरुन दिल्लीस नेले होते ते शके १६२९ सर्वजिन्नाम संवत्सरांत मुक्त होऊन आपले देशीं आले. नंतर त्यांणीं पुनः आपलें राज्य आक्रमण केलें. नंतर ते परळीस श्रीसमर्थांच्या समाधीचें दर्शन घेऊन श्रीरघुपतीचें दर्शन घेण्याकरितां चांफळास आले. तेथें येतांच उत्साह व महोत्साह यांचा पुनः बंदोबस्त करून दिला; तेसमयीं तीर्थस्वरूप मातोश्री आका याणीं समर्थांचें चरित्र शाहुराजास आरंभापासून तें समाधीपर्यंत सर्व कथन केलें आणि त्यांत आमच्याही वडीलांचा काळ जाहलेला कथन केला; त्याजवरून छत्रपती यांणीं आह्मांस जांबेहून आणविले ते आह्मीं शके १६३२ विकृतीनाम संवत्सर श्रावण

शुद्ध ५ स सज्जनगडीं येऊन दाखल जाहलों, तेव्हांपासून आह्मींच श्रीची सेवा करून आहों असें गंगाधरस्वामी याणीं सर्व भक्त-मंडळींस निवेदन केलें त्या वेळेस आह्मीं जें श्रवण केलें तें तुह्मांस त्यांजपासून श्रवण करविलें असें हनुमंतस्वामी याणीं सांगून ह्मणाले कीं, पूर्वी मातोश्री आका याणीं शाहूमहाराज यांस सांगितलें कीं, रामचंद्रबावा व शामजीबावा हे उभयतां श्रेष्ठांचे पुत्र जांबेस होते; त्यांस आणविण्याची श्रीची आज्ञा होती, परंतु त्या उभयतांचा तर काळ झाला; सांप्रत रामचंद्रबावा यांचे पुत्र उभयतां ज्येष्ठ गंगाधर गोसांवी व कनिष्ठ शामजी गोसांवी असे आहेत; त्यांस आणावितें पाहिजे. त्यावरून आज्ञा प्रमाण ह्मणून शाहूमहाराज यांणीं कारकून व पालखी पाठवून गंगाधरबावा यांस आणविलें, ते माहुलीस आले तेच दिवशीं शाहूमहाराज श्रीकृष्णास्नानास गेले होते, तेथें कारकुनानें येऊन विनंति केली कीं, महाराज गंगाधरबावा आले आहेत, ते चावरे उपाध्ये यांचे घरीं उतरले आहेत. असें ऐकतांच महाराज तेथें गेले. तों गंगाधरगोसांवी स्नानसंध्या करून नेत्र लावून ध्यानस्थ बसले होते; हें पाहून महाराज चार घटिकापर्यंत उभे राहिले. त्याकाळीं जवळची मंडळी गडबड करूं लागली. तेव्हां महाराजयांणीं हस्तसंकेत करून सर्वांस सांगितलें कीं, गडबड करूंनका, असें सुचवून महाराज साहा घटिकापर्यंत तसेच उभे राहिले. तथापि बावा नेत्र उघडीनात व त्यांचें आसनही हालेना; हें पाहून राजश्री बहुत संतुष्ट होऊन खंडेरावबल्लाळ चिटणीस व श्रीपतराव प्रतिनिधी यांशीं

बोलले कीं, या शाहूपुढें दुसऱ्याचें असें आसन कधीं ठरावयाचें नाहीं, तस्मात् हे गोसांवी परम योग्य आहेत. किंबहुना स्वामींचा वंश धन्यच आहे. असें परस्परें हळूहळू बोलत आहेत, तों गंगाधर गोसांवी यांणीं ध्यान विसर्जन करून महाराज यांजकडे अवलोकन करितांच महाराज नमस्कार करून पुढें उभे राहिले असतां बसावयाची आज्ञा जाहल्यानंतर महाराज खालीं बसले. आणि क्षणभर परस्परें कांहीं संभाषणें होऊन आज आपण येथेंच राहण्याचें करावें आणि उदईक साताऱ्यास येण्याविषयीं बोलावणें पाठवूं; त्याप्रमाणें येण्याचा विचार व्हावा. अशी विनंति करून महाराज स्वारीसुद्धां साताऱ्यास गेले.

दुसरे दिवशीं राजश्रींनीं पंतप्रधान पिंगळे, श्रीपतराव प्रतिनिधी, व खंडेराव बल्लाळ चिटणीस यांस पाठवून बहुत समारंभानें गंगाधर स्वामीस साताऱ्यास घेऊन गेले. तेव्हां पोंवईपर्यंत महाराज स्वतः सामोरे आले आणि चादर घालून दर्शन घेऊन शहरांत आणून सबनीस यांचे घरीं बिऱ्हाड दिलें. तेथें पांच चार दिवस ठेवून घेऊन आपण नित्य दर्शनास येत असून तर्तुद राखण्याकरितां राजश्रीनीं नेहमी खंडेराव बल्लाळ यांस जवळ ठेविलें होतें. नंतर उत्तम मुहूर्तावर सर्व मंडळी बरोबर देऊन मोठ्या समारंभानें गंगाधर स्वामींस परळीस रवाना केले, ते शके १६३२ माघ शु० ५ स परळीचे दरवाज्याखालीं आले तेथें मुद्राधारी सयाजी धुळेप्रभृति मंडळी उद्धव गोसांवी आकासहवर्तमान

सामोरे येऊन आका व उद्धव गोसांवी नमस्कार करणार तोंच उभयतां बंधूंनीं पालखींतून उतरून आका व उद्धव यांचे चरणीं मस्तक ठेवूं लागले. तों उद्धव गोसांवी यांणीं उभयतां बंधूंस वरचेवर उचलून पोटांशीं धरिलें आणि उद्धव व आका बोलली कीं, तुह्मीं समर्थांचे वंशज तस्मात् तुंमचे पायांवर आह्मीं मस्तक ठेवावें; तुह्मीं आह्मांस नमस्कार करूंनये. हें ऐकून गंगाधरस्वामी बोलले कीं, तुह्मीं समर्थांचे कन्या व पुत्र आणि आह्मीं तर समर्थांचे नातु, तेव्हां तुह्मांस नमस्कार करण्याचा आह्मांस अधिकार आहे. तेव्हां उद्धव व आका बोलली कीं, तुह्मीं वयानें लहान असलां तथापि तुळशीचीं रोपें अहां; असें ह्मणून मोठ्या गौरवानें उभयतांस किल्लयावर नेऊन समाधीचें दर्शन झाल्यानंतर शर्करा वांटली. तेव्हां मुद्राधारी यांणीं विनंति केली कीं, तोफा सोडण्याविषयीं आज्ञा झाली आहे. तस्मात् आपण सांगितल्यास सोडवितों. उद्धव गोसांवी याणीं बरें आहे असें ह्मटल्यावरून तोफा सोडल्या. नंतर तिसरे दिवशीं राजश्रीनीं येऊन गंगाधरबावा व आका व उद्धवगोसांवी यांस वंदन केलें. आणि विनंति केली कीं, आज्ञेप्रमाणें गोसांवी यांस आणविले. आतां गंगाधरबावा बहुत योग्य असून प्रत्यक्ष समर्थांचे वंशज सेवा करण्यास आले. याउप्पर काय आज्ञा होणें ती व्हावी. त्यावरून उद्धव गोसांवी बोलले कीं, मुलें अज्ञान आहेत. यास्तव संस्थानचा अभिमान आपल्यास असावा. त्याजवरून महाराजांनीं विनंति केली कीं, राज्य त्यांचेंच आहे. मी फक्त सेवेचा अधि-

कारी आहें. आज्ञा होईल त्याप्रमाणें सेवा करीन असें म्हणून खंडो बल्लाळ चिटणीस यांस आज्ञा केली कीं, पूर्वी संस्थानचा बंदोबस्त तुमचेकडे होता त्याप्रमाणें तुह्मीं बंदोबस्त राखावा. उणें पडल्यास सरकारांतून पूर्ण करवावें, असें सांगून तेथें त्रिरात्र राहून शाहू महाराज आज्ञा घेऊन गेले, ते समर्थांचे पुण्यतिथीस व रामनवमीस येत व केव्हां केव्हां मध्यें ही येत, गंगाधरस्वामी यांचें लग्न इकडे येण्याचे पूर्वी आंबेडकर देशमुख यांचे कन्येशीं केलें होतें. तिचें नांव पार्वतीबाई ती जांबेसच वारली. हें वर्तमान राजश्रीस कळल्यानंतर आकाचे विचारें राजश्रीनीं विजापुरचे कुळकर्णी राहत होते त्यांची कन्या केली. नंतर गंगाधरबावा आका सहवर्तमान श्रीचे दर्शनाकरितां जांबेस गेले.

शामजीबावा यांस जी गुर्वीकर कुळकर्णी यांची कन्या केली होती, ती वारल्यानंतर आंबेडकर देशमुख यांची कन्या केली. गंगाधरबावा यांचा तिसरा विवाह परळीवैजनाथ येथील ब्राह्मण वैदीक होते, त्यांची कन्या केली. तिचें नांव रमाबाई, त्यानंतर देशीं परळीस आले.

समर्थांचे मागें आकानें जातीनें २९ वर्षे संस्थानचा कारभार चालविला. उद्धवगोसांवी यांचा काल शके १६३२ फाल्गुन कृष्ण १ बुधवारीं टांकळीस झाला त्यांचे मागें केशवगोसांवी त्या संस्थानचें काम पाहूं लागले. तेव्हां त्यांणीं मनांत आणिलें कीं, आका वृद्ध आहेत. व गंगाधरस्वामी हे

माझेच स्थापित, तेव्हां यांस काय विचारावयाचें आहे; ह्मणून धनीपणा करूं लागले. तेव्हां खंडोबल्लाळ चिटणीस वगैरे यांणीं निषेध करून सांगितलें कीं, उद्धव गोसांवो धनीपणा करित होते, परंतु तसा अधिकार तुमचा नाहीं. तुमची मर्जी असेल तर कारभाऱ्याच्या नात्यानें रहावें. त्यावरून त्यांणीं विचार केला कीं, आपण येथें राहूं नये. तस्मात् समर्थांच्या अस्थि घेऊन महायात्रेस जावें, हें बरें. ह्मणून कल्याणगोसांवो यांस विचारावयासं गेले. तों त्याणीं सांगितलें कीं, तूर्त गडबडीचें कारण नाहीं. त्यावरून पुनः माघारे आले. याप्रमाणें केशवस्वामींनीं पांच चार खेपा केल्या. मग शेवटीं विचार केला कीं, आतां विचारावयास गेलें ह्मणजे आज्ञा देत नाहींत. यास्तव आपणच अस्थि घेऊन जावें ह्मणजे नको ह्मणणार नाहींत. या प्रमाणें निश्चय करून आकास व गंगाधर स्वामींस विचारिलें. त्यांणीं बरें आहे ह्मणून सांगितलें आणि खर्चाची बेगमी करून दिली.

नंतर केशवगोसांवी यांणीं समर्थांच्या अस्थि आषाढ शुद्ध द्वादशीस काढिल्या ते दिवशीं डोम गांवी कल्याण गोसांवो यांणीं अंतरज्ञानानें जाणून प्रातःकाळीं सर्व शिष्य मंडळीस बोलावून सांगितलें कीं, केशवास तूर्त अस्थि घेऊन जाऊं नये ह्मणून सांगत असतां त्याणें जलदी केली. बरें ईश्वर इच्छा. आतां समर्थ भागीरथीस्नानास निघाले. तेव्हां त्यांजबरोबर आमच्याही अस्थि

घाव्या. आह्मींही देह ठेवितों. तेव्हां शिष्य मंडळींनीं विनंति केली कीं, महाराज जरी केशव अस्थि घेऊन आला तरी तो येथें राहील. अथवा आज्ञा असल्यास गडी पाठवून त्यांस माघारा पाठवितों. त्याजवरून कल्याण गोसांवी बोलले कीं, आतां या गोष्टीचा उपयोग नाहीं. श्रीची इच्छा. त्याजवर जगन्नाथ गोसांवी यांणीं विनंति केली कीं, महाराज श्रीची सेवा पुढें कोणी करावी? तेव्हां आज्ञा झाली कीं, जगन्नाथानें करावी. तेव्हां जगन्नाथ यांणीं विनंती केली कीं, महाराज ही आज्ञा दुसरे कोणास व्हावी. मी त्याचे आज्ञेंत चालेन. कल्याण गोसांवी यांणीं उत्तम आहे ह्मणून मुधोबा गोसांवी यांस बोलावून त्यांचे गळ्यांत मेखळा घातली आणि सांगितलें कीं, श्रीची पूजा तुह्मीं करावी. आणि गंगाधर स्वामी यांचे आज्ञेंत चालावें. असें सांगून आपण रघुपतीच्या पुढें दर्भासन घालून बसले आणि राम या शब्दासरसा देह ठेविला, नंतर उत्तर कर्म यथाविधि मुधोबा गोसांवी यांणीं केलें.

तों तेरावे दिवशीं केशव गोसांवी येऊन पोंचले. त्यांचा सर्वत्रांनीं फार निषेध केल्यानें त्यांस फार वाईट वाटलें. नंतर केशव गोसांवी कल्याण गोसांवी यांच्याही अस्थि घेऊन निघाले. ते भागीरथीस जाऊन यथाविधि दोघांच्या अस्थी गंगेंत टाकिल्या आणि त्रिस्थळी यात्रा करून परत देशीं येऊन उंबरजेस श्रीमारुतीपाशीं राहिले. आकानें समर्थांच्या मागें ४० वर्षें ह्मणजे शके

१६४३ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस देह ठेविला. तिचें उत्तरकर्म गंगाधर बावा यांणीं यथासांग केलें व श्रीचे देवालयाचे ईशान्येस वृंदावन करविलें.

गंगाधर स्वामी श्रीची सेवा करोत असतां त्यांस पुत्रसंतति नसून दोन स्त्रियांस दोन कन्याच झाल्या. नंतर उभयतां स्त्रियांपैकीं कनिष्ठ स्त्री गरोदर असतां, महाराज यांणीं गंगाधरस्वामीस दोन्ही स्त्रियांसहवर्तमान साताऱ्यास स्वाभाविक नेलें होतें; तेथें अकस्मात् शके १६५६ मार्गशीर्ष वद्य १२ चे दिवशीं त्यांचा काल जाहला. ते वेळेस ज्येष्ठ स्त्रीनें पतीसहगमनाकरितां माहुलीस जाऊन सहगमन केलें. त्यांचें उत्तरकार्य शामजी बावांनीं यथाविधि करून ते साताऱ्यास आले. नंतर महाराजांनीं दर्शनास येऊन शामजी बावा यांस विनंति केली कीं, धाकटी बाई गरोदर आहेत, यांस पुत्र झाल्यास उत्तम. नाहींपेक्षां आपले ज्येष्ठ पुत्र लक्ष्मण गोसांवी यांस गंगाधर बावा यांचे पुत्र ह्मणवून अधिकार त्यांस द्यावा. तेव्हां शामजी गोसांवी बोलले कीं, महाराज संस्थान आपलें व अधिकारही आपलाच आहे, मर्जी असेल तसें करावें. याप्रमाणें सांगून परळीस गेले. पुढें गंगाधर बावा यांचे स्त्रीस कन्या जाहली. नंतर शके १६५७ चे सालीं महाराज चाफळीं उत्साहास येऊन शामजी बावा यांचे चिरंजीव लक्ष्मण गंगाधर गोसांवी असें ह्मणून त्यांस अधिकार देऊन गादीवर बसवून आपण साताऱ्यास गेले. त्या दिवसापासून लक्ष्मण स्वामी संस्थानाचा व सेवेचा सर्व अधिकार करीत होते.

लक्ष्मण बावा त्यांचे बावा स्वामी व रामचंद्र बावा [आबा स्वामी] असे उभयतां बंधू होते त्यांपैकीं बावा स्वामी चाफळीं असतां रामचंद्र बावा धाकटे बंधु जांबेस सूर्याजीपंत यांस ज्या श्रीनें मूर्ती दिल्या होत्या त्यांचें पूजन अर्चन पूर्ववत् प्रमाणें करीत असतां कोणे एके दिवशीं रात्रौ पंचपदी करून देवद्वार लावून येऊन रामचंद्र बावा [आबा स्वामी] निद्रेस गेले; तों मध्यरात्रीं अकस्मात् कुलुपासुद्धां कवाड उघडून कोलाहल जाहला आणि कवाडाचा शब्दही मोठा जाहला; तो ऐकून आबा स्वामी देवालयांत आले आणि कारभारी मंडळी व माणसें यांस हाका मारून विचारूं लागले कीं, कांकडआरतीच्या समयाशिवाय देवद्वार उघडावयाचें नाहीं; असें असतां द्वार कसें उघडलें. तेव्हां सर्वांनीं विनंति केली कीं, महाराज आह्मीं कोणी कवाड उघडलें नाहीं. असें ह्मटल्यावरून आपण खाशानिशीं येऊन देवालयांत गेले आणि पाहतात तों राम, सीता व लक्ष्मण, ह्या तीन्ही मूर्ती सिंहासनीं नाहींत, मात्र मारुतीचा मूर्ती आहे. असें पाहून कोण चोर आला याची चवकशी करावी, असें ह्मणून दरवाजा व दिंडी याची चवकशी करितात तों जशींचीं तशींच कुलुपें आहेत; हें पाहून बाहेरून तर कोणी आले नाहींत आणि देव तर गेले, हें कसें झालें. असा विचार करीत असतां देव आपुले आपणच गेले. असा निश्चय करून आबा स्वामींनीं बहुत खेद केला. [हा प्रकार शके १६८२ मार्गशीर्ष शुद्ध ८ विक्रमनामसंवत्सरीं झाला.] नंतर दुसरे दिवशीं आबा स्वामी यांणीं बाबा स्वामींकडे चांफळीं देव

गेल्याचें सविस्तर वर्तमान लिहून पाठविलें व आपण दुसरे दिवसापासून अनुष्ठानास प्रारंभ केला, तो प्रतिदिवशीं अर्धशेर खारीक व अर्धशेर दूध भक्षावें. याप्रमाणें अनुष्ठान एकवीस महिनेपर्यंत जांवेंत केलें.

इकडे बावा स्वामीस सर्व वर्तमान कळल्यानंतर त्यांणींही शिंगण वाडीच्या मारुतीपाशीं सत्रा महिनेपर्यंत गोमूत्र व सातूचें पीठ भक्षण करून अनुष्ठान चालविलें. याप्रमाणें उभयतां बंधु अनुष्ठान करीत असतां उभयतांस एकाच दिवशीं सारखाच दृष्टांत जाहला कीं, आह्मीं काशीस गेलों. आह्मांवरोबर मारुतीही येत होते, परंतु संस्थानचे संरक्षणार्थ त्यांस तेथें ठेऊन आलों आहों. तर तुह्मीं अतःपर निग्रह करूं नये. तुमचे सप्तपुरुषांपर्यंत तुह्मांस सोडावयाचें नाहीं. आतां मात्र दुसरी प्रतिमा करून जांबेस स्थापावी आणि पूर्व पद्धतीप्रमाणें सेवा करून रहावें. याप्रमाणें एक्यारात्रींच आज्ञा जाहल्यावर परस्परांनीं परस्परांकडे पत्र लिहून पाठविलें आणि उभयतांनीं अनुष्ठानें समाप्त केलीं. नंतर बावा स्वामी यांणीं आवा स्वामीस परळीस बोलावून आणिलें. त्यासंधींतच शामजी बावा यांचा काळ जाहला. नंतर शके १६८४ श्रावण शुद्ध ६ स चंदावरास सेतुराम गोसांवी व तुळजा महाराज यांजकडे बापूभट श्रोत्रिय यांस बावा स्वामी यांणीं पाठवून श्रीच्या दुसऱ्या प्रतिमा करवून आणविल्या. त्या मूर्ती बावा स्वामींनीं चांफळाहून येऊन शके १६९१ विरोधकृतनामसंवत्सरीं अर्चा करून स्थापन केल्या. त्या मूर्तीचें ध्यानः—

॥ श्लोक ॥

श्रीभानुज्वल भानु कोटिसदृशं, मंदस्मितं शामलं ॥
श्री सीतासहितं वराभयकरं, वामे सुमित्रा सुतं ॥
श्री वत्सांकित चाप बाणलसितं, वातात्मजं सन्मुखे ॥
श्रीरामेति पदत्रयान्वित सदा, ध्यायन्मनोमंदिरं ॥ १ ॥

या ध्यानाखेरीज दुसरीही प्रतिमा पराभिराम ध्यानाची आणविली. ती खडकी चिंचवली येथें तुकाराम बावा अभंग अतीतकर हे गंगाधर स्वामी यांचे शिष्य, त्यांचे मठीं स्थापिली. नंतर बावा स्वामी परत चांफळास आले.

याप्रमाणें जन्मापासून समाधिपर्यंत जाहलेलीं समर्थांचीं व त्यांच्या शिष्य वर्गांचीं चरित्रें परळीवर शके १६४५ चे सालांत लिहिलेली प्रत व शहापुरकर कुळकर्णी यांचे घरीं शके १६४७ चे सालांत लिहून ठेविलेली प्रत यांच्या आधारानें व परंपरेनें श्रवण केल्यावरून प्रश्न करणारे शिष्यमंडळीस हनुमंत स्वामी यांनीं सांगून आज्ञा केली कीं, या चरित्रांचें श्रवण मनन करून तुह्मीं पवित्र व्हाल आणि स्वामी कृपा करून तुमचा उद्धार करतील.

पुनः शिष्यमंडळींनीं हनुमंतस्वामींस प्रश्न केला कीं, समर्थांचीं चरित्रें सविस्तर आपण सांगितलीं तीं श्रवण केलीं.परंतु आतां समर्थांच्या बरोबरीचे जे जे साधू होते ते ते कोणेकाळीं निजधामाप्रत गेले हें सविस्तर कथन करावें. हें ऐकून हनुमंतस्वामींनीं उत्तर केलें कीं, समर्थांच्या बरोबरीचे साधू बहुत होते तितक्यांचे नि-

जधामी जाण्याचे काल माहितींत आहेत असें नाहीं परंतु गंगाधर स्वामींच्या सांगण्यावरून जितक्यांचे माहित आहेत तितक्यांचे सांगतों. श्रवण करा. श्रीवामनस्वामी शके १५१६ जयनाम संवत्सरांत वैशाख शु० ६ कोरेगांवीं समाधिस्थ झाले. श्री एकनाथ महाराज शके १५३१ फाल्गुनवद्य ६ स समाधिस्थ जाहले. तेवेळेस रामदास स्वामींचें वय बावीस महिन्यांचें होतें. समर्थ विद्यमान असतां तुकाराम महाराज शके १५७१ विरोधीनाम संवत्सरीं फाल्गुनवद्य २ सोमवारीं देहासहवर्तमान निजधामाप्रत गेले. बालस्वामी शके १५७६ वैशाख शुद्ध ६ स वारणातीरीं कोरेगांवीं समाधिस्थ जाहले. रघुनाथस्वामी ब्रह्मनाळकर शके १५८८ भाद्रपद शुद्ध २ स समाधिस्थ जाहले. जयरामस्वामी वडगांवकर हे वडगांवीं शके १५९४ भाद्रपदवद्य ११ गुरुवारीं समाधिस्थ जाहले. श्रेष्ठ व शिवछत्रपती यांचा निर्याणसमय पूर्वी सांगितलाच आहे. समर्थांचे मागें रंगनाथस्वामी निगडीकर हे निगडीस शके १६०६ मार्गशीर्ष वद्य १० स समाधिस्थ जाहले. त्यांचे ज्येष्ठ बंधु अप्पा शके १६०६ पौष शु० १५ स समाधिस्थ जाहले. आनंदमूर्ति शके १६१८ कार्तिक शुद्ध १४ स समाधिस्थ जाहले. अत्यास्वामी निगडीकर हे निगडीस शके १६२७ श्रावण शुद्ध ८ स समाधिस्थ जाहले. याप्रमाणें सर्व साधुवृंदांनीं आपआपलीं चरित्रें करून ते निजधामाप्रत गेले.

रामचंद्रबावा (अबास्वामी) यांचा काळ शालिवाहन शके १६९३ खरनामसंवत्सरे वैशाख वद्य १२ स जांबेस जाहला. इकडे बावास्वामीही श्रीची व समाधीची सेवा करून संस्थानचा अधिकार करून शके १७०५ शुभकृतनामसंवत्सरे चैत्र वद्य ७ स समाप्त जाहले. तेवेळीं आमचें वय (१५) वर्षांचें होतें. ह्मणजे शके १६९० यानंतर आह्मीं श्रीरघुपतीची व श्रीसमाधीची सेवा करून आहों. हे समर्थांचें चरित्र श्रवण केलें असतां समर्थांनीं केलेला दासबोध ग्रंथ श्रवणकेल्याचें फळ आहे. असें श्री हनुमंतस्वामी यांणीं सर्व शिष्य समुदायास सांगून कथा समाप्त केली.

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

इति श्रीरामदासस्वामींचे चरित्रांची बखर समाप्त.



श्रीसमर्थ रामदास स्वामी यांचे गुरुपरंपरेचे अभंग.

आदिनारायण, सद्गुरुआमुचा ॥ शिष्य जाहला त्याचा, महा विष्णू ॥ १ ॥ तयाचा हो शिष्य, तो जाणावा हंस ॥ तेणें ब्रह्मयास, उपदेशीलें ॥ २ ॥ ब्रह्मदेवें केला, उपदेश वसिष्ठा ॥ तेणें धरी निष्ठा, शुद्ध भावें ॥ ३ ॥ वसिष्ठ उपदेशी, श्रीरामरायासी ॥ रामें रामदासाशीं, उपदेशीलें ॥ ४ ॥ उपदेश देउनी, दीधला मारुती ॥ स्वयें रघुपती, निरवीन ॥५॥ निरवितां तेणें, झालों रामदास ॥ संसारीं उदास, जीवेंभावें ॥ ६ ॥ म्हणूनि आमूचें, कुळीं कुळदैवत ॥ राम हनुमंत, आत्मरूप ॥ ७ ॥ आत्मरूपीं झाला, रामींरामदास ॥ केला उपदेश, दीनोद्धारें ॥ ॥ ८ ॥ भाविकां भजना, गुरुपरंपरा ॥ सदा जप करा, रामंत्र ॥ ९ ॥ राममंत्र जाणा, त्रयोदशाक्षरी ॥ सर्व वेद शास्त्रीं, प्रगटची ॥ १० ॥ प्रगटची राम, मंत्र हा प्रसिद्ध ॥ तारीतसे बद्ध, जड जीवां ॥ ११ ॥ जड जीवां तारी, सकळ चराचरीं ॥ देह काशीपुरी, धन्य तेणें ॥ १२ ॥ मंत्र हा तारक, ॐकार स्वरूप ॥ देव विश्वरूप, मुमुक्षूंसी ॥ १३ ॥ येणें मंत्रें जाणा, मुमुक्षु होय बद्ध ॥ साधक प्रसिद्ध, सिद्ध होती ॥ १४ ॥ सिद्ध होय राम, तारक जपतां ॥ मुक्तिसायुज्यता, रामदासीं ॥ १५ ॥

समाप्त.